म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. ८२३

# केतकर

ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकर यांचे चरित्र

द. न. गोखले

मौज प्रकाशन
काशन गृह, मुंबई ४

किंमत साडेबारा रुपये

REFBK-0010346



द. न. गोखले

# डॉ. केतकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २८८११ वि: चरित्र
क्रमांक ........ नों: दि:

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०३४६

# डॉ. केतकर

ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकर यांचे चरित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २५८११ वि: चरित्र
क्रमांक ८२३ नों: दि: २५।११।७९

ग्रंथालय ठाणे
१०३४६

द. न. गोखले

REFBK-0010346

मौज प्रकाशन गृह, मुंबई ४

किंमत साडेबारा रुपये

मौज प्रकाशन : ४०

पहिली आवृत्ति : २० सप्टेंबर १९५९
© द. न. गोखले, १९५९

वेष्टनावरील चित्र :
द. ग. गोडसे

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, मुंबई.

प्रकाशक :
वा. पु. भागवत
मौज प्रकाशन गृह,
खटाववाडी, मुंबई.

ज्यांनी आपल्या घरकुलांमध्ये
केतकरांसारख्या वादळाला
थारा दिला त्यांना—

... स्थळप्रत.
दि. ........
अनुक्रम ........
क्रमांक ........ नों. दि. ........

# लेखकाचे निवेदन

ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांचे शक्य तेवढे 'सत्य' नि 'सजीव' चरित्र लिहिण्याचा एक प्रयत्न या पुस्तकात मी केला आहे. वाचकांनी व टीकाकारांनी या प्रयत्नाकडे सहृदयतेने बघावे आणि तो गोड करून घ्यावा, अशी त्यांना नम्र विनंती आहे.

व्यक्तींचे निरनिराळे साचे लोककल्पनेत तयार झालेले असतात; आणि प्रत्येक व्यक्तीला एखाद्या साच्यात घालून, त्या साच्याचे सर्व गुणधर्म त्या व्यक्तीत खरोखर नसले तरी तिला ते चिकटवावे अशी प्रवृत्ती असते. पण हे चरित्र सत्य व्हावे, म्हणून अशी प्रवृत्ती चार हात दूर ठेवण्याची मी धडपड केली आहे.

चरित्राचा जो आशय असेल त्यामधून आपल्या सौंदर्यकल्पनेशी जुळणारा एखादा आकृतिबंध तयार व्हावा, असे केव्हाकेव्हा कलापिपासू लेखकाला वाटत असते. मग सुंदर आकृतिबंध स्वाभाविकपणे तयार झाला नाही, तर चरित्राचा आशयच कळत न कळत फिरविण्याची त्या लेखकाला बुद्धी होते. पण एखादा आकृतिबंध कृत्रिमपणे बनविण्याचा मोह या पुस्तकात मी सत्यदर्शनासाठी शक्य तेवढा टाळला आहे.

केतकर हे एक असामान्य विचारवंत असल्यामुळे विचार हे त्यांच्या जीवनाचे एक महत्वाचे नि अविभाज्य अंग होते. तेव्हा चरित्रात त्यांचे विचार मी सांगितले आहेत, त्यांच्या संशोधनाची माहिती दिली आहे, अन् त्यांच्या वाङ्मयाचा आशयही निवेदन केला आहे. त्या साऱ्यातून केतकर दिसावेत, अशी माझी अपेक्षा आहे.

कोणाही व्यक्तीच्या आयुष्यात नवनव्या घटना नित्य घडतच असतात; इतकेच नव्हे तर त्या व्यक्तीचे व्यक्तित्वही सतत बदलत असते. केतकरांचे व्यक्तित्व विशेषच बदलते नि गतिमान होते. अर्थात 'केतकर नेहमी असे होते' अशी समजूत न ठेवता, 'ते निरनिराळ्या वेळी निरनिराळे होते', 'त्या निराळेपणात काही सूत्र होते' अशी भूमिका ठेवून मी हे चरित्र रेखाटले आहे.

केतकर ही एक multi-dimensional किंवा 'बहुमिती' व्यक्ती होती. त्यांच्या व्यक्तित्वाला अनेक अंगे होती आणि ती अंगे सकृद्दर्शनी भिन्न जातीची वाटावी,

अशी होती. अशा अनेक अंगांचे चित्रण करावयाचे व त्या अंगांची बदलती रूपे दाखवावयाची तर कथनसूत्र तुटल्याचा भास होतो. एकच भावना छेडीत गेल्याने जी रसोत्पत्ती व्हावयाची ती खुंटल्यासारखी वाटू लागते. पण कथनसूत्र तुटल्याचा भास झाला, रसोत्पत्ती खुंटल्यासारखे वाटले, तरी त्यांचे multi-dimensional व्यक्तित्व जसेच्या तसे चितारण्याचा आग्रह मी धरला आहे. पाचपंचवीस वाद्यांचा वाद्यवृंद श्रवण करताना मनाला जसा आनंद होतो, थोडासा तसा आनंद अशा चित्रणातून वाचकांना मिळू शकेल, अशी माझी कल्पना आहे.

चरित्र सत्य व्हावयाचे तर 'नामूलं लिख्यते किंचित्' हा प्राचीन दंडक पाळला पाहिजे. तो मी यथाशक्ती पाळला आहे आणि ऊनोक्ती किंवा अत्युक्ती वर्ज्य मानली आहे. मात्र सत्याला अपाय होऊ नये, म्हणून स्पष्टोक्ती सोडलेली नाही.

केतकर म्हणजे महाराष्ट्रातील एक विवाद्य महापुरुष असल्यामुळे, या चरित्रातील विधानांच्या सत्यतेबद्दल लहानमोठ्या अनेक शंका निघण्याचा संभव आहे. पण माझ्या बाजूने मी विनम्रपणे एवढे सांगू इच्छितो, की सत्याचा शोध मी माझ्या शक्तीप्रमाणे कसोशीने केला आहे. सतत चारपाच वर्षे केतकरांचा मी झटून अभ्यास केला; केतकर आपल्या निकटच्या परिचितांना कसे दिसले, याची शक्य तेवढी चौकशी केली; आणि वीसपंचवीस परिचितांच्या लेखी आठवणीही त्या परिचितांच्या स्वाक्षऱ्यांसह मिळवल्या. शिवाय गेली सुमारे बारा वर्षे केतकरांच्या वाचनात, अध्ययनात, व चिंतनात मी नित्याचा व्यवसाय सांभाळून मग्न झालो होतो. तेव्हा मला अशी आशा आहे, की या चरित्रात सत्याच्या अगदी जवळ मी पोचलो असेन.

मात्र माहितीच्या नि तपशिलाच्या काही चुका माझ्या अनवधानाने किंवा अज्ञानाने अजूनही राहून गेल्या असतील, याची मला जाणीव आहे. जाणकारांना अशा चुका आढळल्या तर त्यांनी त्या कृपया माझ्या निदर्शनास आणाव्या, ही विनंती.

अंधळे प्रेम व अंधळा राग या दोघांनाही सत्याचे प्रखर तेज सहन होत नाही. तेव्हा या चरित्रातील सत्यावर उभयपक्षी टीका होईल, व ती टीका प्रच्छन्न असू शकेल, याची मला जाणीव आहे. पण प्रेमाने सत्यावर प्रेम करावे, रागाने सत्यावर राग धरू नये, एवढी प्रार्थना करण्यावाचून माझ्या हातात काही नाही.

चरित्रकार हा कादंबरीकार नसल्यामुळे त्याला ऐतिहासिक सत्याची मोडतोड करता येत नाही किंवा त्यात कल्पिताची भर घालता येत नाही. त्यामुळे चरित्र 'सजीव' करण्यासाठी तो मार्ग मी अवलंबिलेला नाही. मी फक्त सत्याचा जो चैतन्यमय, रसरशीत भाग असतो त्याचा ठाव काढण्याची खटपट केली आहे. शिवाय सत्याची मांडामांड नि निवेदन ही सत्यातील स्वाभाविक जिवंतपणा आविष्कृत होण्यास साह्यकारी व्हावीत, म्हणून मी काळजी घेतली आहे. मांडामांड नि निवेदन यांची सध्याची पद्धती सापडण्यासाठी मला पुष्कळ कष्ट घ्यावे लागले. हस्तलिखिताची शे-सव्वाशे पाने दोनतीनदा मला फाडावी लागली आणि पद्धतीसंबंधीच्या विचारात

काही महिने दोनतीन वेळा खर्च करावे लागले. सत्य अविकृत ठेवून त्याचे सजीव दर्शन घडविण्यास सध्याची पद्धती पुरी पडेल, अशी मी आशा करतो.

पीएच्. डी. च्या पदवीसाठी केतकरांचा जो अभ्यास मी केला त्या अभ्यासातून हे चरित्र निघाले. पण पदवीसाठी लिहिलेल्या प्रबंधात केतकरांच्या चरित्राचे, व्यक्तित्वाचे व वाङ्मयाचे वर्णन, विश्लेषण व मूल्यमापन करण्यावर भर होता. या चरित्रात केतकरांचे समग्र जीवन संश्लिष्टपणे वाचकांच्या मनावर ठसावे, असा हेतू आहे. अर्थात चर्चेला यात जवळजवळ फाटा दिला असून चित्रणाला प्राधान्य दिले आहे.

मराठीच्या शुद्धलेखनात ज्या सुधारणा ताबडतोब व्हाव्यात असे मला वाटते त्या या पुस्तकात प्रयोग म्हणून मी अमलात आणल्या आहेत. त्या सुधारणा थोडक्यात अशा: (१) सर्व व्याकरणिक, व्युत्पत्तिसूचक व रूढ अनुस्वार गाळावे. मात्र कारणदर्शी 'कां' आणि नामांची व सर्वनामांची अनेकवचनी सामान्यरूपे यांवरील अनुस्वार ठेवावे. (२) 'आणि' 'नि' ही अन्वये ऱ्हस्वान्त लिहिण्याचा विकल्प ठेवून तत्सम शब्दांसह सर्व शब्दांतील अंत्य इकार, उकार दीर्घ लिहावे. (३) ध्वन्यनुकारी शब्द व 'अन्' हे अव्यय यांखेरीज सर्व शब्द स्वरान्त लिहावे. (४) संयुक्त अक्षरांचे लेखन बहुसंख्य शिष्टांच्या उच्चारानुसार करावे.—या सुधारणांनी कोणताही प्रलय न होता शुद्धलेखन फार सुलभ होते, हे प्रस्तुत प्रयोगावरून स्पष्ट होईल. या सुधारणांचा तपशील देणे किंवा त्यांचे समर्थन करणे हे काम मी अन्यत्र, योग्य स्थळी करीत आहे.

प्रकाशित वाङ्मय, लेखी आठवणी, तोंडी आठवणी वगैरे साहित्याचा उपयोग हे चरित्र लिहिताना मी मोठ्या प्रमाणावर केला. ते साहित्य ज्यांनी निर्माण केले त्यांची नावे तळटिपांत व मुख्य मजकुरात वाचकांना पदोपदी आढळतील. त्या साऱ्यांच्या ऋणाचा येथे मी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतो. तसेच, श्रीमती शीलवतीबाई केतकर, श्री. चिं. ग. कर्वे, श्री. य. रा. दाते, श्री. श्री. बा. जोग वगैरे व्यक्तींनी पत्रे, छायाचित्रे, जुनी वृत्तपत्रे, पुस्तके इत्यादी सामग्री उदारपणाने पुरविल्याबद्दल त्यांचा मी मनापासून आभारी आहे. केसरी-मराठा-ग्रंथालय व मुंबई-मराठी-ग्रंथसंग्रहालय यांनी ज्या विशेष सवलती मला दिल्या त्यांबद्दल त्यांच्या उपकारांचे स्मरण मला नमूद करावयास हवे. पुस्तकाला शेवटी जी सूची जोडली आहे ती श्री. ग. वा. करंदीकर व कु. सिंधू फणसळकर या माझ्या शिक्षकस्नेह्यांनी तयार केली. आभार मानलेले त्यांना आवडणार नाहीत, तेव्हा जाणिवेने त्यांचा उल्लेख तेवढा करतो.

लेखनाच्या वेळी लेखकाला प्रोत्साहित करण्याचे एक काम असते आणि मुद्रणात व प्रकाशनात पुस्तकाची पाठराखण करण्याचे एक काम असते. ही कामे अतिशय आपुलकीने आणि सहृदयतेने डॉ. ब. ल. वष्ट, प्रा. श्री. पु. भागवत व श्री. स. शि. भावे यांनी केली आहेत. त्यांची आपुलकी आणि सहृदयता माझ्या पाठीशी अशीच चिरंतन राहू दे.

गेली बाराएक वर्षे केतकरांच्या मानसिक सहवासात फार सुखाची गेली. १९४७ साली पीएच. डी.च्या केतकरांवरील अभ्यासाला प्रारंभ झाला. १९५० साली 'ज्ञानकोशकार डॉ. केतकर' हे विद्यार्थ्यांसाठी छोटे चरित्र लिहिले. १९५१ साली प्रबंध हातावेगळा झाला. १९५५ साली 'डॉ. केतकरांच्या कादंबऱ्या' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. प्रस्तुत चरित्र ऑक्टोबर १९५७ ते ऑगस्ट १९५९ पर्यंत सुमारे दहा महिन्यांत लिहून संपविले. आता ते प्रसिद्ध होत आहे. यापुढे केतकरविषयक ग्रंथलेखनाचा निरोप घ्यावा, असा माझा विचार आहे. जीवन पुढे पुढे जावयाचे तर असा निरोप घ्यावयाला हवा. पण निरोप घेताना मनात कालवाकालव होत आहे. माझ्या विचारांना केतकरांच्या अभ्यासाने जो घाट मिळाला, जी प्रेरणा मिळाली, त्यांचे विस्मरण मला कधीच होऊ शकणार नाही. केतकरांच्या स्मृतीला कृतज्ञतापूर्वक प्रणिपात.

न्यू इंग्लिश स्कूल, सातारा
१५ ऑगस्ट, १९५९

—द. न. गोखले

# अनुक्रमणिका


१. स्वैर बालपण [१८८४ ते १९००] पृष्ठे १ ते ११

वडील व्यंकटेशपंत यांचा मृत्यू (पृ. १); केतकर कुटुंब उमरावतीला स्थायिक होते (पृ. २); घरात वळण लागले नाही (पृ. २); शाळेतील अवांतर परीक्षा नि वाचन (पृ. ३); पठनशक्ती नि वाङ्मयनिर्मिती (पृ. ४); हुशारीतील विक्षिप्तपणा (पृ. ५); प्रकाशनाचा पहिला प्रयत्न (पृ. ६); पेशवाई आणि स्वदेश यांबद्दल अभिमान (पृ. ६); स्त्रीप्रेमाची पहिली झुळूक (पृ. ८); जीवन स्वैरपणाने वाढले (पृ. १०); आईचा मृत्यू व प्रवेश-परीक्षा (पृ. १०).

२. गोते आणि भराऱ्या [१९०१ ते ६] पृष्ठे १२ ते २२

मुंबईच्या विल्सन महाविद्यालयात प्रवेश (पृ. १२); वाचन, गप्पा आणि मते (पृ. १३); वाङ्मयीन उद्योग (पृ. १४); परीक्षांमधील अपयश (पृ. १४); क्रांतिकारक विचारांकडे कल व सुधारकांविषयी तुच्छता (पृ. १६); चुलत्यांशी खटका (पृ. १८); अमेरिकेला कां जावयाचे? (पृ. १९); 'महाराष्ट्र वाग्विलास' मासिक (पृ. २०); 'मोहन बिल्डिंग'मधील स्त्री (पृ. २१); अमेरिकेस प्रयाण (पृ. २२).

३. अमेरिकेतील विद्याव्यासंग [१९०६ ते ११] पृष्ठे २३ ते ४२

बोटीचा प्रवास (पृ. २३); उपजीविकेसाठी स्वावलंबन (पृ. २५); मनःपूर्वक अध्ययन (पृ. २६); महाराष्ट्रातील दोन विचारपरंपरा आणि प्रबंधविषयाची निवड (पृ. २६); प्रबंध : आशय नि स्वागत (पृ. २७); अपरंपार वाचन (पृ. २९); अमेरिकन समाजाचे संशोधन व अवांतर अध्ययन (पृ. ३०); कोशनिर्मितीच्या कार्याशी तोंडओळख (पृ. ३२); विद्वत्तेच्या क्षेत्रातील दोन विजय (पृ. ३३); बौद्धिक अहंता (पृ. ३४); उदासपणाच्या छाया (पृ. ३५); क्रीडाविहार नि एका अमेरिकन युवतीचे प्रेम (पृ. ३६); 'उत्तर अमेरिकेतील

वसंतकाल' या काव्याचे लेखन (पृ. ३८); अमेरिकेतील स्वदेशबांधवांशी संबंध (पृ. ३९); नव्या जगाचा चौफेर अभ्यास (पृ. ४०); 'राष्ट्रत्यागमोह' (पृ. ४१); अमेरिकेचा निरोप घेतला (पृ. ४२).

४. मायभूमीच्या वाटेवर [१९११ ते १२] पृष्ठे ४३ ते ५४

इंग्लंडमधील ज्ञानार्जन आणि दरिद्री जीवन (पृ. ४३); जेत्यांच्या देशातील स्वाभिमानी बाणा (पृ. ४४); 'हिंदुइझम'चे लेखन, हिंदू समाजाच्या घटनेचा व पुनर्घटनेचा विचार (पृ. ४६); भावी पत्नीशी परिचय (पृ. ५२); इंग्लंड सोडले (पृ. ५४).

५. भटक्या राष्ट्रगुरू [१९१२ ते १५] पृष्ठे ५५ ते ७६

राष्ट्रगुरूच्या उच्च भूमिकेचा स्वीकार (पृ. ५५); कलकत्ता विद्यापीठातील नोकरी, सर आशुतोष मुकर्जींशी खटका (पृ. ५६); 'इंडियन इकॉनमिक्स' व 'हिंदू लॉ' या पुस्तकांचे लेखन (पृ. ५७); स्फुट लेखन (पृ. ५९); धर्मानंद कोसंबी व वऱ्हाड-समाचारातील निनावी लेखक यांच्याशी वादविवाद (पृ. ६०); ऐहिक जीवनमूल्यांवर श्रद्धा (पृ. ६१); 'सरदारगृहा'तील बेकारी (पृ. ६२); मद्रासच्या कॉंग्रेसमध्ये भाषावार प्रांतरचनेचा प्रचार (पृ. ६४); सीलोनमधील समाजनिरीक्षण (पृ. ६४); त्रावणकोर-कोचीन-यात्रा आणि ना. गोखल्यांच्या मृत्यूचा धक्का (पृ. ६६); तेलगू ज्ञानकोशाने स्फूर्ती दिली (पृ. ६७); आंध्र-उत्कलमधील 'राष्ट्रधर्मप्रचारणसंघा'चा प्रचार (पृ. ६८); मध्यप्रांताच्या हिताचा विचार आणि बंगाली लोकांना वाक्ताडन (पृ. ७०); वऱ्हाडच्या उत्पन्नाचा विचार (पृ. ७२); नागपूर विद्यापीठासंबंधी दूरदृष्टीची चळवळ (पृ. ७३); 'स्वार्थत्यागाची मीमांसा' (पृ. ७४); व्यक्तित्वाच्या दोन विक्षिप्त कळा (पृ. ७४); ज्ञानकोश हाती घेतला (पृ. ७५).

६. ज्ञानकोशास प्रारंभ [१९१५ ते १९] पृष्ठे ७७ ते १०४

ज्ञानकोशासाठी परिपक्व झालेली परिस्थिती (पृ. ७७); तरीही कार्य सोपे नव्हते (पृ. ७८); मुंबई-पुण्याकडील खेप व कोसंबी, भांडारकर, टिळक वगैरेंच्या भेटी (पृ. ८०); कार्यासाठी नागपूरची निवड (पृ. ८३); ज्ञानकोशासाठी 'लिमिटेड कंपनी'ची नवी कल्पना (पृ. ८३); सरकारी संशयाची थोडी बाधा (पृ. ८५); संपादनाला प्रारंभ व 'ज्ञानकोशाच्या घटनेची योजना' (पृ. ८६); योजनेमागील व्यापक आणि उच्च ध्येय (पृ. ८८); 'माराहष्ट्रीय वाङ्मयसूची' (पृ. ८९); सूचीच्या प्रस्तावनेमधील भाषाहिताचा थोर विचार (पृ. ८९); सूचीची छपाई व पाध्येगटाशी कलह (पृ. ९१); श्री. पाध्यांचे सफाईदार उच्चाटन (पृ. ९४);

टिळकांचे प्रोत्साहन : 'महाराष्ट्राचे डिडेरो व्हा' (पृ. ९५); लेखकांची जुळवाजुळव नि राजवाडे, टिळक, भांडारकर यांच्याकडील खटपटीला अपयश (पृ. ९५); माहितीसाठी समाजाकडे व ज्ञानसंस्थांकडे याचना (पृ. ९७); संदेशकारांच्या दक्षिणेला नकार (पृ. ९८); पुणे-शाखेची सुरवात आणि जादा चालकांची ओरड (पृ. ९९); भांडवलवाढीची 'क्यापिटल जोक' (पृ. १०१); पाध्ये-गटातील जादा चालकांना अर्धचंद्र (पृ. १०१); नागपुरास असतानाचे अवांतर उद्योग (पृ. १०२); कोटांचे सहज दान (पृ. १०३); 'श्री. व्यं. ज्ञानकोशे' यांचे खाजगी जीवन (पृ. १०४).

७. लग्नमाळ [१९१९ ते २४] पृष्ठे १०५ ते ११७

कु. कोहन यांच्याविषयी प्रेमभाव (पृ. १०५); कु. कोहन यांचे हिंदुस्थानात आगमन (पृ. १०६); केतकरांचे पुण्याला स्थलांतर (पृ. १०६); आंतरधर्मीय विवाहाचा प्रश्न व हिंदुत्वाभिमान (पृ.१०८); शुभमंगल ठरले (पृ.१०९); व्रात्यस्तोम व विवाह (पृ. १०९); मधुचंद्र (पृ. १११); परस्परांशी समरस झालेले जोडपे (पृ. ११२); जोडप्याविषयी कुतूहल (पृ. ११४); 'स्त्रीकर्मसदन' (पृ. ११४); 'आशास्थाना'ची बांधणी (पृ. ११५); आर्थिक सुस्थिती (पृ. ११६); आता मुले हवीत (पृ. ११७).

८. एक अपूर्व प्रस्तावना [१९१९ ते २४] पृष्ठे ११८ ते १३७

ज्ञानकोशाच्या प्रस्तावनाखंडाची कल्पना (पृ. ११८); पहिल्या विभागाचा जन्म (पृ. ११९); पहिल्या विभागातील 'हिंदुस्थान आणि जग' यांचा विचार (पृ. ११९); ग्रंथावरील व्यक्तित्वाची छाप (पृ. १२३); ग्रंथाचे स्वागत (पृ. १२४); वैदिक संशोधनाचा प्रयत्न (पृ. १२५); दुसऱ्या व तिसऱ्या विभागातील नवे उद्धृत ज्ञान (पृ. १२७); ऐतिहासिक साधनांची निर्मिती (पृ. १२८); नवा वैदिक इतिहास (पृ. १२८); संशोधनाचे एकंदर मूल्य (पृ. १३४); ज्ञानकोशाला परदेशातून मागणी, वैदिक इतिहासाचे स्वागत (पृ. १३५); प्रस्तावनाखंडाची परिसमाप्ती (पृ. १३५); स्वतःच्या लेखनाबद्दल उद्गार (पृ. १३६).

९. बहुरूपी ज्ञानकोशकार [१९१९ ते २४] पृष्ठे १३८ ते १६२

पाध्ये-गटाचे आरोप नि केतकरांचा निर्णायक विजय (पृ. १३८); वासुदेवशास्त्री खऱ्यांचे साह्य मिळवण्याची खटपट (पृ. १४३); ज्ञानकोशातील खरे सहकारी (पृ. १४४); दुय्यम संपादकांना शिक्षण (पृ. १४५); मुख्य संपादकांचे काही व्यक्तिविशेष (पृ. १४७); स्वतःच मुद्रक बनले! (पृ. १४९); पैशाची उभारणी

आणि ग्रंथविक्रयाची अपूर्व मोहीम (पृ. १५२); ज्ञानकोशाबाहेरचे उद्योग : मुंबई-कौन्सिलची उमेदवारी, पुणे-नगर-परिषद, समाजशास्त्रमंडळ, चातुर्वर्ण्य-संरक्षक-पीठ, घायपाताची लागवड (पृ. १५५); समाजातील वर्तन म्हणजे एक विनोदी कोडेच (पृ. १५८); खाजगी वागणुकीतही न उलगडणारी कोडी (पृ. १६०); 'माझे दहन करू नका!' (पृ. १६१).

१०. 'विद्यासेवका'तील वाङ्मयवैभव [१९२४ ते २९] पृष्ठे १६३ ते १९३

विद्यासेवक : जन्म, ध्येय, धोरण इत्यादी (पृ. १६३); केतकरांचे विद्यासेवकातील लेखन (पृ. १६४); विद्यासेवकाचे एकंदर स्वरूप (पृ. १६४); 'निःशस्त्रांचे राजकारण' : पूर्वपीठिका नि विचार (पृ. १६५); निःशस्त्रांच्या राजकारणावर वृत्तपत्रांचे अभिप्राय (पृ. १७१); प्रत्यक्ष राजकारणाचे बेत व स्वयंनिर्णयी संघाची स्थापना (पृ. १७२); कादंबरीलेखनाकडे मोर्चा (पृ. १७३); कादंबऱ्यांचा वेगळा प्रकार (पृ. १७४); 'गोंडवनातील प्रियंवदा' (पृ. १७५); 'प्रियंवदे'चे स्वागत (पृ. १७९); 'परागंदा' (पृ. १७९); 'परागंदे'चे स्वागत (पृ. १८५); 'आशावादी' (पृ. १८६); 'आशावादी'चे स्वागत (पृ. १८८); कादंबऱ्यांचे स्वतंत्र स्वरूप आणि 'काव्य'विषयक कल्पना (पृ. १८९); 'महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण' : कल्पनेचा जन्म, आशय (पृ. १९०); कादंबऱ्यांवरील कलाहीनतेच्या, तंत्रदुष्टतेच्या आक्षेपांस उत्तर (पृ. १९२); विविध स्फुट लेख (पृ.१९२).

११. ज्ञानकोशाने तड गाठली [१९२४ ते २९] पृष्ठे १९४ ते २२५

केसरीकार केळकरांशी वाद (पृ. १९४); ज्ञानकोश आणि मुसलमानांची चळवळ (पृ. १९९); बुद्धावर टीका नि बुद्धभक्तांच्या चळवळीकडे दुर्लक्ष (पृ. २०२); गोवर्धनांची चळवळ (पृ. २०३); देवरुख्यांची चळवळ (पृ. २०४); इतर जातींमधील खळवळी (पृ. २०५); ज्ञानकोशातील जातिविषयक लेखनाचे फळ (पृ. २०६); 'ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास' (पृ. २०७); शारदोपासक संमेलनातील भाषण व त्यावरील वाद (पृ. २०७); 'हिंदू हायस्कुला'तील गौरव (पृ. २०९); महाविद्यालयीन विद्यार्थ्यांतर्फे पुण्यात सत्कार आणि विद्यार्थ्यांना संदेश (पृ. २०९); नागपुरातील गौरव, कालिदासाबद्दल प्रा. मिराशींशी वाद (पृ. २१०); पिसाळलेल्या कुत्र्याचा दंश आणि मृत्यूच्या छायेतील विचार (पृ. २११); कल्पनांचा नि योजनांचा बादशहा (पृ. २१२); 'पुणे समाचार': दैनिक नि साप्ताहिक, मालिनी-खान-विवाहाची गडबड (पृ. २१३); ज्ञानकोशातील सहकारी फुटले (पृ. २१९); ज्ञानकोशाची आर्थिक निरवानिरव (पृ. २२१); ज्ञानकोशाचे यशापयश (पृ. २२१); ज्ञानकोशकाराच्या भूमिकेत न मावणारे

स्वैर व्यक्तिमत्व : १९२७ च्या साहित्य-संमेलनातील काव्यगायन, केळकरांना विचित्र पत्र, एका वेश्येच्या उद्धाराची उबळ (पृ. २२२).

१२. कौटुंबिक जीवन [१९२४ ते पुढे] पृष्ठे २२६ ते २४४

अनाथ मुले घरी आणली (पृ. २२६); संसाराची 'जागतिक' घडण (पृ. २२७); विन्हाडाचे लष्करात स्थलांतर नि 'जागतिक' संसारास पूर्णता (पृ. २२८); दामूची भुताटकी आणि खरेखोटे प्रवाद (पृ. २३०); घरादारावर अपार प्रेम (पृ. २३५); घरातील क्रीडाकरमणूक (पृ. २३६); मुलांना शिक्षण (पृ. २३७); रसिकतेच्या दुर्मिळ लहरी (पृ. २३७); घराच्या द्वारकेचा खंबीर खांब (पृ. २३८); घरातले अर्थकारण (पृ. २३९); पत्नीची वैचारिक सोवत (पृ. २३९); शीलवतीबाईंचा पगडा नि ज्ञानकोशातील सहकारी (पृ. २४०); आप्तस्वकीयांबद्दल जिव्हाळा (पृ. २४१); केतकर-कुटुंबाचे एक मासलेवाईक दर्शन (पृ. २४२); विचारी सल्लागार (पृ. २४३); एका कवीची बोळवण (पृ. २४३).

१३. वाङ्मयनिर्मितीचे अखेरचे पर्व [१९२९ ते ३७] पृष्ठे २४५ ते २७६

अखेरच्या काळातील विविध नि विपुल वाङ्मयनिर्मिती (पृ. २४५); सर्वोत्कृष्ट कादंबरी 'ब्राम्हणकन्या' (पृ. २४५); 'गावसासू' (पृ. २५१); 'विचक्षणा' (पृ. २५२); 'भटक्या' (पृ. २५३); कादंबऱ्यांतील क्रांतिकारक विचारांचे मूळ अधार्मिकपणात (पृ. २५४); विचार अखेरीस विधायकच (पृ. २५५); एक अपुरे महाकाव्य (पृ. २५५); 'प्राचीन महाराष्ट्र' : कल्पनेचा उगम, संशोधनाचा खटाटोप (पृ. २५६); कायस्थांवरील लेख आणि कायस्थांचा संताप (पृ. २५७); 'महाराष्ट्र व मौर्यसत्ता' यावरील प्रा. आळतेकरांची प्रखर टीका (पृ. २५८); 'आदिपर्व' बाद केले (पृ. २५९); 'शातवाहनपर्वा'चा आशय, त्यातील शबल युक्तिवाद (पृ. २५९); ढिले बहिरंग (पृ. २६४); बौद्धिक क्षीणता (पृ. २६५); 'शातवाहनपर्वा'चे मूल्य, प्रकाशन, स्वागत (पृ. २६७); प्राचीन महाराष्ट्राच्या कामाचा वाढत गेलेला व्याप (पृ. २६८); 'गुजराती ज्ञानकोशा'ची दुर्दैवी कहाणी (पृ. २६८); इतर भाषांतील ज्ञानकोश व मराठी ज्ञानकोशाची पुरवणी (पृ. २७१); 'भारतीय समाजशास्त्र' व बौद्धिक क्षीणतेचा परिणाम (पृ. २७२); 'व्हिक्टोरियस इंडिया' (पृ. २७३); हैद्राबादच्या साहित्य-संमेलनातील गाजलेले भाषण नि तीन मौजा (पृ. २७३); स्फुट लेखन (पृ. २७५); लेखनाच्या शारीरिक प्रक्रियेतील तऱ्हा (पृ. २७५).

१४. जगावेगळे राजकारण [१९२९ ते ३७] पृष्ठे २७७ ते २९५

राजकीय उद्योगाचे मूळ (पृ. २७७); बादशहांना हिंदुस्थानात बोलावण्याची

कल्पना (पृ. २७८); कल्पनेचा कच्चा पाया (पृ. २७९); थोडे पूर्वसूत्र (पृ. २८१); भारतमंत्री, व्हाइसरॉय वगैरेंवर कायदेशीर इलाज (पृ. २८२); कायदेशीर खटपटीमागील भ्रामक समजूत (पृ. २८३); फिर्यादीचे वेड नि सयाजी-रावांना फिर्यादीची धमकी (पृ. २८४); 'भारतमंत्र्याच्या थोबाडीत मारीन' (पृ. २८४); सरकारदरबारातील घडामोडींचा स्वानुकूल अर्थ (पृ. २८५); पूरक खटपटी (पृ. २८६); १९३५ च्या कायद्याचा उलगडा : 'स्वातंत्र्य मिळाले! लोकसत्ता झाली!' (पृ. २८७); इष्ट ते सिद्ध करणारे युक्तिवाद (पृ. २८७); 'हिंदुस्थान एक विजयशाली देश आहे!' (पृ. २८९); 'हिंदुस्थानला स्वराज्य मिळवून दिले' म्हणून आत्मगौरव (पृ. २९०); संकुचित स्वाभिमान बळावले (पृ. २९०); म. गांधींविषयी द्वेष (पृ. २९१); शंकरराव देवांवर फिर्याद (पृ. २९२); लोकांत झालेले हसे (पृ. २९३); भीषण दारिद्र्यातील देशभक्ती (पृ. २९४).

१५. आकस्मिक अंत [१९३७] पृष्ठे २९६ ते ३०१

आयुष्याचे सहज केलेले सिंहावलोकन (पृ. २९६); मृत्यूपूर्वी जगाच्या नि घराच्या व्यापात मग्न (पृ. २९७); मधुमेहात झालेली प्राणघातक भोवरी (पृ. २९८); आकस्मिक मृत्यू (पृ. २९९); अंत्यसंस्कार नि अंत्यदर्शन (पृ. २९९).

सूची पृष्ठे ३०२ ते ३१०

शुद्धिपत्र



डॉ. केतकर



शांताराम दांडेकर
श्रीधर केतकर



श्रीधर व्यंकटेश
ज्ञानकोश




केतकर दामू

शीलवती वीरा हेटी कोहन



दामू केतकर वीरा शीलवती श्रीयुत व सौभाग्यवती केतकर





डॉ. केतकर



१०३४८५

# स्वैर बालपण

[१८८४ ते १९००]

कोकणात दाभोळजवळ अंजनवेल नावाचे जे गाव आहे ते केतकर घराण्याचे मूळ गाव होय. ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेशपंत केतकर यांचे वडील व्यंकटेशपंत हे पोस्टखात्यात मास्तर होते आणि नोकरीनिमित्त भटकता भटकता ते कोकणापासून खूपच दूर गेले. महाराष्ट्राच्या अगदी ईशान्य टोकाला मध्यप्रांतातील रायपूर या गावी ते होते, तेव्हा २ फेब्रुवारी १८८४ या दिवशी डॉ. केतकरांचा जन्म झाला. व्यंकटेशपंतांना दामोदर, भिकुताई नि प्रभाकर अशी पहिली तीन मुले होती आणि डॉ. केतकर हे त्यांचे चौथे नि शेवटचे मूल होय. डॉ. केतकरांचे श्रीधर असे नामकरण झाले आणि लौकरच व्यंकटेशपंतांची बदली रायपुराहून संबळपुरास व तेथून मुंबईस झाली. संबळपुराहून त्यांनी मुंबईला स्थलांतर केले त्या सुमारास तंट्या भिल्लाच्या चंडाळीच्या बातम्या जोरजोरात उठत होत्या. त्यांच्या ताब्यात पोस्टाची तिजोरी असल्यामुळे त्या बातम्यांनी ते मोठ्या फिकिरीत पडले होते. ते आणि त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांना असे वाटे, की पोस्टाच्या तिजोरीसाठी तंट्या एखाद्या रात्री आपल्या घरावर धाड घालील आणि त्या धाडीत घरची चीजवस्त जाऊन वर मुलाबाळांना मार बसेल. पण तसा संकटप्रसंग त्यांच्यावर न ओढवता ती दोघे मुलाबाळांसह मुंबईला सुखरूप येऊन पोहोचली. मुंबईला आल्यावर मात्र या कुटुंबावर एक भयानक आपत्ती कोसळली. व्यंकटेशपंतांना जलोदराचा विकार जडला आणि त्यांनी अक्षरशः अंथरूण धरले. विठ्ठलपंत नावाचे त्यांचे एक विधुर बंधू मुंबईच्या टाकसाळीत नोकरीला होते आणि ते आंग्रेवाडी-समोरील बाबा पाठक यांच्या वाडीत राहात असत. आजारी पडल्यावर व्यंकटेशपंत कुटुंबासह या आपल्या बंधूकडेच मुक्कामाला नि आश्रयाला गेले. त्यांच्यावर पुष्कळ औषधोपचार करण्यात आले, पण गुण न येता, दोनतीन वर्षे अंथरुणात खितपून ते १८९९ च्या सुमारास मृत्युमुखी पडले. त्यांच्या मृत्यूच्या वेळी डॉ. केतकर म्हणजे केवळ चारपाच वर्षांचे कोवळे पोर होते. त्या पोरवयात त्यांच्यावर वडिलांचे कसले संस्कार

होणार! वडिलांच्या ओझरत्या नि अस्पष्ट आठवणी हाच काय तो भावी जीवनात वडिलांशी त्यांना बद्ध करणारा संस्कार त्यांच्या मनावर शिल्लक राहिला.[1]

व्यंकटेशपंतांच्या मृत्यूने लक्ष्मीबाई व चार अल्पवयी मुले यांचा मुख्य आधारच कोलमडून पडला. विठ्ठलपंतांच्या आधाराने हे कुटुंब मुंबईला राहू शकले असते; पण विधुर दिराजवळ राहाणे जनदृष्टीला बरे दिसणार नाही, म्हणून लक्ष्मीबाईंनी दुसरीकडे जाण्याचे ठरविले. व्यंकटेशपंतांचे आणखी एक बंधू नारायणराव ऊर्फ नानासाहेब मध्यप्रांतात उमरावतीला वकिली करीत असत आणि त्यांची कौटुंबिक नि सांपत्तिक स्थिती चांगली भरभराटीची होती. तेव्हा त्या दिराचा आधार घ्यायचा, असे लक्ष्मीबाईंनी ठरविले आणि त्या बिऱ्हाड घेऊन मुलांसह उमरावतीला गेल्या. स्वतःच्या मिळकतीमधील आणि वडिलोपार्जित मिळकतीमधील बरीच पुंजी व्यंकटेशपंतांनी कुटुंबासाठी मागे ठेवली होती. त्या पुंजीतून नानासाहेबांनी तहशीलकचेरीजवळ, घड्याळाच्या मनोऱ्यापाशी, एक लहान घर खरीदले आणि तेथे विधवा भावजयीची सोय करून दिली. घर खरीदल्यावरदेखील व्यंकटेशपंतांच्या पुंजीपैकी बराचसा पैसा शिल्लक होता आणि त्यातून समृद्धीचा प्रपंच नि मुलांची शिक्षणे पार पडणे शक्य होते. साहजिकच पुरुषाचा आधार नसलेले केतकर कुटुंब या पैशाच्या बळावर दुःखात सुख मानून कालक्रमणा करू लागले.[2]

डॉ. केतकरांना घरात शिस्तीचे वळण जवळजवळ मुळीच लागले नाही. त्यांची आई घरकामात आणि देवदेव करण्यात निमग्न असे. वाढत्या वयाच्या मुलांना धाकात ठेवून त्यांच्या जीवनाची घडी बसवून देणे तिला जमले नाही. थोरले बंधू दामोदरपंत वयाने चारसहा वर्षांनी मोठे, पण धाकट्या भावंडांना वळण लावणे त्यांच्या स्वभावात नव्हते. ते होते स्वभावाने चक्रम आणि बुद्धीने मंद. एकदा ते प्रवासाला निघाले असता आईने त्यांना डबा भरून लाडू करून दिले; पण प्रवासाला निघण्याच्या आधीच त्यांनी ते सारे फस्त करून टाकले! महाविद्यालयात गेल्यावर मध्यमकक्षा (इंटरमीजिएट) होईपर्यंत त्यांनी सहा वर्षे घेतली! पुढे शिक्षकाची नोकरी करीत असता जवळच्या गावी उमरावतीहून त्यांना जा-ये करावी लागे. तेव्हा सायकलीवर ते स्वतः स्वार होत, स्वतःच्या डोक्यावर लाकडाची मोळी घेत, आणि असेच कधीकधी घरी परतत. डोक्यावर मोळी घेतल्याने सायकलीला भार कमी होईल अशी त्यांची कल्पना असावी! डॉ. केतकरांसारखा हुशार नि बिकट मुलगा या थोरल्या बंधूंच्या ताब्यात राहाणे शक्यच नव्हते. चुलते नानासाहेब आपल्या घरी वेगळे असत. ते केतकरांना शिकवण्याचा दुरून काही प्रयत्न करीत; पण केतकरांच्या दुर्लक्षामुळे तो प्रयत्न सफल होणे कठीण

१. 'गार्ग्यगोत्रीय कोकणस्थ आणि गाडगीळ घराणे', विद्यासेवक, डिसेंबर १९३५; लोकशिक्षण, मे-जून १९३७, श्री. रा. पारसनीस; आठवणी, केतकर, प्रतिभा, २८ ऑगस्ट १९३३; आठवणी, दि. य. फाटक.

२. आठवणी, दि. य. फाटक; आठवणी, केतकर, प्रतिभा, १४ ऑगस्ट १९३३.

होते. एकदा चुलत्यांच्या घरी डॉ. केतकरांचे बालमित्र शांतारामपंत दांडेकर यांचे वडील जेवायला आले होते. न्यायाधीश मनुष्य जेवायचा म्हणून चुलतीने डॉ. केतकरांना बाजारातून भाजी आणण्यास सांगितले. पण हा मुलगा निवडक, चांगली भाजी घेऊन येण्याऐवजी कसलीतरी भिकार भाजी घेऊन आला. आतेभाऊ दिवाकरपंत फाटक हे केतकरांचे समवयस्क. त्यांनी त्यांना विचारले, 'अरे, हे असे कां केलेस?' तर ते म्हणाले, 'मुद्दामच भिकार भाजी आणली. काकू पुन्हा म्हणून कसले काम आता सांगणार नाही!' ते जबाबदारीकडे असे जाणूनबुजून दुर्लक्ष करीत. मग चुलते झाले तरी त्यांना काय शिकवणार? कोणी दाबते-दडपते नाही, कोणी दडपले तर दडपण मानण्याची वृत्ती नाही, अशा परिस्थितीत ते स्वैर वाढत राहिले.[1]

प्राथमिक दुसऱ्या इयत्तेपासून प्रवेश-परीक्षेपर्यंत केतकरांचे शिक्षण उमरावतीस झाले. रोड, काळसर आणि उंचट असा हा पोरगा 'हिंदू हायस्कुला'त आपल्या हुशारीमुळे उठून दिसे. तिसरीतून चवथीत जाताना त्यांनी 'हायस्कूल एन्ट्रन्स' ही परीक्षा दिली. सुमारे चोवीस शाळांतून या परीक्षेला विद्यार्थी बसत तरी त्या सर्वांत खूपच वरचा क्रमांक त्यांनी पटकावला. नववीत असताना दहावीच्या परीक्षेला ते गंमत म्हणून बसले आणि अनेक विषयांत त्यांनी उत्तम गुण मिळवून दाखविले. १८९९ मध्ये 'व्हरनॅक्युलर स्कॉलरशिप'ची एक चढाओढीची परीक्षा दहावीत असता त्यांनी दिली आणि तीमध्येही पहिल्या क्रमांकाने ते उत्तीर्ण झाले. या परीक्षेला कोणत्याही इयत्तेतील विद्यार्थ्याला बसता येई; पुस्तके नेमलेली नसत; मराठी वाङ्मयावर सर्वसाधारण प्रश्न येत; आणि पद्यरचना करावी लागे. पण 'नेटिव्ह जनरल लायब्ररी'त जाऊन सपाटून वाचन करण्याचा केतकरांना नाद होता. कविता करण्यातही ते मागे नसत. त्यामुळे या परीक्षेत सर्वोच्च यश ते सहजासहजी मिळवू शकले. पुढे महानुभाव-संशोधक म्हणून प्रसिद्धीस आलेले डॉ. यशवंत खुशाल देशपांडे हे त्यांचे शाळामित्र. 'नेटिव्ह जनरल लायब्ररी'त वाचनाच्या नादामुळे दोघेही जात असल्याने तेथे दोघांची विशेष गट्टी जमली होती. डॉ. देशपांडे केतकरांच्याबरोबर या 'व्हरनॅक्युलर स्कॉलरशिप'च्या परीक्षेला बसले होते आणि दुसरे आले होते.[2]

केतकरांनी परीक्षा दिल्या आणि यशही संपादले. पण परीक्षेच्या क्षुण्ण नि अरुंद वाटेने जाण्याचा एकमार्गीपणा त्यांच्या बुद्धीत नव्हता. अस्ताव्यस्त आणि अफाट वाचावे व ज्ञानाच्या क्षेत्रात वेड्यावाकड्या वाटांनी दूरदूरची मुशाफिरी करावी, अशी त्यांना हौस असे. पाठ्य पुस्तकांबाहेर त्यांनी कितीतरी वाचन शालेय वयात केले होते. मोरोपंत, वामन, मुक्तेश्वर, रघुनाथपंडित इत्यादी जुन्या कवींची

१. आठवणी, केतकर, प्रतिभा, १४ ऑगस्ट १९३३; आठवणी, दि. य. फाटक.
२. आठवणी, दि. य. फाटक; आठवणी, केतकर, प्रतिभा, ३१ जुलै १९३३; प्रतिभा, जुलै १९३७, य. खु. देशपांडे व वा. सं. गडकरी यांचे लेख.

थोडीफार कविता त्यांनी वाचली होती. कृष्णशास्त्री चिपळूणकर, चिंतामणिपेठकर, परशुरामतात्या गोडबोले, गणेशशास्त्री लेले वगैरे अर्वाचीन कवींच्या काव्याचा त्यांनी चांगला अभ्यास केला होता. कृष्णशास्त्र्यांचे व्याकरणावरील निबंध, नवनीत, गणेशशास्त्री लेल्यांचे साहित्यशास्त्र, शाकुंतल-सौभद्रादी नाटके यासारखे पुष्कळ वाङ्मय त्यांनी नजरेखालून घातले होते. माहितीत आणि बहुश्रुतपणात त्यांचा हात धरील असा विद्यार्थी शाळेत कोणीही नव्हता. त्यांच्या पोतडीतून केव्हा, कोणती नि किती माहिती बाहेर पडेल याचा नेम नसे. बहुतेक शिक्षकांना त्यांच्या या गुणाची ओळख पटली होती आणि रा. नारायण वामन थत्ते यांनी तर 'लिव्हिंग एन्सायक्लोपीडिया'—चालता-बोलता ज्ञानकोश—असे त्यांचे नाव ठेवले होते. भावी ज्ञानकोशकाराला बालपणी असे नाव मिळावे हा केवळ योगायोग नव्हता. भावी मोठेपणाची बीजे बालपणीच अंकुरत होती, याची ती साक्ष होती.[1]

केतकरांची पठनशक्ती पुष्कळदा त्यांच्या मित्रांना आणि शिक्षकांना चकित करून सोडी. आवडणाऱ्या कविता आणि गद्य उतारे वाचता वाचता ते पाठ करीत. संस्कृत, मराठी व इंग्रजी वाङ्मयातील कित्येक भाग त्यांना मुखोद्गत असत. कृष्णशास्त्र्यांचे 'मेघदूत' आणि चिंतामणिपेठकरांचे 'गंगावर्णना' त्यांना आवडे आणि मित्रांना त्यातील ओळींच्या ओळी ते घडाघड म्हणून दाखवीत. आपल्या एका बालमैत्रिणीवर त्यांनी काही साक्या रचल्या होत्या. रंगात आले की त्या साक्याही सोबत्यांना ते ऐकवीत. स्वतःची कविता तर त्यांना पाठ असेच, पण मित्रांची कविताही त्यांच्या जिव्हाग्रावर राही. डॉ. यशवंत खुशाल देशपांड्यांनी शाळेत असताना 'सत्यप्रभा' नावाचे संगीत नाटक लिहिले होते. या नाटकातील पदे स्वतः देशपांडे मोठेपणी विसरून गेले; पण तीसपस्तीस वर्षांनी केतकरांनी मात्र ती सारी पदे देशपांड्यांना म्हणून दाखवली! बालपणी पाठ झालेली काव्ये त्यांच्या स्मृतीत अशी कुलुपबंद होऊन पडली होती, की १९३५ साली, सुमारे पस्तीसचाळीस वर्षांनी, त्यांनी ती 'विद्यासेवका'त जशीच्या तशी उतरून काढली![2]

कादंबरीकार बाळकृष्ण संतुराम गडकरी, वीर वामनराव जोशी आणि डॉ. य. खु. देशपांडे हे केतकरांचे शालेय सहाध्यायी होते. या साऱ्यांनाच काहीतरी लिहिण्याचा छंद होता. गडकरी कविता करीत; देशपांडे नि जोशी मेळ्यासाठी पदे करून शिवाय नाटुकली लिहीत, आणि केतकर लेख, कविता वगैरे क्षेत्रात लेखन करीत. वामनराव जोश्यांची आणि केतकरांची लेखनात स्पर्धा असे. वामनरावांचे तालीमबाज मित्र आणि त्यांचे पुंडपणाचे उद्योग यांमध्ये केतकर त्यांची बरोबरी करू शकत नसत. पण जोश्यांच्या-

१. प्रतिभा, जुलै १९३७, य. खु. देशपांडे व बा. सं. गडकरी यांचे लेख; ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ४.

२. प्रतिभा, जुलै १९३७, य. खु. देशपांडे व बा. सं. गडकरी यांचे लेख; 'आधुनिक कवींविषयी स्वैरालाप', विद्यासेवक, डिसेंबर १९३५.

हून आपण कविता चांगल्या करतो, असा त्यांचा दावा असे. जोशांच्या लेखनाचा चहाता वर्ग मोटा होता; पण केतकरांची स्तुती करणारेही कमी नव्हते. देशपांडे आणि गडकरी या स्तुतिपाठकांत समाविष्ट असत. शिवाय, कोणी स्तुती करोत की निंदा करोत, केतकरांचा स्वतःच्या मोठेपणावर पक्का विश्वास होता. कधी कधी ते म्हणत, 'आधुनिक मराठीत तीनच कवी मोठे आहेत. एक चिपळूणकर, दुसरे चिंतामणिपेठकर आणि तिसरे श्रीधर व्यंकटेश केतकर !'[1]

केतकरांच्या घरात जुन्या हस्तलिखित पोथ्यांचे दोन पेटारे धूळ खात पडलेले होते. केतकरांचे आजोबा गोविंद रघुनाथ हे पेशवाई बुडाल्यानंतर ग्रंथविक्रयाच्या धंद्याच्या निमित्ताने हिंदुस्थानभर हिंडत असत. मुद्रणकला तेव्हा प्रचारात नसल्यामुळे ठिकठिकाणी ब्राम्हण गोळा करून त्यांच्याकडून जुन्या ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती ते तयार करून घेत आणि त्या राजेरजवाड्यांकडे खपवीत. त्यांच्यामागे बराच ग्रंथसंग्रह शिल्लक उरला होता. त्यातला काही केतकरांच्या वडिलांनी लोकांना देऊन टाकला, काही फिरतीच्या नोकरीत सांभाळता येईना म्हणून जाळून टाकला आणि काही मात्र पेटाऱ्यात पडून राहिला. या पेटाऱ्यांचे पूर्ववृत्त चुलत्यांकडून केतकरांना कळले आणि त्यांची जिज्ञासा त्यांतील ग्रंथसंग्रहावर खिळून राहिली. कुमारवयात त्यातील काही पोथ्या त्यांनी वाचून काढल्या आणि शिवरामस्वामींच्या ज्या पोथ्या होत्या त्यांवर एक लेखही लिहिला ! १८९९ च्या 'वऱ्हाडसमाचारा'त हा लेख प्रसिद्ध झाला तेव्हा त्यांच्या शाळकरी सोबत्यांना आश्चर्याचा धक्काच बसला असेल.[2]

केतकरांच्या हुशारीत विक्षिप्तपणाची काही गमतीदार गल्लत झालेली आढळे. जत्रेवर गुरुजींनी निबंध लिहावयास सांगितला तेव्हा जत्रेत बघितलेल्या वेश्यांचा उल्लेख त्यांनी निबंधामध्ये बिनदिक्कत आवर्जून केला. मोरोपंतांबद्दल ते म्हणत, की मोरोपंताला शृंगार साधत नाही, भाराभर रामायणे रचून नि यमकांचा हव्यास धरून त्याने आपल्या प्रतिभेचा अपव्यय केला. त्यांच्या मते कालिदासाच्या 'शाकुंतला'पेक्षा किर्लोस्करांचे 'सौभद्र' श्रेष्ठ होते; कारण 'सौभद्राचे कथानक' अधिक सुश्लिष्ट असून त्यात स्वभाववैचित्र्य जास्त आहे. शिवाय, महाभारतातील दुष्यंत आपली कण्वाश्रमातील भानगड खऱ्याखुऱ्या माणसाप्रमाणे लपवू पाहातो म्हणून तो स्वाभाविक वाटतो; पण 'शाकुंतला'तला दुष्यंत असे काही करत नाही म्हणून तो अस्वाभाविक नि वेंगरूळ वाटतो. जुन्या पंडित कवींपेक्षा नवे चिपळूणकर किंवा चिंतामणिपेठकर सरस आहेत, असे केतकर म्हणत. इंग्रजी तिसरीत असताना या किशोराच्या डोक्यात ईश्वरविषयक विचारांचे बंड चालू झाले. हे बंड इतके वाढले होते, की परीक्षेच्या ऐन गर्दीत ईश्वराचा शोध करण्यासाठी

१. आठवणी, केतकर, प्रतिभा, १४ ऑगस्ट व १५ सप्टेंबर १९३३; प्रतिभा, जुलै १९३७, बा. सं. गडकरी.

२. महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण, प्रकरण १९ वे, व पृष्ठ ५६.

त्याचे मन भरारी घेणार नाही, अशी त्याच्या शिक्षकांना खात्री देता येत नसे. तो एकीकडे घरच्या देवांच्या पूजेत रममाण होई आणि दुसरीकडे ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल भलभलते प्रश्न उत्पन्न करून वावदूक सोबत्यांना भांबावून सोडी. 'ईश्वर सर्वशक्तिमान आहे तर स्त्रीपुरुषसंबंधाशिवाय तो प्रजा कां उत्पन्न करीत नाही? तो सर्वव्यापक आहे तर मला कां दिसत नाही?'—असले त्याचे प्रश्न असत. एकदा, एका परीक्षेत 'दुष्काळग्रस्तांनी भाकलेली देवाची करुणा' किंवा असाच काही विषय पद्यरचनेसाठी आला होता. तेव्हा परीक्षामंडपातून बाहेर आल्यावर केतकर उद्गारले, 'या परीक्षेत आमचा निकाल लागला! परीक्षक एक गाढव आणि आम्ही सात गाढव!' मित्रांनी विचारले, 'ते कसे काय?' तेव्हा ते म्हणाले, 'परीक्षेला आमच्यासारखे नास्तिक विद्यार्थी असले असतील याची या परीक्षकांना कल्पनाच नाही. आम्ही देव मानत नाही; मग 'देवाची करुणा' कशी भाकणार? यांना हे कळत नाही म्हणून हे एक गाढव! आणि आम्ही कवितेत लिहिले, की 'आम्ही भुकेविण पहा मरतो कसे हे!' आता आम्ही भुकेने मरू, पण 'भुकेविण' कसे मरणार? तेव्हा आम्ही सात गाढव!' —केतकर आपल्या हुशारीत विक्षिप्तपणाचे असे नाना रंग नि ढंग भरीत आणि मग शाळेतील काही मुलगे म्हणत, 'हाफ मॅड आहे लेकाचा!'[1]

शाळेत असताना प्रकाशनाचा एक छोटासा प्रयत्न केतकरांनी केला होता. डॉ. य. खु. देशपांड्यांनी मेळ्याकरता जी गणपतीची पद्ये लिहिली होती त्यांचा संग्रह बराच साचला होता. हा संग्रह प्रसिद्ध करावा अशी कल्पना देशपांड्यांच्या मनात केतकरांनी भरवून दिली आणि प्रकाशनासाठी उत्साहपूर्वक त्यांना साह्य दिले. या शाळकरी मुलाने स्थानिक छापखान्यात छपाईच्या भावांची चौकशी केली; 'देशसेवक', 'ज्ञानप्रकाश', वगैरे परगावच्या छापखान्यांकडे पत्रव्यवहार केला आणि शेवटी 'अल्बियन' छापखान्याची निवड करून त्याच्याकडे काम दिले. पद्यांची निवड करणे, त्यांचा क्रम ठरविणे, मुद्रितें तपासणे वगैरे कामेही त्याने व्यवस्थित उरकली आणि 'गणेशपद्यावली' या नावाने पुस्तकाचे प्रकाशन केले. शालेय वयात केलेले हे प्रकाशन कौतुकास्पद होते यात शंका नाही. प्रकाशनाच्या क्षेत्रात पुढे केतकरांनी अनेक विक्रम गाजविले आणि महाराष्ट्राला चकित केले. त्या साऱ्या विक्रमांची गंगोत्री या पहिल्या छोट्या प्रकाशनातच होती.[2]

पेशवे आणि पेशवाई यांच्याशी केतकरांच्या घराण्याचा दूरचा पण परंपरागत संबंध होता. त्यांचे पणजोबा पेशव्यांचे सावकार होते आणि पेशवाईबरोबर बुडाले होते. आजोबा ग्रंथविक्रयासाठी उत्तर भारतात हिंडत असता १८५७ च्या सुमारास गुप्त झाले होते आणि गुप्ततेच्या काळात बहुधा नानासाहेब पेशव्यांचे दूत म्हणून देशभर

१. प्रतिभा, जुलै १९३७, बा. सं. गडकरी; आठवणी, बा. सं. गडकरी; आठवणी, केतकर, प्रतिभा, ३१ जुलै १९३३.
२ प्रतिभा, जुलै १९३७, य. खु. देशपांडे.

फिरले होते. केतकर घराणे आणि पेशवे या दोघांचे गार्ग्य गोत्रच असल्यामुळे त्यांच्यात विवाहसंबंध घडणे शक्य नव्हते; पण दूरान्वयाने त्यांचे काही नाते जुळले होते. डॉ. केतकरांच्या वडिलांची आत्या काशीच्या जुन्नरकर जोशांकडे दिली होती आणि या जोशांची पेशव्यांशी सोयरीक असल्यामुळे तिला पेशव्यांचा विहीणपणा प्राप्त झाला होता. तिने एका लग्नात नानासाहेब पेशव्यांना प्रत्यक्ष पाहिलेही होते. एकदा ही आत्या केतकरांच्या घरी आली होती आणि तेव्हा १८५७ च्या अनेक रोमहर्षक कथा घरात निघाल्या होत्या. १८८८ च्या सुमारास केतकरांचे वडील मुंबईला होते, त्या वेळी पेशवे घराण्यातील दोन मुले केतकरांच्या घरी आली होती. त्या प्रसंगी ऐपतीबाहेर खर्च करून त्यांचे थाटाने कसे स्वागत झाले, ते केतकरांनी बघितले होते. पेशवे आणि पेशवाई यांच्याशी असलेल्या या संबंधाचा केतकरांच्या संस्कारक्षम बालमनावर विलक्षण परिणाम झाला. स्वराज्य नि स्वातंत्र्य यांसाठी पेशव्यांनी इतिहासकालात जसे अलौकिक कर्तृत्व करून दाखविले तसे आपणही काही केले पाहिजे असे विचार त्यांच्या मनात घोळू लागले. देशभक्तीच्या बलवत्तर भावना त्यांच्या मनात रुजल्या आणि तेथे एखाद्या वटवृक्षासारख्या फोफावल्या.[१]

केतकर एके ठिकाणी म्हणतात, "माझ्या देशाभिमानाचे स्वरूप वारंवार भिन्न प्रकारचे होत गेले. तथापी देशाकरिता आपण काहीतरी केले पाहिजे, अशा तऱ्हेची भावना मला अगदी लहानपणापासून झाली. माझ्या मनावर ज्या अनेक गोष्टी संस्कार करत्या झाल्या त्यांपैकी एक गोष्ट म्हटली म्हणजे आमचे पेशवे घराण्याशी नाते आहे, याचा शोध होय."..."पेशवाईविषयी माझ्या मनात सप्रेमादर अत्यंत अल्प वयापासून आहे."[२]

केतकरांच्या बालपणी लोकात अशी समजूत होती, की बंडवाले नानासाहेब पेशवे अद्यापी जिवंत आहेत. नानासाहेब जिवंत आहेत ही समजूत केतकरांनाही मोठी सुखकारक वाटे. नानासाहेब प्रकट होतील; शिंदे, होळकर, गायकवाड, वगैरे त्यांना मिळतील; आणि त्यांच्या मदतीने नानासाहेब परत स्वराज्य स्थापन करतील;—ही आशा बालवयात त्यांनी कधीच सोडली नाही. केव्हा केव्हा त्यांना स्वप्ने पडत, की नानासाहेब आले आहेत आणि आपल्याच घरी उतरले आहेत! घराला पोलिसांचा गराडा पडला आहे नि बंदुकीच्या फैरी झडत आहेत! मग त्या बंदुकीच्या फैरींनीच त्यांना धक्का बसून जाग येई. 'पेशवाई चालू असती तर आपण कितीतरी मोठे झालो असतो' असे त्यांना वाटे आणि गेलेल्या स्वातंत्र्याबद्दल त्यांच्या मनाची तडफड होई. इंग्रजी चौथीत असताना नाना फडणविसानंतरचा मराठ्यांच्या पराभवाचा इतिहास त्यांनी एकदाच वाचला; पण पुनश्च त्यांच्याच्याने तो वाचवला नाही! १८७९च्या

१. महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण, प्रकरण १९ वे; आठवणी, केतकर, प्रतिभा, २८ ऑगस्ट १९३३.
२. आठवणी, केतकर, प्रतिभा, २८ ऑगस्ट १९३३.

सुमारास ज्या वासुदेव बळवंतांनी महाराष्ट्रात बंडाची धामधूम उडवून दिली त्या वासुदेव बळवंतांचा एक पुतण्या इंग्रजी दुसरीत त्यांच्याबरोबर शिकत होता. तो अत्यंत गरिबीत नि दैन्यात दिवस कंठी; पण एका थोर देशभक्ताशी त्याचे जे नाते होते त्यामुळे केतकर त्याला भाग्यवान समजत. देशभक्तीचा असा पक्का पीळ त्यांच्या मनाला पडला होता, की रँडचा वध करणाऱ्या चाफेकरांच्या पंक्तीला एकदा ते जेवले होते त्याचे त्यांना भूषण वाटे. "ज्या व्यक्तींना लोक थोर समजतात अशा अनेक व्यक्तींबरोबर भोजनप्रसंग किंवा अल्पाहारप्रसंग आले आहेत; तथापी दामोदर चाफेकर यांच्याबरोबर जेवण्याबद्दल जो अभिमान वाटला तितका अभिमान दुसऱ्या कोणत्याही जेवणाने वाटला नाही." —असे त्यांनी नमूद करून ठेवले आहे. इतिहासकाल व सशस्त्र क्रांतिकारक यांनी त्यांच्या मनावर हे जे विविध संस्कार केले त्यांमुळे सशस्त्र क्रांतीकडे साहजिकच त्यांचे विचार धावत गेले. शालान्त परीक्षा उत्तीर्ण होण्यापूर्वी क्रांतीच्या प्रयत्नात उडी घेण्याइतपत त्यांच्या मनाची सिद्धता झाली होती.[१]

स्वदेशाबद्दलच्या अभिमानामुळे, परकीयांसमोर लांगूलचालन करणाऱ्या लोकांबद्दल केतकरांना लहानपणीच कमालीचा तिटकारा वाटे. आठव्या वर्षी वक्तृत्वाच्या एका स्पर्धेत त्यांनी बक्षीस मिळविले होते. ही स्पर्धा रा. गणेश हरी खापर्डे भरवीत आणि बक्षीससमारंभाच्या वेळी एका ख्रिस्ती बाईकडून मुलांना बक्षिसे वाटवीत. याबद्दल खापर्ड्यांची त्यांना "जुगुप्सा आली होती". ख्रिस्ती बाईच्या पाया पडणे तर त्यांना संताप उत्पन्न करी. आपले बक्षीस घेताना त्या बाईच्या पाया पडण्याचे त्यांनी साफ नाकारले. तेव्हा खापर्ड्यांनी त्यांना पकडले आणि त्यांचे डोके तिच्यासमोर लववले. या मानहानीचे शल्य त्यांच्या मनात इतके सलत राहिले, की आमरण खापर्ड्यांना त्यांनी क्षमा केली नाही.[२]

विद्या आणि देशभक्ती यांत रमणारे केतकर किशोरावस्थेमध्ये स्त्रीच्या आकर्षणातही किंचित रमू लागले होते. त्यांच्या चुलतबहिणीकडे येणारी आणि शाळेत किंवा गावात त्यांच्या दृष्टीस वारंवार पडणारी एक सुस्वरूप, कुलीन नि श्रीमान किशोरी होती. तिच्यावर सोळावे वर्ष संपण्यापूर्वी त्यांचे मन अतिशय उत्कटपणाने जडले. या किशोरीच्या नावाचे इंग्रजी आद्याक्षर 'एन' होते आणि तिच्या एका मैत्रिणीच्या नावाचे आद्याक्षर 'एम' होते. 'एन'बद्दल जसे केतकरांना आकर्षण वाटे तसे 'एम'बद्दल त्यांच्या एका मित्राला वाटे. मग 'एन. एम. अँड को.' असा साभिप्राय उल्लेख ते एकमेकात करीत. 'एन'वरच केतकरांनी साक्या लिहिल्या होत्या आणि रंगात आले की ते त्या मित्रांना म्हणून दाखवीत. मात्र आपल्या भावना 'एन'जवळ व्यक्त करण्याचे धैर्य त्यांच्या किशोरमनाला कधीही झाले नाही. "तुजशी साक्षर बोलायाते मन नच घे

१ आठवणी, केतकर, प्रतिभा, २८ ऑगस्ट १९३३.
२. आठवणी, केतकर, प्रतिभा, २५ सप्टेंबर १९३३.

लज्जेने।" अशी त्यांची मनःस्थिती होती. या विशुद्ध प्रेमाचे वर्णन "होय बालवय दोघांचे त्या समयी स्पष्टचि होय। मीनकेतनने योजियलेल्या बाणांचे नच कार्य।" अशा शब्दांनी त्यांनी केले आहे. 'एन'ची श्रीमंती नि खानदानीपणा आणि आपली मध्यम स्थिती नि सामान्य सामाजिक दर्जा यांची तुलना त्यांच्या मनात होई आणि 'एन'ची अभिलाषा धरण्याचा त्यांना संकोच वाटे. शिवाय ज्ञानाच्या व देशभक्तीच्या काही प्रबळ आकांक्षा या वेळी त्यांच्या मनात स्फुरू लागल्या होत्या. रुळलेली चाकोरी सोडून आपल्या आयुष्याला ध्येयकल्पनांप्रमाणे काही वेगळे वळण द्यावे, असा त्यांचा निश्चय होत होता. त्यामुळे, ध्येयाच्या आड नाजुक भावनेचे पाश नकोत, म्हणून आपले प्रेम त्यांनी मुखर होऊ दिले नाही. भावनेचा जो चटका मनाला बसला त्याचा अनुभव घेत, कौमार्यावस्थेला साजेशी कल्पनामय स्वप्ने हृदयात रंगवीत त्यांनी आपले प्रेम विसरून जाण्याचा प्रयत्न केला.[1]

या वेळी ध्येयकल्पनांची जी खळबळ त्यांच्या मनात माजली होती तिचे वर्णन त्यांनी पुढीलप्रमाणे केले आहे :

> **"असेल ठावा जो लोकांते आयुष्याचा क्रम तो**
> **द्यावा टाकुनि, आयुष्याचे नियमन सुखे करावे—**
> **स्वकल्पनांनी, अशी भावना वागे ज्याच्या चित्ती—**
> **त्यास कोठुनी नित्यसुखाचा कार्यक्रम लाधेल ?**
> **क्रांति घडावी सर्व परीची राष्ट्री आपुल्या ऐसे**
> **चित्ती वाटुनि चित्त खळबळे कर्तृत्वाच्या ध्यासे."[2]**

या खळबळीमुळे प्रेमभावनेला त्यांनी बांध घातला, पण या पहिल्या प्रेमाचा विसर त्यांना कधीही पडला नाही. शाळा संपवून ते महाविद्यालयात गेले, तेव्हा "जे जे देती विचार माझ्या चित्ताते अस्वास्थ्य। ते ते कथितो चोरुनिया मी नच ठेवितसे सत्य"[3] असे म्हणून आपले प्रेम ते काव्यात गुंफीत राहिले. पुढे स्त्रीप्रेमाचे आघात जेव्हा जेव्हा त्यांच्या मनावर झाले तेव्हा तेव्हा पहिल्या प्रेमाची त्यांना स्मृती होई. परदेशातून विद्याविभूषित होऊन परतल्यावर, प्रौढपणी त्यांनी 'एन'ला मागणीही घातली होती. पण 'एन'चा व त्यांचा विवाहसंबंध जमावा असा योग नव्हता.[4]

'एन'चे आणि 'एम'चे पुढे काय झाले? 'एन'चे धागे जसे केतकरांशी जुळले नाहीत तसे 'एम'चेही त्यांच्या मित्राशी जुळले नाहीत. अजून 'एन' आणि 'एम'

१. आठवणी, दि. य. फाटक, य. खु. देशपांडे; प्रतिभा, जुलै १९३७, य. खु. देशपांडे; 'प्रथमकल्लोल', विद्यासेवक, फेब्रुवारी १९२६.
२. प्रथमकल्लोल, विद्यासेवक, फेब्रुवारी १९२६.
३. प्रथमकल्लोल, विद्यासेवक, फेब्रुवारी १९२६.
४. आठवणी, बा. सं. गडकरी; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृ. ८४-८५.

विद्यमान आहेत. 'एन'चे लग्न पुष्कळ प्रौढपणी होऊन ती एका सरदार घराण्यात पडली आहे आणि 'एम' एका प्रसिद्ध पुरुषाची पत्नी होऊन एका विख्यात साहित्यिकाची सासू झाली आहे. नियती जीवनाचे प्रवाह कसकसे फिरवील, याचे भविष्य सांगणे केवळ अशक्य आहे.[१]

उमरावतीला प्रवेशपरीक्षेपर्यंत केतकरांचे जीवन नाना अंगांनी वाढत होते. एकीकडे भरपूर वाचनात आणि नवमतांच्या जोपासनेत ते गुंगले होते. एकीकडे देशभक्तीच्या भावना प्रदीप्त होऊन काही दैदीप्यमान आवाहन त्यांना करू लागल्या होत्या. हृदयाच्या कोमल भागावर कुठेतरी स्त्रीच्या आकर्षणाची सुखद कळ उठत होती. वगत कोणी धाक लावणारे माणूस नसल्याने कौमार्य उच्छृंखलपणे फेसाळून धावत होते. अठरापगड जातीच्या, पार्शी नि प्रभू, ब्राह्मण नि कासार मित्रांबरोबर स्वैर हुंदडण्यात नि वाद खेळण्यात मनाला मौज नि हौस वाटत होती. एखादे वेळी देवीच्या देवळात जाऊन कोण्या योगानंदाकडून धौती किंवा आसने शिकण्यातही काही नव्या अनुभवाचा आनंद लाभत होता.[२]—आणि या चित्रविचित्र जीवनाचा आविष्कार वाङ्मयलेखनात अंशतः होऊन नवनिर्मितीची भूक भागत होती. त्यांचे जीवन नीटस करणारा कोणी फुलारी त्यांना भेटला नाही. त्यामुळे ते जीवन जोपासलेल्या बगीच्यासारखे बांधेसूद वाढू शकले नाही. डोंगरदऱ्यातून रान माजावे तशी त्याची अस्ताव्यस्त पण रमणीय वाढ होत राहिली.

केतकर अकराव्या इयत्तेत असताना, १९०० साली, त्यांची आई पटकी होऊन तडकाफडकी वारली. शाळेतून केतकर घरी आले तेव्हा तिला बाधा झाली होती आणि रात्री एकदोनच्या सुमारास तिचे प्राणोत्क्रमण झाले. केतकर या वेळी इतके आत्मकेंद्रित झालेले नि स्वतःच्या कल्पनांनी वेडावलेले होते, की आईच्या मृत्यूचा धक्का त्यांना फारसा जाणवला नाही. एक दिवस उलटल्यावर, ते दुसऱ्या दिवशी शाळेत नित्याप्रमाणे हजर झाले. त्यांच्या वर्गमित्रांना वाटले होते, की केतकर आता आठपंधरा दिवस शाळेत यावयाचा नाही; पण वर्गात त्यांची ती उंचट नि रोड मूर्ती पाहून त्यांना पराकाष्ठेचे आश्चर्य वाटले. त्यांचा तो लांब नि बंद गळ्याचा कोट, ते धोतर, ती जरीच्या वेलबुट्टीची गोल टोपी आणि वहाणा यांकडे सारे जण टकमका बघत राहिले. मेघदूतातल्या साक्या या वेळी केतकर गुणगुणत होते! तेव्हा काही विद्यार्थ्यांना शंका आली, की याच्या आईच्या मृत्यूची ताजी बातमी खरी की खोटी? एकाने त्यांना दचकत विचारलेदेखील, की 'केतकर, तुझ्या आईचे कसे आहे?' त्यावर केतकर शांतपणे उद्गारले, 'ती कालच वारली!' तो विद्यार्थी म्हणाला, 'पण तुझ्या चेहऱ्यावरून तसे वाटत नाही.' तर केतकरांनी उलट पृच्छा केली, 'कसा चेहरा करू म्हणजे तुला ती वारल्यासारखे

१. आठवणी, दि. य. फाटक.
२. आठवणी, दि. य. फाटक वगैरे.

वाटेल?'!! या केतकराला काय म्हणावे ते या वेळी कोणाही विद्यार्थ्याला सांगता येणे शक्य नव्हते.[१]

आई वारल्यावर केतकर चुलत्यांच्या घरी राहावयास गेले आणि त्याच साली प्रवेश-परीक्षा उत्तीर्ण झाले. आईमागोमाग त्यांची थोरली वहीणही या वेळी मृत्युमुखी पडली. आईच्या नि वहिणीच्या मृत्यूमुळे त्यांना थोडेसे बद्ध करणारे ठिसूळ कुटुंबपाश तुटून गेले. प्रवेशपरीक्षेनंतर पुण्यामुंबईकडे उच्च शिक्षणासाठी जाण्याचा प्रसंग आला; त्यामुळे तर चुलत्यांचे बंधनही सुटल्यासारखे झाले. उच्च शिक्षणाला पुरेसा पैसा वडिलार्जित पुंजीपैकी अजून शिल्लक असल्याने भविष्यकाळाची फारशी चिंता नव्हती.—आणि मन तरुण आशाआकांक्षांच्या पंखांवर बसून उंच झेप घेण्यासाठी अत्युत्सुक झालेले होते. अर्थात आईच्या मृत्यूने नि प्रवेशपरीक्षेतील यशाने पिंजऱ्यातून सुटलेल्या पक्ष्यासारखी त्यांची काहीशी स्थिती झाली. "आयुष्याचे नियमन सुखे करावे!" या आकांक्षेची हाक पुन्हा कानावर आदळून त्यांनी उद्गार काढले, की "आता मला जगभर वाटेल तिकडे भटकण्यास हरकत नाही!"[२]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २५६९१ दि: चारित्र
क्रमांक ........ नों: दि: २५।११।५८

१. आठवणी, केतकर, प्रतिभा, १४ ऑगस्ट १९३३; प्रतिभा, जुलै १९३७, वा. सं. गडकरी: आठवणी, दि. य. फाटक.
२. आठवणी, केतकर, प्रतिभा, १४ ऑगस्ट १९३३.

# गोते आणि भराऱ्या

[१९०१ ते ६]

आपले महाविद्यालयीन शिक्षण पुण्याच्या राष्ट्रीय वातावरणात फर्ग्युसन महाविद्यालयात व्हावे, अशी केतकरांची फार इच्छा होती. पण नानासाहेबांचा असा आग्रह होता, की या हुशार पुतण्याचे शिक्षण युरोपीय प्राध्यापकांच्या हाताखालीच व्हावे. नानासाहेबांच्या या आग्रहापुढे केतकरांचे काही चालले नाही आणि त्यांना मुंबईच्या विल्सन महाविद्यालयात आपले नाव दाखल करावे लागले. १९०१ पासून १९०५ अखेर, संपूर्ण पाच वर्षे ते विल्सनमध्ये होते; पण तेथील वातावरणाशी ते कधीही समरस होऊ शकले नाहीत. फर्ग्युसनमध्ये नाही, तर निदान पुण्याच्या डेक्कन महाविद्यालयात तरी जाता यावे, म्हणून दर वर्षी ते प्रयत्न करीत. डेक्कनमध्ये खोली मिळण्यास अडचण असल्यामुळे त्यासाठी क्रम लावून ठेवावा लागे. पण क्रमासाठी करावयाच्या अर्जाला जो दाखला लागे तो द्यायला विल्सनचे प्राचार्य डॉ. मॅकिकन टोलवाटोलवी करीत. त्यामुळे दाखला वेळेवर जात नसे आणि डेक्कनमध्ये जाण्याचा केतकरांचा प्रयत्न अयशस्वी होई. मनाला मारूनमुटकून विल्सनमधली पाच वर्षे त्यांनी कशीबशी ढकलली.[1]

विल्सनमधील वातावरण केतकरांच्या देशाभिमानी स्वभावाला मुळीच मानवण्यासारखे नव्हते. तेथे त्यांच्या आवडत्या पेशव्यांवर मधूनमधून टीका होई. 'पेशव्यांनी मराठी राज्य बुडविले' असे उद्गार निघत, आणि नाना फडणविसाचा गंगाबाईशी वाकडा संबंध होता अशीही कुजबूज चाले. या सर्वाला साम्राज्यवादी डॉ. मॅकिकन संभावित मूकपणा धारण करून उत्तेजन देत. इंग्रजीचा वरचष्मा देशभर असावा आणि देशी भाषा चिरडल्या जाव्या, असे मॅकिकन यांना वाटे. त्यामुळे केतकरांच्या प्राणप्रिय मराठीला महाविद्यालयात पदोपदी मज्जाव होई. अर्ध्याहून अधिक विद्यार्थी महाराष्ट्रीय

१. आठवणी, केतकर, प्रतिभा, १४ ऑगस्ट १९३३.

होते; पण वादसभेत मराठीला प्रवेश नव्हता, आणि मराठी वृत्तपत्रांना वाचनालयात स्थान नव्हते. मराठीचे परीक्षकत्व मिळविण्यापुरती मात्र डॉ. मॅक्किकन मराठीची आवर्जून आठवण ठेवीत! सर्वच साम्राज्यवाद्यांप्रमाणे अल्पसंख्यांच्या हक्कांची त्यांना विशेष काळजी वाटे, हे सांगायला नकोच. विल्सनमधल्या या तऱ्हेच्या वातावरणामुळे केतकरांचे मन अभ्यासावरून पार उडाले आणि ते नाना दिशांनी भरकटत राहिले. शिवाय युरोपीय व्यक्तींच्या सान्निध्यामुळे त्यांच्याविषयीची भीती त्यांच्या मनातून निघून गेली आणि युरोपीय लोकांच्या सार्वजनिक हेतूंविषयी द्वेष त्यांच्या अंतरगात भिनून राहिला.

वर्गांतील पुष्कळशा तासांना आणि विशेषतः गणिताच्या तासांना बुट्टी मारून केतकर खोलीवर जात आणि इतिहास, वाङ्मय, राजकारण, रोमन कायदा वगैरे विषयांच्या वाचनात दंग होऊन राहात. वसतिगृहातील क्लबात जेवीत असता त्यांची वृत्ती विशेष उल्लसित असे. डॉ. पां. दा. गुणे, महामहोपाध्याय पां. वा. काणे, पंतप्रधान बा. गं. खेर, डॉ. य. खु. देशपांडे, प्रा. एल. जी. साठे वगैरे भावी काळांत चमकलेल्या व्यक्ती त्या वेळी विल्सनमध्ये शिकत होत्या आणि जेवताना त्यांच्याशी केलेल्या वादविवादांना और मजा येत असे. कोणी गंध लावून उघडे बसले आहेत, कोणी मुकटाही नेसला आहे, कोणी शर्ट न काढताच सुधारकासारखा जेवीत आहे, अशा चित्रविचित्र पंक्तीत नाना विषय वादासाठी निघत. जेवण संपले तरी वाद संपत नसत. या वादात मग केतकरांची गमतीदार, आगळीं मतें बाहेर पडत. 'केसरी'त 'कोकणस्थ, देशस्थ आणि कऱ्हाडे' असा एक लेख तेव्हा आला होता आणि त्यात या तीन पोटजातींमध्ये लग्नसंबंध घडावेत असे प्रतिपादिले होते. त्यावर केतकरांनी असा पक्ष घेतला होता, की (ब्राम्हणांतील विवाहांची व्यापकता सारस्वत नि कायस्थ प्रभूंपर्यंतही वाढवावयास हवी. किंबहुना कोकणस्थांचे विवाह देशस्थांशी होण्याऐवजी ते सारस्वत नि प्रभू जातींशी व्हावे.[१] कारण कोकणस्थ नि देशस्थ यांत जेवढे साम्य आहे त्यापेक्षा कोकणस्थ नि सारस्वत-प्रभू यांत अधिक साम्य आहे!) केतकरांचे हे मत स्वानुभवावरच आधारलेले होते. मुंबईत भटकताना त्यांच्या तरुण दृष्टीने स्त्रीसौंदर्याचे विविध नमुने टिपले होते आणि त्यांना पाठारे प्रभू वगैरे स्त्रिया "फार सुंदर" वाटल्या होत्या. अर्थात कोकणस्थांचे अशा रूपसुंदर स्त्रियांशी विवाह होण्यास कां आडकाठी असावी? आहारभिन्नतेची अडचण या जातींमध्ये होती; पण तिची क्षिती केतकरांना वाटली नाही. कारण प्रभाकरपंत शिलोत्री, महादेवराव खारकर वगैरे मंडळींच्या संगतीने त्यांचा आहार "थोडासा व्यापक" झालेला होता. असो. जेव्हा वाचन आणि गप्पा मन रमवायला पुरेशा पडत नसत तेव्हा केतकरांचे वात्रट तरुण मन काही तरी गंमत उडवून देण्याच्या मागे असे. त्यांच्याबरोबर विल्सनमध्ये असणारी काही मंडळी असे सांगतात, की त्यांनी एकदा

१. आठवणी, केतकर, प्रतिभा, १४ ऑगस्ट १९३३.

एका फटाकड्या पार्शी पोरीला एक प्रेमपत्र लिहिले होते. त्यावरून प्राचार्य मॅक्किन यांनी त्यांना आपल्या खोलीत बोलावले, आणि काय चमत्कार झाला कोण जाणे, ते प्रकरण तिथच्या तिथेच जिरले![1]

शाळेप्रमाणे महाविद्यालयातही त्यांचे वाङ्मयीन उद्योग चालू असत. 'परमानंद प्राइझ'साठी होणाऱ्या चढाओढीत 'तुकाराम, एकनाथ इत्यादी साधूंचे महाराष्ट्रातील कार्य' या अर्थाच्या विषयावर त्यांनी एक निबंध पाठविला होता. पण निबंधात तुकाराम व ख्रिस्त यांची तुलना करण्याचा 'अव्यापारेषु व्यापार' त्यांनी केल्यामुळे श्री. वि. मो. महाजनी व प्रा. मॅक्किन यांनी त्यांचा निबंध बक्षिसाला अपात्र ठरविला. पुढे हा निबंध त्यांनी प्रा. विजापूरकरांच्या 'ग्रंथमाले'कडे प्रकाशनार्थ पाठविला; पण विजापूरकर त्याच वेळी तुरुंगात गेल्यामुळे तो कोठे तरी गळफटून नाहीसा झाला.[2] १९०४ च्या सुमारास केतकरांचा 'मासिक मनोरंजन'चे संपादक श्री. का. र. मित्र यांच्याशी परिचय झाला आणि 'मनोरंजन'च्या संपादनात ते थोडेसे सहभागी होऊ शकले. श्री. मित्रांशी ओळख झाल्यावर आपले शाळासोबती श्री. रा. सं. गडकरी यांच्या एका कादंबरीची शिफारस त्यांनी श्री. मित्रांकडे केली आणि तिला प्रकाशनाची वाट दाखविली. मात्र प्रकाशनापूर्वी श्री. मित्रांनी कादंबरीचे 'सुधारणेचा मध्यकाल' असे नवे नामकरण केले व तीत बरीच काटछाट केली; त्यामुळे गडकरी नि केतकर दोघेही फार नाराज झाले. गडकऱ्यांची प्रतिभा पूर्णपणे प्रकाशात आणण्यासाठी स्वतःचेच मासिक हवे, असा विचार या वेळेपासून केतकरांच्या मनात घोळू लागला. त्यांची स्वतःची काही ओबड-धोबड प्रेमकाव्ये या सुमारास साभार परत आली होती. तेव्हा आपल्या स्वतःच्या प्रतिभेला वाव मिळावा म्हणूनही स्वतंत्र मासिकाची गरज त्यांना भासू लागली असावी.[3]

अवांतर उलाढालींतून उरलेल्या वेळात केतकर जो अभ्यास करीत त्याचे फळ न सांगताही समजण्यासारखे आहे. 'इंटर'च्या वर्गात असताना त्यांना योगमार्गाचा छंद जडला. पातंजलयोगदर्शन, हठयोगप्रदीपिका वगैरे ग्रंथ त्यांच्या अभ्यासिकेत दिसू लागले आणि उमरावतीला शिकलेल्या धौतीची वगैरे उजळणी होऊन ते आणखी काही योगक्रिया करू लागले. विसाव्या शतकाचा प्रारंभ हा विवेकानंदांसारख्या योगमार्गाच्या जगद्विख्यात पुरस्कर्त्याचा उत्कर्षकाल होता. त्या वेळी पुण्याला अगम्यगुरु नि नाशिकला विनायकबुवा फाटक वगैरे योगमार्गी बुवा संचार करीत होते. योगमार्गाच्या व्यावहारिक मर्यादा स्पष्ट झालेल्या नसल्यामुळे योगाचा उपयोग देशकार्याकडे करता येईल, अशी काहींची कल्पना होती. या वातावरणाचा परिणाम होऊनच केतकर योगमार्गाकडे

१ प्रतिभा, जुलै १९३७, य. खु. देशपांडे; लोकशिक्षण, मे-जून १९३७, श्री. रा. पारसनीस; आठवणी, केतकर, प्रतिभा, २३ ऑक्टोबर १९३३; आठवणी, य. खु. देशपांडे; महाराष्ट्र, १९ मे १९१५.

२ आठवणी, केतकर, प्रतिभा, १४ ऑगस्ट १९३३.

३ आठवणी, केतकर, प्रतिभा, ९ ऑक्टोबर व २३ ऑक्टोबर १९३३.

वळले असावे. मात्र अखेर त्यांच्या ध्यानी आले, की लबाड नि भोंदू बुवांनी आपणाला पुरेपुरे फसविले आहे. त्यांना योगाचें तेल मिळाले नाही, महाविद्यालयांतील शिक्षणाचे तूप सांडून गेले, आणि 'इंटर'च्या परीक्षेत "नापाशी"चे धुपाटणे त्यांच्या हाती आले.[१]

'इंटर'च्या परीक्षेत अनुत्तीर्ण होण्याला आणखी एक कारण होते. प्रा. रॉबर्ट्सन त्यांना मिल्टनचें 'पॅरेडाइज लॉस्ट' शिकवीत असत. त्यातील 'प्रीडेस्टिनेशन'वर किंवा 'विधिलिखिता'वर भाष्य करीत असता प्रा. रॉबर्ट्सननी असे प्रतिपादन केले होते, की 'सर्वज्ञ ईश्वराला पुढील सर्व गोष्टी ठाऊक असल्या तरी माणसाच्या इच्छाशक्तीचें स्वातंत्र्य नष्ट होत नाही.' पण केतकरांना वाटले, की 'ईश्वराला जर पुढील गोष्टी ठाऊक असतील तर त्या वज्रलेप ठरलेल्या असणार. भवितव्य असे ठरलेले असल्यावर इच्छाशक्तीला स्वातंत्र्य असणे शक्य नाही. जे व्हायचे तेच होणार, घडायचें तेच घडणार.' साहजिक, यशासाठी कां धडपडायचें, असा प्रश्न त्यांना भेडसावू लागला. त्यांनी ठरविले, की 'आयुष्याचे तारू भटकेल तिकडे भटकू द्यावे! आपण उत्तीर्ण होणार असलो तर अभ्यास न करताही उत्तीर्ण होऊ आणि अनुत्तीर्ण होणार असलो तर अभ्यास करूनही अनुत्तीर्ण होऊ! मग अभ्यासाची यातायात कशाला?' त्यांनी अभ्यासामागची इच्छाशक्तीची प्रेरणा काढून घेतली आणि व्हायचे तेच झाले. त्यांनी परीक्षेत गोता खाल्ला.[२]

ते गोत्यामागून गोते खात होते. बी. ए.च्या पहिल्या वर्षाला असताना ते पहिल्या एलएल. बी. ला बसले होते, तेव्हा ते अनुत्तीर्ण झाले; आणि बी. ए.च्या दुसऱ्या वर्षाच्या परीक्षेतही ते खाली राहिले. या वेळी योग किंवा 'विधिलिखित' आडवे आले नाही, पण देशभक्ती नि परीक्षाविषयक "जुगुप्सा" यांनी वाट अडवून धरली. विल्सन महाविद्यालय जवळजवळ गावात असल्याने मुंबईतील राजकीय वातावरण केतकरांपर्यंत येऊन सहज पोहोचे. त्या काळी गणेशोत्सव नि शिवजन्मोत्सव चांगले जोरात चालले होते; कर्झनच्या झोटिंगशाहीविरुद्ध टिळकांच्या 'केसरी'ची गर्जना घुमू लागली होती; बोअरयुद्ध नि चिमुकल्या जपानने रशियावर मिळवलेला विजय यांमुळे राष्ट्रीय आत्मविश्वास उजळला होता;—आणि सशस्त्र क्रांतिकारकांची गुप्त संघटना महाराष्ट्रात पसरू लागली होती. त्यामुळे मुंबईचे राजकीय वातावरण तेव्हा काहीसे गरम झाले होते आणि त्याचा परिणाम सभाव्याख्यानांना हटकून उपस्थित असणाऱ्या केतकरांवर होत होता. या वातावरणाने त्यांची देशभक्ती उद्दीपित होऊन अभ्यासात मन लावणे त्यांना अशक्य झाले. त्यातून गावातल्या सभा गाजविणारे वक्ते प्रचलित शिक्षणपद्धतीवर कठोर टीका करीत आणि परीक्षांमधील फोलपणा आग्रहपूर्वक प्रतिपादीत. त्यामुळे तर परीक्षा म्हणजे व्यर्थ खटाटोप होय, अशी केतकरांची भावना

१. आठवणी, केतकर, प्रतिभा, २८ ऑगस्ट १९३३.
२. आठवणी, केतकर, प्रतिभा, २८ ऑगस्ट १९३३.

झाली. अभ्यास नाही, परीक्षेवर श्रद्धा नाही, तेव्हा पहिल्या एलएल. बी.ला आणि बी. ए.ला त्यांनी गोते खाल्ले तर त्यात नवल ते कसले? महाराष्ट्राच्या या भावी ज्ञानकोशकाराच्या गळ्यात हिंदुस्थानातील पदवीची माळ कधीच पडली नाही![1]

वीर विनायकराव सावरकर आणि जॅक्सनवधासाठी फाशी गेलेले हुतात्मा कृष्णाजी गोपाळ ऊर्फ आण्णा कर्वे ज्या 'कॉलेजच्चतुष्टयी'त शिकत होते तीतच केतकर शिकत होते. त्यामुळे सावरकर, कर्वे आणि केतकर यांचे राजकीय विचार साधारणतः सारख्याच दिशेने धावत असत. काँग्रेसबद्दल सर्वांना तिरस्कार होता; भिक्षांदेहीने काही मिळणार नाही, याबद्दल सर्वांची खात्री होती; आणि पारतंत्र्यात स्वजातीचा अपमान होतो तर निदान गोऱ्यांची खुशामत करू नये, असे साऱ्यांना वाटत होते. काही दिवस "नैराश्यवादी मंडळीत 'अधिकारी-हत्या-मत' पसरू लागले होते." केतकरदेखील राजकीय कारणासाठी परक्यांची हत्या करावी, अशा विचारांपर्यंत येऊन ठेपले होते. भावी काळात जॅक्सनला ठार करणारे खुद्द आण्णा कर्वे एकदा समोर बसले असताना केतकर म्हणाले, की "इंग्रज अधिकाऱ्याची हत्या करावयाची झाली तर त्याची पानसुपारी चालली असता त्याला गोळी घालावी. म्हणजे संशय पानसुपारी देणारांवर जाईल आणि इंग्रजस्तुतीचे... प्रकार बंद पडतील."! केतकरांच्या या उद्गारांमुळे आण्णा कर्व्यांच्या भावी प्रयत्नाचा घाट ठरला की काय ते ईश्वराला माहीत; पण केतकर जहाल मतांकडे कसे झुकले होते, ते या उद्गारांमुळे स्पष्ट होते.[2]

केतकर "अधिकारी-हत्या-मता"पर्यंत पोहोचले, पण क्रांतिकारकाला साजेशी प्रत्यक्ष कृती त्यांच्या हातून केव्हाही घडली नाही; कारण त्यांचे राजकीय विचार सारखे बदलत होते नि प्रगत होत होते. याविषयी ते म्हणतात, "राजकीय तऱ्हेच्या प्रयत्नात पडण्याच्या काठावर मी येत असे, पण आत गुंतत नसे, याला कारणे अनेक असत. तसल्या तऱ्हेच्या प्रयत्नात जी मंडळी पडत त्यांच्या मतांपासून माझी मते जराशी पुढे सरकलेली असत; त्यामुळे मी कोणच्याच प्रकरणात सामील झालो नाही...ज्या वेळेस दुष्ट सरकारी अधिकारी मारून टाकावे म्हणजे हिंदुस्थानला बरे दिवस येतील असे मला वाटे, त्या वेळेस आमच्या सहाध्यायी मंडळींपैकी कोणास तसे वाटत नसे. तथापी जेव्हा तशा प्रकारचे मत लोकांत होई [तेव्हा] त्याच्या अगोदरच त्या मताचा मी त्याग केला [आहे], असे...आढळून येई." केतकरांचे विचार कृतीच्या पुढे असे पळत राहिल्याने मित्रांचा त्यांच्याविषयी गैरसमजही झाला. "देशकल्याणाचा खरा एकच मार्ग सोडून" ते स्वार्थाच्या मागे लागले आहेत असा आरोप क्रांतिकारक विचारांची मंडळी त्यांच्यावर मधूनमधून करीत असत.[3]

त्या काळी बहुतेक जहाल आणि क्रांतिकारक तरुणांना सुधारकांबद्दल तुच्छता वाटे,

१. आठवणी, केतकर, प्रतिभा, २८ ऑगस्ट १९३३.
२. आठवणी, केतकर, प्रतिभा, २८ ऑगस्ट १९३३.
३. आठवणी, केतकर, प्रतिभा, २८ ऑगस्ट १९३३.

व सुधारक म्हणजे सरकारचे हांजीखोर आहेत, अशी त्यांची भावना असे. हीच भावना केतकरांच्या मनातही रुजली आणि त्यांच्या स्वभावधर्माप्रमाणे तेथून कधीही हलली नाही. सुधारकांचे राष्ट्रप्रेम त्यांना ठिसूळ नि तकलुबी वाटे व म्हणून त्यांचा त्यांना संताप येई. डॉ. रामकृष्णपंत भांडारकर व सर नारायणराव चंदावरकर यांच्याविषयी त्यांनी जे उद्गार काढले आहेत त्यांत ही गोष्ट स्पष्टपणे दिसून येते. ते म्हणतात, "डॉ. भांडारकरांच्या विद्वत्तेचा लौकिक जरी बऱ्या प्रकारचा होता तरी त्यांची राजकीय वृत्ती अत्यंत खेदकारक होती, आणि त्यामुळे आम्हांस त्यांच्याविषयी अगदी तिरस्कार वाटे. पेशवाई गेली हे बरे झाले, नाही तर आम्ही अजून संध्या-ब्रम्हयज्ञ करीत बसलो असतो, हे डेक्कन कॉलेजच्या विद्यार्थ्यांपुढे [त्यांनी] उच्चारलेले वाक्य ज्यांच्या कानी पडले त्यांना त्या गृहस्थाविषयी फारसा आदर वाटणे शक्य नाही. आम्हांस त्यांच्या विद्येशी करावयाचे आहे काय? इंग्रजांस खूप करण्यास त्यांची विद्या वापरली जाते, याबद्दल आम्हांस राग येई." ते सर चंदावरकरांबद्दल म्हणतात, की "विल्सन कॉलेजात सर चंदावरकर व्याख्यानास गेले म्हणजे मिशनऱ्यांची जी खुशामत चाले व स्वतः हिंदु धर्माचे [खोटे] अभिमानी बनून हिंदू समाजातर्फे हिंदूंचे व हिंदूंच्या धर्मग्रंथांचे नसते दोष कबूल करणे चाले, ते ऐकून कोणाही स्वाभिमानी मनुष्यास सर चंदावरकरांविषयी रागच येई." केतकरांना न्यायमूर्ती रानड्यांबद्दलही विशेष प्रेम किंवा आदर नसे. प्रार्थनासमाजाबद्दल ते म्हणतात, की "फक्त जुन्या संप्रदायांविषयी तिरस्कार दाखविणाऱ्या आणि खिस्ताच्या संप्रदायाविषयी आपलेपणा दाखविणाऱ्या प्रार्थनोंच्या टोळीविषयी [मला] राग येत असे." डॉ. भांडारकर, सर चंदावरकर, न्यायमूर्ती रानडे, प्रार्थनासमाज यांचा अंतर्भाव सामान्यपणे सुधारकपक्षात होत असे; तेव्हा केतकरांच्या जहाल देशभक्तीची सुधारकपक्षाशी सोयरीक न जमून सुधारकांबद्दल सर्वसाधारणपणे तुच्छता नि राग या भावना त्यांच्या मनामध्ये वावरत, हे साहजिक होते.[१]

बी. ए.च्या दुसऱ्या वर्षाला असताना केतकरांच्या राजकीय विचारांनी असा टप्पा गाठला, की सशस्त्र उठावणी केल्याशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही, असे त्यांना वाटू लागले. सशस्त्र उठावणी करावयाची तर १८५७प्रमाणे फौज फितवली पाहिजे, शस्त्रसंचय करून योग्य संधीची वाट पाहात राहिले पाहिजे आणि लष्करी शिक्षण मिळविले पाहिजे, या गोष्टी ओघाने आल्या. या गोष्टी करण्याकरता त्यांनी आणि त्यांच्या मित्रांनी एक क्रांतिकारक गुप्त संघ स्थापन करण्याचा प्रयत्न केला. पण इतक्यात त्यांना एक कायदेपंडित भेटला आणि त्याने सांगितले, की लष्करी शिक्षण घेणे हा गुन्हा होत नाही. तेव्हा लष्करी शिक्षण कोठे मिळेल याची चौकशी सुरू झाली आणि त्यांनी मुंबईमधील अनेक परदेशीय वकिलातींच्या कार्यालयात खेटे घातले.

१. आठवणी, केतकर, प्रतिभा, ३१ जुलै व ६ नोव्हेंबर १९३३; शिवाय पाहा : संकीर्ण लेख, पृष्ठ ५; 'प्रार्थनासमाजाचा इतिहास' (अभिप्राय), विद्यासेवक, एप्रिल १९२८.

लष्करी शिक्षण अमेरिकेमध्ये बऱ्याच शाळांतून व विद्यापीठांतून मिळते, हे या वेळी त्यांना कळले आणि क्रांतिकारक गुप्त संघ स्थापण्याची कल्पना मागे पडली. मात्र सशस्त्र उठावणीच्या गप्पा मारणाऱ्या बोलघेवड्यांपैकी कोणीही अमेरिकेला जाण्यास तयार होईना. फक्त श्री. प्रभाकरपंत शिलोत्री आणि केतकर असे दोघे जणच जाण्याला तयार झाले. "बाकी कोणी मंडळीं आपल्या आयुष्यास हवे तिकडे भटकू देण्यास तयार नव्हती." शिलोत्री व केतकर अमेरिकेस जाण्याचा बेत ठरल्यानंतर त्यांच्या वाटखर्चा-साठी निधी जमविण्याची कल्पनाही क्रांतिविचाराच्या तरुण मंडळीत निघाली होती; पण निधीसाठी प्रत्यक्ष रक्कम काहीही जमा झाली नाही. तेव्हा एका स्नेह्याकडून चारशे रुपये घेऊन, १९०५ साली शिलोत्री अमेरिकेस निघून गेले. केतकर त्यांच्याबरोबरच जाणार होते पण चुलत्यांनी त्यांच्या जाण्याला हरकत घेऊन त्यांना पैसे दिले नाहीत. त्यामुळे त्यांना काही काळ लोटल्यावर मागाहून जावे लागले.[१]

केतकरांनी बी. ए. न होताच परदेशात जावे, हे नानासाहेबांना मान्य नव्हते. केतकरांनी आय. सी. एस. व्हावे ही वडिलांची इच्छा होती आणि डॉक्टर व्हावे ही नानासाहेबांची इच्छा होती. दोघांच्या इच्छांना केतकरांनी आतापर्यंत वाटाण्याच्या अक्षता लावल्याच होत्या; पण आता परदेशात जावयाचे तर निदान पदवी घेऊन सन्मानपूर्वक जावे, असे नानासाहेबांचे म्हणणे पडले. त्यातच केतकरांनी नानासाहेबांना सांगितले, की अमेरिकेत जाऊन लष्करी शिक्षण घेण्याचा आपला विचार आहे. त्यामुळे तर सारेच मुसळ केरात पडले. त्या काळी बायकोने 'केसरी' मागविला तर नवऱ्याची नोकरी जाई! मग राज्यक्रांतीचा हेतू मनात धरून लष्करी शिक्षण घेण्यासाठी पुतण्या अमेरिकेस गेला असता तर चुलत्याचे काय झाले असते? नसती सरकारी तोहमत ओढवून घेण्याची नानासाहेबांची इच्छा नव्हती; आणि पुतण्यानेही संकटात उडी घ्यावी, हे त्याना मानवत नव्हते. केतकरांच्या वडिलांची काही ठेव व काही दागदागिने घरात होते ते केतकरांना देण्यास त्यांनी स्पष्ट नकार दिला. पण केतकर अशा नकाराने बधण्याइतके कच्च्या दिलाचे ख्यास नव्हते. आपल्या स्वभावानुसार त्यांनी एक खिसाडी टोला हाणला आणि प्रश्न एकदम सोडवून टाकला. त्यांनी चुलत्यांना सरळसरळ धमकी दिली, की वाटण्या करून न दिल्यास मी न्यायालयाची पायरी चढेन! त्यामुळे नाइलाज होऊन, त्यांचे थोरले बंधू दामोदरपंत यांच्या संमतीने नानासाहेबांनी वाटण्या केल्या आणि अमेरिकेच्या वाटखर्चाइतके पैसे केतकरांच्या पदरात पडले.[२]

पैसे मिळाले पण जाणे मात्र लांबणीवर पडले. कारण वाटण्या झाल्यावरही केतकरांना उमरावतीहून सोडण्यास नानासाहेब तयार नव्हते. केतकर कुठे जातात, काय करतात, हे बघण्यासाठी त्यांनी पाळतीला एक मनुष्य ठेवला आणि केतकरांना

१ आठवणी, केतकर, प्रतिभा, २८ आगस्ट १९३३.

२ आठवणी, केतकर, प्रतिभा, २८ ऑगस्ट १९३३; लोकशिक्षण, मे-जून १९३७, बा. सं. गडकरी.

उमरावती सोडणे अशक्य केले. पण अखेर एक युक्ती योजून केतकर नानासाहेबांच्या मिठीतून शिताफीने निसटले. त्यांनी अमेरिकेला जाण्याची भाषा अजिबात सोडली, चांभाराला घरी बोलावून त्याच्याकडे एक चढाव करण्यास टाकला व सर्वांच्या देखत त्याला एक रुपया विसारा दिला, परटाकडेही काही कपडे धुवायला टाकले, आणि आपल्यावरील पाळत ढिली केली. मग एके दिवशी संध्याकाळी ते म्हणाले, 'मी गडकऱ्यांकडे जाऊन येतो.' श्री. वा. सं. गडकऱ्यांकडे जाऊन त्यांना त्यांनी कीर्तन करण्याचा आग्रह केला. ते गडकऱ्यांना म्हणाले, 'आज तुमचे कीर्तन झालेच पाहिजे. मला कीर्तन ऐकायची हुक्की आली आहे!' गडकऱ्यांचे कीर्तन उभे राहिले; स्टेशनाजवळील हमालवस्तीमधले काही स्त्रीपुरुष कीर्तनासाठी जमले आणि सव्वा अकराच्या सुमारास कीर्तन आटोपले. जणू भक्तिपूर्ण अंतःकरणाने कीर्तन श्रवण करून केतकर गडकऱ्यांच्या घरातून निघून गेले.—आणि ते गेले ते गेलेच! रात्रीच्या एक्सप्रेसने त्यांनी मुंबई गाठली![1]

एवढ्या खटाटोपाने पैसे मिळवून ते मुंबईला आले खरे; पण मुंबईस आल्यावर त्यांच्या विचारांत भलतेच स्थित्यंतर झाले. शिलोत्री अमेरिकेस गेल्यानंतर वर्षभराच्या काळात त्यांनी हिंदुस्थानची स्थिती पुन्हा अभ्यासली होती आणि युद्धविषयक अनेक पुस्तके वाचली होती. त्यावरून त्यांची अशी खात्री पटली, की हिंदुस्थानात यशस्वी बंड करणे शक्य होणार नाही! अर्थात अमेरिकेला जाण्यामध्ये लष्करी शिक्षण घेणे हे जे प्रयोजन होते ते यामुळे संपुष्टात आले. मात्र प्रयोजन संपले तरी अमेरिकेला जाण्याचा बेत केतकरांनी सोडला, असे मात्र नाही. आजवर अमेरिकेला जाण्याच्या गप्पा मारल्या तर आता पाय मागे घेऊन नामुष्की पतकरणे बरे नाही, बोललेले बोल खरे करून दाखविले पाहिजेत, अशा भरीला ते पडले आणि अमेरिकेला जाण्याचा बेत त्यांनी घट्ट धरून ठेवला! लो. टिळकांना ते भेटले आणि आपल्या परदेशगमनाच्या विचाराला त्यांचा आशीर्वाद त्यांनी मिळविला. सावरकर, खाडिलकर, रवींद्रनाथ टागोर वगैरेंना परदेशी जाण्यासाठी सक्रिय साह्य करणाऱ्या टिळकांनी केतकरांना द्रव्यसाह्यही देऊ केले आणि केतकरांच्या नातेवाइकांचा त्यामुळे टिळकांवर रोष झाला. या घटना इकडे घडत असताना १९०५च्या अखेरीस तिकडे बी. ए. च्या परीक्षेचा निकाल लागला आणि त्यात, पूर्वी सांगितल्याप्रमाणे, केतकरांचाही निकाल लागला! पण परीक्षेत-उत्तीर्ण होऊन पदवीचे शेपूट मागे लावणे हे त्यांचे ध्येय नसल्यामुळे अनुत्तीर्ण झाल्याचे त्यांना काही वाटले नाही. बी. ए. अनुत्तीर्ण झालेला आणि कौटुंबिक पाशातून जवळजवळ पूर्णांशाने सुटलेला हा तरुण आपल्या मार्गाने बिनदिक्कत तसाच पुढे जात राहिला.[2]

१. आठवणी, दि. य. फाटक; लोकशिक्षण, मे-जून १९३७, बा. सं. गडकरी.
२. आठवणी, केतकर, प्रतिभा, २८ ऑगस्ट १९३३; 'केसरीकारांची ज्ञानकोशविषयक वृत्ती', विद्यासेवक, जून १९२५; 'ज्ञानकोशकारांचे केसरीकारांस प्रत्युत्तर', विद्यासेवक, जुलै १९२५.

बी. ए. चा निर्णय लागल्यापासून अमेरिकेला निघेपर्यंत जो काळ लोटला तेवढ्यात या तरुणाने एका मासिकाला जन्म दिला ! (आपले मित्र श्री. वा. सं. गडकरी हे हरी नारायण आपट्यांपेक्षा श्रेष्ठ प्रतीचे कादंबरीकार आहेत,) असे केतकरांचे मत होते. 'मनोरंजन'कारांनी गडकऱ्यांच्या कादंबरीची कत्तल केल्यापासून त्यांच्या कादंबऱ्यांच्या प्रकाशनासाठी एक मासिक काढावे अशी कल्पना त्यांच्या डोक्यात घोळतच होती. त्या कल्पनेला आता त्यांनी मूर्त स्वरूप दिले आणि ('महाराष्ट्र-वाग्विलास' हे मासिक १९०६च्या जानेवारीत चालू केले.) मासिक काढण्याची कल्पना गडकऱ्यांना त्यांनी पटवून दिली होती आणि मासिकावर गडकरी व केतकर या दोघांची नावे संपादक म्हणून झळकत होती. "थकल्याभागल्या वेळी लोकांची करमणूक करावी" हे मुख्य निसाधे ध्येय मासिकाने आपणासमोर ठेवले होते. केतकरांनी गडकऱ्यांकडून एका कादंबरीची काही प्रकरणे मागून घेऊन 'दुर्दैवी प्रेमयोग' असे त्या कादंबरीला नाव दिले, स्वतः एक ऐतिहासिक गोष्ट लिहिली, इतर मजकूर जमविला आणि पहिला अंक तडाख्याने बाहेर काढला. दुसऱ्या अंकापासून बॅ. हरिश्चंद्र तालचेरकर या 'रावबहादुर पर्वत्या' नामक प्रहसनाच्या प्रसिद्ध लेखकाचे लेखनसाह्य त्यांनी मिळविले. मासिकाला द्रव्याचे पाठबळ शून्य होते; पण वर्गणीदार मिळविण्यासाठी गडकऱ्यांना वऱ्हाडात त्यांनी हिंडायला लावले, स्वतः मुंबईला हिंडून घरोघर खटपट केली आणि तीनचार महिन्यांत वर्गणीदारांची संख्या दीडशेच्या आसपास नेऊन ठेविली. काही जाहिराती मिळविण्यातही ते यशस्वी झाले. लौकरच मासिकासाठी एक तरुण व्यवस्थापक त्यांनी मिळविला आणि मासिकाचे कार्यालय गिरगावात 'मोहन बिल्डिंग'मध्ये थाटून दिले. मासिकाचे चार अंक नियमितपणे काढून ते अमेरिकेकडे गेले, तेव्हा त्यांची अशी खात्री होती, की आपले मासिक नक्की यशस्वी होणार. पण त्यांच्यामागे गडकऱ्यांना मुंबईला येऊन मासिक चालविणे कठीण जाऊ लागले. गडकऱ्यांनी मासिकाचे स्थलांतर अमरावतीला केले, तरी आर्थिक परिस्थितीला तोंड देणे त्यांना शक्य नव्हते. त्यामुळे गडकऱ्यांच्या नेकीचा अंत पाहून हे छोटे पण चांगली वाङ्मयसेवा बजावणारे मासिक जून १९०८मध्ये, निघाल्यापासून अडीच वर्षांनी, शेवटी बंद पडले. या मासिकाच्या उद्योगात केतकर आणि गडकरी या दोघांना मिळून एक हजार रुपयांचे नुकसान सोसावे लागले! गडकऱ्यांनी आपल्या मावशीचे गोट विकून आणि केतकरांनी अमेरिकेसाठी काढलेल्या पैशांना तीनचार शे रुपयांची कात्री लावून हे नुकसान भरून काढले. झालेल्या नुकसानीमुळे गडकऱ्यांची साहित्यप्रकाशनाची हौस कायमची फिटली! केतकरांनी मात्र झाल्या प्रकारापासून धडा घेतला आणि प्रौढपणी प्रकाशनाचा अवाढव्य उद्योग यशस्वीपणाने करून दाखविला.[१]

[१] आठवणी, केतकर, प्रतिभा, २८ ऑगस्ट, ९ ऑक्टोबर व २३ ऑक्टोबर १९३३; लोकशिक्षण, मे-जून १९३७, वा. सं. गडकरी; महाराष्ट्र-वाग्विलासचे अंक.

'वाग्विलास'साठी केतकर वर्गणीदार जमवीत होते, तेव्हाची त्यांच्या गमत्या स्वभावाची एक आठवण सांगण्यासारखी आहे. त्यांचे प्रचारकौशल्य बघून एक कंजूष मित्र त्यांना म्हणाला, 'तुमच्या प्रचाराचा परिणाम इतरांवर होईल, पण माझ्यावर तुमची मात्रा चालायची नाही. मला वर्गणीदार करण्याइतपत हुषारी तुमच्यामध्ये नाही. काय करायचे ते करा आणि मला वर्गणीदार करून दाखवा.' तेव्हा केतकर चारपाच दिवस स्वस्थ बसले आणि मग त्याला शांतपणे म्हणाले, 'तुम्ही वर्गणीदार झाल्याबद्दल आभार बरे का! मिसेस * * नीस या नावाने अंकाची व्ही. पी. तुमच्या गावी पाठविली आणि वर्गणीचे पैसे हाती आले.' हे ऐकताच तो कंजूष गारच झाला. तो रागावून बोलू लागला तेव्हा केतकर म्हणाले, 'काय करायचे ते करा, असे तुम्ही सांगितलेत आणि माझ्या हुषारीचा प्रश्न काढलात, म्हणून हे केले.' त्या कंजुषाने पैसे परत मागितले, त्या वेळी त्यांनी पैसे परत देऊ केले, पण त्याच्याकडून असे लिहून घेतले, की 'पुन्हा तुमच्या हुषारीबद्दल प्रश्न उत्पन्न करणार नाही! व केलाच तर २५० रुपये दंड देईन!' लिहिण्याखाली 'स्टँप' लावून त्यांनी त्यावर त्या कंजुषाची सहीदेखील घेतली. मग मिस्कील गंभीरपणाने ते त्याला म्हणाले, 'आता तुम्हांला वर्गणीचे पैसे आम्ही परत देण्याचे कारण नाही. कारण तुमच्या गावी व्ही. पी. केली नव्हती आणि मिसेस * * नीस यांच्याकडून पैसेही आले नव्हते!' त्या कंजुषाचा चेहरा तेव्हा प्रेक्षणीय झाला असेल यात शंका नाही.[1]

महाविद्यालयात एका फटाकड्या पार्शी पोरीला प्रेमपत्र लिहिणारे केतकर 'वाग्विलास' चालू असताना स्त्रीजातीकडे अधिकाधिक ओढले जात होते. ज्या 'मोहन बिल्डिंग'मध्ये 'वाग्विलास'चे कार्यालय होते त्या 'मोहन बिल्डिंग'मध्ये उमरावतीची त्यांच्या ओळखीची एक देखणी नि तरुण स्त्री येऊन राहिली होती. ही स्त्री विवाहित होती आणि काही शिक्षण घेण्याच्या उद्देशाने मुंबईस आली होती. केतकर तिच्याकडे वारंवार जाऊन गप्पागोष्टीत तासच्या तास घालवीत असत. 'महाराष्ट्र-वाग्विलास'मध्ये 'बंगालची आठवण' या नावाचा जो लेख प्रसिद्ध झाला होता त्यातील माहिती याच 'सन्मान्य भगिनीकडून' त्यांनी मिळविली होती. पातळ वस्त्र परिधान करणाऱ्या किंवा गंगेत स्नान करताना गोपा चटसारा बाजूला ठेवणाऱ्या बंगाली स्त्रियांचे चोखंदळ वर्णन या लेखामध्ये केलेले आहे. त्यावरून त्या विवाहित स्त्रीबरोबर तरुण केतकर कशा तऱ्हेच्या गप्पागोष्टी करीत असतील याचा सुगावा लागू शकतो. अत्यंत जिवलग मित्र भेटायला आले तरी या स्त्रीकडे खेप टाकल्याशिवाय त्यांना राहवत नसे आणि मित्रांच्या साभिप्राय नेत्रपल्लवीला आपल्या धृष्ट स्वभावानुसार ते जुमानीत नसत. ते अमेरिकेला जाण्याच्या आदल्या दिवशी त्यांचे आतेभाऊ रा. दिवाकरपंत फाटक आणि मित्र रा. सं. गडकरी व शांतारामपंत दांडेकर त्यांना भेटायला त्यांच्या खोलीवर गेले होते. त्या वेळी

१. 'तीस वर्षांपूर्वीचा संपादकीय अनुभव', केतकर, यशवंत, एप्रिल १९३६

मित्रपरिवारातून ते असेच खुशाल उठले आणि त्या स्त्रीच्या खोलीकडे गप्पाटप्पांसाठी निघून गेले.[1]

१५ एप्रिल १९०६ रोजी केतकरांनी अमेरिकेस जाणाऱ्या बोटीवर मुंबई बंदरामध्ये पाय ठेवला. त्या वेळी, सूट, बूट, टाय, हॅट असा नखशिखान्त साहेबी पोषाख त्यांनी अंगावर चढवला होता आणि राजबिंडेपणाचा एक विशेष नूर त्यांच्या दर्शनात खुलून राहिला होता. आता त्यांचा बालपणातला काळसरपणा काहीसा कमी होऊन त्यांच्या शरीरावर गव्हाळ कांती शोभू लागली होती. त्यांची रोड शरीरयष्टी भरून ती थोडी रुंदावली होती.—आणि शरीरयष्टी रुंदावल्यामुळे उंचटपणा कमी होऊन ते मध्यमसर दिसू लागले होते. बोटीवर चढून हिंदुस्थानच्या किनाऱ्याकडे बघताना त्यांच्या तोंडावर नेहमीचे हास्यदेखील झळकत असावे. पण त्यांचा बाह्य परिवेष असा उघड असला तरी त्यांच्या मनात काय होते ते सांगणे कठीण होते. कारण बोटीचे तिकीट काढल्या-नंतर फक्त दोनेकशे रुपये त्यांच्या खिशात शिल्लक होते आणि बँकेत अडकलेले तीनचारशे रुपये किनाऱ्यावर उभे असलेले त्यांचे आतेभाऊ श्री. दिवाकरपंत फाटक त्यांना मागाहून धाडणार होते: पण पैशाची अशी टंचाई असताना ते सातासमुद्रापलीकडे आनंदाने निघाले होते. अमेरिकेत जाऊन राज्यक्रांती करण्यासाठी लष्करी शिक्षण घ्यावे, हा बेत त्यांच्या मनातून विरून गेला होता; पण बोललेले शब्द खरे करण्यासाठी ते प्रवासाला चालले होते. तारुण्यामध्ये नवे जग बघण्याची जी साहसी प्रवृत्ती असते तिनेही त्यांचे मन तरारले असावे; पण अमेरिकेत गेल्यानंतर आपण काय करणार याबद्दल त्यांना काहीही कल्पना नव्हती! त्यांनीच एके ठिकाणी म्हटले आहे, की "अमेरिकेस गेल्यानंतर आपण काय करावे, यासंबंधीचे मनापुढे कोणतेच कल्पनाचित्र नव्हते." तेव्हा त्यांचे मन म्हणजे संमिश्र नि अस्पष्ट भावनांचे एक धुके होते. त्यांच्यापूर्वी विवेकानंद, पंडिता रमाबाई वगैरे कित्येक भारतीय अमेरिकेस गेले होते; पण अगदी निरुद्देश, धुकटलेल्या मनाने, आणि आनंदाच्या धुंदीतही, खिशात पुरेसा पैसा नसताना अमेरिकेस निघालेला हा पहिलाच भारतीय मनुष्य असावा!—आणि कोणी सांगावे, शेवटचाही असेल![2]

१ आठवणी, दि. य. फाटक व बा. सं. गडकरी; महाराष्ट्र-वाग्विलास, जानेवारी १९०६.
२. आठवणी, केतकर, प्रतिभा, २८ आगस्ट व ९ ऑक्टोबर १९३३; 'अमेरिकेचा प्रवास' महाराष्ट्र-वाग्विलास, ऑगस्ट १९०६.

# अमेरिकेतील विद्याव्यासंग

[१९०६ ते ११]

सातासमुद्रापलीकडे निरुद्देश निघालेल्या केतकरांचा वेळ प्रवासात निरुद्देशच जात होता. त्यांच्या इटालियन बोटीतील तिसऱ्या वर्गाची खुराडी फार लहान नि गर्दीची होती, त्यामुळे बराच वेळ ते डेकवर घालवीत. स्नानासाठी स्वतंत्र खोल्या नसल्यामुळे ओल्या फडक्याने अंग पुसून ते स्वतःचे काम भागवीत.---आणि अन्न गचाळ असल्यामुळे ठिकठिकाणी बंदरावर खाद्यपदार्थ विकत घेऊन क्षुधाशमन करीत. बरीच इंग्रजी, मराठी नि संस्कृत पुस्तके व खरडण्यासाठी वह्या त्यांनी बरोबर घेतल्या होत्या. त्यांच्या सान्निध्यात त्यांचा काही वेळ निघून जाई. उरलेल्या वेळात सहप्रवाशांच्याबरोबर त्यांच्या गप्पाटप्पा चालत. बोटीवर एक गोड आवाजाची, सुंदर 'रोम्यानियन' बाई होती, तिच्याशी संभाषण करण्यात त्यांना साहजिकपणे विशेष गोडी वाटे. ही गोष्ट एका स्कॉच मनुष्याच्या लक्षात येऊन त्याला त्यांचा मत्सर वाटू लागला आणि त्याने इतरांशी त्यांची टवाळी चालविली. त्या बाईबरोबर स्वतः लुब्रेपणा करण्याला मात्र त्याला काही वाटत नसे. तेव्हा केतकरांनी अशी गंमत केली, की 'लव्ह ऑन दि ओशन' ('सागरावरील प्रेम') या नावाचे एक पुस्तक त्याला वाचावयास दिले आणि दुसऱ्या दिवशी त्या बाईशी तो लुब्रेपणा करीत असता त्यांनी विचारले, 'डू यू लाइक लव्ह ऑन दि ओशन?' (आपणांला 'सागरावरील प्रेम' आवडते काय?) त्या प्रश्नाने तो उमगायचे ते उमगला आणि त्याची कुचाळी बंद झाली. बोटीवरील स्त्रियांशी फाजील लघळपणा करणारा एक स्पॅनिश "लांडा कोल्हा" केतकरांबरोबर प्रवास करीत होता. या लांड्या कोल्ह्याची बायको मात्र अत्यंत सुस्वभावी नि सभ्य होती. ते बघून केतकरांच्या चिंतनशील मनात विचार आला, की (हिंदुस्थानात प्रीतिविवाह होऊ लागले तरी वैवाहिक दुःखे संपण्याची शक्यता नाही. "प्रीतिविवाह ज्या समाजात रूढ आहे त्या समाजातदेखील विरुद्ध स्वभावांचा संबंध येतो,) त्याचेच हे उदाहरण आहे."
केतकरांच्या बोटीवर स्कॉटलंडात शिल्पकलेच्या शिक्षणासाठी निघालेला एक सतरा

वर्षांचा खिस्ती मराठा विद्यार्थी होता. तो हिंदुस्थानात आपल्या घरीही क्वचितच मराठीत बोले. केतकरांनी त्याला मराठीची दीक्षा दिली आणि त्याने एडनहून जे पत्र घरी लिहिले ते त्यांनी त्याला मराठीत लिहायला लावले.[1]

वाटेत जेथे जेथे बोट थांबे तेथे तेथे उतरून तेथल्या परिस्थितीचे आणि समाजाचे धावते निरीक्षण ते करीत असत. पोर्ट सेद् येथील लबाड व्यापारी नि लुच्चे वाटाड्ये, चावट पुस्तके नि नग्न स्त्रियांची चित्रे, उघड चालणारा जुगार नि 'तुर्की आनंद' नामक मेवा इत्यादी गोष्टी त्यांच्या लक्षात राहिल्या. सिसिली बेटातील मसिना या गावी घोड्यांच्या गाडीत बसून ते बाजारातून फेरफटका मारून आले. त्या वेळी डोक्याला पटका बांधून पाठीवर त्यांनी झोकदार शेमला सोडला होता. तो बघून तेथल्या दुकान-दारांना ते कोण आहेत हे उलगडले नाही, आणि बहुधा ते कोणी पौर्वात्य राजपुत्र असावेत अशा कल्पनेने दुकानदारांनी त्यांना सलाम ठोकले! नेपल्स या शहरात तेथील 'राष्ट्रीय पदार्थ संग्रहालया'ला भेट देऊन त्यांनी जवळचे 'माम्पी' हे उकरलेले गाव बघितले. तोंड वाकडे करून लाडिकपणे बोलणाऱ्या नेपल्समधील इटालियन स्त्रिया त्यांना विशेष सुंदर वाटल्या. खलाशांनी संप पुकारल्यामुळे जिनोआला त्यांना पंधरा दिवस अडकून पडावे लागले आणि तेथील बागा, देवळे, मॅझिनीचे थडगे वगैरे अनेक ठिकाणे पाहाता आली. मार्क ट्वेनने एके ठिकाणी असे उद्गार काढले आहेत, की 'जिनोआच्या स्त्रिया अत्यंत सुंदर आहेत; त्यांतील कोणाशी लग्न करावे याचीच पंचाईत पडेल.' केतकरांना जिनोआमध्ये मार्क ट्वेनचे हे उद्गार आठवले, पण कोणाशी लग्न करावे अशी पंचाईत काही पडली नाही. कारण त्यांच्या मते जिनोआपेक्षा नेपल्सच्या स्त्रिया अधिक सुंदर होत्या. जिनोआत असताना तेथील खिस्ती भिक्षूंच्या अनेक भानगडी त्यांच्या कानावर आल्या. एकच पेला मद्य पिण्याची धर्माची अनुज्ञा असल्यामुळे हे तुस्त नि मस्त भिक्षू पेला घागरीएवढा करीत आणि चाळिशीच्या पुढची एकच सेविका बाळगण्याची धर्माची परवानगी असल्यामुळे विशीतल्या दोन सेविका बाळगीत! त्यांच्या प्लेटॉनिक प्रेमासंबंधी नि लेकवळ्यांसंबंधी गावामध्ये बरीच कुजबूज चाललेली असे.[2]

जिनोआपासून पुढचा प्रवास केतकरांनी दुसऱ्या वर्गाने केला आणि १ जून १९०६ रोजी ते न्यूयॉर्कला येऊन पोहोचले. त्यांचे आतेभाऊ बँकेत अडकलेले तीनचारशे रुपये त्यांना त्यांच्या पाठोपाठ धाडणार होते; पण काही घोटाळा होऊन ते पैसे जिनोआला येऊन परत गेले होते. केतकरांची कल्पना अशी होती, की ते पैसे न्यूयॉर्कला येऊन पडले असतील. त्यामुळे बोटीतून उतरताना जेव्हा 'तुमच्यापाशी तीस डॉलर्स आहेत

१ 'अमेरिकेचा प्रवास', महाराष्ट्र-वाग्विलास, ऑगस्ट १९०६ व मार्च १९०७.

२. 'अमेरिकेचा प्रवास', महाराष्ट्र-वाग्विलास, मार्च १९०७ व जून १९०७; आठवणी, केतकर, प्रतिभा, २० नोव्हेंबर १९३३.

काय ?' असा धक्क्यावरील अधिकाऱ्यांनी त्यांना प्रश्न केला, तेव्हा त्यांनी 'होय' म्हणून उत्तर दिले. धक्क्यावरील अधिकाऱ्यालाही त्यांचा शेमलेदार पटका नि सूट बघून वाटले, की हा कोणी 'ओरिएंटल नबाब' असावा; म्हणून त्याने त्यांची जास्त पाहाणी न करता त्यांना धक्क्यावर उतरू दिले. त्यांच्या डोळ्यांची तपासणीही अशीच योगायोगाने राहून गेली. सॅम्युअल लूकस जोशी त्यांना नेण्यासाठी धक्क्यावर यावयाचे होते; पण त्यांचे स्थानांतर झाले असल्याने ते आले नव्हते. 'टेक्निकल इन्स्टिट्यूट'चे दोघे हिंदी विद्यार्थी मात्र त्यांना उतरून घेण्यासाठी आले होते आणि तेच त्यांना आपल्या खोलीकडे घेऊन गेले.[1]

(१ जून १९०६ ते २ मे १९११ अशी एकूण पाच वर्षे केतकर अमेरिकेमध्ये होते. त्या काळात उपजीविकेसाठी स्वावलंबनावर अवलंबून राहाण्याखेरीज त्यांना गत्यंतर नव्हते.) कारण त्यांच्याजवळ जी वडिलार्जित पुंजी होती ती अमेरिकेला येईपर्यंत बहुतेक सर्व संपून गेली होती. त्यांना सयाजीरावमहाराज गायकवाड यांनी एक शिष्यवृत्ती दिली;[3] पण तिच्यात सर्व खर्च भागण्यासारखा नव्हता. शिवाय ही शिष्यवृत्ती फक्त तीन वर्षे मिळत होती आणि त्यांचे अमेरिकेतील वास्तव्य पाच वर्षे घडले. ते चुलत्यांच्या मताला न जुमानता अमेरिकेत आले असल्यामुळे चुलत्यांकडून काही पैसे येतील अशी आशाही त्यांना धरता येण्यासारखी नव्हती. तेव्हा बिकट आर्थिक स्थितीला तोंड देण्यासाठी त्यांना स्वावलंबनाची कास धरणे प्राप्तच होते. त्यांचे हिंदुस्थानातील आयुष्य काहीसे स्वैरपणात आणि ऐषआरामात गेलेले होते; पण स्वावलंबनाच्या या प्रसंगी त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. विद्यापीठांना उन्हाळ्याच्या मोठमोठ्या सुट्या मिळत त्या वेळी, किंवा विद्यापीठांचे काम चालू असतानादेखील, ते अभ्यास सांभाळून मिळतील ती कामे करीत असत. पोटासाठी आणि विद्येसाठी त्यांनी पोषाखी प्रतिष्ठा पार गुंडाळून ठेविली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहात प्रसंगी ताटवाट्या साफ केल्या आणि विद्यार्थ्यांना वाढण्याचे काम केले. कधी शेतात बटाटे काढले, तर कधी फळबागांत फळे तोडली. केव्हा 'कॅमेरे' बनविण्याच्या कारखान्यात पेट्या तयार केल्या, तर केव्हा घरोघर जाऊन संसारोपयोगी वस्तू खपविल्या. जाहिराती मिळवणे, पुस्तकांचा प्रचार करणे वगैरे कामेही त्यांनी उत्साहपूर्वक पार पाडली.[4] ह्या वेळी केव्हा केव्हा असे होई, की "आजचा दिवस गेला, उद्याचा कसा जाणार?" अशी भ्रांत पडे. मन चिंताकुल होई. पण हळूहळू त्या उद्याच्या चिंतेला त्यांचे मन सरावले आणि उद्याविषयी ते पूर्ण बेपर्वा बनले. ("आला हा क्षण आपला; उद्याची

१. आठवणी, केतकर, प्रतिभा, २० नोव्हेंबर १९३३.
२. आठवणी, केतकर, प्रतिभा, २३ नोव्हेंबर १९३४.
३. हिंदुइझम, प्रस्तावना, पृष्ठ २६; 'श्रीमन्महाराज...यांस...प्रेमोपहार', विद्यासेवक, डिसेंबर १९३५.
४. लोकशिक्षण, मे-जून १९३७, शीलवती केतकर.

चिंता वाहाण्याचे कारण नाही"—हा धडा अमेरिकेने आपणाला शिकविला, असे एके ठिकाणी त्यांनी म्हटले आहे.[1] स्वावलंबनाच्या जोरावर पैशाचा प्रश्न त्यांनी असा सोडविला आणि त्यामुळे विद्यार्जनाचा त्यांचा मार्ग मोकळा झाला.

मुंबईला असताना महाविद्यालयीन अभ्यासक्रम आणि त्यांच्या विचारविकारांचा क्रम यांची सांधेजोड कधीही झाली नाही. पण अमेरिकेत गेल्यावर त्यांना असे वाटू लागले, की सशस्त्र क्रांतीचे किंवा अधिकारीहत्येचे प्रयत्न करून इंग्रजांची दृढमूल नि विस्तृत राज्यसत्ता उखडून टाकणे कधीही शक्य होणार नाही. देशसेवेचा तो मार्ग अज्ञानाचा आणि वेडेपणाचा आहे. खरी देशसेवा करायची असेल तर राजकारण नि समाजकारण यांचे शास्त्रीय ज्ञान पैदा केले पाहिजे आणि ते ज्ञान देशसुधारणेकडे लावले पाहिजे.[2] त्यामुळे त्यांची देशाभिमानी वृत्ती आणि त्यांचा अभ्यासक्रम यांची सांधेजोड अमेरिकेमध्ये झाली आणि त्यांची विद्यालयीन प्रगती झपाट्याने होत गेली. अमेरिकेत जाताच पूर्वेकडील कॉर्नेल विद्यापीठात त्यांनी नाव दाखल केले आणि १९०८-९ मधील एक सहामाही वगळता त्यांचे सारे शिक्षण त्याच विद्यापीठात पार पडले. १९०८-९ च्या दुसऱ्या सहामाहीत, बहुधा ग्रंथालयाच्या सोयीसाठी, ते हार्वर्ड विद्यापीठात जाऊन राहिले होते. (कॉर्नेल विद्यापीठातून १९०७ साली ते बी. ए. झाले, १९०८ साली एम. ए. झाले आणि १९११ साली पीएच. डी. झाले. १९०९ मध्येच आपला पीएच. डी.चा प्रबंध त्यांनी प्रसिद्ध केला होता आणि तो पदवीसाठी मान्यही झाला होता. पण त्या वेळी, नेमलेले वाचन नि फ्रेंचचा अभ्यास त्यांच्या हातून पुरा झाला नव्हता म्हणून पदवी मिळणे दीडदोन वर्षे लांबणीवर पडले. नाहीतर १९०९-१० सालीच ते पीएच. डी. झाले असते.) म्हणजे अभ्यासात मन नसल्यामुळे हिंदुस्थानात जे केतकर पाच वर्षांमध्ये बी. ए.देखील होऊ शकले नाहीत, तेच केतकर अभ्यासात मन घातल्यावर अमेरिकेमध्ये बी. ए., एम. ए., नि पीएच. डी. अशा तीन पदव्या पाच वर्षांत लीलया मिळवू शकले![3] आणि या पदव्या काही अज्ञातशा नव्हत्या. त्या चढत्यावाढत्या महत्त्वाच्या होत्या आणि त्यांत पीएच. डी. ही संशोधनात्मक नि सर्वोच्च पदवी समाविष्ट होती.

केतकरांच्या मनावर महाराष्ट्रातील विचारपरंपरांचा जो परिणाम कळत न कळत झाला होता, त्यामुळे पीएच. डी.च्या त्यांच्या संशोधनाला दिशा मिळालेली दिसते. महाराष्ट्रात तेव्हा दोन मुख्य विचारपरंपरा वावरत होत्या. पैकी पहिली परंपरा स्थूलपणे सुधारकांची, प्रार्थनांची, लोकहितवादींची किंवा रानडे-आगरकरांची होती; आणि दुसरी

१. प्रतिभा, जुलै १९३७, श्री. वि. वर्तक.
२. आठवणी, केतकर, प्रतिभा, २८ ऑगस्ट १९३३
३. लोकशिक्षण, मे-जून १९३७, श्री. रा. पारसनीस; ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ५, ७; 'एक अमेरिकेतील सामाजिक संशोधन', केतकर, प्रतिभा, जुलै १९३७.

परंपरा स्थूलपणे सनातन्यांची, विष्णुशास्त्र्यांची, टिळकांची किंवा फडके-सावरकरांची होती. पहिली परंपरा सत्य, समानता, दया, इत्यादी नीतितत्वांच्या आधारावर जुन्यातले दोष बघे, समाजाची नवी रचना करण्यासाठी झटे आणि राजकारणापेक्षा समाजकारणाला प्राधान्य देई. उलट, दुसरी परंपरा पूर्वेतिहासाचा अभिमान बाळगी, पारतंत्र्याबद्दल संतप्त होई, समाजसुधारणांचे फक्त तात्विक स्वागत करी आणि समाजकारणापेक्षा राजकारणाला उचलून धरी. या दोन्ही परंपरा ऐतिहासिक गरजेमधून उत्पन्न झालेल्या असल्यामुळे त्यांपैकी प्रत्येकीत काही ना काही ग्राह्य अंग होती. केतकरांच्या प्रेमाचा नि अभिमानाचा ओढा दुसऱ्या परंपरेकडे होता हे खरे; पण दोन्ही परंपरांचा परिणाम त्यांच्या संस्कारक्षम बुद्धीवर झाल्याशिवाय राहिला नाही. [पहिल्या परंपरेने जातिभेद, सामाजिक विषमता, अज्ञान इत्यादी हिंदू समाजाचे दोष त्यांच्या हृदयावर ठसविले असावे; आणि दुसऱ्या परंपरेने स्वातंत्र्याची इच्छा तीव्र करून त्यांचा देशाभिमान, हिंदुत्वाभिमान व स्वत्वाभिमान पेटता नि वाढता ठेवला असावा.] 'महाराष्ट्र-वाग्विलास 'चे ध्येय व धोरण सांगताना त्यांनी लिहिले होते, की "आम्ही सुधारकही नाही व पूर्ण जुन्या मताचेही नाही....जातीजातीत ज्या लेखाच्या योगाने द्वेष उत्पन्न होईल व ज्याच्या योगाने हिंदुस्थानच्या एकराष्ट्रीयत्वाचा बिघाड होईल असा लेख आम्हांस प्रसिद्ध करता येणार नाही."[1] त्यांच्या या लिहिण्यावरून दोन्ही परंपरांचा संमिश्र परिणाम त्यांच्यावर कसा झाला होता याची स्पष्ट कल्पना येते. या संमिश्र परिणामातून त्यांच्या विचारांची अशी घडी बसत गेली, की राष्ट्रीय स्वातंत्र्या-इतकेच एकराष्ट्रीयत्वही महत्वाचे आहे. एकराष्ट्रीयत्व टिकवायचे नि वाढवायचे असेल तर जातिभेदाचे उच्चाटन केले पाहिजे, सामाजिक प्रश्न हाताळले पाहिजेत. हे जाणतेपणी करायचे असेल तर समाजशास्त्राचा पायाशुद्ध अभ्यास करण्यावाचून दुसरा मार्ग नाही. ते समाजशास्त्राच्या अभ्यासापर्यंत असे येऊन पोहोचले आणि पीएच. डी.च्या अभ्यासासाठी समाजशास्त्राची मुख्य विषय म्हणून त्यांनी निवड केली. प्रबंधासाठी त्यांनी विषय घेतला तोही जातिसंस्थेच्या संशोधनाचा. राष्ट्रीय हिताची प्रेरणा त्यांच्या जातिसंशोधनामागे कशी होती ते प्रबंधाच्या प्रारंभी त्यांनी काढलेल्या उद्गारांवरून सहज दिसते. ते म्हणतात, "जातिसंस्थेच्या अभ्यासाची पद्धती घालून द्यावी किंवा तिच्या घटनेची तत्वे शोधावी एवढाच केवळ प्रस्तुत अभ्यासाचा हेतू नाही. जातिसंस्थेचा पाश केव्हा व कां आवळत गेला आणि तो सोडविण्याचा उपाय इतिहासावरून सुचतो काय, हेही प्रस्तुत अभ्यासात पाहावयाचे आहे."[2]

पीएच. डी.च्या प्रबंधापर्यंत केतकरांच्या बुद्धिमत्तेचे नुसते फुटकळ फवारे स्वैर उडत होते; पण या प्रबंधामध्ये त्यांच्या बुद्धिमत्तेचा स्रोत प्रथमच केंद्रीभूत झाला आणि तिचे

१. 'स्वत:संबंधी दोन शब्द', महाराष्ट्र-वाग्विलास, जानेवारी १९०६.
२. हिस्टरी ऑफ कास्ट, पृष्ठ ३.

असामान्यत्व ढळढळीतपणे प्रत्ययास आले. 'दि हिस्टरी ऑफ कास्ट इन इंडिया' (प्रथम खंड) या आपल्या प्रबंधात त्यांनी मनुस्मृतीची ऐतिहासिक छाननी केली आणि तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे, विशेषतः जातिसंस्थेचे स्वरूप अत्यंत कुशलपणे स्पष्ट करून दाखविले. त्यांच्यापूर्वी येल विद्यापीठातील प्रा. हॉपकिन्स यांनी तसा एक प्रयत्न केला होता; पण केतकर आपल्या प्रयत्नात प्रा. हॉपकिन्स यांच्या फारच पुढे गेले. त्यांनी जातिसंस्थेचे सर्वसाधारण स्वरूप प्रारंभी विशद करून सांगितले, मनुस्मृतीचा ऐतिहासिक अर्थ कसा लावावा त्याची शास्त्रशुद्ध पद्धती निश्चित केली आणि मनुस्मृतीचा काल नव्याने ठरवला. बुल्हरने ख्रिस्तपूर्व २०० ते ख्रिस्तोत्तर २०० या कालखंडात मनुस्मृती टाकली होती; पण अनेक अभिनव पुरावे पुढे आणून केतकरांनी मनुस्मृतीला ख्रिस्तोत्तर २२७ ते ३२० या कालखंडात आणून ठेवले. एवढी प्रास्ताविक तयारी करून त्यांनी मनुस्मृतीची जी पाहाणी केली तीमधून असा निष्कर्ष काढला, की "आज जी समाजाची स्थिती आहे त्यापेक्षा मानवधर्मशास्त्राच्या [म्हणजे मनुस्मृतीच्या] काळी...फारशी निराळी स्थिती नव्हती." त्या निष्कर्षामुळे, 'मनुस्मृतीच्या काळी जातिभेद नव्हता', 'ब्राम्हण ब्राम्हणेतरांशी मोकळेपणी लग्ने लावीत' वगैरे अनेक कल्पना कायमच्या धुळीस मिळाल्या. या प्रबंधाला 'जाती व मानववंशशास्त्र' या नावाचे एक उद्बोधक परिशिष्ट त्यांनी जोडले आहे आणि ते मूळ प्रबंधाइतकेच मूलगामी आहे. त्यात मानववंशशास्त्रातील काही मूलभूत कल्पना त्यांनी प्रस्थापित केल्या असून 'जाती व वंश यांचा संबंध एकरूपतेचा नाही' हे सत्य उजेडात आणले आहे. हा सर्वच प्रबंध आमूलाग्र इतका उच्च दर्जाचा आहे, की तो एका पंचविशीतील तरुणाने लिहिला यावर विश्वास ठेवणे फार जड जाते.

हा प्रबंध प्रसिद्ध झाल्यावर त्याने अमेरिकेतील आणि युरोपातील विद्वानांचे लक्ष चांगलेच वेधून घेतले. विस्कन्सिन विद्यापीठाचे प्रा. रॉस, हार्वर्डचे प्रा. एजर्टन, मँचेस्टरचे प्रा. ऱ्हिस डेव्हिड्स, ब्रुसेल्स सोशॉलॉजिकल इन्स्टिट्यूटचे प्रा. वॉक्शवायलर, येल विद्यापीठाचे प्रा. हॉपकिन्स, लंडनचे प्रा. व्हिन्सेंट स्मिथ नि प्रा. बार्नेट इत्यादी विद्वद्वर्यांनी प्रबंधावर टीका लिहिल्या आणि मुक्त कंठाने त्याची प्रशंसा केली. पैकी प्रा. वॉक्शवायलर यांनी तर फ्रेंचमध्ये एक स्वतंत्र पुस्तिका लिहूनच आपल्या टीकेचा मान प्रबंधाला दिला! या विद्वद्वर्यांमध्ये जागतिक कीर्ती मिळविलेले संस्कृतचे व पालीचे दोन महापंडित होते! ऑक्सफर्डचे प्रा. मॅकडोनेल, प्रागचे प्रा. विंटरनिट्झ, हिंदुस्थान सरकारच्या शिरगणती-वृत्तांताचे काही लेखक, 'डिक्शनरी ऑफ ॲंग्लो-इंडियन बायॉग्रफी'चे कर्ते श्री. बकलंड इत्यादी विद्वानांनी आपापल्या ग्रंथांतून या प्रबंधाचा गौरवयुक्त उल्लेख केला. लंडनच्या 'टी. पी.ज वीकली'मध्ये प्रबंधातील उतारे वारंवार येत असत. प्रबंधात सर एच. रिस्ले यांच्यावर केतकरांनी जी टीका केली होती ती सरसाहेबांनी मोकळ्या मनाने मान्य केली आणि तशा अर्थाचे एक पत्र केतकरांना पाठविले! हे पत्र केतकरांनी पुढे लंडनच्या 'रॉयल ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सोसायटी'च्या

हवाली केले. विद्वत्तेच्या क्षेत्रात या प्रबंधाच्या रूपाने केतकरांचा जो प्रवेश घडला त्याचे हे सारे स्वरूप महाराष्ट्राच्या भावी ज्ञानकोशकाराला खरोखर साजेसेच होते. इतक्या अल्प वयात, इतक्या मोठ्या पंडितसमूहाचे लक्ष फारच थोड्या भारतीयांनी अर्वाचीन काळात स्वतःकडे वेधून घेतलेले आढळेल.[१]

प्रबंधाचा गौरव तिकडे युरोप-अमेरिकेत भरघोसपणे होत असता इकडे केतकरांच्या प्रियतम मायभूमीत मात्र त्याची दखल जवळजवळ कोणीही घेतली नाही. १९११-पर्यंत हिंदुस्थानामध्ये या प्रबंधाच्या अवघ्या सत्तर प्रती खपल्या आणि त्यांतही पन्नास प्रती एकट्या बडोदे-सरकारने घेतलेल्या होत्या! केतकरांनी पंचाहत्तर प्रती अभिप्रायार्थ हिंदुस्थानात धाडल्या; पण विद्येविषयी उदासीन असलेल्या या देशात तीनचार नियतकालिकांखेरीज त्या प्रबंधाचा उल्लेखसुद्धा कोठे आला नाही! युरोप-अमेरिकेत प्रबंधावर जे उत्कृष्ट अभिप्राय प्रसिद्ध झाले होते त्यांची जाहिरात केतकरांनी इकडे देशी भाषांत केली असती तर त्यांच्या नावाचे नगारे इकडे खूप दुमदुमू लागले असते. पण परक्यांच्या अभिप्रायांवर स्वदेशबांधवांनी परभृतपणे स्वतःस थोर म्हणावे, याची त्यांना किळस होती. आपल्या पुस्तकांवरील इंग्रजी अभिप्राय त्यांनी देशी भाषांत कधीही भाषांतरित केले नाहीत आणि त्यांचा प्रसिद्धीसाठी उपयोग करून घेतला नाही. स्वदेशाच्या उणेपणाची त्यांना इतकी मरणप्राय लाज वाटे, की न्यूयॉर्कच्या 'नेशन' पत्रातील अभिप्राय येथील 'हिंदुस्थान रिव्ह्यू'ने शब्दशः उतरला होता तो अमेरिकन मित्रांच्या दृष्टीस पडू नये म्हणून त्यांनी खटपट केली. ते म्हणतात, "ही गोष्ट मला स्वतःला इतकी लज्जाकारक वाटली, की ती पाहून मलाच कोणी चपराक लगावली आहे, असे झाले."[२]

विद्यापीठाच्या परीक्षांसाठी, प्रबंधलेखनासाठी आणि ज्ञानाच्या सर्वसाधारण भुकेसाठी अमेरिकेत असताना केतकरांनी अपरंपार वाचन केले. अक्षरशः शेकडो ग्रंथ त्यांनी वाचले किंवा बारकाईने चाळले. कॉर्नेल विद्यापीठाच्या प्रचंड ग्रंथालयात त्या वेळी पुस्तके नि पत्रके मिळून सुमारे आठ लाख ग्रंथ होते; या ग्रंथांचे वर्गीकरण व नोंद अत्यंत सूक्ष्मपणे केलेली होती; आणि दिवसातून पंधरा तास ग्रंथालय उघडे ठेवण्याची सोय होती. पदवीधर विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा उपयोग करण्यात विशेष स्वातंत्र्यही देण्यात येत असे. केतकरांनी या ग्रंथालयाचा भरपूर फायदा करून घेतला. हिंदुस्थानात गेल्यावर असे ग्रंथालय दृष्टीसदेखील पडणार नाही असे त्यांना वाटे आणि अधाशीपणे ते वाचीत सुटत. उन्हाळ्याच्या सुट्ट्या वगळता ते या ग्रंथालयात चार वर्षे जवळजवळ मुक्कामालाच होते! 'ग्रंथोपयोगशास्त्र' व 'ग्रंथवर्णनशास्त्र' यांच्यावरील एका व्याख्यानमालेला हजर

१. हिंदुइझम, प्रस्तावना, पृष्ठ २६; 'मी व माझे टीकाकार', केतकर, ज्योत्स्ना, जून १९३६; 'इंडियन इकॉनॉमिक्स' वरील जाहिराती.

२. हिंदुइझम, प्रस्तावना, पृष्ठ २६; 'मी व माझे टीकाकार', केतकर, ज्योत्स्ना, जून १९३६.

राहून त्यांनी त्या शास्त्रांचा अभ्यास केला होता आणि ‘ऐतिहासिक पद्धती’वरील एक व्याख्यानमालाही त्यांनी अभ्यासली होती. त्यामुळे त्यांचे वाचन विशेष सुव्यवस्थित होऊ शकले. त्या काळात त्यांनी इतकी पुस्तके चाळली, की कॉर्नेल विद्यापीठातील कोणाही विद्यार्थ्याने किंवा प्राध्यापकाने तितकी पुस्तके चाळली नसतील! ग्रंथालयाचा उपयोग करण्यात कुशल आणि कोठलीही माहिती चटकन काढून देण्यात पटाईत म्हणून साऱ्या विद्यापीठात त्यांचा लौकिक पसरला होता. कॉर्नेलच्या ग्रंथालयाप्रमाणे ‘बोस्टन पब्लिक लायब्ररी’ आणि कोलंबिया, येल नि हार्वर्ड येथील पुस्तकालये यांच्याशी त्यांचा संबंध होता आणि त्या पुस्तकालयांतल्या पुस्तकांचा उपयोग त्यांनी आपल्या प्रबंधलेखनासाठी केला होता. शिवाय प्रा. लानमन यांच्यासारख्या विद्याभिलाषी गृहस्थांचे जे खाजगी ग्रंथसंग्रह असत त्यांच्याकडेही त्यांची शोधक, ज्ञानपिपासू दृष्टी मधूनमधून वळत असे. अमेरिकेतील या वाचनाच्या वेळी ‘एन्सायक्लोपीडिया’सारखे संग्रहग्रंथ त्यांना वारंवार हाताळावे लागले आणि असे ग्रंथ मराठीत नाहीत, याची दुःखद जाणीव झाली. या जाणिवेत मराठी ज्ञानकोशाच्या रचनेचा जो उद्योग त्यांनी पुढे केला त्याची बीजे रुजली होती. ग्रंथांचा जरुरीपुरता सूचिशोध घेण्याची जी सवय या वेळी त्यांना लागली तिचा उपयोगही ज्ञानकोशाच्या संपादनाच्या वेळी त्यांना मोठ्या प्रमाणावर झाला. या वाचनामुळे त्यांच्या सर्वच ज्ञानकार्याची रुंद नि खोल अशी पायाभरणी झाली, असे म्हटले तर त्यात अतिशयोक्ती होणार नाही.[१]

१९०९ साली प्रबंध प्रसिद्ध होऊन तो पदवीसाठी मान्य झाला, तरी केतकरांना पीएच. डी. ची पदवी १९११पर्यंत मिळू शकली नाही, याला त्यांची हावरी ज्ञानपिपासा आणि देशहिताची बाभरी कळकळ कारणीभूत होती. त्या काळी हिंदुस्थानात सुधारक पक्ष बालविवाहाबद्दल ओरड करीत होता आणि प्रौढविवाहाची तरफदारी करीत होता. प्रौढविवाहाने समाजातील नीतिमत्ता खालावेल असे सनातनी पक्ष म्हणे, तर ती खालावणार नाही, उंचावेल, असा सुधारक पक्ष निर्वाळा देई. केतकरांना असे वाटले, की अमेरिकेत प्रौढविवाह प्रचलित असल्याने तेथील निरीक्षणावरून या वादाचा वस्तुनिष्ठ निर्णय लागू शकेल. तेव्हा हा हिंदी प्रश्न सोडविण्यासाठी, प्रबंध प्रकाशित झाल्यानंतर, त्यांनी अमेरिकन समाजाच्या संशोधनास प्रारंभ केला. याच सुमारास ‘न्यूझ होम’च्या ‘व्हायटल स्टॅटिस्टिक्स’ या ग्रंथात अशा अर्थाचे एक विधान प्रसिद्ध झाले होते, की अमेरिकेत लग्नाची वये वाढत असतानाही अधर्मसंततीचे प्रमाण कमी होत आहे. त्या विधानाचा सूचितार्थ हा होता, की लग्नाची वये वाढली तरी समाजाची लैंगिक नीती सुधारत चालली आहे. केतकरांचे लक्ष या विधानाकडे गेले आणि प्रा. वॉल्टर एफ. विलकॉक्स या आपल्या गुरुजींपाशी त्यांनी त्यावर टीका केली. अधर्मसंतती चुकविण्याची

१. आठवणी, केतकर, प्रतिभा, ५ जानेवारी १९३४; हिस्टरी ऑफ कास्ट, प्रस्तावना, पृष्ठ ३; ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ४.

नि गर्भपात करण्याची कला आधुनिक काळात वाढली आहे; तेव्हा अधर्मसंततींचे प्रमाण कमी झाल्यास त्यावरून लैंगिक नीती सुधारली आहे असे निगमन काढता येणार नाही, हा त्यांच्या टीकेचा भावार्थ होता. या टीकेतील सत्य उघड होते; पण नीती खरोखर उंचावली की खालावली हा प्रश्न अनिर्णीतच राहात होता. तेव्हा त्या प्रश्नाचा उलगडा करण्यासाठीही अमेरिकन समाजाचे संशोधन करणे आवश्यक वाटू लागले. हिंदुस्थानातील प्रौढविवाहाची समस्या आणि 'व्हायटल स्टॅटिस्टिक्स'मधील अमेरिकन नीतीबद्दलचे विधान या दोहोंनी केतकरांना असे एकाच संशोधनक्षेत्राकडे लोटीत नेले. अर्थात पीएच. डी.च्या उरल्यासुरल्या अभ्यासाकडे त्यांनी दुर्लक्ष केले आणि अमेरिकन समाजाच्या लैंगिक नीतिशोधनात ते रममाण झाले!

लैंगिक नीतीचे प्रत्यक्ष मोजमाप केले पाहिजे हे ठरले, तरी ते मोजमाप कसे करावयाचे हा प्रश्न शिल्लक होता. विचाराअंती तो प्रश्न केतकरांनी असा सोडविला, की ज्या अविवाहित स्त्रीस किंवा पुरुषास उपदंश-प्रमेहादी लिंगरोग झाले असतील त्या स्त्रीचे किंवा पुरुषाचे नीतिस्खलन झाले आहे, असे नक्की समजावे. त्याचप्रमाणे ज्या कुमारिकेने गर्भपात केला आहे तीही नीतिभ्रष्ट समजावी. लैंगिक नीतीच्या मापनाचे हे गमक हाती लागल्यावर त्यांनी आकडे जमविण्यास प्रारंभ केला. इथका, कोर्टलंड आणि महग्राव्हिली या तीन गावांत अनेक महिने मधूनमधून ते डॉक्टरांकडे जाऊन आकडे जमवीत होते. इथका नि कोर्टलंड ही गावे प्रत्येकी पंधरा हजार वस्तीची होती आणि महग्राव्हिली फक्त एक हजार वस्तीचे होते. या आकडेसंशोधनातून कोणता निर्णय त्यांच्या हाती पडला, ते मात्र आज दुर्दैवाने सांगता येत नाही. कारण त्यासंबंधीचे मद्रासच्या 'मॉडर्न वर्ल्ड'मध्ये त्यांनी पुढे लिहिलेले लेख अनुपलब्ध आहेत. एवढे खरे, की या संशोधनाच्या उपद्व्यापात त्यांचा नित्य अभ्यास बाजूला राहिला आणि त्यांची पीएच. डी.ची पदवी लांबणीवर पडली! या संशोधनापायी त्यांना सुमारे दोन हजार रुपये खर्च आला; पण सयाजीरावमहाराजांनी त्यांच्या प्राध्यापकांच्या शिफारशीवरून एक वर्ष शिष्यवृत्ती वाढवून दिल्यामुळे तो खर्च त्यांना जाणवला नाही.[१]

त्यांची हावरी ज्ञानपिपासा या वेळी इतर क्षेत्रांतदेखील संचार करीत होती आणि तो संचारही पीएच. डी.ची पदवी लांबणीवर पडण्यास कारणीभूत झाला होता. हा संचार त्यांनी का केला आणि कसा केला हे त्यांच्याच शब्दांत ऐकणे श्रेयस्कर ठरेल. ते म्हणतात, "संशोधनपद्धतीशी परिचय जातिभेदाच्या इतिहासाचा पहिला भाग तयार केला त्यामुळे बराच झाला होता आणि आपण समाजशास्त्रीय, शासनशास्त्रीय आणि अर्थशास्त्रीय संशोधन चांगल्या प्रकारे करू असा आत्मविश्वास आतापर्यंत प्रोफेसरांच्या आदेशाने जे अनेक निबंध लिहिले त्यांमुळे उत्पन्न झाला होता. तथापी याच सुमारास मी एक जिऑलॉजीवर पुस्तक वाचले. तेव्हा भूस्तरशास्त्रास लागू पडणारे

१. 'एक अमेरिकेतील सामाजिक संशोधन', केतकर, प्रतिभा, जुलै १९३७.

अनेक नियम सामाजिक घडामोडींचे स्पष्टीकरण करण्यासही कसे लागू पडतात व ते समाजशास्त्रज्ञांनी कसे दाखवून दिले नाहीत, हे मनास पटले. आणि यानंतर असे वाटले, की सामाजिक शास्त्रांच्या अनेक शाखांविषयी आपण स्वतःच्या परिश्रमाने अभ्यास करण्यास समर्थ आहो, तर आपणास खरे समाजशास्त्री बनावयाचे असेल तर केवळ समाजशास्त्रावरील पुस्तके वाचीत बसण्यात काय अर्थ आहे? त्या पुस्तकांचे लेखकही मला अर्धवट लोक आहेत, असे भासू लागले. त्यांची पुस्तके वाचण्यापेक्षा अनेक शास्त्रांचे प्राथमिक ज्ञान मिळविले तर ते अधिक उपयुक्त होईल, या प्रकारच्या कल्पना मनात येऊन समाजशास्त्र व शासनशास्त्र यांच्या प्रोफेसरांच्या कोणत्याही व्याख्यानास न जाता भूस्तरशास्त्र, जीविशास्त्र (बायॉलॉजी), पुस्तकवर्णनशास्त्र (बिब्लिओग्राफी), इतिहाससंशोधनशास्त्र, पुराणवस्तुशास्त्र इत्यादी विषयांवरल्या पहिल्या वर्गात जाऊन व्याख्याने ऐकत बसलो....[माझे शिक्षक] प्रो. विल्कॉक्स यांची वृत्ती अशी होती की प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या इच्छेप्रमाणे अभ्यास करावा आणि ठेचा खात खात शिकावे. त्यामुळे त्यांनी मला ठेचा खाण्याचे स्वातंत्र्य दिले आणि मी वाटेल ते विषय अभ्यासू लागलो. परिणाम असा झाला, की १९१० सालच्या जून महिन्यात जी माझी पीएच. डी.ची परीक्षा घेण्यात आली त्या परीक्षेत मी नापास झालो."[१]

अमेरिकेत असताना कोशनिर्मितीच्या कार्याशी केतकरांचा थोडाबहुत परिचय घडला. १९०८ साली ते हार्वर्ड विद्यापीठात शिकत असताना नेल्सन कंपनीचा 'लूज लीफ एन्सायक्लोपीडिया' खपविणारा एक दलाल त्यांच्या वसतिगृहात आला. आपल्या कोशात वेळोवेळी पाने घालण्याची सोय असल्याने तो श्रेष्ठ आहे, असे हा दलाल जेव्हा प्रतिपादू लागला तेव्हा केतकरांनी त्या कोशाच्या मजकुरातील काही दोष आणि उणीवा त्याला जागच्या जागी दाखवून दिल्या. एम. ए.पर्यंत झालेला अभ्यास आणि संशोधन-पद्धतीशी असलेला परिचय यांच्या जोरावर कुशाग्र बुद्धीमुळे ही गोष्ट ते सहज करू शकले. त्याचा परिणाम मात्र असा झाला, की त्यांच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे त्या कोशाविषयी अनुकूल मत बनले नाही आणि त्या दलालाला हात हलवीत परत जावे लागले. पुढे त्या दलालाकडून व कोशाच्या मुख्य संपादकाकडून केतकरांना अशी विचारणा करण्यात आली, की कोशाच्या संपादकवर्गात आपण काम कराल का? केतकरांनी त्या विचारणेला होकारार्थी उत्तर देऊन, संपादकवर्गात काम करण्याची वेळ आलीच तर तयारी असावी म्हणून त्या कोशाचे सूक्ष्म निरीक्षण करून ठेवले आणि नवे कोणते लेख त्यात घालावयास हवेत याचे टाचणही केले. पण कोशकार्यालयाकडून नंतर काहीच उत्तर न आल्याने त्यांचा तो उद्योग जागच्या जागीच थांबला. हार्वर्ड येथे असतानाच वेब्स्टरच्या मोठ्या शब्दकोशाचे संपादक डॉ. लॅग यांचे एक व्याख्यान त्यांनी ऐकले होते आणि व्याख्याना-नंतर डॉ. लॅग त्यांच्याच खोलीवर झोपायला असल्याने त्यांच्याशी त्यांनी शब्दकोशाबद्दल

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ७-८.

ऐसपैस गप्पा मारल्या होत्या. १९१० साली 'इंटरनॅशनल एन्सायक्लोपीडिया'च्या प्रचारकाचे काम त्यांना मिळाले. त्या वेळी विक्रयकलेच्या वर्गात एकदोन दिवस त्यांनी जुजबी पाठ घेतले आणि दोन आठवडे तो ज्ञानकोश खपविण्यासाठी प्रचार केला. कोशकार्याशी अमेरिकेत त्यांचा हा जो प्रसंगाप्रसंगाने संबंध आला त्यामुळे कोशकार्याची थोडीच पण उपयुक्त माहिती त्यांना मिळाली आणि तिचा उपयोग त्यांना पुढे महाराष्ट्रीय ज्ञानकोशामध्ये करता आला.[१]

अमेरिकेत असताना आणि नंतर काही वर्षे केतकर अमेरिकेतल्या 'सोशॉलॉजिकल सोसायटी'चे सदस्य होते. १९०९ च्या नाताळात न्यूयॉर्कमध्ये ज्या अनेक विद्वत्-परिषदा भरल्या त्यांच्याशी या 'सोशॉलॉजिकल सोसायटी'मुळे त्यांचा संबंध आला. या परिषदांमध्ये अमेरिकेतल्या सर्व प्रकारच्या विद्वानांशी त्यांचा परिचय घडला आणि आपले समाजशास्त्रीय ज्ञान जगापुढे मांडण्याची अल्पशी संधीही त्यांना मिळाली. त्या काळी प्रा. गिडिंग्ज आणि प्रा. लेस्टर वॉर्ड हे दोन विद्वान समाजशास्त्राच्या क्षेत्रात बरेच महत्वाचे समजले जात; पण आपल्या समाजशास्त्राच्या चर्चामंडळात केतकर त्यांच्यावर नेहमी टीका करीत. तेव्हा गिडिंग्ज व वॉर्ड यांनी परिषदेपुढे आणलेल्या निबंधावर केतकरांनीच उपवक्ता म्हणून बोलावे अशी योजना त्यांचे गुरुजी प्रा. विल्कॉक्स यांनी केली. उपवक्त्यास निबंध आधी पाहाण्यास मिळे आणि आपल्या भाषणाचे टिपण भाषण करण्यापूर्वी कार्यकारी मंडळाच्या स्वाधीन करावे लागे. परिषदेमध्ये चर्चा आणि व्याख्याने यांपेक्षा चहा आणि गप्पा या गोष्टी बहुतेकांना अधिक मोह पाडीत आणि तसाच मोह केतकरांनाही पडला होता. पण "ज्या केक्सवर मंथन केलेल्या मलईचा शंकू तीनचार इंच उभा आहे अशा केक्स" बाजूला टाकून त्यांनी आपले भाषण कोलंबिया विद्यापीठाच्या ग्रंथशाळेत बसून तयार केले. आपल्या भाषणात त्यांनी निबंधावर जे आक्षेप घेतले होते त्यांना गिडिंग्ज नि वॉर्ड यांच्यासारखी प्रस्थे जागच्या जागी उत्तरे देतील अशी बहुतेकांची अपेक्षा होती. पण या नवोदित तरुण विद्वानाच्या अभिनव आक्षेपांनी गिडिंग्ज नि वॉर्ड बहुधा गडबडले आणि त्यांनी शिकागोच्या एका द्वैमासिकात मागाहून उत्तरे देण्याचे आश्वासन दिले! मात्र गंमत अशी, की त्या द्वैमासिकात आपला निबंध पुढे त्यांनी प्रसिद्धीस दिला नाही आणि केतकरांच्या आक्षेपांना उत्तरे देण्याचा प्रसंगही स्वतःवर ओढवून घेतला नाही. मूळ निबंध प्रसिद्ध न झाल्यामुळे त्यावरील केतकरांची टीकाही अर्थातच प्रसिद्ध झाली नाही आणि या प्रस्थांची झाकली मूठ सवा लाखाची राहिली. गिडिंग्ज आणि वॉर्ड यांच्या निबंधावर बोलण्याची केतकरांना ही जी संधी मिळाली ती संधी म्हणजे विद्वत्तेच्या क्षेत्रात होतकरू विद्वानांना मिळणारा विशेष मान होता. त्यामुळे या संधीबद्दल अनेकांकडून त्यांचे अभिनंदन झाले.—आणि जेव्हा त्यांच्या आक्षेपांवर गिडिंग्ज नि वॉर्ड यांनी

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ५ ते १०.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...२८९८९... वि: ...चरित्र...
क्रमांक .................. नों: दि: ..........

मूग गिळले तेव्हा तर तरुण विद्यार्थ्यांना त्यांचा तो दिग्विजय वाटला.[१]

केतकर कॉर्नेल विद्यापीठात शिकत होते, तेव्हा 'दि सोसायटी ऑफ कंपॅरेटिव्ह थिऑलॉजी अँड फिलॉसॉफी' या नावाचा अभ्याससंघ तेथे स्थापन झाला. या संघात बहुतेक सदस्य प्राध्यापक किंवा पदवीधर विद्यार्थी असत आणि प्राध्यापक मागे राहून अधिकारपदाच्या जागा निवडक विद्यार्थ्यांना देत. 'तौलनिक दैवतशास्त्र आणि तत्वज्ञान' यांना वाहिलेल्या या संघाचे अध्यक्षपद केतकरांना एक वर्ष लाभले होते. त्यांच्या ज्ञानाविषयी विद्यार्थीवर्गात जो विशेष आदर वसे आणि प्राध्यापकांना त्यांचे जे कौतुक वाटे त्यामुळेच अध्यक्षपदाची ही माळ त्यांच्या गळ्यात पडली होती.[२]

प्रखर बुद्धीचा होतकरू विद्यार्थी म्हणून विद्यापीठात केतकरांना मान मिळाला आणि प्रबंधाच्या प्रकाशनानंतर विद्यापीठाबाहेरील विद्वज्जनांतही त्यांचा सन्मान झाला; पण हे मानसन्मान त्यांच्या बौद्धिक अहंतेच्या मानाने मात्र अगदीच क्षुद्र असे होते. त्यांची बौद्धिक अहंता त्या मानसन्मानांहून फार उंच होती आणि तिच्यावर बांधलेल्या स्वर्गीय मनोऱ्यात ते वावरत असत. शालेय वयात स्वतःला ते वामनपंडिताहून थोर कवी समजत आणि आपली गणना महाकवींत करीत; त्याप्रमाणे तारुण्यात स्वतःचे स्थान महापंडितांच्या पंक्तीला त्यांनी कायमचे नेऊन ठेवले होते! "बुद्धीने नच मत्सम ऐसा वेडा हृदयी गर्व"[३] असे उद्‌गार लीनतेच्या एखाद्या क्षणी ते काढीत; पण आपला बुद्धीचा गर्व शहाणपणाचा आहे अशीच त्यांची स्थायी भावना होती. विद्यापीठात विद्यार्थी म्हणून अध्ययन करणारा हा तरुण स्वतःला सर्व प्राध्यापकांपेक्षाही मनातल्या मनात थोर समजत असे! ते एके ठिकाणी म्हणतात, "मला स्वाभाविकपणे आपण अमेरिकन अभ्यासकांपेक्षा उच्चतर भूमिकेत आहो, असे वाटत असे. कारण येथील अत्यंत मान्य असे त्या वेळचे समाजशास्त्रज्ञ प्रो. गिडिंग्ज किंवा प्रो. लेस्टर वॉर्ड, प्रो. अल्बियन स्मॉल, प्रो. रॉस, प्रो. वुइल्कॉक्स, प्रो. जेंक्स इत्यादी मंडळींची माझ्या मनात स्वतःशी तुलना उत्पन्न होई. त्यांना जगाचा बराच भूभाग बरोबर ठाऊक नाही, ज्या सामाजिक अवस्था मला चांगल्या परिचित आहेत त्या त्यांना ठाऊक नाहीत, पण त्यांच्या समाजाचे ज्ञान मात्र आपणास आहे, 'अशा तऱ्हेची भावना जातिभेदाचा अभ्यासक अशा मला झाल्याशिवाय राहात नसे.—आणि त्यामुळे व त्यांच्या विद्वत्तेच्या मर्यादा अधिक निश्चितपणे कळल्यामुळे स्वतःविषयी एक तऱ्हेची अतुल्यत्वाची भावना उत्पन्न झालेली होती."![४] त्यांची बौद्धिक अहंता अशी 'अतुल्य' नि असीम असल्यामुळे, विद्वत्तेच्या क्षेत्रात झालेल्या मानसन्मानांचे महत्व त्यांना मुळीच वाटत नसे. 'हे मानसन्मान करणारांची पदवी ती कोणती? आपण त्या

१. आठवणी, केतकर, प्रतिभा, २ फेब्रुवारी १९३४.
२. आठवणी, केतकर, प्रतिभा, ५ जानेवारी १९३४.
३. 'हृदयाची तळमळ', विद्यासेवक, मे १९२६.
४. 'मी व माझे टीकाकार', ज्योत्स्ना, जून १९३६.

मानसन्मानांना किंमत तरी किती द्यायची ?'—अशी त्यांची वृत्ती होती. खुरट्या झुडपाने वटवृक्षाचा गौरव केला तर वटवृक्ष जसा मोठेपणाच्या डौलात मंदस्मित करील तसे मंदस्मित या मानसन्मानांच्या वेळी त्यांच्या मुखमंडलावर विलसत राही !

त्यांच्या बौद्धिक अहंतेला मानसन्मानांचे काही वाटत नसे; पण त्यांच्या मनात एक भावनामय भाग असा होता, की या मानसन्मानांच्या प्रसंगी त्यात कोमल कंपने उठू लागत. आता ते पंचविशीत प्रविष्ट झाले होते आणि त्यांच्या भावभावनांना परिपक्वता येत चालली होती. बालपणातील नि तरुणपणातील अतिरिक्त आत्मकेंद्रितपणा त्यांच्यामधून कमी झाला होता आणि त्यामुळे कुटुंबियांची आपुलकी त्यांना हवीहवीशी वाटू लागली होती. पूर्वी आई नि बहीण मृत्युमुखी पडून जेव्हा त्यांचे कुटुंबपाश संपले तेव्हा त्यांना स्वातंत्र्याचे स्वर्गद्वार उघडल्यासारखे झाले होते; पण आता, तुटलेल्या कुटुंबपाशांमुळे आपले काही तरी हरवले आहे, अशी जाणीव त्यांना होऊ लागली होती. मानसन्मानांच्या आणि अत्यंत आनंदाच्या प्रसंगांनंतर, एकांतामध्ये, त्यांना जिवलगांच्या आठवणी होत नि त्यांचे चित्त विषण्ण होई. आपल्या मानसन्मानांचे आपणाला काही वाटत नसले तरी त्यांमुळे ज्यांना खराखुरा संतोष झाला असता अशी माणसे जवळ नाहीत, म्हणून त्यांना उदास वाटे. आपल्या गद्यसदृश काव्यात या मनःस्थितीचा आविष्कार त्यांनी पुढीलप्रमाणे करून ठेवला आहे :

**“ बाल्य जयांच्यासवे लोटिले त्यांच्यापैकी आजी**
**अवलोकाया तुज परिसाया कोण असे या राष्ट्री ?**
**शैशवपरिचित मातापितरे भगिनी ही मृत झाली;**
**त्वत्स्मृतिविण इतरत्र तयांची स्मृतिही आज निमाली.**
**कृत्या करुनी कोणाते मी तोषविण्यास झटावे ?**
**ऐकुनि मम यश कोण जने बा जगती या हर्षावे ? ”**

दुःख नि औदासीन्य यांनी मन असे ग्रासले, की त्यांच्यापुढे अनेक प्रश्न उभे राहात. 'आपल्या मानसन्मानाचे नि आनंदाचे खरे वाटेकरी जर कोणीही नाहीत, तर हे मानसन्मान मिळवायचे तरी कशासाठी ? रात्रंदिवस धडपडत उत्कर्षाची साधना का करायची ? आपल्या विद्येचे सार्थक कोणते ?'—अशा प्रकारचे ते प्रश्न असत. हे प्रश्न मनापुढे उभे राहिले, की मग संन्यास नि तुच्छतावाद यांच्या अतल अंतराळात ते गटांगळ्या खाऊ लागत आणि 'कशात काही अर्थ नाही! सर्व सोडून द्यावे !' अशी त्यांची भावना होई. या वेळी त्यांचा तीव्रतम देशाभिमानच त्यांना काही आधार देऊ शके. संन्यास नि तुच्छतावाद यांत बुडू पाहाणाऱ्या मनाला ते म्हणत :

**“ तिरस्कृतीते, उदासीनते देउ नको बा स्थान**
**मानवजातीच्या प्रगतीते जी करि मोठे विघ्न. ”**
**“ नको गौरवू जे देशाते हानिप्रद वैराग्य ”...**

मग मानवजातीच्या प्रेमाखातर आणि देशाभिमानाखातर त्यांचे मन पुन्हा थाऱ्यावर येई आणि काही वेळाने स्वस्थ होई.[१]

विद्यापीठामधील नियोजित अभ्यासक्रम आणि बौद्धिक चळवळी यांमध्ये केतकर पूर्णपणे रमले, पण तेथे हौसेमौजेचा नि क्रीडाविहाराचा जो जीवनक्रम असे त्यात ते फारसे रमू शकले नाहीत. हिंदुस्थानापेक्षा अमेरिकेमध्ये विद्यार्थी-विद्यार्थिनींना एकमेकांत मिसळण्याचे स्वातंत्र्य पुष्कळ होते; पण या सहजीवनाचा उपभोग घेण्यासाठी काही संचित प्रत्येकाजवळ असावे लागे. उदाहरणार्थ, तरुणींत सहजतेने वावरू इच्छिणाऱ्या तरुणाला आपला पोषाख नीटनेटका ठेवण्याची कला अवगत असावी लागे. पण केतकरांजवळ ही कला जवळजवळ शून्य होती. पहिल्या तिमाहीत एकदा त्यांनी पांढरा 'टाय' परिधान केला आणि ते विद्यापीठात गेले; तेव्हा जो तो त्यांना विचारू लागला, की 'काय हो ? आपण नाचाला निघालात वाटते ?' पोषाखाच्या बाबतीत त्यांचा असा सैल कारभार होता; त्यामुळे तरुणतरुणींच्या संमिश्र नि उल्हसित घोळक्यांत ते फारसे मिसळून जाऊ शकले नाहीत. त्यातून युवतींचा सहवास बराच महाग पडे. मैत्रिणीला बरोबर न्यायचे असेल तर दाढी न्हाव्याकडून गुळगुळीत करून घ्यावी लागे, पोषाखाला उत्तम इस्त्री मारावी लागे आणि उच्च प्रतीच्या उपाहारगृहात जाण्यासाठी खिशाची तयारी ठेवावी लागे. मैत्रिणीसाठी वारंवार गाडीचीही गरज पडे आणि नेहमीच्या पायाच्या टांग्यावर भागत नसे. केतकर निष्कांचन नि स्वावलंबी विद्यार्थी होते, तेव्हा मैत्रिणीचा असला महागडा सहवास त्यांना साहजिकपणेच परवडत नसे. अर्थात, वनविहार नि नौकास्पर्धा, संमिश्र खेळ नि नाचगाणी यासारख्या सुखासीन जीवनक्रमापासून ते दूर राहिले.[२]

सुखासीन जीवनक्रमापासून केतकर दूर होते तरी कामविकाराने मात्र त्यांच्या तरुण मनाचा वेळोवेळी ताबा घेतला होता. उन्हाळ्याच्या सुट्टीत जेव्हा उपजीविकेसाठी किंवा भटकण्यासाठी ते विद्यापीठाबाहेर पडत त्या वेळी उन्मत्त वसंतकाल फुललेला असे आणि त्याचा परिणाम त्यांच्या मनावर होई. अमेरिकेत चंद्रप्रकाश क्षीण होता आणि आम्रमंजिऱ्या किंवा कोकिलांचे कूजन यांना बहर येत नव्हता. पण 'रतिपतीचे कार्य' तेथे भरभराटीत चालू असे. "काम असे हा शत्रु जनांचा निर्दाळुनि या टाका। ऐशा वेड्या वेदांताने भ्रष्टविला नच जन हा।" अशी त्या ठिकाणची लोकस्थिती होती आणि तीमुळे स्त्रीपुरुषांमधला व्यवहार अगदी मोकळेपणी घडत होता. "शत-जातींच्यायोगे होत न उत्साहाचा भंग। अवरोधाविण पूर्ण करितसे येथे राज्य अनंग।"... "रुचेल चित्ता तो पति अथवा पत्नी निवडायाची। मोकळीक हो स्त्रीपुरुषांते, सक्तिहि नसे कशाची।" अशा स्वातंत्र्याच्या वातावरणात तेथल्या गौरकाय अंगना आपल्या

१. 'आनंदकालीन दु:खोद्गार व तज्जन्य विचार', विद्यासेवक, जून १९२६.
२. आठवणी, केतकर, प्रतिभा, ५ जानेवारी १९३४.

मोहनास्त्राचा मारा भोवतालच्या तरुणांवर चौफेर चालू ठेवीत. आपल्या टोपीला त्या शहामृगाचे पीस खोवीत, ती टोपी केशकलापावर तिरकी घालीत आणि पुरुषांच्या मनाला मोह पाडीत. वसंतकालातील प्रसन्न हवेत या प्रकारची उद्दीपक दृश्ये बघून केतकरांचे मन चलित होई. ते म्हणतात:

"भारतवर्षी मेघ पाहुनी व्याकुळ मन नच झाले
पाहुनि हा देखावा ते मन विव्हल होउनि गेले!"

उद्दीपक वसंतकालामध्ये कोणा सुंदर अमेरिकन युवतीने केतकरांवर किंचित्काल प्रेमजालही टाकले असावे. ही युवती कशी होती ते केतकरांच्या काही काव्यपंक्तींवरून ध्यानी येऊ शकते. आपल्या प्रेयसीबद्दल ते लिहितात:

"सोत्सुक वचनी नित्य वागते, प्रिय आचरण्या झटते
मंजुळ, मृदु वचनी चित्ताते जी आनंदित करिते
तशात ती जर सुंदर, वादनचित्रकलांही युक्त
नवल काय जर ऐशी बाला क्षणभर वेधिल चित्त?"

या 'बाले'ने त्यांचे चित्त वेधले, पण ते 'क्षणभर'च वेधले. उमरावतीच्या 'एन'चा ठसा त्यांच्या चित्तावर जसा खोल उमटला होता, तसा खोल ठसा या युवतीमुळे उमटला नाही. विवेकाच्या बळावर या युवतीचा मोह त्यांनी मनामधून थोड्या दिवसांनी काढून टाकला.

कामविकार जेव्हा मनात जागा होई तेव्हा विवेकशक्तीने त्याला प्रतिकार करण्यासाठी केतकरांना आपल्या देशप्रेमाचाच आधार सापडे. देशाभिमानामुळे जसा तुच्छतावाद नि वैराग्य यांचा निरास ते करू शकत, त्याप्रमाणे देशाभिमानामुळे कामविकारही ते पराभूत करू शकत. कामविकाराने मन गडबडले म्हणजे त्यांना स्वदेश, स्वधर्म आणि स्वसमाज यांची आठवण होई. युरोप-अमेरिकेतले लोक त्यांच्यासारख्या वंश-शास्त्राच्या अभ्यासकास भारतीयांचे बांधवच वाटत; पण त्याच वेळी त्यांच्या दृष्टीसमोर ही गोष्ट येई, की 'या गौरवर्णीयांना भारतामधले हिंदू आपले बांधव समजत नाहीत. ते अत्यंज आहेत, पतित आहेत, ही हिंदूंची समजूत आहे. "शूद्रीमुखमधु करी प्राशना ब्राह्मण तो हो पतित। शासन आहे असे मनूचे त्याच्या प्रिय राज्यात।" तेव्हा स्वसमाजाची सेवा आपणाला करायची असेल तर येथे "शूद्रीमुख-मधु" प्राशन करून "पतित" होऊन चालणार नाही. आपले हिंदुत्व आणि ब्राम्हण्य टिकवले पाहिजे. तरच देशबांधव आपणाला मानतील आणि आपल्या नेतृत्वाचा किंवा सेवेचा अंगीकार करतील.' ही गोष्ट दृष्टीसमोर आली, की पुढील उपदेश ते स्वतःला करीत आणि कामविकार जिंकण्यास समर्थ होत. ते स्वतःला म्हणत:

“भारतवर्षी पुन्हा जाउनी वसती करणे ज्यास
गुंतु नये कधि तेणे देऊ मन येथिल मोहास.
पीच तरूवर पिकलेले फळ हाता येण्याजोगे
परि परक्याचे म्हणोनि मोहा दूर करावे लागे.”

त्या गौरकाय अमेरिकन युवतीच्या ‘पीच तरूवर’ जे प्रेमाचे ‘फळ’ पिकले होते ते त्यांनी या तऱ्हेच्या विचारांनीच दूर सारले होते.[१]

१९०८ च्या जून महिन्यात ‘उत्तर अमेरिकेतील वसंतकाल’ हे साकीवृत्तातील काव्य लिहिण्यास केतकरांनी न्यूयॉर्क संस्थानातील इथका या गावी, म्हणजे आपल्या शिक्षणाच्या गावी, प्रारंभ केला. या काव्यातील एकूणसत्तर साक्यांचा मुख्य भाग अमेरिकेतच लिहून पूर्ण झाला आहे. त्यात अमेरिकेमध्ये कामविकाराने आपणावर मिळविलेला ताबा आणि त्या गौरकाय युवतीने टाकलेले प्रेमजाल यांचे वर्णन स्वतःच्या खडखडीत नि खडबडीत शैलीने त्यांनी केले असून, शिवाय आपल्या मनाचे काही विशेष पैलूही प्रकट केले आहेत. त्यांची स्त्रीविषयक भावना आणि त्यांचा स्पष्टवक्तेपणाचा बाणा या काव्यात ठसठशीत स्वरूपात आविष्कृत होतात. स्वतःचा कामविकार आणि त्या गौरकाय युवतीचा ‘क्षणभर’ पडलेला मोह त्यांनी उघड करून सांगितला, तेव्हा एका रसिकाने त्यांना प्रश्न केला, की

“हृदय तुझे आधीच असे बळकावियले अन्येने
अश्रुलोचना, वदलासी तू पूर्वी गद्‌गद वचने.
प्रेम तुझे जरि एका स्त्रीवर दृढ, मग कैचे जाई—
अन्य स्त्रीवर? शक्य कसे हे? वद आम्हां लवलाही.”

त्या वेळी काहीतरी गुळमुळीत उत्तर देऊन स्वतःच्या भावना त्यांनी चोरून ठेवल्या नाहीत. “जर तू वदशी हृदय आपुले इतरां येइल धैर्य” हे स्पष्टवक्तेपणाचे स्वतःचे ब्रीदवाक्य त्यांनी आपल्या पहिल्या काव्यातच ठरवून टाकले होते.[२] त्याच ब्रीदवाक्याचा वेगळ्या शब्दांत त्यांनी त्या रसिकाजवळ पुनरुच्चार केला. ते म्हणाले :

“उदात्त भावां वर्णन करितो नलगे मज हा मान
खरे वर्णितो इतुके मजला पुरे प्रशंसावचन.
खऱ्या कवीने हृदयावरचा पडदा दूर करावा;
निंदो अथवा स्तवो जन, कवी वर्णो मानवभावा.”

स्पष्टवक्तेपणाचे हे ब्रीदवाक्य सांगितल्यावर, दुसऱ्या प्रेमासंबंधी त्यांनी पुढील स्पष्टीकरण केले :

१. ‘उत्तर अमेरिकेतील वसंतकाल’.
२. ‘प्रथमकल्लोल’, विद्यासेवक, फेब्रुवारी १९२६.

"स्पष्टपणे मी कथितो माझें नाही हृदय पवित्र
नाना काळी अधमविचारीं केलासे त्या स्पर्श."
"पूर्वी जरिही प्रेम घट्टसें एका स्त्रीवर बसलें
पूर्ण शक्य हे जर अन्येने क्षणभर विस्मित केलें."

'ते मनुष्य होते; पुराणातले भीष्म किंवा श्रीराम नव्हते; अथवा खोट्या कथाकाव्यातले नायकही नव्हते.—आणि हेच त्यांच्या पुनरावृत्त स्त्रीप्रेमाचे कारण होते.' त्यांनी दुसऱ्या एका ठिकाणीही परखड स्पष्टपणाने सांगितले आहे, की "मी एकनिष्ठ प्रेम करणारा नाही. अनेक स्त्रियांच्या पाठीमागे......माझे अंतःकरण भटकले आहे."[1]

अध्ययन आणि उपजीविका यांच्या व्यापातून मुक्त होऊन केतकर जेव्हा इकडेतिकडे भटकत तेव्हा त्यांचे मन आपल्या देशबांधवांकडेही सहजच वळे. ते अमेरिकेत असताना सुमारे तीन हजार शीख कामकरी आणि दीडदोनशे भारतीय विद्यार्थी अमेरिकेत राहात असावेत. त्यांपैकी शीख कामकरी अमेरिकेच्या पश्चिम भागातच असल्यामुळे केतकरांचा त्यांच्याशी संबंध आला नाही; पण विद्यार्थ्यांपैकी काही पूर्वभागात असल्यामुळे त्यांच्याशी मात्र त्यांचा संबंध आला. या विद्यार्थ्यांचे नि अन्य भारतीयांचे जे जमाव नगरानगरात गोळा झालेले होते त्यांच्यात जाऊन ते मिसळत आणि देशाच्या उद्धाराच्या भव्य योजना त्यांच्यासमवेत आखीत. बंगालमधील राजकीय पुढाऱ्यांच्या कुटुंबांची १९०५नंतर जी वाताहात झाली होती तिच्या निवारणासाठी एकदा त्यांनी अडीचशे रुपये जमवून हिंदुस्थानात पाठविले होते. दुसऱ्या एका वेळीं, इतिहासचार्य राजवाड्यांच्या एका खंडाच्या मुद्रणासाठी शिलोत्री वगैरे मित्रांसह त्यांनी राजवाड्यांना पन्नास डॉलर देऊ केले होते आणि राजवाड्यांनी त्या खंडाला विस्तृत सूची जोडावी अशी अट त्यांना घातली होती. देशबांधव भेटले, की त्यांनी हिंदुस्थानची अब्रू परदेशात खराब करू नये म्हणून केतकर चिंता वाहात. स्त्रियांचे दर्शन ज्यांना साठीसहामासी व्हावयाचे असे पडद्याच्या प्रदेशातले पंजाबी नि बंगाली विद्यार्थी अमेरिकेत गेले, की तेथल्या गोऱ्या स्त्रियांच्या चिकचिक्या हवेत पाघळू लागत. त्यांचे वर्तन अत्यंत गर्हणीय होऊ लागे. अशा वेळी स्वतःच्या कामविकाराला देशाभिमानाने बंधन घालणारे केतकर त्या विद्यार्थ्यांची प्रेमळ खरडपट्टी काढीत. केव्हाकेव्हा या भारतीयांमध्ये त्यांना एखादे अमेरिकेतच स्थायिक झालेले भारतीय कुटुंब भेटे. अमेरिकन संस्कृतीत हळूहळू मिसळत जाणारे ते कुटुंब बघून त्यांच्या मनात विचार येई, की 'अशा कुटुंबांचे भारतीयत्व कसे टिकविता येईल? त्यांचा उपयोग भारताला व्हावा म्हणून कोणते मार्ग चोखाळता येतील!' केव्हा एखादी महाराष्ट्रीय प्रौढ महिला त्यांना भेटे. तिची मराठी मातृभाषा विसरत चाललेली बघून त्यांना विषाद वाटे.—आणि मातृभाषेतले अमृतमय शब्द त्या

१. आठवणी, केतकर, प्रतिभा, २८ ऑगस्ट १९३३.

विदेशात ऐकायला मिळावे म्हणून आतुर होऊन ते त्या महिलेला एखादे मराठी गाणे म्हणण्याचा आग्रह करीत![1]

अमेरिकेत चोहोकडे हिंडत असता कान-डोळे उघडे ठेवून ते हिंडत होते. एक नवे जग आपणाला बघावयास मिळत आहे, ते आताच पुरेपूर बघून घेतले पाहिजे, अशी त्यांची भूमिका असे. येथल्या निरीक्षणावर नि अनुभवावर आपल्या कार्याची भावी इमारत उभारली जाणार आहे, याची जाणीव त्यांच्या मनात सदैव जागृत असे. अमेरिका हे एक नवजात राष्ट्र होते. युरोपखंडातून अनेक देशांचे नि वंशांचे समाज तेथे येऊन कोसळत होते आणि त्यांच्या आघातप्रत्याघातांतून एकजिनसी अमेरिकन समाज बनत होता. हिंदुस्थानच्या एकराष्ट्रीकरणाच्या दृष्टीने या गोष्टीकडे ते बघत असत. तेथे भांडवले एकत्र येत होती, लहान व्यापारी संघांचे औद्योगिक महासंघ बनत होते, आणि उत्पादन प्रचंड प्रमाणावर होऊन वस्तूंच्या किंमती उतरत होत्या. हिंदुस्थानच्या आर्थिक जीवनाला गती देता यावी म्हणून या प्रक्रियेकडे ते लक्ष पुरवीत होते. त्या नव्या राष्ट्रात नवी नगरे वसत होती, समृद्धीने व सौंदर्याने नटत होती, आणि नगररचनेचे शास्त्र विस्तारत चालले होते. लहान खेड्यांच्या नि कळाहीन शहरांच्या भारतात परतण्यापूर्वी ही घटना ते लक्षपूर्वक न्याहाळीत होते. हिंदुस्थानातील लोकशाहीचा प्रयोग यशस्वी करता यावा, म्हणून तेथील राजकारणावर त्यांची नजर असे; कारण धर्माचा पाया दूर लोटून केवळ राजकीय दृष्ट्या राज्यघटना बनविलेले आणि त्या घटनेप्रमाणे चालणारे अमेरिका हे जगातले एकच लोकसत्ताक राज्य होते. हिंदुस्थानात हळूहळू प्रौढविवाह नि प्रेमविवाह रूढ होणार; म्हणून तसे विवाह चालू असलेल्या अमेरिकेत कुटुंबे नि कुंटणखाने, स्त्रिया नि पुरुष यांचे संशोधन त्यांनी चालविले होते. स्वतः माल खपवण्याचे काम करीत असता विक्रयकला, टपालविक्रीचा धंदा, दुकानांची मांडणी वगैरेंचे अद्ययावत ज्ञान ते गोळा करीत होते आणि मायभूमीला परतल्यावर त्या ज्ञानाचे उपयोजन ते व्यवहारात करणार होते. डॉ. अँड्र्यू डी. व्हाइट व डॉ. अँड्र्यू कार्नेगी यांसारख्या थोर अमेरिकनांचा परिचय करून घेऊन जग घडवणाऱ्यांचे विचार ते भारत घडवण्यासाठी समजून घेत होते. थोडक्यात म्हणजे एका प्रगत नि संपन्न राष्ट्राच्या जीवनक्रमाचा ग्रंथ ते लक्षपूर्वक अभ्यासत होते. विद्यापीठातील विद्या त्यांना जेवढी मोलाची वाटत होती, तेवढ्याच मोलाची या ग्रंथातील विद्याही त्यांना वाटत होती. त्यांच्या सर्व भावी विचारांची नि उद्योगांची मुळे अमेरिकेत नि अमेरिकेचे त्यांनी हे जे मनसोक्त अध्ययन केले त्यात रुजलेली नि पुष्ट झालेली आढळून येतील.[2]

१. आठवणी, केतकर, प्रतिभा, ५ जानेवारी १९३४, १२ ऑक्टोबर १९३४, व २३ नोव्हेंबर १९३४; 'उत्तर अमेरिकेतील वसंतकाल', साक्या ६० ते ६९.

२. आठवणी, केतकर, प्रतिभा, १९ जानेवारी १९३४; केतकरांचे अमेरिकानिवासानंतरचे विविध लेखन.

प्रबंधाला मान्यता मिळून पीएच. डी. ची पदवी जेव्हा त्यांच्या दृष्टिपथात आली तेव्हा त्यांना हिंदुस्थानात येण्याचे वेध लागले. पण त्यांचे हिंदुस्थानात येणे सहजासहजी झाले नाही. तत्पूर्वी 'हिंदुस्थानात न जाता अमेरिकेचेच रहिवासी आपण व्हावे' अशा मोहाचा एक हेलकावा त्यांच्या मनाला बसला. अमेरिकेतच त्यांनी राहावे, असा आग्रह त्यांचे अमेरिकन मित्र त्यांना करीत होते आणि अमेरिकेचे नागरिकत्व मिळवून एखाद्या विद्यापीठात सुखाची प्राध्यापकी करीत राहाणे त्यांना अगदी शक्य होते. शिवाय हिंदुस्थानकडे दृष्टी वळताच त्यांना अशी तीव्र जाणीव होऊ लागली, की आपली खरीखुरी प्रतीक्षा करणारी व्यक्ती तेथे कोणीही नाही. वडील, आई, बहीण या त्यांच्या नातेवाइकांचे मृत्यू पूर्वीच घडले होते आणि ते अमेरिकेत असता त्यांचे थोरले बंधूही दिवंगत झाले होते![1] तेव्हा जेथे कुटुंबप्रेमाचा साहारा झाला आहे तेथे जाण्यात काय अर्थ आहे, असे त्यांना वाटू लागले. अमेरिका नि हिंदुस्थान यांची तुलनाही त्यांच्या मनात उभी राहिली. आपण हिंदुस्थानात गेलो तर इंग्रजांचे गुलाम म्हणून जगणार, पारतंत्र्यातली मानहानी आपणाला सहन होणार नाही; तर त्या गर्तेत आपण आपल्याच पायाने कां उतरायचे, असा प्रश्न त्यांच्या डोक्यात घोळू लागला. हिंदुस्थानच्या अज्ञ आणि परवश भूमीत आपल्या उच्च समाजशास्त्रीय विद्येचे चीज होणार नाही, अशी भीतीही त्यांच्या मनात उद्भवली. उलट, अमेरिकेची भूमी त्यांना समृद्ध नि सुधारलेली दिसत होती. तेथील लोकशाही नि व्यक्तिस्वातंत्र्य यांची चव नि चटक त्यांना लागली होती. तेथे आपल्या विद्येला भरपूर वाव मिळेल हे त्यांना स्पष्ट दिसत होते. तेव्हा हिंदुस्थानशी संबंध तोडावा, अमेरिकेचाच मायभूमी म्हणून स्वीकार करावा, हा त्यांचा मोह बळावत गेला आणि तो दूर करणे त्यांना थोडेसे जड जाऊ लागले.

पण त्यांचे सर्व स्थायी विचारविकार त्या स्वार्थी मोहाच्या मूलतःच विरुद्ध होते. संकुचित स्वार्थ साधून मनाला खरी शांती लाभत नाही, ती कर्तव्य करीत राहिल्याने लाभते, हे आत्मचिंतनामुळे त्यांना पुरेपूर पटले होते. अधिकांचे अधिक हित ज्यामुळे साध्य होईल, ज्यामुळे चिरकालिक हित हाती येईल, ते खरे कर्तव्य होय, हा निर्णय त्यांनी केव्हाच घेतला होता.—आणि पॅरिसमध्ये किंवा न्यूयॉर्कमध्ये देशभक्तीच्या गप्पा मारल्याने कर्तव्य घडणार नाही, हे त्यांना उघड दिसत होते. हिंदुस्थानात जाऊन देशकल्याणाच्या कार्याला हातभार लावणे हेच खरे कर्तव्य होय, ही त्यांच्या सर्व विचारशक्तीची ग्वाही होती. त्यांचा जळजळीत देशाभिमान नि त्यांची कर्तृत्वाची आकांक्षाही हिंदुस्थानकडे जाण्याचीच प्रेरणा त्यांना देत होती. तेव्हा या स्थायी विचारविकारांपुढे त्यांचा भंगुर 'राष्ट्रत्यागमोह' टिकू शकला नाही. त्या मोहाचे पटल दूर सारून विचारपूर्वक त्यांनीं स्वतःलाच आदेश दिला, की

१. आठवणी, दि. य. फाटक.

"स्वच्छंदे त्वा दिन घालविले नाना प्रयोग केले
तूही आता कां कचरावे कार्यांच्या कालात ?
जाई देशी कार्या लागे, स्वजनांच्या कल्याणा—
प्रयोग म्हणुनी योजावे या देहाते तू वीरा" ![1]

२ मे १९११ या दिवशी अमेरिकेहून निघणाऱ्या बोटीत केतकरांनी पाय ठेवला.[2] पाच वर्षांपूर्वी ते अमेरिकेस आले तेव्हापासून आतापर्यंत त्यांच्यामध्ये केवढा तरी फरक पडला होता ! तेव्हा ते नवथर नि अननुभवी तरुण होते; पण आता ते परिणत नि प्रौढ पुरुष बनले होते. तेव्हा त्यांच्यापाशी एकही पदवी नव्हती; पण आता अत्युच्च पदवी त्यांच्या शिरावर शोभत होती. त्या वेळी सारेच अपक्व, तोकडे नि खुजे होते; पण आता साऱ्याला बरकत नी भरभराट आली होती. आता ज्ञानातला तोकडेपणा गेला होता आणि ते खोल नि विस्तृत बनले होते. अनुभवातला उणेपणा उणावला होता आणि अनुभव व्यापक नि सूक्ष्म बनला होता. पाच वर्षांपूर्वी त्यांचे विचार विस्कळीत होते, विकार उथळ होते. पण आता विचारांना वजन आले होते; आकार प्राप्त झाला होता. विकार गंभीर बनले होते. मनावर प्रेमाची, कामाची, कर्तव्यविचाराची, कुटुंबमायेची किंवा देशाभिमानाची अनेक वादळे उठली होती आणि मनाचे पोरपण कमी झाले होते. त्यातल्या भावभावना रुंद प्रवाहातून वाहू लागल्या होत्या. पूर्वी आकांक्षा उंच होत्या, पण कल्पनारम्य होत्या; आता त्या अधिक उंच झाल्या होत्या, पण व्यवहार्यही बनल्या होत्या. गेल्या पाच वर्षांत मनाची माती जशी काही नव्या मुशीत ओतली होती. मुशीत असताना नवी मूर्ती घडली होती. माती तीच, पण मूर्ती नवी !—आणि ही नवी मूर्ती आता मायभूमीकडे, आपल्या मूळ मातीकडे, निघाली होती.

१. 'राष्ट्रत्यागमोह', विद्यासेवक, डिसेंबर १९२५.
२. आठवणी, केतकर, प्रतिभा, २३ नोव्हेंबर १९३४.

## मायभूमीच्या वाटेवर

### [१९११ ते १९१२]

[हिंदुस्थानाकडे परत येताना केतकर वाटेत इंग्लंडमध्ये उतरले आणि तेथे मे १९११ ते सप्टेंबर १९१२ पर्यंत राहिले. लंडनला]२४ अल्फ्रेड स्ट्रीट वेस्ट येथील [एका निवासगृहात श्री. भास्करराव काणे, हरिश्चंद्र तालचेरकर, गोरखनाथ नगरकर वगैरे महाराष्ट्रीय मंडळी राहात आणि त्यांच्यामध्येच केतकर बराच काळ जाऊन राहिलें होते.] काही काळ ते अन्यत्रही राहात असत. [इंग्लंडमधील वास्तव्यात नवे ज्ञान आणि नवा अनुभव गोळा करावा, हा त्यांचा मुख्य उद्देश होता.] [त्यामुळे 'रॉयल एशियाटिक सोसायटी', 'स्टॅटिस्टिकल असोसिएशन' इत्यादी संस्थांच्या बैठकींना ते आस्थापूर्वक उपस्थित राहात. सामाजिक सभा आणि मजुरांच्या सभा यांना हजर राहण्याची संधीही ते वाया दवडीत नसत. 'नॉर्थब्रुक सोसायटी' नि 'इंडियन असोसिएशन' येथे जाऊन श्रोत्याची नि वक्त्याची अशा दोन्ही भूमिका ते बजावीत. इंग्लंडमध्ये येणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांमध्ये मिसळून त्यांची मनोगते जाणून घ्यावी, अशी त्यांची धडपड चाले. ब्रिटिश म्यूझियममध्ये नाना ग्रंथांच्या अवलोकनार्थ त्यांची जाये चालू असे.—आणि त्यांची ज्ञानलालसा अशा दूरदूरच्या प्रदेशात हिंडे, की 'इंडिया ऑफिस'चे वतीने 'ब्रम्हांडपुराणा'ची बली बेटातील प्रत मिळवावी म्हणून इंग्लंडात असतानाच त्यांनी प्रयत्न केला होता.[1]

[इंग्लंडात त्यांची सांपत्तिक स्थिती फार हलाखीची होती.] 'हिंदुइझम' या तेथे प्रसिद्ध झालेल्या आपल्या ग्रंथावर आणि 'अथीनियम' किंवा 'राजस्थान' या नियतकालिकांत ते जी समालोचने किंवा लेख लिहीत त्यांवर त्यांना थोडेसे पैसे मिळत; पण त्यांतून त्यांचे भागत नसे. [अनेकदा एकाच जेवणावर ते दिवस कंठीत] आणि काही वेळा एका

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ११; आठवणी, भा. गो. काणे; 'हिंदुत्वाची पुनर्घटना', लोकशिक्षण, पौष-माघ १८३८.

जेवणाचे पैसे देणेही त्यांना अशक्य होई. मग श्री. काणे किंवा ताल्चेरकर त्यांच्या जेवणाची बिले भागवीत असत. ज्ञानार्जनासाठी दारिद्र्य सोशीत असता, काही दिवस हातांनीच स्वयंपाक करण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला होता आणि मग गॅसच्या ज्वालेवर मांस भाजून त्यांनी आपली भूक भागविली होती. जेवणाला पुरेसे पैसे नसल्यामुळे, लंडनमध्ये स्वस्तात स्वस्त जेवण कोठे मिळते, या विषयाचे ते 'तज्ज्ञ' बनले होते. केव्हाकेव्हा जाये करण्यासाठी त्यांच्या खिशात 'बस'पुरते पैसे नसत; मग लंडनमध्ये पायी हिंडण्याची 'खास मौज' ते अनुभवीत. अशी त्यांची दैना होती, पण दैन्य मात्र त्यांच्या तोंडावर कधीच दिसत नसे. 'हे असेच चालायचे!' अशा निष्काळजी वृत्तीने ही आनंदमूर्ती आपल्या ज्ञानार्जनाच्या कार्यात निमग्न असे.[1]

आपल्याच छंदात वावरत असता पोषाख आणि नेटकेपणा यांच्याकडे ते क्वचितच लक्ष देत. 'डॉक्टरेट'ची पदवी मिळवलेला हा पंडित, लग्न न झालेला हा राजबिंडा पुरुष; पण गबाळ नि गचाळ पोषाखात तो खुशाल रस्त्यातून हिंडे. त्यांचा बूट फाटलेला असायचा, 'लाँग कोट' व विजार ही किटलेली असावयाची, एक मोजा एका रंगाचा तर दुसरा दुसऱ्या रंगाचा असावयाचा, आणि अशा साहेबी पोषाखावर हिंदू पगडी कैक वेळा झळकताना दिसावयाची! झुळझुळीत, घडीदार कपडे घातलेली गोरीगोमटी इंग्रज माणसे ज्या रस्त्यातून हिंडत त्याच रस्त्यातून जेव्हा ते अशा पोषाखात जाताना दिसत तेव्हा त्यांचे ध्यान पाहणाराच्या चांगलेच नजरेत भरे.[2]

पण गरिबी नि गबाळेपणा यांच्या आवरणाखाली केतकरांचा स्वत्वाभिमान राज्यकर्त्यांच्या त्या देशात विशेष जागृत होता. मराठीचा कडक अभिमान इंग्रजी बोलणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांच्या घोळक्यात त्यांनी कधीही सोडला नाही. ते आणि ॲक्चुअरी ग. स. मराठे 'इंडियन सोशल मीटिंग'मध्ये आग्रहपूर्वक मराठीत बोलत.[3] अमेरिकेमध्ये गोऱ्यांच्या वर्णविद्वेषाचा थोडासा अनुभव त्यांना आला होता. हजामतीच्या किंवा जोडे पुसण्याच्या वेळी अमेरिकन लोक हिंदी माणसांची सेवा करण्यास कसा नकार देत, काळ्या हिंदी पुरुषाचा संबंध गोऱ्या अमेरिकन स्त्रीबरोबर येऊ नये म्हणून ते कशी मत्सरी काळजी वहात, ते त्यांनी बघितले होते. या वागणुकीची प्रतिक्रिया म्हणून त्यांचा हिंदुत्वाभिमान तेथेच घट्ट झाला होता.[4] आता इंग्लंडमध्ये त्यांना थोडा नवा अनुभव येत होता. इंग्रज कितीही मनमोकळे वागले तरी 'आपण राज्यकर्ते आहोत, हे हिंदी लोक आपले गुलाम आहेत' याचा अहंकार त्यांच्या मनाच्या तळाशी दाटलेला असे. केतकरांना साहजिकच त्या अहंकाराचा तिरस्कार वाटे आणि त्यांचा स्वत्वाभिमान एखादे वेळी

१. आठवणी, भा. गो. काणे; डॉ. केतकरांचें सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ९; आठवणी, शीलवती केतकर.
२. आठवणी, भा. गो. काणे.
३. आठवणी, भा. गो. काणे.
४. आठवणी, केतकर, प्रतिभा, १२ ऑक्टोबर १९३४ व २६ ऑक्टोबर १९३४.

उफाळून वर येई. एकदा एका संभाषणाच्या प्रसंगी एक 'मुंबईकर बॅरिस्टर' (बहुधा बॅ. भास्करराव काणे) लंडनमध्ये त्यांना म्हणाले, की 'हिंदुत्वाच्या एवढ्या गप्पा मारतोस तर हिंदुस्थानात गेल्यावर तू प्रायश्चित्त घेणार का?' तर ते उद्गारले, 'अलबत, घेणारच!' प्रायश्चित्तातील सोवळे-ओवळे किंवा पावित्र्य-अपावित्र्य त्यांना पटत नव्हते; पण प्रायश्चित्त घेऊन हिंदू आपली श्रेष्ठता नि गोऱ्यांची कनिष्ठता जाहीर करतात, हे त्यांना महत्वाचे वाटे. हिंदू समाज या श्रेष्ठतेच्या भावनेमुळे स्वत्व टिकवून ठेवू शकला, बाटला नाही, असे त्यांचे मत होते/ प्रायश्चित्त घेण्याचा त्यांचा विचार ऐकून कोणीतरी विनोदाने म्हणाला, 'अरे! याचा हा डाव आहे. या घोडनवऱ्याला आता वाढलेली मुलगी हिंदुस्थानात कोठली मिळणार? परकरी पोर मिळायची तर तिचा बाप याला भ्रष्ट म्हणणार! म्हणून प्रायश्चित्त घेऊन परकरी पोर मिळवण्याचा याचा विचार चालला आहे!' केतकर या विनोदावर मनसोक्त हसले आणि मग समोर बसलेल्या रेव्हरंड पियर्सन यांच्याकडे अंगुली दाखवून म्हणाले, 'मला मुलगी मिळण्याचा प्रश्न असेल, पण या रेव्हरंडसाहेबांना तर मुलगी मिळण्याचा प्रश्न नाही ना? पण हेही हिंदुस्थानात गेले तेव्हा पवित्र झाले आणि आता इकडे आले तेव्हा अपवित्र झाले, असे माझे मत आहे. यांनीही हिंदुस्थानात गेल्यावर प्रायश्चित्त घेतले पाहिजे!' या उत्तरात विनोदासह त्यांच्या हिंदुत्वाभिमानाचेही बेमालूम मिश्रण झालेले होते.[1]

लंडनमध्ये असताना कुप्रसिद्ध चिरोलसाहेबांची आणि त्यांची एक गमतीदार चकमक उडाली होती. 'इंडियन युनियन सोसायटी'मध्ये 'हिंदुस्थानच्या इतिहासाचा अभ्यास' या विषयावर चिरोलसाहेबांचे एक व्याख्यान झाले. त्या वेळी साहेब-मजकुरांनी इतिहासाचार्य राजवाड्यांचे नाव आपल्या व्याख्यानात काळजीपूर्वक वगळले. केतकर उमरावतीस होते तेव्हाच वऱ्हाडी ब्राम्हणांकडून 'कोब्रा' म्हणून कोकणस्थांची जी टवाळी होई ती त्यांनी अनुभवविली होती, आणि हिंदुस्थानावर राज्य केलेली राज्यकर्त्यांची एक जात म्हणून स्वतःच्या कोकणस्थ जातीचा अभिमान त्यांच्या मनात बळावला होता. त्यातून राजवाड्यांविषयी त्यांना विशेष अभिमान होता; आणि राज-वाड्यांच्या जळजळीत राष्ट्राभिमानाचा संबंध त्यांच्या कोकणस्थपणाशी जोडून त्यांचे नाव राज्यकर्ते टाळतात, असा त्यांचा ग्रह होता. तेव्हा चिरोलसाहेबांच्या व्याख्यानानंतर सभेच्या अध्यक्षांनी जेव्हा चार शब्द सांगण्याची त्यांना विनंती केली तेव्हा ते म्हणाले, 'चिरोल यांनी राजवाडे यांचेच नाव वगळले, हे आश्चर्य होय. राजवाडे जरी कोकणस्थ असले तरी त्यांचे नाव वगळण्यास तेवढेच कारण पुरेसे नाही!' यावर चिरोल मध्येच उठून उद्गारले, की 'मी पारसनिसांचे नाव घेतले आहे. तेदेखील चित्पावन आहेत.' तेव्हा 'पारसनीस चित्पावन नाहीत. आपणांस अधिक काही बोलावयाचे असल्यास उत्तर देण्याची संधी मिळेल तेव्हा बोलावे' असे म्हणून केतकरांनी त्यांना गप्प बसविले!

१. 'मी प्रायश्चित कां घेतले नाही?', यशवंत, मे १९३६.

पुढे उत्तराच्या वेळीं चिरोल यांनी त्या विषयाला बगलच दिली, आणि चहा पिताना, आपल्यासारखे जे वार्ताहर असतात त्यांच्या हातून चुका होणे कसे संभवनीय असते वगैरे विषयावर एक सर्वसाधारण व्याख्यान झोडून वेळ मारून नेली ![1]

अमेरिकेत असताना केतकरांनी जातिसंस्थेच्या संशोधनाला जो प्रारंभ केला त्यामागे देशप्रेमाची आणि ज्ञानशोधनाची बलवान प्रेरणा होती. त्या प्रेरणेमुळे पीएच. डी.साठी प्रबंध लिहून झाल्यावर त्यांचे संशोधन थंडावले नाही. भारतीय समाजाची काही पुनर्घटना करावयाची असेल तर त्या समाजाचे परिपूर्ण ज्ञान करून घेतले पाहिजे, अशी खऱ्या बुद्धिवाद्याला साजेशी त्यांची भूमिका असल्यामुळे 'हिस्टरी ऑफ कास्ट' (प्रथम खंड) हा प्रबंध लिहून झाल्यानंतर जातिसंस्था नि हिंदू समाज यांचे स्वरूप आणखी समजून घेण्यासाठी ते धडपडत राहिले. 'हिस्टरी ऑफ कास्ट'चा प्रथम खंड लिहिताना त्यांची अशी कल्पना होती, कीं त्या खंडात ज्याप्रमाणे त्यांनी तिसऱ्या शतकाचा आणि मनुस्मृतीचा अभ्यास केला त्याप्रमाणे नाना कालांचा व विषयांचा आणखी अभ्यास करावा लागेल आणि मग त्यातून जातिसंस्थेचा समग्र इतिहास दिसू शकेल.[2] पण देशप्रेमाच्या व ज्ञानशोधनाच्या प्रेरणेमुळे पुढील दोन वर्षांत त्यांच्या चिंतनाची गती इतक्या झपाट्याने वाढली, की नाना कालांचा नि विषयांचा खंडशः अभ्यास न करताच जातिसंस्थेच्या इतिहासाची रूपरेषा त्यांच्या प्रज्ञादृष्टीला दिसू लागली. जातिसंस्थेचा इतिहासच नव्हे, तर हिंदू समाजाच्या घटनेचे परिपूर्ण चित्रही त्यांच्या नजरेच्या टप्प्यात आले. हिंदू समाजाची पुनर्घटना हिंदू समाजाच्या शास्त्रीय ज्ञानावर त्यांना आधारावयाची होती. तेव्हा हिंदू समाजाच्या घटनेचे चित्र नजरेच्या टप्प्यात आल्यावर पुनर्घटनेच्या प्रश्नांचा निर्णय ते झपाझप लावू शकले. हिंदू समाजाच्या घटनेसंबंधी आणि पुनर्घटनेसंबंधी आपल्या या साऱ्या कल्पना इंग्लंडमध्ये आल्यावर त्यांनी एका पुस्तकामध्ये प्रकाशित केल्या. 'हिस्टरी ऑफ कास्ट' (द्वितीय खंड) अथवा 'ॲन एसे ऑन हिंदूइझम, इट्स फॉर्मेशन ॲंड फ्यूचर' हे त्या पुस्तकाचे नाव असून ते १९११ साली प्रसिद्ध झाले.

तोवर सर्वसामान्य समजूत अशी होती, की ब्राम्हण-क्षत्रियादी चार वर्णांत फूट होता-होता आजचा हजारो जातींनी चिरफाळलेला हिंदू समाज तयार झाला. आधी हिंदू समाज संयुक्त नि एकजीव होता, पण जातिभेदामुळे नंतर विभक्त नि फुटीर बनला. पण केतकरांनी हिंदू समाजाच्या घटनेचे निदान करताना ही सर्वसामान्य समजूत समूळ झुगारून दिली. सेनार्ट, वैद्य, हॉपकिन्स वगैरे विद्वानांनी वर्णांना जातींचे जनकत्व त्यांच्यापूर्वी नाकारले होते. त्यांचेच सूत्र उचलून केतकरांनी अशी मांडणी केली, की जाती वर्णांमधून उत्पन्न न होता वेगवेगळ्या टोळ्यांमधून उत्पन्न झाल्या. अतिप्राचीन काळी

१ संकीर्ण लेख, पृष्ठ ८; आठवणी, दि. य. फाटक.

२. हिस्टरी ऑफ कास्ट, पृष्ठे ८, ९.

अनेक महावंशांच्या ('रेस'च्या) हजारो टोळ्या हिंदुस्थानात राहात, परस्परांत भांडत आणि स्वयंपूर्ण जीवन जगत. भांडणांमुळे परस्परांत लग्ने न करता त्या आपल्या-आपल्यांत लग्ने करू लागल्या आणि कालांतराने त्यांचे रूपांतर जातींमध्ये झाले. पुढे पावित्र्याच्या फाजील कल्पनांमुळे 'अमकी जात उच्च, अमकी नीच' असा उच्चनीचभाव उत्पन्न झाला; आणि बालविवाहामुळे आईबापांच्या मतावर अवलंबून राहाणारी लग्ने जातीबाहेर होणे अशक्य होऊन जातिभेद घट्ट झाला. केतकरांनी अशी मांडणी केली, पण टोळ्यांखेरीज इतर ठिकाणांहून जाती उत्पन्न झाल्याच नाहीत, असा ऐकांतिक पक्ष त्यांनी घेतला नाही. ब्राम्हणांसारखे मूळचे 'वर्ण' किंवा 'वर्ग' पुढे अनेक जातींत रूपांतर पावले, किंवा संप्रदाय, उद्यम यांच्या जाती बनल्या, हे त्याना मान्य होते. त्यांनी मुख्य भर मात्र या मुद्यावर दिला, की मूळच्या चार वर्णांतून किंवा एकरूप समाजातून आजचा जातिभेदयुक्त फुटीर समाज तयार झाला, ही विकासाची खरी दिशा नसून, मूळच्या हजारो विभक्त टोळ्यांतून हल्लीचा जातिनिबद्ध संयुक्त समाज तयार झाला, ही विकासाची खरी दिशा आहे. "आजचा हिंदू समाज जातींनी कितीही असंघटित झालेला व चिरफाळलेला असला तरी तो पूर्वीपेक्षा नक्की अधिक संघटित आहे" असे त्यांनी टासून सांगितले.[१]

समाजाच्या इतिहासकालीन विकासाची दिशा नक्की झाल्यावर त्याच्या स्वरूपा-संबंधीचे अनेक प्रश्न त्यांना सुलभतेने सोडविता आले. 'वर्ण' जर जातींचे जनक नसतील तर त्यांचा जातींशी संबंध काय, असा प्रश्न ओघाने आला. त्याचे उत्तर त्यांनी असे दिले, की वर्ण म्हणजे एका तऱ्हेचे 'वर्ग' होत. ह्या वर्गांत निरनिराळ्या जातींना त्यांच्या सामाजिक महत्वाप्रमाणे आणि संस्कारांप्रमाणे निरनिराळ्या काळीं निरनिराळे स्थान मिळे.[२] टोळ्यांचे जर जातींत रूपांतर झाले तर हजारो जाती एकमेकींशी निगडित कशा झाल्या, हा प्रश्न पुढे आला. त्याची सोडवणूक त्यांनी अशी केली, की हजारो टोळ्या शतकानुशतके एकमेकींच्या सान्निध्यात राहिल्यामुळे त्यांच्यात काही साधारण कल्पना उत्पन्न झाल्या, सादृश्य वाढले, बंधने उत्पन्न झाली आणि त्यामधून परस्परनिबद्ध समाज निर्माण झाला.[३] हिंदू समाजाच्या निर्मितीची अशी वेगळी उपपत्ती त्यांनी दिल्यामुळे हिंदू समाज व मुसलमान-खिश्चन समाज यांच्यातील भेद स्पष्ट करून सांगणे त्यांना क्रमप्राप्त होते. तो भेद त्यांनी असा सांगितला, की हिंदू समाज हा ब्राम्हण-महारादी अनेक जातींचा नि शीख-महानुभावादी संप्रदायांचा एक 'सामाजिक संघ' आहे, तर खिश्चन-मुसलमान हे पारमार्थिक मतांवर आधारलेले 'संप्रदाय' आहेत. वास्तविक पाहाता हिंदूंच्या 'सामाजिक संघा'त खिश्चन-मुसलमान

१. हिंदुइझम, पृष्ठे १२६,१२७; हिस्टरी ऑफ कास्ट, पृष्ठे ८७, ९४, ९५, १०१ ते १०५, १६,२९ ३१,२८.
२. संकीर्ण लेख, पृष्ठ २९.
३. हिंदुइझम, प्रकरणे ३, ४.

हे संप्रदाय शीख संप्रदायाप्रमाणे सामावण्यास तत्वतः हरकत नसावी. पण ख्रिश्चन मुसलमानांनी, हिंदुस्थानात आल्यावर, जे आपणांत येणार नाहीत त्यांना हिंदू म्हणण्यास सुरवात केली आणि त्यामुळे ख्रिश्चन-मुसलमान हिंदूंपासून अलग पडले.[१] केतकरांनी ख्रिश्चन-मुसलमानांतील व हिंदूंमधील भेद असा अभिनव रीतीने स्पष्ट केल्याने, 'हिंदू कोणास म्हणावे?' या सार्वत्रिक प्रश्नाची उकल करण्याशिवाय त्यांना गत्यंतर राहिले नाही. त्या प्रश्नाबद्दल त्यांनी असे मत मांडले की निश्चित हिंदू असणाऱ्या समाजसमूहांशी ज्यांचे सामाजिक लागेबांधे जडलेले असतील ते समाजसमूह हिंदू समजावे. लागेबांधे घट्ट किंवा क्षीण असणे शक्य असल्याने काही समाजसमूहांचे हिंदुत्व संदिग्ध असणे अगदी शक्य आहे.[२] हिंदू समाजाच्या विकासाची दिशा कळल्यामुळे केतकरांनी अनेक प्रश्नांवर या तऱ्हेने प्रकाश टाकला आणि 'हिंदू समाजाच्या घटने'ची एक अत्यंत अभिनव आणि उद्बोधक अशी उपपत्तीच जन्मास घातली.

हिंदू समाजाच्या घटनेबद्दलच्या कल्पना 'हिंदुइझम'मध्ये केतकरांनी प्रामुख्याने मांडल्या, पण त्या कल्पनांचा काही महत्वाचा अंश आधीच्या 'हिस्टरी ऑफ कास्ट'च्या प्रथम खंडातही येऊन गेला होता. तेव्हा ते दोनही ग्रंथ विचारात घेतले म्हणजे हिंदुत्वविषयक त्यांच्या उपपत्तीचा पूर्ण विस्तार ध्यानात येऊन तिचे चांगले आकलन होऊ शकते. वर त्या दोन ग्रंथांच्या आधारानेच त्या उपपत्तीची रूपरेषा दिली आहे. या उपपत्तीने सामान्य समाजविज्ञानात, आणि विशेषतः हिंदू समाजविज्ञानात, त्यांनी फार मोलाची भर घातली. तीमुळे हिंदू समाजाच्या घटनेचा उलगडा त्यांनी अगदी वेगळ्या पद्धतीने करून दाखविला आणि अभ्यासकांना हिंदू समाजाचे चित्र रूढ कल्पनांपेक्षा पार निराळे दिसू लागले. केतकरांची प्रज्ञा शतकाशतकांच्या प्रदीर्घ कालात समाजसमूहांची जी हालचाल होते ती व्यापक दृष्टीने पाहू शके आणि कोट्यवधी व्यक्तींच्या लागाबांध्यांचा गुंता मूलग्राहीपणे उकलू शके, याची साक्ष या उपपत्तीमुळे ठसठशीतपणे पटली. ज्या कोणाला नंतरच्या कालात भारतीय समाजाचा शास्त्रीय अभ्यास करावासा वाटला किंवा वाटेल, त्याला केतकरांची उपपत्ती डावलून पुढे जाणे अशक्य झाले. म्हणूनच प्रा. इरावतीबाई कर्वे यांनी लिहिले, की "पाश्चात्य पंडितांनी हिंदू समाजाचे जे निरीक्षण केले ते एकांगी व पूर्वग्रहदूषित होते. त्यामुळे भारतीय समाजाचा अभ्यास करू इच्छिणाऱ्याला त्याचा फारसा उपयोग होण्यासारखा नव्हता. पण केतकरांचे ह्या विषयावरील संशोधन असामान्य व मूलग्राही असे आहे."[३]

समाजविज्ञानातून समाजसुधारणेचा कार्यक्रम तयार करावा, ही केतकरांची शास्त्रशुद्ध भूमिका होती. तीमुळे नुसते हिंदू-समाज-घटनेचे ज्ञान मिळवून लगेच समाजसुधारणेच्या

१ हिंदुइझम, प्रकरण ३.
२. हिंदुइझम, पृष्ठे ३१ ते ३३.
३ लोकशिक्षण, मे-जून १९३७.

कार्यक्रमाला हात घालणे त्यांना शक्य झाले नाही. तत्पूर्वी एकंदर जगाच्या विकासाची दिशा कोणती आहे तिचा अंदाज घेणे त्यांना आवश्यक वाटले. कारण सर्व जगात ज्या शक्ती कार्य करीत आहेत आणि परिणामकारक होत आहेत त्यांना विरोधी असा सुधारणेचा कार्यक्रम हाती घेतला तर तो अयशस्वी होईल, हे ते जाणत होते. उलट जगाला विशिष्ट दिशेने नेणाऱ्या शक्ती ओळखून त्यांच्या अनुरोधाने सुधारणेचे कार्य केले तर ते यशस्वी होईल आणि जगद्विकासालाही त्यामुळे चालना मिळेल, अशी त्यांची श्रद्धा होती. तेव्हा जगाच्या विकासाची दिशा शोधावी म्हणून त्यांची जिज्ञासू नि पल्लेदार दृष्टी भ्रमण करू लागली आणि तिने त्या दिशेचा वेध थोड्या काळातच घेतला. १९०९ साली 'हिस्टरी ऑफ कास्ट'चा प्रथम खंड प्रसिद्ध झाला त्या वेळी 'जग एक होणार' हे भवितव्य त्यांनी ओळखले होते.[1] आता 'हिंदुइझम'मध्ये त्या भवितव्याचा आणखी मागोवा घेण्यात १९११ साली ते यशस्वी झाले. जगदैक्याचे भवितव्य शास्त्रपूत दृष्टीने ज्यांनी प्रथम पाहिले अशा अगदी थोड्या द्रष्ट्यांत त्यामुळे ते आपोआपच जाऊन बसले.

'हिंदुइझम'मध्ये जगदैक्याविषयी जी विचारपरंपरा त्यांनी मांडली ती थोडक्यात पुढीलप्रमाणे होती: 'मानवसमूह दूरदूर जाण्याचा जगाच्या इतिहासातील कालखंड संपला आहे आणि कित्येक शतकांपूर्वी हे समूह जवळजवळ येण्यास प्रारंभ झाला आहे. जवळ येणाऱ्या समूहांचे एकस्वरूपी समाज बनविण्याचे कार्य साम्राज्यांनी आणि धर्मसंप्रदायांनी पुष्कळसे केले आणि केवळ सान्निध्याने सादृश्य वाढण्याची जी प्रक्रिया होते तीमुळेही त्या कार्याला हातभार लागला. आता दळणवळणाचे मार्ग आणि साधने वाढत आहेत, त्यामुळे पाश्चात्य नि पौर्वात्य जगात वेगाने देवाणघेवाण चालू आहे. या देवाणघेवाणीत हिंदुस्थानला देण्यासारखे थोडे असून घेण्यासारखे बरेच आहे. देवाणघेवाणीचा मुख्य परिणाम म्हणजे सर्वत्र सारख्या संस्कृतीची वाढ होत जाईल. प्रथमतः शास्त्रीय ज्ञान आणि विचार ही सर्वत्र एक होतील; कारण सत्ये दोन असू शकत नाहीत. सादृश्य वाढत गेले की निखिल जग म्हणजे जणू एक समाज बनेल; त्यात स्थानिक भौतिक परिस्थितीप्रमाणे मात्र काही वैशिष्ट्ये शिल्लक उरतील. हा जो एक समाज बनणार तो एखाद्या धर्मसंप्रदायाची वाढ होत होत बनणे शक्य नाही, किंवा एखादे साम्राज्य जगभर पसरूनही बनणे शक्य नाही. सान्निध्याने किंवा सान्निकर्षाने समान संस्कृतीचा प्रसार होईल आणि त्या पद्धतीने जग एक होईल.'[2]

केतकरांनी एकीकडे हिंदू समाजाच्या घटनेचे ज्ञान मिळविले, दुसरीकडे जगाच्या विकासाची दिशा अशी निश्चित केली आणि मग सुधारणेच्या कार्यक्रमाचा आराखडा तयार केला. जगदैक्याचे भवितव्य अटळ असल्यामुळे, हिंदू समाजाचे रूपांतर तो

१. हिस्टरी ऑफ कास्ट, पृष्ठ ४.

२. हिंदुइझम, प्रकरणे ८, १०

जागतिक समाजात चपखल बसेल अशा रीतीने केले पाहिजे, असा पहिला निर्णय त्यांनी घेतला. नव्या जगात धर्मसंप्रदायांना स्थान नाही; कारण धर्मसंप्रदाय ज्या पारलौकिक कल्पनांवर अधिष्ठित असतात त्या पारलौकिक कल्पना विज्ञानाने वितळत आहेत. शिवाय, धर्मसंप्रदाय ही व्यक्तिगत बाब ठेवून समाजरचनेत त्यांना स्थान देऊ नये, अशी प्रवृत्ती सुप्रतिष्ठित झाली आहे. तेव्हा जागतिक समाजात बसणारे जे समूह तयार व्हावयाचे ते धर्मसंप्रदाय असू शकणार नाहीत, अशी खूणगाठ त्यांनी बांधली. त्यांच्या मते फक्त प्रादेशिक समूह किंवा राष्ट्रेच जागतिक समाजाच्या बांधणीशी सुसंगत होती. तेव्हा हिंदू समाजाचे रूपांतर प्रादेशिक समूहात किंवा 'हिंदी राष्ट्रा'त केले पाहिजे, अशा विचारापर्यंत ते येऊन पोहोचले. आता हिंदू समाज तर जाती नि पंथ यांच्या संघीकरणातून बनलेला होता, प्रादेशिक नव्हता; त्यासाठी त्याचे ते स्वरूप उच्छेदून टाकण्याच्या उपायांकडे ते वळले. हिंदुस्थानात जे अहिंदू राहातात त्यांना हिंदू लोक म्लेंच्छ व अपवित्र समजतात. त्यामुळे हिंदू-अहिंदूंच्या एकीकरणात एक अडसर उत्पन्न होतो. हा अडसर दूर व्हावा म्हणून अहिंदूंना म्लेंच्छ समजणारी पावित्र्यभावना हिंदूंनी टाकली पाहिजे, असे त्यांनी सुचविले. पावित्र्याच्या कल्पना सोडल्या तर जातीजातींतला उच्चनीचभाव कमी होईल, असेही त्यांचे म्हणणे होते. जातिभेद मोडावा यासाठी आंतरजातीय विवाहाचा त्यांनी पुरस्कार केला आणि बालविवाहामुळे आंतरजातीय विवाह अशक्य होत असल्याने प्रौढविवाहाची नि प्रेमविवाहाची बाजू उचलून धरली. धर्मसंप्रदायांचा जोर नष्ट करण्यासाठी धर्मसंप्रदायांविषयी वेदांती नि औपनिषदिक औदार्य वाढवावे, धर्मसंप्रदाय ही व्यक्तिगत बाब समजून त्यांना राजकारणात वा समाजकारणात कोणतेही स्थान देऊ नये, असे प्रतिपादन त्यांनी केले. जातिनिष्ठ व संप्रदायनिष्ठ समाजाच्या गाठी अशा एकीकडे मोडीत असता दुसरीकडे प्रादेशिक समाजाची घटना व्हावी म्हणून त्यांनी दोन उपाय सुचविले. एक उपाय म्हणजे भाषावार प्रांतरचना आणि दुसरा उपाय म्हणजे ॲरिस्टोक्रसीची किंवा उच्च वर्गाची प्रस्थापना. भाषावार प्रांतरचनेमुळे समान संस्कृतीचे समाजसमूह एका राज्यविभागाखाली येतील आणि सामाजिक कायदे करण्याची प्रवृत्ती वाढेल; तसे कायदे होत गेले की जातिविशिष्ट कायदे नष्ट होऊन प्रांतातील सर्व समाजसमूह एकरूप होऊ लागतील, असे भाषावार प्रांतरचनेसंबंधी त्यांचे मत होते. ॲरिस्टोक्रसीची त्यांची कल्पना अशी होती, की समाजाचे नेतृत्व करणारा नि समाजातील कोणत्याही जमातीशी विवाहसंबंध जोडणारा असा हा देशव्यापक वर्ग असावा. असा वर्ग संस्थानिकांतून किंवा ब्राम्हणांतून उत्पन्न होऊ शकेल, असे त्यांना वाटे; आणि या वर्गाच्या अनुकरणातून व त्याच्याशी विवाहबद्ध होण्याच्या इच्छेतून देशभर सादृश्य वाढत राहील, असा त्यांचा कयास होता. सुधारणाविषयक त्यांच्या या सर्व कार्यक्रमाचे सार 'हिंदी राष्ट्रवादाची प्रस्थापना' हे होते असे म्हणता येईल.[१]

१. हिंदुइझम, प्रकरण ९.

हिंदी राष्ट्रवादाची किंवा अखिल भारतीय प्रादेशिक समाजाची प्रस्थापना केतकरांना करावयाची होती हे खरे; पण त्यांचा ‘हिंदी राष्ट्रवाद’ ‘हिंदुत्वाधिष्ठित’ होता हे विसरून चालणार नाही. हिंदुत्वातील जातिभेद नि संप्रदाय त्यांना नको होते; पण जो अखिल भारतीय समाज निर्माण व्हावयाचा त्यात हिंदू संस्कृतीचा अंश प्रमुख असणार, आणि तो तसा असलाच पाहिजे, असे त्यांचे स्पष्ट मत होते.[१] पाश्चात्य किंवा दुसऱ्या कोठल्या संस्कृतीच्या वर्चस्वाचा थर भारतीय समाजावर पसरला तर त्यातून जी एकरूपता उत्पन्न होईल ती क्षीण असणार, उलट हिंदू संस्कृती सर्व भारतीय समाजात पसरली तर उत्पन्न होणारी एकरूपता दृढ असणार, अशी त्यांच्या विचारांची दिशा होती.[२] शिवाय, समाजसमूह एकमेकांच्या अधिकाधिक जवळ आणून—म्हणजे ‘सन्निकर्षा’ने—त्यांच्यात सादृश्य वाढवावयाचे आणि त्यातून हिंदी राष्ट्र नि एक जग उत्पन्न व्हावयाचे, या पद्धतीत हिंदू पद्धतीचा विजय आहे, असा त्यांचा दावा होता. कारण त्यांच्या म्हणण्याप्रमाणे मुसलमान किंवा खिश्चन समाज विशिष्ट पारमार्थिक मत स्वीकारणारा समूह वाढत गेल्याने वाढले, तर हिंदू समाज केवळ सन्निकर्षाने वाढला. हिंदू समाजामध्ये स्वतःच्या पृथक्त्वाची भावना मुसलमान व खिश्चन हिंदुस्थानात येईपर्यंत नव्हती; तो समाज ‘सर्व जग एक आहे’ असे समजे आणि ‘मानवधर्मा’चा आग्रह धरी, अशी केतकरांची मांडणी होती. त्यामुळे एक जगाचे ध्येय आणि तदर्थ घडणारी हिंदी राष्ट्रवादाची प्रस्थापना म्हणजे मूळच्या हिंदू कल्पनेचाच विस्तार होय, असे ते मानीत.[३] थोडक्यात असे म्हणता येईल, की जगदैक्य किंवा हिंदी राष्ट्रवाद ही ध्येये पुरस्कारताना त्यांचा हिंदुत्वाचा अभिमान सुटला नव्हता. हिंदी राष्ट्रवादात हिंदू संस्कृतीचे वर्चस्व त्यांना हवे होते आणि हिंदी राष्ट्रवाद प्रस्थापित करण्यासाठी हिंदू समाजाच्या घटनाविकासात ज्या अनुकूल कल्पना त्यांना आढळल्या त्यांचे उपयोजन करण्याची त्यांची इच्छा होती.

सामाजिक सुधारणांच्या केतकरांच्या एकूण कार्यक्रमात ‘ॲरिस्टोक्रसी’च्या प्रस्थापनेची कल्पना आणि भाषावार प्रांतरचनेची कल्पना/या दोन कल्पना पुष्कळच अभिनव होत्या. /पैकी पहिल्या कल्पनेने अजून मूळ धरलेले नाही; पण दुसऱ्या कल्पनेने फारच झपाट्याने मजल मारली आहे नि केतकरांचे दूरदर्शी योजकत्व स्पष्ट केले आहे. त्यांच्या बाकीच्या कल्पना बहुतेक जुन्याच होत्या; पण जुन्या कल्पनांत नव्यांची भर घालून सर्व कार्यक्रमाला त्यांनी एक नवी संगती दिली होती. शिवाय, जगदैक्याशी सर्व कार्यक्रमाची त्यांनी जी सांगड घातली तीमुळे त्या कार्यक्रमाला एक उंच वैचारिक बैठक प्राप्त झाली. त्या वेळचे राजकारणी पुढारी हिंदी राष्ट्रवादाचा घोष करीत होते, पण त्यात फक्त राजकीय ऐक्यावर ते भर देत होते. केतकरांनी आपल्या हिंदी राष्ट्रवादात

१. ज्ञानकोश, विभाग १, पृष्ठे ३९१, ४२२, ४२४, ४७९ मध्ये हा विचार पुढे अधिक स्पष्टपणे मांडला गेला.

२. इंडियन इकॉनमिक्स, प्रकरण ५ मध्ये हा विचार पुढे अधिक स्पष्टपणे मांडला गेला.

३. हिंदुइझम, प्रकरण ९.

सामाजिक पुनर्घटनेचा नि ऐक्याचा प्रश्न उत्तम रीतीने गोवून दिला आणि हिंदी राष्ट्रवादाची कल्पनाही अधिक व्यापक आणि अधिक भक्कम बनविली.

१९०६ साली अमेरिकेत जाण्यासाठी हिंदुस्थान सोडल्यापासून तो १९१२ साली हिंदुस्थानात परत येईपर्यंत, हिंदू समाजाची घटना नि पुनर्घटना हा मुख्य विषय केतकरांच्या डोक्यात घोळत होता. त्या विषयासंबंधीचे त्यांचे सर्व निष्कर्ष 'हिंदुइझम' या पुस्तकात जणू अर्करूपाने ग्रथित झाले. पुढे हिंदुस्थानात आल्यावर या निष्कर्षांत बरीच वर्षे कोणताही मूलभूत फरक पडला नाही. त्यांत काही भर पडली आणि त्यांच्या तपशिलाचा विस्तार तेवढा झाला. हिंदुस्थानात आल्यावर या निष्कर्षांच्या प्रचाराकडे आणि ते अमलात आणण्याकडे ते धडाडीने वळले. विचारातून आचाराला गती मिळावी, असा त्यांच्या जीवनाचा एकंदर क्रम होता. त्या क्रमापैकी विचारातून आचाराला गती मिळण्याचा भाग 'हिंदुइझम'पासून ठळकपणे चालू झाला, असे म्हणता येईल.

इंग्लंडमध्ये केतकर होते, तेव्हा काही इंग्रज मंडळींनी 'दि नोवडीज क्लब' या नावाचा एक संघ लंडनमध्ये स्थापन केला होता. या संघाचे केतकर सदस्य झाले आणि दोन कार्यवाहांपैकी एक कार्यवाह म्हणूनही त्यांची निवड झाली. या संघात त्यांच्या भावी पत्नी कु. ईडिथ व्हिक्टोरिया कोहन या आपल्या वडिलांबरोबर नि धाकट्या बहिणी-बरोबर येत असल्यामुळे, लंडन सोडण्यापूर्वी काही महिने त्यांच्याशी केतकरांची ओळख झाली. कु. कोहन जर्मन ज्यू होत्या व त्यांचे कुटुंब इंग्लंडात येऊन स्थायिक झाले होते. जेना वगैरे जर्मन विद्यापीठांतून अभ्यास केल्यावर स्कॉटलंडमधील सेंट अँड्रूज विद्यापीठातून त्यांनी पदवी घेतली होती. 'कंपॅरेटिव्ह रिलिजन्स' ('तौलनिक संप्रदाय-विज्ञान') या विषयात त्यांनी 'सन्मानपूर्वक' पदवी मिळवली होती आणि जर्मनबरोबर फ्रेंच व डच या भाषांशी त्यांचा चांगला परिचय होता. भारतीय वाङ्मयावरून त्यांची एक अशी मौजेची समजूत झाली होती, की रामायण, महाभारत व शाकुंतल यांत वर्णन केल्याप्रमाणे तपस्वी ऋषिमुनी अजूनही हिंदुस्थानात आहेत! केतकरांशी परिचय झाल्यावर, कां कोण जाणे, पण त्यांच्याविषयी कु. कोहन यांना गाढ आस्था नि आकर्षण वाटू लागले. केतकरांजवळ पैसा नव्हता, अधिकार नव्हता, पण असामान्य बुद्धिमत्ता व विद्वत्ता होती. तेव्हा त्या बुद्धिमत्तेचा नि विद्वत्तेचा परिणामच कु. कोहन यांच्या सुशिक्षित नि सुसंस्कृत मनावर झाला असावा. 'या प्रज्ञावंत पुरुषाची काळजी आपण वाहिली पाहिजे, त्याच्या विस्कळीत जीवनाची घडी बसविली पाहिजे' अशी संगोपनाची सूक्ष्म प्रवृत्तीही कदाचित त्यांच्या आस्थेला कारण झाली असेल. ते काही असो, केतकरां-बद्दल एकदा मन चलित झाल्यावर त्यांनी काहीशा धिटाईने आपले हृद्गत केतकरांपाशी सूचकपणे बोलून दाखविले आणि तेथून उभयतांच्या प्रेमसंबंधाला सुरवात झाली.[१]

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ८५, ८६, ७३, ७४; 'बाळे कोहिनूर', विद्यासेवक, जून १९२९.

कु. कोहन यांनी प्रेमाचे सूचक बोलणे काढले, पण त्याला लगेच रुकार देण्याच्या मनःस्थितीमध्ये केतकर नव्हते. त्यांचे असे मत होते, की हिंदू पुरुषांनी युरोपीय स्त्रीशी लग्न करून कौटुंबिक दुःखाचा व सामाजिक बहिष्काराचा धोका व्यर्थ पतकरू नये. त्यांचे उमरावतीचे बालमित्र श्री. भास्करराव काणे लंडनला एका इंग्रज मुलीशी तेव्हा विशेष संघटन ठेवीत. पुढे त्या मुलीबरोबर श्री. काण्यांचे लग्न झाले आणि तिने आता त्यांची वंशवेलही विस्तारली आहे. पण आपल्या या हिंदू, ब्राम्हण नि कोकणस्थ मित्राने इंग्रज मुलीबरोबर मैत्री ठेवावी, हे केतकरांना नामंजूर होते. त्यांनी श्री. काण्यांच्या वडिलांना उमरावतीस पत्र लिहून धोक्याचा इषारा दिला होता![1] "भारतवर्षी पुन्हा जाउनी वसती करणे ज्यास। गुंतु नये कधि तेणे देऊ मन येथिल मोहास" हा त्यांचा विचार अमेरिकेतच ठरलेला होता.[2] तेव्हा कु. कोहन यांनी बोलणे काढल्यावर त्यांनी प्रारंभी आपली प्रतिकूलता दर्शविली. 'आम्ही हिंदू म्हणजे "पवित्र प्राणी" आहोत, त्यामुळे आपल्या विवाहाला सामाजिक मान्यता मिळणार नाही' हे त्यांनी कु. कोहन यांना स्पष्ट करून सांगितले.

"जाणसि सत्प्रेमाचे अंतिम फळ जे विवाह इष्ट
शक्य न घडणे मधुर बालिके, पूर्वी केले स्पष्ट ॥"

असे त्यांचे म्हणणे होते. एवढेच काय, पण आपल्या स्पष्टवक्त्या उघड्या स्वभावास अनुसरून त्यांनी हेही सांगून टाकले, की 'माझे हृदय तुझ्यावर अत्युत्कट प्रेम करू शकत नाही!' त्यांनी कुमारवयात एकदा 'एन'वर अत्युत्कट प्रेम केले होते, मुंबईला नि अमेरिकेत स्त्रीसान्निध्याचे अनेक प्रसंग अनुभविले होते आणि आता त्यांचे वयही तिशीला येऊन ठेपले होते. आता एखाद्या प्रौढ कुमारीने प्रेम व्यक्त करताच त्यांचे जीवनसर्वस्व उचंबळून येणे कठीण होते. शिवाय कर्तृत्वाच्या अन् देशसेवेच्या मोठमोठ्या आकांक्षा दृष्टीसमोर तळपत असता स्त्रीप्रेमात स्वत्व बुडवून टाकणे त्यांच्यासारख्या महत्वाकांक्षी पुरुषाच्या स्वभावाविरुद्ध होते. तेव्हा कु. कोहन यांना ते मोकळ्या मनाने म्हणाले, की

"तव सान्निध्ये होतो चित्ती मजला बहु आल्हाद
परि मम सर्व न हृत्परमाणू धावति तुज भेटाया.
अस्तित्वी तव मम अस्तित्वा विसरुनि जाई नच मी
तुज सुख देणे आयुष्याचा एक हेतु नच वाटे."

केतकरांनी विवाहाचा नि अंशतः प्रेमाचा असा नकार दिला, तरी कु. कोहन यांचे

१. आठवणी, भा. गो. काणे.
२. 'उत्तर अमेरिकेतील वसंतकाल'.

प्रेम व प्रयत्न तेवढ्याने थांबली नाहीत. उदार पुरुषाच्या हृदयाला पाझर फोडणारी एकमार्गी प्रेमाची भाषा त्यांनी सुरू केली./ त्या म्हणाल्या, की

"प्रेम नको मज, नसे पात्रता मिळवाया त्वत्प्रेमा;
सख्य असो दे, असो मित्रता, करील ती संतुष्ट !
प्रेम नको करु मजवरि, परि मज तुजवरि करण्या प्रेम—
असो अनुज्ञा"...!

/या भाषेने मात्र केतकरांचे मन विचलित झाले/आणि ते स्वतःशी उद्गारले, की

"प्रेम न, मार्मिकता प्रेमाची अनिच्छ मज आकर्षी."
..."स्तंभित केल्या हृदयाते तू अबला प्रेमबलाने—
केवळ ओढुनि नेशी; माझे दुर्बलत्व दावीशी."

/आपल्या विचलित झालेल्या मनाचा थांग मात्र त्यांनी कु. कोहन यांना लागू दिला नाही. प्रेमाचा स्वीकार करावा का? विवाहाचे आश्वासन द्यावे का?—वगैरे विचारांवर त्यांचे मन हिंदोळत होते. त्यांनी आपल्या आत्मनिवेदनात म्हटले आहे, की "मी लंडन सोडले, त्या वेळेस आमचे लग्नासंबंधाने काही बोलणे झाले नाही. एवढेच नव्हे, तर एकमेकांची अंतःकरणे एकमेकांस पुरी कळलीदेखील नाहीत." त्यांच्या त्या म्हणण्यात गर्भितार्थ आणि अनुक्त आशय पुष्कळच होता.[१]

१९१२ च्या सप्टेंबरमध्ये त्यांनी इंग्लंड सोडले, तेव्हा कु. कोहन त्यांना निरोप देण्यासाठी उपस्थित होत्या. निरोपाच्या वेळी कु. कोहन यांना वियोगाचे तीव्र दुःख झाले आणि ते दुःख त्या लपवून ठेवू शकल्या नाहीत. त्यांची दुःखपूर्ण चर्या केतकरांच्या दृष्टीस पडली आणि केतकरांच्या हृदयावरही आघात झाला. ते हिंदुस्थानकडे परतले, पण घायाळ होऊन परतले ! वाटेत 'जिनोआ' या ठिकाणी 'बाळे कोहिनूर' नावाची कविता त्यांनी कु. कोहन यांना उद्देशून लिहिली. ४ ऑक्टोबर या दिवशी ते हिंदुस्थानात उतरले तेव्हा त्यांच्या मनाचा एक अंश इंग्लंडातच राहिलेला होता.[२]/

१. 'बाळे कोहिनूर', विद्यासेवक, जून १९२९: ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ८५,८६.
२. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ८६; 'बाळे कोहिनूर', विद्यासेवक, जून १९२९; 'मी व माझे टीकाकार', ज्योत्स्ना, जुलै १९३६.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २५६११ विः चरित्र
क्रमांक ८२२ नोंः दिः २५।७१

# भटक्या राष्ट्रगुरू

[१९१२ ते १५]

१९१२ च्या ऑक्टोबरमध्ये हिंदुस्थानात परतल्यापासून केतकरांच्या जीवनामधील प्रत्यक्ष कार्याच्या कालखंडाला खराखुरा प्रारंभ झाला. त्या काळी अनेक हिंदी लोक पाश्चात्य पदवी संपादून हिंदुस्थानात येत आणि बड्या पगाराची नोकरी मिळवून सुखाने आयुष्य कंठीत. जनतेपासून दूर राहावे आणि ऐटीत अधिकाराचा उपभोग घ्यावा, असे त्यांचे धोरण असे. पण या परिपाठाला रँग्लर अप्पासाहेब परांजपे यांनी जसे त्यागपूर्वक बाजूला सारले तसेच केतकरांनीही सारले. "म्या विक्षिप्ते आज सुखाचा मार्ग निराळा धरिला!" असे उद्गार उमरावतीची शाळा सोडून मुंबईला महाविद्यालयीन शिक्षणासाठी आल्यावर त्यांनी काढले होते.[1] त्याच उद्गारांप्रमाणे आताही त्यांचे आचरण घडत राहिले. त्यांनी पैशाचा, अधिकाराचा आणि सुखाचा जीवनक्रम तर बाजूला टाकलाच, पण अनेक राष्ट्रसेवकांना तात्पुरत्या लोकप्रियतेचा जो अनावर मोह असतो तोही त्यांनी सोडून दिला. अमेरिकेतच याविषयी त्यांनी विचार करून ठेवला होता आणि असा निर्णय घेतला होता, की

"लोकप्रियता निकट अंतिमा या भेदा जाणोन
चिरप्रियत्वा आकांक्षोनी नियमी आयुष्याते."
"अव्यक्ता सत्या उद्गारुनि, लोकी वागति भाव
ज्यांते व्यक्त कराया कचरे मन सामान्याचे त्या—
व्यक्त करोनी, तैसे शोधुनि कारण जे दुःखाचे—
नष्ट कराया प्रवृत्त होवो मम भावी आयुष्य."[2]

१. 'प्रथमकल्लोल', विद्यासेवक, फेब्रुवारी १९२६.
२. 'आनंदकालीन दुःखोद्गार व तज्जन्य विचार', विद्यासेवक, जून १९२६.

या निर्णयाप्रमाणे तात्पुरत्या लोकप्रियतेकडे पाठ फिरवून, 'अव्यक्त सत्य' उलगडून सांगावे, दुःखाचे कारण शोधावे, त्या कारणाचे निराकरण करण्यासाठी झटावे, या वाटांनी ते जाऊ लागले. त्यांनी कोणताही पक्ष स्वीकारला नाही, तर सर्व पक्षोपपक्षांपेक्षा उंच भूमिका घेऊन ते वावरू लागले. सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक वगैरे सर्व राष्ट्रीय अंगे सुधारावीत आणि राष्ट्राच्या कोटिचक्र गाड्याला गती मिळावी, म्हणून लोकांना ज्ञानी बनविण्याचा खटाटोप त्यांनी चालू केला. त्यांनी चळवळी करणाऱ्यांना आणि त्यांच्या अनुयायांना, विद्वानांना आणि सामान्य जनांना निर्भीड शब्दांचे फटकारे लगावून प्रमादांपासून परावृत्त केले आणि त्यांच्यापुढे प्रगतीची नवीनवी क्षितिजे उघडून ठेवली. थोडक्यात म्हणजे, राष्ट्रगुरूच्या थोर भूमिकेवरून त्यांची उक्ती नि कृती घडू लागली. १९१५ साली प्रसिद्ध झालेल्या 'संकीर्ण लेखां'च्या प्रस्तावनेत आपल्या भूमिकेचा काही आविष्कार पर्यायाने त्यांनी पुढीलप्रमाणे केला आहे. ते म्हणतात :

"राजकीय अगर सामाजिक सुधारणेविषयी जे लोक काही तरी कार्य करू इच्छितात, तथापी राजकीय अगर सामाजिक विषयांचे सोपपत्तिक ज्ञान मिळविण्यास ज्यांस अवकाश नसतो,...ज्यांच्या अंगी प्रयत्न करण्याची इच्छा आहे व कर्तेपणा आहे अशा लोकांस यांपैकी काही लेख उपयोगी पडतील."..."कोणत्याही पक्षाचे समर्थन करण्याची जबाबदारी मजवर नाही. मी सर्व पक्षांच्या लोकांचे व त्यांनी प्रसिद्ध केलेल्या मतांचे दोषाविष्करण निःशंकपणे करीन."..."लोकांस अप्रिय होणाऱ्या गोष्टी स्पष्टपणे निर्देशिल्या आहेत व काही ठिकाणी पूर्वगत लोकांच्या कार्याचे निर्दयपणे परीक्षण केले आहे. व हे परीक्षण करिताना मधाचे बोट अगर वारणीस मात्र खर्चिले नाही. सुधारक, जुना शास्त्रीवर्ग, सरकार, सामान्यजन, आपला पुढाऱ्यांचा वर्ग या सर्वांसच थोडाबहुत प्रसाद मिळाला आहे."..."राष्ट्रघटनेस व राष्ट्रबलसंवर्धनास जे ज्ञान उपयोगी पडेल त्याचा थोडा अंश या लेखांत आला आहे."..."माझे लेख विशेषतः शिक्षणात्मक आहेत."..."माझे काम शिक्षकाचे आहे."

राष्ट्रगुरूची भूमिका बठविण्याच्या मनोदयामुळे त्यांनी बडोदे संस्थानातील नोकरी पतकरली नाही. सयाजीराव महाराजांनी अमेरिकेतील शिक्षणासाठी त्यांना शिष्यवृत्ती दिलेली असल्यामुळे शिक्षण संपल्यावर बडोदे संस्थानात नोकरी करण्याचे बंधन त्यांच्यावर होते. पण इंग्रजी भाषेत प्राध्यापकी करण्यास आपण नाखूष आहोत, या सबबीवर त्या बंधनातून सयाजीरावांकडून स्वतःला त्यांनी सोडवून घेतले.[1] पुढे सुमारे नऊ महिने विश्रांतीमध्ये व भावी बेत आखण्यामध्ये घालविल्यावर त्यांना कळून चुकले, की आकांक्षा कितीही भव्य असल्या तरी पोटासाठी काहीतरी उद्योग केल्याशिवाय गत्यंतर नव्हते. तेव्हा जेथे राष्ट्रीय शिक्षणाचे कार्य चालू ठेवण्याची शक्यता होती, अशी कलकत्ता विद्यापीठातील प्राध्यापकाची नोकरी त्यांनी स्वीकारली. १ जुलै १९१३ पासून

१. डॉ. केतकरांचें सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ९; 'श्रीमन्महाराज...यांस...प्रेमोपहार', विद्यासेवक, डिसेंबर १९३५.

१ मे १९१४ पर्यंत कलकत्ता विद्यापीठात पदवीधर विद्यार्थ्यांना ते राजकारण, व अर्थशास्त्र शिकवीत होते.[१] पण 'अव्यक्त सत्य' उद्गारून दाखवण्याच्या बाण्यामुळे आणि धृष्ट स्वभावामुळे त्यांची ती नोकरी त्यानंतर टिकली नाही.

कलकत्त्यास असताना 'इंडियन इकॉनमिक्स' हे पुस्तक त्यांनी लिहिले आणि त्या पुस्तकातील एका उताऱ्यानेच त्यांच्या नोकरीवर गदा आणली. हे पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर त्याची एक प्रत घेऊन ती भेट देण्यासाठी म्हणून ते उपकुलगुरू सर आशुतोष मुकर्जी यांच्याकडे गेले. पुस्तकाच्या भेटीचा स्वीकार करून सर मुकर्जी त्यांच्याशी बोलत बोलत पुस्तक चाळू लागले, तो त्यांच्या दृष्टीला पुढील मजकूर पडला: "दहा ते पन्नासच्या दरम्यान वय असणाऱ्या स्त्रिया कलकत्त्यात १८७ हजार असून त्यांच्यात वेश्यांचे प्रमाण अधिक आहे. वेश्यांची संख्या ५० हजारांपासून १०० हजारांपर्यंत असावी, असे विविध अंदाज बांधले गेलेले आहेत. वेश्येची व्याख्या करण्यात अडचण असल्यामुळे विविध अंदाजांत एवढी तफावत बहुधा पडली असावी. वरून पानविडी विकण्याचे प्रामाणिक कर्म करताना दिसणाऱ्या बऱ्याच बायका आपले जीवन चांगल्या मार्गाने घालवीत नाहीत; आणि ज्यांना समाजोपयोगी उद्यम म्हणता येईल अशा उद्यमांत काम करणाऱ्या कित्येक स्त्रियाही तशाच प्रकारच्या असतात, असे मला समजले आहे." कलकत्त्यातील सुमारे १०० हजार बंगाली स्त्रियांना वेश्या म्हणणारा हा मजकूर बघून सर मुकर्जी यांचे मस्तक साहजिकच भडकले आणि ते केतकरांची हजेरी घेऊ लागले. तेव्हा केतकर हळूच त्यांना म्हणाले, की 'बाबूजी, ही मात्रा कडू आहे हे खरे. पण असे भडकून कसे चालेल? रोगनिवारणासाठी ती मात्रा उगाळण्यावाचून दुसरा मार्ग नाही!' पण केतकरांचा युक्तिवाद ऐकण्यास मुकर्जीबाबू तयार नव्हते. ते आवेशाने ओरडले, की 'बंगाली स्त्रियांची शालीनता आणि नीतिमत्ता मापण्यास सच्छील आर्य हृदयाची व आर्य संस्कृतीची आवश्यकता आहे. स्त्रियांच्या धंद्यांच्या आकडेवारीवरून स्त्रीनीतिमत्तेचे माप घेणाऱ्यांच्या उथळ नि कुटिल बुद्धीला आम्ही कवडीचीही किंमत देणार नाही!' या गर्जनेनंतर केतकरांना श्री. मुकर्जी यांचे घर सोडावे लागले आणि विद्यापीठातील नोकरीही सोडावी लागली. सर आशुतोष मुकर्जी यांनी आपल्याविरुद्ध "लबाडी केली" म्हणून आपली नोकरी गेली, असा त्यांचा समज होता.[२]

'इंडियन इकॉनमिक्स' या पुस्तकात केतकरांनी हिंदुस्थानच्या आर्थिक प्रगतीविषयी आपले विचार प्रकट केले. हिंदुस्थानच्या आर्थिक प्रगतीचा विचार करताना, पाश्चात्यांनी जे औपपत्तिक विचार अर्थशास्त्रात मांडले आहेत तेवढ्यांवर विसंबून चालणार नाही;

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ११.
२. महाराष्ट्र, ५ मे १९३७ व ८ सप्टेंबर १९१५, या. श्री. अणे; 'इंडियन इकॉनमिक्स, पृष्ठ २२; ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ १३.

त्यांच्या जोडीला येथील विशिष्ट परिस्थिती नीट लक्षात घेतली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी स्वीकारली. त्या भूमिकेस अनुसरून प्रारंभी त्यांनी अनेक आर्थिकेतर गोष्टींची पाहाणी केली आणि त्यांचा आर्थिक प्रगतीवर कसकसा परिणाम होतो त्याचा शोध घेतला. आपल्या पाहाणीत जातिभेद, पारलौकिकाचे आकर्षण, आयातीच्या धोरणाने झालेली रेल्वेरचना, इंग्रजी भाषेचे वर्चस्व, अल्पसंख्य जमाती वगैरे गोष्टी त्यांनी समाविष्ट केल्या आणि हिंदुस्थानच्या आर्थिक विकासाला त्यांच्यामुळे पायबंद पडतो, हे मोठ्या सूक्ष्म नि मार्मिक युक्तिवादांनी सिद्ध केले. यानंतर ते आर्थिक सुधारणांकडे वळले आणि त्यांत आर्थिक प्रगतीसाठी आर्थिकेतर क्षेत्रांत कोणकोणत्या सुधारणा करावयास हव्यात त्याच प्रामुख्याने त्यांनी सांगितल्या. ' हिंदुइझम 'मध्ये हिंदी राष्ट्रवादाच्या निर्मितीसाठी ज्या सुधारणा त्यांनी सुचविल्या होत्या त्यांचीच पुनरुक्ती त्यांनी या ठिकाणी केली. फक्त ती करताना त्यांचे आर्थिक महत्व अधिक विशद करून सांगितले. त्या सर्व सुधारणा हिंदुस्थानात एकस्वरूपी समाज निर्माण करण्याच्या उद्दिष्टासाठी त्यांनी ' हिंदुइझम 'मध्ये सांगितल्या होत्या आणि एकस्वरूपी समाजात मोठ्या प्रमाणावरील उत्पादन, श्रम-शक्तीचे चलनवलन, उच्च राहाणीची निर्मिती वगैरे आर्थिक प्रक्रिया वेगाने होऊ शकतात असा त्यांचा सिद्धांत होता. तेव्हा त्या सुधारणांचे आर्थिक महत्व ते सहजच विशद करू शकले. ज्या इतर सुधारणा त्यांनी सुचविल्या त्यांमध्ये, लोकांत आर्थिक उन्नतीसाठी उत्साह उत्पन्न व्हावा म्हणून पारलौकिकावरील विश्वास नष्ट करावा नि ऐहिक उत्कर्ष हेच जीवितध्येय प्रस्थापित करावे यांसारख्या कल्पना मांडल्या होत्या. शिवाय, राष्ट्रीयीकरण केल्यास ते परकी भांडवलाच्या धंद्यांचेच करावे, लोकसत्ता स्थापन होण्यापूर्वी राष्ट्रीयीकरणाला प्रारंभ झाल्यास परसत्ता बळकट होईल म्हणून त्याचा तावडतोब आग्रह धरू नये, शिक्षणाचा, दारूबंदीचा वगैरे प्रसार करावा, या प्रकारच्या सूचनाही त्यांनी केल्या.

या सर्व लेखनात आर्थिकेतर गोष्टींचा आर्थिक गोष्टींवरील परिणाम सांगताना त्यांनी थोडीफार अतिशयोक्ती केली. आर्थिक प्रगतीसाठी जातिभेद, सोवळ्याच्या कल्पना, पडदा वगैरे गोष्टी नष्ट कराव्या हे सांगण्यात त्यांच्या हातून कार्यकारणभावाची काही उलटापालट झाली; कारण जातिभेदाच्या नाशाने आर्थिक प्रगती साध्य होण्याऐवजी आर्थिक प्रगतीने समाज ढवळला जाऊन जातिभेद नष्ट व्हावा हे अधिक नैसर्गिक होते. आर्थिकेतर गोष्टींमधील सुधारणा सुचविण्याच्या भरात खुद्द आर्थिक क्षेत्रातील सुधारणां-कडेही त्यांचे दुर्लक्ष झाले. पण असे काही दोष नि उणीवा या लेखनात राहिल्या तरी ते एकंदरीत अतिशय उद्बोधक झाले. आर्थिक प्रगतीवर परिणाम करणाऱ्या आर्थिकेतर गोष्टींवर त्या लिखाणाने नवा नी स्पष्ट प्रकाश पडला. आर्थिक प्रगती साधू पाहाणाराने केवळ आर्थिक सुधारणांवर लक्ष न खिळवता अन्य क्षेत्रांतील सुधारणांचाही व्यापकपणे विचार केला पाहिजे, हे त्या लिखाणाने दाखवून दिले.—आणि सामाजिक, मानसिक इत्यादी क्षेत्रांतील सुधारणांना आर्थिक अंग असू शकते हे उघड केले. प्रा. प. म. लिमयांनी

म्हटल्याप्रमाणे, त्यांचे हे अर्थशास्त्रविषयक लेखन ‘पाश्चात्य अर्थशास्त्रात रुळलेल्या अभ्यासकाला नवी दृष्टी देण्याच्या योग्यतेचे आहे’ यात शंका नाही.[१]

कलकत्त्याला असताना केतकरांनी ‘हिंदू लॉ, अँड दि मेथड्स अँड प्रिन्सिपल्स ऑफ दि हिस्टॉरिकल स्टडी देअरऑफ’ या नांवाचे दुसरे एक पुस्तक लिहून प्रसिद्ध केले. त्यामध्ये ‘कायदा’ आणि स्मृतिकारांनी उपदेशिलेला ‘धर्म’ यांच्यातील भेद त्यांनी स्पष्ट करून सांगितला आणि हिंदू कायद्याच्या इतिहासाची रूपरेषा सिद्ध करून ठेवली. कलकत्ता विद्यापीठामध्ये चालू असलेल्या टागोर-व्याख्यानमालेत व्याख्यात्याची जागा मिळावी, या उद्देशाने हे पुस्तक त्यांनी लिहिले होते; पण कलकत्त्याची त्यांची नोकरीच मुळात संपल्याने ह्या पुस्तकाचा तो उद्देश सफल झाला नाही.[२]

‘अव्यक्त सत्य’ उद्गारून दाखविण्याच्या बाण्यामुळे केतकरांची कलकत्त्याची नोकरी सुटली; पण ‘अव्यक्त सत्य’ उद्गारून आपले राष्ट्रीय शिक्षकाचे कर्तव्य बजावण्याचे काम त्यांनी थांबविले नाही. कलकत्त्यास असताना आणि कलकत्ता सोडल्यावर, विविध विषयांवरील त्यांचे लेखन चालू होते आणि राष्ट्राच्या विविध अंगांना ते चालना देत होते. ‘इंडियन इकॉनमिक्स’ व ‘हिंदू लॉ’ या पुस्तकांत त्यांनी अर्थकारण व समाजनियमन या दोन क्षेत्रांतील विचारांना चालना दिली. त्याखेरीज त्यांनी जे अनेक स्फुट लेख त्या दोन-अडीच वर्षांत लिहिले त्यावरून किती तऱ्हांनी त्यांचे हे काम चालू होते त्याची कल्पना येऊ शकते. त्यांच्या काही लेखांचे मथळे पुढीलप्रमाणे होते: ‘जातिभेद व त्यासंबंधाचे राष्ट्रीय धोरण’, ‘जनता आणि पुढारी यांचा अन्योन्याश्रय’, ‘पाश्चिमात्य विवाहपद्धती’, ‘हिंदुत्वाची पुनर्घटना’, ‘प्रेम, विवाह नि अनुनय यांवरील टिपणे’ (इंग्रजी), ‘समाजशास्त्र आणि धर्मशास्त्र यांचा परस्परसंबंध’, ‘आपली दुकाने व त्यांची सुधारणा’, ‘टपालविक्रीचा धंदा’, ‘नगरसंवर्धन आणि नगरसौंदर्य’, ‘विक्री कशी करावी?’, ‘पोलिटिकल क्लब कसा असावा?’, ‘सनदशीर चळवळीची मीमांसा’, ‘काव्यग्रंथांचे महत्वमापन’, ‘तौलनिक पद्धती आणि मराठी गीर्वाण’, ‘साहित्यशास्त्र आणि त्याचे भवितव्य’, ‘फोकस्टोन येथील सुंदरीप्रदर्शन’ वगैरे वगैरे वगैरे. परदेशात मिळविलेला अनुभव आणि डोक्यात साठलेले विचार हे देशप्रेमाच्या ऊर्मीने जणू या वेळी ते फवारून बाहेर टाकीत होते. त्यांच्या या लेखनाने कोणतीही मूर्त हालचाल उत्पन्न झाली नाही, पण विचाराच्या सृष्टीत एक अमूर्त खळबळ नक्की उत्पन्न झाली. निरनिराळ्या क्षेत्रांत वावरणाऱ्या जिज्ञासू माणसांना काहीतरी नवदर्शन घडू लागले आणि आपल्या जुन्या कल्पनांना धक्के बसल्यामुळे ती माणसे थोडीशी गांगरूनही गेली. या वेळच्या केतकरांच्या लेखनाविषयी प्रा. श्री. के. क्षीरसागरांनी म्हटले आहे, की “केतकरांचे या सुमाराचे लेख जहाल आहेत;...पण त्या वेळच्या लोकांस ते नुसते

१. लोकशिक्षण, मे-जून १९३७.
२. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे ५–६.

तिखटच वाटले असे नव्हे, तर भांबावून सोडणारे वाटले. कारण त्या वेळच्या सुशिक्षितांच्या रूढ कल्पनांस त्या लेखांनी फार मोठे धक्के दिले."..."अशा प्रकारचे लिखाण येवढ्याशा वयात महाराष्ट्रात दुसऱ्या कोणीही लिहिले नाही व इतर राष्ट्रात ज्या थोड्या लोकांनी लिहिले ते जगद्विख्यात होऊन गेले."[1]

केतकरांची 'जातिभेद व त्यासंबंधाचे राष्ट्रीय धोरण' ही लेखमाला 'केसरी'त १९१३ साली प्रसिद्ध झाली आणि तीवरून श्री. धर्मानंद कोसंबींशी त्यांची चांगलीच झोंबी जुंपली. या लेखमालेत आपल्या इंग्रजी पुस्तकांतील कल्पनाच त्यांनी पुन्हा मांडल्या होत्या; पण गौतम बुद्धाविषयी मात्र काही नवी नि बोचरी विधाने केली होती. गौतम बुद्धाने सोवळ्याओवळ्याच्या कल्पना फार प्रसृत केल्या आणि जातिभेद मोडण्याऐवजी तो वाढवला, असे त्यांचे म्हणणे होते. शिवाय त्यांनी अशा तऱ्हेची वाक्ये लिहिली की "तो स्वतः मांसाहारी होता; व पुढे तो मृत्यू पावला त्याचे कारण त्याने एके दिवशी डुकराचे मांस सपाटून खाल्ल्यामुळे त्यास अपचन होऊन अतिसार झाला. अहिंसा परमो धर्मः हे तत्व जैनांचे आहे, बौद्धांचे नव्हे. सध्याचे बौद्ध मांसाहारीच आहेत." धर्मानंदांना हे लिखाण खोडसाळ व निराधार वाटून त्यांनी त्यावर टीका केली आणि दोघांचा वाद चालू झाला. दोघांनीही आपल्या विद्वत्तेस साजेसा वाद चालू केला असता, तर बरे झाले असते; पण केतकरांचे लिखाण काहीसे जिव्हारी लागून व बहुधा केतकरांच्या खोल व्यासंगाचा अंदाज न लागून धर्मानंदांनी प्रथमतः केतकरांच्या अमेरिकन पदवीची टर उडविली: तेव्हा केतकरांनीही धर्मानंदांच्या टीकेची चिरफाड करून त्यांना उलट अहेर केला. अशा तऱ्हेने वादाला भलतेच तोंड लागले आणि दोघांनीही एकमेकाला ओरबडून वादाचे रूपांतर वितंडवादात करून टाकले! हा वाद कसा का होईना, केतकरांच्या लेखनामुळे त्या काळात विचारक्षेत्रामध्ये कशी खळबळ माजत होती, त्याचे प्रत्यंतर त्यावरून चांगले पटते.[2]

'उषा' या नियतकालिकात १९१४ च्या सप्टेंबरमध्ये त्यांनी 'धर्मनियम आणि ब्राम्हणांची परंपरागत विद्या' यावर एक लेख लिहिला आणि त्यामुळेही काही वादंग माजले. त्या लेखात अशा अर्थाचे एक विधान त्यांनी केले होते, की शंकराचार्य अर्वाचीन विद्या शिकलेले असावे. त्यावर 'वऱ्हाडसमाचार'मधील एका लेखकाने टीका केली, आणि केतकरांची शंकराचार्य होण्याबद्दल धडपड आहे असा केतकरांच्या मनातील गूढार्थ शोधून काढला! त्याने केतकरांना 'वेङ्कक' म्हटले आणि वर असेही लिहिले, की "इकडे मॅट्रिकदेखील न झाल्याने तीन वर्षांत अमेरिकेस जाऊन पीएच. डी. झालेले असे हे आचार्य वऱ्हाड प्रांताला लाभले आहेत!" या लेखकाने उघड उघड सत्यापलाप केला असल्याने केतकरांना त्याला न्यायालयात खेचता आले असते.

१. प्रतिभा, जुलै १९३७.
२. संकीर्ण लेख, पृष्ठे ३३ ते ३७, ५२ ते ६४.

पण लेख लेखकाच्या नावावर प्रसिद्ध झालेला नव्हता, 'वऱ्हाडसमाचार'चे संपादक श्री. ना. खं. फडके हे केतकरांचे आप्त होते आणि त्यांनी तो लेख न बघताच छापला होता. त्यामुळे केतकरांनी फिर्याद केली असती तर लेखक बाजूला राहून संपादक फाशी गेला असता. तेव्हा केतकरांनी त्या लेखकाला फक्त एक पत्र पाठविले आणि "वऱ्हाड-समाचारात मला जी दीड कॉलम जाहिरात मिळाली तीबद्दल मी संपादकाचा ऋणी आहे; पण लेखकाने सही न करण्याचा नामर्दपणा कां करावा?" असा खोचक सवाल त्याला विचारला. पुढे हे प्रकरण उभय पक्षांनी मिटते घेतले.[१]

या काळच्या लिखाणात केतकरांची जीवनमूल्ये केवळ ऐहिकातच पूर्णपणे स्थिर झालेली दिसतात. बालपणापासून ईश्वराच्या अस्तित्वाविषयी त्यांना संशय होता आणि त्यांचा तो संशय पुढे कधीही नष्ट झाला नव्हता. अमेरिकेत असताना 'हृदयाची तळमळ'[२] या नावाची एक कविता १९०९ साली त्यांनी लिहिली होती आणि तीमध्ये आपला संशय त्यांनी स्पष्टपणे बोलून दाखविला होता. त्या वेळी ईश्वरावर किंवा पुनर्जन्म, स्वर्ग, नरक, जीवात्मा, मोक्ष इत्यादी कोणत्याही पारमार्थिक गोष्टीवर त्यांचा विश्वास नव्हता; दुःख पापमूलक आहे असे त्यांना वाटत नव्हते; आणि सुख पुण्यमूलक आहे याविषयी त्यांची खात्री नव्हती. एक तऱ्हेच्या पारमार्थिक अश्रद्धेच्या पोकळीत ते वावरत होते. पारमार्थिकावर तर त्यांची श्रद्धा नव्हतीच, पण एहिकावरही त्यांची श्रद्धा पक्केपणी स्थिरावली नव्हती. देशभक्त नि ध्येयप्रवण मनात जी आत्म-समर्पणाची स्वाभाविक इच्छा असते ती त्यांच्या मनात उसळ्या घेत होती; परंतू श्रद्धा कोठेच स्थिरावलेली नसल्यामुळे ती आत्मसमर्पणाची इच्छा त्यांना तृप्त करता येत नव्हती. त्यांनी म्हटले, की

> **" स्वकीय कर्माते पिंडाते समर्पिण्याते व्यक्ती—**
> **लाभो ऐशी इच्छा वागे; खळबळ करि ती चित्ती. "**
> **" आदरबुद्धी नष्ट न झाली स्थाणु तसे हे चित्त,**
> **इतरां आदर दावायाते यत्ने शोधी पात्र. "**

भक्तिप्रेमाच्या समाधीत रंगलेला नि टाळमृदंगांच्या निनादात नादावलेला एखादा भाविक शूद्र त्यांच्या नजरेसमोर उभा राही आणि त्याचा त्यांना हेवा वाटे. त्या शूद्राप्रमाणे आपली श्रद्धाही एखाद्या परम तत्वावर स्थिर व्हावी, म्हणून त्यांच्या 'हृदयाची तळमळ' होई! त्यांच्या मनाची ही अवस्था बहुधा अमेरिकेतच कालांतराने पालटली असावी. केवळ ऐहिकाचीच उपासना करणारा सभोवारचा अमेरिकन समाज, समाजशास्त्राचा अभ्यास आणि उपजत राष्ट्राभिमान यांच्या संकलित परिणामातून नव्या

१. 'मी व माझे टीकाकार', ज्योत्स्ना, जुलै १९३६; संकीर्ण लेख, पृष्ठे १४–१५
२. विद्यासेवक, मे १९२६.

ऐहिक श्रद्धांनी त्यांच्या मनात हळूहळू मूळ धरले. जगदैक्याचे अटळ भवितव्य त्यांना दिसले होते; त्या भवितव्याकडे जाणारा मार्ग सुलभ व्हावा म्हणून राष्ट्रैक्य नि राष्ट्रबलवर्धन या गोष्टी साधल्या पाहिजेत हे त्यांना पटले होते; आणि विश्वाच्या स्वाभाविक शक्तींना गती देण्यावाचून मनुष्य फारसे काही करू शकत नाही, हे वॉर्ड वगैरे समाजशास्त्रज्ञांच्या ग्रंथांवरून त्यांच्या बुद्धीवर बिंबले होते. तेव्हा आत्मसमर्पणासाठी उत्सुक झालेले पण परमार्थिकापासून संशयाने दूर सरकलेले त्यांचे मन जगदैक्य, राष्ट्रैक्य, राष्ट्रबलवर्धन या ऐहिक कल्पनांवर परम विश्वासाने स्थिर झाले. ऐहिकाची उपासना ते एवढ्या उत्साहाने करू लागले, की नीती-अनीती, पाप-पुण्य, कर्तव्य-अकर्तव्य, यांविषयीचा निर्णयही त्यांनी राष्ट्रहिताच्या ऐहिक कसोटीवर पारखून घेण्यास प्रारंभ केला. १९१३ साली 'केसरी'त लिहिलेल्या जातिभेदविषयक लेखात त्यांचा हा ऐहिकवाद मोठ्या प्रकर्षाने एका ठिकाणी प्रकट झाला आहे. तेथे ते म्हणतात :

"आपल्या नीती व अनीती आणि धर्म व अधर्म यांच्या कल्पनाही चांगल्या व्यवस्थित झाल्या पाहिजेत. धर्म कोणता? किंवा नीती म्हणजे काय?—तर ज्या आचरणाने मनुष्य नेमका स्वर्गात जाऊन पडेल तोच धर्म आणि तीच नीती, असे न न समजता, ज्याच्या योगाने राष्ट्रबलसंवर्धन होईल तोच धर्म आणि तीच नीती, या गोष्टी लक्षात ठेविल्या पाहिजेत. राष्ट्रबलसंवर्धन व राष्ट्रोत्कर्ष या ध्येयांनी नीतिकल्पनांची उजळणी करण्याची लोकांस सवय झाली पाहिजे. आज तशी सवय लोकांस मुळीच नाही. आपण जगात आहो, ते कसे तरी मुक्त होऊन गेले पाहिजे, हे तत्वज्ञान काही केस पिकलेल्या म्हाताऱ्यांस, ज्यांचे कर्तव्याचे दिवस आटपून गेले आहेत अशांस दिले, तर हरकत नाही. तथापी ते तरुणांच्या डोक्यात भरवून देणे हा अत्यंत कडक शिक्षेस पात्र असा देशद्रोह होय. माझ्या हाती जर सुलतानी सत्ता असती, तर इहलोकाकडे दुर्लक्ष करा असे तत्वज्ञान तरुणांस उपदेशिणाऱ्या मंडळींस मी तोफेच्या तोंडी दिले असते!"[1]

विसाव्या शतकाच्या प्रारंभी अशी निखळ ऐहिक जीवनमूल्ये फारच थोडे समाजधुरीण प्रतिपादीत होते आणि सामान्य समाजाला ती ऐकण्याची मुळीच सवय नव्हती. ती जीवनमूल्ये व्यवहारात मुरवण्याचा प्रश्न तर फारच दूरचा होता. त्यामुळे या ऐहिक जीवनमूल्यांचा प्रचार राष्ट्रप्रेमाने नि हिरीरीने जेव्हा केतकर करू लागले तेव्हा मराठी वाचक भांबावून गेले यात नवल नव्हते. केतकर कोणतीच रूढ नि साचेबंद विचारसरणी राजकीय वा सामाजिक क्षेत्रात मानीत नव्हते, हे जसे त्यांच्या लिखाणाला अपूर्वाई येण्याचे एक कारण होते तसेच त्यांची ऐहिक जीवनमूल्ये हेही एक कारण होते.

कलकत्ता सोडल्यानंतर १९१४च्या मेच्या अखेरीला केतकर मुंबईला येऊन सरदारगृहात राहिले. त्या वेळेस पोटाचा नि ज्ञानप्रसाराचा उद्योग म्हणून ग्रंथप्रकाशनाच्या क्षेत्रात पडावे, अशी त्यांची एक इच्छा होती. एक इंग्रजी आणि एक मराठी अशी

१. संकीर्ण लेख, पृष्ठ ४७.

दोन मासिके काढण्याची योजना त्यांच्या डोक्यात घोळत होती आणि डॉ. प्रभाकरपंत शिलोत्री त्यांना 'पायलट' नावाचे प्रगमनशील विचारांचे इंग्रजी मासिक काढण्याविषयी आग्रहही करीत होते. पण कलकत्त्याला असतांना 'मॉडर्न रिव्ह्यू' चे संपादक श्री. रामानंद चतर्जी यांच्याकडून त्यांना इंग्रजी मासिकांची जी स्थिती कळली होती तीमुळे आपली मासिके लौकर किफायतशीर होतील असे त्यांना वाटेना. त्यामुळे मासिकांची कल्पना त्यांनी सोडून दिली असावी. आपल्या संशोधनशक्तीचा पुढील पिढीस उपयोग करून देता यावा, म्हणून एखाद्या विद्यापीठात प्राध्यापकाची जागा पतकरावी, अशी दुसरी इच्छा त्यांच्या मनात होती. तीप्रमाणे मुंबई, मद्रास व अलाहाबाद या विद्यापीठांत त्यांनी अर्ज केले; पण सगळीकडून उत्तरे येण्यास विलंब लागला आणि अखेर तीनही ठिकाणी इंग्रजांची वर्णी लागली. आपणाला विद्यापीठात जागा कां मिळाली नाही, याविषयी केतकरांनी जे उद्‌गार काढले आहेत ते तत्कालीन ज्ञानविषयक परिस्थितीवर नि त्यांच्या स्वतःबद्दलच्या मतावर चांगला प्रकाश टाकणारे आहेत. ते म्हणतात :

"मी स्वतःला जरी युनिव्हर्सिटी प्रोफेसरासारख्या मोठ्या जागेला लायक समजत होतो तरी अधिकारी लोक मला लायक समजत नव्हते. माझ्या योग्यतेसंबंधाने माझे मत सकारण होते. १९१४ सालापर्यंत समाजशास्त्रीय, शासनशास्त्रीय, अर्थशास्त्रीय व संशोधनपद्धतीचे शिक्षण देण्याची पद्धत इंग्लंडात सुरू झाली नव्हती आणि त्यामुळे इंग्लिश युनिव्हर्सिट्यांतून बाहेर पडणारे पदवीधर किंवा तिकडून येणारे इंग्रज शिक्षक माझ्याइतके शिक्षणाचे नव्हते. तथापी इकडील युनिव्हर्सिट्यांमधून, ते इंग्रज असल्यामुळे आणि संशोधनविद्येशी अपरिचित असल्यामुळे, संशोधनाच्या आवश्यकतेचा काल इकडे अजून आला नाही, असे ते म्हणत आणि त्यांच्या तंत्राने इतर लोक चालत.... अशा प्रकारच्या कारणामुळे...माझा सौदा जुळला नाही."[1]

उद्योगाचा शोध चालू असताना केतकरांची पुण्याला येजा चालू होती आणि तीमध्ये पुण्यातील मंडळींशी त्यांचे संबंध येत होते. पुण्याला होणाऱ्या खेपांमुळेच इतिहासाचार्य राजवाड्यांबरोबरची त्यांची ओळख दृढ झाली आणि म. म. दत्तोपंत पोतदार, सरदार तात्यासाहेब मेहेंदळे वगैरेंशी त्यांच्या नव्या ओळखी जमल्या. श्री. अच्युतराव भटांशी या खेपांमध्ये त्यांचा संबंध वाढून भटांकडून त्यांना ग्रंथविक्रया-संबंधी काही उपयुक्त माहिती मिळाली. महायुद्धाला प्रारंभ होण्यापूर्वी १७ जून १९१४ रोजी लो. टिळक मंडालेहून सुटून पुण्यास आले, तेव्हा केतकर पुण्यातच होते. लो. टिळकांनी त्यांना अमेरिकेस जाण्याला प्रोत्साहन दिले होते, तेव्हा ते पहिल्याच दिवशी टिळकांना येऊन भेटले आणि टिळकांनी तुरुंगात फ्रेंच, पाली व जर्मन या भाषांचा जो अभ्यास केला होता त्याबद्दल त्यांच्याशी त्यांनी गप्पागोष्टी केल्या. उद्योगाचा शोध नि ओळखीपाळखी करून घेणे यांमध्ये असा काळ जात असता

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ११ ते १३.

४ ऑगस्ट रोजी महायुद्ध सुरू झाले व पुढे १९१४ सालही संपत आले. जीवनाला तोपर्यंत कोठे घर लागला नाही; तेव्हा ज्ञानार्जन नि ज्ञानप्रसार असा दुहेरी हेतू मनात ठेवून त्यांनी प्रवासाला निघण्याचे ठरविले.[१]

१९१४ च्या डिसेंबर महिन्यात ते काँग्रेसच्या अधिवेशनासाठी मद्रासला गेले आणि तेथे, भाषावार प्रांतरचना व्हावी म्हणून एक पत्रक छापून त्यांनी प्रतिनिधींमध्ये वाटले. 'हिंदुइझम'मध्ये त्यांनी भाषावार प्रांतरचनेची जी कल्पना मांडली होती ती विस्तार पावून त्यांच्या मनात आता दृढावली होती आणि तिचा आविष्कारही त्यांनी 'इंडियन इकॉनमिक्स'मध्ये करून ठेवला होता. हिंदी राष्ट्राच्या प्रस्थापनेसाठी जातिभावना कमी होऊन प्रादेशिक भावना वाढली पाहिजे, भाषावार प्रांत झाले की प्रांतवार सामाजिक कायदे होऊन प्रादेशिक भावना वाढीस लागेल, असे 'हिंदुइझम'मध्ये त्यांनी म्हटले होते. आता भाषावार प्रांतांत देशी भाषांमध्ये राज्यकारभार झाला पाहिजे आणि प्रत्येक प्रांतात देशी भाषेमधून शिक्षण देणारे एकेक विद्यापीठ असले पाहिजे, अशी मांडणी ते करू लागले. राज्यकारभारात व विद्यापीठांत इंग्रजीचे जे वर्चस्व आहे त्यामुळे सुशिक्षितांत नि बहुजनसमाजात भेदाची एक भिंत उभी राहते, बहुजनसमाज ज्ञानापासून वंचित होतो, त्याच्या आर्थिक प्रगतीलाही अडथळा येतो, इंग्रजीत अभिव्यक्ती करण्यासाठी जी धडपड करावी लागते तीमुळे स्वतंत्र बुद्धीचा कोंडमारा होतो, वगैरे कारणांसाठी इंग्रजीचे वर्चस्व त्यांना नको होते. तेव्हा इंग्रजीचे वर्चस्व नष्ट करण्यासाठी त्यांनी देशी भाषांत राज्यकारभार नि देशी भाषांत शिकविणारी विद्यापीठे यांचा पुरस्कार केला. देशी भाषांत राज्यकारभार नि देशी भाषांतून शिकविणारी विद्यापीठे झाली, की प्रांताप्रांतातील बहुसंख्य देशी लोकांचे महत्व वाढेल व त्यांची संस्कृती प्रांतात पसरून दृढमूल होईल, असे त्यांचे म्हणणे होते. देशी भाषांत राज्यकारभार होऊ लागला म्हणजे प्रांतातील अल्पसंख्य जमाती प्रांतिक देशी भाषा शिकतील आणि प्रांतिक संस्कृतीशी बऱ्याचशा मिसळून जातील, म्हणूनही ते राज्यकारभारात देशी भाषांचा आग्रह धरीत होते. भाषावार प्रांतरचना, देशी भाषांत राज्यकारभार नि देशी भाषांतून शिक्षण देणारी प्रांतवार विद्यापीठे या तीन सुधारणांना त्यांनी 'सुधारणात्रयी' असे नाव दिले होते आणि या सुधारणात्रयीचा मुख्य रोख प्रादेशिक समाजभावनेची निर्मिती व 'हिंदी राष्ट्रा'चे दृढीकरण यावर होता. मद्रासच्या काँग्रेसमध्ये त्यांनी जे पत्रक वाटले ते सध्या उपलब्ध नाही; पण त्यात या सुधारणात्रयीचाच पाठपुरवठा त्यांनी केला असला पाहिजे, हे उघड आहे.[२]

मद्रासची काँग्रेस आटोपल्यावर, १ जानेवारी १९१५ या दिवशी, ते सीलोनमध्ये प्रवासाच्या उद्देशाने गेले. तेथे घालविलेल्या दोन आठवड्यांत त्यांनी राष्ट्रहिताच्या

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे १४-१५.
२. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ १५; इंडियन इकॉनमिक्स, प्रकरण ५.

दृष्टीने तेथील समाजाचे व संस्कृतीचे अवलोकन केले. पुराणवस्तुसंशोधकाची त्यांची दृष्टी नव्हती, म्हणून बौद्ध अवशेष पाहाण्यात त्यांनी फारच थोडा वेळ खर्च केला. अनुराधापूरचे थोडेसे अवशेष त्यांनी दृष्टीखाली घातले, पण कँडी शहराला भेटही दिली नाही. सीलोनमध्ये जाण्यापूर्वी काही वाचनात्मक पूर्वतयारी त्यांनी केली होती; तीमुळे थोड्या वेळात पुष्कळ अवलोकन त्यांच्या हातून होऊ शकले. या अवलोकनात त्यांच्या विचारांवर परिणाम करणारी मुख्य गोष्ट त्यांना अशी दिसली, की "एकंदर आर्थिक आणि शैक्षणिक दृष्ट्या सिंहलद्वीप जरी पुढे गेले तरी राष्ट्रीय भावनांच्या दृष्टीने त्या देशाचा अपकर्ष झाला आहे." तेथे खिस्ती झालेला मनुष्य पतित झाला अशी भावना खिस्ती मंडळींत नव्हती व बौद्धांतही नव्हती. उलट खिस्ती झालेला मनुष्य प्रगतीच्या मार्गाला लागला, असे सामान्य लोकांना वाटत असे. शिवाय, दोन सिंहली जातींची मंडळी एकमेकांशी लग्ने करीत नव्हती, पण बर्घर म्हणजे (डच नि पोर्तुगीज यांच्यापासून झालेल्या) युरेशियन प्रजेशी लग्ने करण्यास दोनही जातींना प्रत्यवाय वाटत नव्हता. याचा अर्थ केतकरांनी असा लावला, की 'सीलोनमध्ये इंग्रज हे समाजाचे केंद्र बनून ब्राम्हण ठरत चालले आहेत आणि सिंहली बौद्ध हे मात्र इंग्रजानुयायी होऊन शूद्रांची भूमिका घेत आहेत. जर या सामाजिक स्थितीच्या जोडीला त्या देशात इंग्रजीचे वर्चस्वही कायम झाले तर इंग्रजांचे ब्राम्हण्य आणि सिंहली बौद्धांचे शूद्रत्व अधिकच पक्के होत जाईल.' हिंदुस्थानच्या स्थितीशी जेव्हा सीलोनमधील स्थिती ते पडताळून बघू लागले तेव्हा ते पुढील निर्णयाला येऊन पोहोचले :

"परक्या भाषेची उच्चता देशात राहू दिली तर ती भाषा ज्यांची जन्मभाषा आहे त्यांचे उच्चजातित्व देशास मान्य करावे लागेल. तर या क्रियेस जोराने प्रतिबंध केला पाहिजे. हिंदूमध्ये जातिभेद आहे आणि राज्य जरी परक्यांचे आहे, तरी त्यामुळे क्षत्रिय वर्ग काय तो स्थानभ्रष्ट झाला. पण ब्राम्हणवर्गाचे देशावर प्रामुख्य राहिले. परराष्ट्रीयांस आपले सामाजिक उच्चत्व देण्याची अधोगती देशात अजून उत्पन्न झाली नाही; तर आपल्या भाषेचे देशात प्रामुख्य राखल्याने, इंग्रजांच्या सबंध जातीला समाजाचा उच्च वर्ग बनू देण्यामुळे जी राष्ट्रीय अधोगती उत्पन्न होईल, तीतून तरी आपला समाज बचावेल."[१]

थोडक्यात म्हणजे सीलोनमधील अवलोकनामुळे देशभाषांच्या संवर्धनाचे तत्व त्यांच्या हृदयात खोल जाऊन भिडले आणि त्या तत्वाच्या अभिसिद्धीसाठी आपण काही-तरी केले पाहिजे, अशी कार्येच्छा त्यांच्या मनात मुसमुसू लागली. वास्तविक पाहाता त्यांच्या 'सुधारणात्रयी'त देशभाषांच्या व स्थानिक संस्कृतीच्या संवर्धनाचे तत्व अनुस्यूत होतेच; पण सीलोनमधील अवलोकनामुळे त्यांच्या जुन्या विचारांना एक नवीन

१. 'सिंहलद्वीपातील लोकस्थिती', लोकशिक्षण, पौष शके १८३७; ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे १५ ते १९.

आधार नि एक नवीन चालना मिळाली. इंग्रजांचे सामाजिक प्रामुख्य टाळण्यासाठी, म्हणजेच राजकीय पारतंत्र्याबरोबर सामाजिक पारतंत्र्य येऊ नये यासाठी, देशभाषांचे व स्थानिक संस्कृतीचे संवर्धन केले पाहिजे हे त्यांना नव्याने कळले.—आणि पुढे ते ज्ञानकोशाच्या भाषासंवर्धक व संस्कृतीसंवर्धक कार्याकडे वळले त्याला ते एक सर्वांत महत्वाचे कारण घडले. ते एके ठिकाणी म्हणतात, की "ज्या वेळेस [ज्ञानकोशाचे] काम सुरू केले त्या वेळेस आपण केवळ भाषाप्रेमामुळे इकडे वळलो आहोत असे वाटत होते. एवढेच नव्हे, तर इंग्रजी राज्याचा हेतू इंग्रजी भाषेस संस्कृत भाषेचे स्थान देऊन मराठी भाषेला शूद्र भाषेचे स्थान द्यावयाचे...हाच आहे, आणि हा हेतू आपण विध्वंसून टाकला पाहिजे, असे वाटत होते." दुसरीकडे त्यांनी म्हटले आहे, की "हिंदुस्थानाच्या प्रत्येक भागात स्थानिक संस्कृतीचे महत्व स्थापन करण्यासाठी जी एक भावना माझ्या मनात उत्पन्न झाली...ती भावना ज्ञानकोशाच्या उत्पत्तीस बऱ्याच अंशी कारणीभूत झाली."[1]

सीलोनमध्ये असताना केतकरांनी तेथील समाजाचे जे अवलोकन केले त्यात आणखी एक महत्वाची गोष्ट त्यांच्या नजरेस आली. ती अशी की सीलोनमध्ये ब्राम्हण नव्हते, पण जातिभेद होता. त्या देशात बौद्धांचा वरचष्मा असूनही तेथील जातिभेद नष्ट झालेला नव्हता. तेव्हा 'बुद्धाने जातिभेद घालविण्याचा प्रयत्न केला नाही', 'ब्राम्हणांनीच जातिभेद वाढविला असे नाही' वगैरे आपल्या मतांना या प्रत्यक्ष स्थितीमुळे पुष्टी मिळते, असा निष्कर्ष त्यांनी काढला. सीलोनमधील समाजाचे आणखी बरेच नि बहुरंगी निरीक्षण त्यांनी मूलग्राही दृष्टीने केले आणि त्यावर 'लोकशिक्षणा'त एक विस्तृत लेख प्रसिद्ध केला. सीलोनमध्ये असताना आपल्या विशिष्ट मतांचा प्रचारही ते करीत होते. जे जे पत्रकार त्यांच्याकडे येत त्यांच्यापाशी भाषावार प्रांतरचना, राज्यकारभारात नि उच्च शिक्षणात देशी भाषांचा उपयोग, एक-राष्ट्रीयत्वासाठी नि उन्नतीसाठी ॲरिस्टोक्रसीची किंवा अभिजात वर्गाची स्थापना, आणि इंग्रजांना या अभिजात वर्गाचे स्थान मिळू नये म्हणून प्रयत्न इत्यादी गोष्टींच्या महत्वा-संबंधाने ते बोलत. त्यांच्या मतांचे स्वागत तेथे चांगल्या प्रकारे झाले आणि हा हिंदी मनुष्य आपणाला काही वेगळी दृष्टी देत आहे, अशी कित्येकांची भावना झाली.[2]

सीलोनमध्ये पंधरवडाभर फिरून ते सायन्स काँग्रेसला उपस्थित राहाण्यासाठी १५ जानेवारी १९१५ च्या सुमारास परत मद्रास येथे येऊन पोहोचले. मद्रासच्या पहिल्या भेटीत डॉ. अच्युत लक्ष्मीपती यांच्याशी त्यांची ओळख झाली होती, म्हणून या वेळी पाचसहा दिवस ते डॉ. लक्ष्मीपतींच्याकडेच उतरले. सायन्स काँग्रेसमध्ये 'हिंदू आयकोनोग्राफी'चे कर्ते टी. गोपीनाथराव यांच्याशी त्यांचा परिचय झाला आणि

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे १५, २३.
२. 'सिंहलद्वीपांतील लोकस्थिती', लोकशिक्षण, पौष शके १८३७.

टी. गोपीनाथरावांनी त्यांना त्रावणकोर पाहाण्यास आमंत्रण दिले. त्यांना देशाचे सामाजिक निरीक्षण करण्याची इच्छा होतीच, तेव्हा ते आमंत्रण स्वीकारून ते त्रिवेंद्रमला गेले. त्रिवेंद्रम येथे काही सामाजिक निरीक्षण केल्यावर त्यांनी कोचीनमध्ये प्रवेश केला आणि एर्नाकुलम, त्रिचूर इत्यादी ठिकाणी थोडथोडे दिवस मुक्काम ठेवला. त्रिचूर येथे ते एथ्नॉलॉजिस्ट ए. के. अनंतकृष्ण अय्यर यांच्याकडे पाहुणे होते. त्रावणकोरचे गोपीनाथराव व त्रिचूरचे अनंतकृष्ण अय्यर यांच्याकडून मल्याळी समाजाची माहिती त्यांना चांगल्या प्रकारे मिळाली आणि त्रावणकोरचे दिवाण रा. कृष्णन नायर यांनी त्यांना नायर समाजाची बरीच माहिती दिली.[1]

ते त्रिचूर येथे असताना, १९ फेब्रुवारी १९१५ रोजी नामदार गोपाळ कृष्ण गोखल्यांचे निधन झाल्याची वार्ता त्यांच्या कानावर जाऊन पडली. त्या वार्तेने त्यांना काहीसा धक्का बसला आणि आपले आयुष्य निरुद्देश वाया तर जात नाही ना, असा भेदक प्रश्न त्यांच्या मनात घटकाभर लसलसून गेला. "महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा मनुष्य दिवंगत होतो आणि आपण केवळ अनिश्चयी मनुष्यासारखे भ्रमण करीत आहो, जग हे पुढे दररोज चालले आहे, हिंदुस्थान मात्र मागे आहे,—आणि आपण त्याच्या प्रगतीसाठी काय करीत आहो, इत्यादी विचार मनात जागृत झाले"—असे आपल्या आत्मनिवेदनात त्यांनी म्हटले आहे. राष्ट्राच्या कोटिचक्र गाड्याला गती द्यायला ते निघाले होते आणि त्यांनी राष्ट्रीय शिक्षकाची भूमिका पतकरली होती; पण विविध क्षेत्रांत विचारांना काही चालना देण्याखेरीज कोणतेही प्रत्यक्ष कार्य त्यांना आतापावेतो साधता आले नव्हते. तेव्हा ना. गोखल्यांच्या मृत्यूमुळे आपल्या अकर्मण्याची त्यांना खडखडून जाणीव व्हावी हे साहजिक होते. या जाणिवेमुळेच यापुढे ते एखादे प्रत्यक्ष जीवितकार्य शोधण्याकडे जारीने वळले असावे आणि ज्ञानकोशरचनेचे कार्य त्यांनी अखेर पतकरले असावे.[2]

त्रावणकोर-कोचीनकडून मद्रासला परतल्यावर ते डॉ. अच्यन्त लक्ष्मीपती यांच्याकडे पुन्हा उतरले आणि लक्ष्मीपतींचा आणि त्यांच्या सुशिक्षित सुशील पत्नीचा पाहुणचार उपभोगीत तेथे सुमारे दोन आठवडे राहिले. त्या वेळी 'आंध्रविज्ञानसर्वस्वमू' या तेलगू ज्ञानकोशाचे कार्य मद्रास येथे जोरात चालले होते. त्या ज्ञानकोशाचे मुख्य संपादक रा. के. व्ही. लक्ष्मणराव हे होते; पण सर्व व्यवस्था पाहाण्याचे काम डॉ. लक्ष्मीपती हे करीत असत. त्यामुळे डॉ. लक्ष्मीपती यांच्यामार्फत केतकरांना 'आंध्रविज्ञानसर्वस्वमू'ची माहिती अगदी जवळून समजली. ही माहिती पुढे मराठी ज्ञानकोशाच्या रचनेच्या वेळी त्यांना उपयोगी पडली आणि 'आंध्रविज्ञानसर्वस्वमू'चे कार्य बघून त्यांना जी स्फूर्ती मिळाली ती तर मराठी ज्ञानकोशाचे कार्य हाती घेण्यासाठी त्यांना सर्वांत जास्त प्रेरक

१ ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे १८, १९, २०.
२ ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ २०.

वाटली. ते म्हणतात, "आंध्रांचा हा प्रयत्न पाहून मनाला एक तऱ्हेचे ईर्ष्येचे उत्तेजन मिळाले. आंध्रांच्यामध्ये शिक्षण कमी आहे, अशी माझी त्या वेळेस समजूत होती आणि आंध्रांपैकी निजामहद्दीत असलेला भाग महाराष्ट्राच्या निजामहद्दीत असलेल्या भागापेक्षा जास्त आहे, त्यामुळे बऱ्याच भागात आंध्र वाङ्मयाला अपकर्षक अशी स्थिती आहे, असे दिसून येत होते.—आणि अर्वाचीन आंध्र वाङ्मय त्याच्या योग्यतेकडे पाहिले तर ते मराठीपेक्षा कमी दर्जाचे आहे, असे भासल्याशिवाय राहात नसे. असे असूनही आंध्रांनी ज्ञानकोश तयार करण्याची कंबर बांधली तर महाराष्ट्राला तसे करता येणार नाही काय, असा विचार उत्पन्न झाला; व माझा स्वतःच्या योग्यतेसंबंधाने मोठा आत्मविश्वास होताच. तर आपण जर ज्ञानकोशरचनेचे काम अंगावर घेतले तर आंध्रांपेक्षा ते अधिक चांगले आणि अधिक यशस्वी करू असे वाटले."[1]

'आंध्रविज्ञानसर्वस्वम्'मुळे महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या रचनेकडे त्यांचे मन असे जोराने वळले; पण रचनेचे कार्य त्यांनी लगेच हाती घेतले नाही. आपल्या जीवितकार्याविषयी अजून थोडेसे आंदोलन त्यांच्या मनात चालू होते. राष्ट्रीय शिक्षकाच्या उच्चतम भूमिकेवरून प्रगत विचारांचे प्रदान करीत राहावे आणि राष्ट्रीय जीवनाची विविध अंगे संजीवित करीत जावे, ही आकांक्षा अजून त्यांना आकृष्ट करीत होती. विचारांच्या प्रदानाने होणारे कार्य महत्वाचे असले तरी अमूर्त असते, त्याने व्यवहारी कर्तृत्व करू इच्छिणाऱ्या मनाचे पुरेसे समाधान होत नाही, हे त्यांना जाणवत होते; पण एकदम वैचारिक मार्गदर्शन करण्याची भूमिका सोडण्यास ते तयार नव्हते. त्यातल्या त्यात काही प्रत्यक्ष कार्य हातून घडावे म्हणून त्यांनी 'स्वकीय संस्कृतीच्या संवर्धना'साठी राजकीय व सामाजिक चळवळ करण्याचे ठरविले होते आणि आपल्या सुधारणात्रयीचा प्रचार ते करू पाहात होते. पण 'भाषावार प्रांतरचना, देशी भाषांत राज्यकारभार व देशी भाषांत शिकविणारी प्रांतवार विद्यापीठे' या सुधारणात्रयीच्या प्रचारातही प्रत्यक्ष चळवळ नि संघटना यांपेक्षा विचारांच्या प्रदानावरच त्यांचा भर होता. तेव्हा 'आंध्रविज्ञानसर्वस्वम्'च्या अवलोकनानंतर मराठी ज्ञानकोशाच्या रचनेची एक उबळ जरी त्यांच्या मनात उसळी मारून गेली, तरी लगेच त्या कार्याला त्यांनी हात घातला नाही. आपल्या वळणावळणाच्या वाटांनी मन त्या कार्याकडे निश्चितपणे येईपर्यंत राष्ट्रीय शिक्षकाची भूमिकाच ते बजावीत राहिले आणि विचारप्रदानाचे कार्य त्यांनी चालू ठेवले.[2]

मद्रास कॉंग्रेसच्या वेळी भाषावार प्रांतरचनेचा जो प्रचार त्यांनी केला होता त्याला अनुसरून त्यांनी मद्रासला काही व्याख्याने दिली. त्या व्याख्यानांची इतिवृत्ते वृत्तपत्रांतून ज्या वेळी प्रसिद्ध झाली त्या वेळी आंध्र मंडळींत त्यांच्या विचारांविषयी जिज्ञासा उत्पन्न होऊन त्यांना आंध्र प्रांतात व्याख्यानाची निमंत्रणे येऊ लागली. तेव्हा आंध्र प्रांतामध्ये

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे २१-२२.
२. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे २२-२३.

व्याख्यानांचा एक छोटासा दौराच त्यांनी काढला आणि मच्छलीपट्टण, वेझवाडा, गुंतूर, नरसरापेठ, राजमहेंद्री, काकीनाडा, विजयानगर इत्यादी ठिकाणी व्याख्याने दिली. ही व्याख्याने भाषेच्या अडचणीमुळे कधी ते संभाषणाच्या स्वरूपात देत, तर कधी संस्कृतमधून देत. कधी समाजसंघटनेवर रचलेल्या काही संस्कृत श्लोकांचा प्रचारही या व्याख्यानांतून ते करीत. त्या वेळी आंध्रातील लोकांनी आपल्या स्वतंत्र भाषिक प्रांताच्या मागणीला प्रारंभ केला होता आणि केतकर भाषिक प्रांतांना आपल्या व्याख्यानांतून पाठिंबा देत होते. त्यामुळे त्यांची ही व्याख्याने चांगलीच गाजली. आंध्रांनी आपली मागणी मुख्यतः स्थानिक हिताच्या दृष्टीने केलेली होती; पण केतकर भाषिक प्रांतांचा धागा प्रादेशिक समुच्चयभावनेशी, हिंदी राष्ट्रवादाशी आणि जगदैक्याशी सुसंगतपणे नेऊन भिडवीत होते. इंग्रजांच्या राजकीय वर्चस्वाबरोबर त्यांचे सामाजिक वर्चस्वही होऊ नये, म्हणून देशी भाषेचे नि संस्कृतीचे संवर्धन झाले पाहिजे, त्यासाठी भाषिक प्रांत केले पाहिजेत, अशी विचारपरंपरा त्यांनी स्वीकारली होती. त्यामुळे, आंध्रांच्या मागणीला त्यांच्या व्याख्यानांमुळे एक व्यापक नि दूरदर्शी विचारसरणी लाभली आणि त्यांचा सर्वत्र विशेष गौरव झाला. त्यांना आंध्र समाजात इतके महत्व प्राप्त झाले, की तेथील सामाजिक नेतृत्वच काही काळ त्यांच्याकडे आल्यासारखे झाले आणि डॉ. पट्टाभी सीतारामय्या यांच्यासारखी थोर थोर मंडळी त्यांची अनुयायी बनली. त्यांनी केलेला एक संस्कृत श्लोक तर तेथे राष्ट्रगीतासारखा सभासभांतून गायला जाऊ लागला! तो श्लोक असा :

> **“प्राचीना ननु शातवाहननृपा भृत्यास्तु येषां श्रुतम्**
> **विद्याशौर्यपरोद्यमैः खलु युतास्तस्मात् त्रिलिंगा वयम् ।**
> **स्वत्वस्थापनमेव धर्मविभवो येषां बुधैर्ज्ञायते**
> **दुर्दान्ता निजधर्मपालनपरा कार्ये नवान्ध्रा वयम् ॥”**

आज हिंदुस्थानभर बहुतेक सर्व प्रांतांची रचना भाषिक तत्वावर झाली आहे आणि भाषिक तत्वावर ज्याची सर्वात प्रथम रचना झाली असा प्रांत आंध्र हा आहे. केतकरांनी १९१५ साली त्यासाठी आंध्र प्रांतात जोराची वैचारिक चळवळ केली होती, हे या ठिकाणी आठवले, की त्यांच्या दूरदर्शी बुद्धीचे आणि आक्रोडाची फळे पेरणाऱ्या देशहितैषी भावनेचे मोठेपण मनावर ठळकपणे बिंबते.[1]

आंध्रामध्ये व्याख्यानांचा दौरा सुरू होता त्या सुमारास ‘राष्ट्रधर्मप्रचारण-संघ’ या नावाचा संघ केतकरांनी स्थापन केला होता आणि आपली व्याख्याने म्हणजे या संघाचेच कार्य होय, असे ते समजत होते. शके १८३७च्या फाल्गुन महिन्याच्या

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे २२-२३; ‘राष्ट्रधर्मप्रचारण-संघ’, लोकशिक्षण, फाल्गुन शके १८३७; लोकशिक्षण, मे-जून १९३७, श्री. रा. पारसनीस.

‘लोकशिक्षणा’च्या अंकात ‘राष्ट्रधर्मप्रचारण-संघ, विचारपद्धती’ या नावाचा एक लेख लिहून या संघाची माहिती महाराष्ट्राला त्यांनी करून दिली. या लेखाला जी एक संपादकीय टीप जोडलेली होती तीत असे म्हटले होते, की ‘डॉक्टर केतकर यांनी हा संघ स्थापन केला आहे आणि या संघाच्या शाखा सध्या आंध्र प्रदेशातच आहेत. केतकर आंध्र प्रदेशातून जसजसा पुढे प्रवास करतील तसतशा या संघाच्या शाखा इतर प्रांतांतही स्थापन होतील.’ पण आंध्र प्रदेशातील शाखा अगदी अल्पजीवी ठरल्या आणि इतर प्रांतांत शाखा निघाल्याच नाहीत, असे पुढील इतिहासावरून दिसते. केतकर राष्ट्रधर्मप्रचारण-संघ हा ‘कार्यकर्ता संघ नाही’ असेच म्हणत होते आणि ‘हा संघ केवळ विचारांची दिशा दाखवील’ अशी त्यांची भूमिका होती. तेव्हा ह्या संघाने संघटनात्मक प्रत्यक्ष कार्य काहीही केले नाही, यात विशेष आश्चर्य नाही. आपल्या ‘राष्ट्रीय शिक्षका’च्या भूमिकेवरून या संघाच्या द्वारे केतकरांनी आंध्रांना नवविचार दिले आणि तेथेच संघाचे बहुतेक कार्य संपले. आंध्र प्रांत सोडल्यावर उत्कलमध्ये गंजम, कटक, जगन्नाथपुरी इत्यादी ठिकाणी त्यांनी जी व्याख्याने दिली ती व्याख्याने म्हणजे या संघाचे उरलेसुरले कार्य म्हणून फार तर सांगता येईल.[१]

आंध्र-उत्कलमधील दौरा आटोपून ते कलकत्त्याला गेले आणि त्यांची भटकी ज्ञानदृष्टी आंध्रांचा प्रश्न सोडून वेगळ्या प्रदेशात संचार करू लागली. मध्यप्रांताला विधिमंडळ मिळाल्यावर १९१४ साली ‘मध्यप्रांतास संदेश’ या नावाचे एक व्याख्यान त्यांनी नागपूरला दिले होते आणि नव्या विधिमंडळात जाणाऱ्या लोकप्रतिनिधींना मार्गदर्शन केले होते. आता कलकत्त्यावरून ते पुन्हा मध्यप्रांतात येणार होते, तेव्हा पूर्वीच्या व्याख्यानाचे सूत्र उचलून मध्यप्रांताला आंध्र प्रांताप्रमाणे काही नवे मार्गदर्शन केले पाहिजे, असे त्यांना वाटू लागले असावे. त्याप्रमाणे कलकत्त्याच्या ग्रंथालयात बसून एक विचारप्रवर्तक व्याख्यान त्यांनी तयार केले आणि रायपूर या आपल्या जन्मग्रामाचे संतोषकारक दर्शन वाटेत घेऊन ते नागपूरला येऊन पोहोचले. २३ ऑगस्ट १९१५ रोजी, चिकार भरलेल्या व्यंकटेश नाट्यगृहात ‘मध्यप्रांतापुढील प्रश्न’ या नावाने त्यांचे ते व्याख्यान झाले आणि नागपूरकर मंडळींवर त्यांची एकदम छाप बसली. पुढारी नि विद्वान त्यांच्या व्याख्यानाने सारखेच चकित होऊन विचारांची एक खळबळ प्रांतभर उसळून गेली. त्या व्याख्यानातील अभिनव प्रतिपाद्य असे होते, की ‘मध्यप्रांताकडून ज्या प्रमाणात हिंदुस्थान सरकार कर घेते त्या प्रमाणात त्या प्रांतावर हिंदुस्थान सरकार खर्च करीत नाही.’ आकडेवारी देऊन त्यांनी हे सिद्ध केले, की मुंबई व संयुक्तप्रांत वगळता मध्यप्रांताचा जमीनमहसूल सर्व प्रांतांहून जास्त होता; पण पाटभिजणीखालची जमीन, साक्षरता, ग्रंथप्रकाशन वगैरे बाबतीत मध्यप्रांत बहुतेक प्रांतांहून मागे होता. मध्यप्रांतावर कमी खर्च करण्यास हिंदुस्थान सरकारला कोणतेही सयुक्तिक कारण नव्हते,

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ २३.

हे त्यांनी दाखवून दिले आणि मध्यप्रांतातील नगरपालिकांची प्रवृत्ती शिक्षणावर जास्त खर्च करण्याची आहे, मध्यप्रांतात गुन्हेगारी कमी आहे, तेथे वन्य जमातींची संख्या जास्त आहे वगैरे कारणांस्तव हिंदुस्थान सरकारने त्या प्रांतावर प्रमाणापेक्षा उलट जास्तच खर्च करावयास हवा, असा आग्रह धरला. सर्वच व्याख्यान आकडेवारीने आणि बिनतोड युक्तिवादाने या प्रकारे नटलेले असल्यामुळे त्यातील प्रतिपाद्य सर्वांच्या मनावर विशेष ठसले यात नवल नाही.[1]

या व्याख्यानात, मध्यप्रांताची बाजू मांडताना, करांचा बोजा व सुधारणाप्रियता या दोन बाबतींत केतकरांनी अनेक प्रांतांची तुलना केली होती आणि तीत बंगाल प्रांतावर सपाटून तोंडसुख घेतले होते. त्यामुळे त्यांच्या बंगालद्वेषावर तेव्हा वृत्तपत्रात नि लोकचर्चेत थोडीफार टीका झाली आणि त्या कारणानेही हे व्याख्यान गाजले. राष्ट्रगुरूची उच्चतम भूमिका घेऊन राष्ट्राला वैचारिक मार्गदर्शन करण्यासाठी केतकर बाहेर पडले होते. पण त्या भूमिकेला साजेशी बुद्धी जरी त्यांना लाभली होती तरी त्या भूमिकेला साजेशी प्रशांत नि समावेशक वृत्ती त्यांना कमावता आली नव्हती. एखाद्या ज्वालामुखीतून लाव्हा, राख नि धूर यांचे लोटच्या लोट जसे बाहेर पडावे तसे विचार नि विकार त्यांच्या अस्वस्थ प्रकृतीतून बाहेर पडत. त्यामुळे त्यांच्या भूमिकेची सलग घडी विसकटे आणि तीत असंगती वा विसंगती यांची गुंतागुंत उत्पन्न होई. या वेळी तसेच होऊन, उत्कृष्ट विचारांनी भरलेल्या आपल्या व्याख्यानात त्यांनी बऱ्याच राजस विकारांना वाट करून दिली. परदेशात असल्यापासून त्यांचे बंगाली लोकांबद्दल बरे मत नव्हते. अमेरिकेत किंवा इंग्लंडमध्ये बहुसंख्येने जाणारे बंगाली विद्यार्थी "हिंदुस्थानच्या नावाची बदनामी करणारे" वर्तन तेथे करतात असा त्यांचा अनुभव होता. विवेकानंदांसारख्या जगद्विख्यात विभूतीबद्दलही त्यांनी अमेरिकेत असा लौकिक ऐकला होता, की त्यांना स्त्रीसहवास नि शृंगार विशेष प्रिय होता![2] कलकत्त्याची स्वतःची नोकरी सुटली तेव्हा बंगाली सहिष्णुतेचा त्यांना आलेला अनुभव कडूच होता. तेव्हा बंगालबद्दल त्यांच्या मनात जे काही खुटखुटत नि धुमसत होते ते सारे या व्याख्यानात त्यांनी ओकून टाकले. या व्याख्यानात बंगाली लोकांवर प्रहार करणारी जी वाक्ये त्यांनी उच्चारली त्यांतील काही वाक्ये नमुन्यादाखल बघण्यासारखी आहेत. ते म्हणाले :

"बंगाल प्रांत श्रीमंत असता त्याच्यावर सर्वांत कमी कर, हा न्याय कोठला?"... "बंगाल प्रांतातील लोकसंख्येला स्वायत्तता आणि विविधकर्मकर्तृत्व या प्रगतीच्या चिन्हांचा अभाव आहे."..."मध्यप्रांतीय म्युनिसिपालिट्यांमध्ये शिक्षकत्व विशेष

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे २३, २६; 'मध्यप्रांतास संदेश', संकीर्ण लेख, पृष्ठ १५०; महाराष्ट्र, २५ ऑगस्ट १९१५, १ सप्टेंबर १९१५.

२. आठवणी, केतकर, प्रतिभा, २३ नोव्हेंबर १९३४.

आहे आणि बंगाली म्युनिसिपालिट्यांमध्ये भंगीपणा विशेष आहे."..." बंगाली लोकांवर आणि त्यांच्या पुढाऱ्यांवर टीका करण्यास येथे अवकाश नाही आणि हेतू नाही. तसा हेतू जर माझ्या मनात असेल तर पुष्कळच भेंडोळी बाहेर काढीन."... "महाराष्ट्रातील लोक हिंदुस्थानविषयक प्रश्नांचा खल करीत असता बंगालमधील लोक केवळ आपले प्रांतिक हित पाहात आहेत."..."लोकांस उपाशी ठेवण्याचा हक्क आपल्याकडे सरकारकडे आहे आणि बंगालमध्ये जमीनदारांकडे आहे, हा बंगाल व मध्यप्रांत यांमध्ये महत्वाचा फरक आहे. दुसरा फरक म्हटला म्हणजे हा हक्क आपल्याकडील सरकार जितक्या कसोशीने बंगाली जमीनदार बजावतात तितक्या कसोशीने बजावीत नाही."..."बंगाली लोकांस पूर्णपणे जंगली म्हणण्यास हरकत फक्त दोन गोष्टींची आहे. एक गोष्ट म्हटली म्हणजे समाजसरोवरावरील पुढारीरूप शेवाळ इंग्रजी शूद्रत्वाच्या संस्कृतीने युक्त असल्यामुळे सुधारलेले दिसते; आणि दुसरी गोष्ट ही, की जंगली लोकांचा कणखरपणा बंगाली लोकांत नाही."[1]

केतकरांनी बंगाली लोकांवर हे जे प्रहार केले त्यांत सत्यांश मुळीच नव्हता, असे नाही. उदाहरणार्थ, बंगाली म्युनिसिपालिट्यांमध्ये भंगीपणा विशेष आहे, असे जे विधान त्यांनी केले, त्यामागे बंगाली म्युनिसिपालिट्यांत भंग्यांवर प्रमाणतः जास्त खर्च होतो, ही आकडेवारीने सिद्ध झालेली वस्तुस्थिती होती. पण सत्यांश असला तरी आपली विधाने त्यांनी अशा पद्धतीने केली होती, की त्यांत त्यांचा संताप उघडउघड दिसत होता. त्यांच्या राष्ट्रीय स्वाभिमानाला आणि महाराष्ट्राभिमानाला बंगाली लोकांचे वर्तन बोचले होते, हे खरे. पण समाजाचे नेतृत्व करायला निघाल्यावर काही गोष्टींबद्दल मौन धारण करण्याचा जो सभ्य दंभ स्वीकारावा लागतो तो त्यांना स्वीकारता आला नाही. मनातले सारे विचार नि विकार ते अनिर्बंध उद्गारून टाकीत; आणि प्रत्येक सार्वजनिक पुरुषाची एक साचेबंद सलग भूमिका पाहाण्याची सवय झालेला आपला समाज त्यामुळे भांबावून जाई. या वेळी, मध्यप्रांतातील लोकांना नवा प्रकाश दाखविणाऱ्या उत्कृष्ट विचारप्रवर्तक व्याख्यानात बंगाली लोकांसंबंधीचे आपले राजस विकार त्यांनी मिसळून दिले, बंगाली लोकांवर शाब्दिक कोरडे ओढले, आणि काहीसा तसाच प्रकार घडला. त्यांच्या प्रखर बुद्धीने थक्क झालेले नागपूरकर त्यांच्या विकारशील दांडगाईमुळे गोंधळून नि बावरून गेले![2] पण केतकरांच्या जटिल नि जोरकस व्यक्तिमत्वाने गोंधळून जाण्याचा महाराष्ट्रावरचा हा पहिलाच प्रसंग होता. अजून अशा कित्येक प्रसंगांचा अनुभव भावी काळात महाराष्ट्राला यावयाचा होता.

मध्यप्रांताच्या उत्पन्नाप्रमाणे वऱ्हाड प्रांताच्या उत्पन्नाकडेही या वेळी केतकरांचे लक्ष वेधले होते. आंध्र, मध्यप्रांत यांना जसे मार्गदर्शन आपण केले तसे वऱ्हाडलाही

१. महाराष्ट्र, २५ ऑगस्ट १९१५, १ सप्टेंबर १९१५.

२. उदाहरणार्थ, या. श्री. अणे यांचे पत्र, महाराष्ट्र, ८ सप्टेंबर १९१५.

कामाने. या हेतूने वऱ्हाडच्या उत्पन्नाच्या त्यांनी अभ्यास केला आणि असा निष्कर्ष काढला, की वऱ्हाडचा पैसा प्रमाणाबाहेर मध्यप्रांताकडे खर्च होत होता. आपल्या या निष्कर्षासंबंधी एक लेख उमरावतीच्या 'कर्तव्य' पत्रात त्यांनी लिहिला आणि एक तक्रारवजा टाचण वऱ्हाडचे कमिशनर बी. पी. स्टँडेन यांच्याकडे पाठवून दिले. त्यांचा हा उद्योग नागपूरच्या काही मंडळींना अर्थातच आवडला नाही; कारण त्यामुळे मध्यप्रांताला वऱ्हाडकडून मिळणाऱ्या उत्पन्नाला कात्री लागणार होती. पण त्यांच्या उद्योगामुळे वऱ्हाडातील अनेक पुढारी जागे झाले आणि त्यांनी वऱ्हाडवरील खर्च वाढवून घेण्यासाठी हालचाल करण्यास सुरवात केली. पुढे, १९३५ च्या कायद्यात, त्या हालचालींना यश येऊन असे तत्व मान्य झाले, की वऱ्हाडचा पैसा प्रमाणाबाहेर मध्यप्रांताकडे खर्च होऊ नये.[1]

या सुमारास मध्यप्रांतात नागपूर विद्यापीठाच्या प्रस्थापनेचा प्रश्न घाटत होता आणि आपल्या कल्पनांशी तो निगडित असल्यामुळे केतकरांनी साहजिकच त्यात लक्ष घातले होते. १९११ साली इंग्लंडात असतानाच त्यांनी मध्यप्रांताच्या सरकारकडे एक पत्र पाठविले होते व नागपूर-विद्यापीठ केवळ परीक्षा घेणारे न होता शिक्षण देणारेही व्हावे, त्यात देशी भाषांतून शिक्षण मिळावे वगैरे विचार त्यामध्ये मांडले होते. इंडिया कौन्सिलचे व्हाइस प्रेसिडेंट सर थिओडोर मॉरिसन, लंडनमधील काही प्रमुख अँग्लोइंडियन मंडळी नि मध्यप्रांत-वऱ्हाडमधील काही प्रमुख गृहस्थ यांच्याकडे पत्रद्वारे आपले विचार कळवून त्यांनी आपल्या विचारांना थोडाफार पाठिंबाही तेव्हा मिळवला होता. आता हिंदुस्थानात नि मध्यप्रांतात आल्यावर, संधी मिळताच पुन्हा त्यांनी नागपूर विद्यापीठासंबंधी एक व्याख्यान सप्टेंबर १९१५ च्या प्रारंभी नागपूर येथे दिले आणि त्या प्रश्नाला आणखी चालना दिली. या व्याख्यानात 'सुधारणात्रयी'ची आपली विचारसरणी त्यांनी फिरून मांडली आणि "युनिव्हर्सिटी म्हणजे समाजसंस्कृतीची धारक आणि संवर्धक अशी संस्था आहे" या कल्पनेची फोड करून त्यासाठी युनिव्हर्सिटीत देशी भाषांतून शिक्षणाची व्यवस्था कशी करता येईल याबद्दल व्यवहार्य सूचना केल्या. त्यांचे हे व्याख्यानही मध्यप्रांताच्या उत्पन्नावरील व्याख्यानाप्रमाणे चांगले परिणामकारक झाले. व्याख्यानानंतर, नागपूर विद्यापीठात देशी भाषांतून शिक्षणाची व्यवस्था व्हावी म्हणून लोकमत प्रदर्शित करण्याच्या चळवळीला त्यांनी हात घातला. लोकमत प्रदर्शित करण्यासाठी व विद्यापीठासंबंधी सूचना मांडण्यासाठी जो अवधी ठेवलेला होता तो थोडा होता आणि त्याची शेवटची तारीख नजीकच्या प्रांतिक परिषदेच्या तारखेपूर्वी पडत होती. तेव्हा प्रांतिक परिषदेत लोकांचे मत प्रदर्शित होऊन उपयोग नसल्यामुळे त्यांना वऱ्हाडभर स्वतःच हिंडावे लागले. त्यांनी वऱ्हाडभर हिंडून, देशी भाषांत विद्यापीठाने शिक्षणाची सोय करावी ही कल्पना अनेक सुशिक्षितांना पटवून दिली आणि

१. 'वऱ्हाड आणि निजाम', विद्यासेवक, डिसेंबर १९३५.

तीनचारशे सह्यांचा एक अर्ज सरकारकडे पाठविला. त्यांच्या या प्रयत्नाला तात्कालिक यश फारसे मिळाले नसावे; पण मुंबई प्रांतातील विद्यापीठांपेक्षा देशी भाषेत शिक्षणाची व्यवस्था करण्यामध्ये नागपूर-विद्यापीठाने आघाडी मारली, असा पुढील इतिहास मात्र आहे.[१]

याच वेळेस 'लोकशिक्षणा'च्या वैशाख शके १८३७ च्या अंकात त्यांनी 'स्वार्थ-त्यागाची मीमांसा' हा लेख लिहिला व पुण्यामुंबईकडील नि विशेषतः फर्ग्युसन महाविद्यालयातील विद्वद्वर्गात खळबळ उडवून दिली. स्वार्थत्याग समाजहितासाठीच झाला पाहिजे आणि स्वार्थत्यागासाठी स्वार्थत्याग करण्याची प्रथा पडता कामा नये, अशी या लेखात त्यांची मूलभूत भूमिका होती. या भूमिकेस अनुसरून, स्वार्थत्यागाची जी पोकळ स्तुतिस्तोत्रे त्या काळात गायली जात होती त्यांवर त्यांनी कोरडे ओढले व स्वार्थत्यागाची स्तुती करण्यापूर्वी तो पुरेसे नि योग्य समाजहित साधणारा आहे की नाही याची परीक्षा झाली पाहिजे, असा इशारा दिला. ज्याने समाजहित होणार नाही किंवा त्याग केलेल्या व्यक्तिहितापेक्षा कमी समाजहित होईल तो स्वार्थत्याग अयोग्य व मूर्खपणाचा होय, ती दारिद्र्याचीच उपासना होय, अशी विचारसरणी मांडून तिच्या स्पष्टीकरणासाठी त्यांनी फर्ग्युसन कॉलेजचे उदाहरण घेतले. त्या उदाहरणात त्यांनी असे म्हटले, की 'जे कार्य फर्ग्युसन करीत आहे तेच कार्य सरकारी विद्यालयांतूनही तितक्याच चांगल्या रीतीने होऊ शकते. तेव्हा स्वार्थत्यागपूर्वक कमी पगार घेऊन ते कार्य करीत राहिल्याने काही विशेष समाजहित साधते असे म्हणता येत नाही.' असे कार्य केल्याने स्वार्थत्यागाचा थोर धडा तरुण पिढीला घालून दिल्यासारखा होतो, हा युक्तिवादही त्यांना मान्य नव्हता. कारण त्यांच्या मते "अधिक उच्च ध्येयाची कल्पना न देता जे केवळ द्रव्यार्जनविषयक महत्वाकांक्षा तरुणांच्या डोक्यातून घालवून देतात ते देशहित साधीत नाहीत." 'ते देश दरिद्री बनवतात.' फर्ग्युसन महाविद्यालयाने आपला त्याग सत्कारणी लावण्यासाठी, इंग्रजीतून शिक्षण देऊन परकीय संस्कृतीचा फैलाव करण्याचा उद्योग सोडला पाहिजे आणि देशी भाषांतून शिक्षण देऊन स्वदेशी संस्कृती अधिक बलिष्ठ व अधिक प्रगत करण्यासाठी झटले पाहिजे, अशी त्यांची सूचना होती. त्यांच्या या लेखामुळे, स्वार्थत्यागपूर्वक शिक्षणसंस्था चालविणाऱ्या महाराष्ट्रातील एका थोर परंपरेला लहानसा धक्का बसला आणि आत्म-परीक्षणाला त्या संस्थांतील काही मंडळी थोडीशी प्रवृत्त झाली. त्या वेळचे केसरी, लोकशिक्षण वगैरे पत्रांतील लेख चाळले, की या घटनेची चांगली कल्पना येते.[२]

केतकरांचे हे उद्योग चालू असता त्यांच्या व्यक्तित्वाचे एक उच्च पातळीवरील

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ २६, २७; महाराष्ट्र, ८ सप्टेंबर १९१५.

२. लोकशिक्षण, ज्येष्ठ शके १८३७, रा. ठकार यांचा लेख; लोकशिक्षण, कार्तिक शके १८३७, 'फर्ग्युसन कॉलेज', केतकर; केसरी, ७ डिसेंबर १९१५, वि. गं. भट यांचे पत्र-

दर्शन महाराष्ट्राला घडत होते. पण त्यांचे व्यक्तित्व बहुरंगी होते आणि त्यामध्ये वेगळ्या पातळीवरच्या कळाही अनुस्यूत होत्या. तेव्हा त्या कळासुद्धा प्रसंगाप्रसंगाने महाराष्ट्राला दिसाव्या हे साहजिक होते. या काळात केव्हातरी, उमरावतीच्या वाचनालयात 'पाश्चिमात्य विवाहपद्धती'वर स्त्रियांसाठी त्यांचे एक व्याख्यान झाले. त्या व्याख्यानात आपल्या लज्जावती नि संकोची महाराष्ट्रीय महिलांपुढे अमेरिकेतील प्रीतिविवाहाचे उघडेवाघडे वर्णन करण्यास त्यांनी मागेपुढे बघितले नाही. अमेरिकेतल्या तरुणी प्रेमाचे चाळे कसे करतात, 'सावज' कसे पकडतात, त्यांना विवाहापूर्वी मुके कसे मिळतात, नि प्रेम जमवण्यासाठी त्यांना अनुनय कसकसा करावा लागतो, ते गंभीर निःसंकोचपणाने त्यांनी सविस्तर निवेदन केले! तेव्हा व्याख्यानानंतर त्या महिलावर्गात कुजबूज उठली, की 'काय मेल्याने व्याख्यान दिले!'...'चावट मेला!'...'आम्ही समोर कोण बसलो होतो? गरती बायकाच ना?'...वगैरे वगैरे. 'मध्यप्रांतापुढील प्रश्न' या व्याख्यानातील बंगाली लोकांवरील भडिमार बघून नागपूरची मंडळी जेवढी थक्क झाली नसतील तेवढ्या उमरावतीच्या या महिला सदर व्याख्यानाने थक्क होऊन गेल्या! तत्कालीन रूढ शिष्टाचार सदर व्याख्यानात त्यांनी उघडउघड गुंडाळून ठेवला होता![१] दुसऱ्या एका प्रसंगी ते यवतमाळला व्याख्यानासाठी गेले होते, तेव्हाही त्यांनी अशीच गंमत केली. व्याख्यान ऐन रंगात आले, तेव्हा व्याख्यानाच्या व्यवस्थापकांना त्यांनी सांगितले, की 'मला भूक लागली आहे!' आणि व्यवस्थापकांकडून त्यांनी चिवडा मागविला. मग एकीकडे चिवड्याचे बोकाणे भरीत दुसरीकडे आपले व्याख्यान त्यांनी चालू ठेवले![२] त्यांचे उच्च विचार नि थोर उद्योग बघून स्तिमित झालेले लोक त्यांच्या व्यक्तित्वामधील या तऱ्हेच्या कळा बघून बुचकळ्यात पडत नि मनात म्हणत, 'ही अनाकलनीय अजब वल्ली आहे!'

हिंदुस्थानात आल्यावर पाश्चात्य केतकरांनी पदवीधरांचा क्षुण्ण मार्ग सोडून दिला होता आणि राष्ट्रगुरूची किंवा राष्ट्रीय विचारप्रवर्तकाची भूमिका घेतली होती. ती भूमिका घेऊन ते सारखा प्रवास करीत होते आणि प्रवास करता करता जेथे जातील तेथे विचारांचा उठाव करीत होते. एखादे चक्रीवादळ जसे या प्रदेशातून त्या प्रदेशात फिरावे तसेच जणू ते फिरत होते आणि पालापाचोळा नि धुरोळा उडवीत सर्वत्र चैतन्य भरीत होते! पण राष्ट्रगुरूच्या भूमिकेमध्ये त्यांचे मन कायमचे स्थिरावले होते, असे मात्र म्हणता येत नाही. राष्ट्रगुरूचे विचारप्रवर्तनाचे कार्य बरेचसे अमूर्त आणि अदृश्य होते. ते फारच व्यापक असल्याने त्यावर आपले व्यक्तिसर्वस्व त्यांना केंद्रीभूत करता येत नव्हते. त्यामुळे एकतऱ्हेचे असमाधान त्यांच्या मनात वावरत होते. विशेषतः नामदार गोखल्यांच्या मृत्यूनंतर काहीतरी मूर्त, मर्यादित नि निश्चित स्वरूपाचे कार्य हाती

१. आठवणी, बा. सं. गडकरी.
२. आठवणी, य. खु. देशपांडे.

घ्यावे, अशी इच्छा त्यांच्या मनात उत्पन्न झाली होती आणि आंध्र ज्ञानकोशाचे कार्य मद्रासला बघितल्यापासून ती इच्छा मराठी ज्ञानकोशाच्या कल्पनेभोवती घिरट्या घालू लागली होती. देशी संस्कृतीच्या व भाषांच्या संवर्धनाचे जे ध्येय त्यांना आकृष्ट करीत होते ते ध्येय ज्ञानकोशाच्या रचनेत साध्य होऊ शकेल, याची जाणीवही स्पष्टपणे त्यांना झाली होती. शिवाय, प्रयत्न करूनदेखील पोटाचा मनाजोगता उद्योग त्यांना अजून-पर्यंत सापडला नव्हता; आणि ज्ञानकोशाचा उद्योग पोटापुरते धन देऊन आपली कार्यपिपासा परिपूर्ण शमवील, असे त्यांना वाटू लागले होते. आंध्रप्रांतातून नागपूरला परतल्यावर त्यांनी या उद्योगाबद्दल जे लोकमत अजमावले त्यावरून या उद्योगाच्या यशाबद्दल त्यांना विश्वास उत्पन्न झाला होता. तेव्हा १९१५च्या अखेरीअखेरीस राष्ट्रगुरूची आपली भूमिका त्यांनी सोडून दिली आणि मराठी ज्ञानकोशाच्या रचनेचे काम हाती घेतले.[१] त्या कामात पुढे बाराचौदा वर्षे ते गढून गेले आणि त्या कामामुळे महाराष्ट्रात नि भारतात त्यांचे नाव अजरामर झाले. मात्र ज्ञानकोशाच्या कामात आपली राष्ट्रगुरूची भूमिका त्यांनी अजिबात सोडून दिली असे नाही. राष्ट्राच्या सर्व अंगांना चालना देण्याचे जे कार्य त्या भूमिकेत अभिप्रेत होते ते त्यांनी ज्ञानकोशाच्या द्वारेही चालूच ठेवले. फक्त त्याचे क्षेत्र महाराष्ट्रापुरते मर्यादित केले आणि त्याचे स्वरूप अधिक मूर्त बनविले. जणू इतस्ततः भ्रमणारे आपले चक्रीवादळ यापुढे त्यांनी एका प्रचंड पवनचक्कीच्या चाकात शक्य तेवढे गुंतवून टाकले!

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ २६.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप
अनुक्रम २५८१७ वि:
क्रमांक ६२८ नों: दि:

## ज्ञानकोशास प्रारंभ

[१९१५ ते १९]

परिपक्व झालेली परिस्थिती आणि कर्तबगार व्यक्तींचे प्रयत्न यांची सांगड पडली, की तीमधून मोठी कार्ये उभी राहात असतात. 'महाराष्ट्रीय ज्ञानकोशा'च्या बाबतीत अशी सांगड पडण्याचा सुयोग जमून आला होता. केतकरांनी 'महाराष्ट्रीय ज्ञानकोशा'च्या कार्याला हात घातला त्या वेळी महाराष्ट्रीय लोकांच्या उपयोगासाठी संचित ज्ञानाचे व्यवस्थित संकलन होणे जरुरीचे होऊन बसले होते. दहाव्या शतकाच्या सुमारास जन्म पावलेल्या मराठीमध्ये तोवर नाना तऱ्हेचे ज्ञान उत्पन्न होऊन ठिकठिकाणी साचून राहिले होते; मराठी लोकांच्या हिताहिताशी संबद्ध असे ज्ञान इंग्रजी, फ्रेंच, जर्मन वगैरे परकीय भाषांतून मोठ्या प्रमाणावर उत्पन्न झालेले होते आणि संस्कृतादी स्वकीय भाषांतील पुष्कळसे उपयुक्त ज्ञानही मराठीत येण्याची वाट बघत तुंबून पडले होते. या ज्ञानाचा तावडतोबीने उपयोग करता यावा व प्रगतीचा मार्ग खुला व्हावा, म्हणून हे ज्ञान पाखडून घ्यावयास हवे होते आणि त्याची मांडणी सुसूत्र करून घेणे जरूर होते. हे सारे ज्ञानकोशाची रचना करूनच साध्य होणे शक्य होते; आणि ज्ञानकोशरचनेचा मार्ग तोवर मराठी लोकांना स्पष्टपणे दिसूही लागला होता. पाश्चात्यांच्या संसर्गामुळे ज्ञानकोश म्हणजे काय आणि त्याचा उपयोग तयार ज्ञान जलद मिळविण्यासाठी कसा होतो, हे इंग्रजी सुशिक्षितांना ठाऊक झाले होते. विशेषतः 'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका'च्या ज्या आवृत्त्यांमागून आवृत्त्या निघत होत्या व त्याची जी अकरावी प्रचंड आवृत्ती १९११ साली प्रसिद्ध झाली होती, त्यामुळे विचारवंतांच्या मनावर विशेष परिणाम झाला होता आणि इंग्रजी एन्सायक्लोपीडियाप्रमाणे मराठीतही ज्ञानकोश व्हावा अशी तीव्र इच्छा त्यांच्या मनात चाळवू लागली होती. मराठीच्या ज्या भारतीय भाषाभगिनी होत्या त्यांपैकी काहींनी ज्ञानकोशरचनेच्या बाबतीत बरीच आघाडी मारली होती आणि डोळस महाराष्ट्रीय विद्वानांना त्यामुळेदेखील चेतना मिळत होती. तेलगू, बंगाली, हिंदी, गुजराथी, उर्दू यांसारख्या भाषांत तोपर्यंत ज्ञानकोश तयार झाले होते, किंवा तयार होण्याच्या मार्गाला

लागले होते. साहजिकच भाषाभगिनींचे हे प्रयत्न बघून मराठीला स्फूर्ती मिळावी, यात नवल नव्हते. महाराष्ट्रात ज्ञानकोशाच्या रचनेचे प्रयत्न त्या काळी आपल्या परीने होऊन राहिले होते. श्री. जनार्दन हरी आठल्ये किंवा डॉ. सांबारे यांच्यासारख्या गृहस्थांनी अव्वल इंग्रजी अमदानीतच मराठी ज्ञानकोश काढण्याची खटपट केली होती; पण दुर्दैवाने ती सफल झाली नव्हती. १९०६च्या पुणे येथील साहित्यसंमेलनात प्रा. विष्णू गोविंद विजापूरकर यांनी व इतर वक्त्यांनी 'मराठी विश्वकोश' व्हावयास पाहिजे, अशी हाक दिली होती आणि सुबुद्ध महाराष्ट्र ज्ञानकोशाच्या रचनेसाठी उन्मुख आहे, याची साक्ष पटविली होती. परिस्थिती अशी चोहो बाजूंनी परिपक्व होत चालली होती;—तेव्हा १९१५-१६ साली केतकरांसारखी कर्तबगार व विद्वान व्यक्ती 'महाराष्ट्रीय ज्ञानकोशा'च्या रचनेसाठी पुढे सरसावल्यानंतर तिच्या हाताला यश येत गेले, हे स्वाभाविक होते.[१]

मात्र परिस्थिती परिपक्व असली तरी कार्य सोपे होते अशातला भाग नव्हता. मराठीतील आणि संस्कृत, इंग्रजी वगैरे अन्य भाषांतील शेकडो ग्रंथ धुंडाळावे लागणार होते. त्यांतील ज्ञानाचे परीक्षण करून त्यात ग्राह्य कोणते व अग्राह्य कोणते ते ठरविणे जरूर होते. पुष्कळसे ज्ञान ग्रंथांत न उतरता लोकव्यवहारातच वावरत होते; ते प्रत्यक्ष चौकशी करून गोळा करावयास हवे होते. जेथे ज्ञानात उणिवा नि फटी होत्या तेथे त्या शक्य तेवढ्या बुजविण्याशिवाय गत्यंतर नव्हते. गोळा केलेले सारे ज्ञान एका सूत्रात गुंफून त्याची सुव्यवस्थित मांडणी व्हावयास हवी होती. ज्ञानकोशामधून जुन्याचा आढावा घेऊन नव्याचा लाभ घेण्याची डोळस शक्ती यावी, अशी अपेक्षा होती. त्यासाठी संकलन नि मांडणी यांच्यापलीकडे जाऊन समाजाच्या असंख्य अंगांना भविष्य-कालासाठी मार्गदर्शन करणारी द्रष्ट्याची व्यापक बुद्धी ग्रंथात सर्वत्र प्रकाशाचे झोत टाकीत राहील, अशी व्यवस्था होणे अगत्याचे होते. बरे, हे सारे बौद्धिक कार्य झाल्याने भागण्यासारखे नव्हते. या बौद्धिक कार्याबरोबर प्रचंड संघटना उभी व्हावयास हवी होती. विद्वानांना कार्याला जुंपावयाचे होते, त्यांची जूट टिकवावयाची होती, त्यांच्या वेतनाची व्यवस्था करावयास हवी होती आणि त्यांची कामगिरी कागदावर उमटून वाचकांच्या हाती पडावी यासाठी लाखो रुपयांचे द्रव्यबळ नि मुद्रणाची, प्रचाराची वगैरे मोठी यंत्रणा सिद्ध करणे आवश्यक होते! या साऱ्यासाठी नुसता प्रकांडपंडित उपयोगी पडला नसता; तो समाजाला मार्गदर्शन करू शकणारा द्रष्टा असावयास हवा होता. तो द्रष्टा असूनही भागण्यासारखे नव्हते; तो कर्तबगार असा असामान्य संघटक असणे अपरिहार्य होते! कार्य असे अवघड नि असामान्य होते. ते कार्य अव्वल इंग्रजी अमदानी-पासून महाराष्ट्राला आव्हान देत होते; पण ते आव्हान स्वीकारून विजयी होणारा पुरुष

१. केसरी, १३ व २० सप्टेंबर १९२१; ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे २१, २२, परिशिष्ट-पृष्ठे २, ३; 'अर्वाचीन मराठी साहित्य' या ग्रंथातील 'अर्वाचीन कोशवाङ्मय' हा लेख, चिं. ग. कर्वे; महाराष्ट्र, ५ जुलै १९१६.

शतकभरात पुढे आला नव्हता. केतकरांनी मात्र ते आव्हान हसतहसत स्वीकारले आणि लीलया त्यात त्यांनी यशही संपादन केले!

१९१५ च्या ऑगस्टच्या सुमारास ज्ञानकोशाची कल्पना केतकरांनी प्रथम नागपूरला मूर्त स्वरूपात डॉ. मुंजे, डॉ. चोळकर, श्री. माधवराव पाध्ये वगैरे मंडळींच्या बैठकीमध्ये मांडली. त्या वेळी काहींनी म्हटले, की या अवाढव्य योजनेत अपयश येणार हे नक्की; पण एक सत्कार्य म्हणून ती राबवून पाहावी! बहुतेकांनी ही योजना म्हणजे "एक मौजेचा, महत्वाकांक्षी, परंतू फाजील महत्वाकांक्षी व त्यामुळे हास्यास्पद" असा कार्यक्रम होय म्हणून तिची बोळवण केली,[1] पुढे अधिक नेटक्या स्वरूपात योजना जेव्हा १९१७ साली प्रसिद्ध झाली, तेव्हा एका साहित्यिकाला केतकरांच्याने ती पेलवणार नाही, अशी भीती पडली. बंगाली 'विश्वकोश' किंवा गुजराथी 'ज्ञानचक्र' तयार करणाऱ्या संपादकांची जी विद्वत्ता व योग्यता होती ती केतकरांच्यामध्ये नाही, असे या साहित्यिकाचे मत होते.[2] अनेक सर्वसामान्य लोकांनाही असे वाटत होते, की ज्या केतकरांना विद्यापीठात प्राध्यापकाची साधी नोकरी मिळाली नाही ते केतकर ज्ञानकोशाचे महत्कार्य कसे पार पाडणार? केतकरांनी नुकतीच तिशी ओलांडली होती; तेव्हा या तरुण विद्वानाला परिणतप्रज्ञ नि वयोवृद्ध विद्वानांना हाताखाली वागवता येणार नाही, अशी शंका काहींना वाटत होती. काहींना काळजी पडली होती, की बेकारीत स्वतः भटकणारा हा मनुष्य लाखो रुपये कसे उभे करू शकेल? त्यांच्या विक्षिप्त वागणुकीच्या आगळ्या तऱ्हा नि त्यांच्या स्वभावातील हूमदांडगा फटकळपणा ज्यांनी अनुभवला होता त्यांना तर ज्ञानकोशाचे कार्य करण्यास ते योग्य नाहीत याविषयी परिपूर्ण खात्री होती. लोकमान्य टिळकांनी ज्ञानकोशाविषयी १९१५ साली असे उद्गार काढले, की हे कार्य जवळजवळ अशक्यकोटीतील किंवा अत्यंत कठीण असे आहे![3] १९१८ च्या सुमारास कार्याला प्रारंभ झाल्यानंतर ते म्हणाले, की 'कार्य पुरे होण्यास वीस वर्षे लागतील, असा माझा अंदाज आहे'![4] इतिहासाचार्य राजवाड्यांनी तर असे भविष्य वर्तविले होते, की हे कार्य परिपूर्ण होण्यास एक हयात खर्ची पडेल![5] चारी बाजूंनी, जाणते आणि अजाणते, हितचिंतक व हितविरोधक या कार्याबद्दल अशा निरुत्साह करणाऱ्या शंका प्रदर्शित करीत होते. परंतू साधनांची प्रतिकूलता असताना केतकरांनी धडाकून कार्याला प्रारंभ केला आणि यशाचे शिखर गाठले. ते तरुण होते, ते बेकार होते; पण दुर्दम्य आत्मविश्वास, अफाट विद्वत्ता, द्रष्ट्याची समाजहितदृष्टी आणि अवाढव्य उद्योग यांच्या बळावर त्यांनी अडथळे

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ २६-२७.
२. 'मी व माझे टीकाकार', ज्योत्स्ना, जुलै १९३६.
३. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ २९.
४. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ५७.
५. आठवणी, गो. चिं. तांबे.

कोळिष्टकासारखे झटकून टाकले. मोठमोठ्यांना अशक्यप्राय वाटणारे कार्य बारापंधरा वर्षांत त्यांनी तडाख्याने, उत्कृष्ट रीतीने उरकले आणि महाराष्ट्रातील कर्तबगार पुरुषांच्या मालिकेत ते चिरंतन जाऊन बसले !

१९१५ च्या ऑगस्टमध्ये ज्ञानकोशाची कल्पना नागपूरला मांडल्यानंतर ते आपले आप्त श्री. नारायण खंडेराव फडके, वकील, यांच्या दुसऱ्या मुलाच्या मुंजीकरता उमरावतीस गेले व तेथे आपल्या कल्पनेस श्री. फडके यांचा त्यांनी सक्रिय पाठिंबा मिळविला. उमरावतीहून काँग्रेसच्या अधिवेशनासाठी डिसेंबर महिन्यात ते मुंबईस गेले व तेथेही ज्ञानकोशाची कल्पना खाजगी रीतीने जाहीर करून तिला अनेकांची सहानुभूती मिळविण्यात ते यशस्वी झाले. १९१६ च्या जानेवारीत मुंबईहून पुण्यास जाऊन, फर्ग्युसन महाविद्यालयातले प्राध्यापक व डॉ. रा. गो. भांडारकर, लो. टिळक वगैरे प्रमुख व्यक्ती यांची अनुकूलता त्यांनी अजमावली. त्यांनी केलेल्या स्वार्थत्यागाच्या तिखट मीमांसेमुळे फर्ग्युसनमधील प्राध्यापक त्यांच्यावर रुष्ट होते; पण प्रा. वासुदेवराव पटवर्धन यांनी त्यांच्याशी खिलाडूपणाची वागणूक ठेवली. प्रा. धर्मानंद कोसंबी यांनी मात्र बुद्धा-विषयी केसरीत झालेल्या वादाची आठवण उकरून काढली आणि लेखनसाह्य देण्याची टाळाटाळ केली. केतकरांनी लेखक होण्याबद्दल त्यांना विनंती केली तेव्हा ते म्हणाले, की 'तुम्ही मला वादविवाद करण्यास अयोग्य समजता आणि मग माझ्याकडे लेख मागण्यास कां येता ?' त्यावर केतकर म्हणाले, की 'तुमच्याशी वादविवाद करणे मी सोडून दिले, कारण वादविवादास लागणाऱ्या औचित्याच्या कल्पना तुम्ही सोडून दिल्या, हे होय.' तेव्हा धर्मानंद उद्गारले, की 'आम्हांला जर औचित्याच्या कल्पना नाहीत तर आम्हांला लिहायला तरी कशाला सांगता ?' धर्मानंदांच्या या उद्गारांना केतकरांनी दिलेले उत्तर मोठे मार्मिक आणि मासलेवाईक होते. ते म्हणाले, 'तुम्हांला औचित्याच्या कल्पना नाहीत, हे खरे. पण तुम्हांला मी पाली वाङ्मयावर लिहावयास सांगणार आहे. औचित्याच्या कल्पनांवर मी निराळा लेखक पाहीन !' धर्मानंदांना हे उत्तर अर्थातच आवडले नाही आणि 'तुम्ही सारस्वतांचा द्वेष करता' वगैरे आरोप त्यांनी केतकरांवर करण्यास प्रारंभ केला. तेव्हा वादावादीला केतकर कंटाळले आणि 'या भांडणाची तारीख जरा काही दिवसांनंतर ठरवू' असे म्हणून त्यांनी बोलणे आटोपते घेतले.[१]

श्री. धर्मानंद कोसंबी यांनी सारस्वतद्वेषाचा केतकरांवर जो आरोप केला त्यामागे थोडासा इतिहास होता. केतकर सारस्वतांचे द्वेष्टे नव्हते, पण सारस्वतांवर रागावलेले सारस्वतांचे एक मित्र होते. त्यांच्या जहाल राष्ट्राभिमानाची सोयरीक तरुणपणी भांडारकर-चंदावरकर यांच्या मवाळ राष्ट्रप्रीतीशी जमली नाही व भांडारकर-चंदावरकर यांच्यावर त्यांचा राग झाला हे मागे सांगितले आहे. भांडारकर-चंदावरकर हे सारस्वत

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे २७, २८.

असल्यामुळे त्यांच्यावरील रागाचा प्रसाद सारस्वतांच्या समग्र जातीलाही केतकरांनी दिला होता. ते एके ठिकाणी म्हणतात, "चंदावरकर सरकारची खुशमस्करी करणारे गृहस्थ म्हणून प्रसिद्ध होते आणि त्यांच्या वृत्तीची छाया सारस्वत समाजावर...पडली होती; आणि पेशवाई वाईट, इंग्रजी राज्य चांगले, अशा तऱ्हेचीच वृत्ती त्या वेळेस सारस्वतांत होती. सारस्वतांमध्ये महाराष्ट्रीय भावना तीव्र असलेला मनुष्य आढळतच नसे व देशाभिमानी मंडळीचा उपहास करण्याची प्रवृत्ती असे." दुसरीकडे ते म्हणतात, की "कित्येक सारस्वतांचा मी तिरस्कार करीत असे, ही गोष्ट खरी आहे; पण तो तिरस्कार ती मंडळी सारस्वत होती म्हणून करीत नव्हतो, तर त्या मंडळींचे वर्तन मला आक्षेपणीय वाटत होते म्हणून करीत होतो. मी यापुढे जाऊन सांगतो, की डॉ. भांडारकर आणि सर नारायण चंदावरकर यांच्यासारखे वर्तन जर कोकणस्थ ब्राम्हणाचे असते तर त्या व्यक्तीविषयी माझा तिरस्कार कमी नसून किंबहुना अधिकच असता." काही प्रमुख सारस्वत व्यक्ती व एकंदरीत सारस्वतांची जात यांच्याबद्दल अशी प्रतिकूल भावना केतकरांच्या मनात थोडीफार असली तरी सारस्वतांच्या जातीबद्दल तीव्र नि सरसहा द्वेषच त्यांच्या मनात होता असे नाही. कोकणस्थांचे विवाह देशस्थांशी होण्यापेक्षा सारस्वतांशी व प्रभूंशी व्हावेत, हे तरुणपणातले त्यांचे मत अनेकांना माहीत होते; आणि कोकणस्थांपेक्षा सारस्वत नि प्रभू या जातींतच त्यांचे जिवलग मित्र जास्त होते! पण आपले मत नि मन झाकून ठेवण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. तेव्हा काही सारस्वतांबद्दलची आपली प्रतिकूल भावना त्यांनी निःशंकपणे बोलून दाखविली होती आणि ते सारस्वतांचा द्वेष करतात, असा भ्रम झाला होता. त्यातच केसरीत जातिभेदासंबंधी जी लेखमाला त्यांनी लिहिली होती तीत काही सारस्वतांना झोंबतील अशी पुढील वाक्ये आली होती: "कोकणस्थ व देशस्थ ब्राम्हण आपणास पंक्तीत बसू देत नाहीत म्हणून त्यांस व जातिभेदास शिव्या देणारे, तथापी परभूंच्या पंक्तीस बसण्यात अपमान समजून उठून जाणारे सारस्वत ब्राम्हण मी पुष्कळ पाहिले आहेत." "शेणवी हे ब्राम्हणच आहेत, तथापी जोपर्यंत त्यांची सर्वमान्यता झाली नाही व जोपर्यंत परभूदेखील त्यांच्या हातचे पाणी घेत नाहीत तोपर्यंत त्यांच्या पुढारीपणाखाली जातिभेद मोडणे शक्य नाही." या वाक्यांत, सर्वच जातींप्रमाणे सारस्वतांच्या अंगात भिनलेला जातिभेद व त्यांचे समाजातील शंकास्पद उच्च स्थान यांचा सत्य उल्लेखच त्यांनी केला होता; पण त्या सत्यामध्ये सारस्वतांचे न्यून उघड होत असल्यामुळे काही सारस्वतांना तो उल्लेख झोंबला असावा. त्यांच्या सारस्वतद्वेषाची कंडी आणखी पिकण्यास ही गोष्टही कारणीभूत झालेली दिसते. हा सारा इतिहास मागे होता, म्हणूनच श्री. धर्मानंद कोसंबींनी सारस्वतद्वेषाचा आरोप त्यांच्यावर केला होता.[१]

श्री. कोसंबी यांच्याकडून केतकर डॉ. भांडारकरांकडे साह्य मागण्यासाठी गेले, तेव्हा

१. आठवणी, केतकर, प्रतिभा, २३ ऑक्टोबर व ६ नोव्हेंबर १९३३; संकीर्ण लेख, पृष्ठे ३७, ४५.

पूर्वीचाच अनुभव त्यांना फिरून आला. डॉ. भांडारकरांच्या कानी केतकरांचे डॉ. भांडारकरांबद्दलचे व सारस्वतांबद्दलचे मत आधी पोचलेले असावे आणि केतकरांच्या लेखनाची विकृत माहितीही कोणीतरी त्यांना दिलेली असावी. त्यामुळे केतकरांविषयी ते "अत्यंत वाईट कल्पना घेऊन बसले होते". आणि परिणामतः प्रारंभीच्या संभाषणात दोघांनी एकमेकांवर लहानसहान हल्लेच चढविले! भांडारकरांनी केतकरांना एक असा प्रश्न केला, की "तुम्ही शेणव्यांना काय ठरविणार आहात? ब्राम्हण ठरविणार की अब्राम्हण ठरविणार?" पण केसरीतील लेखात केतकरांनी सारस्वतांचे ब्राम्हण्य नाकारले नव्हते, उलट त्यांना ब्राम्हणच म्हटले होते. तेव्हा त्यांनी भांडारकरांना अनुकूल उत्तर दिले आणि पुढे चर्चा होताहोता भांडारकरांचे मन पुष्कळच खुले झाले. प्रथम भांडारकरांनी सहकार्याला नकार दिला होता; पण अखेर सहकार्याचे आश्वासन दिले व काही लेख तपासून देण्याचे कबूल केले![1]

केतकर वादाच्या वेळी अभिनिवेशाने भांडत, पण कार्याच्या वेळी मतभेद विसरून जाऊन विरुद्ध मताच्या माणसांकडेही सहकार्याची याचना करीत. ज्ञानकोशाच्या कामात कोसंबी व भांडारकर यांच्याकडे त्यांनी जी याचना केली ती अशा याचनेची पहिली सलामी होती.—आणि ज्ञानकोशासारख्या ज्ञानाच्या विशुद्ध कार्यात जातीय भावनांची अनेक संकटे त्यांना भावी काळात अडविणार होती, त्या संकटांचीही धर्मानंद व भांडारकर यांच्याकडे झडली ती पहिलीच सलामी होती!

केतकर टिळकांच्याकडे गेले, तेव्हा टिळकांनी ज्ञानकोशाचे कार्य अशक्यप्राय आहे, हा आपला अभिप्राय प्रथम बोलून दाखविला. पण कार्य करण्याचा पक्का निश्चय जेव्हा केतकरांनी त्यांना सांगितला, त्या वेळी सर्व प्रकारचे सहकार्य देण्याची त्यांनी तयारी दाखविली. ते म्हणाले, की 'मी स्वतः लेख लिहीन; शक्य तेवढे द्रव्यसाह्य देईन; केसरीतून तुमच्या कार्याची जाहिरात करीन आणि जे लोक भेटायला येतील त्यांच्याशी तुमच्या कार्यासंबंधाने बोलेन.' त्यांनी सहकार्याचे आश्वासन देताना केतकरांना असा इशाराही दिला, की "ज्ञानकोश करताना तुम्हांला अत्यंत निष्ठुरतेने वागले पाहिजे. लोकांचे लेख तुम्हांला तपासावे लागतील आणि मोठमोठ्या मंडळींना दुखवावे लागेल." भांडारकर, राजवाडे, टिळक यांच्यासारख्या अधिकारी व्यक्तींचे लेख तेवढे आपण जसेच्या तसे छापणार आहोत, असे केतकरांनी सांगितल्यावर टिळक उद्गारले, की "नजर सर्वांच्याच लेखांवर ठेवावी लागेल. तुम्हांला भांडारकरांना वगळावयाचे असेल तर वगळा...पण माझ्यासंबंधाने मी सांगतो, की मलादेखील वाटेल तसे लिहिण्याचे स्वातंत्र्य देता कामा नये. तसेच राजवाड्यांनाही देता कामा नये. आम्हा दोघांच्याही लेखांवर तुम्ही कात्री चालविली तर तुम्ही आपले कर्तव्यच केले असे मी समजेन." टिळकांचा हा हितोपदेश केतकरांना मोलाचा वाटला आणि टिळकांनी सहकार्याचे जे

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ २८, २९.

आश्वासन दिले त्यामुळे उत्तेजित होऊन त्यांनी पुण्याचा निरोप घेतला.[1]

पुण्याहून परतल्यावर, २६ जानेवारी १९१६ रोजी, नागपूर येथे वॉकर रोडच्या कोपऱ्यावर श्री. दाते यांच्या घरात त्यांनी भाड्याने जागा घेतली आणि तेथे ज्ञानकोशाचे कार्यालय थाटून दिले. पुण्यासारखे विद्येचे माहेरघर सोडून त्यांनी कार्यक्षेत्र म्हणून नागपूरची ही जी निवड केली तिला काही कारणे होती. 'स्वार्थत्यागाची मीमांसा' व बुद्धावर टीका करणारे जातिभेदाबद्दलचे लेख यांमुळे पुण्याकडे त्यांच्यावर जहाल पक्षाचा शिक्का बसला होता. त्यामुळे पुण्याला काम चालू केले असते तर ते पक्षविषयक राजकारणात गणले गेले असते आणि त्याची हानी झाली असती. पण पूर्वेकडील महाराष्ट्रात राजकीय पक्षांमधील भेद विशेष तीव्र नसल्यामुळे, राजकीय भेदांची झळ टाळण्यासाठी तिकडेच कार्य सुरू करणे श्रेयस्कर होते. पुण्याला लो. टिळक ही एक व्यक्ती अशी होती की तिला वगळावे तरी पंचाईत आणि न वगळावे तरी पंचाईत! टिळकांना वगळले असते तर कार्याला वजनदारपणा आला नसता आणि समाविष्ट केले असते तर मवाळांनी कार्याला उपद्रव दिला असता. हा पेच टाळण्यासाठी पुण्याकडे पाठ वळवून नागपूर पसंत करणे भाग होते. शिवाय, वऱ्हाडमध्यप्रांत ही केतकरांची जन्मभूमी असल्यामुळे नागपूरविषयी केतकरांना विशेष प्रेम होते. पुण्याच्या संस्थांनी वऱ्हाडनागपूरकडचा पैसा न्यावा व पुण्याला संस्था उभाराव्या, ही गोष्ट वऱ्हाडी मंडळींना गैर दिसे आणि केतकरांनाही तिच्याबद्दल वैषम्य असे. त्यांना वाटे, की आपला जेथे जन्म झाला, शिक्षण झाले, तेथे काहीतरी प्रचंड कार्य व्हावे; आणि त्याचा पुण्यानेच नव्हे तर साऱ्या हिंदुस्थानाने गौरव करावा! त्यातच योग असा जमला, की ज्ञानकोशाची कल्पना त्यांनी प्रथम नागपूरला प्रकट केली आणि त्यांचे आप्त, मित्र, चाहते वगैरे सर्वांनी तेथे तिला पाठिंबा दिला. तेव्हा, या सर्व कारणांचा परिणाम होऊन त्यांनी पुण्याऐवजी कार्यक्षेत्र म्हणून नागपूरच पसंत केले. दैवयोग मात्र असा होता, की स्थानिक अभिमान कितीही असला तरी कामाच्या सोयीसाठी त्यांना कालांतराने पुण्यास हलावे लागणार होते आणि पुण्यातच त्यांच्या कार्याचा उत्तुंग इमला उभा राहाणार होता.[2]

ज्ञानकोशाच्या अवाढव्य कामाला केतकरांसारख्या बेकार तरुणाने हात घातला या घटनेमुळे लोकांना जसा आश्चर्याचा धक्का बसला तसाच धक्का दुसऱ्या एका घटनेमुळेही बसला. ती घटना म्हणजे एक 'मर्यादित मंडळ (लिमिटेड कंपनी)' स्थापन करून त्याच्या द्वारे हे पवित्र ज्ञानकार्य पार पाडावयाचे असा केतकरांनी केलेला निश्चय होय. अमेरिकेत असताना 'लूज लीफ एन्सायक्लोपीडिया' किंवा 'इंटरनॅशनल एन्सायक्लोपीडिया' यांच्याशी त्यांचा जवळचा संबंध आला होता आणि हे ज्ञानकोश 'नेल्सन कंपनी' किंवा 'डॉड मीड आणि कंपनी' यांसारखी व्यापारी मंडळे काढीत होती, ही गोष्ट त्यांच्या

१ ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ २९-३०.

२ ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ३०, २३ ते २६.

मनावर ठसली होती. एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका हा ब्रिटिश ज्ञानकोश एका मंडळाच्या वतीनेच प्रसिद्ध होत होता, हेही अमेरिकेमध्ये त्यांना ठाऊक झाले होते. तेव्हा, अमेरिकेतील कल्पनांची अनेक रोपटी हिंदुस्थानच्या भूमीत आणून लावण्याचा जो उद्योग त्यांनी जन्मभर केला त्याला अनुसरून, ज्ञानकोशासाठी व्यापारी मंडळ स्थापन करण्याच्या कल्पनेचे रोपटेही त्यांनी इकडे आणून लावण्याचे ठरविले. पण ज्ञानाची व्यापारव्यवहारापासून फारकत करावी अशी तोवर आपली तऱ्हा होती; मोठमोठी वाङ्मयकार्ये संस्थानिकांच्या व धनिकांच्या कृपाप्रसादावर पुरी होत होती; आणि ज्ञानाच्या कामासाठी सामान्य मध्यमवर्ग आपल्या खिशाला चाट लावील, अशी धाडशी कल्पना कोणाच्याने करवत नव्हती. त्यामुळे ज्ञानकोशासाठी व्यापारी पद्धतीचे मर्यादित मंडळ काढण्याचा बेत त्यांनी केला, तेव्हा साहजिकच सर्वांना चमत्कारिक वाटले आणि आश्चर्याचा धक्का बसला. पण मंडळाच्या प्रस्थापनेचा निश्चय १९१५ च्या ऑगस्टमध्ये झालेल्या पहिल्या बैठकीतच त्यांनी बोलून दाखविला आणि पुढे तो त्यांनी पक्काही करून टाकला. ज्ञानकोशासाठी एक विश्वस्तनिधी उभारावा, अशी कल्पना पहिल्या बैठकीत निघाली होती; पण त्यांची व्यवहारदृष्टी फार तीक्ष्ण असल्यामुळे त्यांनी विश्वस्त म्हणून काम करणाऱ्या मंडळींनी प्रत्येकी दोन हजार रुपये निधीला द्यावेत, अशी अट घातली — आणि तेवढी रक्कम देण्यास कोणी तयार नसल्यामुळे विश्वस्तनिधीची कल्पना आपोआप बारगळली. आपली मंडळाची कल्पना त्यांनी अशा कौशल्याने अमलात आणली, की ज्ञानकोशाचे अवाढव्य कार्य मंडळाच्या यंत्रणेतून पूर्णपणे तडीस गेले. वाङ्मयनिर्मितीच्या मोठ्या कामांसाठी या तऱ्हेची मंडळे काढावी अशी काहीशी प्रथाच पुढे महाराष्ट्रात पडून गेली![1]

ज्ञानकोशाच्या मंडळासाठी पन्नास हजार रुपयांच्या भागीदाऱ्या कराव्यात व शंभर रुपयांस एक याप्रमाणे पाचशे वर्गणीदाऱ्या विकून वर्गणीचे पन्नास हजार रुपये उभे करावेत, अशी केतकरांची भांडवल-उभारणीची मूळ कल्पना होती. या कल्पनेप्रमाणे प्रत्येकी शंभर रुपयांचे पंचवीस भाग (शेअर्स) त्यांनी स्वतः घेतले होते आणि उद्यमचे संपादक रा. महादेव कृष्ण पाध्ये यांनी पंधरा भाग घेण्याचे मान्य करून त्यांच्या कल्पनेचा आद्य पुरस्कार केला होता. पुढे ते उमरावतीवरून पुण्यास गेले तेव्हा श्री. ना. खं. फडके यांनी पंधरा भाग घेण्याचे मान्य केले होते आणि अशा रीतीने पंचावन्न भागांची जुळणी होऊन मंडळाची प्रस्थापना वाट चालू लागली होती. पुण्याहून परतल्यावर २५ एप्रिल १९१६ या दिवशी मंडळाचा 'मेमोरॅंडम' व 'आर्टिकल्स ऑफ असोसिएशन' यांवर केतकरांनी अनेक लोकांच्या सह्या घेतल्या. त्यांत स्वतः केतकर आणि पाध्ये नि फडके हे त्यांचे मुख्य पुरस्कर्ते यांच्याखेरीज डॉ. ना. भा. खरे, डॉ. चोळकर, महाराष्ट्राचे संपादक श्री. गोपाळराव ओगले, डॉ. मुंजे इत्यादी प्रसिद्ध व्यक्ती होत्या.

१ ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ३० ते ३३.

८ जुलै रोजी मंडळी नोंदली गेली आणि १२ जुलै रोजी तिला नोंदणीचे प्रमाणपत्र मिळाले. कार्यारंभास अनुज्ञा मिळण्यापूर्वी १५० भाग खपणे अवश्य होते; पण त्याहून पुष्कळच जास्त, म्हणजे २०५ भाग खपले आणि ४ मार्च १९१७ या दिवशी कार्यारंभाला सरकारी अनुज्ञा मिळाली. ३१ मार्चला गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर रावबहादुर ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यारंभाचा समारंभ उत्साहाने पार पडला. ऑगस्ट १९१५ च्या सुमारास जे कल्पनेत होते त्याला सुमारे दीड वर्षाच्या खटपटीनंतर असे मूर्त स्वरूप येण्यास सुरवात झाली.[१]

ज्ञानकोश-मंडळाची नोंदणी झाली, त्या वेळी सरकारच्या मनात ज्ञानकोशाविषयी काही संशय उत्पन्न झालेला होता. आंध्र-उत्कलमधील दौरा संपवून नागपूरला परतल्यावर केतकरांनी वऱ्हाडच्या व मध्यप्रांताच्या अंदाजपत्रकांवर जी व्याख्याने दिली आणि नागपूर विद्यापीठावरील व्याख्यानात विशेषतः देशी भापांचा जो हिरीरीने पुरस्कार केला त्यामुळे त्यांच्या जहाल राष्ट्रभक्तीचा सुगावा सरकारला लागलेला होता. वऱ्हाडचे कमिशनर श्री. स्टँडेन यांच्या मनात प्रथम त्यांच्याविपयी स्नेहबुद्धी होती आणि मध्यप्रांत-सरकार त्यांना सरकारी नोकरीत घेण्यास अनुकूल होते. पण नागपूर विद्यापीठावरील व्याख्यानानंतर सरकारची त्यांच्यावरील मर्जी फिरली होती. ते एक छुपे राजकीय चळवळे असावेत असा सरकारचा बहुधा ग्रह झाला असावा व म्हणूनच एक गुप्त पोलीस त्यांच्या पाळतीवर ठेवण्याची कारवाई काही काळ सरकारने केली असावी. केतकर मात्र विनोद-बुद्धीनेच या गुप्त पोलिसाकडे पाहात असत. एकदा भुसावळ स्टेशनावर कामावरचा पोलीस बदलला आणि पहिल्या पोलिसाने दुसऱ्या पोलिसाकडे काम सोपविताना भलत्या माणसाकडे अंगुलिनिर्देश केला. अंगुलिनिर्देशाप्रमाणे तो पोलीस त्या भलत्या माणसाच्या मागे लागला, तेव्हा केतकरांनी आपण होऊन त्याची चूक दुरुस्त केली व 'तो मी होय!' हे त्याला पटवून दिले. पोलिसाचे कार्य सुकर व्हावे आणि आपलीही जिगजिग वाचावी, म्हणून ते स्वतःचे तिकीट कित्येकदा पाळतीवरील पोलिसालाच काढायला सांगत! असो. सरकारला केतकरांबद्दल असा संशय असल्यामुळे ज्ञानकोश-मंडळाची नोंद ताबडतोब आणि सुखासुखी झाली नाही. तत्पूर्वी 'रजिस्ट्रार ऑफ कंपनीज' या अधिकाऱ्याचा दुसऱ्या खात्यांशी पत्रव्यवहार झाल्याचे केतकरांना समजले होते. पुढे, तत्कालीन डायरेक्टर श्री. ह्यूम यांनी केतकरांना असे विचारले, की 'या मंडळात सरकारचा किंवा युरोपीय लोकांचा काही संबंध नसावा, असे तुम्ही योजिले आहे काय?' त्यावर केतकरांनी 'नाही' असे उत्तर दिले आणिं 'तुम्हांलाही भागीदार व्हावयास हरकत नाही' असे सांगितले. चीफ कमिशनर सर बेंजामिन रॉबर्ट्सन यांना हे मंडळ म्हणजे काही अत्यंत पुरोगामी राजकीय विचार प्रदर्शित करण्याचे साधन बनेल, अशी भीती पडली होती. त्यांनी केतकरांना विचारले, की 'तुम्ही राजकारण आपल्या ज्ञानकोशात घालणार

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ३० ते ३३, ३५-३६, ९९.

आहा काय? तुमच्या मंडळाविषयी मला थोडीशी शंका वाटत आहे, कां की तीमध्ये मुंजे व ओगले यांसारखे राजकीय मतांत जास्त पुढे गेलेले लोक आहेत.' तेव्हा केतकरांनी जबाब दिला, की 'ज्ञानकोशात राजकारण येणारच, मात्र पक्षनिष्ठ राजकारण मांडण्याचा प्रयत्न होणार नाही. राजकीय बाबतीत अगदी त्रयस्थपणाची म्हणजे 'न्यूट्रॅलिटी'ची वृत्ती राहील.' न्यूट्रॅलिटी हा शब्द सर रॉबर्ट्सन यांना आवडला व 'न्यूट्रॅलिटी राहिली नाही तर शाळांकरता मी पुस्तक घेऊ शकणार नाही' अशी सूचना त्यांनी दिली. नंतर 'केवळ पांडित्याच्या अपेक्षेमुळेच (फॉर रीझन्स ऑफ स्कॉलर्शिप अलोन) न्यूट्रॅलिटी बाळगण्यात येईल' असें स्पष्टीकरण केतकरांनी त्यांना दिले. या प्रकारानंतर ज्ञानकोश-मंडळ नोंदले गेले आणि भावी काळात सरकारकडून ज्ञानकोशाला हेतुतः कोणताही त्रास दिला गेला नाही.[१]

मांडवलाची उभारणी व मंडळाची नोंदणी यांसारख्या व्यावहारिक बाबींकडे लक्ष पुरवीत असता केतकर आपले मन संपादनाच्या ज्ञानात्मक बाबीकडेही सारखे खर्ची टाकीत होते. मंडळाला कार्यारंभ करण्याची अनुज्ञा १९१७च्या मार्चमध्ये मिळाली, पण त्यापूर्वीच त्यांनी संपादनाच्या कामाला प्रारंभ केला होता. कित्येक पदवीधर त्यांनी स्वयंसेवक म्हणून मिळवले होते व त्यांच्याकडून अनेक ग्रंथांचे गोषवारे काढून घेतले होते. कार्यारंभाचा लौकिक समारंभ साजरा झाला त्या वेळी या पदवीधर स्वयंसेवकांनी केलेले काम प्रेक्षकांना बघण्यासाठी अकारविल्हेने लावून ठेवले होते. कार्यारंभाचा उत्सव आटोपल्यावर या स्वयंसेवकांना एका ठराविक दराप्रमाणे त्यांच्या कामाचा मोबदला देण्यात आला.[२]

गोषवारे काढण्याच्या कामाला असा प्रारंभ झाला तरी एकंदर कार्याचे क्षेत्र, ग्रंथाची मांडणी, विषयांचा पसारा यांचा नीट उलगडा पडण्यासाठी 'ज्ञानकोशाच्या घटनेची योजना' कागदावर मांडली जाणे अवश्य होते. कारण सुमारे बारापंधरा वर्षे जे काम चालवयाचे, जे काम पाचपन्नास विद्वानांच्या हातून पुरे व्हावयाचे व ज्यात दहापंधरा हजार पृष्ठांचे वाङ्मय उत्पन्न व्हावयाचे, त्या कामाची सुव्यवस्थित योजना आधी झाली नसती तर गोंधळ माजला असता. तेव्हा, ३१ मार्च १९१७च्या चालकमंडळाच्या सभेपुढे केतकरांनी एक योजना ठेवली आणि तीच नंतर जनतेच्या माहितीसाठी वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केली. २५ मे १९१६च्या 'प्रॉस्पेक्टस'मध्ये एक योजना आधी अंशतः प्रसिद्ध झाली होती; पण ही नवी योजना अनुभवाने काही बदल करून व विस्तारपूर्वक मांडलेली होती. या योजनेप्रमाणे 'महाराष्ट्रीय ज्ञानकोशा'ची रचना महाराष्ट्रीय दृष्टिकोनातून व्हावी असे ठरले. म्हणजेच महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीचा

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे २६, १२-१३, ३८-३९; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे ७७.
२. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ३७-३८.

व्यापक हेतू मनात ठेवून ज्ञानाची निवड व मांडणी व्हावी, असा निर्णय घेण्यात आला. केतकर अमेरिकेत असताना 'इंटरनॅशनल एन्सायक्लोपीडिया' हा अमेरिकन ज्ञानकोश व 'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका' हा ब्रिटिश ज्ञानकोश यांच्यातील स्पर्धा त्यांनी अनुभवलेली होती. त्या स्पर्धेत इंटरनॅशनल एन्सायक्लोपीडिया काढणारी कंपनी एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकावर असा आरोप करीत होती, की 'ब्रिटानिका हा इंग्रज लोकांसाठी इंग्रज दृष्टीने लिहिलेला ग्रंथ आहे. त्यात अमेरिकेविषयीची माहिती पूर्वग्रहदूषित व अपुरी आहे. इंग्लंडातील सामान्य व्यक्तीसदेखील स्थान मिळाले आहे आणि अमेरिकेतील प्रख्यात मंडळींकडेदेखील दुर्लक्ष झाले आहे. तर हा ग्रंथ अमेरिकन गरजा पुरविणारा नव्हे आणि त्यातील पूर्वग्रहदूषित दृष्टीमुळे अमेरिकन तरुणांपुढे ठेवण्यास तो निरुपयोगी आहे'. ब्रिटानिकावरील हे आरोप वाचून केतकरांना तेव्हाच हे तत्व उमगले होते, की ज्ञानकोशात सर्व ज्ञानाचा संग्रह व्हावयाचा असला तरी त्या संग्रहाचे स्वरूप तो ज्ञानकोश ज्या समाजासाठी असेल त्या समाजाच्या गरजांप्रमाणे ठेवावे लागते. अर्थात आता त्यांनी महाराष्ट्रीय ज्ञानकोश महाराष्ट्राच्या गरजांप्रमाणे बनवावा, असे ठरविले आणि त्यामुळे त्यांचा ज्ञानकोश म्हणजे 'एन्. ब्रिट्.'ची देशी वेषातील नक्कल न ठरता त्याला स्वतंत्र अस्मिता नि स्वतंत्र महत्व आले. योजनेत नवीन संशोधन व जुन्याचे संकलन यांबद्दल असे धोरण मांडले होते, की ज्ञानकोशासाठी नव्या संशोधनात पडावयाचें नाही. फक्त उपलब्ध ज्ञान संकलित करून, तपासून व ग्राह्यांश निवडून ते अकारविल्हेने मांडावयाचे. पण नुसत्या उपलब्ध ज्ञानावर केतकरांसारख्या ज्ञानपिपासू संशोधकाची तहान भागणे शक्य नव्हते. संशोधनात पडावयाचे नाही हा सर्व ज्ञान-कोशकारांचा दंडक जरी योजनेत त्यांनी मान्य केला, तरी पुढे त्यांनी पुष्कळ अनुपलब्ध ज्ञान उपलब्ध केले आणि शेकडो पृष्ठांचे ज्ञान संशोधून ज्ञानकोशात मांडले. त्यामुळे संकलनाइतकेच नव्हे तर संकलनाहून जास्त महाराष्ट्रीय ज्ञानकोशातील संशोधनाला महत्व आले आणि तेही त्याचे एक अनन्यसाधारण वैशिष्ट्य होऊन बसले. विषय-विभागणी व ग्रंथप्रकाशन यांसंबंधी योजनेत असे म्हटले होते, की अनेक ग्रंथांचे शांतपणे पृथक्करण करावयाचे व अनेक प्रकारची माहिती मिळवून विषय पडतील तसे पद्म द्यावयाचे; सर्व ग्रंथ एकदमच सर्व विषयांसह बाहेर काढावयाचा. हा निर्णय 'आंध्र-विज्ञानसर्वस्वमू' आणि बंगाली विश्वकोश यांच्या अवलोकनावरून केतकरांनी घेतला होता. या दोन कोशांच्या संपादकांनी विषय आधी ठरविले होते आणि त्यानुसार माहिती गोळा करून एक-एक भाग तडीस नेऊन प्रसिद्ध केला होता. पण त्यामुळे अनेक विषय गळून गेले होते आणि ग्रंथाला अपूर्णता आली होती. तेव्हा केतकरांनी या प्रकारचा निर्णय घेतला आणि 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' तेलगू व बंगाली ज्ञानकोशांपेक्षा अधिक परिपूर्ण व्हावा म्हणून वाट मोकळी करून दिली. या योजनेत महाराष्ट्रीय ज्ञानकोशातील पांडित्य उच्च दर्जाचे राखले पाहिजे, ही मनीषाही उत्कटपणे व्यक्त झाली आहे. शिवाय, पृष्ठांची वाटणी विषयानुसार कशी करावी, मुख्य विषयात पोटविषय कोणते यावेत,

पारिभाषिक संज्ञा कशा वापराव्या, औपपत्तिक ज्ञान व व्यावहारिक ज्ञान यांना सापेक्ष महत्व किती नि कसे द्यावे वगैरे गोष्टी योजनेत स्पष्ट केल्या आहेत. ज्ञानकोशाला एक विस्तृत सूची जोडण्यात येईल, असे केतकरांनी या योजनेतच जाहीर केले आणि संपादनाचे नि मुद्रणाचे वेळापत्रक मांडून पाच वर्षांत कामाचा फडशा पाडण्याचा आपण चंग बांधला आहे, हेही आत्मविश्वासपूर्वक नोंदवून ठेवले![1]

ही योजना प्रसिद्ध झाल्यावर तिचे परीक्षण होऊन तिच्यावर विधायक टीका व्हावी, अशी केतकरांची अपेक्षा होती. पण चारदोन टीकाकारांखेरीज तिची दखल फारशी कोणी घेतली नाही. ज्ञानकोशाची रचना हा विषय तेव्हा महाराष्ट्रीय विद्वानांना नवा होता; त्यामुळे टीकेचे धाडस बऱ्याच जणांच्या हातून झाले नसावे आणि काही जणांनी आपल्या नेहमीच्या आळसाला अनुसरून योजनेची उपेक्षा केली असावी. परंतु फारशी टीका न झाल्यामुळे केतकरांची योजना अगदी निर्दोष होण्याचा संभव टळला आणि स्वतःच्या बुद्धीवर विसंबून वाटचाल करणे त्यांना भाग पडले.[2]

ही योजना तयार करीत असताना काही उच्च आणि व्यापक ध्येय केतकरांच्या दृष्टी-समोर तळपत होते आणि ते ध्येय साध्य व्हावे म्हणून या योजनेची मांडणी त्यांनी केली होती. योजना प्रसिद्ध झाली तरी तिचे ध्येय लोकांना कळल्याखेरीज तिचे संपूर्ण स्वारस्य सर्वांना विदित होणे अशक्य होते. तेव्हा ते स्वारस्य सर्वांना विदित व्हावे आणि सर्व महाराष्ट्र या प्रचंड उद्योगात मनाने आपला सहकारी बनावा म्हणून केतकरांनी 'लोकशिक्षणा'त ज्ञानकोशाचे ध्येय स्पष्ट करणारे दोन लेख लिहिले. शके १८४० च्या आश्विन-कार्तिकाच्या व मार्गशीर्ष-पौषाच्या अंकांमधून प्रसिद्ध झालेल्या या लेखांचा सारांश पुढीलप्रमाणे होता: "(१) महाराष्ट्रीय ज्ञानकोश म्हणजे पूर्वपरंपरागत ज्ञान आणि भविष्यकालीन स्थिती यांस जोडणारा दुवा होय. (२) आतापर्यंत झालेल्या वाङ्मयातील ग्राह्य भाग निवडणे त्याचे कर्तव्य आहे. (३) मराठी भाषेत अनेक लेखकांनी आपले एका विषयावरील विचार व्यक्त करण्यासाठी निरनिराळे शब्द योजिले असता जे भाषाद्वैत उत्पन्न झाले असेल ते काढून टाकून भाषा स्थिर करणे त्याचे कर्तव्य आहे. (४) महाराष्ट्रातील पंडितवर्गात वागत असलेले विविध ज्ञान मराठी भाषेने व्यक्त झालेच नसल्यास ते व्यक्त करण्याची संधी त्यास देणे, हेही ग्रंथकाराचे कर्तव्य होय. (५) पाश्चात्य संस्कृती व परंपरागत संस्कृती यांचे एकीकरण करण्याचे स्थान महाराष्ट्रीय ज्ञानकोश होय. (६) शेतकी व सुशिक्षित वर्गाचे धंदे हे करण्यापलीकडे महाराष्ट्रीय समाजामध्ये कार्यक्षमता नाही; तर समाजाचे कार्यक्षेत्र अधिक विस्तृत होणे शक्य होण्यासाठी वाङ्मयद्वारे जी मदत करणे शक्य असेल ती करणे ज्ञानकोशाचे कर्तव्य होय. (७) समाजात ज्या क्रिया येथे होत असतात त्यांचे उत्तान अगर परिणत स्वरूप कोठे

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, परिशिष्ट १ व पृष्ठे ९-१०.
२. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ४१.

अन्यत्र दृग्गोचर होत असेल तर ते दाखविणे हेही ज्ञानकोशाचे कर्तव्य आहे. (८) हिंदू समाजाचे व विशेषेकरून महाराष्ट्रीय समाजाचे हितसंबंध ओळखून तद्विषयक माहिती वाचकांपुढे ठेवणे हेही ज्ञानकोशाचे ध्येय आहे. ... सामान्य जनता व आपल्या देशासंबंधाने संशोधन करणारा वर्ग यांच्या ज्ञानात जे आज जमीनअस्मानाचे अंतर आहे ते काढून टाकावयाचा प्रयत्न केला पाहिजे. ... महाराष्ट्रीय ज्ञानकोश हा महाराष्ट्राचे बौद्धिक स्वातंत्र्य स्थापन करण्यासाठी झालेला प्रयत्न होय."—या सारांशावरून केतकर केवढ्या व्यापक व दूरगामी दृष्टीने ज्ञानकोशाकडे बघत होते, याची तत्कालीन विद्वानांना व समाजधुरीणांना कल्पना आली असावी. केतकरांच्या दृष्टीने ज्ञानकोश हा केवळ ज्ञानसंकलनाचाच विषय नव्हता, तर भाषिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय उत्थापनाचे ते एक प्रभावी साधन होते.

ज्ञानकोशाच्या संपादनाला प्रारंभ झाल्यानंतर प्रथम अशी एक अडचण पुढे उभी राहिली, की मराठीतील सर्व ग्रंथांतील वेचक ज्ञानाचे जर संकलन करावयाचे तर त्यासाठी सर्व ग्रंथांची एक सूची हाताशी हवी होती; पण तशी सूचीच उपलब्ध नव्हती. तेव्हा संन्याशाच्या संसाराला शेंडीपासून तयारी करावी त्याप्रमाणे मराठी ग्रंथांची एक सूची संपादित करावी, असा निर्णय केतकरांनी घेतला. सूचीच्या संपादनाचे काम त्यांनी श्री. य. रा. दाते व श्री. रा. त्र्यं. देशमूख या दोघांवर सोपविले आणि त्या दोघांनी ते काम मोठ्या जबाबदारीने व तडफेने पार पाडले. सरकारी वृत्तान्त, 'डेक्कन व्हर्नॅक्युलर सोसायटी'ने १८१० ते १९०० या कालातील पुस्तकांची केलेली यादी, 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालया'कडील मासिकांचा संभार आणि नागपूर, पुणे व मुंबई येथील ग्रंथालयांमधील पुस्तके वगैरे साधने वापरून दोघांनी सूची बनविली, तीत पुस्तकांप्रमाणे मासिकांतील लेखांचीही नोंद केली आणि अवघ्या सत्तर दिवसांत काम संपवून ते मोकळे झाले! तोवर अशी सूची कोणत्याही देशी भाषेत तयार झाली नसल्यामुळे या सूचीने ग्रंथसूचीच्या क्षेत्रात मराठीला अपूर्वाई प्राप्त करून दिली. सूचीच्या भीतभीत ज्या पाचशे प्रती काढल्या होत्या त्यांचा खप अपेक्षेबाहेर होऊन साऱ्या प्रती १९२७ पर्यंत उडून गेल्या आणि त्यांच्यावर झालेला बहुतेक खर्च वसूल झाला. ज्ञानकोश-मंडळाचे लोकांच्या डोळ्यासमोर आलेले पहिले काम म्हणजे ही सूचीच होय. तिची कष्टपूर्वक व व्यापक प्रमाणावर केलेली रचना आणि तिला जोडलेली केतकरांची सुमारे ४० पृष्ठांची विद्वत्तापूर्ण विस्तृत प्रस्तावना यांमुळे ज्ञानकोश-मंडळाबद्दल लोकांचा ग्रह एकदम अनुकूल झाला आणि कार्याचा श्रीकार तरी अत्यंत यशस्वीपणे लिहिला गेला.[१]

सूचीच्या प्रस्तावनेत मराठी भाषेच्या हिताचा अत्यंत व्यापक आणि खोल विचार केतकरांनी वाचकांपुढे ठेवला. भाषेच्या हितावर परिणाम करणाऱ्या गोष्टींचे पृथक्करण

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ४२ ते ४५, १३३, १२४; भारत (उमरावती), २८ जून १९१७.

व संशोधन करताना त्यांनी आपले समाजशास्त्रीय ज्ञान उपयोगात आणले आणि आकडेशास्त्राच्या अचूक साधनाचा कुशलतेने उपयोग केला. भाषाहितावर परिणाम करणाऱ्या गोष्टींचा जो मूलगामी शोध त्यांनी घेतला त्यातील मुख्य मुद्दे पुढीलप्रमाणे सांगता येतील : (१) महाराष्ट्रात मराठी भाषिकांची संख्या किंवा स्थूल-दार्ढ्य सापेक्षतः कमी आहे. म्हणजे गुजराथेत गुजराथी भाषिकांचे किंवा बंगालमध्ये बंगाली भाषिकांचे तेथील एकंदर लोकसंख्येत जे प्रमाण आहे त्या मानाने महाराष्ट्रातील एकंदर लोकसंख्येत मराठी भाषिकांचे प्रमाण कमी आहे. (२) मराठी भाषिकांत परस्पर-संघटन किंवा घटनादार्ढ्यही कमीच आहे; कारण बडोदे, ग्वालेर वगैरे ठिकाणी जेथे मराठी संस्थानिक आहेत तेथे प्रजा मराठी नाही व जेथे प्रजा मराठी आहे तेथे राज्यकर्ते मराठी नाहीत, ब्रिटिश किंवा मुसलमान आहेत. महाराष्ट्रामध्ये शासनाची भाषा मराठी नाही, स्थानिक ब्राम्हण महाराष्ट्रातील परक्या जमातींचे गुरू किंवा पुरोहित नाहीत वगैरे कारणेही हे घटनादार्ढ्य कमी करणारी आहेत. (३) एकंदर हिंदुस्थानच्या लोकसंख्येत १९०१ ते ११ या दशकात मराठी भाषिकांचे प्रमाण वाढले, ही गोष्ट मात्र अभिमानास्पद आहे. (४) या दशकामध्ये महाराष्ट्रातल्या महाराष्ट्रात मराठी भाषिक घटले, ही घटना शोचनीय होय. तिचा अर्थ असा होतो, की महाराष्ट्राचे स्थूल-दार्ढ्य घटत आहे. (५) ब्रिटिश मुलखातील महाराष्ट्र व इंदूर-बडोदे वगैरे मराठी संस्थाने यांतील फक्त सुशिक्षित वर्गावरच मराठी ग्रंथांचे वजन पडते. म्हणजे दोन कोट महाराष्ट्रीयांपैकी, एक कोट अडतीस लक्ष लोकांतील केवळ सुशिक्षित माणसांवर वाङ्मयाचा परिणाम होणे शक्य आहे. ही गोष्ट वाङ्मयाच्या हिताला उघडपणे अनिष्ट आहे. (६) मराठीच्या अभिवृद्धीला हिंदुत्व पोषक आहे तर ख्रिस्तीपणा व मुसलमानीपणा घातक आहे. पण १९११ पर्यंतच्या दशकात महाराष्ट्रामध्ये हिंदूंच्यापेक्षा ख्रिश्चन-मुसलमानांची भयानक वाढ झाली. गेल्या तीस वर्षांत हिंदुस्थानच्या एकंदर लोकसंख्येत हिंदू घटत आहेत नि ख्रिश्चन-मुसलमान वाढत आहेत. (७) साक्षर जनता म्हणजे वाङ्मयाचा आजचा ग्राहक वर्ग; जितकी साक्षरता जास्त तितके भाषाहित व वाङ्मयहित अधिक; पण साक्षरता महाराष्ट्रात फार कमी आहे. गुजराथेच्या निमपट नि कानडी जिल्ह्यांपेक्षा कमी साक्षरता महाराष्ट्रीय लोकांत आहे. मराठीत ग्रंथप्रकाशनही फार थोड्या प्रमाणात होते. १९०१ ते ११ या दशकात सव्वाचार कोटी बंगाल्यांमागे १०,५०० पुस्तकें आणि दीड कोट महाराष्ट्रीयांमागे फक्त २,२५० पुस्तके प्रकाशित झाली! (८) उच्च वर्गावर वाङ्मयनिर्मिती बरीचशी अवलंबून असते; पण परकी सत्ता, परभाषेचा पगडा व उच्च वर्गांनी आपले कार्य सोडून वैश्य-शूद्रांशी स्पर्धा मांडणे या गोष्टींनी उच्च वर्गाचे समाजावरील वजन कमी झाले आहे. शिवाय, सामान्यतः सर्व हिंदुस्थानात उच्च जाती घटत आहेत व कनिष्ठ जाती वाढत आहेत. महाराष्ट्राच्या वाङ्मयक्षेत्रात ज्या कोकणस्थांचे प्राबल्य आहे त्या कोकणस्थांचा संख्याक्षय होत आहे. (९) १ कोट ९८ लक्ष मराठी भाषिकांपैकी सुमारे ६ लक्ष ७५ हजार लोक पोटभाषा बोलतात. साक्षरतेचे

अल्प प्रमाण, मराठीला शासनात महत्व नसणे वगैरे कारणांनी मराठीचे पोटभाषांवरील वजन फारच कमी आहे.

भाषाहितावर परिणाम करणाऱ्या गोष्टी अशा मूलग्राहीपणे उलगडून दाखवीत असता केतकरांची दृष्टी विधायक मार्गदर्शन करण्याच्या ध्येयावर खिळलेली होती. त्यांनी जे विधायक मार्गदर्शन केले त्याचे सार पुढीलप्रमाणे होते : (१) महाराष्ट्रात हिंदूंची संख्या वाढली पाहिजे व अहिंदूंचा प्रचार थांबला पाहिजे. विशेषतः वन्य लोकांत भिक्षुक, कीर्तनकार वगैरे गेले, वन्य लोकांशी हिंदूंची लग्ने झाली, त्यांच्यात उच्च संस्कृती हिंदूंमार्फत गेली, तर ते हिंदू होतील. त्यांचे हिंदूकरण मराठीच्या वाढीला साहाय्यक ठरेल. (२) मराठी ही महाराष्ट्राच्या शासनाची भाषा झाली पाहिजे. त्यामुळे वाङ्मयाचे तर संवर्धन होईलच, पण महाराष्ट्रातील मराठी न बोलणारे लोक मराठी बोलू व लिहू लागतील. (३) साक्षरता जितकी वाढेल तितकी हवी आहे. साक्षरता वाढली, की समाजाचे सांघिक बल वाढेल, कार्यक्षमता वाढेल, वाङ्मयाचा ग्राहक वर्ग वाढेल व पोटभाषांचे बल कमी होऊन सामान्य भाषा सार्वत्रिक होईल. (४) महाराष्ट्रियांचे स्थलांतर महाराष्ट्रातील कमी लोकवस्तीचा प्रदेश वसविण्यासाठी झाले, किंवा मराठीची पोटभाषा जेथे आहे तेथे झाले किंवा वाङ्मयविहीन भाषा बोलणाऱ्यांच्या पण जवळच्या प्रदेशात झाले तर ते महाराष्ट्राच्या विस्तारास व दार्ढ्यास कारणीभूत होईल. पण स्थलांतर उपदेशाने ठरत नाही, तर सोयीने ठरते. तेव्हा अशा स्थलांतरास सोयिस्कर अशी रेल्वेरचना करण्याचा आग्रह धरण्यात यावा. उदाहरणार्थ, बस्तरकडे जाणारी रेल्वे हिंदी प्रदेशातून न जाता मराठी प्रदेशातून गेल्यास बस्तर महाराष्ट्रास मिळेल. (५) मराठी भाषिकांची संख्या वाढण्यासाठी त्यांचे मृत्यू जननापेक्षा कमी झाले पाहिजेत व त्यासाठी आरोग्यसंवर्धक उपाय योजले पाहिजेत.—वगैरे वगैरे.

भाषाहितावर परिणाम करणाऱ्या गोष्टींचे विवरण व भाषाहित साधण्यासाठी विधायक मार्गदर्शन यांखेरीज प्रस्तावनेमध्ये इतरही अनेक संबद्ध गोष्टींचा परामर्श केतकरांनी घेतला आणि सर्वांमुळे प्रस्तावनेला मोठे वजनदार स्वरूप प्राप्त झाले. हिंदुत्वाधिष्ठित राष्ट्रवादाची व सुधारणात्रयीची जी विचारसरणी पूर्वी ते प्रतिपादीत होते तिचेच विस्तरण या प्रस्तावनेत झाले होते; आणि त्या विचारसरणीचा व समाजशास्त्रीय नि आकडेशास्त्रीय ज्ञानाचा प्रकाशझोत भाषिक प्रश्नावर पडल्यामुळे त्या प्रश्नाचे स्वरूप अगदी वेगळ्या रीतीने उजळून निघाले होते. भाषिक प्रश्नाचा सर्वांगीण व मूलगामी विचार ज्यांनी ज्यांनी महाराष्ट्रात तोवर मांडला होता त्यांच्या विचारात केतकरांनी मोलाची भर घातली होती, यात शंका नाही. सूचीच्या या प्रस्तावनेमुळे ज्ञानकोशातील लेखनाची मोठ्या आशेने आणि औत्सुक्याने सुबुद्ध महाराष्ट्रीय वाट बघू लागले.

ज्ञानकोश-मंडळ ज्ञानाचे पवित्र कार्य करण्यासाठी स्थापन झाले असले तरी इतर व्यापारी मंडळ्यांमध्ये जे भांडणतंटे आढळतात त्यांपासून ते अलिप्त नव्हते. मंडळ स्थापन झाल्यापासून थोड्याच अवधीत भांडणतंट्यांना सुरवात झाली आणि त्यांना

तोंड देतादेता केतकरांचे बरेच रक्त आटले. रा. महादेव कृष्ण पाध्ये, संपादक उद्यम, हे केतकरांचे एक आद्य पुरस्कर्ते आणि मंडळाचे प्रारंभीचे अध्यक्ष होते. ते वाङ्मयाचे अभिमानी होते; सुशिक्षित मंडळींनी स्वतंत्र धंद्यात पडावे असे त्यांचे प्रामाणिक मत होते; पण केतकरांच्या समजुतीप्रमाणे, ज्ञानकोश-मंडळात येताना स्वतःच्या फायद्याचा हेतूही त्यांनी मनात धरला होता. ते ज्या 'देशसेवक' छापखान्याचे मालक होते त्या देशसेवक छापखान्यासाठी ज्ञानकोशाच्या छपाईचे काम त्यांना हवे होते आणि ज्ञानकोशाच्या सोयीपेक्षा छापखान्याच्या सोयीप्रमाणे छपाई व्हावी, अशी त्यांची अपेक्षा होती. वाङ्मयसूचीचे काम त्यांच्या देशसेवक छापखान्याकडे जेव्हा देण्यात आले तेव्हा त्यांचा आणि केतकरांचा पहिला प्रत्यक्ष खटका उडाला. वाङ्मयसूचीचे हस्तलिखित ताब्यात आल्यानंतर एक महिनाभर त्यांनी छपाईला सुरवातच केली नाही!—आणि केतकरांनी जेव्हा कामाचा तगादा लावला तेव्हा काही तरी थातुरमातुर कारणे देऊन ते तगाद्याकडे दुर्लक्षही करू लागले. केतकरांना तर छपाईची निकड होती; कारण मंडळाच्या कामाचे काहीतरी प्रत्यक्ष फळ लोकांच्या हाती देऊन मंडळाच्या कार्याला लोकांचा पाठिंबा मिळवणे त्यांना जरूर होते. तेव्हा ज्ञानकोश-मंडळाचे व्यवस्थापक या नात्याने त्यांनी श्री. पाध्ये यांच्यावर अशी सूचना (नोटीस) बजावली, की ४८ तासांच्या आत छपाईला सुरुवात केली नाही, तर तुमच्याकडील काम काढून घेऊ! या सूचनेमुळे पाध्ये साहजिकच संतापले आणि मंडळात केतकरांच्याविरुद्ध एक गट त्यांनी व्यवस्थितपणे उभा केला.[1]

केतकरांशी पाध्यांचा व पाध्यांच्या गटातील इतर लोकांचा जो विरोध होता त्याला वाङ्मयसूचीच्या छपाईखेरीज आणखीही कारणे होती. पाध्येगटाला असे वाटे, की केतकरांनी आपल्या कामासाठी पगार अगदी थोडा घ्यावा. त्यांच्यासारख्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या स्वार्थत्यागाची जाहिरात झाली की लोकांना ज्ञानकोशाविषयी सहानुभूती वाटू लागेल व लोकाश्रय अधिकाधिक मिळत जाईल. या वृत्तीमुळे तेवीस महिने म्हणजे सुमारे दोन वर्षे केतकरांच्या पगाराचा प्रश्न त्यांनी अनिर्णीत स्थितीत लोंबकळत ठेवला होता! ज्ञानकोशाच्या खटपटीला १९१५ च्या ऑगस्टमध्ये प्रारंभ झाल्यापासून पहिले सहा महिने एक कवडीही केतकरांनी आपल्या कामासाठी घेतली नाही. पुढे चौदा महिने ते फक्त ५० रु. दरमहा घेत होते.—आणि नंतर नऊ महिने त्यांचे वेतन केवळ १०० रु. होते. याचा अर्थ असा, की बेकाराच्या किंवा कारकुनाच्या प्रातीवर ते ज्ञानकोशाच्या संपादकाचे नि व्यवस्थापकाचे अत्यंत अवघड काम उचलीत होते! पण पाध्येगटाला मात्र हे असेच असावे असे वाटत होते. उलट, ज्ञानकोशामधून आपणाला तेवढा पुरेपूर लाभ व्हावा, याविषयीही हा गट दक्ष असे. त्याबद्दल केतकरांनी असे म्हटले आहे, की "त्यांचा प्रयत्न डायरेक्टरांच्या बैठका वारंवार कराव्यात व

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ४५ ते ४७.

त्यांची प्रत्येकी १० रुपये फी करावी आणि प्रत्येक डायरेक्टराने आपले दरसाल ५०० रुपयांचे उत्पन्न करून घ्यावे, अशा प्रकारचा होता...त्यांनी त्याच प्रकारचे नियम सुचविले होते." पण दुसऱ्याला स्वार्थत्यागाच्या तत्वासाठी उपाशी ठेवावे व स्वतः आपल्या तुंबड्या भरून घ्याव्या, हा त्यांचा उपद्व्याप चालू देण्याइतके केतकर भोळे नव्हते. 'स्वार्थत्यागाची मीमांसा' त्यांनी पूर्वीच करून ठेवली होती. जगातील सर्वच कार्ये व्यापारी तत्वावर चालणे शक्य नाही, म्हणून स्वार्थत्यागाची जरूरी आहे, हे त्यांना मान्य होते. पण ज्याने कार्यकर्ताच उपाशी मरतो व कार्यासाठी शिल्लक उरत नाही तो स्वार्थत्याग त्यांना मंजूर नव्हता. कार्यकर्त्याने आपल्या कार्याचे महत्व लोकांच्या मनावर बिंबवावे, कार्याचा मोबदला देण्यास लोकांना प्रवृत्त करावे आणि त्यामुळे गोळा झालेला पैसा स्वतः अवश्य स्वीकारावा, असे त्यांचे धोरण होते. शिवाय एकाच्या त्यागावर दुसऱ्याने नफा मिळवावा, हे तर त्यांना गुन्ह्यासारखे वाटत होते. तेव्हा स्वार्थत्यागाच्या मुद्द्यावर पाध्येगटाचे व त्यांचे वारंवार खटके उडू लागले, यात आश्चर्य नाही.[1]

ज्ञानकोश-मंडळातील अधिकारसूत्रे आपल्या हाती राहावी व कार्याचे श्रेय आपल्या पदरात पडावे, असाही पाध्येगटाचा प्रयत्न चालू होता. मंडळाच्या 'स्टॅच्यूटरी' सभेच्या आधी, १४ सप्टेंबर १९१७ रोजी, आद्य प्रवर्तकांची एक सभा होऊन तीमध्ये डॉ. केतकर, श्री. पाध्ये व श्री. फडके असे तिघे जण चालक म्हणून निवडून आले. भांडवलाचे पंधरा किंवा अधिक भाग घेणाऱ्यांमधून या चालकांची निवड व्हावी अशी योजना होती आणि पंधरा किंवा अधिक भाग घेणारे हे तिघेच होते. तेव्हा इतर कोणी निवडून येणे शक्यही नव्हते. तरीपण चालक म्हणून केतकरांची निवड होऊ नये अशी खटपट या वेळी केली गेली! मंडळ नोंदल्यानंतर मंडळाचे व्यवस्थापक व चिटणीस या दोनही जागांवर केतकरांची निवड झालेली होती. पण चालकांच्या निवडणुकीनंतर १६ सप्टेंबर १९१७ या दिवशी जी 'स्टॅच्यूटरी' सभा भरली तीमध्ये चिटणीसपदावरून त्यांना काढून टाकण्याची कारवाई करण्यात आली. त्यांच्याऐवजी श्री. गोविंद चिंतामण तांबे, वकील, यांना पाध्येगटाने चिटणीस म्हणून निवडून दिले आणि एक अधिकारपद आपल्या गटाकडे आणल्याचे समाधान काही काळ मिळविले. ही कारवाई करण्यात पाध्येगटाचा कोणता हेतू होता व तो नंतर कसा फसला याचे वर्णन केतकरांनी पुढीलप्रमाणे केले आहे: "सेक्रेटरी दुसरा करण्यात रा. पाध्ये यांचा डाव असा होता, की सेक्रेटरी व म्यानेजर यांच्यामध्ये द्वैत राहावे आणि [अध्यक्ष म्हणून] आपला अधिकार चालण्यास संधी जास्त मिळावी. त्यात रा. तांबे रा. पाध्ये यांच्या तंत्राने वागतील, असे वाटण्याचे त्यांना कारणही होते. त्यांना असे वाटे, की तांबे कऱ्हाडे, आपण कऱ्हाडे; आणि अध्यक्ष व सेक्रेटरी दोनही कऱ्हाडे असले म्हणजे ज्ञानकोश काढण्यामध्ये महत्वाची कामगिरी कऱ्हाड्यांनी केली, असे होईल. शिवाय

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ४७ ते ५०, १५३.

रा. तांबे हे वकील या नात्याने माधवराव पाध्ये यांचे काही दिवस ज्यूनिअरदेखील होते. पण रा. तांबे यांस ज्ञानकोशाची कळकळ असल्यामुळे आणि माझ्यावरच त्यांचा विश्वास असल्यामुळे 'कऱ्हाडा पेट्रिऑटिझम' उत्पन्न करून आम्हा दोघांमध्ये द्वैत उत्पन्न करणे रा. पाध्ये यांस शक्य झाले नाही."[१]

या सुमारास केतकरांच्याबद्दल अफरातफरीचा संशय उत्पन्न व्हावा, असा देखावाही पाध्येगटातील लोकांनी थोडासा उत्पन्न करून बघितला. १६ सप्टेंबरच्या स्टॅच्यूटरी सभेसाठी ३१ ऑगस्टअखेर अहवाल तयार करावयाचा होता आणि तो २ सप्टेंबरच्या चालकांच्या सभेत मांडावयाचा होता. म्हणजे एकदीड दिवसात हिशेब पूर्ण होणे जरुरीचे होते. पण तेवढ्या कमी वेळात कारकुनाचा ताळेबंद जुळला नाही आणि पुरे केलेले हिशेब चालकांच्या सभेत केतकर मांडू शकले नाहीत. वास्तविक पाहाता रोजचे हिशेब बरोबर होते आणि प्रश्न फक्त बेरजा जुळण्याचा होता. परंतू पाध्येगटाने या मोहरीचा मेरू करण्याचे ठरविले आणि चालकांच्या सभेत मोठे काहूर उठविले. केतकर म्हणतात, की "जणू काय मी पैशाची अफरातफर केली असाच कांगावा पाध्येकंपूने केला. प्रत्यक्ष आरोप केला नाही."[२]

पाध्येगटाचा हा विरोध जेव्हा पदोपदी जाणवू लागला तेव्हा तो समूळ उपटून काढला पाहिजे असे केतकरांनी ठरविले आणि डिसेंबर १९१७ च्या अखेरीस मोठ्या युक्तीने श्री. पाध्यांचे चालकमंडळातून उच्चाटन केले. श्री. पाध्ये हे मंडळाचे चालक होते आणि त्यांनी छपाईसाठी मंडळाशी करारही केला होता. पण कायद्याप्रमाणे त्यांना तसे करता येत नव्हते. जो मनुष्य मंडळाशी फायद्याचा व्यापारव्यवहार करतो त्याला मंडळाच्या चालकपदावर राहाता येत नाही. तेव्हा कायद्याच्या या कात्रीत केतकरांनी पाध्यांना पकडले आणि त्यांना चालकपदावरून दूर केले! त्यांना चालकपदावरून दूर केल्याचे पत्र 'रजिस्ट्रार ऑफ कंपनी' यांच्याकडे जे गेले ते चिटणीस या नात्याने श्री. तांबे यांच्याकडून गेले. पण पाध्ये तांब्यांचे एक प्रकारे वकिलीमधील गुरू होते. तेव्हा तांब्यांचे मित्र म्हणू लागले, की "तांबे यांनी 'गुरुसाइड' केला!" ज्ञानकोशाच्या कामात आपणाला प्रथम साह्य देणाऱ्या श्री. पाध्यांना चालकपदावरून काढून टाकण्यामध्ये केतकरांचा हेतू असा होता, की "अपेक्षा फसल्यामुळे जो मनुष्य दुखावला गेला आहे असा मनुष्य डायरेक्टरांत ठेवला तर तो कारभारात दररोज त्रास देईल. तर असा मनुष्य बाहेरच राहावा हे उत्तम. बाहेर राहिला असता तो जो त्रास देईल त्याला प्रतिकार करता येतो; पण आत राहून मनुष्य नेहमी अधिक त्रासदायक बनतो." रा. पाध्ये यांना केतकरांनी कायद्याच्या ज्ञानाच्या जोरावर असे चालकमंडळाच्या बाहेर फेकले आणि ज्ञानकोश-मंडळाच्या गृहकलहातील पहिले पर्व संपले. मात्र

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ४१, ५१-५२.
२. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ५१

गृहकलह तेवढ्याने अजिबात संपला असे नाही. रा. पाध्ये बाहेरून उपद्रव देत राहिले आणि त्यांचे सोबती आत राहून कुरापती काढू लागले. त्या त्रासाची विल्हेवाट लावण्यासाठी पुढच्या काळात केतकरांना आणखी रक्त आटवावे लागणार होते.[1]

रा. पाध्ये यांचे उच्चाटन झाल्यानंतर आणि १९१७ चे राष्ट्रीय सभेचे अधिवेशन आटोपल्यावर लो. टिळक नागपुरास येऊन काही दिवस राहिले होते. तेव्हा लो. टिळकांची व केतकरांची भेटदेखील होऊ नये, अशी "राष्ट्रीय मंडळींतील एका कंपू"ने यशस्वी खटपट केली आणि टिळकांना केतकरांच्याविरुद्ध पुष्कळ गोष्टी सांगितल्या. काही शेलक्या लोकांनी गावात अशी गप्पही उठवली, की डॉ. केतकरांचा ज्ञानकोश कधीही सिद्धीस जाणार नाही, असे लोकमान्य म्हणाले! पण लो. टिळकांच्या मनावर या गावगुंडीचा कांहीही परिणाम झाला नसावा; कारण काही दिवसांनंतर ते पुन्हा नागपुरास आले तेव्हा बुटींच्या बंगल्यावर केतकरांची त्यांनी गाठ घेतली आणि त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. या गप्पांत केतकरांच्या विरोधकांचा प्रत्यक्ष उल्लेख त्यांनी कोठेही केला नाही. उलट, ज्ञानकोश पुरा होण्यास वीस वर्षे लागतील हा आपला अंदाज बोलून दाखविला आणि जगद्विख्यात फ्रेंच ज्ञानकोशकार डिडेरो याचे आपल्या सहकाऱ्यांशी कसे भांडण झाले, सहकारी सोडून गेले तरी तो कसा डगमगला नाही, याचा प्रोत्साहनपर उल्लेख त्यांनी केतकरांपाशी केला. जणू केतकरांना त्यांनी सुचविले, की तुम्हीही डगमगू नका आणि महाराष्ट्राचे डिडेरो व्हा![2]

ज्ञानकोशाच्या संपादनामध्ये लेखकांची जुळवाजुळव करणे हे कार्य केतकरांना प्रारंभी करावे लागले. नागपुरास ज्ञानकोशाचे कार्यालय असेपर्यंत सुमारे चाळीस माणसे संपादकीय खात्यात काम करीत होती आणि नाना प्रकारच्या संग्रहग्रंथांवरून टिपणे काढण्याचे काम त्यांनी चालविले होते. यांपैकी बहुतेक माणसे हंगामी काम करीत आणि आपली गरज संपली की निघून जात. विशेषतः कायद्याचा अभ्यास करणारे विद्यार्थी या माणसांत बहुसंख्येने असत आणि ते 'टर्म' भरली की नोकरी सोडून देत. त्यामुळे अनुभवी माणसे ज्ञानकोशाला लाभत नसत आणि कामाचे व पैशाचे बरेच नुकसान होई. रा. यशवंत रामकृष्ण दाते व रा. सर्वोत्तम वासुदेव देशपांडे ही दोनच माणसे नागपुरात अशी मिळाली की ज्यांनी शेवटपर्यंत ज्ञानकोश सोडला नाही. कार्यालयात बसून काम करणाऱ्या लेखकांखेरीज आपल्या घरी राहून काम करणारे लेखक मिळविण्याचा प्रयत्नही केतकरांनी केला आणि अनेक प्राध्यापक, डॉक्टर, वैद्य, स्थापत्यविशारद वगैरेंकडून सहकार्याचे आश्वासन मिळविले. पण आश्वासन देणाऱ्यांपैकी कांहींनीच प्रत्यक्ष काम केले आणि काम करणाऱ्यांतही हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच शेवटपर्यंत टिकून राहिले. एकंदरीत जी माणसे मिळाली त्यांनाच शिकवून नि मार्गदर्शन करून केतकरांना

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ५५-५६.
२. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ५६-५७.

काम कसेबसे निभावून न्यावे लागले. हंगामी व नवशिक्या माणसांकडून इतके उच्च दर्जाचे काम त्यांनी कसे करून घेतले, हे एक नवलच आहे. ज्ञानकोशाचे कार्यालय नागपुरास असेपर्यंत, म्हणजे जून १९१९ पर्यंत, ज्ञानकोशाची तीनचतुर्थांशाहून जास्त कच्ची टिपणे तयार झाली होती.[१]

संपादनाच्या कामात प्रथितयश विद्वानांचे सहकार्य मिळावे म्हणून केतकरांनी जी खटपट केली ती वेगवेगळ्या कारणांनी दुर्दैवाने वाया गेली. उदाहरणार्थ, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी ज्ञानकोशासाठी लेखन करावे म्हणून त्यांनी आटोकाट खटाटोप केला; पण त्याला यश आले नाही. ज्ञानकोशातील नवशिक्या लेखकांच्या शिक्षणासाठी इतिहाससंशोधनाच्या पद्धतीवर व्याख्याने देण्याकरता राजवाड्यांना त्यांनी प्रथम नागपुरास बोलावले. त्याप्रमाणे राजवाडे नागपुरास गेले, त्यांची एकदोन व्याख्याने झाली, त्यांनी कऱ्हाड-गिजरे प्रकरणातील पत्रांच्या नकला तेथे करून घेतल्या; पण प्रकृती बरी न राहिल्यामुळे एका आठवड्यात त्यांना नागपूर सोडावे लागले. या वेळी ज्ञानकोश-मंडळाच्या एका चालकाने त्यांच्यापाशी असे उद्गार काढले, की तुमच्या येण्यास आम्ही चालकांनी संमती दिलेली नाही! तेव्हा त्यांनी मंडळाकडून खर्च घेण्यास नकार दिला आणि केतकरांना स्वतःच्या पदरचे सुमारे पन्नास रुपये त्यांच्यासाठी खर्च करावे लागले! या वेळीच त्यांनी महाराष्ट्रीय इतिहासावरील सर्व लेख लिहिण्याचे काम पतकरावे म्हणून केतकरांनी त्यांच्याशी बोलणे केले होते. पंधराशे पृष्ठांसाठी सहा हजार रुपये देण्यास केतकर कबूल झाले आणि तो करार ऐकून मंडळाच्या एका चालकाच्या छातीत धडधडू लागले! विद्येला काही आर्थिक मोल असते आणि ते मोल देऊनच विद्या घेतली पाहिजे, हे तत्व तोवर महाराष्ट्राला माहीत नव्हते. त्यामुळे राजवाड्यांसारख्या फटिंगाला सहा हजार रुपये देऊ करणे तेव्हा अनेकांना उधळपट्टीचे वाटले. "डॉ. र. पु. परांजपे, सर भालचंद्र यांसारख्या मंडळींनी तर मजपाशी यासंबंधाने 'अबब!!' करून निषेधाचेच उद्गार काढले होते" असे केतकर म्हणतात. पण केतकरांनी करार केला आणि छातीत धडधडणारा चालक दूर झाल्यावर कराराला चालकमंडळाची संमतीही मिळविली. त्यांचा हिशेब असा होता, की राजवाड्यांना सर्व कामाला दोन वर्षे लागणार असे धरले तर त्यांना मासिक अडीचशे रुपये प्रातीच या करारान्वये होते. फाटक्या प्राध्यापकाला जर याहून जास्त पगार मिळतो तर तेवढा राजवाड्यांसारख्या प्रकांड-पंडिताला कां मिळू नये? शिवाय राजवाडे ऐतिहासिक मजकूर लिहिणार म्हणूनच कित्येक लोक ज्ञानकोशाचे ग्राहक झाले असते आणि तो लाभही केतकरांनी हिशोबात धरला होता. पण सहा हजार रुपये देण्याचा करार करूनही राजवाड्यांचे सहकार्य ते मिळवू शकले नाहीत. कारण स्वतःला बांधून घेऊन काम करावे, हे राजवाड्यांच्या स्वभावातच

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ३९, ४०, १२५, १६०, १६२ वगैरे; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ १६.

नव्हते. विद्वत्तेच्या डरकाळ्या फोडीत रानावनातून मुक्त भटकणाऱ्या त्या वनराजाला ज्ञानकोशातील शिस्तबद्ध लिखाण म्हणजे 'सर्कशीतील कसरत वाटली असावी. तेव्हा काम सुरू करण्यापूर्वी आगाऊ तीन हजार रुपये द्या, अशी अवाच्यासवा मागणी त्यांनी केतकरांकडे केली आणि काम अंगाबाहेर टाकले ![1]

ज्ञानकोश काढण्याचे ठरल्यानंतर १९१६ च्या जानेवारीत केतकर जेव्हा लो. टिळकांना पुण्याला भेटले होते, तेव्हा टिळकांनी 'वेदांतर्गत सूक्तांचा अनुक्रम' या विषयावर लेख लिहिण्याचे आश्वासन दिले होते. ज्ञानकोशाच्या रचनेला प्रारंभ झाल्यानंतर, १९१७-मध्ये, त्या आश्वासनाची आठवण केतकरांनी टिळकांना दिली. त्या वेळी टिळकांनी असे कळविले, की मी सध्या इंग्लंडला जात असल्याने तेथून परतल्यावर आश्वासनाप्रमाणे लेखन करीन. पण ते इंग्लंडहून परतले आणि थोडक्याच काळात त्यांचा अंत ओढवला. त्यामुळे त्यांच्या अमोल लेखनाचा अलंकार ज्ञानकोशावर चढविण्याचे भाग्य केतकरांना मिळू शकले नाही.[2] डॉ. रा. गो. भांडारकर ज्ञानकोशाला काही साह्य करणार होते; पण वार्धक्याने ते विकल झाले, त्यांची दृष्टी अधू झाली आणि त्यांच्या साह्यालाही ज्ञानकोशास मुकावे लागले.

संपादनाच्या कामात प्रथितयश विद्वानांचे सहकार्य लाभले नाही, तेव्हा नवशिक्या पदवीधरांकडून केतकर एकीकडे ज्ञानकोश सजवीत होते आणि दुसरीकडे समाजातील निरनिराळे वर्ग व ज्ञानसंस्था यांच्याकडेही साह्याची याचना करीत होते. शिलालेख, ताम्रपट आदिक लिखाणातील स्थल-काल-व्यक्तिविषयक माहिती मिळावी म्हणून त्यांची सूची करण्याची विनंती त्यांनी भारतेतिहास-संशोधक-मंडळ व भांडारकर-रिसर्च-इन्स्टिटयूट या संस्थांना केली. राजवाड्यांशी बोलणे करण्यापूर्वी महाराष्ट्राच्या इतिहासाबद्दल भारतेतिहास-संशोधक-मंडळाकडे त्यांनी विचारणा केली होती. धर्मशास्त्रावर लिहिताना ज्या अनेक अडचणी लेखकांसमोर येतात त्या त्यांनी जनतेला कळविल्या आणि त्यांवर जनतेकडून सूचना मागविल्या. मुंबईच्या व्यापारी वर्गाकडे प्रश्नावली पाठवून त्या वर्गाकडून व्यापारविषयक माहितीची त्यांनी मागणी केली. नृत्य जाणणाऱ्या स्त्रीपुरुषांपुढे नृत्यविषयक अनेक प्रश्न ठेवून त्यांची उत्तरे देण्याविषयी त्यांनी त्यांना पाचारण केले. —आणि सर्व जातींच्या पुढाऱ्यांना आपापल्या जातीची माहिती पाठविण्याविषयी आवाहन केले. संस्था व समाजातील निरनिराळे वर्ग यांच्याकडे त्यांनी सहकार्याचे हे जे दान मागितले त्याला रुकार मात्र फारसा कोठूनच मिळाला नाही. जातिविषक माहिती तेवढी बऱ्याच लोकांनी पाठविली आणि तीमुळे जातिविषयक खळबळ पुढे पुष्कळशी माजली. जैनांकडून द्रव्यसाह्य मिळवून जैन धर्मावर दोन मोठे ग्रंथ काढावे व जैनांचे ज्ञानकोशाला

१. 'राजवाडे यांची जीवनपद्धती', विद्यासेवक, जानेवारी १९२७; 'राजवाडे आणि ज्ञानकोश', भा. वा. भट, विद्यासेवक, ऑगस्ट १९२९; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे ७५-७६; ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे १२५, १२७.

२. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ३०, परिशिष्ट पृष्ठ १०५.

सहकार्य मिळवावे, असा केतकरांचा एक प्रयत्न होता. पण तो प्रयत्नही सफळ झाला नाही.[1]

ज्ञानकोशाचा व्यवहार चोख व्यापारी बाण्याने चालावा असा जो केतकरांचा आग्रह होता तो १९१७च्या अखेरीस एका प्रसंगी प्रकर्षाने सर्वांच्या नजरेसमोर आला. त्या वेळी 'संदेश'चे संपादक श्री. अच्युत बळवंत कोल्हटकर यांनी 'नारिंगी निशाण' या नाटकाचा प्रचार करण्यासाठी 'बंधुसमाज' नावाची एक नाटकमंडळी काढली होती. सार्वजनिक संस्थांना मदत करावी असा या नाटकमंडळीचा उद्देश होता आणि त्याप्रमाणे आपण कोणकोणत्या संस्थांना मदत करणार आहोत त्यांची नावे कोल्हटकरांनी जाहीर केली होती. त्या नावांत ज्ञानकोश-मंडळाचा समावेश त्यांनी केला होता व ज्ञानकोशास एक हजार रुपये द्यावे अशी आपली इच्छा उद्घोषिली होती. केतकरांच्या मते याचा परिणाम असा झाला असता, की कित्येकांनी रुपया-सव्वारुपयाचे तिकीट घेऊन ज्ञानकोशाला मदत केल्याचे पुण्य गाठीला बांधले असते आणि त्यांच्या गळ्यात दीड-दोनशे रुपयांचा ज्ञानकोशाचा संच बांधणे कठीण होऊन बसले असते. शिवाय, कोल्हटकरांच्या कारभारात खर्चवेच वजा जाता ज्ञानकोशाला काय मिळाले असते, याची केतकरांना शंकाच होती. कोल्हटकरांच्या योजनेमागे ज्ञानकोशाला मदत करण्याची इच्छा असण्यापेक्षा ज्ञानकोशाबद्दल जी सहानुभूती समाजात होती तीवर धंदा करण्याची स्वार्थबुद्धी होती, असे केतकरांचे मत झाले होते. तेव्हा 'ज्ञानकोशाला दक्षिणा नको' अशा अर्थाचे एक पत्र कोल्हटकरांच्या 'संदेश'कडे त्यांनी पाठविले व ते संदेशमध्ये प्रसिद्ध झाले नाही तेव्हा ते इतर वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केले. यानंतर त्यांच्या व ज्ञानकोशाच्या साहेबी वृत्तीवर संदेशामधून टीका येऊ लागली.[2]

या साऱ्या प्रकारामुळे, दक्षिणा किंवा देणगी न स्वीकारण्याचे जे धोरण प्रथमपासून त्यांच्या मनात होते त्याचे स्पष्टीकरण चालकमंडळापुढे करण्याची एक संधी त्यांना मिळाली. ज्ञानकोशासारख्या सार्वजनिक कार्यासाठी देणग्या स्वीकारण्यास काय हरकत आहे, असे इतर चालकांना प्रथम वाटत होते; पण देणग्या स्वीकारण्यामध्ये नफ्याऐवजी तोटाच आहे, हे त्या चालकांना त्यांनी पटवून दिले. त्यांचा युक्तिवाद असा होता, की "आपण जर दक्षिणा घेऊन कंपनीच्या शेअरहोल्डरांना मुनाफा वाटू लागलो तर ते वेडेवाकडे दिसून येणार नाही काय? तुमची जर दक्षिणा घेण्याची स्थिती आहे तर कंपनीस मुनाफा वाटण्याची शक्यता मुळीच नाही, असे आपोआपच होते की नाही? व कंपनीला जर मुनाफा होणार नाही तर लोकांनी शेअरहोल्डर कां व्हावे? आणि लोक जर शेअर-होल्डर होणार नाहीत तर वर्गणीदारांनी आपली वर्गणीची रक्कम कोणत्या तारणावर

१ ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे १२७, परिशिष्ट पृष्ठे ३३ ते ४७; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ८०.

२ ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ५३-५४.

द्यावी? अर्थात दक्षिणा घेणे म्हणजे कंपनीचे अस्तित्वासच धोका आणणे आहे." केतकरांचा हा युक्तिवाद सर्वांना पटला आणि देणगी न घेण्याचे तत्व मंडळाच्या नियमांत १३ नोव्हेंबर १९१७ रोजी समाविष्ट झाले. या तत्वामुळे ज्ञानकोशाचा फायदा झाला, असेच पुढील अनुभवावरून दिसून आले. दहावीस रुपयांची देणगी देऊन आपले दातृत्व संपविणाऱ्यांच्या पदरात दीडदोनशे रुपयांचा ग्रंथच टाकता येऊ लागला आणि कुणाच्या दयेची अपेक्षा न धरल्यामुळे ज्ञानकोश-मंडळाची पत समाजात वाढण्यास मदत झाली.[1]

१ एप्रिल १९१८ या दिवशी ज्ञानकोश-मंडळाची एक शाखा केतकरांनी पुणे येथे उघडली. नागपूरला मिळणारा संपादकवर्ग हंगामी स्वरूपाचा होता, तेव्हा कायम स्वरूपाचा संपादकवर्ग पुण्यासारख्या विद्याकेंद्रात मिळू शकेल, अशी यामागे अपेक्षा होती. शिवाय, 'भारतीय पांडित्याचा मजकूर' आणि शास्त्रीय विषयांवरील मजकूर नागपूरला मनासारखा तयार होत नव्हता. तोही पुण्याला विद्वान संपादक मिळवून तयार करता येईल, अशी कल्पना होती. पुण्याला शाखा उघडल्यामुळे हे सर्व साध्य झालेच, पण आणखीही काही लाभ झाले. पुण्याची शाखा हीच थोड्या दिवसांनी केंद्रशाखा बनली आणि केतकर पुण्यासच येऊन राहिले. त्यामुळे नागपूरला मुद्रणाची जी अडचण झाली असती ती पुण्याला त्यांना निवारता आली व पुण्यातल्या पुण्यात हिंडून ग्राहक मिळवून पैशाची उभारणी करता आली. पुण्याची शाखा उघडण्यासाठी केतकर पुण्यास आले तेव्हाच्या खेपेतच पंचवीस वर्गणीदार त्यांनी मिळविले. 'पुण्याचे लोक लुच्चे आहेत, येथे तुम्हांला पैसा मिळायचा नाही' असे पुण्यातल्या बड्या राजकीय मंडळींनी त्यांना सांगितले होते; पण पुढे पुण्यातूनच चाळीस हजार रुपये त्यांनी निर्माण केले! "वाङ्मयासाठी जे प्रयत्न करतात त्यांचा पाठिराखेपणा पुणे शहर जेवढे करते तेवढे कोणतेच शहर करीत नाही" असे उद्गार म्हणूनच त्यांनी काढले आहेत. पुण्याला शाखा उघडल्यानंतर १ जुलैला मुंबई येथेही त्यांनी एक शाखा उघडली. पुण्याला आल्यानंतर त्यांना वारंवार मुंबईला जाता येई आणि गिऱ्हाईक मिळवण्यासाठी तेथे प्रचंड क्षेत्र असल्यामुळे तेथेही भरपूर प्रयत्न करता येई. एकंदरीत पाहाता, पुण्याला शाखा उघडण्याचा जो निर्णय त्यांनी घेतला तो अनेक दृष्टींनी लाभकारक ठरला, यात शंका नाही.[2]

पुण्याची शाखा उघडण्याचा समारंभ नानावाड्याच्या इतिहासप्रसिद्ध वास्तूत साजरा झाला आणि या शाखेचे प्रमुखत्व केतकराच्या विनंतीवरून प्रा. वैजनाथ काशिनाथ राजवाडे या वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध गृहस्थांनी स्वीकारले. प्रा. राजवाडे हे मवाळ पक्षाचे होते आणि केतकरांची गणना जहाल पक्षात होत होती. पण धर्मानंद कोसंबी किंवा डॉ. भांडारकर या प्रतिपक्षीयांकडे केतकर जसे कार्याच्या वेळी पूर्वी गेले तसेच ते या वेळी प्रा. राजवाड्यांकडे गेले आणि राजवाड्यांनी रुकार दिल्यामुळे प्रतिपक्षीयांचे सहकार्य

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ५३.
२. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ६८ ते ७०, १२५-१२६, ५७ ते ५९.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम २५.८.७७........ वि: [illegible]

मिळविण्यात यशस्वी झाले. त्या काळात राजकीय मतांनी सर्वच जीवनात फळ्या पडत असल्याने राजवाडे ज्ञानकोशात आले याचे अनेकांना आश्चर्य वाटले. राजवाड्यांनी पुणे-शाखेचे नेतृत्व पतकरल्यामुळे ज्ञानकोशाचा मात्र चांगला फायदा झाला. त्यांनी फक्त नऊ महिने काम केले आणि तेवढ्या अवधीतही वार्धक्य व अधू दृष्टी यांमुळे त्यांच्या हातून विशेष काम झाले नाही. पण ज्ञानकोशातील अनेक लेखक केतकरांखेरीज कोणीही आपले लेखन तपासले तर त्याबद्दल नाराज असत; अशा लेखकांनी राजवाड्यांच्या वयामुळे व ज्ञानामुळे आपले लेखन त्यांनी तपासावे याला मान्यता दिली आणि राजवाड्यांकडून अशा लेखकांचे लेखन काही प्रमाणात तपासून झाले. याखेरीज राजवाडे केवळ ज्ञानकोशात काम करीत आहेत, या घटनेमुळे ज्ञानकोश-मंडळाबद्दल लोकांमध्ये विश्वास वाढण्यास खूप मदत झाली.[१]

पुण्यामुंबईला शाखा उघडून पुण्याच्या शाखेवर प्रा. राजवाड्यांची नेमणूक करण्याचा निर्णय केतकरांनी स्वतःच्या अधिकारात तातडीने घेतला आणि तो इष्टही ठरला. पण त्याबद्दल काही चालकांनी त्यांच्याविरुद्ध ओरड करण्यास कमी केले नाही. रा. पाध्ये यांना चालकमंडळातून अर्धचंद्र मिळाला होता, पण त्यांच्या गटातील श्री. टेंगडी व श्री. भवाळकर हे दोन गृहस्थ जादा चालक म्हणून काम पाहात होते. केतकरांविरुद्ध ओरड करण्यात या दोघांनीच पुढाकार घेतला. त्यांच्याविषयी केतकर म्हणतात, की "टेंगडी उद्धटासारखे भाषण करी" तर भवाळकर "द्व्यर्थी भाषणे करी." त्या दोघांचे म्हणणे असे होते, की नव्या शाखा उघडण्यासारखे महत्त्वाचे निर्णय केतकरांनी चालकमंडळाला न विचारता घेणे म्हणजे चालकमंडळाला धाब्यावर बसविणे होय. यावर केतकरांचे उत्तर असे होते, की नव्या शाखा उघडणे ही अंतर्गत बाब होती व ती व्यवस्थापकाच्या अधिकारकक्षेत बसत होती. शिवाय "धंद्यासाठी जो तातडतोब निर्णय करावा लागतो तो निर्णय करण्यास चालक असमर्थ होते." तेव्हा ज्ञानकोशाच्या हितासाठी त्यांनी नव्या शाखा आपल्या अधिकारात उघडून टाकल्या. प्रा. वै. का. राजवाडे यांच्या नेमणुकीबद्दल या दोघा चालकांची वृत्ती अशी होती, की राजवाडे यांनी प्रथम चालकमंडळाकडे अर्ज करावा व मग त्याचा विचार करून तो मंजूर करण्याचे श्रेय आपणास मिळावे! उलट, राजवाडे यांचे मन ज्ञानकोशात काम करण्याकडे कसे वळवावे, या फिकिरीमध्ये केतकर होते. तेव्हा चालकांना गुंडाळून ठेवून संपादकीय अधिकारात राजवाड्यांची नेमणूक त्यांनी करून टाकली होती. जादा चालकांची वृत्ती इतकी असमंजस नि कार्यविघातक होती, की त्यांच्यापैकी एका चालकाच्या मताप्रमाणे ज्ञानकोशातील लेखकांनी गावातही चालकांशी आदबीने वागणे आवश्यक होते व लेखक चहाच्या दुकानात चहा पीत असता तेथे कोणी चालक गेल्यास उठून उभे राहाणे लेखकांचे कर्तव्य होते! एक कारकून असा उभा राहिला नाही, म्हणून या

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ५७-५८.

चालकाने तक्रारही केली होती! तेव्हा अशा चालकांना धुडकावून लावल्याखेरीज केतकरांना कार्य पुढे रेटता आले नसते, हे स्पष्ट आहे![1]

या सुमारास 'इंडियन कंपनीज रिस्ट्रिक्शन ॲक्ट' हा कायदा हिंदुस्थान-सरकारने केला आणि आपल्याला कर्ज मिळावे म्हणून आपल्या परवानगीखेरीज मंडळ्यांना भांडवल वाढविण्यास व भागांवरील हप्त्यांची मागणी करण्यास बंदी केली. या कायद्याप्रमाणे ज्ञानकोश-मंडळाला आपल्या भागीदारांकडून उरलेल्या हप्त्यांची मागणी करता आली नसती व पैशाखेरीज सारा कारभार थंडावला असता. एकंदर भांडवलाची रक्कम वाढविण्याला कायद्याप्रमाणे सवड नसल्याने पन्नास हजारांचे मुळात ठरलेले भांडवल जर अपुरे पडले असते तरही मंडळापुढे अडचण आली असती. केतकर प्रवासात असताना त्यांना या साऱ्या गोष्टी समजल्या आणि त्यांनी हिंदुस्थान-सरकारकडे अर्ज करून भागीदारांकडून उरलेले हप्ते मागविण्यास नि जरूर पडली तर भांडवल एक लाखापर्यंत वाढविण्यास परवानगी आणून ठेवली. पण या सुध्दा गोष्टीबद्दलही जादा चालक रुष्ट झाले आणि 'आम्हांला न विचारता कंपनीचे भांडवल कसे वाढविलेत?' असे म्हणू लागले. 'भांडवल वाढविलेले नाही; जरूर पडल्यास ते वाढविण्याची परवानगी आणून ठेवलेली आहे' असे केतकरांनी स्पष्टीकरण दिले, तेव्हा एका जादा चालकाची समजूत पटली, पण दुसऱ्याची पटली नाही. ज्याची समजूत पटली होती त्याने 'चिड चिड चिड्ढ नको, उगा मुगा राहाना' म्हणून दुसऱ्याला दबकावले व गप्प बसविले. पण तरीदेखील 'ज्ञानकोशाला एक लाखापर्यंत भांडवल वाढविण्याला परवानगी मिळाली काय?' असे कोणी विचारले तर तो दुसरा चालक म्हणे, की केतकरांची ती "क्यापिटल जोक" आहे![2]

केतकरांचा रा. टेंगडी व रा. भवाळकर यांच्याशी जो संघर्ष चालू होता तो सप्टेंबर १९१८ च्या पहिल्या सर्वसाधारण सभेच्या वेळीं निकराला आला आणि सभेनंतर पुष्कळसा कमी झाला. या सभेत भागीदार या नात्याने श्री. पाध्ये यांना भाग घेता येत होता; तेव्हा पाध्यांनी ज्ञानकोश-मंडळावर चौफेर आरोप करावेत आणि टेंगडी-भवाळकरांनी चालकमंडळाच्या वतीने ते संभावितपणे, दुःखपूर्वक कबूल करावेत, असा पाध्येगटाने बेत ठरविला होता. हा गट असा युक्तिवाद करणार होता, की चालकमंडळाचे काम नीट होण्यासाठी केतकरांचे अधिकार कमी केले पाहिजेत व ते इतर चालकांकडे दिले पाहिजेत. त्यासाठी, केतकरांनी दर तीन महिन्यांनी अंदाजपत्रक मांडावे व त्याला चालकमंडळाची संमती मिळाल्याखेरीज खर्च करू नये, अशी उपाययोजना हा गट सुचविणार होता. अशा प्रकारच्या कारवाईने केतकरांची शेंडी आपल्या हाती राहील व आपणास अधिकार गाजविता येईल, अशी त्यांची कल्पना होती. श्री. फडके हे एक कायम चालक होते आणि त्यांचा केतकरांना सदैव पाठिंबा असे.

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ५८-५९, ६३.
२. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ५९-६०.

ग्रंथालय ठाणे
१०३४५
दा. क्र.
(स्थक प्रत)

पण त्यांचे वास्तव्य अकोल्याला असल्यामुळे ते चालकमंडळाच्या सर्व बैठकींना उपस्थित राहू शकत नसत. तेव्हा त्या कारणावरून त्यांना चालकमंडळातून बाहेर काढावे नि केतकरांचा पाठिंबा तोडावा, असाही पाध्येगटाचा डाव होता. परंतु पाध्येगटाने नागपूरच्या वकील-कोठीत आपल्या बेताची बढाईखोर वाच्यता केल्याने त्याचा सुगावा केतकरांना लागला आणि त्यांनी त्याविरुद्ध परिणामकारक उपाय योजिले. सर्वसाधारण सभेच्या वेळी त्यांनी रा. पाध्ये यांनाच अध्यक्ष केले आणि ज्ञानकोश-मंडळावर आरोप करण्याची संधी त्यांना मिळू दिली नाही! अध्यक्ष झाल्यामुळे पाध्यांना आरोप करता येईनात; तेव्हा ठेंगडी-भवाळकरांना मानभावीपणाने ते कबूलही करता येईनात. त्यांचा साराच व्यूह ढासळला. श्री. फडके चालक राहू नयेत म्हणून, अमूक इतक्या बैठकींना हजर नसणारा चालक आपोआप गळावा असा ठराव त्यांनी पुढे आणला; पण मंडळाच्या मूलभूत नियमांवर (आर्टिकल्सवर) बोट ठेवून केतकरांनी त्यांना गप्प केले. कारण मूलभूत नियमांप्रमाणे अनुपस्थितीच्या कारणावर एखाद्या चालकाला पदच्युत करता येत नव्हते. केतकरांनी या सभेपूर्वी खटपट करून अनुपस्थित भागीदारांची 'प्रॉक्झी'ची भरपूर मते आपल्या बाजूला आणून ठेवली होती आणि त्यांना स्वतःला भांडवलाच्या प्रमाणात पंचवीस मते होतीच. तेव्हा नव्या वर्षासाठी चालकांची जी निवडणूक झाली तीतही ठेंगडी-भवाळकरांची डाळ शिजली नाही. ते दोघेही पडले आणि त्यांच्याऐवजी डॉ. खरे व श्री. कठाळे हे निवडून आले. अशा रीतीने ठेंगडी-भवाळकरांना पाध्यांचीच वाट धरावी लागली व केतकर गृहकलहाच्या दुसऱ्या पर्वातून बाहेर पडले![1]

ज्ञानकोशाचे कार्य फार व्यापक आणि अवघड होते; ते नवीन असल्यामुळे ते करताना हुरूप चढत होता; आणि ते पुरे करण्याची जिद्द केतकरांनी धरली होती. त्यामुळे स्वभाव नाकासमोर जाणारा नि एकमार्गी नसतानाही, १९१९च्या जूनमध्ये नागपूर सोडीपर्यंत, केतकर ज्ञानकोशाखेरीज इतर उपद्व्यापांत फारसे शिरले नाहीत. त्यांनी जे काही इतर उद्योग केले ते थोडे आणि किरकोळ होते. उदाहरणार्थ, आपल्या काही मित्रांच्या सहकार्याने 'केतकर्स बँक अँड एजन्सी, लिमिटेड' या नावाची खाजगी बँक त्यांनी काढली होती. ज्ञानकोशाला पैशाची जरुरी भासे, तेव्हा ती भागविण्यासाठी स्वतःची काही योजना असावी, असा हेतू ही बँक काढण्यामध्ये होता. पण अमेरिकेत मंदीची लाट उसळून ही बँक त्या सपाट्यात नेस्तनाबूत झाली. या औटघटकेच्या बँकेवर "ठेवी घेतल्या जातील" अशी पाटी लावलेली होती. तीखाली एका नागपुरी गुंडाने एकदा अशी पुस्ती जोडली, की "परत दिल्या जाणार नाहीत"! ही गोष्ट एका गृहस्थांनी केतकरांच्या निदर्शनास आणली तेव्हा केतकर म्हणाले, 'अगदी खोटी गोष्ट; ठेवींची मागणी होताच आम्ही त्या सव्याज परत देतो. तुम्ही

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ६१ ते ६३, ६७.

ठेवी ठेवा आणि अनुभव घेऊन पाहा. मित्रमंडळींनाही अनुभव घेण्यास सांगा !'[1] केतकरांनी 'चातुर्वर्ण्य-संरक्षक-पीठ' या नावाची आणखी एक संस्था काढली होती. चातुर्वर्ण्य म्हणजे जातिभेदाचे उच्चाटन, अशी त्यांची एक आवडती कल्पना होती. तीप्रमाणे या संस्थेतर्फे जातिभेद नष्ट करून वर्गयुक्त समाज स्थापन करण्याचा त्यांचा विचार होता. पण एक पत्रक छापून ते प्रसिद्ध करण्याखेरीज त्यांच्या या संस्थेने काहीही हालचाल केली नाही.[2] संशोधनात्मक नियतकालिकांमधील लेखांची सूची करण्यासाठी 'बिब्लिओग्राफिक सिंडिकेट' नामक तिसरी एक संस्था त्यांनी काढली होती आणि 'इंडियन ॲंटिक्वरी' वगैरे नियतकालिकांवरून काही सूचिपत्रेही तयार केली होती. परंतु 'भांडारकर रिसर्च इन्स्टिट्यूट' अशी सूची करत असल्याचे समजल्यावरून त्यांनी ते काम सोडून दिले.[3] नागपूरला असताना त्यांनी आणखी एक गमतीदार उद्योग केला होता. व्हाइसरॉयसाहेबांकडे एक खलिता पाठवून त्यात त्यांनी अशी विनंती केली होती, की निजामाच्या राज्यास तोड म्हणून नागपुरास पुन्हा एक हिंदू संस्थान निर्माण करावे आणि त्यासाठी भोसल्यांच्या राज्याचे पुनरुज्जीवन करावे ! या विचित्र विनंतीमागे त्यांची कोणती विचारसरणी होती ते त्यांचे त्यांनाच माहीत ![4]—नव्या कल्पनेने चटकन आकृष्ट होणारी त्यांची कार्यशक्ती ज्ञानकोशाची वाट सोडून अशी क्वचित नि किंचित इतरत्र भरकटत होती. पण एकंदरीने बघितल्यास, ज्ञानकोश-मंडळ निघाल्यापासून नागपुरात वास्तव्य असेपर्यंत त्यांनी ज्ञानकोशाची मुख्य वाट फारशी सोडली नाही.

या काळातील त्यांची एक विलोभनीय आठवण येथे सांगण्यासारखी आहे. चिटणीस-पार्कजवळील ज्या पिवळ्या बंगल्यात ते राहात असत त्या बंगल्यात १९१६ च्या मेमध्ये दोन गरीब विद्यार्थी त्यांची भेट घेण्यासाठी आले. अमेरिकेला जाण्याबद्दल त्यांचा सल्ला त्या विद्यार्थ्यांना हवा होता. त्यांच्यासारख्या पाश्चात्य पदवीधराच्या वेषाविषयी त्या विद्यार्थ्यांनी काही अपेक्षा बाळगल्या होत्या; पण त्यांनी जो पायघोळ रेशमी अंगरखा त्या वेळी घातला होता तो बघून ते विद्यार्थी प्रथम सर्दच झाले ! पण पुढे, ते त्या विद्यार्थ्यांजवळ सतरंजीवर बसले, अमेरिकेतील परिस्थितीविषयी त्यांनी त्यांना बहुमोल सल्ला दिला आणि आपल्या ओळखीच्या कॅलिफोर्निया विद्यापीठातील एका गृहस्थांना त्यांच्यासाठी पत्र लिहिण्याचे काम त्यांनी अंगावर घेतले. त्या वेळी त्यांची स्वतःची प्राप्ती शून्याच्या आसपास होती; पण त्या विद्यार्थ्यांना द्रव्यसाह्य देण्याची इच्छा त्यांनी कळकळीने

१. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे ७३, ७४; आठवणी, वा. वा. चितळे: प्रतिभा जुलै १९३७, आ. रा. देशपांडे.

२. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे ७२-७३; संकीर्ण लेख, पृष्ठ ४१; ज्ञानकोश, विभाग १, पृष्ठ ३५८; हिंदुइझम, प्रस्तावना पृष्ठ २५.

३. डा. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ७०.

४. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ७७.

बोलून दाखविली. बोलताबोलता ते उठले आणि दहादहा पौंड वजनाचे, स्वतः अमेरिकेत वापरलेले, दोन लोकरी कोट उदारपणे त्यांनी त्या विद्यार्थ्यांना देऊनही टाकले! त्यांचे हे औदार्य इतके सहज होते, की त्यामधील सहजता त्या विद्यार्थ्यांच्या स्मृतिपटलावरून कधीही पुसली गेली नाही.[१]

नागपूरला असताना ज्ञानकोशाच्या कामात ते इतके गढले होते, की खाजगी जीवन त्यांना फारसे उरले नव्हते. स्वयंपाकासाठी ठेवलेल्या तापीबाईच्या हातचे जेवण जेवावे, आपली जबलपूरची चुलतबहीण कधी नागपूरला आली तर तिला आणि तिच्याबरोबर घरोब्यातील इतर मंडळींना बिऱ्हाडावर चहापानाला बोलवावे, परिचितांच्या घरी जाऊन खाद्यपदार्थांवर ताव मारीत मनसोक्त गप्पा झोडाव्या, एवढेच काय ते खाजगी जीवन ते जगत होते. बाकी चोवीस तास ज्ञानकोशाखेरीज दुसरा विचार त्यांच्या डोक्यात येत नव्हता. मिशा राखलेला हा पाश्चात्य-विद्या-विभूषित पंडित पुणेरी जोडा घालून नि कोट-उपरणे-पगडी असा भारतीय वेष करून रस्त्याने डुलत निघाला, की कोणी खाजगी व्यक्ती चालली आहे, असे नागपूरकरांना वाटत नसे. हा मूर्तिमंत ज्ञानकोश आपणासमोर फिरत आहे, अशी त्यांची भावना होई. 'श्रीधर व्यंकटेश केतकर' या नावाऐवजी 'श्रीधर व्यंकटेश ज्ञानकोशे' असे त्यांचे नवे नाव काही मित्रांनी पुढे पाडले; पण ते या वेळेपासूनच 'ज्ञानकोशे' झाले होते![२]

१. प्रतिभा, जुलै १९३७, ल. शि. औंठणकर.
२. आठवणी, गो. चिं. तांबे: प्रतिभा, जुलै १९३७, आ. रा. देशपांडे; 'संकीर्ण लेखां'मधील छायाचित्र.

## लग्नमाळ

## [१९१९ ते २४]

इंग्लंडमध्ये कु. ईडिथ व्हिक्टोरिया कोहन या प्रौढ, गोऱ्या युवतीशी परिचय होऊन केतकर हिंदुस्थानकडे परतले, तेव्हा त्यांच्या मनाचा एक अंश मागे राहिला होता.—त्याचे पुढे काय झाले? हिंदुस्थानात आल्यावर त्यांनी एका सुशिक्षित व कुलीन तरुणीला, म्हणजे बहुधा किशोरवयातील आपली प्रेयसी 'एन' हिला, मागणी घातली होती. पण 'एन'ला त्यांच्या खोल भावनेची कल्पना नसल्यामुळे, किंवा इतर काही कारणांनी, त्यांची मागणी सफळ झाली नव्हती.[१] कु. कोहन यांच्याबरोबरचा त्यांचा संबंध मात्र उत्तरोत्तर वाढत गेला. कु. कोहन इंग्लंडातून त्यांना पत्रे पाठवीत आणि कधीकधी प्रेमाच्या भेटीही पाठवीत. ते कलकत्त्याला असताना कु. कोहन यांच्याकडून त्यांना "स्वादु-भाकरी" आली होती आणि उमरावतीला असताना कु. कोहन यांचे छायाचित्र लावलेले दिनदर्शक आले होते. तेही कु. कोहन यांना पत्रे घालीत आणि त्यांच्या भावनेबद्दल अभिज्ञता दाखवीत. परस्परांमध्ये जो पत्रव्यवहार होत होता त्यावरून हळूहळू त्यांची अशी खात्री पटली होती, की कु. कोहन यांचे प्रेम शुद्ध, उत्कट आणि स्थिर आहे. त्या प्रेमाला नकार देणे त्यांच्या जिवावर येऊ लागले होते; आणि प्रेम विफल झाल्याचा दुःखद अनुभव त्यांनी स्वतः घेतला असल्यामुळे, तसाच अनुभव या प्रेमविद्ध स्त्रीला आपण द्यावा, ही कल्पना त्यांच्या मनाला जाचीत होती. प्रेमाला नकार देता देता नकळत ते कु. कोहन यांच्यावर प्रेम करू लागले होते. परंतु, प्रेमाची परिणती विवाहात होऊ द्यावी का? हे प्रेम आपण स्थिर म्हणतो, पण ते लग्नानंतर टिकेल का?—या प्रश्नांवर त्यांचे अनिश्चयी मन झोके खात होते. ते म्हणतात, "मला असे वाटे, की युरोपियन बाई हिंदुस्थानात आल्यानंतर आणि इंग्रज लोक हिंदुस्थानी लोकांस कसे वागवितात हे दृष्टीस पडल्यानंतर, तिची

१. आठवणी, बा. सं. गडकरी; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे ८४, ८५.

बुद्धी कशी होईल याचा नेम सांगता येत नाही.—व आपल्यालाही जो त्रास होईल त्यामुळे आपली बुद्धी तरी काय होईल याचाही नेम सांगता येत नाही. तर अशा वेळेस आपण काही एक कायम करू नये, हे बरे.'' त्यामुळे काहीच्च कायम न करता ते भवितव्य कसे उमलते ते बघत राहिले. मनात प्रेमभावनेचे सुखद नि असह्य कल्लोळ उठले, की आपल्या एखाद्या चुलतबहिणीशी किंवा डॉ. य. खु. देशपांडे यांच्यासारख्या जिवलग मित्राशी आपली भावना ते थोडीशी उघडी करीत.—आणि इतर वेळी देशसेवेच्या नि ज्ञानसेवेच्या उद्योगात मन झाकून मग्न होऊन राहात.[१]

पण भवितव्य उमलणार होते आणि त्यांनाही उमलविणार होते. त्यांनी ज्ञानकोशाचा मांड मांडला आणि त्यामधून कु. कोहन त्यांच्या अधिक जवळ आल्या. ज्ञानकोशासाठी जर्मन, फ्रेंच वगैरे भाषांतील ज्ञानाची निवड करावयाची होती आणि त्यासाठी त्या भाषांतील वेचक ग्रंथ भाषांतरून घ्यावयास हवे होते. तेव्हा साहजिकपणे, त्या भाषा उत्कृष्टपणे जाणणाऱ्या कु. कोहन यांचे नाव भाषांतरकार म्हणून केतकरांच्या दृष्टीसमोर येऊन त्या नावाला त्यांनी ज्ञानकोशाच्या संचालकमंडळाची अनुमती घेतली. 'हिस्टरी ऑफ इंडियन लिटरेचर' या विंटरनिट्झच्या सुप्रसिद्ध जर्मन ग्रंथाचे भाषांतर कु. कोहन यांच्याकडे सोपविण्यात आले आणि पौंडाला पंधरा पृष्ठे या अत्यंत अल्प मोबदल्यात त्यांनी ते पुरे केले. त्या वेळीं महायुद्धामुळे पौंडाची किंमत फार घटली होती नि प्रत्येक वस्तू महाग झाली होती. पण कु. कोहन यांना ज्ञानकोशाचे काम करताना आपल्या प्रिय पुरुषाचे काम केल्याचा आनंद लाभत होता, म्हणून त्यांनी अल्प मोबदल्यात भाषांतराचे काम पतकरले असावे. भाषांतराचे काम त्या एकट्याच करीत आणि तेही फुरसतीच्या वेळीं करीत. पण ज्ञानकोशाची जर्मन व फ्रेंच ग्रंथांच्या भाषांतराची गरज मोठी होती आणि त्यांच्याखेरीज कोणी योग्य भाषांतरकार ज्ञानकोशाला मिळाला नव्हता. तेव्हा भाषांतराचे काम त्यांनी पूर्ण वेळ करावे आणि त्यासाठी सहा महिने मुदतीने हिंदुस्थानात यावे, असा विचार मागाहून निघाला. त्याप्रमाणे चालकमंडळाच्या १६ जून १९१९च्या बैठकीत त्या कामासाठी दोन हजार रुपये मंजूर होऊन, लढाईचा प्रतिबंध दूर होताच, १९ डिसेंबर १९१९ रोजी त्या हिंदुस्थानात येऊन पोहोचल्या. आपल्या मनाचा जो अंश मागे ठेवून केतकर १९१२मध्ये इंग्लंडहून निघाले होते तो अंश सुमारे सात वर्षांनी अशा प्रकारे त्यांच्याजवळ पुन्हा येण्याचा योग आला.[२]

कु. कोहन हिंदुस्थानात आल्या तेव्हा केतकर नागपूर सोडून पुण्याला स्थायिक झाले होते. ज्ञानकोशाची पुणे-शाखा १ एप्रिल १९१८ रोजी उघडल्यानंतर तिचे नेतृत्व प्रथम प्रा. वै. का. राजवाड्यांनी केले, नंतर प्रा. श्री. गो. काळ्यांनी केले आणि नंतर प्रसिद्ध

१ महाराष्ट्र, ५ मे १९३७, या. श्री. अणे; तोंडी आठवणी, श्रीमती वाय. एस. गोखले; आठवणी, य. खु. देशपांडे; ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ८६.

२ ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ७१, ७४, ७५, १६८, परिशिष्ट पृष्ठ ४.

क्रांतिकारक सेनापती बापट यांनी केले. या तिघांच्या कारकीर्दीत पुणे-शाखा संपादनाच्या कामासाठी फार उपयुक्त ठरेल असे दिसल्यामुळे संपादनाची मुख्य कचेरीच पुण्याला आणण्याचे रा. य. रा. दात्यांच्या सूचनेवरून केतकरांनी ठरविले होते व त्याप्रमाणे १ जून १९१९ रोजी ते स्वतः पुण्यास येऊन राहिले होते.[1] पुण्यास आल्यावर आपला ब्रम्हचारी संसार त्यांनी तुळशीबागेच्या रस्त्यावरील पेंडसेवाड्यात थाटला आणि त्याच वाड्यात ज्ञानकोशाचे एक उपसंपादक श्रौताचार्य धुंडिराजशास्त्री बापट राहात, त्यांच्याकडे जेवणखाण, चहा वगैरेची सोय लावून घेतली. धुंडिराजशास्त्र्यांची नि त्यांची प्रथमदर्शनीच चांगली मैत्री जमली होती. धुंडिराजशास्त्र्यांना यज्ञविषयक लेखनासाठी ज्ञानकोशात नेमून घेण्यापूर्वी पुण्याच्या एका खेपेत त्यांनी त्यांस भेटीस बोलाविले होते. तेव्हा ऐसपैस बोलणे करण्याच्या उद्देशाने ते त्यांना म्हणाले, की 'शास्त्रीबुवा, जिथे खाण्याचे चांगले जिन्नस मिळतील असे उपाहारगृह आपण गाठू या.' मग एक पंचेवाला शास्त्री आणि एक आंग्लभारतीय वेषातील देशी साहेब असे ते दोघे 'मामा पक्वान्ने' यांच्या उपाहार-गृहात शिरले आणि तेथे त्यांनी पुऱ्या, श्रीखंड, चिवडा वगैरे पदार्थांवर ताव मारीत आपले बोलणे संपविले. त्याच ठिकाणी बापटशास्त्र्यांची लेखक म्हणून नेमणूकही केतकरांनी करून टाकली. धुंडिराजशास्त्री विडी ओढणारे आणि केतकरांनाही गोऱ्या सिगरेटपेक्षा खाकी विडी अधिक पसंत; तेव्हा धूम्रपानातील सोबती म्हणून ते अधिक जवळ आले. धुंडिराजशास्त्र्यांशी अशी प्रथमदर्शनी मैत्री जमलेली असल्यामुळे त्यांच्या घरी केतकरांना परकेपण मुळीच वाटत नसे. त्यातून केतकरांना संकोच कशाशी खातात याचा पत्ता नव्हता. त्यामुळे, पहिल्या दिवशी जेवणाच्या वेळी जेव्हा धुंडिराजशास्त्र्यांचे कुटुंब त्यांना बेताबाताने वाढू लागले तेव्हा ते उद्गारले, 'वहिनी, हा तेलंग्या नि भुकेला ब्राम्हण आहे असे समजा आणि मग वाढा!'—आणि रोज ते पाटावर जेवायला बसले की जेवणाचा यथेच्छ समाचार घेत. भाज्यापाले, चटण्याकोशिंबिरी, गोडधोड, जे पानात पडेल त्याचा ते फन्ना उडवीत व गृहिणीला आपले पाक-परिश्रम सत्कारणी लागल्याचे समाधान देत. चहाच्या वेळी खाण्यासाठी चुरमुऱ्यांची त्यांनी एक झोळी करून ठेवली होती. चुरमुऱ्यांत चहा ओतून चुरमुरे खाण्यात त्यांना विशेष लज्जत वाटे. पेंडसेवाड्यात असताना त्यांनी केव्हातरी स्वयंपाकासाठी बाईही ठेवली होती आणि आपले जिव्हालौल्य मनमुराद तृप्त करून घेतले होते. त्या वेळी ते रोज पाच वेळा जेवीत नि त्यांच्या जेवणाच्या वेळा सांभाळता सांभाळता स्वयंपाकिणीच्या नाकी नव येत. एकदा एक गृहस्थ सकाळी साडेसहा वाजता त्यांना भेटण्यास गेले, तेव्हा ते दही-भाताचे जेवण करीत होते! त्यांचा हा सारा बुभुक्षितपणा बघून पेंडसेवाड्यातील स्त्रियांना 'डॉक्टरसाहेबांचे आता लग्न व्हायला हवे' असे वाटले असले तर त्यात आश्चर्य नाही.[2]

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ६८; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ, ४०.
२ आठवणी, धुं. ग. बापट; महाराष्ट्र, २१ (?) एप्रिल १९३७, य. पां. मेहेंदळे.

कु. कोहन परदेशात दूर होत्या तोवर केतकरांना आपल्या भावना कह्यात ठेवणे काहीसे सोपे होते. पण कु. कोहन हिंदुस्थानात येऊन पुण्याला त्यांच्यासमोर साक्षात वावरू लागल्या, तेव्हा आपल्या भावनांना आवर घालणे त्यांना कठीण गेले असावे. हिंदुस्थानातील परिस्थिती बघून कु. कोहन यांचे मन कदाचित बदलेल, अशी एक शंका त्यांच्या मनात पूर्वी येत होती. पण कु. कोहन हिंदुस्थानात आल्यावरदेखील जेव्हा पहिल्याच उत्कट प्रेमभावनेचा आविष्कार करीत राहिल्या, तेव्हा ती शंका शिल्लक राहिली नाही. साहजिकपणेच या बुभुक्षित नि ब्रम्हचारी विद्वानाने विवाह करून संसार थाटावा, असा बेत बांधण्यास हळूहळू प्रारंभ केला! त्यांच्या त्या बेताला त्यांच्या हिंदुत्वाभिमानाचाच मुख्य अडसर होता. विवाहाची नि संसाराची त्यांची इच्छा तीव्र असली तरी हिंदुत्वाच्या रक्षणाची नि वर्धनाची त्यांची भावना मडमेशी लग्न करण्याच्या बाबतीत त्यांना पाऊल पुढे टाकू देत नव्हती. भारतातील अहिंदूंना हिंदू संस्कृतीच्या आवरणाखाली आणावे, भारतामधील राष्ट्रीयत्व हिंदुत्वाच्या पायावर उभे करावे, असा उद्घोष आजवर ते करीत आले होते. त्यामुळे अहिंदू गोऱ्या वधूला घरात आणण्याचा विचार त्यांना पटत नव्हता. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या वाङ्मयसूचीच्या प्रस्तावनेत त्यांनी म्हटले होते, की "हिंदूंच्या वृद्धिक्षयात्मक हितास सार्वराष्ट्रीय हिताच्या काही गोष्टींपेक्षा मी अधिक महत्व देतो....माझ्या मताने एक लाख हिंदू जर मुसलमान झाले तर जे नुकसान होईल ते नुकसान सिव्हिल सर्व्हिसमधील सर्व हिंदी लोक काढून टाकले तरी होणार नाही. समाजाच्या अस्तित्वविषयक गोष्टींना अधिक महत्व आहे. आपल्या राष्ट्राचे स्वातंत्र्य कायम राहावे, ही गोष्ट जितकी महत्वाची, तितकीच हिंदूंचे हिंदुत्व कायम राहावे, ही गोष्ट महत्वाची आहे....हिंदुस्थानात हिंदूंचे प्रामुख्य राखणे कर्तव्य समजून तदर्थ खटपट केली पाहिजे." मग अहिंदू बाईशी विवाह केल्यावर जी संतती झाली असती ती हिंदू राहिली असती का? तिला हिंदू समाजाने आपणात सामावून घेतले असते का? तिला मान्यता दिली असती का?—हे व असेच प्रश्न त्यांना अस्वस्थ करीत होते. शिवाय, हिंदू संस्कृतीबद्दल त्यांना जे प्रेम होते तेही परक्या संस्कृतीची वधू घरात आणण्यास नकार देत होते. त्यांना ईश्वराच्या अस्तित्वाविषयी शंका होती; पण जे जे हिंदू आहे त्याचे त्याचे त्यांना विलक्षण प्रेम होते. त्यांनी एके ठिकाणी म्हटले आहे, की "मला सर्व जुन्या गोष्टींची आवड आहे. भक्तिमार्गी मंडळींचे भजन मला आवडते, ज्ञानेश्वराची पालखी मला प्रिय आहे, ब्राम्हणांचा वेदघोष ऐकत राहावासा वाटतो, आणि बरीच मंडळी जेवावयास बसली आणि त्रिसुपर्ण कोणी म्हटला नाही तर मेजवानीत काहीतरी कमी झाले असे वाटते. 'ये ब्राह्मणाः त्रिसुपर्णं पठन्ति' हे शब्द असलेल्या सूक्तांचे श्रवण झाले म्हणजे जेवण अधिक गोड वाटते."[1] तेव्हा एकीकडे विवाह नि संसार यांविषयीचे विकार त्यांच्या

१. आठवणी, केतकर, प्रतिभा, ३१ जुलै १९३३.

मनात गोळा होऊन राहिले होते आणि दुसरीकडे हिंदुत्वाचे नितांत प्रेम त्या विकारांना बांध घालीत होते. अर्थातच कु. कोहन हिंदुस्थानात आल्यावर काही दिवस त्यांनी अतिशय ताणलेल्या नि तीव्र मनःस्थितीत घालविले असावे.

पण त्या मनःस्थितीत त्यांना फार दिवस राहावे लागले नाही. हिंदू धर्माचा स्वीकार करून हिंदू संस्कृतीच्या महासागरात मिसळून जावयाचे असा निर्णय कु. कोहन यांनी घेतला आणि लग्नाला येणारी आडकाठी दूर झाली. केतकरांशी लग्न करण्याचे बाबतीत कु. कोहन यांनी लो. टिळकांचाही सल्ला विचारला. तेव्हा टिळकांनी तात्विक दृष्टया त्यांच्या मिश्रविवाहास अनुकूल असे मत दिले; मात्र 'डॉ. केतकर हा श्रीमंत मनुष्य नाही, त्याला लेखणीच्या जोरावर उपजीविका करावी लागणार आहे, तेव्हा हे ध्यानात घेऊन वाटल्यास विवाह करावा' असा इषाराही देऊन ठेवला. पण केतकर जसे होते तसेच कु. कोहन यांना हवे असल्यामुळे हिंदुत्व स्वीकारून विवाहबद्ध होण्याचा त्यांचा बेत नक्की झाला. सात वर्षांहून अधिक काळ चाललेले आराधन नि अनुनय या प्रकारे संपणार अशी शुभचिन्हे दिसू लागली. दोघांचीही मने त्यामुळे उल्हसित नि आनंदी बनून गेली. तिशी उलटलेली ही भावी वधूवरे पुण्याच्या सनातनी रस्त्यांतून एकमेकांच्या हातात हात घालून उत्साहाने संचार करू लागली. झगेवाल्या गोऱ्या कु. कोहनबरोबर पगडीवाले गव्हाळ केतकर डुलत निघाले, की पुणेकरांना विरोधाभासाचे एक प्रेक्षणीय दृश्य दिसू लागे. गावात आपोआपच पक्की बातमी पसरली, की हा कोकणस्थ ब्राम्हण आणि ही ज्यू जातीची जर्मन मड्डम यांचे लौकरच शुभमंगल होणार![1]

या ठिकाणच्या ज्ञानाचा झोत त्या ठिकाणच्या प्रश्नावर पाडून काहीतरी अभूतपूर्व दृश्य उभे करण्याची किमया केतकर नेहमीच करीत असत. कु. कोहन यांना हिंदू करून घेताना त्यांनी तशीच किमया केली आणि 'व्रात्यस्तोम' नावाचा नवा विधी प्रचारात आणला. त्या वेळीं ज्ञानकोशातील लेखनासाठी वेदांच्या अभ्यासात त्यांचे मन रमले होते आणि अथर्ववेदामध्ये व्रात्यस्तोमाचा विधी त्यांच्या दृष्टीस पडला होता. वेदानुयायी लोकांपासून पोषाख वगैरे बाबतीत भिन्न असलेले लोक म्हणजे 'व्रात्य' आणि त्यांची स्तुती म्हणजे 'स्तोम'. व्रात्यांना कोणताही पारमार्थिक उपदेश न करता किंवा त्यांच्याकडून पश्चात्तापाची अपेक्षा न करता वैदिक समाज जेव्हा स्तुतिपूर्वक त्यांचा स्वीकार करी तेव्हा व्रात्यस्तोमाचा विधी वेदकाली केला जाई. हिंदुत्व हे पारमार्थिक मतावर अधिष्ठित नाही, अशी केतकरांची कल्पना होती; आणि हिंदुत्वाची वाढ करावयाची असेल तर नवहिंदूंना कमी लेखून चालावयाचे नाही, असे त्यांचे मत होते. त्यामुळे व्रात्यस्तोमाचा विधी त्यांच्या विचारसरणीशी जुळला व तोच कु. कोहन यांच्या बाबतीत त्यांनी अमलात आणण्याचे ठरविले. पण हा विधी जुना असला तरी त्याचे उपयोजन नि आचार नवा होता. त्यामुळे तो करण्यास कोणी वृत्तीचा पुरोहित

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ८६, ८७; प्रतिभा, जुलै १९३७, मा. त्र्यं. पटवर्धन.

सहजासहजी तयार होईना. व्रात्यस्तोमाच्या प्रसंगी लो. टिळकांनी गृहपती व्हावे म्हणून केतकरांनी त्यांना विनंती केली; पण 'यात तुम्ही मला अडकवू नका' असे म्हणून टिळक दूर राहिले. 'व्रात्यस्तोमाला कोणी आक्षेप घेतला तर मी त्याचे समर्थन करीन' असे आश्वासन मात्र त्यांनी दिले. ज्ञानकोशात संपादक म्हणून काम करणारी जी शास्त्री-मंडळी होती त्यांना व्रात्यस्तोम मान्य नव्हता, म्हणून पौरोहित्य करण्यास त्यांच्यापैकीही कोणी पुढे आले नाही. तेव्हा संपादकीय खात्याचे व्यवस्थापक श्री. य. रा. दाते यांनी पौरोहित्य करण्याचे पतकरले, दुसरे एक संपादक श्री. चिं. ग. कर्वे यांनी त्यांना मदत केली आणि पाडव्याच्या मुहूर्तावर, २१ मार्च १९२० रोजी, व्रात्यस्तोमाचा विधी पार पडला. हिंदू झालेल्या कु. कोहन यांचे नवे नाव शीलवती असे ठेवण्यात आले. व्रात्यस्तोमानंतर आपल्या लग्नाचा बेत शीलवतींनी इंग्लंडात वडिलांना कळविला आणि १४ मे १९२० रोजी सेनापती पां. म. बापट यांच्या पौरोहित्याखाली लग्नाचा समारंभ साजरा झाला. लग्नात या पाश्चात्यविद्याविभूषित आणि प्रौढ पतिपत्नींनी विड्या तोडण्याचा सनातनी रसिकपणा दाग्विण्यास अनमान केले नाही. विड्या तोडण्याच्या प्रसंगाचे एक छायाचित्र नंतर 'विदूषक' नामक वृत्तपत्रात रंगीत कागदावर छापूनही आले होते![१]

व्रात्यस्तोम आणि लग्न हे दोनही समारंभ काही दिवस लोकचर्चेत गाजत होते. केतकर म्हणतात, की "अत्यंत नवीन गोष्टी करतानादेखील त्या गोष्टी वैदिक धर्माचे उपबृंहण करून करता येतात, या एका गोष्टीमुळे बऱ्याच लोकांस हे लग्न कौतुकाचे वाटले; तर काही सुधारक मंडळींस ते वाईट वाटले. मनोरंजनकारांनी मिस कोहन यांनी हिंदू होऊन हिंदू कायद्याप्रमाणे लग्न केले, ही मोठी चुकीची गोष्ट केली, असे विचार प्रदर्शित केले. त्यांना असे वाटले, की जर जुना श्रौतस्मार्त संप्रदायच...सर्व प्रकारच्या नव्या गोष्टींना क्षेत्र उत्पन्न करून देऊ शकतो, तर 'ब्रम्हो' संप्रदाय व सिव्हिल म्यारेज आक्ट हे अनावश्यक ठरतील. त्याचप्रमाणे हिंदू मिशनरी सोसायटीनेदेखील व्रात्यस्तोमावर टीका केली. कै. गजाननरावांना [म्हणजे गजाननराव वैद्यांना] असे वाटे, की जर जुन्या वैदिक ग्रंथांतूनच परकीयांस हिंदू करण्याचे विधी बाहेर पडू लागले तर आमच्या नवीन विधीस कोण विचारतो?—आणि अहिंदूंस हिंदू करण्याच्या कामात आपले पुढारीपण ब्राम्हण हिसकावून घेणार!" कै. रामशास्त्री आखवे यांनी व्रात्यस्तोमावर एक व्याख्यान दिले आणि मुख्य आक्षेप असा घेतला, की व्रात्यस्तोमाचा विधी केतकरांनी जसाच्या तसा घेतला नाही, तो सोमयागापासून निराळा केला. पण त्यावर केतकरांचे उत्तर असे होते, की अतिप्राचीन काळी व्रात्यस्तोम सोमयागाला जोडलेलाच नव्हता. आखवेशास्त्र्यांचे इतर आक्षेप विधीतील तपशिलाच्या चुकांविषयी होते. ते ऐकून सभेतील एक श्रोता उद्गारला,

१ केसरी, ३० मार्च १९२०; व्रात्यस्तोमप्रयोग (पुस्तिका), य. रा. दाते; आठवणी, य. रा. दाते; ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ८६, ८७, १६६; विदूषक (पुरवणी), मुंबई, १४ मे १९२०

"व्रात्यस्तोमात चुकाच झाल्या ना! पुढच्या व्रात्यस्तोमाच्या प्रसंगी तुम्हांला निमंत्रण करू." तेव्हा प्रेक्षकात एकच हशा पिकला. श्री. दाते व श्री. कर्वे यांनी व्रात्यस्तोमात भाग घेतल्यामुळे पुण्यातील ब्रम्हवृंदांनी सभा भरवून शंकराचार्यांचे आज्ञापत्र आणविले आणि त्यांच्यावर बहिष्कार पुकारला. त्या बहिष्कारात श्री. कर्व्यांना आपले राहाते घर सोडावे लागले! केतकरांना ज्ञानकोशातील सनातनी मंडळी वाटेगे समजू लागली. ज्ञानकोशाच्या कार्यालयात गणपती बसे नि एकत्र जेवण होई. त्या कार्यक्रमास ही मंडळी तयार होईनात. तेव्हा केतकर म्हणाले, की 'गणेशोत्सव झालाच पाहिजे. आम्ही दोघे फार तर वेगळ्या पंक्तीला बसू. यंदा एकाऐवजी दोन पक्वान्न करा! माझे वर्गणीचे पाच रुपये जास्त!' नंतर उत्सव झाला आणि वेगळ्या पंक्तीला मुकटा नेसून ते आणि जांभळे पातळ नेसून शीलवतीबाई अशी जेवणे उरकली. कालांतराने या विवाहाबद्दलची नि व्रात्यस्तोमाबद्दलची खळबळ हळूहळू शांत झाली. मात्र समाजात कुणीकुणी टवाळ गृहस्थ गप्पांचे अड्डे पडले की म्हणत, 'हा सारा प्रकार म्हणजे व्रात्यस्तोम नव्हता. तर केतकरांच्या व्रात्यपणाचे स्तोम होते!'[१]

विवाहानंतर केतकर पतिपत्नी माथेरानला गेली आणि तेथे त्यांनी मधुचंद्र साजरा केला. शीलवतींनी केतकरांची विद्वत्ता नि ज्ञानपिपासू वृत्ती बघून त्यांच्याशी विवाह केला होता; पण विवाहानंतर केतकरांच्या ज्ञानपिपासू वृत्तीचा एक आगळाच आविष्कार त्यांच्या अनुभवाला आला. केतकर खरेखुरे ज्ञानशोधक होते. समाजातील क्रियाप्रतिक्रिया नि मानवी मनातील हालचाली बघाव्या, याचा त्यांना अतोनात छंद होता. शीलवतींनी हिंदुत्व स्वीकारून त्यांच्याशी विवाह केला, ही घटना समाजशास्त्र व मानसशास्त्र यांच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण नव्हती का? तिचे परिणाम शीलवतींच्या मनावर कोणकोणते होतात, हे बघणे उद्बोधक ठरण्यासारखे होते की नाही? तेव्हा, लग्नानंतर मीलनोत्सुक पतीप्रमाणे नवपत्नीचे स्वागत ते करीत बसले नाहीत. त्याऐवजी त्यांनी आपल्या पत्नीचे अलिप्त निरीक्षणच जिज्ञासापूर्वक सुरू केले! शीलवतींच्यावर केलेल्या एका प्रेमकवितेत त्यांनी स्वतःबद्दल पूर्वी असे म्हटले होते, की "कृमिशास्त्री अवलोकी कृमिते, चित्ता हो न विकार। तटस्थ वृत्तीने तैसा मी लक्षी मनुष्यभाव ॥"—स्वतःबद्दलचे त्यांचे ते मत खोटे होते असे म्हणण्याची आता कोणाची शहामत होती? त्यांच्या निरीक्षणाचा शीलवतींना मात्र स्वाभाविकपणे राग आला आणि त्या उद्गारल्या, की "प्रयोगशाळेत विच्छेदनासाठी आणलेला प्राणी म्हणून वागायला मी तयार नाही!" तेव्हा कुठे आपले जिज्ञासू निरीक्षण त्यांनी थांबविले आणि 'कृमिशास्त्र्या'ची भूमिका सोडून रसिक पतीची भूमिका धारण केली.[२]

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ७१-७२, ८६-८७; आठवणी, य. रा. दाते, श्रीताचार्य धुं. ग. बापट.
२. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ८७; बाळे कोहिनूर, विद्यासेवक, जून १९२०-आठवणी, शीलवती केतकर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २५८११...... वि: चरित्र

लग्नानंतर शीलवती पेंडसेवाड्यात केतकरांच्याबरोबर राहू लागल्या आणि केतकरांच्या जीवनाशी आपले जीवन एकरूप करावे, असा त्यांनी मनापासून प्रयत्न केला. विधिपूर्वक त्या हिंदू झाल्याच होत्या, पण मनानेही त्या हिंदू बनू लागल्या. साडी नसण्याची कला बॅ. गाडगिळांच्या पत्नीकडून त्यांनी शिकून घेतली. झग्याऐवजी मधून मधून त्या साडी नेसू लागल्या. चैत्री गौर मांडून चैत्रातील हळदीकुंकवासाठी सुवासिनींना घरी बोलवावे, अशी प्रथा त्यांनी सुरू केली. कोणी हळदीकुंकवास बोलावले तर त्या आस्थापूर्वक जात आणि 'या गोऱ्या बाईला ओटी कशाला?' म्हणून कोणी ओटी भरली नाही तर ती न चुकता भरवून घेत. केतकरांची प्राणाहून प्रिय मराठी भाषा इंग्लंडमध्ये ग्रंथावरून त्या शिकल्या होत्या आणि 'स्कूल ऑफ ओरिएंटल स्टडीज' या संस्थेची परीक्षाही त्यांनी दिली होती. आता बोलण्याचा सराव करून व शिक्षिका ठेवून त्या बालबोध मराठी भराभर बोलू लागल्या. केतकरांचा अस्ताव्यस्त नि गबाळा असा ब्रम्हचाऱ्याचा संसार त्यांनी टापटिपीने नि काटकसरीने नेटका करून टाकला. कपडे जाग्यावर गेले, केर नष्ट झाला, विड्यांची थोटके दिसेनाशी झाली आणि प्रसन्न वातावरणात फुलदाणीमध्ये पानाफुलांचा एखादा झुबका शोभू लागला. केतकरांच्या अनिर्बंध खाण्यापिण्यावर त्यांनी नियंत्रण घातले. केतकर दर अर्ध्यापाऊण तासाने फिक्या चहाचा एखादा पेला ढोशीत आणि चहाचा एक पेला संपेतो त्यांच्या चारपाच विड्या खलास होत! पण त्यांनी या प्रकाराला आळा घातला. केतकर म्हणतात, की "मी रोज काय खातो, सिगारेट किती ओढतो, यावर त्यांचे बरेच लक्ष असे व या बाबतीत मी त्यांच्या नेहेमी धाकातच असे. वारंवार डॉक्टराकडे नेऊन माझी तपासणी करून घेणे, या गोष्टी त्यांनी केल्या आहेत." केतकरांचा अव्यवस्थित नि अस्वच्छ पोषाख शीलवतींनी थोडासा व्यवस्थित नि स्वच्छ केला. कपडा फाटला की लगेच शिवायचा, बटण तुटले की लगेच लावायचे, याकडे त्यांचे बारीक लक्ष असे. केतकर दाढी करीत तेव्हा कधी आरसा नसे, तर कधी ब्रश नसे. सतरा ठिकाणी दाढी कापे. पण आता सर्व सामान जाग्यावर मिळू लागले आणि कुठे कापले तर तुरटीसाठी शीलवतींची प्रेमळ धावपळ सुरू झाली. केतकरांच्या मनात उच्च विचारांची हालचाल सदैव सुरू असे. हे विचार बोलून दाखवायला नि चर्चा करायला शीलवतींच्या ठिकाणी त्यांना एक उत्तम सोबतीण मिळाली. शीलवतींचे केतकरांवर इतके जिवापाड प्रेम होते आणि त्यांच्या जीवनाशी त्या इतक्या एकरूप झाल्या होत्या, की एकदा शांतारामपंत दांडेकरांच्याकडे त्या मुंबईला असताना ज्ञानकोशातील मतभेद विकोपाला गेल्याची केतकरांची त्यांना तार आली आणि तार बघताच त्या उभ्याच्या उभ्या भुईवर कोसळल्या![1]

१. आठवणी, धु. ग. बापट, प्रेमावती दांडेकर, गो. चिं. तांबे, हे. रा. खरे; प्रतिभा, जुलै १९३७, आ. रा. देशपांडे; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे ८५, ४; ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ १६९.

अतिशय अभिज्ञ, ममताळू नि कष्टाळू पत्नी मिळाली हे केतकरांचे थोर भाग्य होते आणि त्याची जाणीव लग्नानंतर पदोपदी ते दाखवीत होते. लग्नापूर्वी इंग्लंडमध्ये ते म्हणाले होते, की "तुज सुख देणे आयुष्याचा एक हेतु नच वाटे।"[१] पण आता तसे शब्द त्यांच्या तोंडून निघेनासे झाले. शीलवतींचा धिप्पाड नि स्थूल देह बघून त्यांचे आप्तमित्र त्यांना क्वचित म्हणत की 'असली कसली बायको केलीस कोण जाणे'. पण पत्नीच्या सौंदर्यातील उणीव त्यांनी कधी जाणवून घेतली नाही. स्वतःच्या प्रकृतिस्वास्थ्यासाठी पत्नीने घालून दिलेले नियम ते आज्ञाधारक मुलाप्रमाणे मुकाट्याने पाळीत आणि नियम मोडायचेच झाले तर घराबाहेर जाऊन पत्नीच्या दृष्टीआड मोडीत! त्यांना महाराष्ट्रीय वळणाचे चमचमीत, तेलकटतुपट नि गोडधोड, सारेच खाणे आवडे. पण शीलवतींना तसले पाकशास्त्र अवगत नव्हते. तरी त्या जे प्रेमाने करीत तेच ते चवीने खात आणि भजी खावीशी वाटली तर उपाहारगृह गाठीत.[२] एकदा ते गावाला गेले आणि स्वतःला त्यांचा चुलता म्हणविणारा एक तोतया कोकणी गृहस्थ त्यांच्या 'पहिल्या बायको'ची चौकशी करीत घरी आला! तेव्हा आपणाला एखादी सवत असावी, या कल्पनेने शीलवतींच्यावर आकाश कोसळले नि त्यांनी सारी रात्र रडून काढली. दुसऱ्या दिवशी केतकर गावाहून परतले तेव्हा 'मला तुम्ही साफ बुडविलेत! कशाला माझ्याशी लग्न केलेत?' असा त्यांनी टाहो फोडला. केतकरांनी किती समजावले तरी त्यांची समजूत पटेना. तेव्हा केतकर त्यांना थेट वऱ्हाडपर्यंत एकदा घेऊन गेले आणि सर्व आप्तमित्रांशी त्यांची ओळख करून देऊन त्यांनी आपले एकपत्नीव्रत त्यांच्याशी शाबीत केले.[३] हिंदू संस्कृतीचा नि म्हणून हिंदू भाषेचा व वेषाचा त्यांना जबर अभिमान होता. पण पत्नीला अवघड वाटू नये म्हणून तो अभिमानही त्यांनी काहीसा गुंडाळून ठेवला. पत्नीबरोबर जरूर तेव्हा ते इंग्रजीत बोलत आणि तिने करून दिलेला साहेबी वेष आवडीने घालीत. लोक म्हणत, की 'केतकर बायकोला हिंदू बनवायला गेले, पण तिनेच त्यांना ख्रिस्ती बनवले!' पण तिकडे ते लक्ष देत नसत.[४] "सामान्यतः ध्येये इतकी क्षुल्लक असतात, की तेवढ्याकरिता पतिपत्नीप्रेमात त्रिघाड व्हावा, असे मला वाटत नाही" असे फार खोल नि मार्मिक उद्गार त्यांनी काढले आहेत. शीलवतींच्या रूपाने सुखाची स्वर्गंगा आपल्या घरात चालून आली आहे, अशी त्यांची तृप्तीची नि समाधानाची वृत्ती असे. "माझे वैवाहिक जीवन सुखी असल्यामुळे मनाविरुद्ध जोडीदार पतकरावा लागणे वगैरेचे परिणाम मला अनुभवावे लागलेच नाहीत" असे शब्द म्हणूनच ते निःसंकोच उच्चारू शकत.[५]

१. बाळे कोहिनूर, विद्यासेवक, जून १९२९.
२. आठवणी, दि. य. फाटक; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ८८.
३. युगवाणी, एप्रिल १९५०, दुर्गा भागवत.
४. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे ८५-८६, १२-१३.
५. 'एक मुलाखत', प्रतिभा, जुलै १९३७.

हे सुखी जोडपे म्हणजे काही काळ लोकांच्या कुतूहलाचा आणि करमणुकीचा विषय झाला होता. पेंडसेवाड्यापासून जवळच असलेल्या मंडईत भाजी नि संसाराच्या जिनसा खरेदी करण्यासाठी दोघे गेली, की जोडीने पतिपत्नी बघण्याची नि त्यातही भिन्नदेशीय पतिपत्नी बघण्याची सवय नसलेली मंडळी डोळे टवकारून त्यांच्याकडे बघत राहात. अजाण पोरे तर घोळके करून त्यांची पाठ धरीत. पण मुलांच्यावर ती रागावत नसत किंवा चिडतही नसत. उलट, एका पिशवीत डाळेचुरमुरे भरून त्यांची खिरापत ती मुलांना वाटीत नि मौज करीत. केतकरांना चित्रपट बघण्याचा विशेष नाद होता. अभिजात आणि गंभीर चित्रपटांपेक्षा सामान्य हास्यविनोदाचे व धांगडधिंग्याचे चित्रपट बघून मनमुराद हसणे त्यांना पसंत असे. अमेरिकन जीवन चित्रित करणारे चित्रपट बघून त्यांच्या जुन्या स्मृती जाग्या होत, म्हणून ते चित्रपटही त्यांना आवडत. तेव्हा असला एखादा चित्रपट लागला, की सपत्नीक ते त्याला हजर राहात आणि विद्यार्थिप्रिय 'आर्यन सिनेमा'त मग त्यांचे दर्शन लोकांना घडे. अशा वेळी, पतिपत्नींनी हातात शेंगा, पेरू नि इतर खाद्यपदार्थ घेतलेले असत आणि दोघे हसत, बोलत त्यांचा फन्ना उडविण्यात गर्क असलेली दिसत. लग्नापूर्वी दोघे हातात हात गुंफून हिंडतच होती; त्यामुळे पाश्चात्य रिवाज लग्नानंतर लोपण्याचा प्रश्न नव्हता. चारचौघांत केतकर पत्नीला 'डार्लिंग' म्हणत, चढताउतरताना तिला हात देत, आणि निरोप घेतांना तिच्या गालांना ओष्ठस्पर्श करीत! सोवळ्या पुणेकरांना आणि त्यातल्या त्यात सदाशिव-शनिवार-पेठेतल्या भटजी संस्कृतीच्या लोकांना हे बघून कसेसेच होई. केतकरांच्या वैवाहिक जीवनाबद्दल अनेकांना इतके कुतूहल उत्पन्न झाले होते, की ज्ञानकोश खपविण्यासाठी केतकर एकदा एका संस्थानी अधिकाऱ्याकडे गेले असता त्याने पृच्छा केली, की 'डॉक्टरसाहेब, आपण या बाईशी कां व कसे लग्न केलेत?' तेव्हा हसतच केतकरांनी त्याला मार्मिक उत्तर दिले, की 'मला येथे बायको कोण देत होता? कसेतरी जमविले झाले!'[1]

हिंदुस्थानात आल्यापासून लग्न होईपर्यंत शीलवतींनी ज्ञानकोशात लेखक म्हणून काम केले; पण लग्न होताच ३० जून १९२० रोजी त्यांनी त्या कामाचा राजिनामा दिला.[2] मिळवत्या बायकांचे नवरे ऐदी बनतात, अशी केतकरांची एक आवडती समजूत होती.[3] त्या समजुतीप्रमाणे, केतकर ऐदी बनू नयेत म्हणून शीलवतींनी राजिनामा दिला, की त्यांना नवऱ्याची बडदास्त आणि घरकाम ही नोकरीपेक्षा जास्त प्रिय होती म्हणून राजिनामा दिला, हे त्यांचे त्यांना ठाऊक! पण घराची निगा नि पतीची सेवा यांची त्यांना कितीही हौस असली, तरी नवराबायकोच्या टामटुमीच्या संसारात

१. आठवणी, धुं. ग. बापट; लोकशिक्षण, मे-जून १९३७, शीलवती केतकर; प्रतिभा, जुलै १९३७, आ. रा. देशपांडे; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे ८६, ८५.
२. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ७५.
३. विचक्षणा, ब्राम्हणकन्या इत्यादी कादंबऱ्यांत अशी समजूत प्रकट झाली आहे.

तेवढ्याने त्यांचे मन गुंतलेले राहात नसे. रिकामा वेळ बराच उरे आणि आपल्या सुशिक्षितपणाला साजेसे काही समाजकार्य करावे अशी इच्छा त्यांना उत्पन्न होई. तेव्हा बुधवार-रस्त्यावरच्या एका वाड्यात, माडीवर, केतकरांनी त्यांना 'स्त्रीकर्मसदन' नावाची संस्था काढून दिली. ब्राम्हण किंवा इतर मध्यम वर्गातील विधवा स्त्रियांना काही उद्योग द्यावा आणि जमाखर्चाची तोंडमिळवणी झाल्यास संस्था चालवावी, असा या संस्थेचा उद्देश होता. उद्देशाप्रमाणे संस्थेत चारपाच शिवणयंत्रे खरेदी करण्यात आली, एक ख्रिश्चन पुरुष कपडे बेतण्यासाठी नोकरीवर घेण्यात आला आणि शीलवतींच्या देखरेखीखाली स्त्रियांकडून शर्ट शिवण्याचे काम होऊ लागले. संस्था या प्रकारे सहा महिने चालली, पण तेवढ्यात बाराशे रुपये बूड येऊन नंतर ती बंद करणे भाग पडले. तेवढ्या वेळात माल तीनचार हजारांचा तयार झाला; पण भाडे, कापड व जाहिरात यांनीच बरीचशी रक्कम खाल्ली आणि स्त्रीकामकऱ्यांच्या पदरात सुमारे सहाशे रुपये काय ते टाकता आले. एवढा मोठा व्यवहार करून त्या मानाने स्त्रीकामकऱ्यांना फार थोडा मोबदला देता आला, याचे केतकरांना विशेष वाईट वाटले. परंतू त्यांना स्वतःला जी बाराशे रुपयांची बूड आली तीबद्दल ते बेफिकीर होते.—कारण त्यांची नजर द्रव्यावर नव्हती, प्रयोगातून मिळणाऱ्या ज्ञानावर होती. अशा संस्था यशस्वी करावयाच्या असतील, तर भांडवली साधनांचा व वस्तू तयार करायला लागणाऱ्या सामग्रीचा खर्च कमी असला पाहिजे आणि मजुरीवर जास्त खर्च करता आला पाहिजे, हे तत्व 'स्त्रीकर्मसदना'च्या प्रयोगातून त्यांना समजले आणि तेवढ्यानेच ते तृप्त झाले! ते म्हणतात, की "या कामामुळे मला काही महत्वाच्या गोष्टी कळल्या आणि ते १२०० रुपये गेले याबद्दल मला आज मुळीच दुःख होत नाही. त्या कामामुळे जो अनुभव मिळाला त्या अनुभवामुळे ते गेलेले १२०० रुपये पुढेमागे वसूल होतील, असा मला विश्वास वाटत आहे." बारीकसारीक गोष्टींसाठी ज्ञान मिळविण्याची त्यांची प्रवृत्ती इतकी प्रखर होती, की ही संस्था काढण्यापूर्वी फोर्डचे आत्मचरित्र आणि अशा संस्थांवरील काही लेख त्यांनी वाचून काढले होते. स्त्रीकर्मसदनानंतर शीलवतीबाईंनी ज्यात पैसा घालावा लागेल असे सार्वजनिक कार्य पुढे कधी हाती घेतले नाही. बालकमंदिरातील अध्यापनासारखे सुरक्षित कार्य तेवढे त्या अधूनमधून करीत राहिल्या.[१]

लग्नानंतर सुमारे दोन वर्षे केतकर पतिपत्नी पेंडसेवाड्यात राहात होती. त्यानंतर शीलवतींचे वडील श्रीयुत कोहन आणि बहीण मिस हेटी कोहन ही मंडळी आपल्या इडिथचा संसार बघण्यासाठी नि कायमचे वास्तव्य करण्यासाठी हिंदुस्थानात आली आणि पेंडसे-वाड्यातील जागा अपुरी पडू लागली. पाश्चात्य संस्कृतीत रुळलेल्या इतक्या गोऱ्या

१. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे ७४, ७५; ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ८८, ८९; आठवणी, शीलवती केतकर.

माणसांना पेंडसेवाड्यातील ब्राम्हणी वालेकिल्ल्यात राहाणे रीतिरिवाजांच्या व खाण्या-पिण्याच्या दृष्टीने फार अवघडही गेले असते. तेव्हा केतकर डेक्कन जिमखान्यावर प्रथम पदेभुवनात व मग श्री. अ. चिं. भटांच्या एका छोट्या बंगलीत राहावयास गेले. श्रीयुत कोहन पुण्याला आल्याबरोबर आजारी पडल्याने एकच दिवस पेंडसेवाड्यात राहून ससून रुग्णालयात गेले नि तेथून एकदम डेक्कन जिमखान्यावरील बिऱ्हाडात येऊन राहू लागले. पण भाड्याचे बिऱ्हाड आता केतकरांना नकोसे वाटू लागले होते. जगभर वाटेल तिकडे भराऱ्या घेतलेल्या या पक्ष्याला आता घरटे बांधून कोठेतरी स्थिर व्हावे, अशी इच्छा उत्पन्न झाली होती. या इच्छेला शीलवतींनी आपल्या संसारी स्वभावानुसार पुष्कळ प्रेरणा दिली असावी. आता ज्ञानकोशातून बरी प्राप्ती होत असल्यामुळे आणि त्या प्राप्तीला आपल्या स्त्रीधनाची जोड देण्यास शीलवती तयार झाल्यामुळे पैशाचाही मोठासा प्रश्न नव्हता. तेव्हा १९२२-२३ च्या सुमारास पी. वाय. सी. जिमखान्यामागे एक जागा भाड्याने घेऊन तीवर ‘आशास्थान’ नामक एक लहानसा बंगला केतकरांनी मोठ्या आशेने बांधून घेतला. मात्र बंगल्याच्या बांधकामात स्वतःच्याच कल्पना त्यांनी लढवल्या आणि त्यामुळे खर्चाचा मूळ अंदाज चार हजारांचा असता प्रत्यक्ष खर्च त्याच्या दुप्पट झाला व मागाहून व्याज नि कोर्टकचेऱ्या यांनी तो तिपटीवर गेला![1]

लग्नानंतरची चारपाच वर्षे आर्थिक दृष्टीने केतकरांनी फार सुखात घालविली. जुलै १९२० पासून ज्ञानकोशातील त्यांचे वेतन मासिक ४२५ रुपयांवर गेले होते आणि त्यांची पैशाची चणचण पूर्णपणे संपली होती. या वेतनातून त्यांनी जी सात हजार रुपयांची शिल्लक टाकली होती तीच ‘आशास्थान’ बांधताना उपयोगी पडली होती. शीलवती लग्न होऊन केतकरांच्या घरात आल्या तेव्हा त्यांच्यापाशी लग्नापूर्वीचे दोन हजार रुपये शिल्लक होते आणि त्यांनी केलेल्या विंटरनिट्झच्या इंग्रजी भाषांतराबद्दल कलकत्ता विद्यापीठाकडून त्यांना आणखी दोन हजार रुपये मिळाले होते. शीलवतींचे हे चार हजार रुपयेही आशास्थानाकडे खर्च करता आले. आशास्थानासाठी गेलेले पैसे वजा करता घरखर्चा-साठी तीनशेच्या आसपास शिल्लक उरे आणि तीत मिस हेटी कोहन यांच्या मिळकतीची भर पडून घरखर्च पाचशे रुपयांपर्यंत होत असे. श्रीयुत कोहन व मिस हेटी कोहन ही केतकर-कुटुंबात राहात असली तरी आपल्या खर्चाचे काटेकोर टिपण ठेवीत व टिपणा-प्रमाणे महिनाअखेर खर्चाची वजावट होई. केतकर कोकणस्थ होते आणि कोहन मंडळी ज्यू होती; तेव्हा एकत्र कुटुंबात राहून पैशाचे व्यवहार चोख ठेवले जात, हे नैसर्गिक म्हणता येईल! केतकरांच्या कुटुंबात खरी माणसे दोनच होती आणि त्यांच्यावर तीनशे-पर्यंत खर्च होई. मध्यम स्थितीतल्या हिंदू कुटुंबाशी तुलना करता हा खर्च त्या काळच्या मानाने श्रीमंती थाटाचा नि काहीसा सढळ होता, यात शंका नाही. पण उद्याच्या

१. आठवणी, शीलवती केतकर; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे ८६, ९२; ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे १५४.

जेवणाची भ्रांत ज्यांनी अनेकदा अनुभवली होती त्या केतकरांचे अंतःकरण आभाळाएवढे मोठे होते. युरोप खंडात राहिलेली कुटुंबीय मंडळीं, उच्च राहाणीच्या स्वतःच्या कल्पना आणि सढळ हात यांमुळे हा खर्च त्यांना तुटपुंजाच वाटे! या वेळीं भरपूर पैसा मिळाला आणि उदार हाताने त्यांनी तो खर्च करून टाकला. त्यांना काय कल्पना, की भविष्यकाळात उद्याच्या जेवणाची भ्रांत त्यांना पुन्हा पडणार होती![1]

१९२४ च्या सुमारास केतकरांच्या संसाराला एका अर्थी बहर आला होता. सुशिक्षित, प्रेमळ, कष्टाळू आणि रसिक अशी पत्नी त्यांना लाभली होती. स्वतःच्या मालकीच्या घरात ते येऊन राहिले होते. सासरे आणि मेव्हणी यांच्यामुळे घर भरले होते. हातात पुरेसा पैसा खेळत होता आणि सर्व सुखे भोवती गजबजली होती. आता उणीव केवळ एकाच गोष्टीची होती. बागडणारी नि रडणारी, अंगाला बिलगणारी नि बोबडे बोल बोलणारी, अशी लहान मुले घरात नव्हती. चाळिशीला टेकलेल्या शीलवतींची मातृभावना तर मुलांसाठी आसुसली होती.[2] भटक्या वृत्तीच्या केतकरांनादेखील वयपरत्वे मुलांची उणीव क्वचित क्वचित जाणवत असावी. मग केतकरांच्या संसारात मुलांचा प्रवेश होणार होता का? त्या संसाराला जो बहर आला होता त्यामधील उणीव दूर होणार होती का? ज्या नियतीने जगावेगळ्या पद्धतीने त्यांचा संसार उभा केला ती नियती त्या संसारात मुलांचे हास्य कसे फुलवणार होती?

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे १५३, १५४; आठवणी, शीलवती केतकर.
२. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ८९.

# एक अपूर्व प्रस्तावना

[१९१९ ते २४]

ज्ञानकोशाचे मुख्य संपादकीय कार्यालय जुलै १९१९ मध्ये पुण्याला येऊन केतकर पुण्यातच स्थायिक झाल्यानंतर ज्ञानकोशाच्या रचनेबद्दल एक अभिनव आणि प्रचंड कल्पना त्यांना स्फुरली. तोवर ज्ञानकोशाची तीनचतुर्थांशाहून अधिक कच्ची टिपणे तयार झालेली होती; पण पक्का मजकूर तयार होऊन, त्यावर मुद्रणपूर्व सारे संस्कार वहून, तो मुद्रित स्वरूपात वाचकांच्या हाती पडण्यास बराच वेळ लागणार होता. ज्ञानकोशाची कल्पना जाहीर होऊन तर सुमारे चार वर्षे उलटली होती आणि ज्ञानकोशाच्या वर्गणीदारांच्या हाती कोणताही मजकूर पडलेला नव्हता. वाङ्मयसूची १९१९ साली प्रसिद्ध होऊन ज्ञानकोशात कोणते ज्ञानकार्य चालले आहे, याची वानगीपुरती कल्पना महाराष्ट्राला आली होती; पण ज्ञानकोशाच्या वर्गणीत वाङ्मयसूची मिळण्याची सोय नसल्यामुळे व तो ज्ञानकोश-मंडळाचा पण ज्ञानकोशाबाहेरील ग्रंथ असल्यामुळे त्याने वर्गणीदारांचे समाधान होणे शक्य नव्हते. फार काळ वर्गणीदारांना ताटकळत ठेवल्याने ज्ञानकोशाच्या कामावरचा वर्गणीदारांचा नि साऱ्या जनतेचाही विश्वास डळमळण्याचा संभव होता. शिवाय, वर्गणीदारांकडे काही भाग रवाना करून त्यांच्याकडून वर्गणीचे पुढील हप्ते वसूल करणे व पैसा निर्माण करणे हेही संपादन व मुद्रण यांचा गाडा चालू राहाण्यासाठी जरुरीचे होऊन बसले होते. तेव्हा केतकरांनी पुण्यास आल्यावर अशी कल्पना काढली, की अकारविल्हेने येणारा मजकूर 'शरीरखंड' म्हणून अनेक भागांत पुढे यथाकाल प्रसिद्ध व्हावा, पण मूलभूत स्वरूपाचा काही मजकूर 'प्रस्तावनाखंड' म्हणून सलग ग्रंथांच्या रूपाने तत्पूर्वी वाचकांच्या पदरात टाकावा. प्रथमतः त्यांची कल्पना अशी होती, की वैदिक व बौद्ध वाङ्मयाची माहिती देणारे दोन ग्रंथ छापण्यास घ्यावेत; पण पुढे या दोन ग्रंथांना धुमारे नि पारंब्या फुटून पाचपाचशे रॉयल अष्टपत्री पृष्ठांच्या पाच ग्रंथांचा जन्म झाला! हे पाच ग्रंथ ज्ञानकोशाबाहेरचे न समजता ज्ञानकोशांतर्गत समजावेत असेही नक्की ठरले आणि सप्टेंबर १९१९ मधील चालकमंडळाच्या सभेत

या वेतावर शिक्कामोर्तब झाले. एक 'मर्यादित मंडळ' स्थापून त्या मंडळाकरवी ज्ञानकोशरचना करण्याची अभिनव कल्पना केतकरांनी काढली आणि ज्ञानकोशाच्या कारभारयंत्रणेला प्रथम अपूर्वता प्राप्त करून दिली. आता प्रस्तावनाखंडाची जी दुसरी अभिनव कल्पना त्यांनी काढली तीमुळे ज्ञानकोशाच्या संपादनाला अपूर्वता प्राप्त झाली. कारण प्रस्तावनाखंडाच्या पाच ग्रंथांत जे ज्ञानभांडार खोलले गेले त्याला भारतीय कोशवाङ्मयांत तरी तोड नव्हती.[१]

प्रस्तावनाखंडाच्या कल्पनेला चालकमंडळाने सप्टेंबर १९१९ मध्ये जरी संमती दिली तरी तत्पूर्वीच प्रस्तावनाखंडाच्या रचनेला केतकरांनी आत्मविश्वासपूर्वक प्रारंभ केलेला होता. चालकमंडळाची संमती मिळाल्यावर प्रस्तावनाखंडातील पहिल्या विभागाचे काम झपाट्याने पूर्ण करून नोव्हेंबरमध्ये त्यांनी तो विभाग निर्णयसागर छापखान्याकडे छपाईसाठी दिला. निर्णयसागरने मात्र अत्यंत दिरंगाईने छपाई केली आणि हा पहिला विभाग प्रसिद्ध होण्यास १९२१ साल उजाडले! वास्तविक पाहाता १९२० साली ज्ञानकोशाचे सारे हस्तलिखित सिद्ध होऊन मूळ योजनेप्रमाणे सारा ज्ञानकोशच १९२१ च्या सुमारास प्रकाशात यावयास हवा होता. पण अनेक अडथळे उत्पन्न झाले, मूळचे अंदाज चुकले आणि २१ साली फक्त पहिला विभाग असा बाहेर पडला. भागीदारांच्या आणि वर्गणीदारांच्या अपेक्षा या वेळेपर्यंत खूपच ताणल्या गेल्या होत्या. ज्ञानोत्पादनाच्या या कारखान्यात आपण पैसे गुंतवले, पण तीनचार वर्षांत हातात काही पडले नाही, तेव्हा काय होते, काय नाही, याचे त्यांना गूढ पडले होते. पहिला विभाग हाती पडल्यानंतर मात्र त्यांनी सुटकेचा निःश्वास टाकला. जेव्हा डोळे उघडून त्या विभागातील मजकूर ते वाचू लागले तेव्हा तर ज्ञानाची संजीवक वृष्टी चौफेर सुरू झाली आहे आणि तीमध्ये न्हाणारी तृषार्त मने आनंदाने तृप्त होत आहेत असा अनुभव त्यांना येऊ लागला.[२]

'हिंदुस्थान आणि जग' या पहिल्या विभागात केतकरांनी आपल्या जुन्या ग्रंथांचा आणि स्फुट लेखांचा मुक्त हस्ताने उपयोग करून घेतला आणि त्यात नव्या संकलनाची मोठ्या प्रमाणावर भर टाकली. भारतीय जनतेचे स्वत्व विस्तरशः उलगडून दाखवावे, जग घडवणाऱ्या शक्तींची त्या जनतेला ओळख करून द्यावी आणि आपल्या कर्तव्यासाठी तिला प्रोत्साहित करावे, अशा व्यापक नि उच्च हेतूने या विभागाची रचना झाली आहे. भारतीय जनतेचा गाभा जो हिंदू समाज त्याच्या घटनेचा आणि पुनर्घटनेचा सूक्ष्म विचार केतकरांनी अमेरिकेत व इंग्लंडमध्ये असताना केला होता आणि 'हिस्टरी ऑफ कास्ट' नि 'हिंदुइझम' या इंग्रजी ग्रंथांत तो मांडला होता. तेव्हा हिंदू समाजाबद्दल पहिल्या विभागात जे विवेचन झाले ते मुख्यतः या इंग्रजी ग्रंथांच्या अनुवादाच्या

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे १२५, ७०: डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ४२.
२. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ९० ते ९३.

आधारे झाले. भारतीय पण अहिंदू असे जे मुसलमानादी समाज आहेत त्यांच्याकडे हिंदुस्थानात आल्यापासून केतकरांचे लक्ष वेधले होते. कलकत्त्यास लिहिलेल्या 'इंडियन इकॉनमिक्स' मध्ये व 'आमचे बाह्यांसंबंधाने कर्तव्यकर्म' या लोकशिक्षणातील लेखामध्ये[१] या समाजांचा परामर्श घेऊन त्यांचे राष्ट्रीयीकरण कसे करावे याबद्दल आपले विचार त्यांनी व्यक्त केले होते. भारतीय अहिंदू समाजांबद्दलचे आपले हे पूर्वविचार त्यांनी पहिल्या विभागात उद्धृत केले आणि त्यांना काही पुरवण्या जोडल्या.—

हिंदुस्थानात प्रादेशिक राष्ट्रवादाची वाढ होऊन त्यावर हिंदू संस्कृतीची छाप राहावी, असे ध्येय भारतीय समाजासाठी त्यांनी निश्चित केलेले होते. हिंदू समाज हा अनेक जातींचा व संप्रदायांचा एक सामाजिक संघ आहे, तो स्वतःच धर्म (religion) किंवा संप्रदाय नाही, असे हिंदू समाजाच्या स्वरूपाचे निदान त्यांनी केलेले होते. तेव्हा मुसलमान, ख्रिश्चन, बेने इस्रायल, पार्शी वगैरे अहिंदू समाजांनी हिंदूंच्या सामाजिक संघात एकेक संप्रदाय म्हणून समाविष्ट व्हावे, असे त्यांचे सांगणे होते. या समाजांनी आपापले पारमार्थिक विचार सुखेनैव बाळगावे, त्यांचा प्रचारही खुशाल करावा; पण आपली 'जात' करून ती वाढविण्याचा प्रयत्न करू नये; उलट, सामाजिक व सांस्कृतिक बाबतीत हिंदूंशी सदृश व्हावे; थोडक्यात म्हणजे भागवत संप्रदायासारखे हिंदुत्वाच्या अंतर्गत असे त्यांचे संप्रदाय बनावे;—असे अहिंदूंचे समाजरूपांतर ते करू बघत होते. या समाजरूपांतराला चालना देण्यासाठी आपली 'सुधारणात्रयी' हा सर्वात महत्वाचा उपाय त्यांनी पुनश्च आग्रहाने सांगितला. भाषिक प्रांत झाले, देशी भाषा राज्यकार-भारात आली नि प्रांतवार देशी भाषांत शिक्षण देणारी विद्यापीठे स्थापन झाली, की प्रांताप्रांतातील हिंदू जनतेचे महत्व वाढेल व प्रांतिक भाषेच्या नि संस्कृतीच्या बंधनांनी अहिंदू समाज त्या जनतेशी बद्ध होतील, असा त्यांचा कयास होता. हिंदूंनी इतरांना म्लेंच्छ नि तुच्छ समजण्याची आढ्यता सोडावी, अहिंदूंच्या धर्मांचा ब्राम्हणांनी अभ्यास करून अहिंदूंचे गुरुत्व संपादावे वगैरे उपायही त्यांनी सांगून ठेवले. हिंदू-अहिंदूंच्या लग्नसंबंधातून एकरूप भारतीय समाज उत्पन्न होऊ शकेल, हे त्यांना मान्य होते; पण हिंदुत्वाच्या मोबदल्यात असे लग्नसंबंध घाईगर्दीने करण्याच्या ते विरुद्ध होते. "जेव्हा या लोकांशी शरीरसंबंध केल्याने हिंदू समाजाचे बल कमी न होता वृद्धिंगत होईल तेव्हाच असले संबंध केले पाहिजेत; नाहीतर आपली माणसे गमावून...आपल्या समाजास दुर्बलत्व आणणे, हे आपल्याच नाशास कारणीभूत होईल"—असा धोक्याचा इशारा त्यांनी दिला आहे.[२] अहिंदूंचे राष्ट्रीयीकरण करण्याच्या या प्रश्नाच्या संदर्भात ते काही व्यापक समाजप्रवृत्तींचाही मागोवा घेत होते आणि त्या प्रवृत्ती अहिंदूंच्या राष्ट्रीयीकरणास साह्यकारक होतील, अशी दृढ आशा बाळगीत होते.

१. लोकशिक्षण, कार्तिक शके १८३६.

२. पृष्ठ ३६४.

उदाहरणार्थ, धार्मिक प्रश्नांपेक्षा आर्थिक नि राजकीय प्रश्नांना महत्व येत जाणार, ही प्रवृत्ती त्यांना दिसत होती आणि तीमुळे मुख्यतः धार्मिक कारणांनी अलग राहाणारे अहिंदू समाज हिंदूंच्या अधिकाधिक जवळ येतील, असे त्यांना वाटत होते. एकमुखी नि परकीय सत्तेपेक्षा लोकसत्तेची वाढ होत जाणार, ही प्रवृत्तीही त्यांच्या नजरेस आली होती आणि तीमुळे लोक सामाजिक कायदे करावयास लागून एकाच प्रकारच्या सामाजिक कायद्यांच्या आवरणाखाली हिंदू व अहिंदू समाज परस्परसदृश बनत जातील, असा त्यांचा कयास होता. लोकसत्तेची वाढ झाली, की राज्यकर्त्यांना चिकटून राहाणारे अल्पसंख्य समाज राज्यकर्त्यांना, म्हणजे लोकांना, म्हणजेच हिंदूंना चिकटून राहू लागतील नि त्यामुळे त्यांचे राष्ट्रीयीकरण सुलभ होईल, असादेखील त्यांचा अंदाज होता. मात्र अलगपणाच्या ज्या मुसलमानी प्रवृत्तींमधून पुढे पाकिस्तानचा जन्म झाला त्या प्रवृत्तींची पुरेशी कल्पना त्यांना आली होती, असे कुठे दिसून येत नाही.

भारतीय समाजाचे स्वत्व उलगडून दाखविण्यामधला एक भाग म्हणून एकूण सहा-सात प्रकरणे परदेशातील हिंदू संस्कृतीच्या विवरणासाठी या विभागात केतकरांनी खर्ची टाकली आहेत. ४ ते ७ प्रकरणांत, सीलोन, ब्रम्हदेश, सयाम, चीन, जावा, बली, साकोत्रा, मालदीव, तिबेट इत्यादी प्रदेशांत प्राचीन काळी हिंदू संस्कृती कसकशी पसरली याची हकीगत दिली आहे आणि आठव्या प्रकरणात हिंदुस्थानातून परागंदा झालेल्या जिप्सींची ओळख करून दिली आहे. नवव्या प्रकरणात अर्वाचीन काळी परदेशात गेलेल्या हिंदूंचा परामर्श घेतला जातो आणि दहाव्या प्रकरणात हिंदूंनी बाह्य जगावर जे उर्वरित परिणाम केले त्यांचा निर्देश केला जातो. हा सारा प्रपंच करण्यात केतकरांचा एक हेतू हा होता, की प्राचीन काळी हिंदू संस्कृतीने केलेले दिग्विजय बघून अर्वाचीन काळात हिंदुत्ववर्धनासाठी हिंदूंना स्फूर्ती चढावी. मात्र प्राचीन काळी हिंदू संस्कृती जेथे जेथे पसरली तेथे तेथे तिचे पुनरुज्जीवन होऊन जगातले सारे हिंदू एक होतील, ते एका शासनाखाली येऊ शकतील, अशी वेडी आशा त्यांनी बाळगली नाही. हिंदू संस्कृतीच्या इतस्ततः पसरलेल्या शकलांना "सामुच्चयिक आयुष्यक्रम आहे काय ?" असा प्रश्न उत्पन्न करून त्याला त्यांनी असे स्पष्ट उत्तर दिले, की "असला आयुष्यक्रम त्यांस असल्यास तो फारच थोडका आहे...सर्व हिंदूंनी एक होऊन जगावर राज्य करण्याची इच्छा आज 'पॅन इस्लामिझमच्या' उत्कट भावनांपेक्षा-देखील अतिशय मूर्खपणाची आहे."[१] अर्वाचीन काळी परदेशात जाऊन राहिलेल्या हिंदूंचे हिंदुत्व टिकावे, याची तेवढी त्यांना काळजी होती. त्यासाठी आफ्रिकेसारख्या हिंदू वसाहतींच्या प्रदेशांत संस्कार करण्यासाठी ब्राम्हणांनी जावे, परंपरा नि विवाहसंबंध अखंड चालवण्यासाठी स्त्रियांनी जावे आणि आर्थिक दृष्ट्या वाताहात टाळण्यासाठी भांडवलदारांनी जावे, अशी व्यवहार्य उपाययोजना त्यांनी सुचविली. शेवटी एका मूलभूत

१. पृष्ठ ३५५

मुद्द्यावर बोट ठेवून त्यांनी सांगितले, की "आपली आपल्या देशातच अधिक प्रगती झाल्याशिवाय इतरत्र गेलेल्या स्वजनांचे दुःखनिवारण आपणास अशक्य आहे."[१]

हिंदुत्वाची पुनर्घटना योग्य दिशेने व्हावी, म्हणून जग घडविणाऱ्या शक्तींचा परिचय केतकरांनी पहिल्या विभागात अनेक ठिकाणी विस्ताराने करून दिला आहे. 'जगाची गती जग एक होण्याकडे आहे' हे पहिल्याच ग्रंथात आपणाला दिसलेले तत्व त्यांनी पुन्हा सांगितले आहे आणि नव्याने स्थापन झालेला राष्ट्रसंघ नि रशियातील बोल्शेव्हिक राज्यघटना यांची विपुल माहिती देऊन त्या तत्वावर आणखी प्रकाश टाकला आहे. शिवाय "समाजरूपांतराचे नियम" सूत्ररूपाने सांगून समाजांची घटना नि विघटना कशी होते, याचे अतिशय मूलगामी विवेचन केले आहे. जगाची गती कळली, समाजरूपांतराचे नियम समजले, की भारतीय समाजाने त्या अनुरोधाने आपल्या नव्या जीवनाला अकार द्यावा, अशी त्यांची अपेक्षा होती. शिवाय प्रगतीचा मार्ग अधिक स्पष्ट दिसावा म्हणून 'इतिकर्तव्यता' या विस्तृत प्रकरणात इंग्लंड-अमेरिकेमध्ये स्वतः बघितलेल्या विकसित समाजांची चित्रे त्यांनी रंगविली आहेत आणि प्रत्यक्ष आचाराची मोठी उद्बोधक शहानिशा केली आहे.

पाचशे पृष्ठांच्या या विभागात मुख्य विषयाला आनुषंगिक असणाऱ्या आणि आनुषंगिक नसणाऱ्या अशा शेपन्नास विषयांची तरी माहिती आली आहे आणि त्यांवर काहीतरी नवे नि विचारप्रवर्तक भाष्य केले गेले आहे. पण साऱ्या विषयविस्ताराकडे विहंगमदृष्टी टाकली तर हे लक्षात येते, की मुख्यतः सांस्कृतिक भूमिकेवरून केतकरांनी ग्रंथाची मांडणी केली आहे आणि हिंदू संस्कृतीचे संरक्षण नि संवर्धन हाच त्यांच्या चिंतेचा एकमेव विषय आहे. सांस्कृतिक भूमिकेला त्यांनी हे जे असाधारण महत्व दिले त्यामागची कारणे त्यांच्या पुढील उताऱ्यावरून लक्षात येऊ शकतात. ते म्हणतात : "फार मोठ्या जनसंख्येवर परिणाम घडवणाऱ्या आणि आपल्या विविध शक्तींचा उपयोग करणाऱ्या अशा शक्ती राजकीय नसून सांस्कृतिक असतात. राष्ट्रांचे इतिहास हा संस्कृतींच्या इतिहासातील एक अल्प भाग असतो. सर्व जगाचे निरीक्षण करताना राष्ट्रांच्या लहानसहान क्रियाच केवळ नव्हत तर राष्ट्रांची विस्तारसंकोचमूलक बनलेली साम्राज्ये हीदेखील संस्कृतीच्या इतिहासाच्या पोटात येऊन जातात. यासाठी राष्ट्रांचे आणि साम्राज्यांचे इतिहास संस्कृतींच्या इतिहासाचे अल्प घटक समजण्याचा इतिहासवेत्त्यांचा परिपाठ आहे. जगातील सर्व प्रकारच्या स्पर्धांत सांस्कृतिक स्पर्धा सर्वांत महत्वाची आहे." ते पुढे म्हणतात, "हिंदू या दृष्टीने जो आपणास विचार करावयाचा आहे त्याचे महत्त्व हिंदुस्थानीय विचारापेक्षा मोठे आहे; हिंदुस्थान आणि इंग्लंड यांच्या संबंधाचा प्रश्न, जगांतील विविध संस्कृतींच्या भवितव्यासंबंधीच्या प्रश्नापेक्षा फारच लहान आहे."[२]

१. पृष्ठ २९४
२. पृष्ठ १०४.

ज्ञानकोश हा एक शास्त्रीय ग्रंथ होता आणि त्याची उत्पत्ती अनेकांच्या सामूहिक प्रयत्नांमधून व्हावयाची होती. तेव्हा, त्याचे स्वरूप शास्त्रीय नि सामूहिक ग्रंथाला साजेसे केवळ वस्तुनिष्ठ नि तटस्थ असावे, अशी त्याच्याविषयी साहजिकपणे अपेक्षा होती. पण पहिल्या विभागाचे जे स्वरूप वाचकांना दिसले ते काही आगळेच होते. त्या विभागावर केतकरांच्या व्यक्तित्वाची इतकी सार्वत्रिक छाप पडली आहे, की ती सुज्ञ वाचकांच्या नजरेतून सुटणे शक्य नव्हते. त्या विभागात केतकरांची विद्वत्ता तर पानापानावर दिसतेच, पण गंमत अशी की त्यांच्या व्यक्तित्वाचे इतर चिल्लर पैलूही त्यात वारंवार झळकून जातात. त्यामुळे त्याला केवळ वस्तुनिष्ठ नि तटस्थ अशा शास्त्रीय संग्रहग्रंथाचे स्वरूप येण्याऐवजी व्यक्तित्वाचा आविष्कार करणाऱ्या कलाग्रंथाचे स्वरूप किंचित प्रमाणात प्राप्त होते. त्यातील विवेचन भावनाशून्य नाही, तर ते ठायीठायी भावनेने रंजित झालेले नि वैयक्तिक स्वभावच्छटांनी जिवंत झालेले आहे. हिंदू समाजाच्या उद्धारासाठी असीम आशावाद नि प्रयत्नवाद यांचा पुरस्कार त्यात केला आहे; पण मध्येच साशंक निराशेने असे वाक्य लिहिले आहे, की "हिंदू समाजासारखे जे मोठे धूड आहे ते एकीकृत होऊन काही संस्कृतिरक्षणाचे कार्य करू लागेल असा संभव नाही!"[१] हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय राजकारणात युरोपखंडामध्ये भटकणाऱ्या जिप्सींचा काही संबंध येतो, असे कोणाच्या स्वप्नात तरी येईल का ? पण जिप्सींच्या अंगात भारतीय भावना संचरावी म्हणून परराष्ट्रीय धोरण कोणते आखावे, यावर विचार-रंजनाच्या भरात उंचउंच झेपा घेतल्या आहेत![२] काही ग्रंथकारांचे मूल्यमापन करताना त्यांना असे फटकारे लगावले आहेत, की बोलता सोय नाही. किंकेड नि पारसनीस या इतिहासकारांविषयी लिहिले आहे, की "यांनी मराठ्यांचा इतिहास लिहावयाचा एक प्रयत्न केला आहे. होतकरू लेखकांस उत्तेजनार्थ दोन गोड शब्द बोलावे या दृष्टीनेच त्याची थोडीबहुत प्रशंसा होत असावी. एरवी हा विषय जाणणारा कोणीही ग्रंथकारांचे अभिनंदन करील असे वाटत नाही."[३] वेदार्थयत्नकार कै. शं. पां. पंडित यांना "भोळा ब्राम्हण" अशी पदवी दिली आहे[४] आणि थर्स्टन व ओपर्ट या समाजशास्त्रज्ञांना पुढील अहेर बहाल केला आहे: "जातिवर्णनात्मक लेख लिहिणारांमध्ये...दुसरीही कित्येक नावे देता येतील; पण त्यांत चांगले थोडके आणि गचाळ पुष्कळ. थर्स्टन याने मद्रासकडील जातींसंबंधाने जे सात भाग प्रसिद्ध केले आहेत त्यापेक्षा अधिक गचाळ काम सुशिक्षितास करता येईल किंवा नाही याची शंका आहे." "सध्याच्या जाती आणि जुनी परिस्थिती यांचे धागे जोडण्याची खटपट

१. पृष्ठ ३३८.
२. प्रकरण १५ चे उपप्रकरण ७.
३. पृष्ठ ८८.
४. पृष्ठ ८९.

करणारा पाश्चात्य म्हटला म्हणजे गस्टाव्ह ओपर्ट होय. याचा 'भारताचे मूळ लोक' यावर लिहिलेला ग्रंथ स्वैर कल्पनांस माहितीचे आणि पांडित्याचे नियंत्रण नसता मनुष्य किती बहकतो याचे उत्तम उदाहरण आहे."[१] या विद्वत्ताप्रचुर ग्रंथात मधूनमधून खास केतकरी पद्धतीची मार्मिक निरीक्षणे पेरलेली आढळतात आणि रूक्ष विद्वत्ता चविष्ट वाटू लागते. परदेशात गेलेल्या भारतीयांचे वर्गीकरण करीत असता ग्रंथकार पॅरिसमधील मूठभर हिंदुस्थानी वेश्यांना विसरलेले नाहीत.[२] भटक्या जाती कशा वाढतात हे सांगत असता, कैकाड्यांच्या जातीत महाजनी आडनावाचा कऱ्हाडा मुलगा कसा शिरला व त्यांचा पुढारी कसा बनला, हे ग्रंथकार टीपेमध्ये आवर्जून उल्लेखतात.[३] शीखांच्या परदेशगमनाविषयी लिहीत असता, दक्षिण अमेरिकेत दाढीवाल्या व जटाधारी शीखांवर प्रवेशबंदी घालण्यात आली याची नोंद करून ग्रंथकार पुढे म्हणतात, की "संप्रदायचिन्हाच्या तीव्र प्रेमामुळे शीखांस आपला वेणीसंभार काढून टाकणे अयोग्य वाटले. येथे हेही सांगितले पाहिजे, की दुसऱ्या एका क्षुद्र कारणासाठी काही शीख वेणीसंभार काढावयास तयार होतात. वेणी ठेवल्याने वेश्यागमनास पुष्कळ अडथळा होतो म्हणून ते पुष्कळदा ही वेणी काढून टाकतात!!"[४] केतकरांची कलाहीनता आणि दडपेगिरी हीही या विभागात वारंवार जाणवतात. वास्तविक पाहाता या विभागात चित्रांचे काहीही प्रयोजन नव्हते; पण जी मिळाली ती चित्रे आर्टपेपरवर छापली आहेत. गणपतीचे चित्र छापून त्याला 'ज्ञानकोशकारांवर रूपक' असे नाव दिले आहे आणि महाभारताचे निरूपण ऋषिवर्य व्यास करीत असल्याचे चित्र छापून त्याला 'महाभारतरूपी ज्ञानकोशाच्या प्रसाराची पद्धत' असे स्पष्टीकरण जोडले आहे! यात चित्रांचा ग्रंथाशी बादरायण संबंध जोडण्याचा अगडबंब प्रयत्न तर दिसतोच, पण स्वतःची गणपतीशी किंवा व्यासांशी तुलना करणारी उदंड अहंताही जाणवते. या विभागात एका ठिकाणी १९व्या शतकामधील महाराष्ट्रातील रस्ते नि व्याजाचे दर आणि १७-१८व्या शतकांमधील गुलामांचा व्यापार यांबद्दल तीन याद्या घुसडल्या आहेत. पण त्या याद्या त्या ठिकाणी कां घुसडल्या ते एक केतकरांना ठाऊक की ब्रम्हदेवाला ठाऊक![५] केतकरांच्या विविध व्यक्तित्वाने चित्रविचित्र रंगलेला असा हा विभाग साहजिकच विद्वत्तेने टाशीव पण काहीसा रोचक नि रंजक झाला. अर्थात महाराष्ट्रीयांच्या हाती तो पडला तेव्हा सारा महाराष्ट्र एकीकडे आदराने नतमस्तक नि स्तिमित झाला आणि दुसरीकडे गालातल्या गालात मिस्किलपणे हसला, यात नवल नाही.

महाराष्ट्राने पहिल्या विभागाचे स्वागत अतिशय गौरवपूर्ण शब्दांनी केले. पत्रकारांनी

१. पृष्ठ २९६.
२. पृष्ठ २७३.
३. पृष्ठ ३८५.
४. पृष्ठ २९०.
५. पृष्ठे ४६१ ते ४६५.

आपापल्या अभिप्रायात विशिष्ट मतांवर टीका केली, पुनरुक्तीचा किंवा सैल रचनेचा उल्लेख केला, वादग्रस्त मुद्दे उपस्थित केल्याबद्दल नापसंती व्यक्त केली किंवा संदिग्धतेवर बोट ठेवले; पण ग्रंथाचा अतिशय उच्च दर्जा कोणीही नाकारला नाही. केसरीने लिहिले, की "या ग्रंथाचा विस्तार, यात आलेले बहुविध विषय आणि यातील विश्वव्यापक माहिती या सर्वांचा विचार केला म्हणजे यात जरी काही दोष असले तरी एकंदरीत हा ग्रंथ उत्कृष्ट झाला आहे, असेच म्हणावे लागेल."[1] इतर पत्रकारांनी असाच स्तुतिसुमनांचा मुक्तहस्ताने वर्षाव केला. लोकमान्य, इंदुप्रकाश, ज्ञानप्रकाश, लोकसंग्रह, म. सा. पत्रिका, लोकमित्र इत्यादींनी लेख किंवा लेखमाला लिहून या विभागाचा परामर्श घेतला.[2] या विभागाच्या एकूण स्वरूपाने महाराष्ट्र इतका भारला, की पुढील विभाग जसजसे प्रसिद्ध झाले तसतसा दोन्ही हात पसरून त्यांचा त्याने स्वीकारच केला. त्यांचे चिकित्सात्मक निरीक्षण नि परीक्षण फारसे कोणी केले नाही. मात्र, पहिल्या विभागाचे एकंदरीत सहर्ष स्वागत झाले, तरी त्यावर कोणाचीच वक्रदृष्टी फिरली नाही, असे नाही. पेशव्यांच्या सामाजिक नीतीवर त्यात जे काहीसे भरमसाट लिखाण झाले होते त्यावर 'विजयी मराठ्या'तील एक लेखक ब्रम्हद्वेषामुळे तुटून पडला आणि त्याने म्हटले, की "ह्या आकाराने जाड असलेल्या अगडबंब पुस्तकाचा चहासाखरेच्या पुड्या बांधणाऱ्या वाण्याशिवाय इतरांना फारसा उपयोग होणार नाही..."[3]

ज्ञानकोशाच्या प्रस्तावनाखंडापैकी 'वेदविद्या' या दुसऱ्या विभागात व 'बुद्धपूर्व जग' या तिसऱ्या विभागात केतकरांनी आपले विपुल वैदिक संशोधन अंतर्भूत केले. वास्तविक पाहाता ज्ञानकोशाच्या मूळ योजनेत नव्या संशोधनाची कल्पना नव्हती; फक्त उपलब्ध ज्ञानाची निवड व संकलन व्हावयाचे होते. पण संकलनासाठी जेव्हा ते वेदविषयक माहिती अभ्यासू लागले, तेव्हा त्यांच्या असे ध्यानात आले, की "या विषयात बरेच खोल गेल्याशिवाय आपण काहीही लिहिणे धोक्याचे आहे." पाश्चात्यांनी वेदांविषयी जे लेखन केले होते त्यात त्यांना अनेक उणिवा नि चुका दिसू लागल्या आणि त्या लेखनाचे उतारे ज्ञानकोशात देऊन सदोष ज्ञानाचा प्रसार करण्यास त्यांचे मन नकार देऊ लागले. ज्ञानकोशाची कल्पना लोकांना समजावून सांगताना त्यांनी पूर्वी म्हटले होते, की "बौद्धिक बाबतीत परावलंबित्व धोक्याचे व राष्ट्रास अत्यंत कमीपणा आणणारे आहे. त्यातल्या त्यात जे ज्ञान राष्ट्राच्या हिताशी निकटतेने संबद्ध आहे त्यात परावलंबित्व फार धोक्याचे आहे. उदाहरणार्थ, वेदांत काय आहे, हे आपण इंग्रजास अगर जर्मनास विचारावे आणि त्याने आपणापुढे पांडित्य करावे, यासारखी खेदाची

१. केसरी, १३ व २० सप्टेंबर १९२१.
२. लोकसंग्रह, ६ आक्टोबर १९२१; लोकमान्य, १७, २१ व ३१ डिसेंबर १९२१, आणि २ जानेवारी १९२२; म. सा. पत्रिका, वर्ष ९, अंक ३; लोकमित्र, डिसेंबर १९२१; ज्ञानप्रकाश, ८ एप्रिल १९२२; इंदुप्रकाश, ३ लेख, दिनांक अनुपलब्ध; वगैरे वगैरे.
३. विजयी मराठा, २९ सप्टेंबर १९२५.

दुसरी कोणती गोष्ट आहे बरे?" वेदविषयक ज्ञानासाठी परक्यांच्या तोंडाकडे बघण्याचा मुळातच त्यांना असा तिटकारा असल्यामुळे परक्यांचे सदोष वाटणारे ज्ञान उतरून घेण्यास ते सिद्ध झाले नाहीत, यात नवल नव्हते. त्यांची ईर्ष्या अशी होती, की ज्ञानकोश "भारतेतिहासपांडित्याच्या बाबतीत......जगाच्या पाठीमागे राहू नये. येवढेच नव्हे तर भारतीय पांडित्याच्या बाबतीत परिश्रम करणाऱ्याने महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचे सूक्ष्म परिशीलन केले नाही तर तो विद्येविरुद्ध गुन्हा होईल, अशा योग्यतेचा...ग्रंथ झाला पाहिजे....हा राष्ट्राच्या मानापमानाचा प्रश्न आहे." तेव्हा फक्त संकलन करण्याची मूळ भूमिका त्यांनी दूर सारली आणि वेदवाङ्मयाचा जो अफाट उदधी आहे त्याचे मंथन करून त्यातून संशोधनाची रत्ने बाहेर काढण्यासाठी कंबर कसली. "पाश्चात्य पांडित्यामुळे घाबरून हतवीर्य होणे आणि बाबावाक्यं प्रमाणं या प्रकारची दृष्टी ठेवणे" हे त्यांच्या बौद्धिक नि राष्ट्रीय स्वाभिमानाला मानवणे कदापी शक्य नव्हते.[१]

१९१९ च्या जुलैपासून त्यांनी वैदिक अभ्यासाला प्रारंभ केला आणि १९२२-पर्यंतच्या तीनसाडेतीन वर्षांत अनेक विद्वानांना हाताशी घेऊन अभ्यासाचे डोंगर पाडले. वे. अण्णंभट अभ्यंकर यांनी यजुर्वेदाच्या अभ्यासात त्यांना मदत केली. १९१९ च्या ऑगस्टमध्ये, दहाबारा यज्ञांत ऋत्विजाचे काम केलेले विख्यात याज्ञिक श्रौतवेत्ते चिंतामणभट्ट दातार यांची त्यांनी ज्ञानकोशात नेमणूक करून घेतली आणि यज्ञसंस्थेच्या प्रायोगिक अंगाची अनुभवसिद्ध माहिती मिळावी अशी सोय केली. श्रौताचार्य धुंडिराजशास्त्री बापट ज्ञानकोशात आधीच लागलेले होते आणि त्यांच्याही परंपराप्राप्त ज्ञानाचा त्यांनी उपयोग करून घेतला. वे. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव व श्री. य. रा. दाते हेदेखील त्यांना हरएक प्रकारचे बहुमोल साह्य करीत होते. या साऱ्या मंडळींत वैदिक इतिहासाबद्दल नित्य चर्चा चालत, पूर्वपक्ष-उत्तरपक्ष होई, केतकरांची अमेरिकन विचार-सरणी आणि काही जणांची सनातनी विचारसरणी यांत चकमकी उडत आणि अनेक सिद्धांत निष्कर्षिले जात. ज्ञानकोशातील या संपादकमंडळीने संहिता, ब्राम्हणे, उपनिषदे वगैरे बहुतेक वेदवाङ्मय मुळातून अभ्यासले, वेदविद्येवरील प्रमुख इंग्रजी ग्रंथांचे परिशीलन केले आणि जर्मनमधील ग्रंथांची सौ. शीलवती केतकरांनी जी इंग्रजी भाषांतरे केली होती त्यांवरून जर्मन ग्रंथांचाही मागोवा घेतला. वेदवाङ्मयावरून इतिहास शोधावा, ही त्यांची आकांक्षा असल्यामुळे त्या वाङ्मयाचे अत्यंत परिश्रमपूर्वक त्यांनी नाना रीतीने पृथक्करण केले. उदाहरणार्थ, ऋग्वेदातील प्रत्येक पादाचे त्यांनी वर्गीकरण केले, चारही वेदांच्या संहितांतील शब्दसृष्टी धुंडाळून विषयवारीने शब्द लावले, त्यासाठी दीड लाख पत्रिका तयार केल्या आणि तैत्तिरीय संहितेची पदसूची पूर्वी केलेली नसल्यामुळे ती नवीन तयार केली. विशिष्ट विषय एका दृष्टिक्षेपासरशी लक्षात भरून त्याचा निर्णय करता यावा म्हणून कोष्टके नि जंत्र्या तयार कराव्या लागतात. केतकरांच्या

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ७२, ११२, १२२, १३५-३६, १५१ वगैरे.

मार्गदर्शनाखाली अशी कोष्टके नि जंत्र्या करण्यासाठी श्रौताचार्य बापट, हौत्रवेत्ते दातार किंवा श्री. दाते यांनी महिनेच्या महिने रक्त आटवण्यास कमी केले नाही. वेदांचा पार्श्योंच्या अवेस्त्याशी संबंध असून अवेस्त्याच्या अभ्यासाशिवाय वेदाभ्यासाची पूर्तता होणार नाही, हे दिसून आल्यावर ज्ञानकोश-मंडळात अवेस्त्याचा अभ्यासही सुरू झाला आणि अवेस्त्याचे व्याकरण व गाथा यांचे मराठी तर्जुमे तयार केले गेले. सारांश, वेदाभ्यासाला १९१९ ते २२ या काळात केतकरांनी अशी काही चालना दिली नि असा काही रंग भरला की सांगता पुरवणार नाही. पेंडसेवाड्यात ते दाढी करायला बसले, की धुंडिराजशास्त्री बापटाना म्हणत, 'काय शास्त्रीबुवा, वेदांत दाढीबिढी आहे का?' धुंडिराजशास्त्री 'हो' म्हणत आणि वेदांतील हजामतीविषयी टिपण तयार होई! नृत्य, गायन वगैरेसंबंधी टिपणे अशीच तयार झाली. त्यांच्या विद्युद्गर्भ विद्वत्तेमुळे ज्ञानकोश-मंडळात या वेळी एक जिवंत नि जागृत विद्यापीठ निर्माण झाले होते, असे म्हणावयाला हरकत नाही.[1]

दुसऱ्या नि तिसऱ्या विभागात ज्या वेदज्ञानाची मांडणी केतकरांनी केली ते वेदज्ञान त्रिविध होते. त्यांनी या विभागांत पूर्वलेखकांच्या लेखनाचे निवडक अवतरण केले, इतिहासलेखकांना उपयुक्त अशी ऐतिहासिक साधने निर्माण केली आणि नवा इतिहासही उलगडून दाखविला. पैकी अवतरणाच्या भागाला विद्वत्तेच्या दृष्टीने कमी महत्व होते; पण अजिबात महत्व नव्हते असे नाही. हे अवतरण करण्यासाठी त्यांनी विंटरनिट्झ या प्रसिद्ध जर्मन पंडिताच्या 'हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर' या जर्मन ग्रंथाचे, मॅकडोनेलच्या 'वेदिक मायथॉलजी' या इंग्रजी ग्रंथाचे आणि पार्गिटेरच्या पुराणविषयक लेखनाचे काही भाषांतर प्रथमच मराठीत केले आणि मराठीचे ज्ञानभांडार त्यामुळे समृद्ध झाले.[2] विशेषतः विंटरनिट्झच्या जर्मन ग्रंथाचे भाषांतर इंग्रजीत प्रसिद्ध होण्यापूर्वी सहासात वर्षे आधी त्यांच्या प्रयत्नाने ते मराठीत प्रसिद्ध झाले, ही गोष्ट ज्ञानविकासाच्या दृष्टीने महत्वाची होती. त्यांचा हा प्रयत्न इतका पुरोगामी होता, की त्यामुळे आपल्यातील काही आंग्लोपजीवी विद्वान चांगलेच चकले. दुसऱ्या विभागातील प्रकरणेच्या प्रकरणे विंटरनिट्झवरून केतकरांनी उतरली; पण गंमत अशी केली की 'विंटरनिट्झवरून हे भाषांतर केले आहे' असा उल्लेख कोठेही केला नाही. उलट विंटरनिट्झने जेथे प्रथमपुरुषी उल्लेख केले होते तेथे ते बदलून 'विंटरनिट्झचे मत असे आहे' 'हे आल्डेनबर्गचे मत विंटरनिट्झला चुकीचे वाटते' असे ते

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ७२, १३४, १३८, १३९, १५०-५१, परिशिष्ट पृष्ठे ५४-५५; आठवणी, धुं. ग. बापट.

२. विंटरनिट्झवरून घेतलेला मजकूर विभाग २ मध्ये प्रकरण २ ते ९ मध्ये आढळतो; मॅकडोनेलवरून घेतलेला मजकूर विभाग २, प्रकरण १२ मध्ये आढळतो; विभाग ३, प्रकरण ७-मध्ये पार्गिटेरवरून काही भाग उतरलेला आहे.

तृतीयपुरुषी करून ठेवले. त्यामुळे, १९२७ साली विंटरनिट्झचे इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध होईपर्यंत आणि नंतरही काही विद्वानांना असे वाटे, की हे सारे लेखन ज्ञानकोश-मंडळात नव्याने तयार झाले आहे! केतकरांनी विंटरनिट्झच्या तळ-टीपांचेही भाषांतर केले होते. त्या टीपांत आलेल्या संदर्भग्रंथांच्या विपुल उल्लेखांवरून एका सन्मान्य पंडिताने तर असा तर्क लढवला, की फ्रेंच विद्वान लुई रनू याच्या 'बिब्लिओग्राफी वेदिक' या सूचीपूर्वी तशी 'वैदिकवाङ्मयसूची' केतकरांनी तयार केली असावी.[1] असो. ज्ञानकोशामुळे प्रथमच मराठीत आलेले असे भाषांतरित वैदिक ज्ञान मोजले तर ते ज्ञानकोशाची सुमारे पावणेदोनशे पृष्ठे भरेल इतके विपुल आहे.

उद्धृत किंवा अवतरण केलेल्या भागापेक्षा जी ऐतिहासिक साधने केतकरांनी निर्माण केली त्यांचे महत्व विद्वत्तेच्या दृष्टीने पुष्कळच जास्त होते. अशा साधनांची किंमत राजवाड्यांच्या पूर्वप्रयत्नांमुळे व अमेरिकेत केलेल्या संशोधनामुळे त्यांना पूर्णपणे कळलेली होती आणि ज्ञानकोशाच्या संघटनेमुळे अशी साधने निर्माण करण्यासाठी लागणारा विद्वानांचा संच त्यांना उपलब्ध होता. त्यामुळे ही साधने जितकी निर्माण करता येतील तितकी त्यांनी निर्माण केली. आपल्या लेखनाची शैली दुसऱ्या नि तिसऱ्या विभागात त्यांनी अशी ठेवली, की कोणताही निष्कर्ष सांगण्यापूर्वी सारा पुरावा वाचकांपुढे मांडावयाचा, किंवा पुरावा पुढे ठेवून निष्कर्ष वाचकांवर नि विद्वानांच्या भावी पिढ्यांवर सोपवावयाचा. या शैलीमुळे निर्माण केलेली बहुतेक सर्व इतिहाससाधने त्यांना ग्रंथात गोवून देता आली. ही साधने इतकी विपुल आणि विविध आहेत नि त्यांचा उपयोग कसा करता येईल याविषयी केतकरांनी इतके सूचनागर्भ लेखन केले आहे, की भावी महाराष्ट्रीय संशोधकांच्या दोनतीन पिढ्यांची गुजराण त्यांच्यावर सहज होईल. दुसऱ्या विभागाच्या चौथ्या प्रकरणात मांडलेला तैत्तिरीय संहितेचा, ब्राम्हणाचा व आरण्यकाचा अभ्यास, यज्ञसंस्था व ब्राम्हणजाती यांचा विकास दाखविण्यासाठी ठिकठिकाणी दिलेल्या याद्या नि कोष्टके; दुसऱ्या विभागाच्या अकराव्या प्रकरणात संकलित केलेला 'वेदोक्त इतिहास व आख्यायिका'; तिसऱ्या विभागातील 'वेदकालतील शब्दसृष्टी' हे तीनशे पृष्ठांचे पाचवे प्रचंड प्रकरण वगैरे साधनांकडे जाणकारांनी नुसता दृष्टिक्षेप टाकला, तरी त्या साधनांचे अपरंपार महत्व त्यांच्या लक्षांत भरण्यासारखे आहे. वेदाभ्यासासाठी केतकरांनी जेवढी मौलिक साधनसामग्री ज्ञानकोशात निर्माण केली, तेवढी सामग्री महाराष्ट्रामध्ये पूर्वी कोणाही संशोधकाने निर्माण केलेली नव्हती.

पूर्वीच्या लेखनाचे निवडक अवतरण व ऐतिहासिक साधनांची निर्मिती या दोन अंगांहून नवा इतिहास उलगडून दाखविण्याचे जे तिसरे अंग केतकरांच्या वैदिक लेखनाला होते त्याचे महत्व फार मोठे होते. नवा इतिहास उलगडून दाखविताना त्यांनी अनेक जुन्या कल्पना खोडून काढल्या, नव्या प्रस्थापित केल्या आणि कित्येक

१. डॉ. प. ल. वैद्य, लोकशिक्षण, जुलै १९३७.

अभिनव क्षेत्रे संशोधनासाठी खुली करून ठेवली. या कामात त्यांच्या धाडसी नि संशोधक प्रज्ञेचा जो विस्तृत विलास घडला त्याचे तेज केवळ असामान्य होते. 'हिस्टरी ऑफ कास्ट'च्या व 'हिंदुइझम'च्या लेखनासाठी त्यांनी विदेशात जो समाजशास्त्रीय अभ्यास केला होता त्यामुळे सामाजिक घडामोडींचा छडा लावण्याची विशिष्ट समाजशास्त्रीय दृष्टी त्यांना प्राप्त झालेली होती. जाती, वर्ण, वंश वगैरेसंबंधी मनुस्मृतीवरून त्यांची काही नवी मते पूर्वीच बनलेली होती. हे पूर्वसंचित बरोबर घेऊन ते वेदविद्येत शिरल्यामुळे वैदिक इतिहासाचा सारा आकारच त्यांना वेगळा दिसू लागला व नवे सिद्धांत ते प्रस्थापित करू शकले. त्यातून पाश्चात्य लेखकांपेक्षा भारतीय परिस्थितीची त्यांना अधिक समजूत होती, त्यांच्या हाताखाली जे विद्वान काम करीत होते ते तर खास वैदिक परंपरेत वाढलेले होते, त्यामुळेही पाश्चात्यांपेक्षा वेदांचा निराळा अर्थ लावणे त्यांना शक्य झाले. संहिता, ब्राम्हणे, सूत्रे वगैरे वाङ्मय यज्ञसंस्थेशी अत्यंत निगडित असल्याने त्या वाङ्मयाची उकल यज्ञसंस्थेच्या आधाराने होणे अत्यंत आवश्यक होते. त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या विद्वानांत एक श्रौताचार्य नि एक हौत्रवेत्ता असल्यामुळे ही गोष्ट त्यांच्या सहजी लक्षात आली आणि यज्ञसंस्थेतील नानाविध विधींचा विकासक्रम शोधून त्याच्यावरून वैदिक इतिहास बनविण्याचा त्यांनी निकराने प्रयत्न केला. त्यांच्यापूर्वी डॉ. मार्टिन हौग, हिलेब्रॅण्ट किंवा कुंटे यांच्यासारख्यांनी यज्ञाचा नि विधींचा अभ्यास करून वैदिक इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला होता; पण त्या प्रयत्नाहून आपला प्रयत्न अधिक सूक्ष्म व अधिक विस्तृत अशा अचूक तांत्रिक ज्ञानावर आधारला जावा, अशी त्यांनी योजना केली. साहजिकच वैदिक इतिहासात एक मोठे प्रवेशद्वार पाडून त्याच्या अंतरंगाचे अपूर्व दर्शन घडविण्याचा मान ते सहजासहजी मिळवू शकले. मनुस्मृतीकडून वेदांकडे जाणारी उलटी गती, समाजशास्त्रीय दृष्टी आणि यज्ञसंस्थेच्या आधारे इतिहास लावण्याची पद्धती, या तीन गोष्टींत त्यांच्या साऱ्या वैदिक संशोधनाचे मूळ आहे. या गोष्टींची बीजे त्यांच्या निर्माणक्षम प्रज्ञेच्या भूमीमध्ये रुजली आणि त्यातून त्यांच्या संशोधनाचे घनदाट बन औरसचौरस फोफावले.

तोवर युरोपीय लेखकांची सर्वसाधारण कल्पना अशी होती, की वैदिक वाङ्मय ज्यांनी उत्पन्न केले ते 'आर्यन' महावंशातील लोक होते आणि दस्यूंशी म्हणजे अन्य कृष्णवर्णी महावंशातील लोकांशी त्यांची युद्धे झाली. वर्णाचा अर्थ रंग आणि भिन्न रंगांच्या किंवा वर्णांच्या लोकांचा जो संनिकर्ष झाला त्यातून चातुर्वर्ण्य निघाले नि जातिभेद जन्म पावला. पण केतकरांनी आर्य, दस्यू इत्यादी शब्दांचे वेदांतील नि अवेस्त्यातील उल्लेख तपासून युरोपीय लेखकांची ही कल्पना खोडून काढली. त्यांच्या मते, आर्य व दस्यू हे भेद वंशमूलक नव्हते, तर यजनमूलक होते. ऋग्वेदात गोऱ्या आर्यन लोकांचे काळ्या एतद्देशीय लोकांशी युद्ध झालेले दिसत नाही, तर आर्यन लोकांचे आर्यन[1] लोकांशी जे झगडे झाले

१. 'आर्यन' हा शब्द वंशवाचक व 'आर्य' हा शब्द वर्गवाचक, सामाजिक प्रतिष्ठेचा निदर्शक, अशा अर्थाने केतकर वापरीत.

त्यांचे वर्णन ऋग्वेदात आले आहे. भरत नावाच्या आर्यन टोळींचा भारतात झालेला जो प्रवेश ऋग्वेदात आढळतो तत्पूर्वी हजारो आर्यन भारतात येऊन वस्ती करून राहिले होते आणि अमेरिकेत जसे नव्या वसाहतवाल्यांचे जुन्या वसाहतवाल्यांशी झगडे झाले तसे झगडे भरतांचे जुन्या आर्यन लोकांशी झाले. साहजिकच भिन्न वंशांच्या व वर्णांच्या संघर्षांची कल्पना सोडून द्यावी लागते आणि त्या संघर्षांतून चातुर्वर्ण्य नि जातिभेद उत्पन्न झाला हा कयास कोलमडून पडतो. केतकरांनी अवेस्त्याच्या पाहाणीवरून असे निदान केले आहे, की आर्यन लोक जेव्हा हिंदुस्थानात आले तेव्हाच वर्णकल्पना ते आपल्या-बरोबर घेऊन आले. वर्णांची उत्पत्ती हिंदुस्थानात झाली नाही, तर जेव्हा पार्श्यांचे व आपले पूर्वज एकत्र होते तेव्हा अतिप्राचीन काळीं ती हिंदुस्थानाबाहेर झाली. वर्णांचा व जातींचा युरोपीय लेखकांनी जो संबंध जोडला होता तोही केतकरांनी नाकारला. आपल्या इंग्रजी ग्रंथांतील मताला अनुसरून त्यांनी अशी मांडणी केली, की वर्ण हे यजनावर, सामाजिक प्रतिष्ठेवर वगैरे आधारलेले एक तऱ्हेचे वर्ग असावेत. जाती वर्णांतून निघाल्या नाहीत. त्यांची उत्पत्ती टोळ्या अंतर्विवाही बनल्याने अंतर्गत विवाहाच्या प्रथेमधून हळूहळू होत गेली.

ऋग्वेदात आर्यन लोकांचे हिंदुस्थानातील पहिले आगमन आपणास बघावयास मिळते, हा जुना सिद्धांत तर केतकरांनी नाकारलाच; पण असा नवा सिद्धांत मांडला, की ऋग्वेदात आर्यन लोकांचे जे आगमन दिसते ते सर्वांत शेवटचे आगमन होय ! कारण नंतरच्या आगमनांचे उल्लेख पुढील वाङ्मयात कोठेही आढळत नाहीत. ऋग्वेदातील आर्यन लोक हिंदुस्थानात येण्यापूर्वी जवळजवळ सर्व हिंदुस्थानभर आर्यन लोकांच्या वसाहती झालेल्या होत्या, असा व्यापक उत्तरपक्ष केतकरांनी केला व त्याच्या मंडनासाठी अनेक प्रकारचे कच्चेपक्के पुरावे पुढे आणले. ऋग्वेदात दिसणाऱ्या मंत्रकर्त्या आर्यन लोकांच्या संस्कृतीला त्यांनी 'मांत्र संस्कृती' असे नाव दिले आणि आधी आलेल्या आर्यन लोकांच्या संस्कृतीला 'सूत संस्कृती' असे नाव दिले. त्यांच्या कल्पनेप्रमाणे, ऋग्वेदातील आर्यन लोक हिंदुस्थानात आले तेव्हा सूत-संस्कृती कमीत कमी हजार वर्षांची जुनी असावी. वेदांत नि ब्राम्हणांत इतिहास-पुराणांचे जे उल्लेख येतात ते सूत-संस्कृतीच्या वाङ्मयाचे उल्लेख होत. आज रामायण, महाभारत नि पुराणे यांमध्ये त्या वाङ्मयाचे रूपांतरित अवशेष तेवढे शिल्लक आहेत. जैन व बौद्ध मतांचे पूर्वस्वरूप या प्राचीनतम सूतसंस्कृती-मध्येच शोधले पाहिजे.

ऋग्वेदाची पाहाणी राजकीय घडामोडींच्या दृष्टीने करीत असता, दाशराज्ञ युद्ध ही ऋग्वेदातील सर्वांत महत्वाची राजकीय घडामोड होय, हे केतकरांनी प्रथम ओळखले. या युद्धात गुंतलेल्या व्यक्ती व त्या व्यक्तींशी संबंध असलेल्या इतर व्यक्ती यांचा शोध घेत घेत त्यांनी असे दाखवून दिले, की आठ व नऊ ही मंडले वगळता साऱ्या ऋग्वेदात अशा व्यक्ती पसरलेल्या आहेत. साहजिकच दाशराज्ञ युद्धाचे साग्र वर्णन देण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले आणि तशा वर्णनासाठी बरीच साधनसामग्री जमवून ती ग्रंथात

मांडून ठेवली. मात्र त्या युद्धाचे समाधानकारक नि सुसंगत वृत्त देण्यात ते यशस्वी झाले, असे म्हणता येत नाही. हे युद्ध आणि सूक्तरचना यांत कालदृष्ट्या आधी काय व नंतर काय, हे हुडकण्याचा त्यांनी जो दुसरा मोठा प्रयत्न केला तो तेवढा यशस्वी झाल्यासारखा दिसतो. ऋग्वेदातील बहुतेक सूक्ते, विशेषतः दोन ते सात या मंडलांतील सूक्ते, दाशराज्ञ युद्धाच्या वेळी किंवा तदनंतर रचली गेली, असा त्यांचा निष्कर्ष होता. दाशराज्ञ युद्धाचा काल इतर संशोधकांप्रमाणे कुरुयुद्धापूर्वी अडीचशे वर्षे न मानता डॉ. अळतेकरांप्रमाणे ते तो कुरुयुद्धापूर्वी सहाशे वर्षे मानतात आणि दोन युद्धांच्या मध्यंतरी यज्ञसंस्थेचा जो मोठा विकास झाला त्याचा त्याला आधार देतात.

आपल्या वैदिक संशोधनात यज्ञसंस्थेचा इतिहास शोधण्यावर केतकरांनी खूप भर दिला आणि मंत्रपूर्व-काल, मंत्र-काल, यजुर्ब्राम्हण-काल, सूत्र-काल, व सूत्रोत्तर-काल अशा पाच टप्प्यांत तो तपशीलवार मांडून दाखविला. यज्ञसंस्थेचे आश्वलायनादी सूत्रांत जे परिणत, गुंतागुंतीचे नि अनेकावयवी स्वरूप दृष्टीस पडते त्यातील अंगोपांगे ते आधीच्या वाङ्मयात मागे मागे हुडकीत गेले. अशा रितीने ब्राम्हणे, यजुर्वेद, ऋग्वेद आणि अवेस्ता यांपर्यंत ते जाऊन भिडले आणि यज्ञाची जी अंगोपांगे जुन्यात जुन्या वाङ्मयात प्राथमिक अवस्थेमध्ये त्यांना आढळली त्यांचा विकास बघत ते पुन्हा सूत्रांपर्यंत माघारे आले. अभ्यासाच्या या पद्धतीमुळे यज्ञसंस्थेचे समग्र चित्र ते कालक्रमाने यशस्वी-पणे रेखाटू शकले. त्यांच्या मते, आर्यन लोक हिंदुस्थानात आले तेव्हाच त्यांच्यात अग्नीची उपासना असली पाहिजे; कारण पार्श्यांच्यामध्येही ती प्राचीन काळी होती. ही उपासना वैयक्तिक स्वरूपाची असल्याने हिंदुस्थानच्या उष्ण हवेत तिची कटकट पेलणे लोकांना व्यक्तिशः कठीण जाऊ लागले. तेव्हा मंत्रपूर्वकालातच ती समूहशः होऊ लागली आणि ती धंदेवाइकांच्या हाती गेली. धंदेवाइकांनी उपजीविकेचे साधन म्हणून पुढे तीत नवनवी अंगे आणण्यास प्रारंभ केला. मंत्रकालात घरोघरचे अग्निहोत्र पार उताराला लागले आणि अनेक अंगोपांगांनी युक्त अशी सामुच्चयिक यज्ञसंस्था तयार झाली. मात्र विशिष्ट ऋत्विजाचे विशिष्ट काम अशी ऋत्विक्कर्मातील परिपूर्ण श्रमविभागणी मंत्रकालात झाली नाही. अध्वर्यू, होता, ब्रम्हा वगैरे ऋत्विज एकाच तऱ्हेची कामे करताना मंत्रकालात दृष्टीस पडतात. यजुर्वेद व ब्राम्हणे यांच्या पुढील काळात ऋत्विजांच्या कामांची परिपूर्ण विभागणी झाली आणि अथर्ववेदातील विद्येचा उपयोग करणारे अथर्वे व इतर वेदांचे अनुयायी त्रैविद्य यांचा समझोता होऊन अथर्व्यांना यज्ञसंस्थेत स्थान मिळाले. अथर्वे विवाहादी संस्कार, जारणमारण, अभिषेक इत्यादी कर्मे करीत आणि त्यांचे अस्तित्व मांत्र व सूत अशा उभय संस्कृतींत जुन्या काळापासून होते. त्यांना बहुधा राजांचा आश्रय असावा व म्हणून लोकाश्रयी त्रैविद्यांनी त्यांना आपणात सामावून घेतले असावे. मंत्रकालात यज्ञसंस्थेमध्ये जी अनेक अंगोपांगे होती ती यजुर्ब्राम्हणकालात आणखी वाढली. त्यांत सोमयाग, चयन, पुरुषमेध वगैरे प्रकार यजुर्वेदी अध्वर्यूंनी आणले व तिला तिचे पूर्ण परिणत स्वरूप प्राप्त करून दिले.

यजुर्वेदात व ब्राम्हणांत श्रौतकर्मांची जी खूप वाढ झालेली दिसते तिचे कारण भिक्षुकांतील वाढता जीवनकलह व स्पर्धा हे होते. अधिक गुंतागुंतीचा, आकर्षक व लोकप्रिय विधी आपल्या यज्ञसंस्थेला चिकटविण्याची भिक्षुकांनी उपजीविकेसाठी खटपट केली आणि यज्ञसंस्थेचा विस्तार झाला. कुरुयुद्धानंतरच्या सूत्रकालात यज्ञसंस्था सूत्रात्मक नियमांनी बांधली जाऊन ऋत्विजांचे आधीचे स्वातंत्र्य नष्टप्राय झाले. याच कालात यज्ञसंस्था उतारालाही लागली असावी; कारण गृह्यसूत्रांत वेदाध्ययन, अतिथि-सत्कार वगैरे कृत्यांनाही यज्ञ ही संज्ञा लावून यज्ञकल्पनेची व्याप्ती वाढविण्याचा प्रयत्न केला आहे आणि पाकसंस्थांच्या रूपाने यज्ञविधींना संक्षेप दिला आहे. सूत्रकालातच जातिधर्म, ग्रामधर्म इत्यादींचे महत्व मानणारा जो पौराणिक धर्म त्याने यज्ञसंस्थेवर कुरघोडी करण्यास आरंभ केला. पुढे सूत्रोत्तर-कालात पौराणिक धर्माने यज्ञसंस्थेवर पुरी कुरघोडी केली, जैन-चार्वाकादींनी तिच्यावर आघात केले आणि ती मरणाच्या पंथाला लागली.

यज्ञसंस्थेचा हा जटिल इतिहास रेखाटीत असता, यज्ञसंस्था कशाच्या बळावर टिकली, समाजजीवनात तिने कोणते कार्य केले, इत्यादी मूलभूत प्रश्नांचाही केतकरांनी पटण्यासारखा उलगडा करून ठेवला. त्याचा सारांश हा, की यज्ञातील अगडबंब विधी आज जरी आपणाला निरर्थक वाटत असले तरी प्राचीनांना ते तसे वाटत नव्हते. त्यांच्यात अग्नीबद्दल परंपरागत पूज्यबुद्धी होती, अग्नी हा हव्यवाहक असल्याने त्यात अर्पण केलेली वस्तू देवांना पोचते अशी त्यांची निष्ठा होती आणि त्यामुळे यज्ञ करून अग्नीत हवन करणे त्यांना स्वाभाविक वाटे. यज्ञात अनेक क्रिया रूपकात्मक होत्या; त्यांच्यामुळे यज्ञ सार्थ ठरण्यास मदत होई. यज्ञांनी मनःकामना पूर्ण होतात, अशी कल्पना असल्याने भौतिक व स्वर्गीय सुखांच्या लालसेनेही लोक यज्ञाकडे वळत. शिवाय राष्ट्रीय जीवनात यज्ञांकडून फार उपयुक्त कामगिरी होत होती. यज्ञविधींना आवश्यक म्हणून शुल्बसूत्रे व भूमिती यांचा जन्म झाला, वेदांगज्योतिष वाढले, गोत्रप्रवरावली तयार झाली आणि शिक्षा-व्याकरण-निरुक्त-छंद इत्यादींचा विकास झाला. यज्ञविधी आकर्षक व गुंतागुंतीचा करण्याच्या खटपटीमुळे नृत्य, संगीत, शिल्प, प्राणिशास्त्र इत्यादी गोष्टी त्यात आल्या आणि त्यांचे रक्षण नि वर्धन होऊ लागले. यज्ञाच्या आश्रयाने प्राचीन पुरोहितसंघाचे नि मांत्र व सूत संस्कृतींतील आर्यांचे एकीकरण घडून आले. यज्ञाने भूमी पवित्र होई आणि त्या भूमीत नव्या वसाहती होत. ‘निषादस्थपतिं यजेत’ इत्यादी विधिवाक्यांनी ‘आर्यन’ वंशाचे ‘नॉन आर्यन’ राजांशी संबंध येऊन ‘नॉन आर्यन’ राजांना यज्ञद्वारा क्षत्रिय होता आले. त्यामुळे समाज परस्परसंबद्ध झाला. यज्ञांच्या वेळी मोठाल्या जत्रा भरून व्यापाराला गती मिळे, राजे एकत्र येऊन राज्याराज्यांतील आचारनीती ठरे आणि एकंदर समाजजीवनच यज्ञातून आकार घेई. तेव्हा, यज्ञ टिकले ते विशिष्ट समजुतींनी टिकले आणि वाढले ते समाज समृद्ध केल्यामुळे वाढले, ही गोष्ट स्पष्ट आहे.

यज्ञसंस्थेच्या इतिहासाची पुरवणी म्हणून गृह्यकर्मांचा इतिहासही केतकर हुडकीत गेले. यज्ञ म्हणजे श्रौतकर्म होय. ते त्रेताग्नीवर आणि सामूहिक रीतीने होई. पण गृह्यकर्म एकाग्नीवर आणि व्यक्तिशः होई. या गृह्यकर्मांबद्दल केतकरांनी थोडक्यात अशी कल्पना मांडली, की गृह्यकर्म श्रौतकर्मांहून प्राचीन होते आणि ते अथर्व्यांच्या हातात होते. अथर्ववेद हा गृह्यप्रधानवेद आहे. जेव्हा श्रौत वाढले तेव्हा श्रौतातील नियमबद्धता गृह्यालाही आली आणि त्याला मंत्रही चिकटले. सूत्रकालात ज्या वेळी श्रौत म्हणजे यज्ञसंस्था उताराला लागली तेव्हा अनेक ब्राम्हण पौरोहित्याच्या धंद्यातून बाहेर पडले आणि त्यांचे पौरोहित्य मिळवण्यासाठी धंद्यात राहिलेल्यांची धडपड सुरू झाली. या धडपडीत आपल्या वेदशाखेच्या लोकांनी आपणाकडून कर्मे करवून घ्यावी, असा उपदेश साहजिकपणे सुरू होऊन वेदशाखेप्रमाणे गृह्य भिन्नभिन्न झाले. पौराणिक धर्माच्या वाढीबरोबर ग्रामधर्म, जातिधर्म इत्यादींचे महत्व गृह्यात वाढल्यामुळेही गृह्य भिन्न होण्यास चालना मिळाली.

श्रौत आणि गृह्य विधींच्या अनुषंगाने व अंशतः स्वतंत्रपणे केतकरांनी ब्राम्हणांचा इतिहास लावण्याचा बराच प्रयत्न केला. त्या प्रयत्नात त्यांनी सूक्तकर्ते ऋषी, त्यांना मिळणारा राजाश्रय, व त्यांची कुले नि नातेसंबंध यांचा काही शोध घेतला आणि तसा शोध आणखी घेता यावा म्हणून थोडीफार सामग्री उत्पन्न केली. गोत्रांबद्दल त्यांनी अशी कल्पना मांडली, की मांत्र संस्कृतीत गोत्रे नव्हती, ती सूत-संस्कृतीत होती आणि ब्राम्हणकालात ती मांत्र संस्कृतीने सूत-संस्कृतीमधून आयात केली. त्यांच्या मते प्रवर हे मांत्र लोकांतील धार्मिक संप्रदाय असावेत. ब्राम्हणकालात व सूत्रकालात या संस्कृतींचा संगम जेव्हा झाला तेव्हा सूत-संस्कृतीतून आलेल्या गोत्रांचा संबंध प्रवरांशी जोडण्यात आला. ब्राम्हण जातीच्या उत्पत्तीची हकीगत त्यांनी थोडक्यात अशी दिली आहे, की मांत्र व सूत संस्कृतींत अथर्व्यांचा जो जुना वर्ग होता त्यामधून यज्ञकर्मे करणाऱ्या पुरोहित वर्गाचा उदय झाला. या पुरोहितवर्गाला काही कारणांनी ब्राम्हण हे अभिधान मिळाले आणि यज्ञाला उतार लागल्यावर काही ब्राम्हणांचे पौरोहित्य गेले तरी ब्राम्हणत्व मात्र कायम राहू लागले. कारण पौरोहित्याचा धंदा गेला तरी ब्राम्हण म्हणून जी सामाजिक प्रतिष्ठा मिळत होती ती सोडण्याची त्यांना इच्छा नव्हती. धंदा बदलला तरी ब्राम्हण्य बदलेना, याचा अर्थ जन्मानुसारी ब्राम्हण जात तयार झाली हा होय. "ब्राम्हणांचे आज जे जातिस्वरूप आहे त्यातील मुख्य स्वरूपे कुरुयुद्धकालीन आहेत."[1]

सूक्ते व ब्राम्हणे यांच्या रचनेच्या पद्धतीसंबंधी व कालसंबंधी काही नव्या स्फुट कल्पना केतकरांनी मांडल्या, पण त्या कल्पनांचा विशेष पाठपुरावा स्वतः केला नाही. वेदांच्या संहितीकरणासंबंधी मात्र त्यांनी विशिष्ट विचारसरणी स्वीकारली व तीप्रमाणे निघणारे निष्कर्ष विस्ताराने सांगितले. त्यांची विचारसरणी अशी होती, की संहिती-

१. विभाग ३, पृष्ठ ५११.

करणाचे सारे प्रयत्न वेदांचा विनियोग यज्ञासाठी व्हावा या उद्देशाने झाले आणि प्रत्येक वेदाची संहिता यज्ञात विशिष्ट कार्याकडे लागणार असल्याने एका वेदाची संहिता झाली तेव्हाच इतर संहिताही झाल्या. संहितांचा यज्ञहेतू व अन्योन्याश्रय यासंबंधी या तऱ्हेची विचारसरणी पत्करून त्यांनी असा निष्कर्ष काढला, की यज्ञहेतूने संहितीकरणाचे एकूण तीन प्रयत्न झाले. कुरुयुद्धापूर्वी शेपन्नास वर्षे पहिला प्रयत्न झाला, कुरुयुद्धकाली दुसरा झाला आणि पुढे एकदोन पिढ्यांनी तिसरा झाला. प्रत्येक प्रयत्नाचे वेळीं सर्वच वेदांची संहितीकरणे होऊन संबद्ध ब्राम्हणांची जुडगीही तेव्हाच बांधली गेली.

ज्ञानकोशाच्या दुसऱ्या व तिसऱ्या विभागांतील हे एकंदर वैदिक संशोधन भव्य, उत्तुंग आणि गुणदोषांनी चित्रविचित्र बनलेले असे आहे. हे संशोधन अनेक विद्वान एकाच वेळीं केतकरांच्या मार्गदर्शनाखाली करीत होते व जसजसे संशोधन होत होते तसतसे त्याचे लेखन व मुद्रणही चालले होते. त्यामुळे त्यात पुनरुक्ती नि अव्यवस्था हे दोष नजरेत भरण्याइतक्या प्रमाणात शिरले. कालमर्यादा थोडी, डोक्यात उन्मेष पुष्कळ नि स्वभावात दडपेगिरी भरपूर, अशा परिस्थितीमुळे या संशोधनात असंगती नि विसंगती केतकरांच्या हातून मधूनमधून राहून गेली. वेदसंबद्ध इतिहासाच्या बहुतेक क्षेत्रांमध्ये त्यांनी मुक्त संचार केला आणि आपल्या संशोधनाची व्याप्ती जन्मभर वैदिक संशोधन करणाऱ्या अन्य पंडितांच्या बरोबर नेऊन ठेवली. ज्या ज्या क्षेत्रांमध्ये त्यांनी संचार केला त्या त्या क्षेत्रांत काही नवे, आगळे नि परंपरागत संशोधनात रुळलेल्या विद्वानांना थक्क करील असे इतिहासचित्र त्यांनी उभे केले. त्यांच्या साऱ्या इतिहासचित्रात एक विशिष्ट संगती आहे व तीमुळे वैदिक इतिहासात त्यांनी स्वतःची खास प्रतिसृष्टी उत्पन्न केल्याचा अनुभव येतो. मात्र नव्या कल्पना धोधो ओतीत असता जुन्या कल्पना पूर्णांशाने निपटून काढण्याची काळजी त्यांनी घेतली नाही, आपल्या नव्या कल्पनांनाही कधीकधी पुरेसे आधार दिले नाहीत आणि विद्यापीठी संशोधनपरंपरेत वाढलेल्या विद्वानांची परिस्थिती बिकट करून टाकली. थोड्या पुराव्यावर त्यांनी कल्पनांचे प्रचंड घुमट उभवल्यामुळे ते खरे किंवा खोटे ठरविणे कठीण झाले. पुढील काळात जेव्हा नवे पुरावे पुढे येतील व त्यांच्या एकेका कल्पनेची चिकित्सा संशोधकांकडून कसून करण्यात येईल, तेव्हा त्यांच्या संशोधनातील काही भाग नाकारावा लागेल, हे आजही ताडता येण्यासारखे आहे. पण त्यांचे काही संशोधन नाकारले गेले तरी त्यांची मूलग्राही नवी विचारसरणी आणि नव्या कल्पना यांमुळे भावी संशोधकांची शोधक बुद्धी वारंवार उजळत राहील, तिला नवनवे डोळे फुटतील, यात शंका नाही. शिवाय चिकित्सेच्या भट्टीत काही हीण जळून गेले तरी बरेच सोने बाकी राहील, हे उघड आहे. त्यांनी केलेल्या नव्या संशोधनाच्या जोडीला त्यांनी जी वैदिक इतिहासाची साधने उत्पन्न केली त्यांचा विचार केला म्हणजे वैदिक संशोधनाच्या त्यांच्या एकूण कामगिरीची कल्पना येते. ही कामगिरी क्वचित शबल नि सदोष असली तरी तीमधील गुणसंपदा एवढी मोठी आहे, की तीमुळे महाराष्ट्रातील वैदिक संशोधकांत त्यांना मानाचे स्थान

मिळेल आणि जगातील मोठ्या वैदिक संशोधकांत त्यांची गणना होईल. राजारामशास्त्री भागवत, लो. टिळक, वेदार्थयत्नकर्ते शं. पां. पंडित, महादेव मोरेश्वर कुंटे इत्यादिकांची संशोधनपरंपरा त्यांनी समर्थपणे पुढे चालविली आणि परिपुष्ट केली, यात काहीच संदेह नाही.

ज्ञानकोश-मंडळात वेदांचा अभ्यास तीन वर्षांवर झाल्यानंतर, दुसरा नि तिसरा विभाग प्रसिद्ध होण्यापूर्वी केतकरांनी आपल्या संशोधनाबद्दल एक पत्रक काढले होते आणि ते जगातील सर्व महत्त्वाच्या विद्यापीठांकडे पाठविले होते. या पत्रकात आपल्या नव्या सिद्धांतांचा गोषवारा तेवढा त्यांनी दिला होता; पण त्या सिद्धांतांचे मंडन करणारा पुरावा किंवा युक्तिवाद दिला नव्हता. त्यांचा उद्देश असा होता, की आपली सर्वसाधारण विचारपद्धती पत्रकावरून जगातील विद्वानांना कळावी आणि ती विचारपद्धती धरून चालल्यास मूलभूत असंबद्धता, तर्कदुष्टता कोठे उत्पन्न होते ते त्या विद्वानांनी आपल्या निदर्शनास आणावे. पण त्यांच्या पत्रकावर कोणीच मतप्रदर्शन न केल्यामुळे त्या पत्रकाचा मुख्य उद्देश सफल झाला नाही. पत्रकामुळे जगात ज्ञानकोशाची जाहिरात मात्र चांगली झाली आणि इंग्लंड, अमेरिका, स्वीडन, जर्मनी, चेकोस्लोव्हाकिया, फ्रेंच इंडोचायना इत्यादी देशांतून ज्ञानकोशाला मागणी आली! पत्रकाचे मराठी भाषांतर केतकरांनी मराठीतूनही प्रसिद्ध केले होते. त्यामुळे ज्ञानकोशातील वैदिक संशोधनाकडे महाराष्ट्राचे लक्ष वेधले आणि त्यांना व रा. दात्यांना ठिकठिकाणी व्याख्यानांची आमंत्रणे आली. पत्रकातील आशय बघितल्यावर युरोप-अमेरिकेतील संस्कृताच्या काही अभ्यासकांनी अशी इच्छा प्रदर्शित केली होती, की केतकरांनी आपले सारे म्हणणे एखाद्या पाश्चात्य भाषेत मांडावे. शिवाय, केतकरांचे म्हणणे इंग्रजीत मांडले गेले तर ते स्वतः जर्मनमध्ये मांडण्याची तयारी प्रसिद्ध जर्मन पंडित प्रा. विंटरनिट्झ यांनी दर्शविली होती. या पत्रकानंतर १९२२ साली दुसरा विभाग नि १९२४ साली तिसरा विभाग प्रकाशात आला; पण महाराष्ट्रात त्या विभागांचे विस्तृत नि चिकित्सक परीक्षण व्हावे तेवढे झाले नाही. महाराष्ट्रात वैदिक पंडितांचा वर्गच अस्तित्वात नव्हता, हे त्याला कारण असावे. मात्र हे दोन विभाग हाती पडल्यावर, पहिल्या विभागाने हर्षोत्फुल्ल झालेले सामान्य मराठी वाचक पांडित्याच्या नव्या झगझगाटाने नुसते दिपून गेले. तो इतके दिपले, की त्यांना अभिज्ञतेचे चार शब्द उच्चारण्याचेही तितकेसे भान राहिले नाही![1]

तिसरा विभाग प्रसिद्ध होण्यापूर्वी १९२३ साली चौथा व पाचवा हे पुढील विभाग आगाऊ प्रसिद्ध झाले होते; त्यामुळे १९२४ साली तिसरा विभाग प्रसिद्ध झाला तेव्हा पंचविभागात्मक प्रस्तावनाखंडाची परिसमाप्ती झाली. चौथा विभाग 'युद्धोत्तर जगा'वर नि पाचवा विभाग 'विज्ञानेतिहासा'वर खर्ची पडला होता. त्यांत नवे संशोधन मुळीच

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे १३८ ते १४६ इत्यादी.

नव्हते, फक्त जुन्याचे वेचक संकलन केलेले होते. पण त्या संकलनामुळे, बुद्धापासून तो इंग्रजी राज्याच्या प्रारंभापर्यंत जो विस्तीर्ण काळ लोटला त्याचा व्यापक इतिहास मराठी वाचकांच्या हाती पडला आणि रसायन, गणित, वैद्यक इत्यादी शास्त्रांच्या विकास-क्रमाची माहितीही त्यांना नव्याने मिळाली. या पाच विभागांच्या प्रसिद्धीने केतकरांच्या डोक्यात पाचसहा वर्षांपूर्वी निपजलेली एक मोठी कल्पना फलद्रूप झाली आणि महाराष्ट्राला एक अपूर्व ग्रंथभांडार लाभले. पुढे महामहोपाध्याय द. वा. पोतदारांनी या ग्रंथभांडारा-विषयी असे लिहिले, की "इतकी विविध माहिती व इतके मौलिक विचार मराठीतच काय, परंतू अन्य भाषांतील कोणत्याही ग्रंथात क्वचितच सापडतील. हे पाचही खंड संपूर्ण जो अभ्यासील तो खचित विद्वान होईल, त्याची दृष्टी विशाल होईल आणि त्याची मते व विचार थोडेतरी बदलतील."[1] हाती घेतलेले एक काम झपाट्याने उरकल्यामुळे केतकरांना तर परम समाधान झाले होते. विशेषतः प्रारंभीच्या तीन विभागांत त्यांच्या विद्वत्तेचा जो मुक्त आविष्कार घडला होता त्यामुळे त्या विभागांनी त्यांच्या अभिमानविषयांत अढळ स्थान पटकावले होते. पहिल्या विभागातील समाजशास्त्र आणि दुसऱ्या व तिसऱ्या विभागातील वैदिक संशोधन यांमुळे पांडित्याच्या खुजा टेकाडात नि उंचवट्यात आपण हिमालयासारखे ऐसपैस नि उंचनिंच उभे आहोत असे त्यांना वाटे. या विभागांमुळे दूरच्या भविष्यकाळात आपली थोर कीर्ती होईल, अशी दृढ आशा ते बाळगीत आणि त्यांची कीर्तिलालसा आपला दृष्टिक्षेप शतकभर पुढे टाकून तिथे दिलासा शोधी. आपल्या या कार्याचे सिंहावलोकन करताना त्यांनी पुढील संस्मरणीय उद्गार काढले आहेत :

"मला चारही वेद काळजीपूर्वक वाचावयाचे होते व त्यांवर संशोधन करावयाचे होते. ते करण्याची संधी मला ज्ञानकोशांनी दिली....आज जरी माझे संशोधनफल जगप्रसिद्ध झाले नाही तरी ते उद्या होईल आणि वेदाच्या अत्यंत मोठ्या अभ्यासकांत माझे नाव केव्हातरी होईल, ही माझी खात्री आहे. मी असे म्हणू शकतो, की ज्ञानकोश-मंडळात नवीन वैदिक संशोधन प्रसिद्ध झाले आहे ते जगातील अत्यंत मोठ्या वेदाच्या अभ्यासकांच्या सबंध आयुष्यातील कामाइतके मोठे ठरेल.... मला समकालीनांनी जरी योग्य अभिज्ञता दाखविली नसली तरी त्याबद्दल खंत मुळीच नाही. मला असे वाटते, की मी जे काय लिहिले आहे त्याची उत्तम प्रकारे जाणीव होण्याइतका ज्ञानविकास भोवतालच्या जनतेत नाही. त्यामुळे लोकांच्या स्तुतिनिंदेची मला फारशी फिकीर वाटत नाही....ज्ञानकोशामध्ये जे समाजशास्त्र घातले आहे ते जगातील प्रचलित समाजशास्त्रज्ञांच्यापेक्षा काही बाबतीत वरच्या दर्जाचे आहे, हाही मला आत्मविश्वास आहे. तथापी त्याची पारखदेखील समकालीन महाराष्ट्राकडून होणे शक्य नाही. मी जे लिहिले आहे ते इंग्रजीत लिहिले असते तर त्याचे महत्व लोकांस

१. लोकशिक्षण, जुलै १९३७.

पटले असते....ज्यावर लोक मोठमोठाले ग्रंथ लिहितील अशा अनेक गोष्टी, विशेषेकरून जगद्विकासविषयक सत्ये, मी फार थोड्या पानांत मांडली आहेत आणि अनेक शास्त्रांच्या विकासाविषयी काहीतरी नवीन सांगितले आहे, असे आजतागाईत शास्त्रीय वाङ्मय वाचणारांस दिसून येईल....या सर्व गोष्टी केल्या त्या अर्थात कीर्तीच्या आशेने केल्या नाहीत....आजपासून अनेक दशकांनी माझ्या संशोधनाची जाणीव उत्पन्न होईल, ही माझी खात्री आहे. शिवाय कीर्ती तरी कोणाची मिळवावयाची? सध्याच्या पिढीत जो समाजशास्त्रज्ञ वर्ग आहे तो मला फारच अल्प कर्तृत्वाचा वाटतो व त्यामुळे त्याच्या प्रशंसेची लालसा माझ्या कार्यक्रमात बंध उत्पन्न करू शकत नाही."[१]

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे १५४-१५५.

# बहुरूपी ज्ञानकोशकार

[१९१९ ते २४]

नागपूरहून पुण्याला आल्यापासून, १९१९ ते १९२४ या कालात, प्रस्तावना-खंडाचे मोठे काम केतकरांनी शिरावर घेतले आणि ते झपाट्याने पार पाडले. पण या कालात तेवढे एकच कार्य ते करीत नव्हते. प्रस्तावनाखंडाचे संपादन नि त्यासाठी करावे लागलेले विस्तृत वैदिक संशोधन यांखेरीज इतर अनेक कामे या कालात त्यांनी चालविली होती आणि शर्थीने यशस्वी केली होती. ती कामे करताना ते हरतऱ्हेच्या भूमिका घेत होते आणि त्या भूमिकांत त्यांच्या व्यक्तित्वातील नाना कळा दृग्गोचर होत होत्या. या कालात त्यांनी जी कामे यशस्वी केली त्यांत ज्ञानकोश-मंडळामधील जुनाट कटकटींना तोंड देणे नि त्या कायमच्या मिटवून टाकणे हे एक महत्वाचे काम होते. हे काम करीत असता, प्रतिपक्षाची कारस्थाने डावावर डाव रचून त्यांना हाणून पाडावी लागली आणि त्यांच्या स्वभावांतील उचापती व व्यवहारी झुंजारपणा पुन्हा एकदा प्रकट झाला.

पहिला विभाग छापला जात असता ज्ञानकोश-मंडळाची जी तिसरी सर्वसाधारण सभा झाली तीमध्ये पाध्येगटाने त्यांना जोराचा विरोध पुन्हा एकदा केला. या विरोधामुळे मंडळाच्या कारभाराला एवढा जबर धक्का बसला, की ते मोडते की काय अशी भीती उत्पन्न झाली. ही सर्वसाधारण सभा प्रथमतः २६ सप्टेंबर १९२० रोजी नागपूरला भरली. पण त्या वेळीं चालकमंडळाच्या कार्यवृत्ताची (प्रोसीडिंगची) वही न्यायालयात गेली होती नि मंडळाची खातेवहीही नागपूरला नव्हती. तेव्हा 'आजच्या सभेत ताळेबंद संमत करू नये, हिशेब पाहाण्यास आम्हांस संधी द्यावी' अशी काही भागिदारांनी मागणी केली आणि सभा पुढे ढकलण्यात आली. पुढे, २४ ऑक्टोबर १९२० रोजी, ही सभा पुन्हा भरली आणि तीमध्ये रा. पाध्यांनी एक लांबलचक ठराव आणला. "तो ठराव साठसत्तर ओळींचा, अशुद्ध वाक्यांचा आणि अनेक आरोप गर्भित करणारा आणि अनेक खोटी विधाने केलेला होता." पण तो विचारात घेतला गेला नाही. हिशेब पाहाण्यास वेळ अपुरा होता, अशी तक्रार काही भागिदारांनी

केल्यामुळे अध्यक्ष डॉ. ना. भा. खरे यांनी सभा पुन्हा तहकूब केली आणि 'आक्षेपकांची एक समिती हिशेब पाहून तक्रार मांडण्यासाठी नेमली.' या समितीत रा. पाध्ये, रा. स. कृ. फाटक व रा. एम. जी. लोकस अशी तीन मंडळी होती. पण या मंडळीने आपली कर्तव्यकक्षा उल्लंघिली आणि "आपणास जणू काय कंपनीचा व्यवहार पाहून शेअरहोल्डरांकडे रिपोर्ट करण्याचा अधिकार मिळाला आहे, असा बहाणा करून" एक प्रतिवृत्त तयार केले. हे प्रतिवृत्त 'खाजगी व गुप्त' असा शेरा मारून त्यांनी सर्व भागिदारांकडे रवाना केले. या प्रतिवृत्तात केतकरांवर अनेक गंभीर आक्षेप घेतले होते आणि केतकरांबद्दल भागिदारांची मने कलुषित व्हावी, अशी धूर्त व्यवस्था केली होती. प्रतिवृत्ताच्याआधी रा. पाध्यांच्या मनात, आपण पुन्हा एकदा ज्ञानकोश-मंडळाच्या संचालकपदावर आरूढ व्हावे, अशी इच्छा उत्पन्न झाली होती आणि पुढील वर्षाच्या निवडणुकीसाठी आपण उभे राहाणार आहोत, अशी सूचनाही अधिकृत रीतीने त्यांनी दिली होती. तेव्हा या प्रतिवृत्तामुळे भागिदारांची मने केतकरांविषयी कलुषित झाल्यास आपण निवडून येऊ शकू, असे मतलबी मांडे ते मनात खात असावे. साहजिकच त्यांच्या आक्षेपांना उत्तरे देऊन त्यांचे डाव हाणून पाडण्यासाठी केतकरांना पुनश्च कंबर कसावी लागली.

पाध्ये-मंडळीने भागिदारांकडे पाठविलेल्या प्रतिवृत्तात एक आक्षेप असा होता, की मंडळाचे हिशेब नि कागद अव्यवस्थितपणे नि अप्रामाणिकपणे ठेवलेले असून मंडळाच्या पैशांचा वापर डॉ. केतकर आणि इतर लोक खाजगी कामासाठी करतात. दुसरा आक्षेप असा होता, की ज्ञानकोशाचा खर्च मूळ अंदाजाच्या बाहेर गेला, काम आश्वासनाप्रमाणे डिसेंबर १९२० पर्यंत पुरे झाले नाही आणि भांडवल एक लाखापर्यंत वाढवून मिळाले तरी पूर्वी ज्यांची नावे जाहीर झाली त्या विद्वानांचे लेखनसाह्य मिळवले गेले नाही. तिसरा आक्षेप मुख्यतः कु. कोहन ऊर्फ सौ. केतकर यांच्याबद्दल होता. तो असा, की त्यांना चालकांच्या ठरावावाचून काम दिले; विंटरनिट्झच्या ग्रंथाचे भाषांतर त्यांनी मंडळाचा पगार घेऊन केले, पण ते प्रसिद्ध करण्याचा हक्क त्यांना फुकट दिला; आणि त्या हिंदुस्थानांत आपल्या भावी पतीकडे आल्या त्या मंडळाकडून परस्पर भाडेखर्च घेऊन आल्या. चौथ्या आक्षेपात, डॉ. केतकर आणि सौ. केतकर यांना मिळणाऱ्या मुशाहिऱ्याची मोजदाद करून ही पतिपत्नी सर्वांत जास्त पैसे लाटतात, असे ध्वनित केले होते. पाचव्या आक्षेपात, केतकरांचा पगार तीनशेवरून सव्वाचारशेवर नेण्यास विरोध दर्शवून केतकर अनन्यदृष्टीने ज्ञानकोशाचे काम करीत नाहीत, असे म्हटले होते. ज्ञानकोशाबरोबर 'केतकर्स बँक', 'चातुर्वर्ण्य-संरक्षक-पीठ', 'स्त्रीकर्मसदन' इत्यादी पाच संस्थांत डॉ. केतकर लक्ष घालतात, तेव्हा त्यांचा पगार वाढविण्याऐवजी कमी केला पाहिजे, असे मत या आक्षेपात व्यक्त केले होते. या तऱ्हेचे अनेक आक्षेप या प्रतिवृत्तात घेतले होते आणि केतकर म्हणजे कोणी सुशिक्षित भामटे असावेत असा आभास उत्पन्न केला होता.

हे प्रतिवृत्त भागिदारांकडे गेल्यावर स्वतःच्या समर्थनासाठी केतकरांनी एक पत्रक काढले आणि आपल्यावरील काही आक्षेपांना ठणठणीत उत्तरे दिली. केतकरांची एकंदर बाजू सारांशाने पुढीलप्रमाणे सांगता येईल: मंडळाचे हिशेब नि कागदपत्र पाध्ये-समितीला अव्यवस्थित नि अप्रामाणिक वाटले असतील, पण हिशेबतपासनिसां-कडून हिशेब तपासून घेतलेले होते व कागदपत्रांविषयी 'रजिस्ट्रार ऑफ कंपनीज' या अधिकाऱ्याची तक्रार नव्हती. पैसे कोणीही खाजगी कामासाठी वापरलेले नव्हते; तर ज्ञानकोशाच्याच कामासाठी आगाऊ पैसे दिले, की हिशेब येईपर्यंत व्यक्तीच्या नावे ते खर्ची पडत नि ते खाजगी कामासाठी घेतल्यासारखे वाटत. ज्ञानकोशाचा खर्च मूळ अंदाजाच्या बाहेर गेला होता, १९२० च्या डिसेंबरपर्यंत कार्य पुरे झाले नव्हते आणि नावे जाहीर झालेल्या विद्वानांचे साह्य लाभले नव्हते, हे सारे खरे होते; पण त्यात केतकरांना दोषी ठरवणे असमंजसपणाचे होते. कार्य अभूतपूर्व नि प्रचंड असल्याने आधीचे अंदाज चुकणे साहजिक होते आणि प्रयत्न करूनही इतर विद्वानांचे साह्य लाभले नाही तर तो परिस्थितीचा दोष होता. विद्वानांचे अपेक्षित साह्य मिळाले नाही तरीही केतकरांनी ज्ञानकोशाचे काम धडाडीने पुढे चालविले, यात उलट त्यांचा गौरवच होता. कु. कोहन यांना चालकांच्या ठरावाशिवाय काम दिले हा आरोप फोल होता; कारण २१ मार्च १९१७ रोजी श्री. पाध्येच अध्यक्ष असता चालकमंडळाने जी योजना मान्य केली तीत कु. कोहन यांना काम दिल्याचा स्पष्ट उल्लेख होता. कु. कोहन यांना विंटरनिट्झच्या ग्रंथाचे भाषांतर प्रसिद्ध करण्याचा हक्कही फुकट दिलेला नव्हता; उलट अशा हक्काबद्दल तुम्ही काय घ्याल, अशी विचारणा त्यांच्याकडे केलेली होती. —आणि त्यांना हिंदुस्थानात येण्यासाठी मंडळाने भाडे दिले, यात काहीच गैर नव्हते. त्या मंडळाच्या कामासाठीच हिंदुस्थानात आल्या होत्या; आणि त्यांचा नि डॉ. केतकरांचा विवाह झाला, ती पुढे ठरलेली घटना होती. आपली परदेशस्थ वधू मंडळाच्या खर्चाने केतकरांनी हिंदुस्थानात आणली व लग्न उरकले, असा प्रकार नव्हता. डॉ. केतकर नि सौ. केतकर यांना मिळणाऱ्या मुशाहिऱ्याचे पाध्ये-समितीने दिलेले आकडे काहीसे फसवे होते; कारण सौ. केतकरांना मिळालेल्या मुशाहिऱ्यात समितीने लंडनच्या कार्या-लयाचा अनेक वर्षांचा खर्च समाविष्ट केला होता. शिवाय, डॉ. केतकर नि सौ. केतकर यांना वेतनापैकी मोठा वाटा मिळाला तर त्यात अन्याय्य काहीही नव्हते. डॉ. केतकर संपादकीय नि व्यवस्थापकीय कामाचे डोंगर उचलीत होते आणि सौ. केतकर ज्ञान-कोशाच्या कामासाठी परदेशातून हिंदुस्थानात आल्या होत्या, तेव्हा ते न्याय्यच होते. डॉ. केतकर ज्ञानकोशाबरोबर इतर संस्थांत आपल्या स्वभावानुसार लक्ष घालीत होते हे खरे, पण त्या संस्थांनी काम इतके थोडे केले की त्यांत खर्चिलेल्या चारदोन घटकांसाठी केतकरांचा पगार कमी करू पाहाणे, हे सूडबुद्धीलाच शक्य होते. सारांश, पाध्ये-समितीने फुगा मोठा फुगवला होता, पण त्यात काही राम नव्हता.

पाध्ये-समितीच्या प्रतिवृत्ताला केतकरांनी उत्तरे तर दिलीच; पण श्री. पाध्यांचा डाव

इतर उपायांनीही हाणून पाडण्याचा प्रयत्न केला. २४ ऑक्टोबरला पुढे ढकललेली सभा १९ डिसेंबर रोजी पुन्हा भरणार होती. ती त्यांनी नागपुरास न बोलावता पुण्यास बोलावली आणि श्री. पाध्यांनी स्वतःसाठी जमविलेली 'प्रॉक्झी'ची मते वाया घालविली. 'ही सभा पुण्यास बोलाविण्यात नागपूरच्या माहितगार भागिदारांना डावलण्याचा यत्न आहे, तरी सावध असावे' अशा अर्थाचे अकरा जणांच्या सह्यांचे पत्र पाध्ये-आदिकांनी केसरीकडे पाठविले; पण ते सभा झाल्यावर दोन दिवसांनी प्रसिद्ध झाले! पुण्याच्या सभेत काहीच झाले नाही; तिकडे अध्यक्ष डॉ. खरे यांच्या संमतीने नागपुरास सभा भरली, पण तिची पूर्वसूचना ठीक गेलेली नसल्यामुळे तीही पुढे ढकलण्यात आली! अखेर २० फेब्रुवारी १९२१ रोजी ही तहकुबीने लांबलेली सभा नागपूरला भरली आणि सारेच अपेक्षेबाहेर घडले :

केतकरांना प्रॉक्झीची नि इतर मते रा. पाध्ये यांच्यापेक्षा इतकी अधिक होती की त्यांना विजयाची चिंता नव्हती. पण त्यांची तटबंदी सौजन्य नि दिलदारपणा या त्यांच्या मनाच्या नाजुक भागांवर मारा होऊन तेथेच ढासळली. पाध्येपक्षाच्या वतीने श्री. विष्णुपंत जकातदार यांनी त्यांच्याशी नरमाईचे बोलणे सुरू करून म्हटले, "आमच्या म्हणण्याला आपण काहीच मान देत नाही काय?" तेव्हा ते विरघळले आणि पाध्येपक्षाचे अनेक मुद्दे झपाझप त्यांनी मान्य करून टाकले! श्री. पाध्ये यांना चालकपदावरून त्यांनीच काढून टाकले होते; पण श्री. पाध्यांच्या चालकत्वाला त्यांनी मान डोलावली. संपादक नि व्यवस्थापक ही पदे एकाच व्यक्तीकडे न ठेवता दोन व्यक्तींकडे ठेवावीत या पाध्येपक्षाच्या सूचनेला त्यांनी अनुमती दिली आणि स्वतःकडील व्यवस्थापकत्व रा. विष्णुपंत जकातदार यांच्याकडे जाऊ दिले. कु. कोहन यांना दिलेल्या ६९७ रुपयांच्या ज्या भाडेखर्चावर वाद झाला होता तो भाडेखर्चही परत देण्यास ते कबूल झाले. श्री. विष्णुपंत जकातदार यांच्यासारखा धडाडीचा मनुष्य स्वतःच्या वकिलीवर पाणी सोडून ज्ञानकोशात येत असेल तर भाडेखर्चाच्या रकमेवर आपण पाणी सोडण्यास काय हरकत आहे, असा त्या वेळी त्यांनी विचार केला.—म्हणजे श्री. पाध्यांच्या शाठ्या नीतीपुढे ते हरले नाहीत; पण श्री. जकातदारांसारखा भला मनुष्य भेटताच कासेची लंगोटी त्यांनी सोडून दिली![1]

या सभेत वाद मिटल्याचा देखावा दिसला, पण तेवढ्याने मूळ प्रश्न संपला नाही. श्री. जकातदार हे धडाडीचे गृहस्थ होते आणि ते ज्ञानकोश-मंडळाचे व्यवस्थापक झाले असते तर पैसा उभारण्याचे काम त्यांनी खचित केले असते. त्या आशेनेच केतकरांनी त्यांच्या व्यवस्थापकत्वास मान्यता दिली होती. पण गंभीरपणे काम करण्याची जकातदारांची इच्छा नव्हती. काम समजावून घेण्यासाठी ते पुण्याला तर आले नाहीतच, पण

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ७६ ते ८२, परिशिष्ट-पृष्ठे ५७ ते ८०; 'ज्ञानकोश-मंडळाचे काम', केसरी, २१ डिसेंबर १९२०.

नागपूरच्या कार्यालयातदेखील त्यांनी पाऊल टाकले नाही. तेव्हा, काही काळ वाट बघून केतकरांनी 'रजिस्ट्रार ऑफ कंपनीज' यांच्याकडे कळविले, की श्री. जकातदार व्यवस्थापक नसून आपणच व्यवस्थापक आहोत, आणि त्यांनी स्वतः कामाला प्रारंभ केला! रा. पाध्ये हे पुन्हा कायम चालक झाले होते, पण त्यांनीही सरळपणाचे वर्तन केले असावे, असे दिसत नाही. "त्यांनी अशी वृत्ती दाखविली, की मी व फडके जेव्हा नापुगरास असू तेव्हा सभाच होऊ देऊ नये व आम्ही नसलो म्हणजे त्यांनी व कटाळ्यांनी मिळून वाटेल ते ठराव करावेत"—असे त्यांच्याविषयी केतकरांनी म्हटले आहे. त्यांचे वर्तन असे वाकडे होऊ लागले तेव्हा त्यांना काढून टाकणे केतकरांना पुन्हा प्राप्त झाले. कायम चालकाच्या पदावरून रा. पाध्ये एकदा च्युत झालेले होते, तेव्हा त्यांची फेरनिवडणूक बेकायदेशीरच होती. पण श्री. जकातदारांच्या आग्रहाखातर केतकरांनी तिला संमती दर्शवली होती. आता रा. दि. य. फाटक या आपल्या आतेबंधूंकरवी केतकरांनी पाध्यांच्या निवडणुकीच्या बेकायदेशीरपणाविषयी अर्ज करविला आणि अर्जानंतर पाध्ये यांना चालकत्वावरून दूर केले! सर्वसाधारण सभेतील एकच महत्वाचा निर्णय आता शिल्लक उरला होता. तो म्हणजे सौ. केतकर यांना दिलेल्या भाड्याबद्दलचा. रा. जकातदार ज्ञानकोशासाठी वकिलीवर पाणी सोडण्यास तयार झाले होते, म्हणून हे भाडे परत करण्यास केतकर सिद्ध झाले होते. पण जकातदारांनी वकिलीवर पाणी सोडले नाही; तेव्हा केतकरांना भाडे परत घेण्याची इच्छा झाली. शिवाय, मंडळाने एकदा दिलेले भाडे परत घेण्यात मंडळाची पत राहात नाही, असेही कित्येकांचे पूर्वीपासून मत होते. त्यामुळे, मंडळाने प्रथम दिलेले व नंतर केतकरांनी परत केलेले असे हे भाडे केतकरांनी मंडळाकडून पुन्हा घेतले! या सर्व घटनांवर सप्टेंबर १९२१ च्या पुढील सर्वसाधारण वार्षिक सभेत शिक्कामोर्तब झाले.—म्हणजे फेब्रुवारी १९२१ च्या सभेतील सर्व निर्णय वर्षसहामहिन्यात उलटेपालटे होऊन सप्टेंबर १९२१ च्या सभेत हरदासाची सारी कथा मूळ पदावर आली![१]

मात्र मध्यंतरीच्या काळात हरदासाची कथा भलतीकडे भरकटल्यामुळे मंडळाचे अतिशय नुकसान झाले. श्री. जकातदारांनी व्यवस्थापक म्हणून आपल्या हाती सूत्रे न घेतल्यामुळे कित्येक महिने व्यवस्थापकीय खात्यात निश्चित सत्तेचा अभाव होता. अर्थात नवे भागिदार करून घेणे किंवा नवे वर्गणीदार मिळवणे ही कामे थांबून आत येणाऱ्या पैशांचा ओघ कोरडा पडला. खर्च तेवढा चालू राहून मंडळ आर्थिक दृष्ट्या डबघाईस आले. मंडळाला ज्ञानदृष्टीनेही काही कमी ठोकर बसली नाही. रा. पाध्ये यांच्याशी झालेल्या झटापटीत केतकरांनी मुद्द्याला मुद्द्याने व हिकमतीला हिकमतीने यशस्वी तोंड दिले; पण ते करताना प्रस्तावनाखंडाच्या उरलेल्या चार विभागांच्या संपादनाचे जे अवाढव्य काम त्यांच्यापुढे पसरले होते तिकडे त्यांचे दुर्लक्ष झाले. नंतर काही महिने जी

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ८१ ते ८५.

अनागोंदी माजली तीमुळेही मनस्ताप होऊन संपादनाचे काम ते नीटपणे करू शकले नाहीत. या काळात लिहिलेल्या एका पत्रात ते म्हणतात, "माझ्या डोक्यात काही निरनिराळे कप्पे नाहीत, की एक उघडा ठेवून दुसरा बंद करता यावा;...व्यवस्थेसंबंधी चाललेल्या घोटाळ्यामुळे संपादकीय कामावरही परिणाम होऊन ते माझ्याने सध्या बरोबर होत नाही."[१]

१९२१च्या सप्टेंबरमध्ये झालेल्या वार्षिक सभेत जे निर्णय घेण्यात आले त्यांमुळे केतकरांच्यामागची गृहकलहाची पीडा कायमची टळण्याचीही व्यवस्था झाली. या सभेत असे ठरले, की दोन हजार रुपये मंडळास कर्जाऊ देणारे किंवा तेवढ्या रकमेस जामीन राहाणारे लोकच जादा चालक म्हणून निवडले जावे. त्यामुळे ठेंगडी, भवाळकर, कठाळे वगैरे पाध्ये-गटातील फुकटे भागिदार लोक जादा चालक म्हणून निवडून येण्याचे बंद झाले आणि गृहकलहाचे मूळच उखडले गेले. १९२१ पासून श्री. लक्ष्मणराव फाटक, श्री. शांतारामपंत दांडेकर (केतकरांचे बालमित्र), श्री. अच्युतराव भट, श्री. धोंडोपंत साठे (लोखंडवाले) वगैरे मंडळी जादा चालकांच्या पदावर येऊन त्यांनी केतकरांना मनःपूर्वक पाठिंबा दिला. सप्टेंबर १९२१ च्या सभेत असेही ठरले, की ज्या अर्थी डॉ. केतकर मंडळाच्या कर्जाला वैयक्तिक रीत्या जबाबदार राहिले आहेत त्या अर्थी त्यांच्या अधिकारात चालकांनी ढवळाढवळ करू नये. या ठरावामुळे तर सर्व सत्ता कायदेशीरपणे केतकरांच्या हातांत एकवटली आणि त्यांचा मार्ग पूर्णपणे निर्वेध झाला. आपल्या दूरगामी, धाडसी नि अपूर्व कल्पना व्यवहारात उतरविण्यास चालकांचा अडसर त्यांच्या मार्गात राहिला नाही. 'वाङ्मयसूची'च्या छपाईच्या निमित्ताने १९१७ साली ज्या कलिपुराणाचा श्रीकार लिहिला गेला त्या कलिपुराणाची अशा रीतीने इतिश्री झाली![२]

पुण्याला आल्यानंतर, केतकरांना अकारविल्हेने माहिती देणाऱ्या ज्ञानकोशाच्या शरीरखंडाचे काम पुरे करावयाचे होते आणि प्रस्तावनाखंडाचीही उभारणी करावयाची होती. त्यासाठी प्रथितयश विद्वानांचे सहकार्य मिळवावे, म्हणून त्यांनी नागपुराप्रमाणे पुण्यासही प्रथम बरीच खटपट करून बघितली; पण त्यांना यश आले नाही. उदाहरणार्थ, मिरजेचे प्रसिद्ध इतिहाससंशोधक श्री. वासुदेवशास्त्री खरे यांना ज्ञानकोशात येण्याविषयी त्यांनी विशेष आग्रह केला; पण पैशाचा सौदा न पटल्यामुळे वासुदेवशास्त्री आले नाहीत. ज्ञानकोशाचे बरेचसे काम झाल्यावर एकदा वासुदेवशास्त्री पुण्यास आले होते, तेव्हा मात्र काही लेख तपासून देण्याचे त्यांनी मान्य केले आणि अडीचशे रुपये दरमहा घेऊन दोन वर्षांत पेशवाईच्या इतिहासावर एक हजार पृष्ठांचा मोठा ग्रंथ लिहिण्याची सिद्धताही दर्शविली. पण पुढे त्यांचा मृत्यू ओढवून साराच ग्रंथ

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ८९; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ४३.
२. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ८४, ८९-९०.

आटोपला! दैवयोजना अशी असावी, की प्रथितयश, गाढ्या विद्वानांच्या सहकार्या-शिवायच केतकरांच्या हातून ज्ञानकोश पुरा व्हावा. त्यामुळे लो. टिळक, डॉ. भांडारकर, इतिहासाचार्य राजवाडे किंवा वासुदेवशास्त्री खरे यांसारख्या कोणाचेच हात ज्ञानकोशास लागले नाहीत. प्रथितयश विद्वानांचे सहकार्य मिळाले नाही, तेव्हा जी अप्रसिद्ध माणसे हाताशी लागली त्यांनाच केतकरांनी कोशकर्ते विद्वान बनविले आणि दैवयोजना खरी करून दाखविली.[१]

नागपूरहून त्यांच्याबरोबर रा. य. रा. दाते आणि रा. स. वा. देशपांडे ज्ञानकोशा-साठी पुण्यास आले होते. शिवाय, पुण्याच्या शाखेत तत्पूर्वी किंवा तदनंतर सेनापती पां. म. बापट, श्रौताचार्य धुं. ग. बापट, रा. चिं. ग. कर्वे, रा. ल. के. भावे, हैत्रवेत्ते चिंतामणभट्ट दातार, वे. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव वगैरे प्रमुख मंडळी येऊन मिळाली. याच अप्रसिद्ध विद्वानांच्या बळावर ज्ञानकोशाचे संपादन पुण्यास आल्यावर त्यांनी पुढे रेटले आणि तडीस नेले. या विद्वानांमधील सुप्त गुणांची पारख करून केतकरांनी त्यांना खास प्रयत्नाने ज्ञानकोशात आणले व तेथे टिकविले, असा प्रकार झाला नाही. तर ज्ञानकोशात जी दोनेकशे माणसे वेळोवेळीं यदृच्छया नोकरीस लागली त्यातच हे विद्वान लागले आणि तेथील कामात गोडी उत्पन्न झाल्यामुळे तेथे चिकटून राहिले. केतकरांनी दिलदारपणाने स्वच्छ म्हटलेच आहे, की "ज्ञानकोशाची सेवा ज्यांनी मोठ्या एकनिष्ठतेने केली अशी मंडळी मी शोधून काढली, असे श्रेय...मला मिळू शकत नाही." मात्र या विद्वानांना पुरेसे वेतन देण्याचा केतकरांनी आटोकाट प्रयत्न केला, त्यांना मनमोकळी व दिलदार वागणूक दिली आणि त्यांच्याभोवती विद्याव्यासंगाला अनुकूल असे वातावरणही निर्माण केले. त्यामुळे या विद्वानांच्या निष्ठेला चांगले कोंदण मिळाले आणि ज्ञानकोशाचे संपादन यशस्वीपणे पार पडले. एकाही प्रथितयश विद्वानाचे म्हणण्यासारखे सहकार्य मिळाले नसताना केतकरांनी ज्ञानकोश सिद्धीस नेला, याचे श्रेय जसे केतकरांच्या विद्वत्तेला नि संघटनचातुर्याला आहे तसेच ते या अप्रसिद्ध नि नवोदित विद्वानांच्या निष्ठेला नि विद्याप्रेमालाही आहे. केतकर आपल्या या सहकाऱ्यांबद्दल एके ठिकाणी कृतज्ञतापूर्वक म्हणतात, की "ज्या माझ्या सहायकांच्या अंतःकरणपूर्वक साह्यामुळे हे काम मी अनेक अडचणींतून...पार पाडू शकलो त्यांचा मी ऋणी आहे.—आणि त्यांचे कर्तृत्व आणि योग्यता ही महाराष्ट्राने ओळखली पाहिजे, असे मला वाटते....ही मंडळी ज्ञानकोशाच्या कामाला लागल्यामुळे त्यांचे जसे द्रव्यदृष्टीने नुकसान झाले आहे, तसेच सामाजिक महत्व या दृष्टीनेही नुकसान झाले आहे. ही गोष्ट मला मोठ्या खेदाने कबूल करणे भाग आहे." "मी असे अभिमानाने सांगू शकतो...की त्यांनी संपादकीय कार्याकडे लक्ष न देता शिक्षणाकडे लक्ष दिले असते तर ते ज्या कॉलेजांमधून शिकवा-

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ १२७; 'राजवाडे यांची जीवनपद्धती', विद्यासेवक, जानेवारी १९२७.

वयास गेले असते त्या कॉलेजांच्या इतिहासातदेखील त्यांचा अत्यंत गौरवपूर्वक उल्लेख करावा लागला असता. एवढेच नव्हे तर प्रसिद्ध विद्वान म्हणून त्यांची ख्यातीही झाली असती." [१]

वैदिक संशोधनात दुय्यम संपादकांनी केतकरांना पुष्कळ साह्य केले; पण प्रस्तावना-खंड व शरीरखंड यांतील ज्ञानसंकलनाच्या कामात त्यांनी जे साह्य केले ते त्याहून मोठे होते. शरीरखंडात बहुतेक सारे संकलन असल्यामुळे तो सोळा विभागांचा प्रचंड खंड दुय्यम संपादकांनीच बहुतांशी तयार केला, असे म्हणावे लागेल. या खंडाची तीन-चतुर्थांशाहून जास्त कच्ची टिपणे नागपूरला तयार झाली होती. पुण्याला दुय्यम संपादकांनी या टिपणांवर केतकरांच्या मार्गदर्शनाखाली शेवटची संस्करणे केली, नव्या भागावर नवी टिपणे काढली आणि १ डिसेंबर १९१९ पर्यंत जो शास्त्रीय मजकूर बाहेरच्या लेखकांकडून अपेक्षेप्रमाणे आला नाही तो कार्यालयात तयार केला. प्रस्तावनाखंड व वैदिक संशोधन यांची घणाघाई एकीकडे चालली असता दुसरीकडे हे काम सुमारे तीन वर्षे चालले आणि अखेर, १९२२ च्या सप्टेंबरमध्ये, ज्ञानकोशाचे सर्व हस्तलिखित जवळजवळ पूर्णपणे तयार झाले! मुद्रणासाठी त्यावर आयत्या वेळेची संस्करणे करणे किंवा ताजी माहिती त्यात वेळोवेळी घालणे एवढेच काय ते बाकी उरले. या साऱ्या कामात, दुय्यम संपादकांमध्ये शिस्त व सुसूत्रता राखण्याची कामगिरी रा. दाते यांनी संपादकीय व्यवस्थापक या नात्याने मोठ्या हिंमतीने व जबाबदारीने पार पाडली. पण रा. दाते किंवा इतर दुय्यम संपादक यांचे सहकार्य कितीही मोठे असले तरी शरीरखंडाचा भार केतकरांवर अजिबातच पडला नाही, असे नाही. शरीरखंडाचा आराखडा त्यांच्या हातचा होता, मजकूर कोठून नि कसा घ्यावा याबद्दल ते सूचना देत होते आणि तयार झालेला मजकूर शक्य तेवढा नजरेखालून घालीत होते. शिवाय, कुठेकुठे स्वतःचे लेख किंवा पुरवण्या नि टीपाही ते देत होते. 'सुपर-रॉयल' आकाराची सुमारे आठ हजार पृष्ठे मजकूर तयार होईतो हे काम त्यांनी केले!—तेव्हा त्या कामाचा अवजडपणा सामान्य माणसाला झेपण्यासारखा नव्हता, हे उघड आहे. विशेषतः वैदिक संशोधन नि प्रस्तावना-खंड यांत चित्त गुंतले असता हे अवजड काम त्यांनी पेलले, हे आश्चर्यकारक होते. [२]

ज्ञानकोशाचे संपादन चालू असता केतकरांनी हाताखालच्या दुय्यम संपादकांना, जाणून किंवा नेणून, उत्तम प्रकारचे संपादकीय शिक्षण दिले आणि संपादकांचे ते शिक्षक बनले. नवा संपादक कामावर लागला, की त्याला ते प्रथम एखाद्या इंग्रजी ग्रंथाचा अनुवाद करण्यास सांगत आणि त्याने अनुवाद करून आणला, की त्याला उलटसुलट प्रश्न विचारून त्याची परीक्षा पाहात. त्याने आपल्या उत्तरात ग्रंथातील आशय अचूक सांगितला, ग्रंथातील आक्षेपार्ह मते दाखवून दिली, तर त्यांच्या परीक्षेत

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे १५६ ते १९५८; आठवणी, ग. ना. टिळक.

२. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे १२५, १३२-१३३, १४६ ते १५०, १६० ते १६२; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ५०.

तो उत्तीर्ण होई नि मग पुढील कामे त्याच्यावर ते विश्वासाने सोपवीत. ज्ञानकोशाच्या कचेरीत पाच हजारांहून अधिक किंमतीचा निवडक ग्रंथसंग्रह त्यांनी जमविला होता आणि मुंबईच्या व नागपूरच्या मोठाल्या ग्रंथालयांनून ग्रंथ मिळण्याची सोय करून ठेवली होती. या ग्रंथांतून हवी ती माहिती कशी काढावी, ते दुय्यम संपादकांना त्यांनी उत्तम रीतीने शिकविले होते. "माझे लेखक य कामात फार निष्णात आहेत" अशी ग्वाहीही मोठ्या लोकांजवळ ते अभिमानाने देत. लेख तौलनिक पद्धतीने लिहावा, यावर त्यांचा भारी कटाक्ष असे. पौर्वात्य व पाश्चात्य मतांची तुलना लेखात आलीच पाहिजे, निदान ती मते समोरासमोर मांडून ठेवली पाहिजेत, असे ते आग्रहाने बजावीत. कोठल्याही विषयावर लिहिताना लेखकाने आपले अज्ञान व्यक्त करू नये, उलट त्या विषयाचा आपला सांगोपांग नि अद्ययावत अभ्यास आहे व आपण अधिकाराने लिहीत आहोत, असे जागोजाग दिग्दर्शित करावे, अशी त्यांची शिकवण असे. अनेक भारदस्त पण संलग्न प्रश्नांचा उल्लेख करणे, आधुनिक अधिकारी माणसांच्या मतांवर उडतउडत टीका करणे, आपल्या काही नव्या कल्पना अस्पष्टपणे मांडणे, यांसारख्या अनेक युक्त्या लेख अधिकारपूर्ण करण्यासाठी ते सांगून ठेवीत! ते म्हणत, एखाद्याला 'मूर्ख' म्हणण्यापेक्षा त्याला 'भोळा' म्हणून त्याची कीव करावी! त्यांच्या मते, वर्तमानपत्राच्या संपादकापेक्षा ज्ञानकोशाच्या संपादकाच्या टाकांच्या फेकी अधिक पल्लेदार व अधिक पांडित्यदर्शक असल्या पाहिजेत! वेळ वाचावा व भाषा सुबोध उतरावी, म्हणून वाचलेल्या इंग्रजी पुस्तकाचा सारांश आपण मराठीत तोंडी सांगावा व कारकुनाने तो लिहून घ्यावा, अशी लेखनाची सवय अनेक संपादकांना त्यांनीच लावली. आधी लेखन करून मग त्याला लांब लांब समावेशक मथळे द्यावयाचे, संस्कृतोद्भव संज्ञा तयार करावयाच्या, अनुक्रमणिकेत ग्रंथामधील मुद्दे घालावयाचे वगैरे संपादकीय कौशल्ये त्यांच्याकडून बहुतेक संपादकांनी अनुकरणाने उचलली. 'ज्ञानकोश विद्यापीठ' या नावाची विचारांची देवघेव करणारी संस्था नागपूरला असतानाच त्यांनी काढली होती आणि या संस्थेत पुण्याला आल्यापासून वीसपंचवीस व्याख्याने त्यांनी करवली होती. ही व्याख्याने, नित्य होणाऱ्या चर्चा आणि त्यांचे नवनवोन्मेषशाली पांडित्य यांमुळे संपादकवर्गाच्या विचारांना गती येई, ज्ञानात भर पडे आणि संपादकवर्गाची दृष्टी विशाल होई. ज्ञानकोशात काम केल्यामुळे वापट, चित्राव, दातार वगैरे सनातनी शास्त्री मंडळींना वेदांकडे बघण्याची नवी दृष्टी प्राप्त झाली आणि दाते, कर्वे वगैरेंना कोशरचनेच्या आपल्या भावी प्रयत्नांचा पाया भरता आला. केतकरांच्या हाताखाली दुय्यम संपादकांना असे विविध नि दुर्मीळ शिक्षण मिळाले, म्हणूनच त्यांच्यापैकी बहुतेक जण प्रथितयश पंडित नसताना पहिल्या प्रतीची कामगिरी ज्ञानकोशात बजावू शकले.[१]

१ डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे २३ ते ३१; ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ १३१, परिशिष्ट-पृष्ठे ५०, ५६.

केतकरांनी ज्ञानकोशात दिलेले शिक्षण घेऊन पुढे अनेक कोशांची ज्यांनी निर्मिती केली त्यांपैकीं रा. चिं. ग. कर्वे म्हणतात, की "डॉक्टरांपासून आर्थिक फायदा त्यांच्या सहकाऱ्यांस कितपत झाला हे सर्वांस सुविदितच आहे; तथापी ज्ञानाचा फार मोठा फायदा झाला आहे; व स्कॉलरशिपा घेऊन ज्याप्रमाणे विद्यापीठातून पदवीधर उच्च ज्ञानार्जन करतात, त्याप्रमाणेच आम्हांला दहाबारा वर्षे ज्ञानकोश-विद्यापीठात डॉ. केतकर यांच्यासारख्या पहिल्या प्रतीच्या विद्वानाच्या नेतृत्वाखाली विविध ज्ञानक्षेत्रांतून मनसोक्त विहार करण्यास मिळाला आहे. ही अमूल्य संधी फार थोड्यांना व तीही फार खटपटीने आणि त्रासाने लाभते. तेव्हा आमच्यांत जी काही थोडीफार संपादकीय विद्या आहे तिचे श्रेय आमचे आचार्य डॉ. केतकर यांनाच दिले पाहिजे व त्यांचीच परंपरा आम्ही चालवितो व आमच्यामागेही ती टिकून राहील याबद्दल खात्री वाटते."[१]

केतकर ज्ञानकोशासाठी इतर संपादकांबरोबर काम करीत होते, तेव्हा त्यांच्या व्यक्तित्वातील काही फुटकळ पण गमतीदार वैशिष्ट्ये अनेकांच्या नजरेत आपोआप भरत असत. ते प्रकांडपंडित होते नि साऱ्या कार्याचे सूत्रचालक होते; पण सहकाऱ्यांशी ते खेळीमेळीने नि मनमोकळेपणाने वागत. पांडित्याची किंवा अधिकाराची आढ्यता त्यांच्या वागणुकीत कधी दिसत नसे. उलट, संपादकीय व्यवस्थापक रा. दाते आपल्या गच्च मिशा नि उग्र चेहरा यांना साजेसे गुरकावणीचे बोलणे कधीकधी करीत नि संपादकवर्गावर दाब ठेवीत. दात्यांच्या वर्चस्वाची कक्षा क्वचित केतकरांपर्यंतही पोचे आणि 'केंद्रीय सरकारला प्रांतीय सरकार मोजीत नाही' असा देखावा कचेरीत उत्पन्न होई. केतकर रागावलेच तर एखादे वेळी रागावत नि मग मात्र एकदम फार गरम होत; पण त्यांचा राग निवण्यास वेळ लागत नसे. एकदा 'वेदविद्ये'वरील दुसरा विभाग प्रसिद्ध झाल्यावर त्यासंबंधी पुण्याच्या वसंत-व्याख्यानमालेत त्यांचे व्याख्यान झाले आणि त्यांच्या व्याख्यानातील काही भागाविरुद्ध दुसऱ्या दिवशी श्रौताचार्य बापटशास्त्री बोलले. तेव्हा बापटशास्त्र्यांना एक तारखेपासून कामावरून 'सस्पेंड' केल्याचा लेखी हुकूम त्यांनी काढला व बापटशास्त्री कचेरीत येताच तो त्यांच्या हातात ठेवला! बापटशास्त्र्यांनी ज्ञानकोशातील दुमत चव्हाट्यावर आणले, म्हणून ते इतके रागावले की रागावता रागावता रागाने ते लालबुंद झाले आणि आपल्या डाव्या हातावर इसबाचा जो चट्टा होता त्याला रागाच्या भरात ते दंश करू लागले! त्यांच्या हुकमामुळे बापटशास्त्र्यांची वृत्तीही स्थिर राहिली नाही आणि एक तारखेची वाट न बघता नोकरीवर पाणी सोडून ते तडक घराकडे निघाले. "ऋषींना तुम्ही हल्लीचे नारायणशास्त्री म्हणाला, वेदांना जुडगी म्हणाला, तर त्याबद्दल मला काहीच वाटू नये का?"—अशा अर्थाचे वैतागाचे उद्गार त्यांनी काढले. त्यांचे ते वैतागाचे उद्गार ऐकल्यावर मात्र केतकरांचा पारा चटकन उतरला आणि हुकूम तिथल्या तिथे फाडून सौम्य शब्दांनी बापटशास्त्र्यांना त्यांनी बसवून

१. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ २१.

घेतले. बापटशास्त्री कामाला लागेपर्यंत त्यांच्या टेबलाशी थांबून मगच ते दुसरीकडे गेले! असो. ज्ञानकोशाची पुण्याची कचेरी प्रथम फुटक्या बुरजाजवळ व नंतर भाऊ महाराजांच्या बोळात होती. तीमध्ये केतकरांची बसण्याची खास जागा असे. तेथे इतर संपादकांना चहासाठी ते अनेकदा बोलावीत नि बापटशास्त्र्यांबरोबर विडीचे झुरकेही मारीत. चहाबरोबर दोन पेढे, भाजलेल्या शेंगा आणि चिवडा किंवा भजी त्यांना प्रिय असत. त्यातल्या त्यात भजी ते जास्त पसंत करीत! सहकाऱ्यांना घरी बोलवावे, स्वैर गप्पा माराव्या, असाही त्यांना मधूनमधून उमाळा येई. त्यांच्या 'मडमममंडित' संसारात यायला सनातनी मंडळी बिचकत, मडमेने आपल्या या पगडीधारी पंडिताचा मुका घेतला तर ही मंडळी संकोचून जात, पण केतकर तिकडे दुर्लक्ष करीत. एखाद्या सोवळ्या शास्त्र्याला कँपातल्या कॅनॉट उपाहारगृहात नेऊन, तो शास्त्री शुचिर्भूतपणे बघत असता मांसयुक्त पदार्थांवर स्वतः ताव मारण्यातही त्यांना व्रात्य मौज वाटे. त्यांचे कोणाशी गटबाजीचे रहस्य नव्हते, कोणाशी प्रतिष्ठेची स्पर्धा नव्हती. साऱ्यांपुढे ते जसे होते तसे उघडेवाघडे, दिलखुलास नि ओबडधोबड होते.[१]

ज्ञानकोशासाठी काम करताना शेपन्नास संपादकांनी तयार केलेली टिपणे लक्षात ठेवणे व त्यांचा वेळेवर उपयोग करणे, हे काम फार महत्वाचे होते. काम वर्षानुवर्षे चालल्यामुळे एखाद्यावर स्वतःच केलेले टिपण स्वतः विसरण्याचा प्रसंग येणेही शक्य होते. पण संशोधन, मुद्रण, चालकमंडळातील कलह इत्यादींच्या रामरगाड्यात केतकरांच्या लक्षामध्ये साऱ्यांची टिपणे अचूकपणे असत. ग्रंथवाचनाच्या वेळी ग्रंथांचा सारांश न काढता, त्यांवर खुणा न करता, त्यांतला संदर्भ जरुरीच्या वेळी ते जसा बिनचूक काढीत, तशी टिपणांच्या चवडीतील हवी ती टिपणे त्यांना नेमकी निवडता येत. या बाबतीत ग. य. रा. दाते तेवढे त्यांची बरोबरी करू शकत. ज्ञानकोशासाठी प्रत्यक्ष लेखन केतकरांनी थोडे केले, पण जे केले ते आपल्या तऱ्हेला धरून केले. त्यांच्या टेबलावर अष्टमांश कागदाच्या कोऱ्या चिठ्या ठेवलेल्या असत. डोक्यात विचार आला, की तो विचार ते असल्या चिठीवर उतरून ठेवीत. पुन्हा विचार आला, की तो दुसऱ्या चिठीवर लिहिला जाई. अशा चिठ्यांनी टेबल चिताड भरे. मग मजकूर छापखान्याकडे देण्यापूर्वी या चिठ्या ते कारकुनाला लावायला सांगत, त्यांची संगती साधण्यासाठी मधूनमधून नव्या पुरवण्या जोडीत आणि या गोधडीपद्धतीने त्यांचा लेख तयार होई! एखाद्या वेळी दुय्यम संपादक त्यांच्याकडे येऊन विशिष्ट विषयावरील लेखाची आयत्या वेळी त्यांच्यापाशी मागणी करीत. मग ते खोलीत येरझारा घालू लागत, किंवा आरामखुर्चीवर पडून हातपाय पसरून डोळे मिटीत आणि लेख लिहून घेण्यास सांगत. नळ सोडला की पाणी पडावे, तसे माहितीपूर्ण विचार धोधो त्यांच्या तोंडून वाहात आणि अर्ध्याएक तासात लेख तयार होई! ज्ञानकोशातील साऱ्या संकलित ज्ञानावरसुद्धा

१ आठवणी, धुं. ग. बापट, आबा चांदोरकर.

स्वतःचा खास ठसा उमटावा अशी त्यांची इच्छा असे. त्यामुळे उपसंपादकांनी तयार केलेल्या लेखात मागेपुढे काही मजकूर घालून त्याचे स्वरूप ते बदलून टाकीत; क्वचित विसंगतीही उत्पन्न करीत. असाच मजकूर त्यांनी अकराव्या विभागातील 'काव्य' या लेखात घालून एक वादळ निर्माण केले. त्यात त्यांनी लिहिले, की "एकंदरीने पाहाता मराठीतील काव्यवाङ्मय म्हणजे उष्टे आणि भिकार होय, यात शंका नाही....आजपर्यंत झालेले मराठी वाङ्मय सर्व जळून गेले तरी जगाचे वाङ्मय या दृष्टीने काहीएक नुकसान व्हावयाचे नाही"![1]

ज्ञानकोशात मुळापासूनच केतकर दुहेरी भूमिका वठवीत होते. वास्तविक पाहाता, संपादकाचे काम नि व्यवस्थापकाचे काम ह्या दोन कामांत भिन्न प्रकारच्या गुणांची माणसाकडून अपेक्षा असते. पण आपल्या बहुरंगी व्यक्तित्वाच्या आधारावर केतकरांनी ती दोनही कामे पतकरली होती. परंतू संपादक नि व्यवस्थापक एवढ्या दोनच भूमिका शेवटपर्यंत ते वठवीत राहिले नाहीत. त्या भूमिकांनाही परिस्थितीप्रमाणे नि त्यांच्या स्वभावाप्रमाणे फाटे अन फरकाटे फुटत गेले. ज्ञानाचे संकलन करण्याचे जे ज्ञानकोशाच्या संपादकाचे मुख्य काम ते सोडून प्रस्तावनाखंडासाठी ते वैदिक संशोधनात शिरले नि त्यांच्या संपादकीय भूमिकेला संशोधकीय भूमिकेचा एक फाटा फुटला. व्यवस्थापक म्हणून त्यांची जी भूमिका होती तिला धरून ज्ञानकोश-मंडळातील कटकटी त्यांनी मिटवल्या किंवा मंडळाच्या उभारणीची नि पुण्यामुंबईला त्याच्या शाखा काढण्याची व्यवस्था केली, हे ठीक झाले. पण त्यांच्या व्यवस्थापकीय भूमिकेलाही पुढे अनेक फांद्या आल्या. ज्ञानकोशावर प्रकाशक म्हणून रीतीप्रमाणे आपले नाव टाकून, किंवा त्याच्या मुद्रणाची व विक्रीची इतरांकडून सोय लावून ते थांबले नाहीत, तर ज्ञानकोशासाठी ते स्वतःच मुद्रक बनले आणि प्रत्यक्ष ग्रंथ खपविणारे विक्रेतेही झाले! १९२२ च्या सुमारास ज्या वेळी वैदिक संशोधन संपले आणि संपादकीय कामाची समाप्ती दृष्टिपथात आली त्या वेळी ते मुद्रक कसे बनले तो वृत्तान्त त्यांच्या कार्यशक्तीवर व बहुरंगी व्यक्तित्वावर वेगळाच प्रकाश टाकणारा आहे :

ज्ञानकोशाचा एकेक विभाग मुद्रणासाठी जसजसा तयार होत होता तसतशी मुद्रणाची एक मोठी आपत्ती आपले अक्राळविक्राळ तोंड वासून केतकरांच्या जवळजवळ येत चालली होती. १९१५ साली ज्ञानकोशाची कल्पना प्रथम निघाली, तेव्हा त्यांनी 'टाईम्स ऑफ इंडिया'कडे मुद्रणाबद्दल काही चौकशी केली होती आणि 'टाईम्स'च्या मुद्रणप्रमुखाने पाचशे पृष्ठांचे वीस विभाग एका वर्षात छापून देण्याची तयारी दर्शविली होती. त्यामुळे मुद्रण ही एक यांत्रिक नि सहजसुलभ गोष्ट आहे, अशी त्यांची समजूत झाली होती. पण मुद्रणाचा प्रत्यक्ष प्रसंग आला तेव्हा त्यांच्या या समजुतीला भयंकर

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ १६२; लोकशिक्षण, मे-जून १९३७, शीलवती केतकर; आठवणी, आबा चांदोरकर; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे २८, ५०.

धक्का बसला. नोव्हेंबर १९१९ मध्ये निर्णयसागर छापखान्यात पहिला विभाग छापण्यास गेला; पण निर्णयसागरने छपाईस इतकी दिरंगाई केली, की तो भाग वाचकांच्या हाती पडण्यास १९२१ चा फेब्रुवारी महिना उजाडला! दुसरा विभागही निर्णयसागरनेच छापला; पण या वेळी आधी पैसे चुकते केल्याशिवाय पुस्तके देण्याचे नाकारले! पाच हजार रुपये देऊनही काही प्रती न सोडण्याचा आडमुठेपणा निर्णयसागर करू लागला, तेव्हा प्रकरण सॉलिसिटरांपर्यंत गेले आणि मग काही तडजोड निघाली. तिसरा विभाग आर्यभूषण छापखान्याकडे टाकला होता; पण आर्यभूषणनेही निर्णयसागरचाच कित्ता गिरवला. १९२१ च्या ऑक्टोबर महिन्यात आर्यभूषणने छपाईस घेतलेला तिसरा विभाग २२ जानेवारी १९२४ रोजी पुरा केला! "सर्वांत गचाळपणे काम करणारा, दर बराच घेणारा आणि कामात दिरंगाई करणारा छापखाना म्हटला म्हणजे आर्यभूषण होय" असे प्रशस्तिपत्र कोपाविष्ट होऊन केतकरांनी आर्यभूषणला दिले आहे. मुंबईच्या कर्नाटक छापखान्याने सहाव्या विभागाची २३२ पृष्ठे छापली; पण ती छापण्यास त्यानेदेखील चार महिने घेतले! शिवाय, तेथे छपाई चालू असता छपाईस अंतिम अनुमती देण्यासाठी केतकरांना किंवा रा. दाते यांना मुंबईस राहावे लागे. अशा रीतीने छापखानदारांनी विलक्षण विलंब लावल्यामुळे ज्ञानकोशाचे प्रकाशन तर लांबणीवर पडत चाललेच, पण केतकर पैशाच्याही बिकट पेचात सापडले.—आणि पैशाचा पेच हीच मुद्रणाला लागलेल्या विलंबामधून उद्भवलेली खरीखुरी आपत्ती होती.[1]

मुद्रणाला विलंब लागला तरी संपादकवर्गाला कामावरून काढून टाकणे केतकरांना शक्य नव्हते; कारण मुख्य संपादन जरी संपत आले होते तरी एवढ्या मोठ्या ग्रंथावर मुद्रणपूर्व संस्करणे करण्यासाठी संपादकवर्गाची जरुरी होती. शिवाय, अनेक छापखान्यांतून जेव्हा नि जशी उपमुद्रिते येतील तेव्हा ती तशींच तपासून देणे भाग होते. नाहीतर छापखानदारांनी ओरड केली असती नि विलंब वाढतच गेला असता. त्यामुळे सगळाच्या सगळा संपादकवर्ग त्यांना कामावर ठेवावा लागला आणि छापखान्यांकडून काम न आल्याने जेव्हा हा संपादकवर्ग मोकळा पडला तेव्हा त्याला काहीतरी नवे काम काढून गुंतवून ठेवावे लागले. दुसऱ्या नि विशेषतः तिसऱ्या विभागातले वैदिक संशोधन अशा परिस्थितीतच विस्तारत गेले आणि महाराष्ट्राला एका अपूर्व विद्याकार्याचा लाभ घडला. पण संपादकवर्ग टिकविण्याच्या खटाटोपात वैदिक संशोधन होऊन केतकरांच्या रथाचे एक चाक स्वर्गापर्यंत उंच गेले, तरी त्या संपादकवर्गाला द्याव्या लागणाऱ्या मासिक वेतनापायी त्यांच्या रथाचे दुसरे चाक भुईत रुतून पाताळापर्यंत खोल गेले. रथ उलटापालटा होण्याची पाळी आली! संपादकांना दरमहा सुमारे अडीच हजार रुपये वेतन द्यावे लागे आणि मूळ कल्पनेत त्या वेळचे त्यांचे काम धरलेले नसल्याने तो जवळजवळ सारा तोटाच होई. छपाई रेंगाळल्यामुळे एकूण पंचाहत्तर हजार रुपयांच्या

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ९० ते ९५, ७६.

आसपास ज्ञानकोशाचा तोटा झाला!—आणि तो तोटा अंशतः भरून काढण्यासाठी ज्ञानकोशाची किंमत दर संचामागे १५७ रुपयांवरून १७७ रुपयांवर न्यावी लागली! "गचाळ छापखानदार आपल्या कामाची दिरंगाई करून प्रकाशकांस कसे भिकेस लावतात, याचे उदाहरण ज्ञानकोश होय" असे वैतागाचे उद्गार केतकरांनी काढले आहेत. मुद्रणाच्या या अकाळविकाळ आपत्तीने ज्ञानकोश-मंडळाला गिळंकृत करण्याची पाळी आणली, तेव्हा विलक्षण धडाडी नि असीम आशावाद यांच्या बळावर केतकरांनी तीमधून आपली सुटका करून घेतली. क्षणभर आपल्या अंगावरची विद्वत्तेची महावस्त्रे त्यांनी उतरून ठेवली, व्यवस्थापकाचे उच्च पद सोडून दिले आणि ते स्वतःच मुद्रक बनले![1]

निर्णयसागर व आर्यभूषण यांचा रंग बघितल्यावर स्वतःचाच छापखाना काढण्याची धाडसी कल्पना त्यांच्या डोक्यात घोळू लागली. पण स्वतःचा छापखाना काढावा, हे चालकमंडळाला पटत नव्हते. "डॉ. केतकर यांस पगार मिळतो तो छापखानदार म्हणून मिळत नाही. त्यांची छापखानदार या नात्याने किंमत मोठी नाही. त्यांनी आपल्या उत्साहाचा दुरुपयोग करण्याचे कारण नाही."—अशी प्रामाणिक मते चालकांच्यामध्ये वावरत होती. काहींनी असेही प्रतिपादन केले, की 'ग्रंथाला उशीर होण्याचे खापर आज छापखानदारांच्या माथ्यावर तरी फोडता येते; पण उद्या स्वतःचा छापखाना काढून उशीर झाला तर ते खापर कोणाच्या माथ्यावर फोडणार?' चालकांची ही मते काही केल्या वळेनात; तेव्हा चालकांना न विचारताच एप्रिल १९२२ मध्ये, पाडव्याच्या मुहूर्तावर, त्यांनी 'ज्ञानकोश छापखाना' धडाकून चालू केला! हा छापखाना नोंदला होता आणि प्रथम तेथे फक्त जुळणी होऊन मुद्रण जगद्धितेच्छू छापखान्याकडे केले जाई. छापखाना चालू केल्यावर त्यांनी सप्टेंबरमध्ये एक पत्रक काढून ग्रंथप्रसिद्धीला झालेल्या विलंबाचे स्पष्टीकरण केले आणि भागिदारांना व वर्गणीदारांना विश्वासात घेतले. पुढे मुद्रणासाठी यंत्र घेण्याचाही त्यांनी चंग बांधला. त्या वेळी त्यांच्या खिशात फक्त शंभर रुपये होते; पण तेवढे आगाऊ भरून चार हजार रुपयांच्या यंत्राची त्यांनी मागणी केली! अनेक मित्रांच्या मदतीने यंत्राची किंमत मागाहून त्यांनी चुकती केली. छापखान्याला पुस्तकबांधणीच्या विभागाचीही त्यांनी जोड दिली होती. अशा रीतीने 'ज्ञानकोश छापखाना' मुख्य अंगांनी सुसज्ज झाला आणि मुद्रणाचा बखेडा एकदम संपला. १९२२ पासून पुढे, जुळणीस प्रारंभ झाल्यानंतर, मुद्रण अत्यंत नियमित नि जलद होऊ लागले. १९२३ मध्ये चौथा व पाचवा हे दोन विभाग प्रकाशात आले आणि १९२४ मध्ये सहा ते अकरा हे सहा विभाग प्रसिद्ध झाले. यापुढे, प्रश्न काय तो झालेला आर्थिक तोटा भरून काढण्याचा राहिला. त्याकडे नंतरच्या काळात केतकर जोराने वळले आणि अविश्रांत श्रम करून तो प्रश्नही त्यांनी बव्हंशी सोडवून टाकला.[2]

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे १३६, १८३-१८४, ९३ ते ९५, १४७ ते १५०.
२. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ १४७, प्रकरण ६ वे; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ४४; 'ज्ञानकोश-मंडळ', विद्यासेवक, सप्टेंबर १९२४.

महाराष्ट्रासारख्या गरीब प्रदेशात ज्ञानकोशासाठी पैसा उभा करणे हे काम मुळातच कठीण होते. त्यातून १९२१ साली, व्यवस्थापक म्हणून आपली नेमणूक झाल्यानंतर श्री. जकातदारांनी काहीच हालचाल न केल्यामुळे भागिदारीचे किंवा वर्गणीचे पैसे येणे फार मंदावले होते. तशात मुद्रणाला विलंब लागला व हजारो रुपयांचा फटका बसला. अर्थात पैसे-उभारणीचे काम एकीकडे अधिकच कठीण झाले आणि दुसरीकडे फार निकडीचेही होऊन बसले. केतकर म्हणतात, की "मुद्रकांचे बेजबाबदार वर्तन आणि आमच्यामध्ये निश्चित सत्तेचा एक वर्षपर्यंत अभाव, यामुळे भरभराट असलेल्या कंपनीस फारच मोठा धक्का बसला. या धक्क्यामुळे कंपनी बुडण्याची वेळ आली होती." पैसे-उभारणीचा हा दिवसेंदिवस उग्र होत गेलेला प्रश्न सोडविणे हे व्यवस्थापक या नात्याने केतकरांचेच कर्तव्य होते. ज्ञानकोश निघाल्यापासूनच भागिदार मिळवून व वर्गणीदार जमा करून ते पैसा गोळा करीत होते आणि त्यामुळे १९२१ सालापर्यंत मंडळातील पगाराचा दिवस कधी चुकत नव्हता. पण पुढे परिस्थिती पालटली आणि पगार वेळेवर होईनात व झालेच तर ते पुऱ्या रकमेने होईनात. तेव्हा, संशोधन नि संपादन यातून मधूनमधून सवड काढून त्यांनी पैसा उभारण्याची एक मोहीमच सुरू केली.[१]

ज्ञानकोश-मंडळ ही 'मर्यादित मंडळी' किंवा 'लिमिटेड कंपनी' असल्यामुळे एक तर भागभांडवल वाढवून पैसे उभारणे शक्य होते, अथवा माल खपवून, म्हणजेच ज्ञानकोशासाठी वर्गणीदार मिळवून पैसे उभारणे शक्य होते. पैसे-उभारणीचे हे दोन्ही मार्ग केतकरांनी हिरिरीने आक्रमण केले. ज्ञानकोशाचे संपादकीय कार्यालय नागपूरला असताना मंडळाचे भागभांडवल पन्नास हजारांवरून एक लाखापर्यंत वाढविण्यास सरकारची परवानगी मिळाली होती आणि कार्यालय पुण्याला आल्यावर, १९१९ साली, मंडळाची जी सर्वसाधारण सभा झाली तीत मंडळाचे भांडवल एक लाख करण्याला भागिदारांनी संमती दिली होती. त्यानंतर, १९१९ ते १९२४ या पाचएक वर्षांच्या काळात केतकरांनी नवे पाचशेच्या पाचशे भाग खपविले व भागभांडवल मिळवण्याची मर्यादा गाठली! ज्ञानकोशासाठी वर्गणीदार मिळविण्याचे कार्यही त्यांनी त्याच तडफेने पार पाडले. एकूण सुमारे तीन हजार संच खपले, त्यांपैकी एक ते दीड हजार संच एकट्या त्यांनी खपविले! १९१९ च्या मार्चपर्यंत एकूण एक हजार संच खपले होते; तो आकडा १९२४-२५ साली अठ्ठावीसशेवर गेला. म्हणजे पुण्याच्या पहिल्या पाचसहा वर्षांत सतराशे ते अठराशे संच खपविण्याची त्यांनी व्यवस्था केली आणि छापलेल्या तीन हजार संचांच्या विक्रीची सारी काळजी जवळजवळ मिटवून टाकली! संचाची किंमत वेगवेगळ्या वेळी दीडशे-पासून पावणेदोनशे रुपयांपर्यंत होती हे लक्षांत घेतले, की एकट्याने एकदीड हजार संच खपविणे ही किती अवघड गोष्ट होती, याची कल्पना येते. पण एकेका कर्तबगार

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ८९, १८५-१८६.

पुरुषाची कर्तबगारी आटवून टाकील असे संपादनाचे किंवा संशोधनाचे काम एकीकडे उरकून, केतकरांनी वर व्यवस्थापकाचे काम पार पाडले आणि त्यात चालकमंडळामधील कटकटींना तोंड देऊन, भागिदार जमा करून, छापखाना काढून, शिवाय ग्रंथविक्रीचा एवढा मोठा खटाटोप केला. त्यांनी कामाचा हा जो आवाका नि झपाटा दाखविला तो केवळ विलक्षण होता. जणू त्यांच्या अंगात अनेक बृहस्पतींचा नि बलभीमांचा संचार होऊन ते असंख्य डोक्यांनी नि हातापायांनी या काळात काम करीत होते![1]

ग्रंथविक्रीसाठी हिंडणे आणि पुष्कळ अंगमेहनत करणे हे हलकेपणाचे लक्षण होय, अशी त्या काळात पांढरपेशा महाराष्ट्रीय समाजात समजूत होती. पण ही समजूत केतकरांनी लाथाडून दिली. आपली पाश्चात्य पदवी व वैदिक पांडित्य ही ज्ञानकोशाच्या गळाठ्यासह खाकोटीस मारून किंवा हेलकऱ्याच्या डोकीवर देऊन ते प्रचारानिमित्त दारोदार हिंडत असत आणि आगगाडीत ज्ञानकोशाची हस्तपत्रके खुशाल वाटीत असत. मुंबईला असताना ते अनेकदा सकाळी आठ वाजता जे ज्ञानकोशाच्या विक्रीसाठी घराबाहेर पडत ते तेराचौदा तास अखंड पायपीट करून रात्री दहा वाजता घरी परतत. मग जेवणाच्या वेळी ज्या भागात ते असतील त्याच भागात एखाद्या इराणी, गोवानीज, पारशी किंवा ब्राम्हणी विश्रांतिगृहात ते धावतपळत 'विश्रांती' घेत. उन्हाची वा पावसाची त्यांना पर्वा नसे. एकदा तर त्यांचे सारे कपडे भिजले आणि मित्राच्या घरी शेगडीवर वाळवून ते परत अंगावर घालण्याचा त्यांना प्रसंग आला. ज्ञानकोशाच्या विक्रीसाठी महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यातून त्यांनी अनेक हेलपाटे मारले. ज्ञानकोशाचे गिऱ्हाईक म्हणून महाराष्ट्रीय मध्यमवर्गावर त्यांची फार भिस्त होती. या वर्गाला ज्ञानकोशाची खरोखर गरज आहे, असा त्यांचा कयास होता; आणि तो त्यांनी घर घर टिपून खरा करून दाखविला. कारण ज्ञानकोशाचे सुमारे पन्नास संचच काय ते बडोदे, इंदूर, सांगली इत्यादी ठिकाणच्या राजेरजवाड्यांनी घेतले, पण बाकीचे अडीच हजार संच सामान्य घरांतून नि ग्रंथालयांतून खपले. त्यांच्या हिशेबाप्रमाणे "शंभर रुपयांपैकी दीड-पावणेदोन रुपयांची मदत या राजेरजवाडयांकडून झाली." तेव्हा शीलवतीबाई जरी राजेरजवाड्यांकडे गेल्या, तरी ते स्वतः सामान्य जनतेत फिरले. पहिल्या प्रतीच्या वर्गणीदारांतील पहिले वर्गणीदार रा. विष्णू विनायक परांजपे हे एक भिक्षुक होते आणि त्यांच्यानंतरचे वर्गणीदार स्वामी आत्मानंद सरस्वती हे एक संन्यासी होते, ही गोष्ट त्यांना "फार उत्तेजक" वाटली. ते म्हणतात, "यानंतर पुढे मी पुष्कळ ग्राहक केले, एका दिवसात सात-सातपर्यंत ग्राहक मिळविले आहेत; पण विष्णुशास्त्री [परांजपे] पुराणिक यांच्या वर्गणीदार होण्याने जो आनंद झाला तो मी पुढे कधीच विसरलो नाही!" ग्रंथविक्रीसाठी घरोघर हिंडून नि मध्यमवर्गावर ग्राहक

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ७१, ९८, १८४; 'ज्ञानकोश-मंडळ', विद्यासेवक, नोव्हेंबर-डिसेंबर १९२४ (जोड अंक); इत्यादी.

म्हणून भिस्त ठेवून त्यांनी ज्ञानप्रसाराच्या क्षेत्रात एक नवा पायंडा पाडून ठेवला.[१]

विद्यार्थिदशेमध्ये अमेरिकेत असताना त्यांनी घरोघर माल खपवण्याचा जो अनुभव घेतला होता तो या वेळी त्यांच्या कामास आला आणि 'मालखपव्या'ची भूमिका त्यांनी उत्कृष्टपणे वठवून दाखविली. ट्रॅममधील क्षणभंगुर समाजाशी किंवा आगगाडीमधील औट घटकेच्या सोबत्यांशी ते तत्काळ समरस होत. कोठेही त्यांच्या गप्पांचा अड्डा पडे आणि कोणाशीही कोणत्याही विषयावर ते काहीतरी विचारप्रवर्तक बोलणे काढीत. त्यांच्या बोलण्याला रुबाब नसे; पण चारदोन वाक्यांत असा एखादा नवा मुद्दा ते उपस्थित करीत, की ऐकणाराने चकित व्हावे. विपुल माहिती, सूक्ष्म निरीक्षण नि नवे लोकविलक्षण विचार यांमुळे त्यांचे संभाषण आकर्षक होई. ज्ञानकोशाचा हा संपादक स्वतःच चालताबोलता ज्ञानकोश आहे, याची श्रोत्यांना खात्री पटे आणि ज्ञानकोश खरेदी करण्याकडे त्यांच्या मनाचा कल होई. डोक्याला कधी पुणेरी पगडी आहे, कधी पटका आहे, तर कधी वाढते टक्कल उन्हात तळपत आहे, अंगावर पुणेरी किंवा पाश्चात्य वेष गबाळपणे पेहेरला आहे, अशी केतकरांची श्रान्त पण आनंदी मूर्ती डुलत एखाद्या घरात शिरली, की लागलीच तेथे परिचितपणाचे मोकळे वातावरण उत्पन्न होई. हुश्श करीत ते म्हणत, "मी डॉक्टर केतकर. ज्ञानकोश खपवण्यासाठी आलो आहे. बरं, मला चहा पाहिजे बुवा! बिनसाखरेचा बरं का!"—आणि आपल्या चतुर बोलण्याने गिऱ्हाइकाच्या गळ्यात हमखास ज्ञानकोश बांधून ते थोड्या वेळाने घराबाहेर पडत. विनोद नि युक्तिवाद यांनी गिऱ्हाइकी कशी पटवावी, यात ते फार वाकबगार होते. हप्त्याने पैसे घेऊन ज्ञानकोश खरेदी करण्याची सोय असे; पण पहिला हप्ता भरला की बाकीचे हप्ते भरण्याची जबाबदारी वर्गणीदारावर पडे. अशा वेळी, दीडदोनशे रुपयांचे हप्ते भरण्याची जबाबदारी घेताना मध्यम स्थितीतले वर्गणीदार कचरू लागत. तेव्हा केतकर म्हणत, 'अहो तुम्ही लग्न केले तेव्हा बायकोला जन्मभर पोसण्याची जबाबदारी पतकरलीत की नाही? बायकोलाच काय पण मुलाबाळांना पोसण्याची जबाबदारीही पतकरलीत. लग्न करताना जबाबदारीचा एवढा विचार केला होतात का? तरीही आता जबाबदारी नीटपणे पार पाडता ना? मग ज्ञानकोशाचे पुढचे हप्ते भरण्याबद्दल एवढा विचार कशाला? आता पहिला हप्ता भरा, पुढची जबाबदारी तुम्ही सहज पार पाडाल!' काही लोक केतकरांना असा प्रश्न करीत, की एवढा मोठा ग्रंथ घेऊन त्याचा मुलांच्या शिक्षणाला काही उपयोग आहे का? त्यावर ते उत्तर देत, 'मुलांना इंग्रजी कोश बघणे शक्य नसते, म्हणून मराठी ज्ञानकोश हवा. शिवाय, व्याख्यान किंवा पुराण ऐकण्यास मुलांना बसविले, तर तेव्हा त्यांची जिज्ञासा जागृत असतेच असे नाही. त्यामुळे ते त्यांच्या कानावरून

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ९९ ते १०१; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ४४; आठवणी, चिं. वि. जोशी; मा. त्र्यं. पटवर्धन, प्रतिभा, जुलै १९३७.

निष्फळ वाहून जाते. पण जिज्ञासा जागी झाली नि त्या वेळी ज्ञानकोश हाताशी असला तर आपली जिज्ञासा मुलांना सहज तृप्त करता येईल आणि जिज्ञासा-जागृतीच्या क्षणी मिळालेले ज्ञान त्यांच्या मनावर चांगले बिंबेल.' असा प्रकारे नाना युक्तिवाद, नाना विनोदचतुर बोलणी करीत महाराष्ट्रभर त्यांनी ज्ञानकोशाचा प्रचार केला. काही लब्धप्रतिष्ठितांना गाठीचा पैसा सोडण्याची इच्छा नसे, पण 'ज्ञानकोश आपणाला नको' असे स्वच्छ सांगण्याचे धैर्यही नसे. असे लोक ज्ञानकोशाच्या कारभारावर खोटेनाटे आरोप करीत. पण न चिडता, मनस्ताप करून न घेता केतकर तिकडे दुर्लक्ष करीत. आपली विक्रयकला या वेळी त्यांनी जणू पणाला लावली होती. विद्या-व्यवसायी वर्गात तर त्यांनी ज्ञानकोश खपविलाच, पण उपाहारगृहाचे एक मालक, वॉशिंग कंपनीचे एक मुसलमान चालक आणि एका केशकर्तनालयाचे धनी यांनाही ग्राहक बनविले! पुढे महंमदावरील लिखाणावरून ज्ञानकोशाविरुद्ध मुसलमानांनी मोठी चळवळ केली. पण ज्ञानकोशाच्या निषेधार्थ भरलेल्या मुसलमानांच्या एका सभेच्या अध्यक्षांनाही त्यांनी ज्ञानकोशाचे वर्गणीदार केले![1]

केतकरांनी ज्ञानकोशाचे काम काढले आणि त्यात स्वतः विक्रेत्याचे काम केले, त्यामुळे महाराष्ट्रातील काही सुशिक्षितांना ग्रंथविक्री करण्याची एक चांगली संधी नि संथा मिळाली. ज्ञानकोशाची विक्री करणाऱ्या प्रचारकांत श्री. वासुदेवराव चितळे व श्री. विष्णुबुवा अक्कलकोटकर हे दोघे प्रमुख होते. शिवाय संपादकवर्गापैकी रा. दाते, रा. भावे, रा. कर्वे, रा. चांदोरकर, श्रौताचार्य बापट, सेनापती बापट वगैरेंनाही केतकरांनी विक्रीसाठी पाठविले आणि या मंडळींनी विक्रीचे चांगले काम केले. शीलवतीबाईंनी लग्नानंतर संपादकाचे काम सोडले, पण प्रचारकाचे काम करून ज्ञानकोशाला पाचएक हजार रुपये मिळवून दिले. ज्ञानकोशाच्या यशात या साऱ्या प्रचारकांचा जो महत्वाचा वाटा होता त्याची केतकरांना चांगली जाणीव होती. पाचशेहून अधिक संच खपविणाऱ्या चितळ्यांबद्दल व अक्कलकोटकरांबद्दल ते म्हणत असत, की "एक क्यानव्हसर मिळवणे म्हणजे अनेक महाराज मिळवणे आहे. या दोघांना ज्ञानकोशास पन्नास हजार रुपये मिळवून देण्याचे श्रेय आहे; तर आमच्या दृष्टीने हे मोठे की संस्थानिक मोठे!!"[2]

ज्ञानकोश हे केतकरांच्या जीवनातील एक महत्वाचे कार्य होते आणि ते कार्य एकदा सुरू झाल्यावर त्यात केतकर इतके अडकले, की त्यामधून बाहेर पडणे त्यांना शक्यच राहिले नाही. पण त्यांचा स्वभाव नव्या कल्पनांना जन्म देणारा नि त्या कल्पनांमागे वेडावून धावणारा असा होता. त्यामुळे ज्ञानकोश जरी त्यांनी नेटाने पार

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे १०१-१०२; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे ४५ ते ४७; नी. म. केळकर, आ. रा. देशपांडे, प्रतिभा, जुलै १९३७; बॅ. घोपेश्वरकर, महाराष्ट्र, २५ एप्रिल १९३७; स्पष्टवक्ता, यशवंत, मे १९३७; आठवणी, आबा चांदोरकर.
२. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे ९८, १०३, १०४.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम .................... विः ..............

पाडला तरी ज्ञानकोशकाराच्या भूमिकेत अनन्य निष्ठेने ते सदैव रमू शकले नाहीत. नागपूरहून पुण्याला आल्यावर ज्ञानकोशाच्या कामाचे डोंगर त्यांनी शंभर हातांनी उपसले, पण त्या वेळीही नव्या कल्पनांना जन्म देण्याचा व त्यांच्यामागे धावण्याचा त्यांच्या मनाचा खेळ मधूनमधून चालू होता. अशा वेळी, ज्ञानकोशकाराची आपली भूमिका ते तात्पुरती विसरत आणि राष्ट्राच्या विविध अंगांना मार्गदर्शन करून चालना देणारी ज्ञानकोशाच्या आधीची आपली राष्ट्रगुरूची भूमिका पतकरत. मात्र लौकरच आपल्या मुख्य भूमिकेचे स्मरण होऊन ते ताळ्यावरही येत; नव्या कल्पनेत फार खोलवर शिरत नसत. १९२० च्या सुमारास ते किंचित्काल राजकारणी म्हणून झळकले किंवा १९१९ ते १९२४ या कालात ज्ञानकोशाव्यतिरिक्त इतर काही उद्योग त्यांनी करून बघितले ते या कारणानेच होत.

१९२० च्या सुमारास राजकारणात पडण्याची एक हुक्की त्यांना आली होती. त्या साली काँग्रेस-डेमोक्रॅटिक-पक्षातर्फे पुणेनगराच्या वतीने मुंबई-कौन्सिलच्या निवडणुकीसाठी त्यांनी उमेदवार म्हणून आपले नाव जाहीर केले. त्यांच्याबरोबर श्री. न. चिं. केळकरांचे नावही जाहीर झाले होते आणि लो. टिळकांच्या निधनापर्यंत या दोघांपैकी कोणाचे नांव नक्की करावयाचे ते ठरले नव्हते. पण पुढे, मुळची हुक्की थंडावल्यानंतर, केतकरांच्या हे ध्यानी आले, की आपण राजकारणात पडल्यास ज्ञानकोशाच्या कार्याची फार हानी होईल. तेव्हा त्यांनी आपली उमेदवारी मागे घेतली ! या सुमारास 'पुणे-नगर-परिषद्' या नावाची एक संस्थाही त्यांनी काढली होती आणि या संस्थेच्या जोरावर आपण निवडणूक जिंकावी, अशी त्यांची मनीषा होती. 'पुणे १९३०' या नावाची, दहा वर्षांत पुण्यात करावयाच्या सुधारणा दाखविणारी एक योजना या संस्थेमार्फत त्यांनी प्रसिद्ध केली होती. 'नगरसंवर्धन आणि नगरसौंदर्य' या विषयाबद्दल अमेरिकेत त्यांनी ज्या कल्पना ग्रहण केल्या होत्या त्या कल्पना या योजनेत त्यांनी पुण्याला लागू केल्या असाव्या. पुणे-नगर-परिषदेचे काम सौ. केतकरांच्या 'स्त्रीकर्मसदना'त चालून परिषदेकडून सदनाला काही भाडे मिळावे, प्रवर्तक म्हणून स्वतःकडे परिषदेचे सर्वाधिकार असावे, इत्यादी त्यांच्या कल्पना होत्या; पण परिषदेच्या इतर कार्यकर्त्यांना त्या पसंत न पडल्याने थोड्याच काळात या परिषदेचा अवतार आटोपला ! १९२० साली लो. टिळकांचे निधन झाल्यानंतर, राष्ट्राच्या राजकारणाचे कसे होणार, ही चिंता इतर अनेकांप्रमाणे केतकरांनाही लागली होती. तेव्हा लो. टिळकांची जागा घेऊ पाहाणाऱ्या म. गांधींना त्यांनी एक खलिता पाठविला आणि राजकारणाविषयी काही सूचना केल्या.[१]

शीलवतीबाईंना समाजसेवेचे एक क्षेत्र उघडून द्यावे म्हणून लग्नानंतर 'स्त्रीकर्म-सदना'चा प्रयोग करून त्यात बाराशे रुपये त्यांनी कसे घालविले, ते पूर्वी सांगितले आहे. 'स्त्रीकर्मसदना'प्रमाणे 'समाजशास्त्रमंडळ' या संस्थेतही ते थोडेफार अडकले होते. १४ मे १९२० रोजी, म्हणजे त्यांच्या लग्नाच्या दिवशी, इतिहासाचार्य राजवाडे यांनी

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ८७, परिशिष्ट-पृष्ठे १०५,११२,११३,१२२; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे ७५,७८.

ज्ञानकोश-कार्यालयात या समाजशास्त्रमंडळाची स्थापना केली. समाजशास्त्रीय विषयावर इंग्रजीत अत्यल्प व मराठीत शून्य वाङ्मय असल्यामुळे समाजशास्त्राचा अभ्यास करणारा वर्ग उत्पन्न करावयाचा आणि समाजशास्त्रीय वाङ्मयाचा पाया मराठीत घालावयाचा, असा या मंडळाचा उद्देश होता. या मंडळात श्री. तात्यासाहेब मेहेंदळे, प्रा. दत्तोपंत पोतदार, श्री. स. मा. दिवेकर, श्री. य. रा. दाते, श्री. रा. शं. राजवाडे, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे आणि केतकर असे प्रारंभीचे सभासद होते आणि केतकर व दाते यांच्या गळ्यात कार्यवाहपद पडले होते. इतिहासाचार्य राजवाड्यांनी दर पाक्षिक सभेत समाजशास्त्रीय निबंध दोन वर्षेपर्यंत वाचावयाचे आणि ते मंडळाने प्रकाशित करावयाचे असा मूळ बेत होता. परंतू चारपाच बैठकीनंतर राजवाडे निबंध आणीनात, स्वतःही येईनात आणि वाचलेले निबंध जाग्यावर ठेवीनात! आपले निबंध ते आपणाबरोबर घेऊन जात! तेव्हा, ज्ञानकोशाच्या पहिल्या विभागात यावयाची केतकरांची काही प्रकरणे मंडळात वाचली गेली. पण ती लौकरच ज्ञानकोशात येणार असल्याने त्यांत गोडी लागेना. इतरही कोणी निबंध लिहून वाचीना. तेव्हा, अखेर सदस्यत्वाची प्रत्येकी अडीचशे रुपये वर्गणी ज्याची त्यास परत देऊन मंडळ सुमारे दीड वर्षाने मोडण्यात आले! समाधान एवढेच, की 'स्त्रीकर्मसदना'प्रमाणे या प्रयोगात केतकरांच्या पदराला चाट बसली नाही.[१]

नागपुरापासून 'चातुर्वर्ण्य-संरक्षक-पीठा'ची एक कल्पना त्यांच्या डोक्यात होती आणि चातुर्वर्ण्याच्या गोंडस नावाखाली जातींचे उच्चाटन करण्याचा त्यांचा धाडसी बेत होता त्याप्रमाणे, पुण्याला आल्यावर पेंडसेवाड्यात एक कारकून ते खाजगीकडे अर्धा वेळ नोकरीला ठेवणार होते आणि त्याला आपल्या पीठाच्या पत्रव्यवहाराला जुंपणार होते. या कारकुनाला परदेशातील निरनिराळ्या रंगांच्या कारखानदारांकडे पत्रव्यवहार करण्याचे जोडकामही द्यावयाचे होते! पण त्या पीठाचे नि त्या रंगांचे खूळ त्यांच्या डोक्यातून पुढे निघून गेले. परदेशातील रंगांच्या कारखानदारांकडे ते कसली चौकशी करणार होते नि कसला उद्योगधंदा काढणार होते, ते ईश्वर जाणे![२]

एकदा त्यांच्या ओळखीचे आफ्रिकेत राहणारे एक एंजिनियर त्यांच्याकडे आले व आफ्रिकेत घायपाताचे मोठेमोठे मळे असतात, अशी बातमी त्यांनी त्यांना दिली. तेव्हा 'येथेही भिकार जमिनीवर घायपाताची लागवड कां करू नये?' असा विचार करून त्यांनी मुठा-कालव्याच्या बाजूच्या घायपाताची व सिंहगडजवळच्या जमिनीची पाहाणी केली. या पाहाणीनंतर आपल्या 'आशास्थाना'सभोंती घायपाताची लागवडही त्यांनी करून बघितली!"[३]

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ८७, ८८, परिशिष्ट-पृष्ठे ५६, ५७; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ७६.

२. य. पां. मेहेंदळे, महाराष्ट्र, २५ एप्रिल १९३७.

३. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ८२.

केतकरांचे समाजामध्ये होणारे वर्तन सर्वसाधारणपणे दिलदार, मनमिळाऊ आणि कर्त्या सुधारकाला साजेसे धिटाईचे असे. पण क्वचित प्रसंगी ते असे काही वागत, की त्यांचे वर्तन म्हणजे एक न उकलणारे विनोदी कोडे होई. ज्ञानकोशकाराच्या थोर भूमिकेशी तर त्याची मुळीच सांगड पडत नसे. आपल्या मुलखावेगळ्या विक्षिप्त वागणुकीने 'ही एक अनाकलनीय अजब वल्ली आहे' असे मत नागपूर-वऱ्हाडकडे त्यांनी जसे उत्पन्न केले होते, तसेच मत पुण्या-मुंबईकडेही, पुण्यास आल्यापासून थोड्याच काळात, त्यांनी उत्पन्न केले. ज्ञानकोशासाठी आगगाडीत त्यांनी हस्तपत्रके वाटली किंवा घरोघर प्रचार केला, तर ती गोष्ट प्रखर ध्येयनिष्ठपायी ते करीत असतील, हे समाज समजू शकत होता. ते विवाहापूर्वी कु. कोहन यांच्याबरोबर रस्त्यातून हिंडले किंवा त्यांनी व्रात्यस्तोमपूर्वक विवाह केला, तर त्यांच्या विलायतनिवासाचा नि हिंदुत्वाभिमानाचा तो परिपाक होता, हेही मानून घेणे समाजाला अवघड जात नव्हते. पण केव्हाकेव्हा त्यांचे वर्तन असे होई, की त्यामागची कारणपरंपरा उकलणे सामान्य जनांना अशक्य होऊन बसे. मनाचा उलगडा करू शकणारे मार्मिकही कपाळाला हात लावीत. महाराष्ट्राने राजारामशास्त्री भागवत किंवा इतिहासाचार्य राजवाडे बघितले होते. पण विक्षिप्त विद्वानांच्या त्या थोर परंपरेत केतकरांना नुसते गोवून दिल्याने मनाचे समाधान होणे कठीण पडे. त्या विक्षिप्त परंपरेतही केतकरांचे एक स्वतंत्रच स्थान आहे, असे विचक्षणांना वाटे आणि त्या स्थानाचा ग्रंथ न लागल्याने ते भांबावून जात. कोडे विनोदी नि मनोरंजक खरे; पण ते त्यांना अस्वस्थ करी.

एकदा कोतवाल-चावडीपाशी केतकरांचे एक अद्वितीय ध्यान पुणेकरांच्या दृष्टीस पडले. चावडीजवळच्या दारूच्या दुकानासमोर केतकरांचा टांगा उभा होता आणि त्यात केतकर विराजमान झाले होते. त्यांच्या कोटाच्या डाव्याउजव्या खिशात दारूच्या दोन बाटल्या कोंबलेल्या होत्या नि हातातील कागदी पुड्यातून चिवड्याचे बोकाणे ते तोंडात भरीत होते. बाजूला बघ्यांचा गराडा उभा होता, पण त्याची त्यांना तिळमात्र क्षिती नव्हती! त्यांचे हे ध्यान एका पुणेकराला इतके अजब वाटले, की दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी त्याविषयी एक सूचक पत्र ज्ञानप्रकाशात त्याने प्रसिद्ध केले.[१] खरे म्हणजे, केतकरांना दारूचे व्यसन मुळीच नव्हते; पण त्यांचे सासरे श्री. कोहन यांना विलायतेतील रितीप्रमाणे झोपण्यापूर्वी एक 'पेग' दारू घेण्याची सवय होती.[२] तेव्हा, आपल्या सासऱ्यांसाठी दारूच्या बाटल्या केतकरांनी खरेदी केल्या असतील. पण त्या बाटल्या झाकून घरी नेण्याची किंवा उगाच गैरसमज होऊ न देण्याची काळजी त्यांनी घेतली नाही आणि एक छोटे वादळ उत्पन्न केले. एकदा गोव्याच्या सरहद्दीवर एक सत्पात्र, लाजाळू इतिहाससंशोधक केतकरांना आगगाडीत भेटला. त्या वेळी, दारूची चव स्वतः चाखीत त्या संशोधकाला त्यांनी दारूचा आग्रह केला होता! ते त्याला

१. आठवणी, चिं. वि. जोशी.
२. आठवणी, गो. चिं. तांबे.

म्हणाले, 'घ्या. कधी घेतल्ये की नाही ? अहो, दारू घेतली नाहीत तर जग तुम्हांला काय नि कसे समजणार ?'[1] त्यांच्या अशा बेपर्वा वागण्यानेच ते दारुडे आहेत, अशी छुपी कुजबूज सोवळ्या महाराष्ट्रीय समाजात चाले आणि करूनसवरून भागलेले काही शिष्ट किंवा न केलेले काही संभावित दारुड्याचा ज्ञानकोश घ्यायला नकार देत![2]

त्या काळी फर्ग्युसन महाविद्यालयात 'न्यू वेरार क्लब' हा वऱ्हाडी विद्यार्थ्यांचा एक क्लब होता आणि श्री. आ. रा. देशपांडे वगैरे विद्यार्थ्यांमुळे, नागपूर-वऱ्हाडचा अभिमान धरणाऱ्या केतकरांचा या क्लबशी थोडाफार संबंध होता. एकदा या क्लबात आमंत्रणावरून केतकर जेवायला गेले ते साहेबी बुटासुटात गेले आणि जाताना हातातून टेंगूळ आलेली एक कातडी पिशवी त्यांनी नेली. 'डॉक्टरसाहेबांच्या या पिशवीत आहे तरी काय?' असे क्लबातील कॉलेजविद्यार्थ्यांना कुतूहल वाटत होते; पण जेवणापूर्वी केतकरांनी कपडे उतरले आणि कातडी पिशवीतून बघताबघता मुकटा काढला! मुकटा नेसताना गंभीरपणे ते विद्यार्थ्यांना म्हणाले, 'हा आपला जेवणाच्या वेळचा राष्ट्रीय पोषाख आहे'! परंपरागत भारतीय पोषाखाची हिंदुस्थानात पुनश्च प्रतिष्ठापना करण्याची त्यांची ही रीत होती! ही रीत बिचाऱ्या सामान्य लोकांना उमगली नाही आणि ते केतकरांना हसत राहिले.[3]

या 'मुकटाप्रकरणा'त दूरान्वयाने तरी काही विचार सांपडणे शक्य होते; पण दुसरे एक 'पगडीप्रकरण' घडले ते तर केवळ विचारांच्या पलीकडचे घडले. त्याचे असे झाले, की १९२२च्या जूनमध्ये 'भांडारकर इन्स्टिट्यूट'मधील एका व्याख्यानाला आपली गोरी मेव्हणी कुमारी हेटी कोहन यांच्याबरोबर ते उपस्थित राहिले. तेथे व्याख्यानापूर्वी चहापान होते; त्या वेळी चहादाणीवरील साटिनचे, तांबडी फुले काढलेले आवरण (टीकॉसी) त्यांनी काढले आणि आपल्या डोक्याला पगडीसारखे घातले! ते आवरण तसेच डोक्यावर ठेवून, तोंडावर हास्याची सुरकुतीही न आणता, त्यांनी व्याख्यानासाठी सभागृहात प्रवेश केला. व्याख्यान संपेपर्यंत, घामाच्या धारा लागल्या तरी, त्यांनी ते विचित्र शिरोभूषण उतरले नाही. त्या शिरोभूषणाकडे लक्ष जाऊन त्यांच्या मेव्हणीला हसू आवरता येत नव्हते; तेव्हा इतरांचे काय झाले असेल, ते सांगायला नको. व्याख्यान संपल्यावर अनेकांनी 'नव्या पगडी'बद्दल त्यांना प्रश्न केला; पश्चिमेकडे बराच प्रवास केलेले एक गृहस्थ उद्गारले की 'अशा पगड्या मी तिकडे बघितल्या आहेत, पण त्या चहादाण्यांच्या डोक्यावर होत्या';—परंतु केतकर लंबोडका चेहरा करून मक्खपणे न बोलता स्वस्थ होते![4] सभेचा बेरंग करणारे व त्यांना विदूषकाच्या पायरीवर नेऊन ठेवणारे त्यांचे हे वर्तन कोणाला झाले तरी कसे उकलणार? त्यांच्या

१. तोंडी आठवण, ग. ह. खरे.
२. आठवणी, गो. चिं. तांबे.
३. आ. रा. देशपांडे, प्रतिभा, जुलै १९३७.
४. 'मार्टिर्स टु ड्यूटी', हेटी कोहन, पृष्ठे ९९ ते १०३.

असल्या वर्तनाने ते 'विद्वान आहेत की विदूषक आहेत?' असा प्रश्न साहित्यसम्राट केळकरांप्रमाणे अनेकांच्या मनात निर्माण होई.

केतकरांच्या खाजगी वागणुकीतही न उलगडणारी काही कोडी गुंतलेली असत. सर्वसाधारणपणे ते माणसांचे नि स्नेहाचे भुकेले होते. आप्तमित्रांबद्दल आस्था बाळगावी, त्यांच्यासाठी प्रसंगी झीज सोसावी, हा त्यांचा स्थायी भाव होता. पेंडसे-वाड्यात ते असताना एकदा बापटशास्त्री गावाला गेले होते आणि बापटशास्त्र्यांच्या कुटुंबाची नथ चोरीला गेली. त्या वेळीं, पोलिसांत वर्दी देऊन खूप खटपट करून त्यांनी चोर हुडकून काढला.[१] त्यांचे बालमित्र श्री. शांतारामपंत दांडेकर यांना १९१९ साली जो मुलगा झाला त्याचे ते 'गॉड फादर' बनले आणि त्याच्या नावे पंचवीस रुपये त्यांनी पोस्टात ठेवले. आपल्या या बालमित्राच्या पत्नीचे नाव प्रेमावती असल्याने जावाजावांची नावे सारखी होण्यासाठी आपल्या पत्नीचे नाव त्यांनी शीलवती ठेवले होते. दांडेकरांची मुले त्यांना काका म्हणत, शीलवतींना काकू म्हणत आणि आपल्या या पुतण्यांसाठी दिवाळीत फटाके आणायला केतकर विसरत नसत. १९२३ साली शांतारामपंत दांडेकरांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या मुलाबाळांची चौकशी ते आठवण ठेवून करीत असत. मुलांच्या अभ्यासावर त्यांचे लक्ष असे आणि मुलांनी अभ्यास केला नाही तर 'भलं जी दादा भलं भलं। लिहिणं वाचणं नाही आलं॥' ही कविता त्यांना ते म्हणून दाखवीत.[२] लग्नानंतर त्यांची जी नवी नाती जडली तीही त्यांनी कुटुंबशीलतेने सांभाळली. सासरे नि मेव्हणी त्यांच्या घरातच राहात होती नि सासऱ्यांची सेवा प्रसंगी ते पत्नीबरोबर करीत होते. मेव्हणी कु. हेटी कोहन यांना ज्ञानकोशात अद्ययावत वृत्तपत्रीय संदर्भ जमविण्याच्या कामात त्यांनी चिकटवून घेतले होते.[३]—पण त्यांचा स्थायी स्वभाव असा असला तरी मधूनमधून त्यावर वेडेवाकडे अस्थायी वादळ उठे आणि त्यांच्या स्वभावातील संगती पार लोपून जाई. तरुणपणी अमेरिकेला जाण्याच्या तयारीच्या वेळीं चुलत्यांना फिर्यादीची धमकी त्यांनी दिलीच होती. आता चुलते वारून त्यांच्यामागे त्यांची विधवा पत्नी १९२१ साली वारलीं, तेव्हाही कोर्टकचेरीची भाषा त्यांनी काढली! चुलतीला मुलगा नव्हता, केवळ चार विवाहित मुली होत्या, तेव्हा तिच्या मिळकतीमधील वाटा आपल्याला मिळावा, असे त्यांना वाटले आणि तिच्या घराला कुलूप घालणे, आपण हिस्सेदार आहोत म्हणून बँकेला नोटिस देणे, यांसारखे काही प्रकार त्यांनी केले. त्यांचे मित्र रा. बा. सं. गडकरी यांनी याबद्दल त्यांना विचारले, तेव्हा ते म्हणाले "केली एक गंमत!"[४] चुलतीच्या मृत्यूसारख्या दुःखद प्रसंगी केलेली ही भयानक गंमत त्यांच्या आप्तविषयक एकंदर वर्तनक्रमात सुसंगत बसविणे अशक्यप्राय होते. चुलत

१. आठवण, धुं. ग. बापट.
२. आठवणी, प्रेमावती दांडेकर व चंद्रप्रभा तालीम.
३. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ १५२.
४. आठवणी, बा. सं. गडकरी; तोंडी आठवणी, यमुनाबाई गोखले.

बहिणींबद्दल त्यांना आपुलकी अन् प्रेम होते; पण स्वार्थाची जी एक उबळ त्यांना आली तीपुढे त्यांचे सारे स्थायी भाव उलथेपालथे झाले. नवी कल्पना जशी त्यांना अनावर होई तशी नवी भावनाही त्यांना अनावर होई. त्यांच्या स्थायी भावनांत अस्थायी भावना कृतिरूप बनून घुसत; तेथे परस्परविरोधाचे गुंते उत्पन्न करीत; आणि त्यामुळेच त्यांचे व्यक्तित्व कमालीचे बहुरूपी आणि जटिल बने.

आपल्या या स्वभावाची केतकरांनाही थोडीफार जाणीव असावी. एके ठिकाणी ते म्हणतात, "[माझ्या] वागणुकीवर टीका करणारी मंडळी घरातल्या निकट आप्तांपासून आहेत. माझ्या अत्यंत निकट आप्तांनी मला काही बाबतींत दु:साध्य व्यक्ती म्हणून सोडून दिले आहे. कोणी वर्तमानपत्राच्या बातमीदारांनी माझ्या आप्तांच्या मुलाखती घेतल्या नाहीत, म्हणून बऱ्याचशा गोष्टी झाकून आहेत."[१]

त्यांच्या स्वभावात शौर्याचा, साहसाचा नि बेपर्वाईचा जो भाग होता त्यालाही भीरुतेची एक विसंगत किनार परमेश्वराने लावली होती. नवे विचार मांडणे, प्रचंड योजना आखणे, शिष्टाचार धुडकावून देणे, जनतेचा रोष नि उपेक्षा सोसणे, लाखालाखांची कामे अंगावर घेणे वगैरे बाबतींत ते कितीही शूर असले, तरी रोगांची आणि मृत्यूची त्यांना भारी भीती वाटे. विशेषतः सांसर्गिक रोगांचा उद्भव एखाद्या ठिकाणी झाला तर लागलीच ते ठिकाण सोडून ते दुसरीकडे जात.[२] लग्नानंतर ते विमा उतरविण्यास गेले तेव्हा वैद्यकीय तपासणीत त्यांच्या ध्यानी आले, की आपल्या शरीरात जादा साखर असून आपणाला मधुमेहाचा विकार आहे. तेव्हा त्यांना धक्काच बसला आणि त्यांनी साखर अजिबात सोडली. एरवी अफाटपणाने वागणारे ते बायको सांगेल तसे पथ्यपाणी करू लागले व ती नेईल तेव्हा कुरकूर न करता तपासणी-साठी डॉक्टराकडे जाऊ लागले.[३] रोगाला व मृत्यूला भिणाऱ्या त्यांच्या शूर स्वभावाचा एक अतिशय विचित्र नि करुण आविष्कार १९२३ साली घडून आला. त्या साली त्यांचे उमरावतीपासूनचे मित्र नि ज्ञानकोशातील साह्यक श्री. शांतारामपंत दांडेकर हे अपेंडिसायटिसवर शस्त्रक्रिया होऊन दोन दिवसांत तडकाफडकी मृत्युमुखी पडले. शांतारामपंतांची प्रेतयात्रा नि दहनसंस्कार आटोपून केतकर जेव्हा घरी परतले तेव्हा भयाने ते विलक्षण अस्वस्थ झाले होते. ते शीलवतींना म्हणाले, 'मी जर प्रथम मृत्यू पावलो तर काही झाले तरी माझे दहन करू नका!'—आणि त्या विषयाबद्दल त्यांनी तोंडाला जे कुलूप घातले ते कायमचे! आपले गतप्राण प्रेतही अग्नीत भस्म व्हावे, ही कल्पना त्यांना असह्य झाली.[४] या वेळी त्यांच्या भयाचा हा जो आविष्कार झाला

१. 'मी व माझे टीकाकार', ज्योत्स्ना, जून १९३६.

२. श्री. वि. वर्तक, प्रतिभा, जुलै १९३७.

३. आठवणी, शीलवती केतकर; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ८८; ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ १६९, वगैरे.

४. आठवणी, शीलवती केतकर, य. रा. दाते, प्रेमावती दांडेकर व चंद्रप्रभा तालीम, इत्यादी.

त्यातूनच भविष्यकाळात त्यांच्या मृत्यूच्या वेळीं त्यांच्या अंत्यसंस्कारासंबंधी मतभेद उत्पन्न झाले आणि गैरसमजाचे एक गूढ नि संशयग्रस्त वातावरण त्यांच्या कुटुंबाभोवती पसरले.

मित्राचा दहनसंस्कार बघितल्यानंतर केतकरांना जेव्हा मृत्यूच्या सावल्या प्रथम दिसल्या, त्याच्या पावलांची चाहूल प्रथम ऐकू आली, तेव्हा जीवनाच्या ऐन शिखरावर ते जवळजवळ पोहोचले होते. जे कार्य पूर्ण केल्याने अनेक आयुष्ये सार्थकी लागावीत ते ज्ञानकोशाचे कार्य त्यांनी आवाक्यात आणले होते. महाराष्ट्राच्या भाग्यविधात्यांत आपले नाव कायमचे कोरले जाणार हे त्यांना कळले होते. विचारांची मोठी संपदा त्यांनी उत्पन्न करून ठेवली होती. त्यांना अत्यंत सुशील सहचारिणी लाभली होती आणि त्यांच्या घरादारात सुखाचे नि तृप्तीचे मंजूळ सूर झंकारत होते. जीवन असे द्रुत लयीत नि समेवर आले असताना मृत्युभयाने आपली सावट त्यांच्यावर क्षणभर का होईना टाकावी, हा अशुभ योगायोग म्हणावयाचा. आपण अवेळी झडप घालण्यासाठी येणार आहोत, याची सूचना मृत्यूने वैर साधून त्यांना या आनंदाच्या पर्वकाळातच जणू देऊन ठेवली !

# 'विद्यासेवका'तील वाङ्मयवैभव

[१९२४ ते २९]

ज्ञानकोशाची समाप्ती दृष्टीच्या टप्प्यात येऊ लागली आणि केतकरांच्या मनात भावी कार्यक्रमासंबंधी निरनिराळे बेत बनू लागले. ज्ञानकोशासारखे संदर्भग्रंथ कितीही परिपूर्ण करावयाचे म्हटले तरी त्यांत काहीतरी उणिवा राहून जातातच आणि ग्रंथ तयार होण्यास अनेक वर्षांचा कालावधी लागत असल्याने ग्रंथ तयार होण्यापूर्वीच तो अंशतः शिळा झालेला असतो. आपल्या 'महाराष्ट्रीय ज्ञानकोशा'च्या बाबतीत हीच स्थिती होत आहे, असे त्यांच्या लक्षात येऊ लागले होते. तेव्हा, ज्ञानकोशाला पूरक होईल असे एखादे मासिक काढण्याचा बेत त्यांच्या मनात ओघाने आला आणि प्रथमतः 'विद्यासेवक' नावाचे मासिक त्यांनी ज्ञानकोश-मंडळाच्या द्वारे चालू केले. मासिकाची कल्पना १९२४च्या जून-जुलैमध्ये त्यांना स्फुरली[१] व आपल्या स्फुरणानुगामी स्वभावानुसार लगेच १९२४च्या सप्टेंबरमध्ये मासिकाचा पहिला अंक त्यांनी बाहेर काढला. मूळ कल्पनेप्रमाणे ज्ञानकोशाच्या पुरवणीचे स्वरूप विद्यासेवकाला काही प्रमाणात होतेच, पण त्याच्या ध्येयाचा व धोरणाचा खुलासा पुढीलप्रमाणे पहिल्या अंकात करण्यात आला होता: "शुद्ध भौतिक शास्त्रे, यांत्रिक कला, इत्यादी गोष्टी यातून वगळल्या जातील. त्याचप्रमाणे कादंबऱ्या, कथा, वगैरेंस यात जागा नाही. तथापी वाङ्मयविषयक लेख, इतिहास, व तत्संबद्ध शास्त्रे, व सामान्य मानवी व्यवहार यांना या मासिकात संपादकांच्या सवडीप्रमाणे स्थान मिळेल. ग्रंथप्रकाशन, मुद्रण इत्यादी धंद्यांकडे लक्ष दिले जाईल आणि ज्ञानसंवर्धन, ज्ञानप्रसार, शिक्षण व मुद्रणप्रकाशनाचा धंदा, संगीत, नाट्य-नृत्यादी ललितकला यांविषयी संलग्न असणारे राजकारण या मासिकात अवश्य विचारात घेतले जाईल. लेखन, प्रकाशन आणि मुद्रण या धंद्यांतील मंडळींनी विशेषेकरून हे मासिक आपले समजावे." हे ध्येय व धोरण पुढे सर्वसामान्यपणे पाळले गेले; पण केतकरांची सर्वच कामे जशी सदैव चल नि प्रवाही असत तसेच

१. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ६१.

या ध्येयधोरणाचेही झाले. उदाहरणार्थ, मूळ कल्पनेत वर्ज्य असलेल्या कथा-कादंबऱ्या मासिकातून लौकरच येऊ लागल्या आणि शुद्ध राजकारणावरही अनेक लेख प्रसिद्ध झाले. या मासिकाचे प्रवर्तक व सूत्रचालक केतकर होते, पण संपादकाच्या पदावर प्रत्यक्ष नियुक्ती रा. दाते यांची झाली व केतकर नुसते मुद्रक नि प्रकाशक राहिले. मात्र रा. दाते यांनी ज्ञानकोश-मंडळ सोडल्यानंतर, एप्रिल १९२८ पासून, मासिकाचे संपादकत्वही केतकरांनी स्वीकारले. विद्यासेवक सप्टेंबर १९२४ पासून मे १९२८-पर्यंत प्रथम पावणेचार वर्षे चालला आणि नंतर वर्षभर बंद पडून जून १९२९ ते ऑगस्ट १९२९ पर्यंत आणखी तीन महिने चालला. पुढे १९३५-३६ मध्ये त्याचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केतकरांनी केला; पण पुढच्या काळातला तो भाग वगळता, त्याची पहिली द्विखंड कारकीर्द एकूण चार वर्षांची झाली.

विद्यासेवक निघाला तेव्हा ज्ञानकोशाच्या कामामधून केतकरांना बराच सुटवंगपणा मिळाला होता. त्यामुळे विद्यासेवकात आपल्या स्वतंत्र लेखनाचा जसा काही धबधबा प्रारंभापासून त्यांनी सुरू केला. यापूर्वी शुद्ध राजकारणावर त्यांनी क्वचितच लिहिले होते; पण आता चौदा लेखांची एक लेखमाला समकालीन राजकारणावर त्यांनी लिहिली आणि ती 'निःशस्त्रांचे राजकारण' या पुस्तकात पुढे संग्रहीत करून राजकीय विचारांना विलक्षण चालना दिली. आजवर कादंबरीलेखनाचा अर्धामुर्धा प्रयत्न त्यांनी नागपूरला असताना केला होता; पण आता विद्यासेवकातून लागोपाठ तीन कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या, चौथीला प्रारंभ केला, आणि त्यांतील वैशिष्ट्यपूर्ण आशयाने ललित साहित्याच्या क्षेत्रात एक नवी धमाल उडवून दिली. साहित्यशास्त्रावर याआधी त्यांनी फारच थोडे लिहिले होते; पण आता 'महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण' हा साहित्यशास्त्रावरील वेगळ्या धर्तीचा ग्रंथ विद्यासेवकात लिहून त्यांनी साहित्यशास्त्रज्ञांना चकित केले. 'स्त्रीसत्तापराभव' या नावाचे एक अपूर्ण नाटकही त्यांनी लिहिले आणि विद्यासेवकामध्ये ते क्रमशः प्रसिद्ध करण्यास सुरवात केली. पुस्तकांच्या स्वरूपाचे हे वाङ्मय वगळता, आपल्या जुन्या स्फुट कविता 'गोविंदपौत्र' या नावाने विद्यासेवकात त्यांनी दिल्या आणि विविध विषयांवर शेपाऊणशे स्फुट लेख लिहिले! हे सारे विपुल नि विविध वाङ्मय महाराष्ट्रापुढे आले, तेव्हा महाराष्ट्राला ज्ञानकोशापेक्षा त्यांची नवी ओळख पटली व ते सामान्य वाचकांच्या अधिक जवळ आले. कारण ज्ञानकोशातील संकलित वा स्वतंत्र वाङ्मयापेक्षा हे वाङ्मय वाचकांना जास्त रिझवणारे किंवा त्यांच्या जीवनाला, आकलनाच्या कक्षेला अधिक खोलवर स्पर्श करणारे होते.

केतकरांच्या लिखाणामुळे विद्यासेवकाला मोठे भारदस्त आणि जिज्ञासूंना आकर्षक वाटणारे असे स्वरूप प्रारंभापासून आले. शिवाय, केतकरांच्या जोडीला विद्यासेवकात ज्ञानकोशामधील इतर लेखक लिहीत, बाहेरूनही थोडेसे लिखाण येई, आणि दुधात साखर पडे. रा. कर्वे यांनी म्हटल्याप्रमाणे, "डॉ. केतकर यांचे राजकीय, सामाजिक व आर्थिक विषयांवरील लेख, 'वाङ्मयतिमाही'ची श्री. दाते यांची परीक्षणे,

श्री. कर्वे यांचे 'तिमाही राजकारण', ज्ञानकोशातील संपादक मंडळींनी लिहिलेली ऐतिहासिक व सामाजिक विषयावरची विविध टाचणे, बाजीप्रभूच्या शौर्यासंबंधी चर्चा, ग्रंथसमीक्षा इत्यादी गोष्टींमुळे विद्यासेवक विद्वानांनाही वाचनीय वाटे. कै. वि. का. राजवाडे यांनीदेखील 'भारतीय इतिहासाची मूलतत्वे' आणि 'खड्गाराट्' हे दोन लेख लिहून त्याला महत्व दिले होते."[१] राजवाड्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्यासंबंधी एक विशेषांक विद्यासेवकाने काढला आणि त्यांच्या संस्मरणीय व मनोरंजक आठवणी त्यात संग्रहीत केल्या. केतकरांच्या पूर्वोक्त पाच पुस्तकांच्या भरीला नाना देशांतील 'प्राचीन कहाण्या' हे पुस्तकही विद्यासेवकाने वाचकांच्या हाती क्रमशः दिले. शिवाय वाचनपरीक्षण, छायाचित्रस्पर्धा, कूटे, समस्यापूर्ती इत्यादी चुरचुरीत खाद्य वाचकांना पुरवून विद्यासेवक खमंग रुचिपालट मधूनमधून घडवून आणी.—मिळून 'मुहूर्तं ज्वलितं श्रेयः' या न्यायाने विद्यासेवक चार वर्षे तळपला आणि उच्च दर्जाच्या मराठी मासिकांच्या मालिकेत अढळपणे जाऊन बसला.

'निःशस्त्रांच्या राजकारणा'वर लिहिलेली बारा लेखांची माला हे केतकरांचे विद्यासेवकातील पहिले महत्वाचे लिखाण होय. १९२० साली केतकर ज्ञानकोशाच्या कामात जेव्हा आकंठ बुडालेले होते, तेव्हा पंजाब-प्रकरण नि खिलाफत यांमधील अन्यायाच्या प्रतिकारासाठी म. गांधींनी एक अभूतपूर्व चळवळ देशात सुरू केली होती;—आणि तिचा परिणाम केतकरांच्या मनावर झाल्यावाचून राहिला नव्हता. त्या चळवळीतील अनत्याचार, असहकार वगैरे तत्वांची चर्वणा त्यांच्या मनात सुरू होऊन तेथे काही नव्या राजकीय कल्पना उदय पावल्या होत्या. ५ फेब्रुवारी १९२४ ला म. गांधी यरवड्याच्या तुरुंगातून सुटून पुण्याला ससून-रुग्णालयात आले, तेव्हा या कल्पनांनी अस्वस्थ होऊन ते महात्मा गांधींना जाऊन भेटले होते व आपल्या कल्पना म. गांधींना त्यांनी ऐकवल्या होत्या.[२] विद्यासेवक सुरू झाल्यावर याच कल्पनांना व्यवस्थित स्वरूप देऊन त्या 'निःशस्त्रांच्या राजकारणा'वरील लेखमालेत त्यांनी मांडल्या आणि १९२६ साली 'निःशस्त्रांचे राजकारण' हे त्या लेखमालेचे पुस्तक प्रकाशित केले. म. गांधींच्या विचारसरणीने त्यांना या वेळी एवढे विचारप्रवृत्त केले होते, की "महात्मा गांधींनी अपूर्ण टाकलेली विचारपद्धती व कार्यपद्धती यात अधिक विस्ताराने दिली आहे" अशी आपल्या पुस्तकाची त्यांनी जाहिरात केली.[३]

'निःशस्त्रांच्या राजकारणा'त म. गांधींच्या विचारसरणीची त्यांनी जागोजाग पुढीलप्रमाणे तरफदारी केली. ते म्हणतात, "म. गांधींचे...मोठे तत्व म्हटले म्हणजे... सर्व सुधारणा अनत्याचारीपणाने आणि असहकारितेचे शासन वापरून घडवून आणावयाच्या आहेत. हे तत्व खरोखर अत्यंत सुंदर तत्व होय. या तत्वाच्या योगाने

१. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ६४.
२. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ७८.
३. विद्यासेवक, नोव्हेंबर १९२६.

जगाच्या भावी राजनीतीमध्ये मोठी क्रांती घडून येणार आहे."..."म. गांधीनी हे ओळखले, की आपणास जो कार्यक्रम पाहिजे तो असा असावा, की दुर्बल मनुष्यासही त्या कार्यक्रमाशी सहकारिता करता येईल. यासाठी त्यांनी असहकारितेचे...सर्वजनव्यापी तत्व पुढे आणले."..."म. गांधींनी दुसरी एक महत्वाची गोष्ट केली ती ही, की आपणास चळवळ करावयाची ती ब्रिटिश जातीविरुद्ध नसून अनियंत्रित राज्यपद्धतीविरुद्ध करावयाची आहे, या मवाळांच्या व लो. टिळकांच्या जुन्या तत्वाचा महात्माजींनी निर्मल चित्ताने व जोरदार पुरस्कार केला."..."महात्माजींचे एक तत्व पूर्णपणे लक्षात घेण्याजोगे आहे व ते हे, की कायदेभंग किंवा कर न देण्याची चळवळ."[१] —म. गांधींच्या विचारसरणीची केतकरांनी अशी पुष्कळ तरफदारी केली, पण ती विचार-सरणी त्यांना पूर्णतः मान्य होती, असे नाही. म. गांधींशी त्यांचे बरेच मतभेद होते आणि मतभेद होते म्हणूनच 'निःशस्त्रांचे राजकारण' ते वेगळेपणाने उपदेशीत होते.

म. गांधींचा शुद्ध अनत्याचार किंवा ऐकांतिक अहिंसा त्यांना मान्य नव्हती. ते म्हणतात, की "जर कोणी आततायी मनुष्य आला तर स्वसंरक्षण करू नका असा आम्ही उपदेश करीत नाही....प्रतिक्रिया करावयाचीच नाही, हे आमचे तत्व नाही. उलट, प्रतिक्रिया अधिक यशस्वी आणि पद्धतशीर व्हावी यासाठीच निःशस्त्रांचे राजकारण उपदेशिले जात आहे."[२] हिंदुस्थानच्या तत्कालीन परिस्थितीत सशस्त्र चळवळ यशस्वी होणे त्यांना अशक्य वाटत होते व म्हणून निःशस्त्र उपायांचा अवलंब ते पुरस्कारीत होते. म. गांधींनी शिक्षणसंस्थांवर, न्यायालयांवर व विधिमंडळांवर बहिष्कार पुकारला होता, पण तोही त्यांना पटत नव्हता. वास्तविक पाहाता अशा बहिष्कारामुळे म. गांधींची चळवळ समाजाच्या सर्व थरांत लहानथोरापर्यंत जाऊन पोहोचली आणि देशातील असंतोष ढळढळीतपणाने प्रकट होऊ शकला. पण केतकरांच्या मते या बहिष्कारा-मुळे स्वराज्यप्राप्तीचा कार्यक्रम म. गांधींनी "अवजड व अव्यवहार्य" केला; आपल्या कार्यक्रमाला "शत्रू वाढविले".[३] चहापानाविरुद्ध म. गांधींनी केलेल्या चळवळीला त्यांनी 'अव्यापारेषु व्यापार' म्हटले आणि चरखा, खादी, स्वदेशी इत्यादी गोष्टींवरही हल्ला चढवला. या गोष्टींनी देशातील स्वत्वाची भावना चेतत होती आणि इंग्रजांनी चालविलेल्या आर्थिक शोषणाविरुद्ध आवाज उठविला जात होता, इकडे त्यांनी दुर्लक्ष केले व म्हटले, की "...चरख्याची चळवळ पूर्णपणे अनावश्यक होती....चरख्याचा व स्वराज्याचा संबंध कधीच स्पष्टपणे व्यक्त न करता अधिकारयुक्त वाणीने 'त्याचा अवलंब करा म्हणजे तुम्हांस स्वर्ग दिसेल' असे म्हणणे औद्धत्य होय आणि हे सुशिक्षितांच्या बुद्धीस केलेले पादत्राणाचे प्रहार होत....जर नोकरशाहीविरुद्ध चळवळ करावयाची आहे तर गिरणीवाले आणि आयात-निर्यात करणारे व्यापारी यांच्या कार्यात

१. अनुक्रमे पृष्ठे ५५, ५४, ५४, ५८.
२. पृष्ठे १५७-१५८.
३. पृष्ठ ५६.

निरर्थक व्यत्यय का?—आणि त्यांचा तरी विरोध आणखी का संपादा?"[1] "राजकीय चळवळीने स्वदेशीविषयी उदासीन असावे."[2] खादी, चरखा, स्वदेशी यांचा प्रचार करीत असता म. गांधी यंत्राला विरोध करीत होते आणि पाश्चात्य पद्धतीच्या औद्योगिक विकासाबद्दल नापसंती दर्शवीत होते. केतकरांना ही गोष्टदेखील साहजिकच मानवण्यासारखी नव्हती. त्यांनी याबद्दल असे लिहिले, की "महात्मा गांधींना पाश्चात्य पद्धतीचा औद्योगिक विकास नको आहे; मला तो हवा आहे. माझे मत असे आहे, की ज्या अर्थी भौतिक शक्तींचा उपयोग उत्पादन सवंग करण्याकडे होत आहे आणि तो वाढत जाईल, त्या अर्थी त्यांचा उपयोग न करणे हा वेडेपणा आहे."[3] म. गांधींशी असे अनेक मतभेद असल्यामुळे, म. गांधींच्या विचारसरणीतील ग्राह्य वाटणारा तेवढा भाग उचलून त्यांनी त्यात स्वविचारांची भर घातली आणि निःशस्त्रांच्या राजकारणाची सुसूत्र विचारप्रणाली तयार केली.

निःशस्त्र राजकारणाने स्वराज्यप्राप्ती होईल, अशी जी दृढ आशा केतकरांना होती तिला मुख्यतः दोन कारणे होती. एक म्हणजे त्यांची स्वराज्याची कल्पना वेगळी होती आणि दुसरे म्हणजे हिंदुस्थान व इंग्लंड यांचे हितसंबंध परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत, अशी त्यांची खात्री होती. त्यांना स्वराज्य सुराज्यासाठी हवे होते, ते प्रातिनिधिक व लोकसत्ताक राज्य हवे होते आणि ते साम्राज्यांतर्गत स्वराज्य किंवा 'डोमिनियन स्टेटस' हवे होते. "स्वराज्याप्रीत्यर्थ चळवळ ही भिन्नराज्यस्थापक चळवळ नसून सामाजिक व राजकीय अंतस्थ सुधारणेची चळवळ आहे,"—असे ते म्हणत होते![4] त्या काळी संपूर्ण स्वातंत्र्याची इच्छा देशांत शिगेला पोचत होती; पण संपूर्ण स्वातंत्र्याचा पाठपुरावा त्यांनी कधीही केला नाही. ते अमेरिकेत असताना अँड्र्यू कार्नेगी या थोर गृहस्थांनी त्यांना जो उपदेश केला होता त्याचा हा परिणाम असावा. अँड्र्यू कार्नेगी त्यांना व त्यांच्या बरोबरच्या हिंदू विद्यार्थ्यांना म्हणाले होते, की "हिंदू लोकांनी स्वतंत्र होण्याचा प्रयत्न बिलकूल करू नये. अमेरिकेने स्वतंत्र होण्याचा हा वेडेपणा केला खरा; आता आम्ही हे जे वियुक्त झालो, ते पुन्हा एकत्र होण्याची संधी दिसत नाही. जितके राज्य मोठे तितके चांगले. हिंदूंनी जो प्रयत्न करावयाचा तो स्वदेशातील राज्यकारभारात सुधारणा व्हावी, देशातील उद्योगाला उत्तेजन मिळावे, व्यापार वाढावा, यासाठीच करावा."[5] कार्नेगी यांच्या या उपदेशाखेरीज आपल्या 'एक जगा'च्या कल्पनेसाठीही त्यांना हिंदुस्थानाने इंग्लंडपासून तुटून निघणे पसंत नसावे. साम्राज्यांनी जगाचे मोठमोठे भाग जोडले जातात व जगदैक्याच्या प्रक्रियेला

१. पृष्ठ ५७.
२. पृष्ठ ६६.
३. पृष्ठ १५७.
४. पृष्ठ ९३.
५. आठवणी, केतकर, प्रतिभा, १९ जानेवारी १९३४.

चालना मिळते, असे त्यांनी लिहिले आहे. तेव्हा, जगदैक्याला पूरक म्हणून इंग्लंडच्या साम्राज्यात स्वायत्त पद्धतीने हिंदुस्थानाने राहावे, अशा निर्णयाला ते आले असावे. इंग्लंडच्या साम्राज्यात स्वायत्त हिंदुस्थान व इंग्लंड यांचे हितसंबंध परस्परपूरक राहातील, ही जी त्यांची दुसरी कल्पना ती त्या काळी तरी बरीचशी अभिनव आणि क्रांतिकारक होती. त्या कल्पनेवरच स्वराज्यप्राप्तीचा आपला कार्यक्रम त्यांनी आधारला होता आणि निःशस्त्र राजकारणाच्या विचारप्रणालीत तिला फार मोठे स्थान दिले होते. ही अभिनव आणि क्रांतिकारक कल्पना त्यांनी पुढीलप्रमाणे विवरून दाखविली:

ते म्हणतात, की "प्रत्येक राष्ट्राने भरभराटीला यावे, हे इतर राष्ट्रांस फायदेशीर आहे."[१] ..."हिंदुस्थानास स्वराज्य देणे ही गोष्ट इंग्लंडच्याच हिताची आहे."[२]... "हिंदुस्थान हा कृषिप्रधान देश आहे. तो उद्योगप्रधान होऊ लागला तरी त्यामुळे इंग्लंडच्या उद्योगवृद्धीस किंवा व्यापारास कोणत्याही तऱ्हेने हरकत यावयाची नाही आणि या सर्व गोष्टी इंग्रज मुत्सद्द्यांच्या लक्षात आल्यास भारतीयांच्या स्वराज्यविषयक प्रयत्नास इंग्लंडच्या मुत्सद्द्यांना विरुद्ध जाण्याचे काहीच कारण नाही."[३]...'हिंदुस्थानचा विकास होऊ लागला, की हिंदुस्थानात कारखाने वाढून इंग्लंडची यंत्रे खपतील; हिंदुस्थानी लोकांची क्रयशक्ती वाढून सिगरेटसारख्या इंग्लंडच्या उपभोग्य मालाला जास्त मागणी उत्पन्न होईल; हिंदुस्थानने निर्माण केलेल्या मालाला गिऱ्हाईक बघण्याचे काम इंग्लंडला मिळेल व इंग्लंडच्या वहातुकीच्या धंद्याला प्राप्ती होईल; आणि विकासासाठी हिंदुस्थानला जे भांडवल लागेल तेही इंग्लंड रोकडवाला देश असल्यामुळे त्याला किफायतीने पुरविता येईल. हिंदुस्थानचा विकास क्रमाने घडणार, तेव्हा दोन्ही देशांतील उत्पादनात सहकार्य व परस्परपूरक विशिष्टीकरण वाढून ते दोघांना लाभकारक ठरेल.'..."इंग्लंडच्या व्यापारविकासाशी सहकारिता करण्याचे धोरण राहिल्यानेच हिंदुस्थानचा अधिक फायदा होण्याचा संभव आहे."[४] 'कारण दोघांची अर्थव्यवस्था सध्या परस्परावलंबी आहे व ती स्वतंत्र करणे दोघांना अशक्यप्राय व हानिकारक आहे.' "हिंदुस्थानचे वित्तचौर्य इंग्लंडकडून सर्व इंग्रज जनतेच्या कल्याणाकरिता कधीच झाले नसून नेहमी विशिष्ट वर्गाच्या कल्याणासाठी झाले आहे."[५] 'तेव्हा लोकशाहीच्या वाढीबरोबर सर्वसामान्य जनतेचे वजन जसजसे इंग्लंडमधील सरकारवर वाढत जाईल तसतशी हिंदुस्थानचे वित्तचौर्य सरकारी यंत्रणेमार्फत करण्याची प्रवृत्ती कमी होईल.'..."आज इंग्लंडची नीती अधिकाधिक उदार होत चालली आहे, ती भावनात्मक औदार्याच्या लाटेने उत्पन्न झाली नसून अधिक व्यवहारज्ञतेने उत्पन्न झाली...आहे आणि तोच आमचा विश्वासस्तंभ

१. पृष्ठ ४.
२. पृष्ठ ९८.
३. पृष्ठे ११५-११६.
४. पृष्ठ ११३.
५. पृष्ठ १०८.

आहे....या दोन देशांच्या आर्थिक विकासातील अन्योन्याश्रय स्पष्ट दिसत असल्यामुळे आम्हांस असा विश्वास वाटतो, की जितप्रदेशाची चोरी करावी, असल्या तऱ्हेचे विचार व मूर्ख कल्पना जर इंग्लंडातील मुत्सद्द्यांच्या डोक्यात असतील तर त्याही आम्ही काढून टाकू आणि हिंदुस्थानला स्वराज्य देण्यास इंग्लंडातील मुत्सद्दी आज जरी एकजात विरुद्ध असले तरी त्यांचाही विरोध काढून टाकू शकू."[१]

या साऱ्या म्हणण्यात काही भाग अतिशयोक्तीचा होता; कारण 'प्रत्येक राष्ट्राने समृद्धीला यावे, हे इतर राष्ट्रांच्या फायद्याचे असते' यांसारख्या सर्वसाधारण विधानांना इतिहासाचा आधार मिळणार नाही. पण विसाव्या शतकातील विकासावस्था ध्यानात घेता, केतकरांनी इंग्लंड व हिंदुस्थान यांच्या हितसंबंधांबद्दल जी मुख्य कल्पना सांगितली ती मान्य होण्यासारखी आहे. केतकरांना वाटत होता तसा तंतोतंत इतिहास पुढे घडला नाही, घडणे शक्यही नव्हते. पण जो इतिहास घडला त्यात त्यांच्या कल्पनेतील प्रमुख अंगांचा पडताळा खचीत आला. पहिल्या महायुद्धानंतर इंग्लंडने हिंदी उद्योगधंद्यांची वाढ झपाट्याने होऊ दिली, दुसऱ्या महायुद्धानंतर हिंदुस्थानाच्या हातावर स्वातंत्र्याचे उदक सोडले ते स्वहितावर दृष्टी ठेवूनच सोडले आणि लोकसत्तेची वाढ नि मजूरपक्षाचा अधिकारस्वीकार यांमुळे ते सुलभ झाले. तेव्हा 'एक जगा'चे भविष्य वर्तवताना केतकरांच्या भविष्यभेदक दृष्टीने जशी एक पल्लेदार भरारी १९०९ साली घेतली तशीच ती या वेळीही घेतली, असे म्हणावे लागेल. हिंदुस्थान व इंग्लंड यांच्या आर्थिक हितसंबंधांचे अचूक निदान करणारे नि बहुजनसमाजाच्या भावनांना न जुमानता ते निदान स्पष्टपणे जाहीर करणारे भाई मानवेंद्रनाथ रॉय यांच्यासारखे जे द्रष्टे पुरुष त्या काळात होते त्यांपैकीच केतकर हेही एक होते.

हिंदुस्थान व इंग्लंड यांचे हितसंबंध परस्परपूरक आहेत व इंग्लंड हिंदुस्थानाला स्वराज्य द्यावयास स्वहितबुद्धीनेच तयार होईल, असे जरी केतकर म्हणत होते, तरी स्वराज्यासाठी प्रयत्नांची आवश्यकता आहे, ही गोष्ट ते नाकारीत नव्हते. हिंदुस्थान ताब्यात ठेवल्यास इंग्लंडमधील विशिष्ट सत्ताधारी गटांना फायदा उकळता येतो व म्हणून ते गट स्वराज्यदानाच्या आड येतात, असे ते म्हणत होते; आणि हा अडथळा दूर करण्यासाठी जोरकस चळवळ हवी, असे प्रतिपादीत होते. आपल्या चळवळीचा कार्यक्रम म. गांधींच्या अनत्याचार व असहकार या तत्वांचा अंगीकार करून त्यांनी पुढीलप्रमाणे आखला: "१९२९ साली पार्लमेंट किंवा ब्रिटिश मंत्रिमंडळ आपली तयारी पाहून स्वराज्याचा नवीन हप्ता किंवा डोमिनियन स्टेटसही देण्याविषयी विचार करणार आहे. तर तोपर्यंतचा काल तयारीत घालवावा आणि स्वराज्य न देणे हे व्यवहारदृष्ट्या अयोग्य होईल, अशी परिस्थिती उत्पन्न करावी."[२] ...'सरकारच्या आर्थिक स्थितीकडे दृष्टी फेकली, तर सरकार किती करतंत्र आहे,

१. पृष्ठ १४१.

२. पृष्ठ ५९.

हे ध्यानात येईल व स्वराज्यप्राप्तीच्या कार्यक्रमाची कळ आपल्या हाती मिळू शकेल. हिंदुस्थान-सरकारला कर्ज इतके आहे, की ते त्याच्या वार्षिक उत्पन्नाच्या सुमारे सात पट भरेल. त्या कर्जावरील व्याज भरण्यातच सरकारचा जवळजवळ पस्तीस टक्के वसूल खर्च होतो. म्हणजे लोकांनी सरकारचे दहा टक्के उत्पन्न जरी कमी केले तरी सरकार पेचात येऊ शकेल; कारण मग सरकारला कर्जावरील व्याज भरता येणार नाही व सावकार त्याच्यावर दडपण आणतील. सरकार असे करतंत्र असल्यामुळे स्वराज्यप्राप्तीसाठी करबंदीची चळवळ केली पाहिजे.'[१] ...'करबंदी केली तर कर न देणाऱ्यांची मालमत्ता सरकार लिलावाला काढते आणि ती कर न देणाऱ्याचा एखादा स्वार्थी शेजारी आपल्या वशात घालतो. या परिस्थितीमुळे करबंदीचे धैर्य अनेकांना होत नाही. यासाठी येत्या चार वर्षांत देशभर अशी आश्वासने घ्यावी, की करबंदी करणाऱ्याची मालमत्ता आम्ही लिलावात घेणार नाही.'[२] ... सरकार परदेशांत कर्ज काढून पैसा उभारू शकेल. त्याकरिता "जगाला व विशेषेकरून इंग्रजी जनतेला हे स्पष्ट सांगितले पाहिजे, की १९२९ नंतर हिंदुस्थान सरकारास कर्ज विचारपूर्वक द्यावे; कां की त्या साली जर हिंदुस्थानास डोमिनियन स्टेटस मिळाले नाही तर त्यानंतर काढलेल्या कर्जास हिंदुस्थानातील जनता खरोखर जबाबदार नाही."[३] ..."शिवाय, सरकारने कागदी चलन वाढवून आपला खर्च चालवू नये म्हणून उपाय योजण्याचाही विचार केला पाहिजे."[४] ... 'चळवळीला सर्व समाजसमूहांचे सहकार्य मिळवावे लागेल. मुख्य विरोध इंग्रज नोकरवर्ग करील असा संभव आहे. पण त्या नोकरवर्गाला हे समजावून सांगावे, की स्वराज्याची चळवळ त्याच्याविरुद्ध नसून अनियंत्रित, परक्या शासनपद्धतीविरुद्ध आहे. स्वराज्य सुराज्यासाठी असल्यामुळे स्वराज्यातही हल्लीचा इंग्रज नोकरवर्ग लागणार आहे.'[५] ...अशा तऱ्हेने सरकारची सर्व बाजूंनी कोंडी केली तर १९२९ मध्ये "सरकार आपण होऊनच स्वराज्य द्यावयास तयार होईल, असा बराच संभव आहे."[६] ... 'हिंदुस्थानला स्वराज्य देण्यात इंग्लंडचे नुकसान नाही, हा विचार तोवर इंग्लंडमध्ये चांगला प्रसृत केला, तर त्या विचारामुळेही स्वराज्य मिळण्यास साह्य होईल.'[७]

स्वराज्यप्राप्तीच्या चळवळीचा हा सारा खटाटोप केतकर 'स्वयंनिर्णयी संघ' नामक संस्था काढून तिच्यामार्फत करू बघत होते. स्वयंनिर्णयी संघाने चांगल्या पगाराचे पाच हजार कार्यकर्ते उत्तम पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखाली देशभर नेमावे व त्या कार्यकर्त्यांनी

१. पृष्ठे ७४-७५.
२. पृष्ठे ५९-६०.
३. पृष्ठ ६५.
४. पृष्ठ ६५.
५. प्रकरण ८.
६. पृष्ठे ६६-६७.
७. पृष्ठे १४९, १६२.

स्वतःच्या पगारासाठी निधी जमवून करबंदीचा प्रचार करावा, अशी त्यांची योजना होती. शिवाय, स्वराज्यात कारभार सुधारेल याची जनतेला खात्री पटावी, यासाठी स्वयंनिर्णयी संघाने आपणातून कार्यक्षम देशी शासकवर्ग उत्पन्न करावा, अशीही त्यांची अपेक्षा होती.[१] मात्र ते असे म्हणत होते, की "स्वयंनिर्णयी संघ शिक्षणविषयक किंवा दानविषयक किंवा सामाजिक सुधारणाविषयक ज्या अनेक गोष्टी आहेत त्या अंगावर घेणार नाही." "स्वयंनिर्णयी संघापुढील मुख्य क्षेत्र म्हणजे चळवळ हेच ठेवावयाचे आहे."[२]

केतकरांनी स्वराज्यप्राप्तीच्या चळवळीचा बराच तपशील आपल्या लेखनात दिला, पण सर्वच तपशील दिला नाही. उदाहरणार्थ, कागदी चलन वाढवून सरकारने कारभार चालविला व करबंदीला तोंड दिले तर नेमकी कोणती उपाययोजना करावयाची, त्याचे दिग्दर्शन त्यांनी कोठेही केले नाही. नवा शासकवर्ग कसा तयार करावयाचा, याची चर्चाही पुढील एखाद्या पुस्तकात करू, असा हवाला त्यांनी दिला. शिवाय स्वयंनिर्णयी संघ शिक्षणासारखी समाजसेवेची कार्ये हाती घेणार नाही, करबंदीच्या चळवळीवर सारे लक्ष खिळवणार, असे ते म्हणत होते; पण जो वर्ग दीर्घकालीन समाजसेवेमुळे समाजाशी निगडित झालेला नसतो त्याच्यामागे फक्त चळवळीसाठी व त्यागासाठी लोक उभे राहात नाहीत, तेव्हा त्यांच्या करबंदीच्या चळवळीला कितपत उठाव आला असता, याची जबर शंका आहे. मात्र त्यांच्या कार्यक्रमात पुष्कळसा भाग व्यवहार्य नि नवा होता; त्यामुळे खऱ्या कार्यकर्त्या पुरुषांना तो सूचक ठरला असता, यात शंका नाही.

मुख्य विषयाच्या अनुषंगाने 'निःशस्त्रांच्या राजकारणा'त केतकरांनी अनेक दुय्यम विषयांवर लिहिले आणि वाचकांची राजकारणविषयक दृष्टी विकसित केली. विशेषतः जेते व जित यांच्या संबंधात होत असलेले बदल, निःशस्त्र उपायांचे नव्या जगात वाढलेले महत्व, स्वराज्यामध्ये अभिप्रेत असलेली सर्व प्रकारच्या लोकांची भौतिक व नैतिक प्रगती, परकीय समाजांचे स्वराज्यातील स्थान वगैरेबद्दल त्यांनी जे जाता जाता विवेचन केले आहे ते फार उद्बोधक झाले आहे. खेरीज, तत्कालीन सर्व राजकीय पक्षांची निर्भीड पाहाणी करून त्यांचे मूल्यमापन त्यांनी केले. तेही सामान्य वाचकांना आपली पक्षविषयक मते अधिक शास्त्रशुद्ध पायावर उभी करण्यास व त्यांची उजळणी करण्यास मार्गदर्शक ठरणारे असे झाले. एकंदरीत 'निःशस्त्रांच्या राजकारणा'ने महाराष्ट्रातील राजकीय विचाराला जोराची चालना दिली आणि तो विचार उच्च बौद्धिक नि तार्किक पातळीवर नेऊन ठेवला.

'निःशस्त्रांच्या राजकारणा'मुळे महाराष्ट्रातील राजकीय विचाराला जी चालना मिळाली ती काही वृत्तपत्रांच्या अभिप्रायांवरून समजण्यासारखी आहे. या पुस्तकात हिंदुस्थानातील परिस्थितीची मीमांसा "सूक्ष्म, तत्वग्राही व स्वतंत्र" अशा बुद्धीने केली आहे, असे 'केसरी'ने म्हटले आणि "राजकारणाच्या विद्यार्थ्यांनी व

१. पृष्ठे ७४ ते ७६, १५९ ते १६२.

२. पृष्ठ १६२.

जिज्ञासूंनी अवश्य वाचण्यासारखे हे विवेचक पुस्तक आहे" अशी त्याची शिफारस केली. पुस्तकातील विवेचन प्रतिसहकारिता पक्षास जुळणारे आहे, असे केसरीचे मत पडले. १९२९ पर्यंत स्वराज्याची मागणी मान्य न झाल्यास करबंदीची चळवळ सुरू करण्याचे केतकरांनी ठरविले होते; पण नैमित्तिक कार्यक्रमास घातलेली असली कालमर्यादा टिकत नाही, असे केसरीने सुचविले. प्रागतिक पक्षाच्या 'ज्ञानप्रकाशा'ने पुस्तकावर असा अभिप्राय दिला की, "पुस्तक निःसंशय वाचनीय, निदान मनोरंजक" आहे; पण अशी भीतीही प्रदर्शित केली, की "उपस्थित केलेली राजकारणातील श्रेष्ठ नैतिक भूमिका शाठ्यनीती संमत मानणाऱ्या पक्षास मंजूर होणे अर्थातच शक्य नाही." १९२९ मध्ये स्वराज्याची मागणी अमान्य होईल, हे केतकरांसारख्या आशावादी माणसाने गृहीत धरावे, हे ज्ञानप्रकाशला बरे वाटले नाही. 'स्वतंत्र हिंदुस्थान' या कट्टर पक्षाच्या पत्राला आणि 'प्रतियोगी' या प्रतिसहकारिता पक्षाच्या पत्राला पुस्तक अभ्यसनीय व विचारप्रवर्तक वाटले. मात्र ब्राम्हणेतर पक्षाच्या 'दीनमित्रा'ने पुढील मासलेवाईक मत व्यक्त केले: "लेखकाचे सर्वच सिद्धांत आम्हांस मान्य नाहीत. ब्राम्हणेतरवादाची केलेली मीमांसा तर पुष्कळच हेकडपणाची आहे! तसेच हिंदुस्थानातील बहुजनसमाजाच्या आजच्या मनाची धाव लक्षात न आणता राष्ट्रीय ऐक्याच्या भराऱ्या उंच उंच मारल्या आहेत."[1]

केतकरांनी 'निःशस्त्रांच्या राजकारणा'वर वर्षभर विद्यासेवकातून लिहिले आणि पुढे आपले लेखन एका पुस्तकातही समाविष्ट केले. पण हे सारे केवळ पांडित्याच्या भूमिकेवरून ते करीत नव्हते. बालपणापासून देशभक्तीची नि क्रियाशील राजकारणाची जी प्रवृत्ती त्यांच्यामध्ये होती तिला अनुसरून राजकारणात प्रत्यक्ष पडण्याचे भव्य बेत ते आखीत होते. म. गांधींच्या नेतृत्वासंबंधी त्यांनी असे निदान केले होते, की "म. गांधींचे अवतारकृत्य १९२४ च्या कॉंग्रेसच्या आठवड्यात संपले." "म. गांधींनी आपल्या शिक्षणसंपत्तीच्या आणि विचारसंपत्तीच्या साहाय्याने चालू राजकारणास जे देण्यासारखे होते ते शक्त्यनुसार दिले आहे."—आणि "तुम्ही सूत काढीत बसा, नाहीतर अत्याचारीपणा कराल, असे सांगण्याखेरीज महात्मा गांधींपाशी काही दुसरा कार्यक्रम नाही."[2]—त्यांना गांधींच्यामधील लोकविलक्षण अंतःस्फूर्ती, कर्तृत्व आणि लोकसंग्रहाचे चातुर्य यांचा अंदाज लागला नव्हता आणि गांधींची जागा ते स्वतःकडे घेऊ बघत होते! विद्यासेवकातील लेखमाला पुरी होते न होते तोच, १९२५ च्या डिसेंबरमध्ये त्यांनी 'स्वयं-निर्णयी संघ' स्थापन करण्याचा बेत उद्घोषित केला[3] आणि 'निःशस्त्रांचे राजकारण' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत पुढील वाक्ये प्रसिद्ध केली : "हिंदुस्थानला स्वराज्य प्राप्त करून देणे, हेच पुढच्या आयुष्यातील अनेक वर्षांचे कार्य ठेवावे, असा माझा हेतू आहे. या

१. सर्व अभिप्राय विद्यासेवक, मार्च १९२६, मध्ये उद्धृत.

२. पृष्ठ ५२.

३. 'माझ्या मनातील हेतू', विद्यासेवक, डिसेंबर १९२५.

कार्याकडे एकनिष्ठपणे मला ज्ञानकोशाच्या समाप्तीनंतर लागता येईल." "हे काम कसे करावे याची कल्पना आज हिंदुस्थानातील राजकारणी मंडळींना अजून चांगली समजली नाही, अशी माझी समजूत आहे, व यामुळे हे काम मी हाती घेऊन सिद्धीस न्यावे, असे मला वाटू लागले आहे." आपल्या विचारांचा सार्वत्रिक प्रसार व्हावा म्हणून पुस्तकाच्या पाच हजार प्रती त्यांनी छापल्या होत्या[1] आणि "पुस्तक महाराष्ट्रात एक लक्ष वाचकांनी वाचावे" अशी त्यांची अपेक्षा होती.[2] हिंदुस्थानातच नव्हे, तर "इंग्लंड, वसाहती, अमेरिका व जिनीव्हा येथे चळवळ करावी लागेल"[3] हे गृहीत धरून त्यांचे उद्दाम मन चळवळीचे मोटमोठे बेत आखण्यात केव्हाच रंगून गेले होते!

मात्र प्रारंभी बेत मोठे झाले, तरी पुढे प्रत्यक्ष कार्य फारसे काहीच झाले नाही. पुस्तकाच्या पाच हजार प्रती अपेक्षेप्रमाणे खपल्या नाहीत.[4] 'स्वयंनिर्णयी संघ' कंपन्यांच्या कायद्याखाली नोंदवावा, अशी कल्पना एप्रिल १९२६ मध्ये त्यांच्या डोक्यात येऊन 'स्वराज्यासाठी लिमिटेड कंपनी' या नावाचा एक लेख विद्यासेवकात त्यांनी लिहिला[5] आणि १९२७ मध्ये संघाची स्थापना झाली. केतकर या संघाचे अध्यक्ष होते, लोकमान्यांचे चिरंजीव श्रीधरपंत टिळक हे चिटणीस होते आणि अध्यक्ष व चिटणीस असे दोघे जणच संघाचे सदस्य होते! या दोन सदस्यांत सगळ्या खर्चाची वाटणी केली जाई. श्रीधरपंत टिळकांनी मे १९२८ मध्ये आत्महत्या केल्यानंतर सौ. शीलवती-बाई केतकर संघाच्या दुसऱ्या सदस्य झाल्या.[6] संघ आपली विचारसरणी प्रसृत करणार होता, कार्यकर्त्यांची संघटना उभारणार होता, आणि करबंदीच्या चळवळीची पूर्वतयारी करणार होता. पण ज्ञानकोशातून सवड न मिळाल्यामुळे किंवा अन्य काही कारणांनी केतकर १९२९ पर्यंत यांपैकी काहीही करू शकले नाहीत.—आणि १९२९ पासून तर केतकरांच्या राजकीय विचारांचे वारे एकदम गिरकी घेऊन वेगळ्या दिशेने वाहू लागले! त्यामुळे 'निःशस्त्रांचे राजकारण' पुढे रेटण्याचा प्रश्न मुळातच संपला! 'निःशस्त्रांच्या राजकारणा'तून याप्रमाणे प्रत्यक्ष राजकारण काहीही घडलें नाही; मात्र विचारांना चालना मिळून विद्यासेवा तेवढी घडली.

'निःशस्त्रांच्या राजकारणा'वरील लेखमाला संपण्यापूर्वीच विद्यासेवकामधून केतकरांनी सप्टेंबर १९२५ पासून एका कादंबरीच्या प्रकाशनास प्रारंभ केला. वास्तविक पाहाता, ते कादंबरीकार होतील असे त्यांच्या निकटवर्ती मित्रांनादेखील वाटत नव्हते.

१. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ७८.
२. निःशस्त्रांचे राजकारण, प्रस्तावना, पृष्ठ ४.
३. निःशस्त्रांचे राजकारण, प्रस्तावना, पृष्ठ २.
४. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ७८.
५. विद्यासेवक, मे १९२६.
६. 'व्हिक्टोरिअस इंडिया', पृष्ठे ६९-७०.

त्यांनी आपल्या एकदोन गोष्टी आपले बालमित्र नि कादंबरीकार श्री. बा. सं. गडकरी यांना एकदा दाखविल्या होत्या, तेव्हा गडकरी त्यांना म्हणाले होते, की "तुम्ही पाहिजे तर निबंध लिहावेत, पण कादंबरीच्या भानगडीत पडू नये." ज्ञानकोशाची योजना गडकऱ्यांना कळली, तेव्हा ते केतकरांजवळ उद्गारले होते, की "तुम्ही आपल्यायोग्य व्यवसाय घेतलात." उद्गारात खोच अशी होती, की 'जे कादंबरी लिहावयास लायक नाहीत त्यांनी निबंध लिहावेत, किंवा वाटल्यास नि झेपल्यास ज्ञानकोशही लिहावा!' पण गडकऱ्यांचा सल्ला केतकरांनी मानला नाही आणि कोणाच्याही ध्यानी, मनी, किंवा स्वप्नी नसताना ते कादंबरीकार बनले. ज्ञानकोश-मंडळ १९१६ साली सरकारातून नोंदून यावयाचे होते, तेव्हा त्यांना जो मोकळा वेळ सापडला तेवढ्यात, नागपूरला, त्यांनी एक कादंबरी लिहावयास घेतली होती आणि ईर्ष्येने गडकऱ्यांना खोटे पाडण्यासाठी कंबर कसली होती. कादंबरीची वीस प्रकरणे लिहून झाली, पण ज्ञानकोशाच्या गर्दीत कादंबरी पुरी झाली नाही. विद्यासेवक निघाल्यावर मात्र त्या वीस प्रकरणांपैकी शेवटची चार प्रकरणे फाडून नव्या सात प्रकरणांची त्यांनी त्यांत भर घातली आणि कादंबरी पुरी केली. हीच ती विद्यासेवकातून प्रकरणशः व निनावी प्रसिद्ध झालेली त्यांची 'गोंडवनातील प्रियंवदा'.[1] 'प्रियंवदे'नंतर कादंबरीलेखनाचा त्यांनी सपाटाच लावला. फेब्रुवारी १९२६ मध्ये 'प्रियंवदा' पुरी होताच, ऑगस्ट-सप्टेंबरच्या विद्यासेवकाच्या जोड-अंकात त्यांनी 'परागंदा' ही दुसरी कादंबरी प्रकाशित केली. १९२७च्या मार्च-एप्रिल-मेच्या जोड-अंकात 'आशावादी' ही तिसरी कादंबरी वाचकांच्या हाती दिली आणि १९२८ साली 'ब्राम्हणकन्या' ही चौथी कादंबरीही क्रमशः विद्यासेवकात घालण्यास प्रारंभ केला. विद्यासेवक नंतर काही काळ बंद पडल्याने 'ब्राम्हणकन्या' १९३० साली त्यांनी पुस्तकरूपाने एकदम काढली आणि त्याच साली 'गावसासू' ही पाचवी कादंबरीही त्यांनी महाराष्ट्रापुढे हजर केली! पाच वर्षांत कादंबऱ्यांचा असा पाचुंदा पुरा झाल्यावर त्यांनी हुश्श म्हटले. नंतर सुमारे सात वर्षांचा दीर्घ काल लोटल्यावर 'विचक्षणा' नि 'भटक्या' या दोन कादंबऱ्या लिहून त्यांनी सत्तक पुरे केले. आता त्यांच्यात कादंबरीकाराचे गुण नाहीत असे म्हणण्याची गडकऱ्यांची छाती नव्हती! माडखोलकरांसारख्या विख्यात ललित कादंबरीकाराजवळ तर ते मनमोकळ्या गर्वाने म्हणत, की "तुम्हा सर्वांपेक्षा मी चांगला कादंबरीकार आहे!"[2]

केतकरांचे व्यक्तित्व लोकविलक्षण होते आणि त्यांचा जीवनक्रमही असामान्य होता; त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्या सर्वसामान्य कादंबऱ्यांहून अगदी वेगळ्या बनल्या. ललित कादंबरीकार जगातील नाना सौंदर्ये टिपीत असतो, त्यात कल्पित सौंदर्यांची भर घालीत असतो आणि आपल्या कादंबरीत एक अभिनव नि सुंदर सृष्टी निर्माण करीत असतो. पण केतकरांनी सौंदर्याकडे फारसे लक्ष दिले नाही. सौंदर्यापेक्षा सत्य त्यांना प्रिय होते;

१. गोंडवनातील प्रियंवदा, प्रस्तावना.
२. ग. त्र्यं. माडखोलकर, प्रतिभा, जुलै १९३७.

किंबहुना सत्यच सौंदर्य होय अशी त्यांची समजूत होती. त्यामुळे आपल्या कादंबऱ्यांत सत्यदर्शन हाच मुख्य उद्देश ते धरून चालले. आपल्या व्यापक पण सूक्ष्म दृष्टीने त्यांनी पृथ्वीतलावरील जे अनेक समाज पाहिले होते त्यांची चित्रे कादंबऱ्यांत त्यांनी रेखाटली. मानवी मनात खोलवर बुड्या मारून त्याचे नग्न अंतरंग बघावे, अशी त्यांना फार हौस होती. त्या हौशीमुळे सभोवारच्या शेकडो व्यक्तींच्या मनाचे त्यांनी जे विदारक पृथक्करण केले होते, ते त्यांनी कादंबऱ्यांत मांडले. त्यांनी 'उत्तर अमेरिकेतील वसंत-काल' या अमेरिकेत लिहिलेल्या काव्यात म्हटले होते, की 'खऱ्या कवीने हृदयावरचा पडदा दूर करावा । निंदो अथवा स्तवो जन, कवी वर्णो मानवभावा ॥' सत्य 'मानव-भाव' वर्णन करण्याचे ते जुने ब्रीद त्यांनी कादंबऱ्यांमध्ये पुरेपुरे खरे करून दाखविले. शिवाय, त्यांच्या डोक्यात नवविचारांची असंख्य कारंजी सदैव थुयथुय नाचत असत. निबंधासारख्या किंवा प्रबंधासारख्या शास्त्रीय लेखनात ती कारंजी स्वैर नाचू देणे शक्य नव्हते. तेव्हा, जेथे निर्णायक नि व्यवस्थित विचार मांडण्याचे बंधन नाही, पात्रांच्या नि प्रसंगांच्या माध्यमामधून जेथे हवे ते विचार सुलभपणे मांडता येतात अशा कादंबरीच्या क्षेत्रात त्यांनी आपल्या साऱ्या स्वैर, रंगीबेरंगी नि आश्चर्यकारक विचारांना वाट मोकळी करून दिली. मिळून, त्यांच्या कादंबऱ्या सौंदर्यवादी सामान्य कादंबऱ्यांहून वेगळ्या बनल्या आणि त्यांना कादंबरी नि प्रबंध यांच्या मिश्रणाचे स्वरूप आले. त्या 'ललित कादंबऱ्या' न होता 'कादंबरी-प्रबंध' झाल्या. त्या वाचताना सौंदर्याच्या काव्यात्म सृष्टीत विहार केल्याचा रसपूर्ण अनुभव फारसा न येता झळझळीत, दाहक सत्य बघितल्याचा ज्ञानात्मक अनुभव वाचकांना येऊ लागला. मराठी वाङ्मयात आपल्या संमिश्र घडणीमुळे या कादंबऱ्या इतक्या स्वतंत्र ठरल्या, की त्या मुळात कादंबऱ्या आहेत किंवा नाहीत असा प्रश्न कित्येकांनी उपस्थित केला, कित्येकांनी त्यांना रद्दी कादंबऱ्या ठरविले आणि कित्येकांना त्यांत उच्च दर्जाची कलात्मकता दिसली ! केतकरां-च्यापूर्वी हरिभाऊ आपट्यांसारखा अत्यंत श्रेष्ठ कादंबरीकार मराठीत होऊन गेला होता; केतकर लिहीत असताना वामनराव जोशी हे दुसरे श्रेष्ठ कादंबरीकार मराठीत प्रभाव गाजवीत होते; पण केतकरांच्यावर कोणाचाच नि कसलाच प्रभाव ठळकपणे पडलेला नव्हता. कादंबरीच्या मुशीत त्यांचे खास सामाजिक निरीक्षण, मानवी मनाचे पृथक्करण, नि विचार त्यांनी ओतल्यामुळे व 'सत्य हेच सौंदर्य' अशी समजूत करून घेतल्यामुळे त्यांच्या कादंबऱ्या वेगळ्या बनल्याच; पण त्यांच्या व्यक्तित्वातील धृष्टपणाची, उपरोधाची, विनोदाची, चावटपणाची, गबाळेपणाची, रागद्वेषांची एक विक्षिप्त कांती त्या कादंबऱ्यांवर चढल्यामुळे त्या आणखी वेगळ्या बनल्या. 'कादंबरी-प्रबंध' हा वेगळा वाङ्मयप्रकार त्यांनी केवळ उत्पन्न केला नाही, तर त्या प्रकारावर 'केतकरीपणा'चा न पुसणारा ठसाही उमटवून ठेवला.

'गोंडवनातील प्रियंवदा व घरकुट्टे घराण्याचा इतिहास' या लांबलचक नावाच्या 'विद्यासेवका'मधील पहिल्या कादंबरीत, केतकरांनी १८९३-९४च्या सुमाराचा काल

घेतला आणि त्या कालातील नागपूरकडील काही व्यक्तींचा वृत्तांत वाचकांना सादर केला. कादंबरीची नायिका प्रियंवदा ही एक नुकतीच लग्न झालेली, सुशिक्षित, नि शृंगारप्रिय अशी लाघवी तरुणी असते. स्त्रियांनी नटावे, नवऱ्याबरोबर सखीसारखे वागावे व त्याला स्वतःमध्ये रममाण करावे, ही गोष्ट त्या वेळच्या समाजाला तितकीशी संमत नव्हती. पण प्रियंवदा म्हणते, की "स्त्रियांनी आपले आकर्षकत्व वाढविण्यासाठी काहीच प्रयत्न केला नाही तर नवरे बाहेर हिंडायला लागतात." "प्रजोत्पादनार्थ विवाहित स्त्रिया आणि मनोविनोदनासाठी वेश्या, अशी वृत्ती जोपर्यंत समाज पेरीत किंवा पिकवीत आहे तोपर्यंत समाजामध्ये वेश्या ही संस्था कायम राहील."[१] तेव्हा आपला पती रामभाऊ याच्याशी शृंगाराच्या अनेक लाडिक लीला ती करते आणि त्याला पूर्णपणे वश करून घेते. रामभाऊ बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लंडला जातो आणि तेथल्या मोकळ्या स्त्रीपुरुषव्यवहाराची वर्णने तिला लिहून धाडतो. त्या वेळी तिने त्याला जी अव्याज-मनोहर नि मनमोकळीं पत्रे पाठविली आहेत त्यांत पुरुषाभोवती मोहक रुंजी घालणाऱ्या स्त्रीमनाचे केतकरांनी फार सुंदर दर्शन घडविले आहे. रामभाऊच्या पत्रांतून तत्कालीन लंडनचे आणि तेथील समाजाचे, विशेषतः तेथे राहाणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांचे नि पुढाऱ्यांचे, वर्णन केतकरांनी करून घेतले आहे. रामभाऊ इंग्लंडातून परतल्यावर बॅरिस्टरी करू लागतो, संसार मुलाबाळांनी भरतो व प्रियंवदा नि रामभाऊ यांची कथा समाप्त होते! प्रियंवदेची सुशिक्षित नि शृंगारिक मूर्ती केतकरांच्या मनात नागपूरला असताना, विवाहापूर्वी, साकार झाली होती. तेव्हा, स्वतःला हवीशी वाटणारी, कल्पनाराज्ये करीत असता स्वतःच्या मनाला गुदगुल्या करणारी, अशी स्त्री प्रियंवदेच्या रूपाने त्यांनी तयार केली असावी. त्या वेळी त्यांचीही भावी पत्नी परदेशात नव्हती का? आणि तीही प्रियंवदेप्रमाणे पत्रांतून आपल्या प्रेमाचा वर्षाव त्यांच्यावर करीत नव्हती का?

या कादंबरीत वैजनाथशास्त्री या नावाचे एक पात्र त्यांनी घातले आणि प्रसिद्ध इतिहाससंशोधक राजवाडे यांचे त्या पात्राच्या द्वारे हुबेहूब चित्रण करून एक गंमत उडवून दिली! वैजनाथशास्त्री हे राजवाड्यांप्रमाणे ऐतिहासिक अवशेष धुंडीत हिंडतात, तसाच पोषाख करतात, तसेच विक्षिप्तपणे वागतात, तसाच भेदक युक्तिवाद करतात आणि वाचकांना राजवाड्यांची वारंवार आठवण करून देतात. राजवाड्यांसारख्या पुरुषांची लग्ने व्हावीत, म्हणजे त्यांचे जीवन सुखाचे होऊन त्यांचे कार्यही सुलभ होईल, अशी केतकरांची कल्पना होती. संशोधनासारख्या उच्च उद्योगात गुंतलेल्या पुरुषांना पैसा मिळत नाही, तेव्हा अशा पुरुषांच्या बायका मिळवत्या असाव्या, असेही केतकरांना वाटे. त्यासाठी, कादंबरीत वैजनाथशास्त्र्यांचा शारदाबाई या विद्वान, विधवा शिक्षिकेशी केतकरांनी पुनर्विवाह लावून दिला आहे! वैजनाथशास्त्र्यांचे चित्र त्यांनी राजवाड्यांसारखे इतके हुबेहूब रंगवले, की ही कादंबरी वाचून सर यदुनाथ सरकार या

१. पृष्ठे १०१, १०२.

कलकत्त्याच्या इतिहाससंशोधकांना वाटले, की राजवाड्यांचा पुनर्विवाह करण्याचा खरोखरीच बेत होता! सर यदुनाथ यांनी राजवाड्यांच्या मृत्यूनंतर 'मॉडर्न रिव्ह्यू'मध्ये जो एक मृत्युलेख लिहिला त्यामध्ये भोळेपणाने त्यांनी तसा उल्लेखदेखील केला![1] असो. वैजनाथशास्त्री ऐतिहासिक अवशेष धुंडाळीत रत्नपूरला आले असताना शारदाबाईशी त्यांचा अनपेक्षितपणे परिचय होतो आणि दोघांमध्ये नाना विषयांवर अतिशय उद्बोधक नि मूलगामी संवाद होतात. इतिहाससंशोधनाचे तंत्र, संशोधक संशयी बनण्याची कारणे, पाश्चात्य नि पौर्वात्य स्त्रीदाक्षिण्य, लैंगिक मानसशास्त्र, विधवांचा धर्म वगैरे विषयांवर या संवादांतून केतकर प्रकाश टाकतात आणि वाचकांना एकदम एका वैचारिक उच्च वातावरणात नेऊन सोडतात. विशेषतः, स्त्रीच्या जीवनाचा हेतू कोणता या प्रश्नावर आणि 'राजवाडे' सर्व सुखांचा होम करून इतिहाससंशोधनात का रमले या प्रश्नावर त्यांनी जो प्रकाश टाकला तो उल्लेखनीय आहे. वैजनाथ व शारदा यांच्या संवादांना ते 'गोंडवनातील आरण्यके' म्हणतात, ते खोटे नाही. पुढे, आपल्या खाण्यापिण्याची अडचण दूर व्हावी या 'शुद्ध' हेतूने वैजनाथशास्त्री शारदाबाईशी लग्न करतात आणि त्यांनी पुनर्विवाह केला म्हणून सुधारक वृत्तपत्रे त्यांचे अभिनंदन करतात. त्या वेळी वैजनाथशास्त्री उद्गारतात, "लोक कसे मूर्ख आहेत. वररुची आणि हेमचंद्र यांच्या प्राकृत भाषेत जे फरक आहेत ते भिन्नकालमूलक आहेत की भिन्नस्थानमूलक आहेत याविषयीच्या माझ्या शोधाचे महत्त्व या लोकांना नाही. आंध्रकालीन प्राकृत अंकित लेखांत द्विवचनांची राहिलेली उदाहरणे मी शोधून काढली, त्याची यांस किंमत नाही. आणि माझी दुसरी बायको ही कुमारी नसून विधवा होती याचेच महत्व यांना आहे!"[2]

शारदाबाईच्या जीवनामधून केतकरांनी असे सूचित केले आहे, की सुशिक्षित स्त्रीलाही कधीकधी ज्ञानसेवा किंवा समाजसेवा यांसारख्या अमूर्त नि व्यापक ध्येयांनी समाधान लाभू शकत नाही. तिचे जीवन मातृत्वाखेरीज, संसाराखेरीज अपूर्ण अन् सुने असते. शारदाबाई जेव्हा आपल्या जीवनातील सुनेपणा प्रियंवदेपाशी बोलून दाखवितात, तेव्हा प्रियंवदेच्या तोंडी तर केतकरांनी फारच क्रांतिकारक विचार घातले आहेत. प्रियंवदा म्हणते, "राष्ट्र म्हणजे बायका; पुरुष नव्हे. राष्ट्ररक्षण म्हणजे बायकांचे रक्षण; पुरुषांचे रक्षण नव्हे. राष्ट्रातले पुरुष नाहीसे झाले तरी थोडक्या पुरुषांच्या साहाय्याने अनेकपत्नीपद्धती सुरू करून किंवा बायकी भाषेत बोलावयाचे झाल्यास सामुच्चयिक पतिपद्धती सुरू करून एका पिढीत पुन्हा राष्ट्र गजबजविता येईल. पण राष्ट्रातल्या बायकाच नाहीशा झाल्या म्हणजे राष्ट्र गेलेच. यासाठी राष्ट्रातल्या स्त्रीवर्गाने समाजसंरक्षण हे आपले कर्तव्य म्हणून स्वीकारले पाहिजे....एखाद्या जमिनीचा विशिष्ट बी पेरण्याकडे उपयोग

१. 'राजवाडे चरित्र', भा. वा. भट, पृष्ठ ४९७.

२. पृष्ठ ११८.

करावा की करू नये हे ज्याप्रमाणे जमिनीच्या मालकाने ठरवावयाचे असते, बियांच्या व्यापाऱ्याने ठरवावयाचे नसते, त्याप्रमाणे प्रजोत्पादनाचा प्रश्न केवळ स्त्रियांनी आपल्या इच्छेने सोडवावा. विवाह आणि प्रजोत्पादन याविषयी झालेले सर्व पुरुषी नियम व्यर्थ आहेत....जो पुरुष आवडला त्यास आपलासा करण्यासाठी किंवा जो आपला नवरा असेल त्याला आपल्या हातात ठेवण्यासाठी स्त्रीने जर काही खटपटी केल्या तर त्यांस मी मुळींच गैर समजत नाही." यानंतर प्रियंवदा शारदाबाईंना सांगते, की "तुम्ही वैजनाथशास्त्र्यांना पकडलेच पाहिजे."[१]—आणि शारदाबाई मग वैजनाथशास्त्र्यांना 'पकडतात'!

कादंबरीत बिंब्रा तांबडे ही एक तरुण नि विधवा मालगुजारीण असते. तिला हरिभय्या मोघे नावाचा अल्पशिक्षित पण बहुश्रुत गवई गाणे शिकविण्यासाठी येतो. बिंबा व हरिभय्या यांचा परिचयोत्तर पुनर्विवाह झाल्याचे केतकरांनी दाखविले आहे आणि प्रौढ विधवांचे पुनर्विवाह व्हावयाचे तर त्यांच्या ओळखी पुरुषांशी होण्याची संधी समाजात असली पाहिजे, अशा मताचे प्रतिपादन केले आहे. हरिभय्या कल्लण नायकीण स्वतःवर खूष झाल्याची दंतकथा बिंबेला सांगतो, 'अंबरगत पयोधरांची' रामजोशाची छेकापन्हुती तिला ऐकवितो, तिच्याशी चोरपावलांनी अंगलगट करतो नि तिला जिंकून घेतो. पुनर्विवाह लावणाऱ्या संस्थेच्या मार्फत होणारे पुनर्विवाह त्याला संमत नाहीत. तो म्हणतो, की "तरुणांनी तरुणींशी आपले आपण लग्न जुळवावे. आईबापांच्या चोरून पाहिजे तर पत्रव्यवहार करावा. आणि स्पष्ट भाषेत सांगावयाचे म्हटल्यास तरुणींस तरुणांनी फूस लावून पळवून न्यावे."[२] अशा व्यवहारात काही दुष्ट लोक विधवांना पळवून नेतील, खराब करतील नि टाकून देतील, ही शक्यता आहे. तेव्हा विधवांना फशी पाडणाऱ्या दुष्ट लोकांविरुद्ध कायदा व्हावा, असे हरिभय्या म्हणतो.

अनंतराव घरकुट्टे हा बिंब्राचा बाप आणि बंड्रूनाना घरकुट्टे हा अनंतरावांचा मुलगा अन् रामभाऊचा मित्र. त्या दोघांच्या उपकथांमध्ये केतकरांनी नागपुरातील स्वार्थमय जीवनाचे, लाचखाऊपणाचे नि क्षुद्र मुत्सद्दीपणा गाजवून उच्च पदाधिकार मिळविणाऱ्या जंतूंचे प्रत्ययकारी वर्णन केले आहे. बंड्रूनाना सिरोंचा येथे नायब तहशीलदार म्हणून नोकरीला असताना त्याला जो सुसंघटित लाचबाजीचा अनुभव येतो तो सत्य परिस्थितीवरूनच केतकरांनी रंगवला होता. ज्ञानकोशाचे चिटणीस श्री. गोविंदराव तांबे यांच्या घरी ते नागपूरला असताना नेहमी जात. त्या वेळी श्री. तांब्यांच्या वडिलांनी त्यांना स्वतःच्या नायब-तहशीलदारीतले जे अनुभव सांगितले तेच बंड्रूनानाचे अनुभव होत. शिवाय अनंतराव घरकुट्टे हे पात्रही खऱ्या व्यक्तीवरून त्यांनी निर्माण केले असावे. कारण अनंतरावाप्रमाणे स्वतःच्या मुलीला युरोपीय कमिशनरीण घरी येण्याच्या वेळी उंच टाचेचे बूट घालायला लावणारे किंवा तिला 'गव्हर्नमेंट हौसची सवाण' बनवून तेथे आपले

१. पृष्ठे ११५-११६.

२. पृष्ठ ९०.

वजन वाढवू पाहाणारे एक महाभाग त्या काळी नागपुरात अनेकांना माहीत होते.'[1]

'प्रियंवदा' विद्यासेवकातून प्रसिद्ध झाल्यानंतर मराठी वाचकांनी तिचा स्वीकार कसा केला, ते काही वृत्तपत्रांच्या अभिप्रायांवरून समजू शकेल. 'केसरी'ने लिहिले की 'पुण्यामुंबईच्या उपवनातील कमल-वसंतांच्या विलासांना विटलेल्या वाचकांचे ही गोंडवनातील प्रियंवदा चित्ताकर्षण करील आणि त्यांना वाङ्मयातील तोंडपालट घडवील.... या कादंबरीत बृहन्महाराष्ट्रातील नागपुरी समाजस्थितीचे अठरापगड समाज बघितलेल्या डॉ. केतकरांच्या दृष्टीतून दर्शन घेता येते....सदरहू पुस्तक हा त्यांच्या विचित्र मतांचा अजबखानाच आहे.'[2] नागपूरच्या 'महाराष्ट्र'ने कादंबरीच्या सैल संविधानकावर आक्षेप घेतला, गैरलागू नावावर टीका केली आणि म्हटले, की 'संविधानकापासून संवादापर्यंत हरएक बाबतीत ही कादंबरी जगावेगळी आहे....नागपूर-मध्यप्रांतातील लोकांना तर ही कादंबरी वाचताना आपण पूर्वी पाहिलेल्या, ऐकलेल्या गोष्टीच पुन्हा पाहात-ऐकत आहो की काय असा भास होईल....वैजनाथ हे एका महाराष्ट्रीय विक्षिप्त विद्वानाचे चित्र वाटते.... काही संभाषणे व प्रसंग "चावट" आहेत; पण...मार्मिक टीकात्मक विचारांनी भरलेली ही एक उद्बोधक कादंबरी आहे....प्रियंवदेची पत्रे चटकदार आहेत नि तिच्या मनःस्थितीचे वर्णन हृदयंगम वाटते....व्यक्तींची स्वभावचित्रे त्यांनी सफाईने रेखाटली आहेत, म्हणून कलेच्या दृष्टीनेही या कादंबरीचे महत्व कमी आहे, असे म्हणवत नाही.'[3] 'उदय' या पत्राने कादंबरीतील विचारवप्रर्तनाच्या गुणाचा ठळकपणे उल्लेख केला व असा अभिप्राय दिला, की 'कादंबरीत निर्भीडपणे जी नवी रीत घालून दिली आहे तीबद्दल डॉ. केतकरांचे आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतो.' 'ज्ञानप्रकाश'चे मत असे पडले, की 'मनोवेधकता निरनिराळ्या पात्रांच्या स्वभाववैचित्र्याने प्राप्त झाली आहे. पुस्तक संपूर्ण वाचण्याची उत्सुकता कायम राहाते.'[4]

'प्रियंवदे'नंतर लिहिलेल्या 'परागंदा' या दुसऱ्या कादंबरीत केतकरांनी नागपूर-मध्यप्रांतातून वाचकांना तडक अमेरिकेत नेले. 'परागंदे'च्या उपसंहारात त्यांनी स्वतःच म्हटल्याप्रमाणे, 'परागंदे'च्या कथानकात १९१० ते १९२० या कालातील अमेरिकेतील हिंदी समाजाचे जीवन निरनिराळ्या प्रकारांनी रंगवले गेले आहे. ते स्वतः पाचएक वर्षे विद्यार्थीदशेत अमेरिकेमध्ये राहिले होते आणि तेथील हिंदी समाज त्यांनी अभ्यासूपणे बघितला होता. तेव्हा, त्यांनी जे समाजचित्र कादंबरीत रंगवले ते अतिशय वास्तव आणि जिवंत उतरले. या कादंबरीतील गोविंदराव कामत हे गृहस्थ नोकरीच्या निमित्ताने सपत्नीक अमेरिकेला आलेले असतात आणि तेथेच त्यांच्या तीन मुलांचा जन्म झालेला असतो. अमेरिकेत वाढणाऱ्या मुलांवर हिंदू संस्कृतीची छाप कायम ठेवणे त्यांना किती अवघड

१. आठवणी, गो. चिं. तांबे.
२. 'आशावादी', मलपृष्ठ ४.
३. 'प्रियंवदेचे टीकाकार', विद्यासेवक, मार्च १९२६.
४. विद्यासेवक, एप्रिल १९२६, मलपृष्ठ ३.

जाते, हे त्यांच्या कथेत केतकरांनी मुख्यतः दाखविले आहे. ते मुलांना देशभक्ती शिकवू लागतात तेव्हा मुले त्यांना सांगतात, की "तुमची जन्मभूमी हिंदुस्थान असेल, पण आमची जन्मभूमी अमेरिका आहे." "आम्ही अमेरिकन लोकांनी इंग्रजांना चोप दिला आणि इंग्रज लोकांनी तुम्हांला चोप दिला."[१] ते खास मुंबईहून गणपती मागवून घरात गणपति-उत्सव करतात, पण मुले गणपतीविषयी पूज्यबुद्धी बाळगण्याऐवजी गणपतीच्या रूपाची चेष्टा करू लागतात. मुले मराठी शिकलेली असतात, पण मराठी त्यांना मातृभाषा न वाटता आपसात बोलण्याची गुप्त सांकेतिक भाषा वाटते! गोविंदरावांच्या मनात एकदा असा विचार येतो, की मुलांना शिक्षणासाठी हिंदुस्थानात पाठवून त्यांच्यावर हिंदू संस्कार होऊ द्यावे. पण मध्यंतरी जेव्हा ते स्वतःच हिंदुस्थानात जाऊन येतात तेव्हा त्यांचे मन हिंदुस्थानातील देखाव्यांनी पालटून जाते. "तेथे असताना त्यांना हिंदुस्थानातील आयुष्यक्रमाविषयी बराचसा कंटाळा उत्पन्न झाला. तेथील प्लेग, मलेरिया इत्यादी गोष्टींच्या भीतीत नेहमी राहावयाचे त्यांस दुःखप्रद वाटे. रक्तपिती झालेली माणसे रस्त्यात भीक मागत खुशाल हिंडतात आणि भिक्षा मागायला अगदी जवळ येतात, हे पाहून त्यांना रस्त्यातून हिंडण्याची भीती वाटू लागली होती. आपल्या आप्तांच्या घरी त्यांना असे दिसून आले, की आप्तांच्या बायकांना आणि मुलांना हातरुमाल वापरण्याची सवय नाही, बायका पदरांना नाके पुसतात आणि कुंकवाची बोटे दारांना किंवा भिंतीला पुसतात. मुलांना धाडशीपणाचे शिक्षणच नाही, त्यांच्या महत्वाकांक्षा अगदी लहान, त्यांचे मत्सरदेखील अत्यंत क्षुद्र गोष्टींबद्दल आणि आईबापांची प्रवृत्तीदेखील मुलांना धाडसास प्रवृत्त करील अशी मुळीच नाही. सुशिक्षित वर्गाशी त्यांचा संबंध आला तेव्हा तर त्यास सुशिक्षित कसे म्हणावे हाच गोविंदरावांस प्रश्न वाटू लागला....बऱ्याच सुशिक्षित वर्गास चेक म्हणजे काय चीज आहे, हे ठाऊक नाही, असे ते म्हणत."[२] अशा स्थितीत मुलांना हिंदुस्थानात न पाठविता त्यांचे शिक्षण ते अमेरिकेतच होऊ देतात आणि त्यामुळे अमेरिकन संस्कृतीचा पगडा मुलांवर पक्का बसतो. त्यामुळे अमेरिकेतच स्थायिक होण्याचा बेत ते करतात आणि स्थायिक होणाऱ्यांच्या 'सेट्लर्स असोसिएशन'मध्ये भाग घेऊ लागतात.

गोविंदरावांचा मुलगा रघू हा 'हिंदी अमेरिकन' तरुणाचा एक नमुना असतो. झपाटेबंद काम उरकण्याचा अमेरिकन गुण त्याच्यात उतरून तो पक्का 'हसलर' बनलेला असतो, तो अनेक खेळांत नैपुण्य संपादन करतो, अर्थशास्त्रात पारंगत होतो आणि स्वतःचे हृदय न गमावता तरुण पोरींशी प्रेमाच्या चेष्टा कशा कराव्या ही 'फ्लर्टिंग'ची विद्याही त्याला ठाऊक असते. मत्तमयूरी नावाची एक सुंदर वेश्याकन्या वैद्यकी शिकण्यासाठी अमेरिकेत आलेली असते नि त्याच्याहून ती वयाने मोठी असते. पण तिचे आराधन करण्यात जातीची, कुलीनपणाची किंवा वयाची आडकाठी

१. पृष्ठ १.
२. पृष्ठ १६.

त्याला वाटत नाही. इंग्लंडमध्ये जाऊन, आईवडिलांना न कळवता, तो मयूरीबरोबर लग्न करतो. आईवडीलही सुनेचे शिक्षण नि सौंदर्य बघून त्याच्या लग्नाला संमती देतात. अमेरिकन रीतिरिवाजात रुळलेले गोविंदराव म्हणतात, की "लग्न झाल्यावर सुनेचा मुका घ्यावा लागेल. तर मला एवढेच पाहिले पाहिजे, की जिचा मुका घ्यावयास मला वाईट वाटणार नाही अशी बायको रघूला पाहिजे....मयूरीचा मुका घ्यायला माझी बिलकूल हरकत नाही!"[1] रघू नि मयूरी यांच्या लग्नानंतरच्या ज्या शृंगारक्रीडा केतकरांनी वर्णिल्या आहेत त्या हिंदी मनुष्याला चांगल्याच चावट वाटण्यासारख्या आहेत. अपुरे कपडे घातलेले असता मयूरीने रघूच्या कमरेवर स्वार होणे आणि त्याला घोडा घोडा करून हाकलणे वगैरे प्रकार त्यात आहेत! असो. मयूरीची हकीकत सांगत असता केतकरांनी अमेरिकन हिंदी समाजातील अनुनयपद्धतीवर प्रकाश टाकला आहे आणि मयूरीच्या प्रेमभावनेला जे हेलकावे बसतात त्यांचे वास्तवदर्शी वर्णन केले आहे. तिच्याहून वयाने लहान असणारा रघू जेव्हा तिच्याशी प्रथम प्रेमचेष्टा करू लागतो, तेव्हा "आवडत्या कुत्र्याचे गळ्यात हात घालणे किंवा चाटणे हे जसे आनंददायक होते तसे तिला रघूचे बागडणे किंवा गोंजारणे आनंददायक होई."[2] तिचे खरे मन गंगाधर नामक प्रौढ क्रांतिकारक तरुणावर असते; पण जेव्हा 'आपण विवाहित आहोत' असे सांगून गंगाधर तिला नकार देतो तेव्हा तिची निराशा होते. पुढे रघूचे वय वाढते, त्याच्या रुंद छातीवर आपले मस्तक विश्वासाने टेकवता येईल असे तिला वाटते आणि ती रघूचा स्वीकार करते.

गोविंदरावांची मुलगी लीला हिच्या हकीगतीतही अमेरिकेतील अनुनयपद्धतीचे हुबेहूब चित्रण केतकरांनी केले आहे. लीला वयात आली की तिचे मन अनेक पुरुषांच्याभोवती रुंजी घालू लागते. एकदोन पुरुषांशी तिचे प्रेमसंबंध किंचित जुळतात आणि शेवटी ती डॉ. सरंजामे या कोकणस्थ ब्राम्हणाशी विवाहबद्ध होते. सरंजाम्यांपूर्वी तिचा गंगाधराशी जो संबंध येतो, त्यात स्त्रिया अनेकदा पराभूत नि दुःखी माणसावर कसे प्रेम करतात, याचे मार्मिक दर्शन केतकरांनी घडवले आहे.

या कादंबरीत उपर्युक्त गंगाधराची कथा घालून, देशभक्तीखातर हिंदुस्थानातून परागंदा होणाऱ्या आणि अमेरिकेतील 'गदर' या क्रांतिकारक उठावात सामील होणाऱ्या तरुणांचा जीवनक्रम केतकरांनी वाचकांपुढे ठेवला आहे. 'त्यात पळ न वसावे। ज्यात दुरित-भीति, धर्म, नय नाही॥' या भावनेने गंगाधर परतंत्र हिंदुस्थान सोडतो आणि अमेरिकेत जाऊन मोठे देशभक्तीचे, नेकीचे नि पवित्र जीवन व्यतीत करतो. जाताना बायकोचे दागिने वाटखर्चासाठी त्याने घेतलेले असतात, पण त्या स्त्रीधनाची परतफेड तो अमेरिकेतून हस्त्याहस्त्याने करतो. मयूरी आणि लीला त्याच्यावर प्रेम करू लागतात, मोहाचे प्रसंग त्याच्यावर येतात; पण आपली पत्नी रुक्मिणी हिच्याशी

१. पृष्ठ १३२.

२. पृष्ठ ६९.

तो बेइमान होत नाही. पुढे, रुक्मिणी अनेक हालअपेष्टा भोगून अमेरिकेत येते आणि दोघांचे मधुर मीलन होते. रुक्मिणी ही एक एकनिष्ठ, प्रेमळ पत्नी केतकरांनी दाखविली आहे आणि अभाग्य-भाग्याची आभाळे येत-जात असता तिच्या मनात नवऱ्याविषयी कसकसे भावतरंग उठतात, याचे हळुवार नि मनोरम चित्रण केले आहे. काम आणि स्वार्थ या दोन मुख्य भावनांच्या विश्लेषणात सदैव रमणारे केतकर त्यागाच्या नि निष्ठेच्या उदात्त भावनांतही कसे सहजतेने रमू शकत, ते गंगाधर-रुक्मिणी यांच्या कथेवरून चांगले दिसून येते.

विविध व्यक्तींच्या हकीगती सांगून अमेरिकन हिंदी समाजाचे व्यापक नि प्रातिनिधिक चित्र उभे करीत असता केतकरांनी त्या समाजाच्या भवितव्याविषयी काही विधायक विचार कादंबरीत मांडले आहेत. पैकी एक विचार ज्ञानकोशात आधी त्यांनी मांडलेला होता. तो असा, की परागंदा हिंदू लोकांचे हिंदुत्व टिकावे आणि त्यांच्यावर हिंदुत्वाचे संस्कार घडत राहावे म्हणून हिंदुस्थानातून हिंदू स्त्रिया आणि भिक्षुक यांना परागंदा हिंदू लोकांच्या वसाहतीत नेण्यात यावे.[१] त्यांनी जो 'ॲरिस्टोक्रसी'बद्दल दुसरा विचार मांडला तोही 'हिंदुइझम' या ग्रंथापासून त्यांनी पूर्वी वारंवार मांडलेला होता. पण आता त्यांनी त्याला थोडे वेगळे स्वरूप दिले. ॲरिस्टोक्रसी ऊर्फ 'उघड्या तोंडाची उच्च जात' ब्राम्हणांमधून किंवा संस्थानिकांमधून तयार होऊ शकेल, असे पूर्वी ते म्हणत होते; पण परागंदा हिंदी लोकांमधून अशी जात तयार होऊ शकेल, असे विचार आता प्रा. शंकरराव गोगटे या अमेरिकेत स्थायिक झालेल्या विमर्शकाच्या तोंडी त्यांनी घातले. ॲरिस्टोक्रसी हा कोणाशीही लग्न करणारा वर्ग असावा; तो शिक्षणाने, राहाणीने नि दर्जाने समाजाच्या शिरोभागी शोभावा; आणि त्याच्याशी विवाह-संबंध जोडल्याने सर्व राष्ट्र एकीकृत होऊन, त्याच्या अनुकरणाने सर्व राष्ट्राला प्रगतीची चालनाही मिळावी, अशी ॲरिस्टोक्रसीबद्दल केतकरांची स्थूल कल्पना होती. तेव्हा प्रा. गोगटे म्हणतात, की "जो उच्च वर्ग असतो त्याची राहाणी उच्च प्रकारची असली पाहिजे व तो इतर वर्गापेक्षा सुशिक्षित असला पाहिजे, अशी इतरांची अपेक्षा असते. ही अपेक्षा येथे असलेल्या हिंदुस्थानीय मंडळींसंबंधाने सहजच पुरी होईल.... हिंदुस्थानातल्या कॉलेजांतून बाहेर पडणाऱ्या मनुष्यापेक्षा येथील न्हावी किंवा रस्तेझाडू अधिक सुशिक्षित असणार; तर या ठिकाणी राहाणारा भारतीयांचा वर्ग सरसकट शिक्षण-दृष्ट्या हिंदुस्थानातील पुढाऱ्यांच्या तोडीचा बनेल, ही अपेक्षा चुकीची होईल काय? त्याचप्रमाणे येथील शास्त्रसेवक वर्ग भारतीय विद्वानांपेक्षा कितीतरी उच्च प्रकारचा तयार होईल." ॲरिस्टोक्रसी कोणाशीही विवाहसंबंधाला तयार असावी लागते, तेव्हा प्रा. गोगटे पुढे म्हणतात, की "आज तुम्हांस हिंदुस्थानात परिचयमूलक व प्रेममूलक विवाह जुळविण्यास अडचण पडणार. तसले विवाह सुरू झाल्याशिवाय जातिभेद कधी

१ पृष्ठे १०१, १०२.

जाणार नाही."...'पण येथे अमेरिकन समाजाच्या संसर्गाने भारतीय मंडळीत परिचय-मूलक व प्रेममूलक विवाह होतील, जातिभेदाची भावना राहाणार नाही, आणि येथील भारतीय समाज सर्वांशी विवाहसंबंध जोडायला सिद्ध राहील.' प्रा. गोगटे या परागंदा ॲरिस्टोक्रसीबद्दल अपेक्षांच्या खूपच उंच उंच भराऱ्या मारतात. ते म्हणतात, की "शास्त्रीय ज्ञानाची, उरकशक्तीची व भांडवलाची माणसे ही ज्या देशात जवळजवळ असतील किंवा वारंवार सहजगत्या भेटतील त्या ठिकाणी मोठमोठ्या योजना तयार होणार. अर्थात त्या योजना हिंदुस्थानात तयार होणार नाहीत....हिंदुस्थानच्या विकासासाठी लागणाऱ्या योजना लंडन येथेच होतात, हे आपणास अनेक रेल्वे-कंपन्यांच्या उदाहरणावरून स्पष्ट समजणार आहे. यासाठी बराच काळपर्यंत हिंदुस्थानच्या विकासाचे कार्य दूरस्थांकडून होणार, हे लक्षात ठेवले पाहिजे.... हिंदुस्थानच्या विकासाच्या अत्यंत मोठमोठ्या योजना जशा लंडन येथे होऊ शकतील तशाच न्यूयॉर्क येथे होऊ शकतील. तर हिंदुस्थानाबाहेर राहाणाऱ्या (हिंदी) लोकांना हिंदुस्थानीय विकासाच्या दृष्टीने महत्वाचा कार्यक्रम हाती घेण्याजोगा आहे."[१]

केतकरांनी 'प्रियंवदे'मध्ये वैजनाथशास्त्री हे पात्र आणून जशी राजवाड्यांची गंमत केली, तशी 'परागंदे'मध्ये लाला गजपतराय हे पात्र आणून लाला लजपतरायांची नि तत्कालीन हिंदी पुढाऱ्यांची गंमत केली. मात्र गजपतरायांच्या चित्रणात हिंदी पुढाऱ्यां-मधील संकुचितपणा, अनभ्यस्तपणा, शिष्टपणा, छुपा स्वार्थीपणा इत्यादी दुर्गुणांच्या गडद छटा त्यांनी उपहासगर्भ शैलीने रंगविल्या आणि ती गंमत भयंकर बनविली.—इतकी की, गजपतरायांच्या चित्रणाबद्दल अनेक मंडळी त्यांच्यावर मनस्वी संतापली होती.[२] गजपतराय काँग्रेसच्या पैशाने इंग्लंड-अमेरिकेत जातात, पण प्रीव्ही कौन्सिलातले काही खाजगी खटलेही जाताना खिशातून नेतात, असे त्यांनी दाखविले आहे. लोकांना नि विशेषतः तरुणवर्गाला गजपतराय वृद्धपणाने मोठा उपदेश करतात, पण त्या तरुण वर्गा-इतका त्याग त्यांनी स्वतः केलेला नसतो, असे त्यांनी म्हटले आहे. प्रगत पाश्चात्य समाजाचे किंवा प्रगत शास्त्रांचे ज्ञान गजपतरायांजवळ असत नाही, असेही त्यांनी सूचित केले आहे. शिवाय, क्रांतिकारक तरुणांच्या उद्योगाबद्दल मनातून आनंद मानावयाचा, पण वरून त्यांना विरोध करावयाचा, अशी जी गजपतरायांची नि तत्कालीन सनदशीर पुढाऱ्यांची वृत्ती असते तीवर त्यांनी कडाडून हल्ला चढविला आहे. डॉ. सरंजामे यांच्या मुखाने लाला गजपतरायांना ते म्हणतात, की "इंग्रजांचे खून झाले म्हणजे तुम्हांस अंतःकरणातून आल्हाद होणार आणि वर्तमानपत्रातून तुम्ही खुनाचा तिटकारा दाखविणार. इतकेच नव्हे, तर तो खून करणाऱ्या मनुष्यास 'आपल्या कृत्याने काही लोकांस तरी आनंद झाला व त्यामुळे देशाचा काहीतरी फायदा झाला' इतके समाधानही मिळू नये अशी खटपट करणार. तुम्ही त्याला कॉवर्ड ऊर्फ नपुसक म्हणणार,

१. पृष्ठे १५५ ते १५८.

२. उदाहरणार्थ पाहा : ग. त्र्यं. माडखोलकर, प्रतिभा, जुलै १९३७.

त्याला देशाचा शत्रू म्हणणार!...लालाजी, सांगा पाहू, अशा प्रकारच्या लेखांनी तुम्ही आपली लेखणी विटाळली आहे किंवा नाही?"[१] केतकरांनी आपल्या जहाल देशभक्तीच्या पोटीच गजपतरायांचे नि त्यांच्या द्वारे तत्कालीन पुढाऱ्यांचे असले मर्मभेदक चित्रण केले. पण ते करताना नामसादृश्यामुळे लजपतरायांवर गजपतरायांचे सारे दोष त्यांनी धसमुसळेपणाने लादले नि लजपतरायांवर फार अन्याय केला. पण विनोदाचा खिसाडी टोला हाणीत असता न्यायान्यायाचा नाजूक विचार केला तर ते केतकर कसले!

या कादंबरीतील डॉ. विष्णुपंत सरंजामे ही व्यक्ती केतकरांनी बरीचशी स्वतःवरून रंगविली आहे. डॉ. सरंजाम्यांचे वर्णन वाचीत असता डॉ. केतकरांचेच साररूपाने दर्शन घेतल्याचा भास होतो. केतकरांप्रमाणे डॉ. सरंजाम्यांचे वडील पोस्टात नोकर असतात आणि सरंजाम्यांच्या बालपणी त्यांचे निधन झालेले असते. केतकरांचे जसे पेशव्यांशी नाते होते तसे सरंजाम्यांचे पेशव्यांशी काही लागेबांधे असतात आणि बालपणी त्यांना उगाचच्च वाटत असते, की मराठी राज्य गेले ते आपल्या पूर्वजांच्या चुकीमुळे गेले आणि ते परत मिळवण्याची काहीतरी खटपट आपण केली पाहिजे. त्यांची आई अचानक मृत्युमुखी पडते तेव्हा "वाटेल तिकडे जावयास चारही दिशा मोकळ्या झाल्या"[२] असे केतकरांसारखे उद्गार काढून ते अमेरिकेला आलेले असतात. तेथे मोलमजुरी करून स्वावलंबनाने ते आपले शिक्षण पूर्ण करतात. तेथे प्रेमाच्या नि कामाच्या ज्या लहरी त्यांच्या मनावर उठतात त्यांबद्दल केतकरांप्रमाणे स्पष्टपणे नि धृष्टपणे ते कबुली देतात, की "माझे प्रेम अनेक स्त्रियांवर जडले आहे."[३] त्यांनाही 'राष्ट्रत्यागमोह' झालेला असतो आणि ते म्हणतात, की 'ज्या राष्ट्रात माझा आणि माझ्या जातिबांधवांचा पदोपदी अपमान होतो व तो अपमान दूर करणे माझ्या शक्तीबाहेरचे असते त्या राष्ट्रात मला पाऊल ठेवावेसे वाटत नाही. येथे जन्मभर जरी कपबश्या विसळाव्या लागल्या तरी मी विसळीन, पण हिंदुस्थानात जाऊन परके लोक स्वदेश-बांधवांना बुटाखाली कसे तुडवतात ते पाहाणे नको.'[४] ते केतकरांप्रमाणे मानवी मनाचे छांदिष्ट निरीक्षक असतात.—इतके की त्यांची प्रेयसी लीला शीलवतीबाईंप्रमाणे एकदा त्यांना म्हणते, "तुमची मला भीती वाटते. मला अशी शंका येऊ लागते, की तुम्ही मला मित्र समजता की केवळ शास्त्रीय दृष्टीने अभ्यास करण्याची वस्तू या दृष्टीने माझ्याकडे पाहाता!" मग त्यांना हे स्पष्ट करावे लागते, की "मी काही केवळ विचार प्रसवणारी व्यक्ती नव्हे. मी हाडामांसाचा मनुष्य आहे आणि मला अंतःकरणही आहे."[५] ते कोकणस्थ ब्राह्मण असतात, पण लीलेशी म्हणजे शेणव्याच्या मुलीशी लग्न

१. पृष्ठ १४३.
२. पृष्ठ ३४.
३. पृष्ठ ३०.
४. पृष्ठ २९.
५. पृष्ठे ७२, ७४.

होऊन मिश्रविवाहाच्या बाबतीत ते केतकरांच्याच पंक्तीला बसलेले असतात. आपल्या मिश्रविवाहाबद्दल कोणी चांभारचौकशा केल्या तर ते जी उत्तरे देतात त्या उत्तरांत नि केतकर जी विनोदी उत्तरे देत त्यात अतिशय साम्य आहे. उदाहरणार्थ, ते कधी-कधी म्हणतात, की "माझा आहार रूढ ब्राम्हणी आहारापेक्षा जास्त व्यापक असतो; म्हणून मला शेणव्याची मुलगी करणेच जास्त योग्य होते. सोवळ्या ब्राम्हणाची मुलगी माझ्या संसर्गाने मी कां दूषित करावी?"[१] केतकर समाजशास्त्राचे विद्यार्थी होते आणि डॉ. सरंजामे रसायनशास्त्राचे विद्यार्थी असतात. पण दोघांच्या विचारांच्या पद्धती अगदी सारख्या आहेत. केतकर जसे एका शास्त्राचे सिद्धान्त दुसऱ्या शास्त्राच्या विषयाला लावीत, एकीकडचा प्रकाशझोत दुसरीकडे वळवीत, तसे सरंजामेही करतात: 'मानवी व्यवहारात रसायनशास्त्र आणण्यास ते एकाएकी प्रवृत्त होत नसत; तथापी रसायन-शास्त्रास परिचित असलेली पद्धती मात्र ते आणीत. संस्कृतीची जी अंगे आहेत त्यांचे पृथक्करण करून...अनेक अंगांचे निरनिराळे मिश्रण केल्याने काही निराळे उपयुक्त पदार्थ होतील, असे विचार त्यांच्या मनात येत. हिंदू मंडळींमध्ये जर मुसलमानी संप्रदाय पसरविला तर त्यांमध्ये काय आवेश उत्पन्न होतो हे पाहावे, त्याचप्रमाणे वेदान्त मुसुलमानांत पसरविला तर काय होईल ते पाहावे, इत्यादी गोष्टी ते बोलत असत.'[२] ते असाही एक विचार मांडतात, की 'आपल्या तरुण मुलांना गुजराथी स्त्रिया आवडल्या तर त्यांच्याशी प्रेम जुळवायला त्यांनी गुजराथी पगडी घातली तर काय झाले!'[३]

'परागंदा' प्रसिद्ध झाल्यानंतर महाराष्ट्रात चोहोकडून तिच्यावर स्तुतीचा नि निंदेचा एकच वर्षाव झाला. "अत्यंत बाष्कळ, अश्लील व अतएव सर्वस्वी त्याज्य" अशी 'मनोरंजना'ने तिची संभावना केली. 'मुमुक्षू'ने अशा अर्थाचा अभिप्राय दिला, की 'व्यक्तिचित्रे अकृत्रिम वठली आहेत. जातिभेदोन्मूलन, मिश्रविवाह, पाश्चात्य प्रियाराधन यांना लेखक अनुकूल आहे; पण जुन्या परंपरेची विचारसरणीही शांतपणाने मांडली आहे. कादंबरीत स्वाभिमानपोषक द्रव्ये आहेत आणि नाहीतही. एकंदरीत कादंबरी समाजात क्रांतिकारक विचार फैलावण्यास साह्य करणारी असून प्रस्तुतच्या हिंदू समाज-घटनेस बाधक आहे.' 'आनंद'ने म्हटले, की "घाणेरडे विचार, मोडकीतोडकी भाषा,...आणि आचरटपणाचे ढंग या सर्वांचा समुच्चय" म्हणजे ही कादंबरी होय! 'नवाकाळ'ने दिलेल्या मताचा आशय असा, की 'कादंबरीतील विचारांनी नि प्रसंगांनी वाचकाच्या मनात खळबळ झालीच पाहिजे. विवेचने इतकी क्रांतिकारक आहेत, की पानागणीक वाचकाच्या रूढ समजुतींना धक्का बसतो. पात्रांची चरित्रे अस्सलबरहुकूम असल्याने त्यांच्यात निराळाच ताजेपणा भासतो.' 'प्रतियोगी' या पत्राने कादंबरीतील विचार एकांडे, क्रांतिकारक, अतिप्रगल्भ, बोचरे व कटू आहेत, असे म्हटले; पण त्यांत

१. पृष्ठ १६३.
२. पृष्ठ ११६.
३. पृष्ठ ११९.

असत्यता नाही अशी त्यांची भलावणीही केली. कादंबरीतील "उच्च व मोहक" वातावरणाने 'वैनतेया'ची "आश्चर्यवत् पश्यति" अशी स्थिती झाली.[१] 'महाराष्ट्र'ने आपले मत पुढीलप्रमाणे दिले : "या कादंबरीत केतकरांनी जसे भारताच्या सरहद्दीचे तसेच भारतीयांच्या रूढ धार्मिक, नैतिक, राजकीय कल्पनांचेही उल्लंघन केले आहे आणि त्यामुळेच कादंबरीला इतके अपूर्वरम्य स्वरूप प्राप्त झाले आहे. अमेरिकेत जाऊन राहिलेल्या भारतीयांच्या आकांक्षा, त्यांच्या मातृभूमीविषयीच्या भावना, परकीय संस्कृतीशी संबंध आल्यामुळे विचारांत व वर्तनात झालेले परिवर्तन, त्यांचे वैयक्तिक व सामाजिक चारित्र्य आणि त्यांच्या जीविताविषयीच्या कल्पना यांचे मोठे मार्मिक व सूक्ष्म वर्णन केतकरांनी या कादंबरीत केले आहे. प्रणयीजनांच्या गूढ हृद्गताचे धागे त्यांनी जितक्या सहृदयतेने उलगडून दाखविले आहेत तितक्याच कुशलतेने 'गदर' चळवळीत पडलेल्या क्रांतिकारक तरुणांच्या विचारांची गुंतागुंत उकलण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे."[२] 'विविधज्ञानविस्तारा'त प्रा. वामनराव जोशांनी जो टीकालेख लिहिला त्यात कथानकाच्या मांडणीतील व जुळणीतील काही दोषांवर त्यांनी बोट ठेवले व आकर्षकपणाचे कारण सांगताना म्हटले, की "कथानकापेक्षा व्यक्तिवैलक्षण्य व विचार-वैलक्षण्य यांमुळे अधिक मौज उत्पन्न झाली आहे." पुढे ते उद्गारतात, की "बंडखोरी इतकी पुढे गेली आहे की तिचे नावीन्य, मनोरंजकत्व, साहस इत्यादी दृष्टींनी अभिनंदन करणे इष्ट असले तथापी लेखणी जराशी अडखळते"![३]

'विद्यासेवका'मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'आशावादी' या तिसऱ्या कादंबरीत केतकरांनी ब्रम्हगिरी ऊर्फ देवीदासपंत अत्रे या व्यक्तीच्या चरित्राच्या आधारे कादंबरीची सर्व उभारणी केली. ब्रम्हगिरी परदेशातून १९२५-२६ साली हिंदुस्थानात आल्यानंतर त्यांचे आपल्या पत्नीशी पुनर्मीलन होईपर्यंत जे तीन महिने लोटतात ते तीन महिने हा मुख्य कथाकाल त्यांनी घेतला. तेवढ्यात ब्रम्हगिरींच्या जीवनात घडलेले प्रसंग त्यांनी कादंबरीत दिले आहेत आणि ब्रम्हगिरींशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने ज्यांचा संबंध येतो अशा पाचदहा व्यक्तींच्या जीवनातील प्रसंगही कादंबरीत सांगितले आहेत. शिवाय, मुख्य कथाकालाच्या आधी घडलेल्या कित्येक गोष्टी पूर्ववृत्ते सांगण्याच्या निमित्ताने किंवा आत्मनिरीक्षण चित्रित करण्याच्या निमित्ताने कादंबरीत त्यांनी प्रविष्ट केल्या आहेत आणि जागोजाग समाजचित्रण, चर्चा, विचारविनिमय यांना भरपूर वाव दिला आहे. त्यामुळे ही कादंबरी म्हणजे एक भलीथोरली, चित्र-विचित्र, ओबडधोबड, पण अज्ञानाच्या गारठ्यात ज्ञानाची ऊब देणारी अशी कथा-कंथा वाटते. या कादंबरीत ब्रम्हगिरींच्या आठवणी नि आत्मनिरीक्षण यांच्या निमित्ताने महाराष्ट्रीय समाजाचे वीस वर्षांचे धावते चित्र आले आहे आणि मोंत्रासा,

१. 'परागंदा कादंबरीचे स्वागत', विद्यासेवक, डिसेंबर १९२६.
२. विद्यासेवक, ऑक्टोबर १९२६, मलपृष्ठ ३.
३. डिसेंबर १९२६.

पोर्ट सय्यद, आफ्रिकेतील मळे इत्यादी ठिकाणच्या लैंगिक परिस्थितीचे उल्लेखही आले आहेत. ब्रम्हगिरींची बॅ. मोऱ्यांशी चर्चा होते तेव्हा सुशिक्षित ब्राम्हणेतर पुढाऱ्यांची कैफियत ऐकायला मिळते, तर ब्रम्हगिरींना कपिला नामक वेश्या जेव्हा स्वतःचे आत्मोद्धाराचे विचार सांगते तेव्हा वेश्यांच्या उन्नतीचा एक नवा कार्यक्रम नजरेसमोर येतो. ब्रम्हगिरी व्याख्यानासाठी प्रतिसहकारपक्षाच्या आमंत्रणावरून नागपुरास जातात, तेव्हा डेंगणे, भोंगळवार, अलंकार वगैरे मंडळींची ओळख होते आणि तीबरोबर तत्कालीन राजकीय पक्ष नि त्यांच्यातील दुय्यम मंडळींची मनःस्थिती यांचाही परिचय घडतो. केतकरांनी आपल्या नेहमीच्या सवयीप्रमाणे या कादंबरीत ब्रम्हगिरींचे चित्रण काहीसे स्वतःवरून केले आहे आणि डेंगणे, भोंगळवार, अलंकार वगैरेंचे चित्रण ज्ञानकोशामुळे स्वतःला खास परिचित झालेल्या नागपुरातील काही खऱ्या व्यक्तींवरून केले आहे. पैकी डेंगणे, भोंगळवार व अलंकार या त्रिकुटाच्या चित्रणात केतकरांच्या स्वभावातील खवचटपणा, उपरोध नि कुचाळीची हौस यांचे विशेष दर्शन घडते. ब्रम्हगिरींनी संन्यास घेतलेला असल्यामुळे कादंबरीत संन्यासविषयक चर्चा येते आणि छाटी जाळल्यावर ब्रम्हगिरी आपल्या खिस्ती झालेल्या बायकोचा स्वीकार करीत असल्यामुळे शुद्धिसंघटनावरील विचार कादंबरीत प्रविष्ट होतात. डॉ. नंदिका ही एक परदेशाला जाऊन आलेली सुंदर डॉक्टरीण असते आणि तिचे शिक्षण लालनाथ या तिच्या नवऱ्याने कारकुनीत कष्ट उपसून केलेले असते; त्यामुळे कादंबरीत विषम विवाहाचे पहिले चित्र आले आहे.—आणि बॅ. विश्वामित्रांना राजकारणात पडण्याची ज्या तऱ्हेची महत्वाकांक्षा असते त्या तऱ्हेची महत्वाकांक्षा त्यांची पत्नी विहंगमा हिला नसल्यामुळे, नवऱ्याने बडा नोकरदार व्हावे ही तिची महत्वाकांक्षा असल्यामुळे, कादंबरीत विषम विवाहाचे दुसरे चित्र आले आहे. परमानंद नावाच्या डॉक्टरापासून पद्मावती या नर्सला एक मुलगी झालेली असते; त्यामुळे अनौरस संततीचा प्रश्नही कादंबरीत येतो. डॉ. नंदिका, बॅ. विश्वामित्र, डॉ. परमानंद वगैरे मंडळींना ब्रम्हगिरी केवळ भेटलेले असतात किंवा ब्रम्हगिरींनी त्यांच्याशी काही चर्चा केलेली असते; पण या साऱ्या मंडळींना केतकरांनी कादंबरीत निःसंकोच जागा दिली आहे. एवढेच नव्हे, तर या मंडळींचा हात धरून आणखीही अनेक पात्रे, त्यांच्या कथा, नि त्यांचे विचार कादंबरीत खुशाल वावरताना आढळतात! मिळून केतकरांच्या अफाट मनात असंख्य उद्बोधक गोष्टींचा जो प्रचंड अजबखाना होता त्याचा एक झरोका या कादंबरीच्या रूपाने त्यांनी खुला केला, असे म्हणता येईल.

कादंबरीत जे अनेक नवे, विक्षिप्त नि विचारशक्तीला विजेचे धक्के देणारे विचार केतकरांनी सांगितले, त्यांपैकी ब्रम्हगिरींच्या तोंडचे गीतेसंबंधीचे विचार वानगी म्हणून बघण्यासारखे आहेत. ब्रम्हगिरी म्हणतात, की "गीता हा ग्रंथ उपयोगी न समजता सैतानी ग्रंथ आहे, असे मी समजतो; का की फलाशा सोडून कर्म करावे, स्वार्थाचा मागमूस नको, अहंकारभावना नको, इत्यादी गोष्टी बोलून या ग्रंथाने लोकांना

आडमार्गास नेले आहे. स्वार्थाची भावना निसर्गाने म्हणा किंवा ईश्वराने म्हणा, आपल्या हृदयात जागृत ठेवली आहे, ती तिचे निर्मूलन करण्यासाठी ठेविली आहे काय ?...जगातील मोठाली कार्ये अहंकारामुळे म्हणजे द्रव्याच्या व कीर्तीच्या लोभामुळे झाली आहेत की अहंकारभाव पुसटून टाकण्याने झाली आहेत! स्वाभाविक गोष्टींस नादान ठरविणे आणि अशक्य गोष्टींस स्तुत्य बनविणे ही क्रिया जे 'महात्मे' करतात ते लोकांस थोतांडी आणि ढोंगी बनवितात."[१] "गीता हा कर्मयोगावरचा उत्तम ग्रंथ नव्हे. समाजातील अनेक वर्गांच्या कर्माविषयी किंवा कर्तव्याविषयी स्पष्टीकरण गीतेत नाही."[२] "आपणास आपल्या कर्तव्याविषयी विचार करताना प्राचीनांच्या अपुऱ्या अनुभवाने जे विचार उत्पन्न झाले त्यांवर अवलंबून मुळीच राहाता येणार नाही....गीतेतला उपदेश आज आपणास आयुष्यक्रमण करण्यास कितपत उपयोगी आहे, असे मला विचारले तर...मी सरळ सांगेन, की त्याचा आपणास काहीएक उपयोग नाही."[३] "ज्या भारतीय अंतःकरणाच्या आणि बुद्धीच्या प्रभावाने गीताग्रंथासारखे ग्रंथ तयार झाले ती भारतीय बुद्धी आणि अंतःकरण ही त्या ग्रंथांपेक्षाही श्रेष्ठ आहेत, ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे."[४]

'प्रियंवदा' व 'परागंदा' या दोन कादंबऱ्यांनी महाराष्ट्रात जशी खळबळ माजली तशीच खळबळ 'आशावादी'मुळेही माजली. चोहोकडून स्तुती नि निंदा यांचा एकच मारा पुन्हा एकदा झाला. 'किर्लोस्कर-खबर'ने अशा अर्थाचा अभिप्राय दिला, की 'कादंबरी नावाप्रमाणे प्रत्येकाच्या अंतःकरणात आशावाद उत्पन्न करणारी आहे. स्त्रीशिक्षण, शुद्धी, कौन्सिलप्रवेश, प्रेम श्रेष्ठ की धर्म श्रेष्ठ, जुन्याला चिकटून राहावे की नवे घ्यावे, धर्माची व्याख्या काय, इत्यादी प्रचलित प्रश्नांचे इतक्या बहारीने विवेचन केले आहे, की एकदा पुस्तक हाती घेतल्यावर ते पुरे केल्याशिवाय खाली ठेववतच नाही. निव्वळ सत्यान्वेषणाच्या दृष्टीने सर्व कथाभाग रंगविलेला आहे. ज्यांना आपली विचारशक्ती समतोल व शोधक बनवावयाची असेल त्यांना प्रस्तुत कादंबरी फारच आवडेल.' 'पुरुषार्थ'ने म्हटले, की "ही कादंबरी विचारांत क्रांती करणारी आहे. पण गीतेसारख्या पवित्र ग्रंथावर कारण नसता भलतीच टीका मध्ये मध्ये केली असल्यामुळे साधारण ज्ञानाच्या तरुणांवर तिचा अनिष्ट परिणाम होईल असे वाटते. लेखकांनी जगद्वंद्य गीताग्रंथापेक्षा आपल्या विचारांस अधिक श्रेष्ठ समजण्यात मोठी चूक केली आहे." 'आनंद'ने असे उद्गार काढले, की "असत्याला किंवा आंशिक सत्याला सत्याचा पोशाख चढवून आपल्या विचारांत नावीन्य, सडेतोडपणा आणि उत्तानता आहे, असे भासविण्याची कला डॉ. केतकरांना बरीच साधलेली दिसते.

१. पृष्ठ १२८-१२९.
२. पृष्ठ १००.
३. पृष्ठ ११७.
४. पृष्ठ ११९.

पण त्याबरोबरच श्रीमद्भगवद्गीतेसारख्या सर्वमान्य व पूज्य ग्रंथाला 'सैतानी' म्हणण्यापर्यंत त्यांच्या मूर्खपणाच्या धारिष्ट्याचीही मजल गेलेली पाहून त्यांच्या लेखनाच्या द्वारे तरुण मंडळींत... उच्छृंखलपणाची साथ पसरेल की काय अशी भीती वाटते. डॉ. केतकर आता गप्प बसतील तर महाराष्ट्राच्या भावी पिढीवर त्यांचे निःसंशय उपकार होतील." बडोद्याच्या 'सहविचार' या पत्राने "कथानक संपूर्ण नाही, उपाख्यानांचे सांधे विस्कळीत आहेत व असंबद्ध विवेचनाचा सुकाळ आहे" इत्यादी दोष दाखवून शेवटी मात्र असे मत दिले, की "विविध विषयांवरील उद्बोधक विचारांची व भिन्न समाजात उघडे डोळे ठेवून वावरणाऱ्या एका विद्वानाच्या अनुभवांची खाण या दृष्टीने आम्ही 'आशावादी' वाचण्याचा सर्वांना आग्रह करतो." कादंबरीत खऱ्या व्यक्तींचे जे उपरोधिक चित्रण केतकरांनी केले त्याच्यासंबंधी 'प्रजापक्षा'ने पुढील टीकात्मक वाक्य लिहिले : "ज्ञानकोशासारख्या ग्रंथाच्या संपादनाची जबाबदारी अंगावर घेणाऱ्या माणसाने क्षुद्र भावनेस बळी पडून आपला वैयक्तिक सूड कादंबरीतील पात्रांच्या रूपाने उगवून घेण्याचा प्रयत्न करणे व एके काळच्या आपल्या दोस्तावर हात चालविणे विपरीत दिसत असले तरी विचित्रताप्रिय डॉक्टरसाहेबांस त्यात गैर न वाटणे साहजिक आहे." 'स्वराज्य'ने दिलेल्या मताचा आशय असा होता, की "अनेक विषयांचे सुंदर व कित्येक ठिकाणी तंतोतंत वस्तुस्थितिनिदर्शक वर्णन" कादंबरीत आले आहे. ती "अत्यंत वाचनीय" आहे. "वाचकांच्या विचारशक्तीला ताण देऊन ती त्यांच्या ज्ञानात भर घालील यात शंका नाही."[१]

आपले मानवी मनाचे नि मानवी समाजाचे निरीक्षण कोठेतरी मांडावे, आपले विचार कोठेतरी सांगावे, थोडक्यात म्हणजे आपल्या डोक्यातील असंख्य उद्बोधक गोष्टींना अभिव्यक्ती द्यावी, म्हणून केतकरांनी कादंबरीलेखन केले. उद्बोधक गोष्टींची अभिव्यक्ती मनोरंजकही व्हावी आणि वाचकांनी ती गोडीने ग्रहण करावी, म्हणून त्यांनी ती कादंबरीच्या माध्यमातून करण्याची क्लृप्ती योजली. कादंबरीसारखे ललित वाङ्मय किंवा 'काव्य' यांच्या स्वरूपाबद्दल त्यांच्या ज्या काही कल्पना होत्या त्यांना धरूनच ही गोष्ट त्यांनी केली. त्यांच्या विचारसृष्टीत 'काव्यासाठी काव्य', 'सौंदर्यासाठी सौंदर्य', 'कलेसाठी कला' वगैरे तत्वांना जवळजवळ मुळीच स्थान नव्हते. सौंदर्याच्या उपासनेला जीवनात काही स्वतंत्र नि स्वयंभू स्थान आहे, याची त्यांना तितकीशी जाणीव नव्हती. ते एके ठिकाणी म्हणतात, की "काव्याचे कार्य म्हटले म्हणजे समाजाच्या ज्या इतर अनेक गरजा आहेत त्यांमध्ये माधुर्याने किंवा दुसऱ्या कोणत्यातरी आकर्षकतेने ग्राह्यता उत्पन्न करणे हे होय. समाजामध्ये लोकांस उपदेश पाहिजे. लोकांस जी संस्था टिकवावयाची असेल ती संस्था टिकविण्यासाठी तिच्याभोवती तेजोमंडळ निर्माण झाले पाहिजे, आणि यासाठी त्या संस्थेशी संबद्ध ज्या व्यक्ती असतात त्या गौरविल्या पाहिजेत. समाजास जुन्या आठवणी राखावयाच्या असतात, तर त्या आठवणी आकर्षक

१. 'आशावादी कादंबरीवर लोकमत', विद्यासेवक, एप्रिल १९२८.

रीतीने लोकांपुढे आल्या पाहिजेत. यासाठी उपदेश, संस्थासंबद्ध व्यक्ती, जुन्या आठवणी, यांमध्ये जो गुण किंवा द्रव्य मिसळावयाचे तो गुण किंवा तदाश्रयी द्रव्य हे काव्य होय."[१] साहजिकपणे, समाजाचे जे व्यापक नि विविध उद्बोधन त्यांना करावयाचे होते ते आकर्षक करण्यासाठी त्यांनी कादंबरीसारख्या ललित वाङ्मयप्रकाराचा किंवा 'काव्या'चा आश्रय घेतला. मात्र उद्बोधनासाठी कलेला, काव्याला किंवा कादंबरीला त्यांनी इतके राबविले, की कलेचे नि काव्याचे स्वयंभू महत्व मानणारे जे टीकाकार होते ते अतोनात गडबडून गेले. त्यांच्या कादंबऱ्यांवर कलेच्या दृष्टीने जी कडक टीका झाली तिचे मर्म यातच होते. ती टीका म्हणजे 'कला नि वास्तव', 'सौंदर्य नि सत्य', 'प्रेय नि उपयुक्त' या द्वंद्वांतील जो सनातन वाद आहे त्या वादाचेच एक अंग होते. केतकर या वादात एका बाजूला उभे होते आणि आपली बाजू स्वयंसिद्ध आहे, ती सिद्ध करण्यासाठी खटपट करण्याची जरूर नाही, अशी त्यांची प्रथम समजूत होती. पण त्यांच्या कादंबऱ्यांवर जेव्हा चोहोकडून टीकेची वादळे उठली तेव्हा आपल्या बाजूचे काही समर्थन केले पाहिजे, असे त्यांना वाटू लागले. 'प्रियंवदा', 'परागंदा' आणि 'आशावादी' या तीन कादंबऱ्यांनंतर 'महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण' हा अगदी वेगळ्या धर्तीचा ग्रंथ विद्यासेवकात त्यांनी लिहिला तो अशा परिस्थितीमुळेच लिहिला.

'काव्यपरीक्षणा'च्या लेखनापर्यंत आपण वळणे घेत घेत कसे आलो, याचे निवेदन केतकरांनी काव्यपरीक्षणाच्या प्रस्तावनेत पुढीलप्रमाणे केले आहे. ते म्हणतात : "माझ्या कादंबऱ्यांविषयी जी बरीचशी प्रशंसात्मक किंवा निंदात्मक टीका प्रसिद्ध झाली तीवरून मला असे दिसून आले, की कादंबऱ्यांतील माझ्या मताने ज्या गोष्टींविषयी अभिज्ञता वाचकांत दिसावयास पाहिजे होती त्या गोष्टींसंबंधाने निंदक व मित्र या दोघांतही चांगली जाणीव दिसली नाही. अशा स्थितीत ग्रंथपरीक्षणात्मक तत्वांच्या बाबतीत आपणच काही सांगितले पाहिजे असे वाटू लागले. पण तेव्हा असे वाटू लागले, की आपण स्वकीय वैयक्तिक ग्रंथाचे केवळ समर्थन करण्याच्या उद्देशाने ग्रंथ लिहिण्याऐवजी व्यापक ग्रंथ कां लिहू नये? तेव्हा, जरा व्यापक, तात्विक, आणि स्वग्रंथनिरपेक्ष असे पुस्तक लिहावे, असे मनात ठरले आणि त्याची योजना मनात करताना इतर लेखकांच्या परीक्षणात्मक लेखांचा आढावा घेण्याचा विचार सुचला. महाराष्ट्रात विचार कितपत झाला आहे याविषयी काही आढावा घेऊन नंतर आपणास काव्यरसज्ञतेविषयी जे काय सांगावयाचे असेल ते सांगावे, असे वाटले.—आणि विविधज्ञानविस्ताराच्या पहिल्या वर्षापासून बहुतेक पुस्तकपरीक्षणे वाचून टाकली....शंभरदीडशे परीक्षणे गोळा केली....ज्याप्रमाणे कायदा शिकताना खटल्यांचे निवाडे घेऊन कायदा शिकण्याची पद्धत आहे त्याप्रमाणे साहित्यशास्त्र शिकावयाचे ते प्रसिद्ध आणि परिचित ग्रंथांवर झालेल्या टीकांचा संग्रह करून

१. महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण, पृष्ठ १११.

अभ्यासकाने का शिकू नये?...हा संग्रह तयार होत असता 'काव्यपरीक्षणा'ची जाहिरात दिली व जाहिरात देताना मुख्यतः अर्वाचीन परीक्षणेच देण्याचा विचार होता.... तथापी जाहिरात प्रत्यक्ष लिहिताना असे वाटू लागले, की जुन्या मराठी ग्रंथकारांमध्ये जी काव्यचिकित्सात्मक बुद्धी दिसून येते तिचा आढावा घेऊन नंतर अर्वाचीन काव्यपरीक्षण मांडावे." तेव्हा जुन्या ग्रंथकारांच्या 'काव्यपरीक्षणाचा'च शोध ते घेऊ लागले आणि त्यातून 'महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण अथवा मराठी वाङ्मयाभिरुचीच्या इतिहासातील एक प्रकरण : ब्रिटिश सत्तेपूर्वीचा काल' हा ग्रंथ जन्म पावला! केतकरांचे ज्ञानशोधक मन एका क्षेत्रातून दुसऱ्या क्षेत्रात कसा संचार करी आणि त्याची क्षितिजे क्षणोक्षणी कशी फाकत नि पालटत जात, ते 'काव्यपरीक्षणा'च्या या जन्मकथेत चांगल्या प्रकारे दिसून येते.

ब्रिटिश सत्ता सुरू होण्यापूर्वी मराठीत जे वाङ्मय निर्माण झाले त्याच्या आधारे जुन्या काळात काव्याविषयी अभिज्ञता कशी होती, सामान्यतः वाङ्मयाविषयी अभिरुची कशी होती, त्याचा शोध 'काव्यपरीक्षणा'त केतकरांनी केला. हा शोध करताना शोधाच्या पद्धतीचा आराखडा घालून देणे व त्या पद्धतीने शोध करून मिळालेले फलित पुढे मांडणे, असे द्विविध कार्य त्यांच्यापुढे होते. पैकी संशोधनाचा विस्तृत अनुभव गाठीशी असल्यामुळे शोधाच्या पद्धतीचा तपशीलवार आराखडा ते घालून देऊ शकले; पण जुन्या मराठीच्या खोल अभ्यासासाठी लागणारा वेळ त्यांच्यापाशी नसल्यामुळे प्रत्यक्ष शोध फारसा ते करू शकले नाहीत. तरीही जुन्या काळात वाङ्मयाच्या नि काव्याच्या स्वरूपाविषयी ज्या कल्पना महाराष्ट्रात वावरत होत्या त्यांची रूपरेषा त्यांनी चांगल्या प्रकारे तयार केली आणि भावी संशोधकांना तपशील भरण्याचे काम तयार करून ठेवले. शिवाय, ज्या क्षेत्रात शिरावयाचे त्यात नाकासमोर न जाता आजूबाजूला संशोधक विचारांच्या शोधज्योती फेकत जाण्याचा त्यांचा जो स्वभाव होता त्याला अनुसरून 'काव्यपरीक्षणा'त अनेक तऱ्हेने त्यांनी विषयांतर केले आणि साहित्यशास्त्र व साहित्याचा इतिहास या विषयांत स्फुट भर घातली. ते पंधरासोळा वर्षांचे होते तेव्हा त्यांनी शिवरामस्वामींच्या ग्रंथांवर एक लेख लिहिला होता, महाविद्यालयात असता त्यांनी 'तुकाराम, एकनाथ इत्यादी साधूंचे महाराष्ट्रातील कार्य' या विषयावर बक्षिसासाठी निबंध लिहिला होता आणि अमेरिकेतून परतल्यावर त्यांनी 'तौलनिक पद्धती आणि मराठी गीर्वाण', किंवा 'काव्यग्रंथांचे महत्वमापन'[1] यांसारखे लेख लिहिले होते. साहित्य व साहित्यशास्त्र यांसंबंधी त्यांच्या डोक्यात याप्रमाणे जे विचार वर्षानुवर्षे बनत होते त्यांची परिणती 'काव्यपरीक्षणा'त एक प्रकारे झाली, असे म्हणता येईल. 'काव्यपरीक्षणा'त काही त्रुटी असतील, पण मराठीतील साहित्यशास्त्रीय ग्रंथात आपल्या वैशिष्ट्याने वेगळा दिसणारा तो ग्रंथ आहे, यात शंका नाही. ज्ञानकोशाला "भाषांतरवजा भारूड" म्हणणारे प्रा. त्रिं. वि. जोशीदेखील "काव्यपरीक्षण हा ग्रंथ मौलिक

१. लोकशिक्षण, पौष शके १८३६ व माघ शके १८३६.

आहे, त्यात विचाराची नवी दृष्टी आहे" असे म्हणतात, हे लक्षात घेण्याजोगे आहे.[1]

काव्यपरीक्षण लिहून बाहेर पडले; पण ज्या मूळ हेतूने केतकरांनी काव्यपरीक्षणाच्या लेखनाला हात घातला तो मूळ हेतू बाजूलाच राहून गेला होता. त्यांच्या कादंबऱ्या अ-कलात्मक आहेत, तंत्रदुष्ट आहेत वगैरे टीका त्यांच्यावर होत होती आणि त्या टीकेचे निराकरण त्यांना करावयाचे होते. पण या विषयाकडून त्या विषयाकडे असे मूलगामी भ्रमण करता करता 'काव्यपरीक्षणा'त त्यांनी वेगळाच विषय हाताळला होता. 'काव्यपरीक्षणा'त तर आपल्या कादंबऱ्यांवरील टीकेला त्यांनी उत्तर दिले नाहीच, पण पुढेही सविस्तर उत्तर देण्याला त्यांना कधी सवड सापडली नाही. १९३६ साली 'मी व माझे टीकाकार' या नावाची लेखमाला जून-जुलै-ऑगस्टच्या ज्योत्स्नेच्या अंकांमध्ये त्यांनी लिहिली आणि त्या लेखमालेत मात्र कादंबऱ्यांवरील टीकेला पुढील त्रोटक नि मासलेवाईक उत्तर दिले. त्यांनी लिहिले :

'गिरगावी व सदाशिवपेठी लेखक महाराष्ट्रीय समाजाचे अल्प स्वरूपच स्वतःच्या नि वाचकांच्या नजरेसमोर ठेवतात. पण माझ्या मनात अशी इच्छा आहे, की जितक्या विविध प्रकृती लोकांपुढे आणता येतील तेवढ्या आणाव्यात, जितक्या व्यापक समाजाचे चित्र रेखाटता येईल तेवढे रेखाटावे. ही इच्छा मनात वागत असल्यामुळेच कादंबरीतील विविध प्रकार माझ्याकडून वर्णिले गेले.'..."चालू समाजाचे चित्र सर्व बाजूंनी रंगवावयाचे झाल्यास आणखी १०-२० कादंबऱ्या लिहाव्या लागतील इतके ते विविध आहे."..."ज्या लोकांना मी करीत आहे ती क्रिया शक्यच नव्हती असाच वर्ग बहुतेक लेखकांत असणार आणि विस्तीर्ण अवलोकन व समाजातील अनेक अंगांचे ज्ञान ही ज्यांस नसतील त्यांस माझा कादंबरीचा प्रकारच गैर आहे, कलेला अपकर्षक आहे, असा बोभाटा करावा लागणार....तो [बोभाटा] त्याप्रामणे [ते] करीत आहेत तो स्वाभाविकच आहे."

"माझ्या लेखामध्ये 'टेक्निक' नाही, असे वाङ्मयक्षेत्रातील शूद्रांनी बोलावे, यात कोणतेही आश्चर्य नाही. टेक्निक ज्या साहित्याच्या अवलोकनापासून निर्माण व्हावयाचे त्या साहित्याचेच अल्पत्व ज्यास भासून येते तो आपल्या कृतीने नवीन टेक्निक निर्माण करण्यास चालना देणार आहे, हे या वाङ्मयातील शूद्रांस काय समजणार ? जंगली लोकांना 'रॅशनल सर्प्राइज' असू शकत नाही, असे जे स्पेन्सरने सांगितले आहे तो नियम वाङ्मयातील शूद्रांसही लागतो....टेक्निकवर नुकतीच निर्माण झालेली कालच्या युरोपातील पुस्तके घोकणारे लवकरच नाहीसे होतील आणि स्वतंत्र बुद्धीने साहित्यशास्त्रीय विषयाचा अभ्यास करणारे लवकर निर्माण होतील, हा काळ जवळ येऊन ठेपला आहे."

—असो. विद्यासेवक १९२४पासून १९२९पर्यंत चारपाच वर्षेच चालला, पण तेवढ्यात केतकरांनी जाता जाता, ज्ञानकोशाचे काम सांभाळून, बराच मोठा वाङ्मयसंभार

१. अभिरुची, जून १९४५, व आठवणी.

उत्पन्न करून ठेवला. एक राजनैतिक प्रबंध, तीन कादंबऱ्या व एक साहित्यशास्त्रीय प्रबंध अशी पाच पुस्तके तर त्यांनी लिहिलीच; पण शिवाय, मागे सांगितल्याप्रमाणे, आणखी दोन पुस्तके विद्यासेवकात सुरू केली आणि शेपाऊणशे स्फुट लेखही लिहिले! त्यांची दृष्टी चौफेर कशी भिरभिरत असे आणि प्रत्येक ठिकाणी काही नवा विचार त्यांच्या बुद्धीला कसा स्फुरत असे, हे त्यांच्या स्फुट लेखांमध्ये सहज दिसते. या लेखांत त्यांनी वाङ्मयोत्पादनाच्या धंद्यावर जसे लिहिले, तसे सिनेमाच्या धंद्यावरही लिहिले. 'संस्थानचा कारभार कसा सुधारेल' यावर जसे चार शब्द सांगितले, तसे 'बालसंरक्षणा'वरही सांगितले. ज्याप्रमाणे स्त्रियांच्या 'संसारशास्त्रा'वर त्याप्रमाणे त्यांच्या 'उद्योगधंद्यातील प्रवेशा'वरही विचार व्यक्तवले. कायदे, दानसंस्था, विद्यापीठे, कंपन्या, धर्मपीठे इत्यादी हरतऱ्हेचे विषय या लेखांमधून आले आहेत. या लेखांत 'मुलींच्या वाढत्या कौमार्य-काला'ची त्यांनी काळजी वाहिली आणि 'मुंबईतील शरीरविक्रया'चीही पाहणी केली. 'कामशास्त्रा'बरोबर 'साहित्यशास्त्रा'चाही परामर्श घेतला. कायस्थप्रभू, गुजराथेतील महाराष्ट्रीय लोक, जातिभेदाच्या भावनेची दृश्ये इत्यादी समाजशास्त्रीय विषय अर्थातच त्यांच्या नजरेतून निसटले नाहीत. सप्टेंबर १९२४ मध्ये ते ज्ञानकोशाच्या विक्रीसाठी सहकुटुंब गोव्याला गेले होते, तेव्हा तेथे केलेल्या अवलोकनावर 'तरुण गोवेकरांचे अंतःकरण' ही लेखमाला त्यांनी लिहिली नि ती चांगलीच गाजली. तिचा सारांश केसरीत आला, गोव्यातील 'हिंदू'मध्ये ती शब्दशः पुनर्मुद्रित झाली नि तीवर झालेल्या पत्रव्यवहारातून अनेकांच्या विचारांना चालना मिळाली.[1] गोव्याच्या दुसऱ्या वारीनंतर फेब्रुवारी १९२६-मध्ये फोंड्याच्या 'स्वयंसेवक' या पत्रात त्यांनी 'गोमांतकातील सारस्वतेतर ब्राम्हण जाती मागासलेल्या कां?' हा जो विचारप्रवर्तक लेख लिहिला त्याचाही येथे उल्लेख करण्यासारखा आहे. त्या लेखानेदेखील चर्चेची व विचारांची बरीच खळबळ माजली होती.[2] एकंदरीत, ज्ञानकोशापूर्वी राष्ट्रगुरूची जी विशाल भूमिका त्यांनी घेतली होती ती या वेळीं त्यांच्या अंगात जणू पुन्हा संचारली होती. 'ज्ञानकोशा'मध्ये हा ज्ञानकोशकार संपत नाही, तो अजून भरपूर उरला आहे, याची साक्ष विद्यासेवकातील त्यांच्या विविध लेखनाने सुबुद्ध महाराष्ट्राला पटली असेल. आपल्या लेखनातून विचारांची विद्युद्गर्भ बीजे ते चौफेर उधळीत, पेरीत चालले होते आणि त्या बीजांतून जुनी सृष्टी पडावी, नवी घडावी, राष्ट्र तरारून उभे राहावे, अशी त्यांची अपेक्षा होती.

१. विद्यासेवक, ऑक्टोबर १९२४, सप्टेंबर १९२५.
२. 'स्वयंसेवक' (फोंडा), मार्च १९२६, यामध्ये अशी चर्चा आढळेल.

# ज्ञानकोशाने तड गाठली

[१९२४ ते २९]

ज्ञानकोशाचे हस्तलिखित जवळजवळ पूर्णपणे १९२२ अखेर तयार झाले होते आणि त्याचे अकरा विभाग १९२४ अखेर छापून निघाले होते. १९२४ च्या सप्टेंबरमध्ये 'विद्यासेवका'चा जन्म झाला आणि विद्यासेवक चालू असता ज्ञानकोशाच्या उरलेल्या विभागांचे मुद्रण, त्यांचे प्रसिद्धीकरण नि उरलेल्या संचांच्या विक्रीची व्यवस्था वगैरे कामे होत होती. ज्ञानकोशाचे विभाग जसजसे बाहेर पडत होते तसतशा १९२४-नंतर, त्यामधून अनेक खळबळी निर्माण होत होत्या. केसरीकार न. चिं. ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांच्याशी केतकरांचा जो गरमागरम वाद १९२५ साली झाला तो वाद म्हणजे अशा खळबळींपैकी पहिली मोठी खळबळ म्हणता येईल. या वादात केळकरांवर काही आरोप करणारा लेख जूनच्या विद्यासेवकात प्रथम केतकरांनी लिहिला,[1] मग केळकरांनी २३ जूनच्या केसरीतून त्याला उत्तर दिले[2] आणि पुन्हा केतकरांनी जुलैच्या विद्यासेवकातून केळकरांना प्रत्युत्तर दिले![3] दोघांनी या वादात एकमेकांवर सणसणीत प्रहार केले; उपरोध, उपहास, निंदा, विपर्यास इत्यादी हत्यारे सर्रास वापरली; पण एकंदरीत असा देखावा दिसला, की केतकरांच्या मनात राग होता, पण स्वतः न चिडता ते केळकरांना चिडवीत होते नि केळकर मात्र चिडून केतकरांना आपल्या जबरदस्त लेखणीने चिरडू पाहात होते!

केतकरांची केळकरांविरुद्ध मुख्य तक्रार अशी होती, की त्यांनी केसरीमधून ज्ञानकोशाला न्यायीपणाने योग्य ती प्रसिद्धी दिली नाही. ते म्हणतात, की "केसरीची प्रवृत्ती ज्ञानकोशाची जाहिरात केसरीमार्फत होता होईतो कमी व्हावी अशी होती. जे केसरीकार 'संक्रांतीचा तिळगूळ' यासारख्या पुस्तकावर...स्तुतिपूर्ण अग्रलेख लिहीत

१. 'केसरीकारांची ज्ञानकोशविषयक वृत्ती'.
२. 'केसरीकार व ज्ञानकोशकार, एका खोडसाळ टीकेस उत्तर'.
३. 'केसरीकार व ज्ञानकोशकार'.

आणि दुसऱ्या अनेक पुस्तकांवर लेखमाला लिहीत त्याच केसरीकारांकडे ज्ञानकोशाचे भाग पाठविले गेले तरी त्यांच्यावर अभिप्राय लिहिण्यास ते प्रवृत्त होत ना.…पहिला भाग प्रसिद्ध झाल्यानंतर सुमारे दीड वर्षाने केसरीत अभिप्राय आला.…ज्ञानकोशाच्या भागावर अभिप्राय जरी दिला नाही तरी तात्बडतोब पुस्तकाची पोच म्हणून तरी प्रसिद्ध व्हावी, पण तसलीही कृपा आमच्यावर केसरीकारांनी केली नाही." केतकरांची ही तक्रार प्रसिद्ध झाल्यावर केळकरांनी जे उत्तर दिले त्यामध्ये त्यांनी केसरीतून ज्ञानकोशासंबंधी जो मजकूर वेळोवेळी प्रसिद्ध झाला होता त्याची यादी दिली नि त्या मजकुरामधील काही स्तुतिपूर्ण उतारेही पुढे मांडले. ज्ञानकोशाचा योग्य तेवढा परामर्श केसरीने घेतला असताना केतकरांनी खोटी तक्रार केली व "पोटभर जेवून उठताना अन्नाला नावे ठेवणाऱ्या कृतघ्न भिक्षुकाचेच अनुकरण केले" असे त्यांचे म्हणणे होते. डॉ. केतकरांची वृत्ती "वाकड्या पापडाने मर्जी जाणाऱ्या विहिणीच्या मिजासीइतकी नाजूक झाली आहे" असेही त्यांनी सूचित केले. पण केळकरांनी स्वतःचे कितीही समर्थन केले तरी केतकरांच्या मूळ तक्रारीत बरेच तथ्य होते. केतकरांनी आपली तक्रार सोडली नाही नि विद्यासेवकातील प्रत्युत्तरात म्हटले, की "उपेक्षेचा मुख्य आरोप हा केवळ आमच्या पुस्तकांविषयी किरकोळ अभिप्रायांनी असिद्ध होणार नाही. वाङ्मयक्षेत्रामध्ये जी पुस्तके अवतरतात त्यांत ज्ञानकोशास इतर ग्रंथांच्या मानाने व त्याच्या योग्यतेप्रमाणे योग्य ते महत्व मिळाले आहे काय? अच्युतरावांचा 'संक्रांतीचा तिळगूळ', रा. बझे यांचे 'भावी हिंदी स्वराज्य' (दोन अग्रलेख) व 'राधामाधवविलासचंपू' इत्यादी पुस्तके जर अग्रलेखाचा मान केसरीकारांच्या 'समतोल' दृष्टीने मिळवू शकतात, तर ज्ञानकोश-मंडळ हे कधीही अग्रलेखास पात्र होऊ नये काय?" केसरीतील निनावी लेखात केळकरांनी त्यांना ज्या उपहासपूर्ण उपमा दिल्या होत्या त्यांना उद्देशून त्यांनी खवचटपणे लिहिले, की "लेखा-खाली सही नाही. तथापी 'पोटभर जेऊन अन्नाला नावे ठेवणाऱ्या भिक्षुकाची' व 'वाकड्या पापडाने मर्जी जाणाऱ्या विहिणीची' उपमा देणारा लेखक कोण असावा, हे केसरीच्या वाचकांस सहज समजणार आहे."

केतकरांना लो. टिळकांबद्दल अतिशय आदर होता, पण केळकरांकडे ते तुच्छतेने बघत. केळकरांना केसरीचे उच्चासन मिळाले तरी ते लो. टिळकांचे एक सुमार बुद्धिमत्तेचे लेखक वारस आहेत, अशी केळकरांबद्दल त्यांची भावना होती. अर्थात केसरीतील अभिप्रायाला विद्वत्तेच्या दृष्टीने ते फारशी किंमत देत नव्हते; पण केसरीचा प्रसार खूप असल्यामुळे त्यातून मिळणारी प्रसिद्धी लोकमत अनुकूल बनविण्याच्या दृष्टीने किंवा ज्ञानकोशाचा खप होण्याच्या दृष्टीने त्यांना महत्वाची वाटत होती. तेव्हा आपल्या पहिल्या लेखात त्यांनी पुढील मतप्रदर्शन केले: "लोकमान्य जिवंत असते तर केसरीमार्फत ज्ञानकोशाची आणि त्यातील अनेक विषयांची मार्मिक तपासणी किंवा लक्ष ओढण्याइतकी पाहाणी बरीच झाली असती. ज्ञानकोश तयार करण्यास हात घालताना ज्ञानकोशकारांची एक मोठी इच्छा होती, की जुन्या पिढीतील विद्वानांनी

—उदाहरणार्थ, रा. टिळक व महाजनी यांसारख्या लोकांनी—ही कृती पाहावी व त्यांनी यशस्वितेबद्दल अभिनंदन करावे. पण ही इच्छा पुरी होण्याचा संभव नाही. ज्यांच्या अनुकूल अभिप्रायांचे किंवा शाबासकीचे विशेष महत्व ज्ञानकोशकारांस वाटत होते अशांपैकी रा. टिळक व महाजनी हे दिवंगत झाले आहेत, आणि सर डॉ. भांडारकर यांना ही कृती पाहाण्याचीही शक्ती उरली नाही. ज्यांनी आपले अभिनंदन करावे अशी विशेष इच्छा असते त्यांच्याकडून अभिनंदन होण्याच्या असंभवामुळे कर्तृत्वाचेही महत्व वाटेनासे होते.—आणि आज इतर मंडळींनी स्तुती केली तरी किंवा निंदा केली तरी त्या दोहोंचे महत्व त्यांच्या टीकेच्या योग्यतेप्रमाणे लहान किंवा थोर असले तरी त्यापासून होणारा आनंद किंवा दुःख ही बरीचशी मर्यादित होतात....रा. टिळकांच्या हयातीत जी केसरीत टीका आली असती तिचे महत्व सध्याच्या स्थितीत नाही, व लोकांचे आमच्या प्रयत्नांपैकी काही भागांकडे तरी लक्ष ओढले गेले हे बरे झाले, एवढ्याच दृष्टीने आम्ही तिकडे पाहात असतो."

लो. टिळकांच्या शाबासकीचे स्वतःला वाटणारे महत्व याप्रकारे सांगून, केतकरांनी केळकरांना जो कमीपणा सूचकपणे दिला त्याच्या मिरच्या केळकरांना चांगल्याच झोंबल्या. 'लो. टिळक वगैरे मंडळी शाबासकी देण्यास राहिली नाहीत, म्हणून आपणाला कर्तृत्वाचेही महत्व वाटेनासे झाले आहे' अशा अर्थाचे जे उद्गार केतकरांनी काढले होते त्यांना उद्देशून केळकरांनी लिहिले, की "...असे निराशेचे उद्गार डॉ. केतकर यांनी दिमाखाने काढले आहेत. जणू काय महाराष्ट्रात टिळक, महाजनी, भांडारकर यांच्या जोडीला स्वतः डॉ. केतकर हेच काय ते एकटे चौथे विद्वान व बाकी सर्व शून्यांधकार! पण या मानभावी निराशेच्या रडण्याने डॉ. केतकरांनी योजिलेल्या प्रतिष्ठेचे घर त्यांना सहज मिळेल असे मात्र त्यांनी समजू नये. कुठे टिळक-भांडारकर व कुठे केतकर!" पण हे लिहिताना रागाच्या सपाट्यात केळकर ही गोष्ट विसरले होते, की केतकरांनी कोठेही स्पष्टपणे स्वतःला टिळकांच्या किंवा भांडारकरांच्या बरोबरीला बसविले नव्हते. उलट, टिळक वगैरेंच्या शाबासकीचे महत्व सांगून त्यांचा स्वतःच्या मानाने मोठेपणाच त्यांनी सूचित केला होता. तेव्हा केळकरांच्या लिहिण्यात त्यामुळे जो विपर्यास झाला होता त्यावर बोट ठेवून केतकरांनी आपल्या प्रत्युत्तरात असा सवाल केला, की "लो. टिळक, महाजनी यांसारख्या वडील म्हणून समजल्या जाणाऱ्या व्यक्तींकडून शाबासकी मिळाल्यास त्याचा विशेष आनंद वाटतो असे [आम्ही] म्हटले आहे", पण "असे म्हणण्यात लो. टिळक, भांडारकर यांच्या बरोबरीचे आम्ही विद्वान आहोत असे म्हटल्यासारखे होते काय?" केतकरांना केसरीतील अभिप्रायाची किंमत विद्वत्तेच्या दृष्टीने वाटत नव्हती, याचा तर केळकरांना भारी संताप आला. त्यांनी त्यावर त्राग्याने लिहिले, की "ज्या अनुकूल अभिप्रायाची ज्ञानकोशकारांना किंमत वाटत नाही तो आम्हीही देऊ इच्छीत नाही. म्हणून त्यांनी यापुढील ग्रंथ केसरीकडे अभिप्रायाला मुळीच न पाठविलेले बरे....त्यांनी केसरीकडे आपले ग्रंथ आणि आपल्या जाहिरातीदेखील यापुढे पाठविण्याचे

कारण नाही. ज्ञानकोशाशिवाय इतर विषय व जाहिरातींच्या रकान्याचे इतर आश्रयदाते सुदैवाने केसरीला पुष्कळच आहेत." केतकरांनी या त्राग्याबद्दल अर्थातच केळकरांना खिजवले नि त्यांना सुनावले, की "इतका त्रागा कां बरे? वर्तमानपत्राच्या धंद्यात आज इतकी वर्षे काढून विरुद्ध टीकेसंबंधाने इतकी नाजुक प्रकृती कां असावी? आम्ही ज्या पत्राविरुद्ध कारणपरत्वे लिहू त्या पत्रातदेखील जाहिरात देऊ आणि आमचे विरुद्ध जे कोणी एखादे पुस्तक लिहितील त्या पुस्तकाचीही जाहिरात आमच्या पत्रात छापू. —आणि केसरीच्या विद्वान संपादकांनी तीच वृत्ती आपल्याही व्यवहारात ठेवावी, अशी आमची त्यांस प्रेमाची शिफारस आहे."

केतकरांनी आपल्या मूळ लेखात, लो. टिळकांची आपणाला विशेष सहानुभूती होती, असे सांगितले होते आणि ते सांगताना आपण अमेरिकेस गेलो त्या वेळी टिळकांनी आपणाला केलेल्या मदतीचा उल्लेख केला होता. त्यावर केळकरांनी अशी मल्लीनाथी केली, की "टिळकांच्या निकट परिचयाच्या लोकांनाही हे शुभवर्तमान अपूर्वच वाटेल! अमेरिकेला धाडण्याला हाच एक मोहरा योग्य, असे म्हणून टिळकांनी डॉ. केतकरांची निवडणूक केली, असे आमच्या तरी ऐकिवात नाही." पण अशा मल्लीनाथीने गडबडण्याइतके केतकर कच्चे नव्हते. त्यांनी रा. वासुदेवराव जोशी वगैरे जुन्या मंडळींची साक्ष आपल्या बाजूने काढण्याची तयारी दर्शविली आणि पुढील वाक्याने केळकरांनाच पकडीत धरले. त्यांनी लिहिले, की "केसरीकारांना टिळकांच्या केतकरांस प्रोत्साहनासंबंधीची माहिती शुभवर्तमानाप्रमाणे भासली, यावरून डॉ. केतकरांच्या विधानांचे असत्यत्व सिद्ध न होता १९०४, १९०५ व १९०६ या सालांत रा. टिळक सध्याच्या केसरीकारांस कितपत विश्वासात घेत होते एवढे स्पष्ट होते"!

लो. टिळकांना ज्ञानकोशाबद्दल प्रेम होते, पण केळकरांनी ज्ञानकोशाची उपेक्षा केली, असे केतकरांचे म्हणणे होते. ते खोडून काढण्यासाठी केळकरांनी हे दाखवून दिले, की लो. टिळकांच्या हयातीत केळकरच केसरीचे संपादक होते आणि त्या वेळी ज्ञानकोशा-संबंधीच्या मजकुराला केसरीतून जो वाव मिळाला तो त्यांच्याच हातून मिळाला. "केळकरांची इच्छा नसताना तो वाव देण्यास टिळकांनी केळकरांना भाग पाडले, असला काही पुरावा डॉ. केतकर यांच्यापाशी असल्यास त्यांनी तो जरूर प्रसिद्ध करावा" असे आव्हानही त्यांनी केतकरांना दिले. पण या साऱ्यावर केतकरांनी फारच पेचदार पवित्रा घेतला. केतकरांनी लिहिले, की "लोकमान्यांच्या हयातीत जे केसरीचे साहाय्य ज्ञानकोशकारांस मिळाले ते लो. टिळकांच्या इच्छेमुळे नसून रा. केळकरांच्या इच्छेमुळे मिळाले असे केसरीकार भासवितात आणि रा. केळकरांना ही मदत देण्यास [टिळकांनी] भाग पाडले असा पुरावा आमच्याशी मागतात! यावर उत्तर एवढेच की लोकमान्य आपल्या मदतनिसांचे सार्वजनिकपणे कान उपटीत होते अशी पद्धत होती, हे केसरीकारांनी सिद्ध करून दिले पाहिजे. नाही तर मालक आपल्या कारकुनास

काय सांगतो, हे तिऱ्हाइतास कसे कळणार?" हा पवित्रा घेताना केळकरांना त्यांनी 'लोकमान्य टिळकांचे कारकून' म्हणून शालजोडीतली शिवी हासडली होती, हेही लक्षात घेण्यासारखे आहे.

केळकरांनी ज्ञानकोशाबद्दल जे वैर धरले ते वैयक्तिक चुरशीमुळे आणि मत्सरामुळे धरले, असे केतकरांनी आपल्या लेखात सूचित केले होते. त्यांचे म्हणणे असे, की १९२० च्या निवडणुकीला कॉंग्रेस-डेमोक्रॅटिक-पक्षातर्फे केळकरांसह त्यांचेही नाव उमेदवार म्हणून जाहीर झाले आणि त्या वेळेपासून केळकरांच्या वृत्तीत फरक पडला. त्यांच्या या म्हणण्यावर केळकरांनी आपल्या उत्तरात पुढील भडिमार केला: "डॉ. केतकर यांना काय सुचवावयाचे आहे ते अगदी उघड आहे....डॉ. केतकरांना उमेदवार म्हणून कायम करण्याची टिळकांची इच्छा असल्याची जी गर्भित सूचना केतकरांनी केली आहे ती सर्वस्वी असत्यमूलक आहे. पुण्यातले एखादे पोरही या सूचनेला हसेल!...या बाबतीत एक गोष्ट आम्हांस पक्की आठवते ती अशी, की डॉ. केतकर यांनी मात्र एक धाडसी व बढाईखोर पत्र लिहून टिळकांकडे धाडले होते. त्यात त्यांनी असे लिहिले होते, की 'मी केळकरांना निवडणुकीत लीलेने सहज चारी मुंडे चीत करीन, असा माझा आत्मविश्वास आहे. याकरिता उमेदवार म्हणून न राहाण्याविषयी केळकरांना सल्ला द्या व मला उमेदवार निवडा.' परंतु केतकरांनी टिळकांना असले पत्र लिहिले यावरून टिळकांच्या मनात केळकरांऐवजी केतकरांना उमेदवार म्हणून निश्चित करण्याचे आले होते, असे कसे सिद्ध होणार? आम्हांला एवढेच स्मरते, की या पत्राचा उघड उपहास करून टिळकांनी ते पत्र केळकरांचेच स्वाधीन केले!" केळकरांच्या या भडिमाराचे स्वागत केतकरांनी मिस्किल शांतपणाने केले नि असे उत्तर दिले, की "कौन्सिल-उमेद्वारीसंबंधाने लेखांश केसरीकारांनी अगदीच विपर्यस्त लिहिला आहे. डॉ. केतकर यांनी लोकमान्यांस, मी रा. केळकर यांस 'चारी मुंडे चीत करीन' असे पत्र लिहिले नव्हते, तर रा. केळकर यांस दुसऱ्या कोणत्यातरी जागेसाठी उमेदवार करावे असे सुचविणारे पत्र लिहिले होते....वरच्या कौन्सिल्साठी रा. केळकरांस घालू व तुम्हांस अवश्य संधी देऊ, इतपत डॉ. केतकर व लोकमान्य यांचे संभाषण झाले होते.... डॉ. केतकर यांस मुद्दाम बढाईखोर, कृतघ्न ठरविण्यासाठी केसरीकारांनी काल्पनिक पत्रे उपस्थित केली आहेत."

या वादात आणखीही बऱ्याच चिल्लर गोष्टी निघाल्या आणि पुष्कळ खारटतुरट बोलाचाली झाली. त्या साऱ्यांवरून दोघांच्या मनात बराच काळ जो परस्परांविषयी द्वेष नाना कारणांनी धुमसत होता त्याची स्पष्ट कल्पना महाराष्ट्राला आली. या वेळी केळकर गप्प बसले, म्हणून हा वाद थांबला. पण येथून पुढे, संधी सापडेल तिथे केळकरांचे उणे काढावे, त्यांना कोपरखळ्या द्याव्या, त्यांची हुर्यो करावी, असा सपाटाच केतकरांनी सुरू केला. केळकरांना प्रारंभी ते चिडवीत होते, पण मागाहून ते स्वतःच चिरडीला पडल्यासारखे झाले आणि त्यांच्या रागाचे रूपांतर दीर्घ द्वेषात नि द्वेषगंडातही

अखेरच्या काळात दुर्दैवाने झाले![1]

ज्ञानकोशाची केळकरांनी उपेक्षा केली म्हणून त्यांच्यावर केतकर रागावले, पण केतकरांनी स्वतः ज्ञानकोशात जो मजकूर घातला त्यामुळे केतकरांच्यावर रागावणारे काही थोडे नव्हते. ज्ञानकोशात निरनिराळ्या जातींची किंवा त्या जातींना आदरणीय वाटणाऱ्या व्यक्तींची जी माहिती प्रसिद्ध झाली तीमुळे अनेक जाती ज्ञानकोशाविरुद्ध उठल्या आणि १९२६-२७ च्या सुमारास त्यांनी केलेल्या चळवळींची एकच धुमाळी माजली. ज्ञानकोशाच्या चौथ्या विभागात, तेराव्या प्रकरणात, महंमद पैगंबराचे चरित्र सेमेटिक संस्कृतीच्या अनुषंगाने दिले होते आणि त्यामुळे मुसलमानांनी सर्वांत मोठी नि कडवी चळवळ ज्ञानकोशाविरुद्ध केली. महंमदाच्या चरित्रात महंमदाच्या वर्तनाविषयी जी भयंकर विधाने केली होती त्यांच्यामुळे मुसलमानांसारख्या महंमदाच्या भक्तांना संताप यावा, हे अगदी साहजिक होते. ही विधाने कशा प्रकारची होती हे पुढील छोट्याशा नमुन्यावरून समजू शकेल: "महंमदाच्या चरित्रावरून महंमदाचे आचरण अगदी वाईट होते, असे दिसते. स्वतःचा हेतू साध्य करण्याकरिता तो वाटेल ती युक्ती योजण्यास कचरत नसे, आणि अनुयायांनाही सदसद्विचार पूर्णपणे धाब्यावर बसविण्यास त्याची संमती असे. खून व कत्तली त्याने बेफिकीरपणे वाटेल तशा घडवून आणलेल्या होत्या. मदीना येथील त्याचा जुलमी कारभार पाहिला म्हणजे तो निव्वळ दरोडेखोरांचा नायक होता, असे दिसते. कारण वाटेल तशी लुटालूट करून जमविलेला पैसा आपल्या अनुयायांत वाटून द्यावयाचा, एवढेच काय ते अर्थशास्त्र त्याला माहीत होते, असे म्हणावे लागते. इतकेच नव्हे, तर लुटीची वाटणी करण्यातही तो फार पक्षपात करतो, अशी अनुयायांची ओरड असे. तो स्वतः विषयोपभोग बेसुमार करीत असे व अनुयायांनाही तेच करण्यास त्याची मुभा होती. पुन्हा, आपण जे जे करतो ते सर्व ईश्वराज्ञेनेच करतो, असे म्हणण्यास तो नेहमी तयार असे."[2] महंमदाबद्दल अशी विधाने करण्यापूर्वी हिंदुस्थानातील दुसऱ्या कोणाही ज्ञानकोशकाराने शंभरदा विचार केला असता आणि नव्याण्णव हिस्स्यांनी अशी विधाने प्रसिद्ध होऊ दिली नसती. पण 'एन्सायक्लोपीडिया ऑफ रिलिजन अँड एथिक्स' या सर्वमान्य कोशात प्रा. मार्गोलिथ या विद्वानाने ती विधाने केली होती, या आधारावर महाराष्ट्रीय ज्ञानकोशात केतकरांनी त्यांना बेडरपणे

१. याची साक्ष पुढील वाङ्मयात मिळते : 'राजवाडे यांची जीवनपद्धती', केतकर, विद्यासेवक, जानेवारी १९२७; चिं. वि. जोशांचे पत्र, केसरी, १ मार्च १९२७; 'राजवाडे-नरसोपंत-वाद', केतकर, विद्यासेवक, एप्रिल १९२८; 'पुणेसमाचार'मधील केसरीचे ट्रस्टी व टिळकपुत्र यांच्यासंबंधी लेख; टिळकचरित्रावर वगैरे टीका, केतकर, विद्यासेवक, एप्रिल १९२८; 'वाङ्मयक्षेत्रात नियंत्रक संस्थेची आवश्यकता', केतकर, प्रतिभा, १३ एप्रिल १९३४; 'मी व माझे टीकाकार', केतकर, ज्योत्स्ना, ऑगस्ट १९३६; भटक्या, पृष्ठ १०८; व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठ १३२ इत्यादी.

२. पृष्ठ ३०३.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
२५८९१ वि: दि:

वाव दिला ! साहजिकच, अझमगडच्या 'मारिफ' या उर्दू मासिकाने या विधानांकडे जेव्हा मुसलमानांचे लक्ष वेधले आणि जेव्हा त्या मासिकातील लेखाचा सारांश 'टाइम्स'-मध्ये १९२६ साली प्रसिद्ध झाला तेव्हा मुसलमानांमध्ये विरोधी चळवळीला सुरवात झाली.

प्रा. मार्गोलिथ यांनी आपली विधाने इब्न इशाकच्या एका प्राचीन ग्रंथावरून केली होती. पण बडोद्याचे प्रा. नबाबअल्ली यांनी केतकरांच्या असे निदर्शनास आणून दिले, की इब्न इशाकने इतिहाससंशोधक म्हणून आपला ग्रंथ लिहिला नव्हता, तर ईजिप्तच्या एका जुलमी राजाच्या हुकमावरून तो लिहिला होता. तेव्हा आपल्या वाईट वर्तनाच्या समर्थनासाठी त्या बादशहाने इब्न इशाककडून महंमदाच्या चरित्रावर शिंतोडे उडविले असणे शक्य आहे. शिवाय प्रा. मार्गोलिथ यांच्या लिखाणाचे खंडन करणारे बरेच वाङ्मय पूर्वी प्रसिद्ध झाले होते, त्याकडेही केतकरांचे लक्ष प्रा. नबाबअल्ली यांनी वळविले. इब्न इशाकचा संपूर्ण ग्रंथ सध्या उपलब्ध नाही, त्यातील काही उतारे तेवढे उपलब्ध आहेत, हे केतकरांना आधीपासून माहीत होतेच. तेव्हा ज्ञानकोशामधले महंमदावरील लिखाण प्रा. मार्गोलिथ यांच्यासारख्या प्रसिद्ध लेखकाच्या विधानांवरून उतरले असले तरी ते डळमळीत आहे, त्याची दुसरी बाजू मांडण्यास वाव द्यावयास हवा, असे केतकरांचे मत या चळवळीच्या प्रारंभीच बनले. यानंतर क्रॉनिकलमधील एका टीकात्मक पत्राला उत्तर देण्याच्या निमित्ताने २३ जून १९२६ रोजी आपली भूमिका त्यांनी क्रॉनिकलमध्ये प्रसिद्ध केली. आपल्या ज्ञानकोशातील लिखाणाला प्रा. मार्गोलिथ यांचा आधार आहे वगैरे गोष्टी त्यांनी सांगितल्या, पण प्रा. मार्गोलिथ यांच्याविरुद्ध महंमदाची बाजू कोणी व्यवस्थित मांडील तर ज्ञानकोशाच्या पुरवणीविभागात आपण ती प्रसिद्ध करू, असे आश्वासनही दिले. वास्तविक पाहाता या आश्वासनानंतर मुसलमानांची चळवळ बंद पडावयास हवी होती, पण मुसलमानांच्या आडमुठ्या हट्टाने ती पेटतच गेली.

केतकरांचे म्हणणे क्रॉनिकलमध्ये प्रसिद्ध होण्यापूर्वी, मुंबईला पायधुणीवरील हामदिया मशिदीत बॅ. कादरभाई व रा. अब्दुलरहीम दिमटिमकर (जे. पी.) यांच्या नेतृत्वाखाली मुसलमानांची एक सभा भरली होती. त्या सभेत असे ठरले होते, की ज्ञानकोशाविरुद्ध मुंबईच्या गव्हर्नरांकडे एक शिष्टमंडळ पाठवावे. या सभेचा वृत्तान्त नंतर टाइम्समध्ये प्रसिद्ध झाला आणि निजाम-राज्यात ज्ञानकोशाला बंदी करणारे फर्मान निजामाने काढले! केतकरांनी रा. दिमटिमकर यांची गाठ घेऊन त्यांना पटवून दिले, की पुरवणी-विभागात महंमदाच्या चरित्राची दुसरी बाजू मांडणेच मुसलमानांच्या हिताचे होते आणि गव्हर्नरकडे शिष्टमंडळ नेण्यात काही लभ्यांश नव्हता. सरकारने जर हस्तक्षेप केला असता तर मुद्रणस्वातंत्र्याच्या दृष्टीने ज्ञानकोशकारांना सरकारशी भांडावे लागले असते आणि सरकारने बहुतकरून या प्रश्नात लक्षही घातले नसते. रा. दिमटिमकरांना केतकरांचे हे म्हणणे पटले, तरी दिमटिमकर इतर मुसलमानांची समजूत घालू शकले नाहीत. काही दिवसांनी मुंबईच्या ११२ प्रसिद्ध गृहस्थांनी व संस्थांनी मुंबईच्या

गव्हर्नरकडे अर्ज केला आणि महंमदविषयक मजकुराची पाने ज्ञानकोशातून कापण्याविषयी सरकारने हुकूम सोडावा, अशी त्यांनी विनंती केली ! तोपर्यंत ज्ञानकोशाच्या तीन हजार प्रतींपैकी २८०० प्रतींना गिऱ्हाईक मिळाले होते आणि बऱ्याच, गिऱ्हाइकांकडे चौथ्या विभागाच्या प्रती रवानाही झाल्या होत्या. तेव्हा पाने कापण्याची मुसलमानांची मागणी मूर्खपणाची होती, हे उघड आहे. बरे, अमुक पाने रद्द समजा, त्यांबद्दल अमुक पाने घ्या, असे म्हणून गिऱ्हाइकांकडे नवी पाने पाठविली असती, तरी त्यामुळे रद्द पानांवरच लोकांचे लक्ष खिळले असते आणि महंमदविषयक लिखाणाचा प्रचार झाला असता. तेव्हा पाने कापण्याच्या मागणीपेक्षा नवी पुरवणी घालणेच अधिक श्रेयस्कर होते. पण मुसलमानांना आपल्या पैगंबराच्या इभ्रतीच्या रक्षणापेक्षा स्वतःचा अहंकार चालविण्याचीच काळजी जास्त दिसली आणि त्यांनी पाने कापण्याचा आग्रह धरला.

केतकर यानंतर बॅ. कादरभाई यांना भेटले व बॅ. कादरभाईंनाही त्यांनी आपले म्हणणे पटवून दिले. दोघांत असे ठरले, की बॅ. कादरभाईंनी ११२ सही करणाऱ्यांची एक सभा बोलवावी व तीत केतकरांनी आपले म्हणणे त्यांना पटविण्याचा प्रयत्न करावा. पुढे, सभा भरण्यापूर्वी बोहरी लोकांचे मुख्य गुरू बडे मुल्ला पुण्यास आले आणि ती संधी साधून सर इब्राहिम हरून जाफर वगैरे पुण्याच्या मुसलमान पुढाऱ्यांनी या प्रकरणाचा निकाल लावण्यासाठी केतकरांची गाठ घेतली. या मंडळींना केतकरांचे म्हणणे पटले व केतकरांनी आपले म्हणणे स्पष्ट करणारे पत्र बड्या मुल्लांना पाठवावे, असे त्यांनी सुचविले. केतकरांना बड्या मुल्लांच्या भेटीचे आमंत्रणही त्यांनी दिले. केतकर भेटीस गेले, तेव्हा एक मनुष्य त्यांचे पत्र बड्या मुल्लांना वाचून दाखविताना अडखळू लागला. तेव्हा केतकरांनीच स्वतः ते पत्र वाचून दाखविले. त्या पत्रात पुरवणीची तोड मांडली होती आणि आपल्यामुळे मुसलमानांच्या भावना दुखावल्या याविषयी खेद व्यक्त केला होता. भेटीत बड्या मुल्लांनी एक शाल देऊन केतकरांचा गौरव केला आणि भेट संपली. पण या भेटीनंतर ११२ सह्यांच्या अर्जाचा आपला पाठिंबा बड्या मुल्लांनी व त्यांच्या एका अनुयायाने काढून घेतला !—आणि बरेच काहूर माजले. केतकरांनी पत्र वाचून दाखविले. म्हणजे क्षमा मागितली, असे गुजराथी पत्रांनी उठविले आणि केतकरांनी बड्या मुल्लांना फितवून मुसलमानांत फूट पाडली, असे बॅ. कादरभाई वगैरे लोक म्हणू लागले ! केतकरांशी समेट करण्याचा अधिकार बड्या मुल्लांना नाही, अशी टीकाही मुसलमानांनी चालविली. पण वास्तविक पाहाता, केतकरांनी आपले म्हणणे बड्या मुल्लांना फक्त पटविले होते, त्यांनी समेट केला नव्हता. जो समेट व्हावयाचा तो ११२ सहीवाल्यांशी व्हावयाचा, हीच त्यांची भूमिका होती. 'मुसलमान माथेफिरू आहेत, त्यांच्या सभेला जाऊ नका, फुकट मार खाल' असे त्यांचे हिंदू मित्र त्यांना सांगत होते; तरी ११२ सहीवाल्यांच्या सभेत आपण जाऊ नि आपले म्हणणे त्यांना पटवून देऊ, अशी उमेद ते बाळगीत होते. परंतू, पुढे त्या सभेचे आमंत्रण त्यांना आले तेव्हा ते शीलवतीबाईच्या आजाराच्या निमित्ताने महाबळेश्वरला गेले होते. सभा पुढे ढकलण्या-

विषयी त्यांनी केलेली तार वेळेवर पोहोचली नाही आणि त्यांच्या अनुपस्थितीतच ती सभा पार पडली. सरकारकडे गेलेला खलिता सभेपूर्वी सरकारने परत पाठविला होता आणि केतकरांचा एक अंदाज खरा ठरला होता. तेव्हा, सरकारने आपला अर्ज फेटाळल्यामुळे केतकर मुद्दाम सभेस आले नाहीत, असा मुसलमानांचा समज झाला आणि ज्ञानकोशातील पाने कापविण्यासाठी पंचवीस हजार सह्यांचा नवा अर्ज करण्याची मोठी चळवळ त्यांनी सुरू केली!

१९२६ च्या ऑक्टोबरमध्ये मुसलमानांच्या चळवळीला रंग भरला. ज्ञानकोशातील पाने कापावी, असे खिलाफतवाल्यांचेही म्हणणे होते आणि शौकतअल्लींनी "एक मोठे प्रेमळ पत्र" लिहून केतकरांना ते म्हणणे कळविले होते. पुण्याच्या स्थानिक मुसलमानांनी-देखील पाने कापण्याचाच हट्ट धरला. शहा रुखयारजंग यांच्या प्रयत्नाने पुण्यातील मुसलमानांची सभा ठरली व तीपुढे केतकरांनी आपली बाजू मांडावी अशी योजना झाली. या सभेपूर्वी खुनाच्या धमकीचे एक पत्र केतकरांना आले! विद्या नि युक्तिवाद यांमध्ये केतकर खूप लढवय्ये होते; पण या पत्राने जेव्हा त्यांच्या प्राणावर बेतले, तेव्हा ते काहीसे अस्वस्थ झाले. मुसलमानांच्या सभेला एकटे न जाता रा. दात्यांना ते बरोबर घेऊन गेले. त्यांनी पुष्कळ युक्तिवाद केला, पण पुरवणीचा उपाय मुसलमानांना न पटून पाने कापण्याचा हट्टच ते धरून बसले. पुण्याच्या मुसलमानांचे हे स्वरूप पाहिल्यावर केतकरांना असे वाटू लागले, की ११२ सहीवाल्यांना आपले म्हणणे आपण पटवून देऊ, ही आपली उमेदही व्यर्थ होती. तेव्हा पुण्याच्या मुसलमानांच्या सभेत त्यांनी अखेर पाने कापण्याचे मान्य केले! खुनाच्या धमकीचे पत्र गुलाम दस्तगीर याच्या गोटातून आले असावे, अशी त्यांची कल्पना होती. म्हणून सभा आटोपून घरी येताना, वाटेत गुलाम दस्तगीर याला सभेतील निर्णय त्यांनी व दात्यांनी जाऊन कळविला! आपली मागणी मान्य झाल्याने यापुढे मुसलमान संतुष्ट झाले नि त्यांची चळवळ संपली. ज्ञानकोशाचा एकविसावा विभाग १९२७ साली ग्राहकांकडे पाठविताना त्यात महमद-विषयक मजकूर रद्द केल्याचे पत्र घालण्यात आले![१]

महंमदाप्रमाणे गौतम बुद्धाविषयीही अतिशय भयंकर विधाने ज्ञानकोशात प्रसिद्ध झाली होती. गौतम बुद्धाविषयी केतकरांचे मत पहिल्यापासूनच प्रतिकूल झालेले होते आणि १९१३ साली त्यांनी जातिभेदावर केसरीत जी लेखमाला लिहिली तीवरून किंवा त्या-नंतर धर्मानंद कोसंबींशी त्यांची जी वादावादी झाली तीवरून महाराष्ट्राला त्यांच्या मताची कल्पना आलेली होती. त्या वेळी त्यांचे लिखाण वाचून धुळ्याच्या रा. चांदोरकरांना वाटले, की त्यांची काही दिशाभूल झाली असावी. म्हणून रा. चांदोरकरांनी अभ्यासाला प्रारंभ केला आणि आश्चर्य असे, की बुद्धाविषयी रा. चांदोरकरांचे मत केतकरांच्या मताहूनही वाईट बनले. पुढे रा. चांदोरकरांनी 'इतिहास आणि ऐतिहासिक' या नियतकालिकात बुद्धावर टीका केली आणि त्या टीकेच्या आधारेच ज्ञानकोशाच्या चौथ्या

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, प्रकरण १४; आठवणी, य. रा. दाते.

भागातील मजकूर लिहिला गेला. ‘बुद्ध कीटक म्हणजे केकाडी या व्यभिचारी वंशात जन्माला आला; त्याची सांपत्तिक व नैतिक स्थिती अत्यंत वाईट होती; तो गृहत्याग करून गेल्यावर त्याची पत्नी यशोधरा हिला सहा वर्षांनी मुलगा झाला; त्याला धातुक्षयाचा विकार होता; त्याने कित्येक वर्षे अनीतीत व व्यभिचारात घालविली; तो खादाड होता व मांसाने अतिसार होऊन मेला: सासरा व मेव्हणा यांच्या नाशाची त्याने खटपट केली; तो दीर्घद्वेषी असे; अजातशत्रू या पितृहत्यारी राजाची कानउघाडणी न करता त्याने खुशामत केली;’—इत्यादी गोष्टी या मजकुरात आल्या होत्या! (पृ. १४२ ते १५४) कोणत्याही बुद्धभक्ताला हा मजकूर खपणारा नव्हता, उलट त्याच्या अंतःकरणाला तो झोंबणारा होता, हे उघड होते. तेव्हा केतकरांनी महंमदप्रकरणी जशी माघार घेतली तशी या बुद्ध-प्रकरणीही घ्यावी नि बुद्धविषयक मजकूर रद्द करावा, असे बुद्धभक्तांचे म्हणणे होते. जर केतकरांनी तसे केले नाही तर ते आरडाओरडीला नि धमक्यांना भितात, पण सरळ विनंतीला डावलतात, असा अर्थ होईल, असे बुद्धभक्त प्रतिपादीत होते. वृत्तपत्रांतून लेख नि पत्रे लिहून आणि मुंबईच्या बुद्धिस्ट सोसायटीत केतकरांना एकदा आमंत्रण देऊन बुद्धभक्तांनी आपली बाजू मांडली. पण केतकरांचे म्हणणे असे होते, की ‘महंमदविषयक आपले लिखाण दुय्यम प्रतीचे होते. ते प्रत्यक्ष अभ्यासावर रचलेले नसून दुसऱ्याच्या अभ्यासावर आधारलेले होते. पण बुद्धविषयक लिखाणाची स्थिती तशी नव्हती.’ “गौतमाविरुद्ध अत्यंत वाईट मत झालेल्या मंडळीत मी आहे, आणि त्यामुळे मी ज्या मताचा मुख्य अध्वर्यू त्या मताचा मी त्याग कसा करीन?” केतकरांचे म्हणणे या तऱ्हेचे असल्यामुळे त्यांनी बुद्धभक्तांच्या चळवळीकडे लक्ष दिले नाही आणि ज्ञानकोशातील बुद्धविषयक मजकूर रद्द केला नाही. बुद्धभक्तांची चळवळही मुळातच जोरदार नसल्याने ती कालांतराने थंडावली.[1]

१९२५ साली प्रसिद्ध झालेल्या ज्ञानकोशाच्या बाराव्या विभागात ‘गोवर्धन ब्राम्हणां’ची माहिती आलेली आहे. या माहितीमुळे आपणावर अन्याय झाला आहे, अशी आरोळी गोवर्धनांनी ठोकली आणि ज्ञानकोशाविरुद्ध सपाटून चळवळ केली. ज्ञान-कोशाकडे निरनिराळ्या जातींकडून जी माहिती आली तीत ऐतिहासिक नि सत्यनिष्ठ दृष्टीने दिलेली माहिती फारच कमी होती. अनेक जातींनी चातुर्वर्ण्यातील आपले स्थान ब्राम्हणाचे किंवा क्षत्रियाचे आहे, हे सिद्ध व्हावे म्हणून विपर्यस्त माहिती पुरविली होती. तेव्हा जातीविषयक प्रश्नांचा निर्णय करण्यासाठी रा. य. रा. दाते, रा. शं. पां. पारखी, रा. स. वा. देशपांडे व रा. चिं. ग. कर्वे यांची एक समिती केतकरांनी १९२२ साली नेमली होती. वास्तविक पाहाता, गोवर्धनांतील निरनिराळ्या ठिकाणच्या सुमारे पन्नास मंडळींनी या समितीपुढे आपले जे म्हणजे मांडले ते लक्षात घेऊनच ज्ञानकोशातील मजकूर लिहिण्यात आला होता. प्रथमतः केतकरांचे मत असे होते, की गोवर्धन हे

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ १७१; ‘मी व माझे टीकाकार’, ज्योत्स्ना, जुलै १९३६; एस. डी. नाडकर्णी यांचे पत्र, ‘बॉबे क्रॉनिकल’, १ जून १९२७.

गोळक म्हणजे व्यभिचारोत्पन्न संतती आहेत. पण गोवर्धनांनी समितीपुढे आपले जे म्हणणे मांडले त्यामुळे केतकरांचे मत बदलले होते आणि कोकणस्थ-देशस्थांप्रमाणेच गोवर्धन ही महाराष्ट्रीय ब्राम्हणांतील पोटजात आहे, असे त्यांचे मत बनले होते. परंतू गोवर्धनांचे म्हणणे ऐकून, विचारपूर्वक ज्ञानकोशातील लिखाण झाले, तरी ते लिखाण गोवर्धनांना रुचले नाही. अनेक गोवर्धनांनी स्वतःचा उल्लेख 'गोळक' या नावाने तत्पूर्वी केला होता आणि केतकरांनीही त्या आधारावर गोवर्धनांना 'गोळक' असे म्हटले होते. पण आपणांला 'गोळक' म्हटले, हेच गोवर्धनांपैकी कित्येकांना सहन झाले नाही. केतकरांनी गोवर्धनांमध्ये निम्म्याहून अधिक जी स्वतंत्र आडनावे आहेत त्यांच्यावरून गोवर्धन ही एक स्वतंत्र ब्राम्हण जात आहे, हे मान्य केले; पण गोवर्धनांत नि इतर ब्राम्हणांत काही आडनावे जी सामान्य दिसतात त्यांचा उलगडा करण्यासाठी अशी कल्पना मांडली, की इतर ब्राम्हणांची व्यभिचारोत्पन्न किंवा पुनर्विवाहाची संतती गोवर्धनांमध्ये शिरली असावी. केतकरांनी मांडलेली ही कल्पनाही गोवर्धनांच्या मनाला अतिशय झोंबली. अर्थात आपल्याला 'गोळक' म्हणणाऱ्या नि आपल्या जातीत व्यभिचारोत्पन्न नि पुनर्विवाहाची संतती आहे अशी कल्पना करणाऱ्या केतकरांवर त्यांनी चोहोकडून टीकेचा भडिमार केला. केतकरांनी घेतलेली इतिहासलेखकाची नि संशोधकाची सत्यनिष्ठ भूमिका स्वजातीच्या अभिमानापुढे त्यांना पटू शकली नाही नि पचली तर नाहीच नाही.[१] दि. ३०-८-२७ च्या केसरीत भगूरच्या गोपाळराव देसायांचे प्रसिद्ध झालेले पत्र किंवा गोवर्धनांच्या संजीवन मासिकाचे १९२५ ते २७ सालांतील अंक पाहिले, म्हणजे गोवर्धनांवरील लेखाबद्दल केतकरांविरुद्ध कसे काहूर उठले होते त्याची कल्पना येते.

ज्ञानकोशातील लिखाणाविरुद्ध गोवर्धनांप्रमाणेच चळवळ करणारी आणखी एक जात म्हणजे देवरुखे ब्राम्हणांची जात होय. देवरुख्यांची माहिती १९२५ साली प्रसिद्ध झालेल्या ज्ञानकोशाच्या पंधराव्या विभागात आली आहे; आणि ती रा. भिकाजी मोरेश्वर मांडुस्कर या देवरुखे गृहस्थांनी पुरविलेल्या सामग्रीवर, राजवाडे, विल्सन वगैरे इतिहासकारांच्या लिखाणावर व सेन्सस रिपोर्ट्स, गॅझेटियर्स इत्यादींवर आधारलेली आहे. पंधराव्या विभागात देशस्थांची माहिती आली नव्हती आणि तत्पूर्वीच्या विभागांत 'कोकणस्थांची' किंवा 'कऱ्हाड्यांची' माहिती दिलेली नव्हती. अशी माहिती कोणी न पाठविल्यामुळे आणि ज्ञानकोश-कार्यालयात वेळेवर तयार न झाल्यामुळे ती 'महाराष्ट्रखंड' या ज्ञानकोशाच्या पुरवणीखंडात द्यावयाचे ठरले होते. पण पुढे महाराष्ट्रखंड राहिला आणि ही माहितीही राहिली. अशा स्थितीत देवरुख्यांची तेवढी माहिती प्रसिद्ध झाली व तीही समाजशास्त्रीय पद्धतीने प्रसिद्ध झाली. तेव्हा देवरुख्यांना साहजिकपणे असे वाटले, की ज्ञानकोशकार देवरुख्यांना महाराष्ट्रीय ब्राम्हणांत बसवीत नाहीत आणि दनू, दरद, दरवेशी, दर्जी, इत्यादी 'द' अक्षरांत ज्ञानकोशामध्ये आलेल्या जातींच्या पंक्तीला बसवितात! "हे अपांक्त

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, परिशिष्ट, पृष्ठ १५२ ते १६६.

नाहीत याबद्दल निरनिराळ्या ठिकाणच्या धर्मसभेची व अधिकाऱ्यांची आज्ञापत्रे (नकला) पाहाण्यात येतात" "देशस्थांशी आपला लग्नव्यवहार अडीचशे वर्षांपासून असल्याचे (हे) सांगतात" इत्यादी प्रकारची शुद्ध शास्त्रीय आणि सावध वाक्येही देवरुख्यांना रुचली नाहीत. त्यांच्या रागाची इतरदेखील कारणे होती. पण हा सर्व राग गैरसमजाच्या पोटी उत्पन्न झाला होता, शास्त्रीय लिखाणाची सवय नसल्याने तो वाढला होता, असे विचाराअंती दिसून येते. ज्ञानकोशातील बहुतेक सर्व माहिती रा. मांदुस्करांच्या माहितीवर आधारलेली असल्यामुळे केतकरांच्याकडे जवळजवळ मुळींच दोष येत नव्हता. पण पंधरावा विभाग प्रसिद्ध झाल्यावर रा. तेरेदेसाई यांनी त्यातील आक्षेपार्ह लेखाचे पुनर्मुद्रण करून तो सुमारे अडीचशे मंडळींकडे पाठविला आणि तेव्हा-पासून देवरुख्यांच्या चळवळीस प्रारंभ झाला. सभा भरल्या, न्यायालयापुढे ज्ञानकोश-कारांना खेचण्याची भाषा झाली आणि नंतर ठाणे व मुंबई येथे ज्ञानकोशकारांकडे खरी माहिती पाठविण्यासाठी मंडळे स्थापन झाली. ही मंडळे पुढे एक होऊन त्यांचा संयुक्त निर्णय त्यांच्याच नावावर पुरवणीविभागात देण्याचे केतकरांनी मान्य केले. पण मंडळांत तीव्र मतभेद माजून अध्यक्षांच्या निर्णायक मतामुळेच ज्ञानकोशात द्यावयाचा मजकूर मान्य झाला! तेव्हा, अल्पसंख्य पक्षाने बहुसंख्य पक्षाचे म्हणणे आपणाला मान्य नाही, असे केतकरांना कळविले व केतकरांनी बहुसंख्य पक्षाला शक्य तर आपणाकडे अधिक मते वळविण्याचा यत्न करण्यास सुचविले. पुढे बहुसंख्य पक्षाने १६, १७ व १८ एप्रिल १९२७ रोजी दहिवलीस परिषद् भरविली व अल्पसंख्य पक्षाने २२, २३ व २४ मे १९२७ रोजी मुंबईस परिषद् भरवली. दोघांनीही आपापल्या पक्षास लोकमताचा पाठिंबा मिळविला; पण दोन परिषदा झाल्याने एकमुखी माहिती पुरविण्याचा मुख्य प्रश्न अनिर्णीतच राहिला! तो प्रश्न कधीच सुटला नाही. मधच्यामधे केतकर मात्र प्रखर टीकेचे धनी होऊन बसले. दोन परिषदा झाल्या तेव्हा मुंबईच्या एका पत्राने केतकरांवर असाही आरोप केला, की ज्ञानकोशाची जाहिरात करण्यासाठी ते देवरुखे मंडळीत मुद्दाम तंटे वाढवीत आहेत![1]

मुसलमान, गोवर्धन व देवरुखे या तीन जातींप्रमाणेच इतर काही जातींतही ज्ञानकोशामुळे खळबळी माजल्या. 'कुडाळदेशकर ब्राम्हणां'वर एक लेख अकराव्या विभागात रा. बांबर्डेकर यांनी दिलेला आहे. तो सारस्वतांना न आवडल्यामुळे सारस्वत ज्ञानकोशावर रागावले.[2] 'पाठारे प्रभूं'संबंधी लेख सतराव्या विभागात प्रसिद्ध झाला आहे. तो पाठारे प्रभूंतील एक गृहस्थ रा. लक्ष्मण बाळकृष्ण नायक यांनी लिहिला असून त्यांच्याच नावाने दिलेला आहे. त्या लेखात, कांचोळे-प्रभू पाठारे-प्रभूंपैकीच आहेत,

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, परिशिष्ट, पृष्ठे १३१ ते १५२, १६७; 'अखिल-देवरुखे-ब्राम्हण-परिषद', दहिवली, अहवाल; मुंबई-परिषदेसंबंधी पत्र, नवाकाळ, २२-४-२७; 'अखिल-देवरुखे-ब्राह्मण-परिषद व तिचे आक्षेपक' हे पत्र, नवाकाळ, १४-५-२७ वगैरे.

२. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, परिशिष्ट, पृष्ठे १३१, १६८.

असे म्हटल्यामुळे पाठारे-प्रभूंच्या पत्रांतून संतापलेली टीका प्रसिद्ध झाली. आमचा आणि कांचोळ्यांचा संबंध नाही, ज्ञानकोशातील माहिती चुकीची आहे, ती दुरुस्त व्हावी, असा पत्रव्यवहार मुंबईच्या 'पाठारे-प्रभू-सोशल-क्लब' मार्फत केतकरांकडे झाला आणि अनेक सह्यांचे एक विनंतीपत्रही केतकरांना पाठाऱ्यांकडून पाठविले गेले.[1] 'अभीर' हे 'यादव' नव्हेत, असे मत ज्ञानकोशाच्या चौथ्या खंडात १२५-१२६ या पृष्ठांवर आले आहे. त्याबद्दल पाटना येथील आपल्या परिषदेत 'अभीर' व 'गोलाल' या लोकांनी ज्ञानकोशाचा निषेध केला. विसाव्या विभागातील वल्लभपंथाच्या वर्णनाबद्दल गुजराथेमधील वल्लभपंथी ज्ञानकोशावर नाखूष झाले आणि त्यांनी निषेधपर सभा भरविल्या. गुजराती जैनांनीदेखील ज्ञानकोशाविरुद्ध सभा घेतल्या होत्या.[2] मिळून ज्ञानकोशातील जातीविषयक लेखनाने अनेक जातींचा राग केतकरांवर ओढवला आणि त्यांना टीकेच्या चौफेर माऱ्यात काही काळ उभे राहावे लागले.

ज्ञानकोशातील जातीविषयक लेखन व त्यामुळे झालेल्या चळवळी याबद्दल केतकर एके ठिकाणी म्हणतात, की "निरनिराळ्या जातींचा गहजब बहुतकरून ज्या कारणामुळे होतो तो असत्य प्रसिद्ध केल्यामुळे होत नसून सत्य प्रसिद्ध केल्यामुळेच होत असतो, असेच पुष्कळदा आढळून येते."[3] ते तर सत्याचे निःसीम उपासक होते आणि सत्य सांगितल्यामुळे असत्य नि दंभ यांच्या गोटात जी गडबड उडते ती बघत बसण्याची त्यांना हौस होती. तेव्हा त्यांच्याविरुद्ध निरनिराळ्या जातींत ज्या चळवळी झाल्या त्या काहीशा हसतमुखाने नि हौसेनेच त्यांनी सहन केल्या. निरनिराळ्या जातींकडून त्यांनी माहिती मागविली तेव्हा त्या जाती एकत्र आल्या आणि त्यांच्यात अनेक प्रश्नांना उत्तरे देण्याच्या निमित्ताने आत्मनिरीक्षणाला प्रारंभ झाला. आत्मनिरीक्षणातून काही सुधारणाही झाल्या. उदाहरणार्थ, कोठे पंचायतींचे निवाडे लिहून ठेवण्याची पद्धत सुरू झाली, कोठे क्षुद्र गोष्टींबद्दल व्यक्तीला दंड करण्याची प्रवृत्ती कमी झाली आणि कोठे जातीच्या शिक्षणाकडे दृष्टी वळली. केतकर याविषयी म्हणतात : "हा आमच्या दृष्टीने इतका मोठा फायदा झाला आहे, की त्या फायद्यामुळे संपादकांस मोठे समाधान वाटते.—आणि आपण आपल्या लिहिण्यामुळे किंवा आपल्या चुकांनी जरी एखाद्या जातीच्या सदस्यांस दुखविले असेल तरी आपण त्या जातीची काहीतरी सेवाच केली, अशी भावना होऊन एक तऱ्हेचा आनंदच वाटत आहे."[4] केतकरांच्या म्हणण्याप्रमाणे व्यक्तिशः काही जातींचा ज्ञानकोशामुळे फायदा झाला हे खरे; पण त्यांनी जातींची माहिती देणारे जे मूल्यवान सामाजिक वाङ्मय निर्माण केले त्यामुळे सुप्त जातीय भावना चांगलीच चाळवली आणि

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, परिशिष्ट, पृष्ठ १६८; विद्यासेवक, जानेवारी १९२७, फेब्रुवारी १९२७; 'प्रभुतरुण'चा १६ नोव्हेंबर १९२६ चा अंक.

२. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, परिशिष्ट, पृष्ठ १६८.

३. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, परिशिष्ट, पृष्ठ १६८.

४ ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, परिशिष्ट, पृष्ठे १२९-३०

जातिभेदाच्या उन्मूलनाचे त्यांचे जे तरुणपणापासून ध्येय होते त्याला न कळत सूक्ष्म अडथळा उत्पन्न झाला.

ज्ञानकोशाचा एकविसावा विभाग १९२७च्या एप्रिलमध्ये बाहेर पडला आणि प्रस्तावनाखंडाप्रमाणे शरीरखंड पुरा होऊन ज्ञानकोशाचे मुख्य कार्य जवळजवळ संपले.[१] तेव्हा आपल्या या प्रचंड ज्ञानकार्याचा वृत्तान्त सांगण्यासाठी १९२७ साली केतकरांनी 'माझे बारा वर्षांचे काम ऊर्फ ज्ञानकोश मंडळाचा इतिहास' हे आत्मवृत्तपर पुस्तक लिहून प्रसिद्ध केले. त्याच्या प्रस्तावनेत ते म्हणतात, की "ज्ञानकोशासारखा मोठा ग्रंथ करू इच्छिणारा जो कोणी असेल त्याला आपला अनुभव सांगावा, अशी कल्पना मनात ठेवून हे पुस्तक लिहिले आहे.... भावी ज्ञानकोशकारास जी जी माहिती उपयोगी पडेल असे वाटले ती ती सर्व माहिती एकत्र करून यात घातली आहे. ज्ञानकोशाच्या पुनर्मुद्रणाचा प्रसंग सुमारे २०-२५ वर्षांनी येईल, त्या वेळेस माझा अनुभव सांगण्यास मी असेनच अशी खात्री नाही व त्या वेळेस आजच्या आठवणी नाहीशा होतील व आजची साधनेही नाहीशी होतील. तर आपल्या आठवणी ताज्या आहेत तोपर्यंत जितक्या पद्धतशीर लिहून काढता येतील तितक्या लिहून काढाव्या, हे अवश्य आहे." या पुस्तकात आपल्या साऱ्या कार्याची माहिती कोठलाही विनय किंवा संकोच न बाळगता स्वतःच्या दृष्टिकोनातून तर त्यांनी दिलीच, पण आपणाला विरोध करणाऱ्यांची बाजूही शक्य तेवढ्या निःपक्षपातीपणाने मांडली. परिशिष्टामध्ये श्री. पाध्ये वगैरेंनी स्वतःवर केलेले आरोप आपल्या उत्तरांसह त्यांनी जसेच्या तसे दिले आणि ज्ञानकोशावर झालेल्या अनेक टीकाही उद्धृत केल्या! केवळ बाह्य घटना देऊन ते थांबले नाहीत, तर निरनिराळ्या वेळी आपल्या मनात उद्भवलेले विकार नि विचार त्यांनी आपल्या धृष्ट शैलीने कथन केले. कोणावर त्यांनी सूड उगवला नाही, पण कोणाला सैलही सोडले नाही. स्वतःच्या कार्याचे महत्त्व स्वतःच विवेचकपणे नि स्पष्टपणे सांगून टाकले. त्यामुळे, एका कर्त्या पुरुषाच्या कार्याचा मनमोकळा इतिहास म्हणून या पुस्तकाला काही असामान्य विशेषता प्राप्त झाली आणि महान मनांचा शोध घेणाऱ्या शोधकांना किंवा महान वाङ्मयीन कार्य करू पाहाणाऱ्या कार्यकर्त्यांना एक उपयुक्त वाङ्मय हाती गवसले. विशेष म्हणजे, ज्या पाचएक वर्षांच्या काळात विद्यासेवकातून त्यांनी पाच ग्रंथ लिहिले नि शेपाऊणशे लेख लिहिले, त्याच काळात त्यांनी हे पुस्तकही लिहिले! एका समीक्षकाने म्हटल्याप्रमाणे, या काळात त्यांनी एकामागोमाग एक असे इतके विविध लेखन केले, की वाचकांना नि समीक्षकांना उसंत मिळू द्यावयाची नाही, असा निर्धारच जणू त्यांनी केला होता.[२]

ज्ञानकोशाचे प्रचंड कार्य केतकरांच्या हातून पुरे होईल किंवा नाही, याविषयी मी मी म्हणणारांना शंका होती आणि इतके मोठे वाङ्मयकार्य तोवर महाराष्ट्रात झाले नसल्याने त्यावर साऱ्यांच्या नजरा खिळल्या होत्या. पण कलह, वादविवाद, विक्षिप्तपणा, धरसोड,

१. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ ९३.

२. 'महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण' यावर 'पोच व अभिप्राय', महाराष्ट्र, २९-४-२८.

विरोधी चळवळी, आर्थिक संकटे वगैरेंच्या धुरोळ्यात झगडता झगडता केतकरांनी ज्ञानकोश तडीला नेला नि त्यामुळे सर्वांना आश्चर्य नि समाधान वाटले. साहजिकच, १९२६ पासून, केतकरांचा गौरव करावा अशी भावना महाराष्ट्रभर उत्पन्न होऊन त्यांना सत्कारासाठी अनेक ठिकाणांहून आमंत्रणे येऊ लागली. प्रथमतः पुणेकरांनी त्यांना मे १९२६ मध्ये दुसऱ्या शारदोपासक संमेलनाचे अध्यक्षपद दिले नि त्यांच्याविषयीची आपली भावना व्यक्त केली. त्या वेळीं, आपल्या अध्यक्षीय भाषणात पहिल्या संमेलनाचे अध्यक्ष इतिहासाचार्य राजवाडे यांच्या भाषणाचे समालोचन त्यांनी केले आणि 'मराठी भाषा मरणार' या राजवाड्यांच्या भविष्यवाणीचा अर्थ उलगडून दाखविला. राजवाड्यांचे भाषण म्हणजे तार्किक अंदाज नव्हता, तर पौरुषाला केलेले आवाहन होते, असे मत त्यांनी व्यक्त केले आणि 'भाषा भ्रष्ट होते, नष्ट होत नाही' असा सामान्य सिद्धान्त सोदाहरण पटवून दिला. भाषा दुर्बल झाली की सामान्य जनांची अधोगती होते; वाङ्मय केवळ अंतर्गत सौंदर्याने जगू शकत नाही; त्याचे जीवन लोकांच्या आर्थिक, राजकीय वगैरे सुस्थितीवर अवलंबून असते; इत्यादी अनेक मूलगामी विचार त्यांनी आपल्या भाषणात सांगितले. शेवटी, 'समाजाची वाङ्मयविषयक गरज वाढविण्यासाठी खपेल ते लिहावे, त्यासाठी जनतेची अभिरुची लक्षात घ्यावी' असे एक अभिनव मत त्यांनी मांडले व "खपेल ते लिहावे, हे तत्व खरोखर निंदास्पद नाही; गलिच्छ वाङ्मय प्रसिद्ध केल्याने त्याचा खप होतो, असे म्हणणे चुकीचे आहे" अशी त्या विधेयाची फोड करून दाखविली. संमेलनात ज्ञानकोशाच्या कार्याचे अभिनंदन करणारा एक ठराव मान्य झाला आणि स्वागताध्यक्ष प्रा. द. वा. पोतदार यांनी आपल्या स्वागतपर भाषणात केतकरांची व राजवाड्यांची मार्मिक तुलना केली.[1] ज्ञानकोशाच्या कार्याविषयी लोकांना जे कौतुक वाटत होते त्यामुळे ह्या संमेलनाचे अध्यक्षपद केतकराना मिळाले होते; पण केतकर ज्ञानकोशाविषयी या संमेलनात किंवा नंतर झालेल्या अन्य सत्कार-समारंभांतही कधी फारसे बोलले नाहीत. मागे पडलेल्या कर्तृत्वाचे मानसिक रवंथ करीत बसावे, हा त्यांचा स्वभावच नव्हता. नवे विषय नि नवे विचार यांच्याकडे त्यांची सतत झेप असल्यामुळे बहुधा प्रत्येक सत्कारसमारंभात ते काहीतरी नवे नि विचार-प्रवर्तक मुद्दे मांडीत राहिले.

शारदोपासक संमेलन संपल्यानंतर 'खपेल ते लिहावे' या केतकरांच्या मतावर 'मनोरंजना'त वगैरे टीका झाली नि बीभत्स वाङ्मय लिहावे, कारण ते खपते, असा त्या मताचा अर्थ केला गेला. आपल्यावरील या टीकेला विद्यासेवकात त्यांनी असे उत्तर दिले, की महाराष्ट्राची अभिरुची शुद्ध असल्यामुळे बीभत्स वाङ्मय खपणार नाही आणि सामान्यतः बीभत्स वाङ्मय खपत नाही, तेव्हा तसले वाङ्मय लिहू नये! संमेलनात त्यांनी अश्लील वाङ्मयावरील चर्चा वेळ संपताच बंद केली व ठरावास अवसर

१. 'शारदोपासक संमेलन', 'शारदोपासकांच्या दुसऱ्या संमेलनप्रसंगी अध्यक्ष डॉ. श्री. व्यं. केतकर यांचे भाषण', 'स्वागताध्यक्ष प्रो. पोतदार यांचे भाषण', विद्यासेवक, मे १९२६.

ठेवला नाही, म्हणूनही त्यांच्याविषयी गैरसमज झाला. पण अश्लीलता-प्रतिबंधक कायद्याचे स्वरूप वक्त्यांनी पुढे मांडावे, अशी त्यांची इच्छा होती आणि तशी सिद्धता कोणाचीच नसल्यामुळे त्यांना चर्चा बंद करावी लागली होती.[१]

१९२६ च्या ऑक्टोबरनंतर उमरावतीच्या 'हिंदू हायस्कूल'चा सुवर्णमहोत्सव साजरा झाला. त्या वेळी मध्यप्रांताचे माजी गव्हर्नर रा. तांबे, सर मोरोपंत जोशी, ना. दादासाहेब खापर्डे, बॅ. रामराव देशमूख वगैरे 'हिंदू हायस्कूल'चे अनेक नामवंत माजी विद्यार्थी उमरावतीला जमले होते आणि 'हिंदू हायस्कूल' ही केतकरांचीही शाळा असल्यामुळे केतकरदेखील उमरावतीला गेले होते. याच शाळेत 'चालताबोलता ज्ञानकोश' अशी पदवी बालपणी त्यांना मिळाली होती नि आता तर ते खरेखुरे ज्ञानकोशकार झाले होते. तेव्हा, सुवर्णमहोत्सवाच्या सोहळ्यात लोकांनी त्यांचा बहुमान करून त्यांच्याविषयी अतिशय आपुलकीची अन आदराची भावना व्यक्त केली. मात्र वयाची चाळिशी उलटली, डोक्यावर वेलबुट्टीच्या टोपीऐवजी टक्कल आले, तरी बालपणीचा शाळेतला विक्षिप्तपणा केतकरांनी अद्यापी टाकलेला नव्हता. वर साहेबी सूट घालून नि खाली पुणेरी जोडा घालून या समारंभात ते वावरत होते![२]

१८ फेब्रुवारी १९२८ रोजी पुण्याच्या सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन त्यांचा सत्कार केला आणि उगवत्या पिढीची पहिली आदरांजली त्यांना वाहिली. या सत्कारसमारंभात त्यांनी विद्यार्थ्यांना जो संदेश दिला त्यात त्यांचे सारे भाषाप्रेम उत्कटपणे उचंबळून आले होते. ते म्हणाले, "मला संदेश म्हणून विशेष सांगावयाजोगे काही नाही. मला काही सांगावयाची गोष्ट असेल तर ती ही, की आपल्या पुढच्या आयुष्यक्रमात मराठी वाङ्मयास अपकर्षक असे सरकार तुम्ही टिकू देऊ नये. आपण ज्या लोकांच्या हाती राज्यसूत्रे देणार ती मंडळी मराठी वाङ्मयास उत्तेजन देतील अशा प्रकारचीच असली पाहिजे, अशी खबरदारी घ्या. सुशिक्षितांनी जंगली सरकार सहन करता कामा नये. वाङ्मयप्रेमी आणि भाषाप्रेमी लोकांनी जे सरकार व जी राज्यपद्धती आपल्या भाषेस अपकर्षक होईल ती टिकू देता कामा नयेत. मराठी भाषेत महाराष्ट्राचा राज्यकारभार चालणे यालाच मी स्वराज्य समजतो. जो कायदा मराठीत मांडला नाही तो कायदा महाराष्ट्रास बंधनकारक नाही. महाराष्ट्राचा जो गव्हर्नर असेल त्याची सहीदेखील मराठीत नसली तर ती बेकायदेशीर व्हावी, आणि मुख्य न्यायाधीशापासून खालच्या न्यायाधीशाच्या निवाड्याची भाषा मराठीच असली पाहिजे, या प्रकारचे कायदे तुम्ही लवकर मंजूर करून घ्या. देशी भाषेत राज्य चालविणारे सरकार जितके लवकर स्थापित होईल तितके लवकर स्थापित करा. हे जर तुमच्या पिढीने केले तरच तुमच्या पिढीने आपले कर्तव्य बजाविले असे होईल, एरव्ही होणार नाही."[३] त्यांचा हा संदेश

१. 'माझे भाषण व त्यावरील आक्षेप', विद्यासेवक, जुलै १९२६.

२. आ. रा. देशपांडे, प्रतिभा, जुलै १९३६; आठवणी, बा. सं. गडकरी.

३. लोकशिक्षण, मे-जून १९३७.

सङ्कदर्शनी भावनात्मक नि आग्रहीपणाचा वाटला तरी त्यामागे त्यांच्या जीवनाची सगळी विचारसरणी उभी होती. त्यांनी जगातील शक्तींचा वेध घेऊन जग एक होणार हे भविष्य हेरले होते आणि ‘एक जगा’च्या भविष्याशी सुसंगत असणारा प्रादेशिक राष्ट्रवाद, भाषावार प्रांतरचना नि देशी भाषांचे संवर्धन या कल्पना विचारपूर्वक स्वीकारल्या होत्या. एका देशी भाषेच्या संवर्धनाचा एक भाग म्हणून महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचा भगीरथ प्रयत्न त्यांनी केला होता. तेव्हा आपल्या संदेशात त्यांनी मराठीचा जो हिरीरीने पुरस्कार केला तो अगदी नैसर्गिक नि क्रमप्राप्त होता. त्यात प्रदीप्त भावना होत्या; पण त्या भावना दीर्घकालीन चिंतनाने पेटलेल्या होत्या, यात शंका नाही.

१९२८ सालीच नागपूरच्या मॉरिस महाविद्यालयाने आपल्या वार्षिक स्नेहसंमेलनात प्रमुख वक्ते म्हणून त्यांना पाचारण केले. त्या वेळी ‘प्राचीन महाराष्ट्रा’च्या इतिहासाचे काम त्यांनी हाती घेतलेले होते, त्यामुळे त्या इतिहासाशी संबद्ध अशा गोष्टीच आपल्या भाषणात त्यांनी सांगितल्या. वऱ्हाड-नागपूरची प्राचीन संस्कृती, तेथील ऐतिहासिक अवशेषांच्या शोधाची आवश्यकता, प्राचीन विदर्भकन्यांनी स्वतःचा पती निवडण्याची पाडलेली प्रथा वगैरे मुद्दे त्यांनी विस्तार करून मांडले आणि शेवटी समोर बसलेल्या विद्यार्थिनींना जाताजाता अशी सूचना केली, की स्वतःचा पती निवडण्याची विदर्भातील कन्यांची प्राचीन प्रथा त्यांनी बंद पडू देऊ नये! मॉरिस महाविद्यालयात केतकर आल्याची संधी साधून ६ ऑक्टोबर रोजी विदर्भ-साहित्य-संघातर्फे त्यांचे एक व्याख्यान करण्यात आले. ‘वाङ्मयविषयक सुखदुःखाच्या गोष्टी’ हा या व्याख्यानाचा विषय होता आणि त्यात बंगाली, कानडी, गुजराथी वगैरे भाषांशी तुलना करून मराठी भाषेचे दैन्य त्यांनी उलगडून दाखविले. ७ ऑक्टोबर रोजी, म्हणजे दुसऱ्याच दिवशी, मॉरिस व हिस्लॉप महाविद्यालयांमधील मराठी-मंडळांनी त्यांना मोठ्या थाटाचे मानपत्र दिले. त्या वेळी त्यांनी कालिदासाच्या मालविकाग्निमित्रावरील आपला एक ऐतिहासिक निबंध वाचून दाखविला आणि समारंभाचे अध्यक्ष प्रा. वि. वा. मिराशी यांनी त्यातील अनेक विधानांस आक्षेप घेतला.[1] पुढे केतकरांचा निबंध ‘महाराष्ट्र’मधून प्रसिद्ध होऊन प्रा. मिराशींनी त्यावर टीकात्मक सहा लेख लिहिले. केतकरांनीही प्रत्युत्तरात्मक तीन लेख लिहिले.—आणि एक विद्वत्तापूर्ण नि चिकित्सक असे वाग्युद्ध रंगले. मात्र प्रा. मिराशींनी आपल्या कोणत्याही मुद्द्याचे खडन केले नाही असे वाटून केतकरांनी ‘महाराष्ट्र’तील आपला निबंध पुढे, जवळजवळ जसाच्या तसा, आपल्या ‘प्राचीन महाराष्ट्र’त समाविष्ट केला. १९२८ साली नागपूरला हे जे सत्कार-समारंभ झाले त्यांनी त्यांना विशेष आनंद वाटला असावा. कारण नागपूर-वऱ्हाड हीच त्यांची प्रेमाची जन्मभूमी होती नि तेथेच त्यांच्या ज्ञानकोशकार्यालाही प्रारंभ झाला होता.

१. महाराष्ट्र, १४ ऑक्टोबर १९२८; श्री. ना. बनहट्टी, प्रतिभा, जुलै १९३७.

२. प्राचीन महाराष्ट्र, पृष्ठ ३९१; ‘महाराष्ट्र’तील वाद २८ ऑक्टोबर १९२८ ते ३१ मार्च १९२९ च्या अंकांत आढळेल.

शिवाय, जे नागपूर अनेक कारणांनी त्यांना सोडावे लागले होते, जेथे त्यांचे विरोधक होते नि पुरस्कर्तेही होते, त्याच नागपुरातील सत्काराला काही विशेष रुची होती.

ज्या काळात केतकरांचे असे सत्कार होत होते आणि एक मोठे कार्य पार पाडल्याचे समाधान ते अनुभवीत होते, त्याच काळात त्यांच्या मनामध्ये निराशा उत्पन्न व्हावी, असा एक प्रसंग घडून आला. १२ फेब्रुवारी १९२७ रोजी त्यांना पिसाळलेला कुत्रा चावला आणि मृत्यूच्या काळ्या छायेने त्यांना अगदी जवळून दर्शन दिले. या वेळीं 'आशावादी' कादंबरीचे लेखन ते करीत होते. तेव्हा मृत्यूची छाया दिसू लागल्यानंतर आपल्या लेखनावर कोणता परिणाम झाला, मनात विचारांचे कोणते तरंग उठले, ज्ञानकोशाच्या परिपूर्तीविषयी काय वाटले इत्यादी हकीगत त्यांनी 'आशावादी'च्या प्रस्तावनेत लिहून ठेवली आहे. ते म्हणतात, "आशावादी कादंबरी लिहिताना थोडीशी अपकर्षकता अगदी निराळ्याच कारणामुळे उत्पन्न झाली....लेखकाचा काही काळ अत्यंत तीव्र प्रकारच्या नैराश्यात गेला....नैराश्य उत्पन्न होण्याचे कारण असे झाले, की १२ फेब्रुवारी रोजी लेखकास पिसाळलेला कुत्रा चावला. अर्थात पाश्चूर उपचार तावडतोब केलेच, पण मनातील नैराश्य एकाएकी गेले नाही. कारण उपचार झाले तरी दर शेकडा काहीतरी लोक दगावतात आणि त्या दगावणाऱ्या व्यक्तींत आपण कशावरून येणार नाही, अशा कल्पना मनात येत. आपला अवतार आता दोनचार महिन्यांत आटपणार, तर कादंबरी लिहावी किंवा लिहू नये इत्यादी विचार चालत. मनात असे येई, की एखादा मोठा कोश पुरा करणारा कोशकार कोश संपताच मृत्युशय्येवर पडावा, असा महाराष्ट्राचा काही दैवयोग नसेल ना? गीर्वाणलघुकोशकार ओकांच्या मृत्यूनंतर मला एक पत्र आले होते. त्या पत्रातील मजकूर गेले फेब्रुवारी व मार्च हे दोन्ही महिने माझ्या मनात एकसारखा घोळत होता. त्या पत्रात असे लिहिले होते, की 'एल. आर. वैद्य डिक्शनरी पुरी मुद्रित होण्यापूर्वी वारले, आपटे मुद्रित झाल्याबरोबर वारले, एन. वी. रानडे आणि ओक हे ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर थोड्याच काळात वारले. तर तुम्ही संभाळून असा.' हे पत्र मला वारंवार आठवत होते आणि ते पत्र भवितव्याचे सूचकच असेल, असे मन सांगू लागले. प्रत्येक कोशकार कोश पुरा होताक्षणीच मरावा, असा दैवाचा नियम असता आपण आपली काळजी घेऊन कोश आटपूनदेखील पंचवीसतीस वर्षे काम करण्याचा आत्मविश्वास बाळगतो, हा आपला मूढपणा नव्हे काय, असे वाटू लागले. पण दैव म्हणून जर कोणी व्यक्ती असलीच तर ती माझ्या या आणखी तीस वर्षे काम करण्याच्या निश्चयाबद्दल आपल्या मनात हसत असेल आणि 'कोशकारा, तू आपली काळजी कितीही घेतलीस किंवा तुझ्या प्रकृतीकडे एकसारखे लक्ष ठेवलेस तरी मी दैव हा काहीतरी एक निराळाच भवितव्यनियामक अंश आहे, त्या मला विसरून चालावयाचे नाही, तर उगाच पसारा वाढवू नको' असे सांगत आहे, असे वाटे....ही किंकर्तव्यतेची वृत्ती १२ फेब्रुवारी-पासून जूनपर्यंत होती. फेब्रुवारी गेला, मार्च गेला, एप्रिल उजाडला; ज्ञानकोशाचा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ................ वि: ......
नों: दि: ...

एकविसावाही भाग पुरा छापून झाला. हा जेव्हा छापून झाला, तेव्हा मनाशी म्हटले, एकदाचा हा तर पुरा झाला. आता आपण मेलो तर काय होईल? ज्ञानकोशासाठी जे तीस हजारांचे कर्ज झाले आहे ते फेडण्याची असमर्थता उत्पन्न होईल आणि सावकार चुडतील, आणि माझ्या नावाने ओरडतील. कर्जाला जामीन मी असल्यामुळे माझ्यामागे घरदार विकावे लागेल. काही हरकत नाही. काय व्हायचे असेल ते होईल; पण ज्ञानकोश एकदाचा बाहेर पडला आहे. कौटुंबिक आपत्ती जरी उत्पन्न होईल तरी एक महत्वाचे कार्य हातावेगळे झाले आहे. या सर्व गोष्टी मनात आल्या आणि थोडासा वेफिकीरपणा-देखील उत्पन्न झाला.—आणि ४ एप्रिलनंतर कथालेखनास पुन्हा सुरवात झाली. कुत्र्याच्या विषाच्या 'इन्क्युवेशन'चे चाळीस दिवस आटपले. त्यानंतर मनाला बरीच स्वस्थता उत्पन्न झाली, पण हे लेखन चालून असता चिंतेचे झटके मधूनमधून येतच होते." आपल्या मनाचे केतकरांनी हे जे चित्र रेखाटले त्यात ज्ञानकोशाबद्दलची त्यांची जिद्द तर दिसतेच; पण मृत्यूबद्दल त्यांना जी गूढ भीती वाटे, दैवगतीपुढे चाळिशीनंतर त्यांना जी अस्पष्ट असहायता वाटे, तीही चांगली दिसते. १९२३ साली, ज्ञानकोशाच्या ऐन घणाघाईत, शांतारामपंत दांडेकरांच्या निधनाच्या वेळी, मृत्यूची पहिली सूचक घंटा त्यांना ऐकू आली होती. आता १९२७ साली, ज्ञानकोशाच्या समाप्तीच्या वेळी, कुत्रा चावल्याच्या निमित्ताने मृत्यूची दुसरी घंटा त्यांच्या कानावर आदळली. मृत्यूची तिसरी नि शेवटची घंटा अचानकपणे वाजणार आहे, याचीच जणू ही आणखी एक सूचना होती.

मृत्युघंटा वाजली नि निराशा उत्पन्न झाली, तरी निराशा फार काळ टिकली नाही. "अलीकडे, म्हणजे काही पाऊस झाल्यानंतर, मन स्वस्थ आणि आनंदित आहे, आणि जगाकडे पुन्हा आशावादी दृष्टीने पाहात आहे" असे 'आशावादी'च्या प्रस्तावनेतच त्यांनी म्हटले होते. निराशेने मरगळून स्वस्थ बसावे, हे त्यांच्या स्वभावातच नव्हते. ज्ञानकोश सुरू करताना १९१५च्या सुमारास जो आत्मविश्वास त्यांच्या अंगात मुसमुसत होता तोच आत्मविश्वास दहा वर्षांनंतरही कायम होता. एवढेच नव्हे, तर १९२४-२५च्या सुमारास ज्ञानकोशाचे काम आवाक्यात आल्यामुळे तो आत्मविश्वास वाढला होता, आणि जसजसे ज्ञानकोशाचे काम यशस्वीपणे हातावेगळे होत होते तसतसा तो आणखी वाढत चालला होता. त्यामुळे, १९२४ ते २९ या कालखंडात, ज्ञानकोशानंतर हाती घ्यावयाच्या कार्यक्रमासंबंधी अनेक कल्पना त्यांच्या महत्वाकांक्षी नि अधीर मनात येत होत्या आणि ते त्या 'विद्यासेवका'त किंवा अन्यत्र वेळोवेळी प्रसिद्ध करीत होते. या अमाप नि अफाट कल्पना बघून महाराष्ट्राला वाटत होते, की कल्पनांचा नि योजनांचा हा कोणी बादशहाच आहे! त्यांनी मांडलेली एक कल्पना अशी होती, की महाराष्ट्रीय ज्ञानकोशाची भाषांतरे इतर भारतीय भाषांत करावी आणि मराठीतील ज्ञानगंगेचे पाट इतर प्रांतांत सोडून द्यावे. त्यांची दुसरी कल्पना अशी होती, की दर दहा वर्षांनी महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या अद्ययावत आवृत्त्या काढाव्या नि इतर संग्रहग्रंथ प्रसिद्ध करीत राहावे. तिसरी कल्पना अशी होती, की चित्रकलेचा एक व्यापक अन सचित्र इतिहास

प्रसिद्ध करावा. चौथ्या कल्पनेप्रमाणे राजवाड्यांचा धातुकोश नि इतर लिखाण ते प्रकाशात आणणार होते. पाचव्या कल्पनेप्रमाणे, पाश्चात्य भाषांतील नाटके, कथा, कादंबऱ्या वगैरे वाङ्मयाचे सटीक भाषांतर देणारे 'कथामंदिर' नावाचे एक मासिक ते काढणार होते. त्यांचा एक विचार असा होता, की वेदांपासून थेट आजपर्यंत जे वाङ्मय झाले त्याचे मंथन करावे, त्यातील उच्च, नैतिक नि धार्मिक भावनांना प्रेरणा देणारे व सामाजिक दृष्ट्या उपयुक्त असे वेचे काढावे आणि एक 'नवसंहिता' तयार करावी. त्यांचा एक बेत असा होता, की 'महाराष्ट्रीयांच्या काव्यपरीक्षणा'चा ब्रिटिशपूर्व कालावरचा एक भाग निघाला होता, तसा अर्धामुर्धा तयार झालेला ब्रिटिश कालावरचा दुसरा भागही पुरा करून बाहेर काढावा. ज्ञानकोशाप्रमाणे मोठा मराठी शब्दकोश रचावा, असा एक संकल्प त्यांनी केला होता. लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांची तुलना करणारी नि साऱ्या महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेणारी एक लेखमाला ते लिहिणार होते. मराठ्यांच्या इतिहासाची साधने गोळा करावी, गोळा झालेली साधने प्रसिद्ध करावी, मराठ्यांचा व्यापक इतिहास लिहून काढावा, अशी त्यांची एक योजना होती. त्यांना वाटे, की जातींची माहिती देणारा 'डिरेक्टरी'सारखा एक 'ज्ञातिनामकोश' सिद्ध करावा. त्यांना असेही वाटे, की एक 'सेमिनार' स्थापून काही विद्वानांनी राजकीय प्रश्नांचा पंडिती अभ्यास करावा व आपले निष्कर्ष प्रसिद्ध करण्यासाठी एक त्रैमासिक चालवावे. 'स्वयंनिर्णयी संघा'मार्फत हिंदुस्थानचे स्वराज्य काबीज करण्याचा त्यांचा बेत कसा उगवला नि मावळला ते पूर्वी सांगितलेच आहे! शिवाय महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासाच्या लेखनाचे एक मोठे काम ते अंगावर घेऊ बघत होते आणि १९२७ साली त्या कामाला त्यांनी प्रारंभही केला होता.[1] अशा असंख्य कल्पना आणि कर्तृत्वाची अशी उद्दाम इच्छा मनात उचंबळत असता निराशेचा पगडा त्यांच्या मनावर किती काळ राहाणार? ज्ञानकोश संपतासंपताच त्यांनी अनेक नवी कामे काढली आणि अनेक नव्या सफरींचे प्रस्थान ठेवले.

जी नवी कामे ते अंगावर घेणार होते त्यांपैकी काही कामे ज्ञानकोशाप्रमाणे सामूहिक रीत्या करण्यासारखी होती. तेव्हा ज्ञानकोश आटोपला तरी त्यातील संपादकवर्ग टिकवावा, तो फुटू देऊ नये, असा त्यांचा प्रयत्न होता. १९२४ साली सप्टेंबरच्या विद्यासेवकात 'ज्ञानकोश-मंडळाचे भवितव्य' हा लेख त्यांनी लिहिला होता आणि त्यात म्हटले होते, की "काम करणारा मनुष्यसंघ व काम करण्याच्या अनुभविक पद्धती मोठ्या परिश्रमाने निर्माण होत असतात व या ज्या संस्थेत उत्पन्न होतात त्या संस्थेची विघटना झाल्यास राष्ट्राची पीछेहाट प्राप्त होते." त्यामुळे ज्ञानकोशातील संपादकवर्गाला बरोबर

१. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे ६४,६५; महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण, प्रस्तावना; 'ज्ञानकोश-मंडळाचे भवितव्य', विद्यासेवक, सप्टेंबर १९२४; विद्यासेवक, ऑगस्ट १९२५; 'प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासाची तयारी', विद्यासेवक, नोव्हेंबर १९२७; विद्यासेवक, डिसेंबर १९२७; 'संकल्पकथन', विद्यासेवक, एप्रिल १९२८; 'माझी गेली आठ वर्षे', प्रतिभा, जुलै १९३७ (उद्धृत).

घेऊनच नवी कामे सुरू करावी, अशी त्यांची विशेष खटपट होती. १९२७ च्या एप्रिल-मध्ये ज्ञानकोशाचा एकविसावा विभाग छापून निघाल्यानंतर ज्ञानकोशाचे फारसे काम उरले नाही आणि निश्चित स्वरुपाचे नवे काम हाती घेऊन संपादकवर्ग टिकवून धरण्याची निकड उत्पन्न झाली. तेव्हा त्यांच्या मनात एक नवीच कल्पना उद्भवली आणि संपादकवर्ग टिकवून धरण्यासाठी त्यांनी एक दैनिक वृत्तपत्र काढण्याचे ठरविले! दैनिक वृत्तपत्राचा जम चांगला बसून त्यात सारा संपादकवर्ग गुंतेल, दैनिक वृत्तपत्रात प्रचलित प्रश्नावरील आपली मते मांडण्यासही वाव मिळेल, आणि यथाकाल एखादे मोठे सामूहिक वाङ्मयकार्य मागाहून हाती घेता येईल, अशी त्यांची कल्पना होती. कल्पना निघाली आणि काहीशा घाईघाईनेच १ जून १९२७ रोजी दैनिक 'पुणे-समाचार'चा पहिला अंक बाहेर पडला![1]

'पुणे-समाचार' नीट चालेल, अशी आशा दाते, कर्वे इत्यादी केतकरांच्या सहकाऱ्यांना फारशी वाटत नव्हती. कारण त्या वेळी ज्ञानकोश-मंडळाची आर्थिक परिस्थिती प्रतिकूल होती आणि त्यांच्या दैनिकाला कोणत्याही विशिष्ट राजकीय पक्षाचा खास पाठिंबा नव्हता. ज्ञानकोशावरून केतकरांचा रा. न. चिं. केळकरांशी जो कडाडीचा वाद झाला होता, त्यामुळे पुण्यातील समर्थ असा केळकर-पक्ष नि केसरी हे वजनदारवृत्त पत्र तर त्यांना विरोध करणार, निदान त्यांना उचलून धरणार नाही, हे उघड होते. केतकरांच्या सहकाऱ्यांना अशी साधार भीती वाटत होती, की दैनिकाच्या या नव्या प्रयोगात मंडळाजवळचे असेल नसेल ते द्रव्य खलास होईल आणि पुढे अगदीच दैन्य ओढवेल. पण इतरांना काही वाटले तरी केतकर मात्र पूर्ण आशावादी होते! ते आपल्या सहकाऱ्यांना म्हणत, की 'अमेरिकेत एकेका शहराची दैनिके छान चालतात. त्यांत बहुतेक बातम्या व गोष्टी त्या शहरासंबंधीच असतात. त्याप्रमाणे नुसते पुणे शहरच घेऊन त्यासंबंधाच्या सर्व असतील नसतील त्या गोष्टी, चर्चा, विचार, संस्थावृत्ते, चळवळी, उदीम, व्यापार इत्यादी एकूण एक बाजू या पत्रात मांडीत गेल्यास या दीडदोन लाख वस्तीच्या शहराला 'पुणे-समाचार' हे आपले मुख आहे, आपले मन आहे, असे वाटेल आणि चांगला खप होईल. बाहेरचे राजकारण यात आणावयाचे नाही व आणावयाचे झाल्यास पुण्याचा त्यात भाग कोणता हे दाखविण्यापुरतेच आणावयाचे. पहिले चार अंक मीच एकटा भरून काढीन व तुम्हांला धोरण आखून देईन.' त्यांची अशी प्रतिज्ञा होती, की 'प्रत्येक पुणेकरास हे पत्र वाचावयास लावीन!' त्यांचा आशावाद असा जबरदस्त असल्यामुळे शिस्तीखातर त्यांचे सहकारी त्यांच्याबरोबर येण्यास तयार झाले.[2]

पुणे-समाचार सुरू होण्याच्या आदल्या दिवशी, म्हणजे ३१ मे १९२७ रोजी, श्री. श्री. रा. टिकेकर या वार्ताहरांनी संध्याकाळी केतकरांना अशी एक तुफानी वार्ता आणून दिली, की लौकरच पुण्यात एक सुशिक्षित हिंदू तरुणी एका मुसलमान

१. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ६५.
२ डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे ६५, ६६.

गृहस्थाबरोबर लग्न लावणार आहे ! पुढे महाराष्ट्रात खूप गाजलेल्या मालिनी पाणंदीकर व गुलबखान वशिरुद्दिनखान यांच्या विवाहाची ही वार्ता होती ! तेव्हा साहजिकच वधूवरांची नावे जाहीर न करता पण ठळकपणे ही वार्ता केतकरांनी पुणे-समाचारात प्रथम घातली आणि आख्ख्या पुण्याचे लक्ष आपल्या दैनिकाकडे एकदम खेचून घेतले. पुढे श्री. खान यांच्याशी केतकरांची एक मुलाखत झाली, सौ. शीलवती केतकर मालिनी-खान-विवाहात साक्षीदार राहिल्या आणि केतकरांचा त्या विवाहाशी बराच संबंध आला. त्यामुळे पुणे-समाचारात मालिनी-खान-विवाहाच्या ताज्या नि अस्सल बातम्या तर येत गेल्याच; पण त्या विवाहाच्या निमित्ताने पुणे-समाचारात केतकरांनी काही तात्त्विक लेखही लिहिले. एका हिंदू सुशिक्षित तरुणीने एका मुसलमान गृहस्थाबरोबर राजीखुषीने लग्न लावावे, या घटनेने त्या वेळी हिंदू समाजाच्या भावना संतप्त झाल्या होत्या. साऱ्यांच्या उत्सुक नजरा त्या विवाहाच्या एकमेव विषयावर जणू केंद्रित झाल्या होत्या. अशा परिस्थितीत पुणे-समाचाराने आपल्या स्तंभांतून त्या विषयावर बराच मजकूर दिल्यामुळे पुणे-समाचाराला तेजी आल्यासारखे झाले. मात्र केतकर पतिपत्नींनी मालिनी-खान-विवाहात जो थोडाफार भाग घेतला त्यामुळे त्यांच्यावर टीकेची झोड उठल्याखेरीज राहिली नाही.—आणि केतकरांच्या लेखांमुळे पुणे-समाचारालादेखील थोडासा प्रसाद मिळाला.[१]

पुणे-समाचारात वधूवरांची नावे केतकरानी प्रथम जाहीर केली नाहीत, पण नंतर केली; लग्न २४ जूनला झाले, पण ते २७ जूनला होणार अशी बातमी पुणे-समाचारात छापून आली; तेव्हा अच्युतराव कोल्हटकरांच्या 'चाबुकस्वारा'ने केतकरांच्यावर पुढील कोरडे ओढले. "ज्या एका कटाच्या योगाने मालिनीचा सुगावा दडवून ठेवून तिच्या आप्तांच्या सुखाचा उन्हाळा करण्यात आला त्या कटात जितका गुलबखान होता तितके डॉ. केतकर होते. समाजाने मालिनीच्या लग्नाला नापसंती दर्शविल्यामुळे आता लांड्या कोल्ह्याप्रमाणे डॉ. केतकर मालिनीच्या लग्नाविरुद्ध [पुणे-समाचारमधून] लिहिण्याचा खूप बहाणा करीत; पण हा लांडा कोल्हा...मालिनीच्या लग्नाच्या मुख्य बातम्या गुप्त राखून लोकांना खेळविण्याकरिता त्यांतून उगीचच एकएक बातमी बाहेर सोडीत होता."... "पुणे-समाचारात मालिनीचे लग्न ता. २७ ला होणार म्हणून खोटे छापून आणि अशा रीतीने हिंदू समाजाला व मालिनीच्या आप्तांना खोट्या समजुतीवर ठेवून ते लग्न ता. २४ रोजीच उरकण्यात आले. काय ही चकवाचकवी ! काय ही धडधडीत खोटी हूल !"[२] केतकरांनी या विवाहात सौ. शीलवतीबाईसह जो भाग घेतला त्यावर लिहितांना अच्युतराव कोल्हटकरांच्या 'संदेश'ने "सौ. शीलवती केतकरणीचा लुडबुडेपणा" असा पाचस्तंभी ठळक मथळा घातला होता ! 'संदेश'ने शीलवतीबाईंना उद्देशून लिहिले, की "शीलवती केतकरांना आम्ही हिंदू समजतो व हिंदू वस्त्रांबरोबर त्यांना हिंदू

१. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ६६; इत्यादी.
२. 'डॉ. केतकर आणि मालिनीचे लग्न', संदेश, १० जुलै १९२७, मध्ये उद्धृत.

अंतःकरणही उत्पन्न झाले आहे, अशी आमची समजूत आहे! आणि म्हणून आम्ही त्यांना स्पष्टच असा प्रश्न करतो, की बाई, तुम्ही हिंदुत्वाचा पेहेराव पेहेरून पुण्यात ज्या राहिलेल्या आहात त्या हिंदुत्वाचे संवर्धन करायला राहिलेल्या आहात, की हिंदू मुलींना इतर धर्मांच्या लोकांनी लग्नासाठी फितवलेल्या...पळवलेल्या...पाहाण्यासाठी राहिलेल्या आहात?—आपल्या पतींनी ज्ञानकोशाचे जे एवढे कार्य केलेले आहे व आपणही त्यात जे साहाय्य केलेले आहे त्यामुळे आम्ही इतके भाळून खास गेलेलो नाही, की तुम्ही आमच्या समाजात ढवळाढवळ करावी आणि आम्ही सहन करावी! आम्हांला ज्ञानकोश देऊन जर तुम्ही आमचा हिंदू धर्म घ्यायला लागाल तर शुक्रवार पेठेच्या खातेऱ्यातच ते सर्व ओझे आम्ही फेकून देऊ!" 'संदेश'ने केतकरांना उद्देशून पुढील वाक्ये रागारागात लिहिली: "अप्रस्तुत गोष्टींच्या चावट रानात न शिरता डॉ. केतकरांनी हे प्रसिद्ध केले पाहिजे, की हिंदू मुली मुसलमानांना द्याव्या, ह्या मताचा मी आहे व इतउत्तर माझे व माझ्या शीलवतीचे आयुष्य मी ह्या सत्कार्यासाठी खर्च करणार आहे! आम्हांला उघडउघड बोलणारा शत्रू पाहिजे, मित्र म्हणून गळेकापी करणारा घातकी मनुष्य आम्हांला नको."[1] केतकरांच्यावर मालिनीबाईंच्या सारस्वत जातीतील काही मंडळींही रुष्ट झाली होती. त्या मंडळींच्या टीकेचा रोख असा होता, की "डॉ. केतकर यांना दुसऱ्याच्या जातीत सुधारणा घडवून आणावयास पाहिजे आहे. नुकसान झाले तर दुसऱ्या जातीचे होईल अशी डॉ. केतकरांची वृत्ती आहे."[2]

केतकरांच्यावर मालिनी-खान-प्रकरणात अशी खूप भडक नि कडक टीका झाली, पण या प्रकरणात ते फारच विचारीपणाने वागले, असे त्यांची भूमिका पाहाता दिसून येते. त्यांनी ८ जुलैच्या पुणे-समाचारात असा खुलासा प्रसिद्ध केला, की ३१ मे रोजी विवाहाची बातमी कळताच मालिनीबाईंचे बंधू डॉ. सत्याश्रय पाणंदीकर यांना त्यांनी एक पत्र लिहिले आणि विवाहाची गोष्ट दहापंधरा सारस्वत मंडळींच्या कानावरही घातली. विवाह टळला असता तर मालिनीबाईंचे नाव आधी प्रसिद्ध होणे मालिनीबाईंनाच अनिष्ट होते, म्हणून त्यांनी पुणे-समाचारात मालिनीबाईंचे नाव प्रथम दिले नाही. पुढे श्री. खान यांनी जेव्हा चारपाच जूनच्या सुमारास आपल्या लग्नाची बातमी वधूच्या नावासह जाहीर केली तेव्हा वधूचे नाव त्यांनीही देण्यास सुरवात केली. अर्थात विवाहाचा सुगावा मालिनीबाईंच्या आप्तांना लागू न देण्याचा आरोप त्यांच्यावर सिद्ध होत नव्हता आणि मालिनीबाईंचे नाव दुष्ट हेतूने त्यांनी दडविले असेही म्हणणे शक्य नव्हते. अच्युतरावांनी विवाहाची खोटी तारीख छापण्याबद्दल नि हिंदू समाजाला फसविण्याबद्दल त्यांना जो दोष दिला होता, तो तर धादांत लबाडीचा होता. कारण लग्न २७ तारखेला होणार ही बातमी लग्न २४ तारखेला झाल्यानंतर २५ तारखेच्या पुणे-समाचारात चुकून छापली गेली होती! पुणे-समाचाराच्या त्याच अंकांत २४ तारखेला लग्न झाल्याची खरी बातमीही आली

१. संदेश, ३ जुलै १९२७.
२ आठवणी, केतकर, प्रतिभा, ६ नोव्हेंबर १९३३.

होती! लग्न झाल्यानंतर, लग्न पुढे होणार असे छापून कोणाला फसविणे आवश्यकच नव्हते; आणि खरी बातमी शेजारी असताना चुकीची बातमी वाचून कोणी फसलेही नसते. दि. २७ च्या लग्नाची, आधी मिळालेली, चुकीची बातमी काढून टाकण्याचे राहून गेल्याने सारा घोटाळा झाला होता. पण त्यातूनच अच्युतरावांनी लबाडीने विपर्यास केला! मालिनीबाईंची नि केतकरांची गाठ लग्नापूर्वी कधीही पडलेली नव्हती; त्यामुळे मुसलमानाशी विवाह करण्यापासून त्यांना केतकरांनी परावृत्त करावे, असा प्रसंगच उद्भवला नव्हता. शिवाय, आपल्या जातीबाहेर तू लग्न करू नकोस, असा उपदेश मालिनीबाईंना करण्यास आपण लायक नाही, हे केतकर जाणून होते; कारण त्यांनी स्वतःच जातीबाहेर लग्न केलेले होते. श्री. खान यांच्याशी त्यांची पहिली मुलाखत पुणे-समाचाराला बातमी मिळविण्याच्या निमित्ताने झाली. त्या वेळी श्री. खान यांनी त्यांना विचारले, की 'तुम्ही किंवा सौ. केतकर या लग्नाला साक्षीदार राहाल काय?' तेव्हा शीलवतीबाईंची संमती घेऊन त्यांनी उत्तर दिले, की 'शीलवतीबाई साक्षीदार राहातील.' यामध्ये त्यांची भूमिका अशी होती, की "जेव्हा एखादी हिंदू मुलगी मुसलमानाशी लग्न करण्याचा आग्रह धरून बसते तेव्हा तिऱ्हाइताचे कर्तव्य एवढेच होते, की तिने पूर्ण फसू नये." गुलाबखानांचे एक लग्न आधी झालेले असते तर मालिनीबाईंच्या उरावर सवत आली असती आणि लग्न रजिस्टर झाल्यावर त्या पकडीतून त्यांची सुटका होणे दुरापास्त झाले असते. तेव्हा साक्षीदार होण्याचे पतकरून त्यांनी गुलाबखानांची खाजगी चौकशी करण्याचा नैतिक अधिकार मिळविला आणि गुलाबखानांचे आधी लग्न झालेले असते तर दुसरे लग्न रजिस्टर करण्याच्या वेळी त्याला हरकत घेता यावी, अशी संधी उत्पन्न करून ठेवली. यात एका हिंदू मुलीचे शक्य तेवढे सुख पाहावे, हाच त्यांचा हेतू होता.[1] खरे म्हणजे, त्यांचा हिंदुत्वाभिमान इतका जागृत होता, की कोणा जाणत्या माणसाने या लग्नात साक्षीदार व्हायला पाहिजे, हे जरी त्यांच्या बुद्धीला पटत होते, तरी हिंदुत्वाभिमानामुळे त्यांना स्वतःला ती गोष्ट करवली नाही. एक हिंदू मुलगी मुसलमान होत असता, आपल्या मनाला ते बघणे फार क्लेशदायक वाटेल, म्हणून त्यांनी शीलवतीबाईंना साक्षीसाठी तयार केले होते![2] तेव्हा हिंदूंच्या मुली मुसलमानांच्या घरात घालण्याचा त्यांच्यावरील आरोप फार उथळ नि सरळसरळ गैरलागू होता. अच्युतराव कोल्हटकरांनी त्यांच्यावर जो भडिमार केला त्याचे कारण नागपूरला असताना अच्युतरावांची एक गळेपडू योजना त्यांनी धुडकावली होती, हे असावे. 'नारिंगी निशाण' या अच्युतरावांच्या नाट्यप्रयोगाचे ज्ञानकोशाला देऊ केलेले पैसे 'दक्षिणा नको' म्हणून त्यांनी नाकारले नव्हते का? तेव्हा सूडबुद्धीने नि भडकपणाच्या नादाने अच्युतरावांनी या वेळी त्यांना झोडपून काढले असावे!

१. 'पुणे-समाचारा'तील एतद्विषयक मजकूर १० जुलै १९२७ च्या 'संदेश'मध्ये उद्धृत केलेला आहे.

२. आठवणी, शीलवती केतकर.

सारस्वतांच्या जातीत आंतरधर्मीय विवाहाचा प्रयोग ते करू बघत होते, अशा अर्थाचा त्यांच्यावर जो आरोप होता तोही बरोबर नव्हता, हे वस्तुस्थितीवरून स्पष्ट दिसते. काही सारस्वत मंडळींच्यामध्ये त्यांच्याविषयी पूर्वीपासून गैरसमज असल्यामुळे त्या गैरसमजातून तो आरोप उद्भवला असावा.

मालिनी-खान-विवाहामुळे पुणे-समाचाराला महिना-दीड महिना तेजी आल्यासारखे झाले; पण पुढे तो फिका पडू लागला. केतकरांचा प्रारंभीचा हुरूप कमी होऊन पुणे-समाचाराचे काम रा. कर्वे-आदिक उपसंपादकांवर ते अधिकाधिक टाकू लागले. दैनिकाचा खप अपेक्षेप्रमाणे होईना; बातमीदारही नोकरीवर टिकेनात. दैनिकाचा रोजचा राक्षसी खर्च चालविण्यापेक्षा ते बंद करावे, असा विचार सगळ्यांच्या डोक्यात येऊ लागला. पण हाती घेतलेले काम मध्येच सोडणे बरे दिसणार नाही, म्हणून दैनिकाचे साप्ताहिक करावे, असा मध्यमक्रम मागाहून निघाला. विशेषतः पुणे जिल्ह्याचे मुखपत्र म्हणून पुणे-समाचार चालवावा, असा बेत झाला. दाते-कर्वे वगैरे मंडळींनी सरस्वती-मंदिर नावाची जी शिक्षणसंस्था काढली होती त्या संस्थेच्या शिक्षकांकडून तालुक्यातील बातम्या मागवाव्या, असे ठरले. जिल्ह्यासंबंधी इतर पत्रांत येणारा मजकूरही या साप्ताहिकात उद्धृत करता येईल अशी कल्पना निघाली.—आणि दैनिकाच्या ६४ अंकांनंतर पुणे-समाचाराच्या दुसऱ्या, साप्ताहिक अवताराची जिल्हापत्र म्हणून सुरुवात झाली.

पण पुणे-समाचाराचा दुसरा अवतारही यशस्वी होण्याची चिन्हे नव्हती. त्यात काही मजकूर वेधक किंवा उपयुक्त असा येत असे. उदाहरणार्थ, 'पुणे शहराची ऐतिहासिक पाहाणी' ही आबा चांदोरकरांची लेखमाला त्यात येई. गुजराथेतील जलप्रलयाची प्रत्यक्ष बघितलेली हकीगत त्यात रा. दात्यांनी दिली होती. केसरीचे विश्वस्त आणि लो. टिळकांचे चिरंजीव यांच्यात जो गाजलेला वाद झाला त्याच्या अनुषंगाने केसरीच्या विश्वस्तांविरुद्ध त्यात लिखाण येई. विशिष्ट पक्षात ज्यामुळे खळबळ उडेल अशी मते केतकर त्यात मधूनमधून प्रदर्शित करीत. एकदा त्यांनी अशी सूचना केली होती, की अशक्त व रोगी माणसांसाठी कुक्कुटांडपाक (एग सूप), ग्रीहारस, मांसमिश्रित अन्न इत्यादी जिन्नस मिळण्याची सोय शहरात प्रमुख जागी झाली पाहिजे ! पण काही मजकूर असा वेधक किंवा उपयुक्त असला तरी पुणे-समाचार एकंदरीत लोकप्रिय होत नव्हता. जुळणीचा खर्च वाचावा म्हणून 'विद्यासेवक', 'काव्यपरीक्षण', 'ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास', 'प्राचीन महाराष्ट्र' इत्यादी टिकाणी पुढे यावयाचा मजकूर त्यात आधी दिला जाई नि तो साप्ताहिकात जड अन् अप्रस्तुत वाटे. बाकीचा मजकूरही साप्ताहिकाला साजेसा येत नसे. साप्ताहिकात जे काही गुण लागतात ते पुणे-समाचारात पुरेशा प्रमाणात उत्पन्न होईनात नि त्याचा खप वाढेना. खप वाढेना म्हणून जाहिरातीही येईनात. मोठ्या पगाराच्या बड्या संपादकांना चारआठ

१. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे ६६ ते ६८.

आण्यांच्या जाहिराती गोळा करण्यास सांगून केतकरांनी गैरकिफायतीचा धंदाही करून बघितला, तरी जम बसेना. मिळून पुणे-समाचाराचा साप्ताहिक अवतारही गडगडणार हे स्पष्ट झाले आणि वर्षअखेर, ८ एप्रिल १९२८ रोजी, तो बंद करण्यात आला. विशेष सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे, ज्या केतकरांनी 'प्रत्येक पुणेकरास हे पत्र वाचावयास लावीन' अशी प्रतिज्ञा प्रारंभी केली होती, त्याच केतकरांनी शेवटच्या अंकात निगर्वी खिलाडूपणाने कबुली दिली, की 'आपण वृत्तपत्र चालविण्यास नालायक आहोत!'[1]

ज्ञानकोशातील संपादकवर्ग टिकवून धरावा म्हणून केतकरांनी पुणे-समाचार काढला, पण पुणे-समाचार चालू असतानाच संपादकवर्ग टिकणार नाही, ही गोष्ट हळूहळू स्पष्ट झाली. १९२७ च्या ऑक्टोबरपूर्वी केतकरांच्या नेतृत्वाखाली संपादकवर्गाने गुजराथी ज्ञानकोशाच्या कामास प्रारंभ केला होता आणि पुणे-समाचार बंद होण्यापूर्वी गुजराथी आवृत्तीत मराठीमधील कोणता भाग कसा घ्यावा यासंबंधी रा. दात्यांनी टिपणांचे दोन ग्रंथ तयार केले होते.[2] नवे सामूहिक कार्य असे नक्की होऊन मार्गीही लागले होते; पण मतभेद झाले ते कार्याविषयी न होता कार्यकर्त्यांची संघटना कशी असावी या प्रश्नावरच झाले. ज्ञानकोशाच्या मुद्रणाला प्रारंभ झाल्यापासून बरीच वर्षे सर्व नोकर-वर्गाबरोबर संपादकवर्गाचे पगार वेळच्या वेळी मिळत नव्हते आणि प्रत्येकाच्या पगाराची बरीच बाकी ज्ञानकोश-मंडळाकडे थकली होती. एकट्या रा. दात्यांच्या पगाराची बाकीच सुमारे चार हजार रुपये होती. पगार धड मिळत नव्हता, पण केतकर मात्र काहीशा सढळ हाताने नि काहीसे अवास्तव खर्च वेडरपणे करीत होते. बारीकसारीक काटकसर नि प्रत्येक रुपयाचे मोजमाप अवाढव्य आकाराच्या त्यांच्या स्वैर स्वभावात बसत नसे. साहजिकच, स्वतः अर्धपगारी काम करीत असता डोळ्यादेखत होणारा सढळ नि अवास्तव खर्च सहकारी संपादकांना बघवत नव्हता आणि केतकरांच्याविषयी एक प्रकारचा धुमा राग त्यांच्या मनात उत्पन्न झाला होता. त्यातही पगारांच्या बाक्या पगारांच्या प्रमाणात थकलेल्या नव्हत्या. केतकरांना सर्वांच्याहून जास्त, म्हणजे मासिक सव्वाचारशे रुपये पगार होता; पण त्यांच्या पगाराची बाकी सर्वांच्याहून जास्त, म्हणजे सुमारे सहा हजार रुपये, जरी असली तरी ती त्यांच्या पगाराच्या मानाने, इतरांशी तुलना करता, कमीच होती. त्यांचा खाजगी खर्च मोठा होता आणि त्यांना असे वाटे, की एवढा खर्च आपण केला नाही तर आपण ज्या प्रकारचे काम करतो त्या प्रकारचे काम आपल्या हातून होणार नाही नि ज्ञानकोशाला पैशाचा पुरेसा पुरवठा आपण करू शकणार नाही! त्यामुळे ज्ञानकोशातून ते स्वतःच्या पगाराची उचल जरुरीप्रमाणे करीत आणि ती गोष्ट इतर संपादकांच्या अतृप्त हृदयात टसठसत राही. आपल्या नोकरांचे नि सहकाऱ्यांचे पगार प्रसंगी घरातील

१. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे ६७ ते ६९; समाचार बंद झाल्याचा दिनांक 'संकल्पकथन', विद्यासेवक, एप्रिल १९२८ वरून.

२. 'गुजराती ज्ञानकोश व गुजरातचा इतिहास', विद्यासेवक, ऑक्टोबर १९२७; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ८१.

चीजवस्त मोडून करावयाचे, ही जी लो. टिळकआदिक कार्यकर्त्यांची स्वार्थत्यागाची मराठी परंपरा होती ती इतर संपादकांच्या नजरेसमोर असल्यामुळे त्यांना केतकरांचे नेतृत्व शबल वाटू लागले होते. ज्ञानकोशात बरीच वर्षे काम केल्यामुळे रा. दात्यांसारख्या माणसांना आत्मविश्वासही उत्पन्न झाला होता आणि नव्या कार्यात केतकरांकडे सर्वाधिकार असण्यापेक्षा दाते, कर्वे, दातार, चांदोरकर या प्रमुख सहसंपादकांत अधिकाराची विभागणी व्हावी, असा विचार वाढू लागला होता. या मंडळींना असे वाटे, की धोरण ठरविणारे नि कारभाराचे स्थूल नियंत्रण करणारे कार्यकर्त्यांचे एक मंडळ असेल तर केतकरांच्या स्वभावाला लगाम घालता येईल व व्यवहार अधिक किफायतीचा होईल. अशा मंडळाची एक योजना केतकरांपुढे मांडण्यात आली होती, पण केतकरांनी ती उचलून धरली नाही. त्यांच्यासारख्या गुरू प्रकृतीच्या, उत्स्फूर्त वृत्तीच्या नि तीव्र बुद्धीच्या पुरुषाला दुय्यम माणसांच्या समूहसत्तेत काम करणे मानवले नसावे. आपले निरपवाद नेतृत्व आपल्या सहकाऱ्यांना नको आहे, आपल्याविषयी त्यांच्या मनात विशुद्ध आदराची किंवा प्रेमाची भावना वसत नाही, हे त्यांना क्रमाक्रमाने नीट उमगले आणि पूर्वीच्या सहकाऱ्यांना सांगाती घेऊन नवी कामे करण्याची त्यांची उमेद मंद होत गेली. अखेर कार्यकर्त्यांच्या संघटनेची स्वतःची कोणतीच योजना त्यांनी पुढे मांडली नाही व आपल्या सहकाऱ्यांचा गट काहीशा विषण्ण मनाने फुटू दिला ![1]

दाते वगैरे मंडळी ज्ञानकोश सोडून गेली, तो प्रत्यक्ष प्रसंग थोड्याशा तणातणीच्या वातावरणात घडून आला. पुणे-समाचार नीट चालत नव्हता, नव्या संघटनेचा बेत जुळत नव्हता, आर्थिक तंगी तर फार झाली होती, अशा काळात १५ मार्च १९२८ रोजी केतकरांनी काटकसरीच्या दृष्टीने सर्व संपादकांना एक सूचना काढली व संपादकवर्गाचे पगार कमी केले. तेव्हा संपादकवर्गानेही उलट एक सूचना केतकरांकडे पाठविली आणि आपण नोकरी सोडणार असल्याचे त्यांना कळविले. रा. दाते, रा. कर्वे, रा. चांदोरकर नि ज्ञानकोशाचे हिशेबनीस रा. ग. ना. टिळक ही मंडळी या वेळी ग्वालेरच्या साहित्यसंमेलनाला जाण्याचे बेत आखीत होती. ते केतकरांना कळताच त्यांनी त्यांना स्पष्टीकरण विचारले, की ‘मला न विचारता तुम्ही हे बेत कसे आखता?’ पण ताणलेल्या मनःस्थितीत त्यांच्याकडून ताडकन उत्तर आले, की ‘आम्ही वाटेल तो बेत ठरवू शकतो. रजेच्या वेळी मात्र तुमच्याकडे अर्ज करू. मग तुम्ही वाटल्यास परवानगी द्यावी किंवा न द्यावी!’—आणि दाते, कर्वे, चांदोरकर, दातार ही मंडळी पुढे १ एप्रिलपासून नोकरी सोडून बाहेरच पडली! या मंडळींनी ‘महाराष्ट्र शब्दकोश’ काढण्याचे यापूर्वीच नक्की केले होते. तेव्हा झालेला तणातणीचा प्रसंग गोड करावा या बुद्धीने केतकरांनी त्यांना पानसुपारी दिली, शब्दकोशाच्या कार्याला उपयोगी पडावी म्हणून ज्ञानकोशाच्या ग्राहकांची यादी दिली आणि त्यांचे अभीष्टचिंतन

१. आठवणी, य. रा. दाते, रा. ना. टिळक; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे ९२, ९७, ९८; केतकर व दाते यांची २०-९-२९ व २१-९-२९ ची पत्रे.

केले ![1] दाते वगैरे मंडळी बाहेर पडल्यामुळे, नेकीने व जबाबदारीने काम करणाऱ्या धुरंधर सहकाऱ्यांच्या पाठिंब्याला केतकर कायमचे मुकले. आयुष्यातील पुढील सारी कार्ये बहुतांशी धुरंधर सहकाऱ्यांच्या अभावी एकटेपणीच त्यांना करावी लागली.

दाते वगैरे सहकारी संपादक ज्ञानकोश सोडून गेले, तेव्हा ज्ञानकोशाचा एकविसावा विभाग निघून 'शरीरखंड' पूर्ण झाला होता आणि पुरवणीखंडापैकी 'हिंदुस्थानखंड' हा तेविसावा विभागही १९२७ साली प्रसिद्ध झाला होता. पुरवणीखंडांपैकी फक्त 'महाराष्ट्रखंड' राहिला होता, पण तो कधीच पुरा झाला नाही. म्हणजे शिल्लक काम फक्त सूचीखंडातील सूचीचे राहिले होते, असे म्हणता येईल. त्या वेळी ज्ञानकोश-मंडळाची एकूण मालमत्ता दहा हजार रुपयांच्या आत होती नि थकलेले पगार धरून कर्ज पंचवीस हजारांच्या वर होते. सारी मालमत्ता केतकरांच्या नावाने केलेली होती आणि कर्जाला जबाबदारही तेच होते. अशा स्थितीत, सावकारांनी मंडळाचा कारभार हाती घेण्याची इच्छा दर्शविली; कारण केतकरांच्या पगाराचा बोजा त्यांना मंडळावर राहावयास नको होता. तेव्हा १३ जून १९२८ रोजी केतकरांनी संपादकत्वाचा व व्यवस्थापकत्वाचा राजिनामा दिला आणि सावकारांनीही कर्जाच्या जबाबदारीतून त्यांना मुक्त केले. पुढे १९२९ साली सूचीचे काम केतकरांनीच केले आणि ज्ञानकोशाचा बाविसावा विभाग म्हणून सूची प्रसिद्ध झाली. सूची प्रसिद्ध झाल्यावर ज्ञानकोश-मंडळाचे चालू खात्याचे कर्ज फिटले; म्हणजेच न खपलेले संच वगैरे देऊन पगाराच्या बाक्या भागविण्यात आल्या. नंतर सावकार व भागीदार यांच्यात मालमत्तेच्या वाटणीचा ठराव होऊन त्याप्रमाणे वाटणी झाली. सावकारांकडे छापखाना, ग्रंथालय व मंडळाने छापलेले काही ग्रंथ गेले आणि ज्या भागिदारांना ज्ञानकोशाचा एकेक संच दिलेला होता त्या भागिदारांचे शंभर रुपयांचे भाग-भांडवल परत दिले गेले, असे समजण्यात आले. शेवटी एकाहून अधिक भाग धारण करणारे थोडेसे भागीदारच शिल्लक होते; त्यांना ठराविक व्याज देऊन 'ज्ञानकोश-मंडळा'चा कारभार केतकरांनी स्वेच्छेने चालवावा, असे ठरले आणि २२ जून १९३० रोजी ज्ञानकोश-मंडळ केतकरांच्या स्वाधीन झाले![2]

ज्ञानकोशासाठी एकत्र आलेला अन् ज्ञानकोशात अनुभवसंपन्न बनलेला संपादकवर्ग टिकू शकला नाही; छापखाना व मूल्यवान ग्रंथालय यांची सावकारांकरवी विक्री झाली; आणि ज्ञानकोशमंडळ ही संस्था जरी नाममात्र जिवंत राहिली तरी तत्वतः संपुष्टात आली.—केतकरांनी निर्माण केलेल्या सृष्टीची ही विल्हेवाट खरोखरच दुःखद होती. पण ही विल्हेवाट दुःखद असली, तरी केतकरांच्या हाती विल्हेवाटीपूर्वीच फार मोठे यश गवसले होते. व्यापारी पद्धतीची 'मर्यादित मंडळी' काढून मोठे वाङ्मयकार्य

१. आठवणी, य. रा. दाते; 'ज्ञानकोश-मंडळ आणि विद्यासेवक', विद्यासेवक, जून १९२९; 'माझी गेली आठ वर्षे', प्रतिभा, जुलै १९३७ (उद्धृत).

२. 'माझी गेली आठ वर्षे', प्रतिभा, जुलै १९३७ (उद्धृत); 'ज्ञानकोश-मंडळ आणि विद्यासेवक', विद्यासेवक, जून १९२९; आठवणी, ग. ना. टिळक.

उरकण्याचा त्यांचा अभिनव अन आश्चर्यकारक प्रयोग बव्हंशी यशस्वी झाला होता! या प्रयोगात भागिदारांना ते नफा वाटू शकले नव्हते; पण ज्ञानकोशाच्या संचाच्या रूपाने भागिदारांचे भागभांडवल त्यांनी परत केले होते. संपादकांना पगारबाकीच्या पोटी अखेरीस काही ग्रंथ घेऊन घस सोसावी लागली होती; पण त्या काळाच्या मानाने संपादकांना त्यांनी सढळ पगार दिलेले होते.[1] सर्व सावकारांना मिळून तीनचार हजारांची बूड आली असेल; पण तीनचार लाख रुपयांची जी उलाढाल झाली[2] तीत ही बूड विशेष मोठी नव्हती. ज्यासाठी 'मर्यादित मंडळी' काढली तो ज्ञानकोश तर पूर्णपणे बाहेर पडला होता. तेव्हा अनेकांना जी थोडीथोडी आर्थिक झळ लागली ती जमेस धरूनही 'मर्यादित मंडळी'ची यंत्रणा वाङ्मयोत्पादनाच्या उद्योगाकडे वापरण्याचा त्यांचा प्रयोग बराचसा यशस्वी झाला होता, असेच म्हणावे लागेल.—आणि 'मर्यादित मंडळी'च्या यंत्रणेमधून त्यांनी जे वाङ्मयाचे कार्य केले त्याला तर तोड नव्हती! तेवीस खंडांचा फार मोठा ग्रंथ त्यांनी निर्माण केला होता. जगातील शक्य तेवढ्या ज्ञानाचे मंथन करून त्यातले उपयुक्त ज्ञान या ग्रंथात महाराष्ट्रासाठी नि हिंदुस्थानसाठी त्यांनी मांडून ठेवले होते. नुसते ज्ञानच त्यांनी मांडले नव्हते, तर ज्ञानाला विधायक विचारांची आणि संशोधनाचीही जोड दिली होती. हिंदुस्थानातल्या कोणत्याही भाषेतील ज्ञानकोशाहून पांडित्याच्या बाबतीत त्यांचा ज्ञानकोश वरचढ झाला होता. त्यात काही किरकोळ उणिवा नि दोष असतील; पण ज्ञानाच्या प्रचंडपणाने व पांडित्याच्या उंचीने तो महाराष्ट्र-वाङ्मयात असा शोभू लागला होता की महाराष्ट्रभूमीवर शोभणारा जसा सह्याद्री! नवी यंत्रणा वापरण्याच्या दृष्टीने नि वाङ्मयाच्या दृष्टीने हे जे अपार यश केतकरांना मिळाले होते त्यापुढे संपादकवर्ग, ग्रंथालय वगैरे त्यांनी निर्मिलेल्या सृष्टीची जी विल्हेवाट लागली ती काहीच नव्हती. ती विल्हेवाट लागली नसती तर त्यांचे यश अधिक उजळ झाले असते, हे खरे. पण चंद्रावर कलंक उत्पन्न करावा, ही विधात्याचीच खोड नाही का?

एक जीवन सार्थकी लागावे असे ज्ञानकोशाचे कार्य बारा वर्षांहून अधिक काळ झगडून केतकरांनी तडीस नेले, पण त्या कार्याच्या मर्यादा त्यांच्या व्यक्तित्वाला कधीही पडल्या नाहीत. ज्ञानकोशकार जसा असावा तसे बनण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही आणि आपले व्यक्तित्व विशिष्ट साच्यात ओतून त्याला जनमताप्रमाणे घाट दिला नाही. ज्ञानकोशापूर्वी ते जसे अंतःस्फूर्त, विशृंखल नि विक्षिप्त होते, तसेच ज्ञानकोश संपतानाही राहिले. हा मनुष्य ज्ञानकोश तर रचतो, पण आपल्या कल्पनेतील ज्ञानकोश-कारासारखा गंभीरपणाने नि संभावितपणाने तर वागत नाही, हे सामान्य मराठी माणसे जेव्हा बघत तेव्हा त्यांना आश्चर्याचे धक्के बसत. किंबहुना आपल्या ज्ञानापेक्षा नि ज्ञानकोशापेक्षा आपल्या मुलखावेगळ्या वागणुकीनेच ते लोकांच्या नजरेत भरत

१. आठवणी, ग. ना. टिळक.

२. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठे १८६, १८७.

नि लोकचर्चेचा विषय होत. ते नागपूरला होते तेव्हा 'अनाकलनीय वल्ली' होते, पुण्याला ज्ञानकोशाचा भर असताना वावरले तेव्हा 'न उलगडणारे कोडे' होते, अन् ज्ञानकोश संपला तरी त्यांच्या वर्तनाचा ग्रंथ लोकांना अजून नीट लागला नव्हता. ज्ञानकोशातील यशाचा तुरा या ज्ञानकोशकाराच्या पगडीत खोवला गेला तेव्हाची त्याची दोनतीन दर्शने या दृष्टीने बघण्यासारखी आहेत.

१९२७ सालचे साहित्यसंमेलन पुण्याला भरले तेव्हा किर्लोस्कर नाटकगृहामध्ये रात्री काव्यगायनाचा कार्यक्रम झाला. स्वतः केतकरांखेरीज कोणीही केतकरांना कवी समजत नसे; पण या कार्यक्रमात पट्टीच्या कवींचे काव्यगायन झाल्यानंतर ते व्यासपीठावर चढले!—आणि त्यांनी आपल्या 'बेसूर' आवाजात 'आर्या' वृत्तातील आपले काव्य वाचून दाखविले. काव्यात अमेरिकन युवयुवतींचे 'निर्विकार' 'प्रेमवर्णन' त्यांनी केलेले होते आणि 'स्पष्टीकरणात्मक टीपांसह' ते वर्णन ते वाचून दाखवीत होते. यात असंख्य विसंगत गोष्टींचा समुच्चय त्यांनी न कळत घडवून आणला होता. तेव्हा काव्यगायनाने नव्हे पण 'कवी'च्या या तऱ्हेदार वर्तनाने प्रेक्षकांची भरपूर करमणूक झाली![1]

केसरीकार केळकरांशी त्यांचे 'तुझे माझे जमेना नि तुझ्यावाचून गमेना' या जातीतले छत्तीस-अंकी सख्य होते. केसरीचे विश्वस्त नि लो. टिळकांचे चिरंजीव यांच्यात वाद पेटला तेव्हा केळकरांच्याविरुद्ध त्यांनी पुणे-समाचारामधून खूप टीका केली होती. पण १९२८ साली केसरीचे विश्वस्त नि लोकमान्यांचे चिरंजीव रामभाऊ टिळक यांच्यात जेव्हा तडजोडीची बोलणी सुरू झाली तेव्हा त्यांना एक वेगळीच लहर आली. केळकरांनी आपला पूर्वद्वेष टाकून रामभाऊ टिळकांशी तडजोड करावी म्हणून पुढील मासलेवाईक पत्र १३-९-२८ रोजी त्यानी केळकरांना लिहिले: "वि. वि.—आजपासून चाळीस दिवसांनी तुमचा मृत्यू आहे असे समजून तुम्ही आता काय करावे याच्या तरतुदीला लागावे, अशी तुम्हांस माझी सूचना आहे. तुम्हांस मी हे स्नेहबुद्धीने लिहीत आहे. मला पिसाळलेले कुत्रे चावले तेव्हा आपणास कदाचित लवकर इहलोक सोडावा लागेल, असे वाटले. त्याचा मनावर फार इष्ट परिणाम झाला. कोणतेही शत्रुत्व वाढविण्यात अर्थ नाही, असे वाटू लागले. प्रेम व द्वेष या दोनही गोष्टींचा फोलपणा अशा वेळेस वाटू लागतो व निराळी दृष्टी उत्पन्न होते. सांगितलेला विचार लक्षात घ्यावा, हे विज्ञापना....ता. क.... तडजोड झाली म्हणजे राजकारण अधिक स्वस्थ चित्ताने करता येईल व आम्हीही आपणास मदत करू."—केळकरांनी तडजोड करावी म्हणून लिहिलेले हे पत्र म्हणजे एक कल्पनातीत उपाय नव्हता का? आपला मृत्यू लौकरच ओढवणार आहे, असे केळकरांनी समजावे, असे त्यांना वाटत होते! पण त्यांच्या वाटण्यासाठी स्वतःच्या मृत्यूची कल्पना केळकर कशी करून घेणार? शिवाय तो मृत्यू नेमका चाळीस दिवसांनी व्हावयाचा हे काय म्हणून? तडजोड झाल्यावर केळकरांना राजकारणात मदत करण्याचे आश्वासन ते देत होते! पण राजकारणात केळकर उच्च

१. श्री. ना. बनहट्टी, प्रतिभा, जुलै १९३७.

स्थानावर सुप्रतिष्ठित होते आणि केतकरांना तेथे उभे राहण्यापुरतीही जागा मिळाली नव्हती. मग त्यांच्या मदतीची किंमत केळकरांना वाटणार ती किती आणि तीसाठी केळकर तडजोडीला तयार होणार तरी कसे ? या मासलेवाईक पत्राचा परिणाम एवढाच झाला, की केळकरांनी ते पत्र केसरीत प्रसिद्ध केले आणि त्यावर विपर्यस्त मल्लीनाथी करून महाराष्ट्रभर केतकरांची नाचक्की करण्याचा मोका साधला ![1]

१९२८ सालीच मुंबईला फ्रेंच ब्रिजच्या नाक्यावरील मंत्री-बिल्डिंगमध्ये 'स्टूडंट्स ब्रदरहुड' या संस्थेमार्फत त्यांची चार व्याख्याने झाली. त्या वेळी एका व्याख्यानाच्या आधी समोरच्या 'अलाइज हॉटेल'जवळ एक सुस्वरूप नि ब्राम्हण जातीमधील असावी अशी वाटणारी वेश्या त्यांच्या दृष्टीस पडली. तिला बघताच त्यांच्या डोक्यात विचारांची अनेक चक्रे एकदम फिरू लागली आणि तिच्या उद्धारासाठी ते अस्वस्थ झाले. व्याख्यान संपल्यावर तिची भेट घेण्यासाठी ते फुटपाथवर काही काळ रेंगाळले आणि ज्यांच्याकडे ते उतरले होते त्या रा. लालजी पेंडश्यांच्या घरी गेल्यावर तिच्याबद्दल ते बोलू लागले. पेंडश्यांच्या घरी जी वडीलधारी पाहुणेमंडळी आली होती ती 'हे काय प्रकरण आहे ?' म्हणून कान टवकारीत होती, पण तिकडे त्यांचे लक्ष नव्हते. ते लालजींना म्हणाले, 'तू माझ्याबरोबर चल; आपण तिची भेट घेऊन चौकशी करू या.' लालजी उत्तरले, 'डॉक्टर, बदनाम होण्याचा हा फुकट उपद्व्याप सांगितला आहे कोणी ?' त्यावर त्यांनी युक्तिवाद केला, की 'तू बदनाम होणार नाहीस. झालो तर मी होईन. माझ्यापेक्षा तू लहान आहेस; तेव्हा लोक फार तर म्हणतील, की या डॉक्टराने पोराला बिघडविले !—आणि लोकांची सहानुभूती तुझ्याकडेच राहील!' अखेर आग्रह करकरून लालजींना घेऊन एके दिवशी ते त्या वेश्येकडे गेले. प्रथमतः त्यांनी तिला प्रश्न केला, की 'तुझी फी काय ?' ती म्हणाली, 'तुम्ही इथे राहू नका. इथून निघून जा. ही जागा वाईट आहे.' तर ते पुन्हा 'फी काय ?' असा प्रश्न करीत नि पुन्हा ती त्यांना निघून जाण्याची विनंती करी. त्यांचा फीचा प्रश्न चमत्कारीक होता; पण तिचा धंद्यामधला वेळ आपण घेणार तर तिचे नुकसान होऊ देऊ नये, असा विचार ते करीत होते. त्या प्रश्नाचा दुसरा अर्थ त्यांच्या ध्यानात येत नव्हता! तिची पुनःपुन्हा निघून जाण्याची विनंती ऐकून त्यांनी विचारले, की 'तू आम्हांला ओळखतेस काय ?' ती म्हणाली, 'हो. तुम्ही ज्ञानकोश लिहिणारे केतकर आणि हे लालजी पेंडसे !' तिचे हे अनपेक्षित उत्तर ऐकून ते नि लालजी दोघेही आश्चर्याने थक्क झाले. तिने विचारले, की 'तुम्हांला काय हवे ?' तेव्हा कुठे फीचा प्रश्न सोडून त्यांनी सांगितले, की 'मला तुमचा इंटरव्ह्यू घ्यावयाचा आहे !' ती तिथे 'इंटरव्ह्यू' द्यावयास तयार होईना, तेव्हा त्यांनी तिला गुजराथी ज्ञानकोशाच्या कचेरीत दुसऱ्या दिवशी येण्याचे आमंत्रण दिले. त्यावर 'भावाला विचारून मग मी येईन' असे तिने आश्वासन दिले आणि लालजी व ते घरी परतले. दुसऱ्या दिवशी तिला आणण्यासाठी त्यांनी मोटार पाठविली; पण ती आली नाही.

१. समग्र केळकर-वाङ्मय, केसरीखंड, पृष्ठे ४९१ ते ४९३.

तिला वेश्याव्यवसायातून मुक्त करावे म्हणून त्या पाचसात दिवसात त्यांच्या डोक्यात नाना कल्पना जोरजोरात घुमत होत्या. प्रथम त्यांना वाटले, की तिला एक घरगुती सामानाचे दुकान काढून द्यावे व त्या दुकानात स्त्री-गिऱ्हाइके येतील असलाच माल ठेवावा. मागाहून त्यांनी अशी कल्पना काढली, की पुरुष-गिऱ्हाइके येतील असला मालही दुकानात ठेवला पाहिजे, कारण माल विकण्यास सुस्वरूप स्त्री असेल तर साहजिक पुरुष तेथे अधिक आकृष्ट होतील. तिला चित्रपटाच्या धंद्यात घालावे, असाही एक विचार त्यांच्या डोक्यात येत होता व म्हणून काही चित्रपटसंस्थांच्या चालकांशी ते बोलणी करून आले होते. त्यांचा एक बेत असा होता, की तिला एक उपाहारगृह काढून द्यावे. उपाहारगृहासाठी किंवा दुकानासाठी भांडवल किती लागेल, जागा कुठे मिळेल, भांडवल कसे उभारता येईल इत्यादी प्रश्न सोडविण्याच्या मागे ते होते आणि ते लालजींना म्हणत होते, की 'दुकानाला आठदहा हजार रुपये लागतील; पैकी तू किती घालशील? बोल.' लालजींनी मध्येच त्यांना असा प्रश्न केला, की 'ती वेश्या ब्राम्हणच कशावरून?' तेव्हा 'बाँबे व्हिजिलन्स सोसायटी'त जाऊन वेश्यांचे जातवार आकडे त्यांनी मिळविले आणि 'एकही ब्राम्हण स्त्री मुंबईमध्ये वेशाव्यवसायात नाही, श्रीमंत गिऱ्हाइके मिळवण्यासाठी काही वेश्या स्वतः ब्राम्हण असल्याचा बहाणा करतात' असा शोध काढला. ती सुस्वरूप वेश्या मात्र बुलढाण्याच्या एका वकिलाची बायको आहे, अशी खास माहिती त्यांनी मिळवली होती!

पुढे, एके दिवशी त्या वेश्येच्या घरी ते स्वतःच गेले आणि तिला म्हणाले, 'बोल, तू कोणता धंदा स्वीकारतेस? दुकान, हॉटेल, की सिनेमा, की आणखी काही?' तेव्हा ती म्हणाली, 'डॉक्टरसाहेब, मी वेश्याव्यवसायातून बाहेर पडावे, असा तुमचा आग्रह का? तुम्हांला हा नसता खटाटोप सांगितला आहे कोणी? मला या व्यवसायातून बाहेर पडावयाचे नाही!' हे अनपेक्षित नि ठणठणीत उत्तर ऐकून ते थंड पडले. त्यांनी तिचा नाद सोडून दिला![१]

महाराष्ट्राला ज्ञानकोश देणारे केतकर हे असे होते. त्यांनी ज्ञानकोश रचला, पण ज्ञानकोशकाराच्या भूमिकेला लोककल्पनेत ज्या मर्यादा असतात त्या त्यांनी कधीच मानल्या नाहीत. सामान्यपणाच्या अन् संभावितपणाच्या साऱ्या मर्यादा उल्लंघून त्यांचे व्यक्तित्व पुराच्या पाण्यासारखे सगळीकडे फेसाळत नि फुसांडत स्वैर वहात असे.

१. आठवणी, लालजी पेंडसे.

## कौटुंबिक जीवन

**[१९२४ ते पुढे]**

लग्नाच्या वेळीच पस्तिशी उलटून शीलवतीबाईंना प्रौढपणा आला होता. लग्नानंतर आई होण्याची त्यांची इच्छा साहजिकच वाढत गेली आणि मुलासाठी त्या भुकेजल्या आहेत, हे भोवतालच्या मंडळींच्याही ध्यानात येऊ लागले. पण लग्नाला तीनचार वर्षे उलटून गेली तरी त्यांना मूल झाले नाही. पतिपत्नींची चाळिशी उलटल्यानंतर मूल होण्याची शक्यता तर फारच कमी उरली. तेव्हा एखादे अनाथ मूल सांभाळण्यासाठी घरी आणावे, असा विचार केतकरांच्या मनात आला आणि त्यांनी दामोदर हरी बापट या चार वर्षांच्या बालकाला १९२४च्या मे महिन्यात पदरात घेतले. दामूची आई ही त्याच्या वडिलांची दुसरी बायको होती आणि बहुधा सवतीच्या भुताटकीला कंटाळून दामू सहा महिन्यांचा असताना तिने स्वतःला जाळून घेऊन आत्महत्या केली होती. पुढे अर्धांगाच्या झटक्याने दामूचे वडील मुंबईच्या जी. टी. हॉस्पिटलमध्ये वारले आणि दामू पोरका झाला. पोलिसांनी त्याला माटुंग्याच्या 'बी. जे. होम'मध्ये ठेवले होते आणि तेथूनच केतकर त्याला घेऊन आले होते. दामू आल्यानंतर शीलवतीबाईंच्या मातृत्वाच्या भावनेला विषय मिळून त्याच्या पालन-पोषणात त्या रंगू लागल्या. पण त्यांची मातृत्वाची भावना इतकी उत्कट होती, की एकटा दामू तिला पुरेसा होईना. दामू आला तेव्हाच तो चार वर्षांचा होता आणि जसजसे दिवस लोटू लागले तसतसा तो मोठा होऊ लागला. तान्ह्या मुलाची भूमिका तो घेऊ शकत नव्हता. तेव्हा अगदी तान्हे मूल प्रतिपालनासाठी आणावे, असा विचार निघाला आणि 'दहा दिवसांच्या आतील मूल सांभाळण्यास पाहिजे!' अशी जाहिरात केतकरांनी वर्तमानपत्रामध्ये दिली. लौकरच असे मूल मुंबईच्या 'कामा अँड अल्ब्लेस हॉस्पिटल'मध्ये त्यांना सापडले. हे मूल म्हणजेच त्यांची मानलेली मुलगी वीरा. वीराचा जन्म १० फेब्रुवारी १९२६ रोजी कोणा कानडी ब्राम्हण मातापित्यांच्या पोटी झालेला होता. ती अर्भक असताना आपल्या गडद सावळ्या रंगामुळे अगदी

कशीशीच दिसे. पण स्वतः गौरवर्ण असणाऱ्या शीलवतीबाईंची तान्ह्या मुलाची तहान इतकी तीव्र होती, की वीरामध्ये त्यांना काही व्यंग वाटले नाही. त्या अनाथ मुलीची बाळग खऱ्या आईपेक्षा अधिक उमाळ्याने त्यांनी सुरू केली. थोरला मुलगा नि धाकटी मुलगी यांची रडणी नि रुसणी, खेळ नि भांडणे, आजार नि औषधोपचार यांच्या गडबडीत त्यांना लोटणारी वर्षे आखूड वाटू लागली आणि संसार स्वर्गासारखा भासू लागला.[१]

केतकरांची आई १९०० साली निधन पावल्यापासून त्यांना घर पारखे झाले होते. लग्न होईपर्यंत, वीस वर्षे, नाना देशांत अन् नाना व्यवसायांत ते अनिकेत होऊन भटकत होते. पुढे त्यांचे लग्न झाले आणि आता त्यांच्या घरात मुलेही वावरू लागली. एक 'भूगोल-तुडव्या' पूर्णार्थाने संसारी बनला. पण त्यांच्या पूर्वायुष्याप्रमाणे अन् जागतिक विचारांप्रमाणे त्यांच्या संसाराची घडणही दैवयोगाने काहीशी 'जागतिक' झाली होती. ते होते पक्के कोकणस्थ ब्राम्हण, तर त्यांना वधू मिळाली जर्मन ज्यू.—आणि या जोडप्याचे एक मूल एका अनाथालयातून आणलेले होते, तर दुसरे मूल दुसऱ्या अनाथालयातून आणलेले होते! घरात केतकरांचे सासरे श्री. कोहन, मेव्हणी कु. हेटी कोहन व शीलवतीबाई ही तीन माणसे युरोपातील, गोऱ्या कातडीची नि ज्यू होती; तर स्वतः केतकर, दामू आणि वीरा ही तीन माणसे हिंदुस्थानातील, काळ्या कातडीची नि ब्राम्हण होती! भाषा, वेष, वंश, संस्कृती वगैरेंचे एक विचित्र मिश्रण या संसारात झाले होते आणि त्याला एखाद्या गोधडीचे स्वरूप आले होते. मात्र या गोधडीतील ठिगळे संख्येने नि रंगाने कितीही चित्रविचित्र असली तरी त्यांची जोडणी पक्की झाली होती. त्या गोधडीला प्रेमाची ऊबही काही अपूर्व आली होती. हेटी कोहन घरकामात शीलवतीबाईंच्या बरोबरीने कष्ट घेत असत. श्रीयुत कोहन आपल्या दोन मुली नि जावई यांच्याकडे कूर्मदृष्टीने बघून सुखाने निवृत्तीचा काळ कंठीत आणि रोज झोपण्यापूर्वी आपल्या मुलींच्या डाव्या गालाचे चुंबन घेण्यास चुकत नसत. शीलवतीबाई आपल्या वृद्ध वडिलांची सेवाचाकरी करीत; पण केतकरदेखील आपल्या सासऱ्यांची शक्य ती सेवाचाकरी करताना संकोच मानीत नसत. शीलवतीबाईंचे आपल्या पतीवर व मानलेल्या मुलांवर अपार प्रेम होते आणि त्या प्रेमाला केतकरांचीही साथ होती. शीलवतीबाईंसाठी उपऱ्या मुलांचे लचांड त्यांनी पतकरले होते, पण पुढे त्यांना मुलांचा लळा लागला. वीराला पाजण्यासाठी त्यांनी एक दाई ठेवली होती—आणि मुलांना खेळवण्यात ते रमू लागले होते.[२] मुले घरात येण्यापूर्वी घरामध्ये जी दृश्ये लोकांना दिसत त्यांहून वेगळी दृश्ये दिसू लागली होती. एकदा रा. आबा चांदोरकर यांना घेऊन केतकर स्वतःच्या घरी गेले तेव्हा तेथे घडलेल्या प्रकाराबद्दल रा. चांदोरकर

१. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे ८९, ९०; आठवणी, शीलवती केतकर; आठवणी, प्रेमावती दांडेकर व चंद्रप्रभा तालीम.

२. आठवणी, गो. चिं. तांबे; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे ८९, ९०.

म्हणतात, "घरी गेलो तर दारात विलक्षण दृश्य पाहण्याचा प्रसंग आला. अहो, त्या बाईने येऊन दारातच आमच्या डॉक्टरचा मुका घेतला! मी खाली बघू लागलो." पण आता चांदोरकरांसारख्या सोवळ्या ब्राम्हणाला खाली बघण्याचा प्रसंग येईनासा झाला. मुले आल्यावर चांदोरकर एकदा आशास्थानात गेले होते. तेव्हा केतकरांनी वीराला एका शिंक्यात बसविले होते आणि झोके देऊन ते तिला खेळवीत होते.[1] गोधडीचे वैचित्र्य नि गोधडीची ऊब जशी केतकरांच्या कुटुंबात होती तशी ती त्या वेळी पुण्यातील दुसऱ्या कोणत्याही कुटुंबात नसेल!

आशास्थान हे स्वतःचे सत्तेचे घर केतकरांनी मोठ्या आशेने डेक्कन जिमखान्यावर बांधले होते, पण तेथे त्यांच्या कुटुंबाचा निवास फार काळ झाला नाही. डेक्कन जिमखान्यावरील डासांनी शीलवतीबाईंना हिवताप लागला आणि रोगांचे जे उपजत भय नवराबायकोला होते त्यामुळे त्यांनी १९२६च्या सुमारास आशास्थानमधील आपले बिऱ्हाड लष्कर विभागात हलवले. बिऱ्हाड कां हलवले, अशी कोणी रिकामटेकडी चौकशी केली तर मात्र केतकर गमतीने उत्तर देत, की 'आमच्या संसाराला लागणारे मांसमच्छर लष्कर भागातच सुलभपणे मिळणार, म्हणून हा ब्राम्हणी भाग सोडला!' वास्तविक पाहाता, कु. हेटी कोहन पूर्णपणे शाकाहारी होत्या नि शीलवतीबाईंना मांसाहाराची फारशी जरुरी भासत नसे. आलीच तर केतकरांना मांसाहाराची लहर येई आणि डेक्कन जिमखान्यावर मांसाहार तसा दुर्लभ नव्हता. पण गमतीदार उत्तरे देऊन नसत्या गैरसमजात रिकामटेकड्या लोकांना गुंगवून ठेवण्याची केतकरांची ती एक लकब होती.[2] त्यांच्या मनात डेक्कन जिमखान्यावरील वास्तव्याबाबत खरोखर ज्या भावना असतील त्या त्यांनी 'ब्राम्हणकन्ये'मध्ये वैजनाथशास्त्र्यांच्या तोंडी घातल्या असाव्या. त्यांच्याप्रमाणेच रोगांना भिणारे वैजनाथशास्त्री (म्हणजे राजवाडे) म्हणतात, "डेक्कन जिमखान्याच्या बाजूला हिवतापाचा विकार आहे आणि ही घाणेरडी बाजू निवडण्याचे पाप फर्ग्युसन कॉलेजच्या आद्य संस्थापकांनी केले आहे....मी येथे आलो तेव्हापासून मला मशकांनी चावून सोडले आहे. जुने गोवे ज्याप्रमाणे मलेरियाने उद्ध्वस्त केले त्याप्रमाणे या नवीन वसाहतीची स्थिती होईल काय, अशी कल्पना माझ्या मनात वारंवार येते. फर्ग्युसन कॉलेजने एक गाढवपणा केला, पण आमच्या शंकऱ्या भागवताला तरी काही समजायला पाहिजे होते. पण त्याने या भागाला महत्व जास्तच आणले. मला भेटला म्हणजे मी त्याला सांगणार आहे, की 'तू जरी इतका शास्त्रज्ञतेचा डौल करतोस तरी त्या सोळाव्या शतकातील जुन्या गोव्याच्या संस्थापक फिरंग्यापेक्षा जास्त अक्कल दाखविली नाहीस.'"[3]

केतकरांनी युरोपीय स्त्रीशी लग्न केले आणि त्यांच्या गंगाजमनी संसाराला प्रारंभ

१. आठवणी, आबा चांदोरकर.
२. आठवणी, शीलवती केतकर; मा. त्र्यं. पटवर्धन, ज्योत्स्ना, जुलै १९३७.
३. पृष्ठ २१८, दुसरी आवृत्ती.

झाला; पण लष्कर विभागात राहाण्यास गेल्यापासून त्यांच्या गंगाजमनी संसारास पूर्णता आली, असे म्हणता येईल. त्यांच्या घरात स्वयंपाक होई तो साहजिकपणे ब्राम्हणी पद्धतीचा नसे, पाश्चात्य धर्तीचा असे; कारण शीलवतीबाईंना ब्राम्हणी पाकशास्त्र अवगत नव्हते. क्वचित शांतारामपंत दांडेकरांची मुले किंवा दुसरी तशी पाहुणेमंडळी घरी आली तर ब्रेड आणि टॉमाटोची कोशिंबीर असा बेत होई आणि दिवाळीचे दिवस असले तर फराळासाठी लाडू बाजारातून येत. फकिरा नावाचा रामोशी नि त्याची बायको घरात कामाला होती आणि शीलवतीबाईंनी त्यांनाही आपली पाकविद्या पुढे शिकविली होती. त्यामुळे स्वयंपाकात त्यांची मदत मधून मधून थोडीशी होई. जेवणाच्या वेळा महाराष्ट्रीय रीतीप्रमाणे दोन नसत, तर साहेबांच्याप्रमाणे चार असत. घरात 'कमोड'चा वापर होई. साऱ्या केतकर-मंडळींची नावे शुद्ध हिंदू होती; पण केतकर शीलवतीबाईंना त्या मुलांची आई म्हणून 'ममी' म्हणत अन् शीलवतीबाई केतकरांना ते मुलांचे वडील म्हणून 'डॅडू' म्हणत. दामूला 'वनी' म्हणून केतकर हाका मारीत. शीलवतीबाईंना चांगले मराठी येऊ लागले होते, पण घरातील भाषा (इंग्रजी जाणणाऱ्या माणसांच्या आधिक्यामुळे) इंग्रजीच राहिली. मुले सफाईदार इंग्रजी बोलू लागली. केतकरांचा वेष गावठी साहेबासारखा झालाच होता; आता दामूचा वेषही साहेबी थाटाचा होत गेला. पण वीराचा वेष मात्र बराचसा भारतीय राहिला आणि शीलवतीबाईंनी साडी नेसण्याची पद्धत चालू ठेवली. केतकरांचे जुने रेशमी सोवळेही गोल साडी म्हणून त्या नेसत असत! लग्नानंतर पाचसहा वर्षे तरी शीलवतीबाई हळदीकुंकू करीत असत; पण लष्करात गेल्यावर ते जवळ जवळ बंदच पडले.[1] केतकरांना ब्राम्हण्याचा नि कोकणस्थपणाचाही अभिमान होता. त्यांचे ज्ञानकोशातले सर्व प्रमुख सहकारी ब्राम्हण होते, ज्ञानकोशाचे दोनतृतीयांशाहून अधिक ग्राहक ब्राम्हण होते, आणि ज्ञानकोशाचे त्यांचे मोठे कार्य ब्राम्हणी संस्कृतीच्या सदाशिवपेठी अड्ड्यातच पार पडले होते.[2] त्यामुळे ब्राम्हणांनी व पांढरपेशा हिंदूंनी त्यांच्यावर टीका केली असली, त्यांची थट्टा केली असली, तरी त्यांच्याविषयी खरी आपुलकी त्या वर्गालाच वाटत होती. केतकरांबद्दल खरी अभिज्ञता नि आदर त्या वर्गातील काही व्यक्तीच बाळगीत होत्या. पण केतकर लष्करात राहायला गेल्यामुळे त्यांच्या या स्वकीय वर्गापासून ते दुरावले. देह एकीकडे नि मन एकीकडे अशी त्यांची थोडीशी स्थिती झाली. ते मग जेव्हा काही कामासाठी लष्करातून गावात येत, तेव्हा एखाद्या परिचिताकडे फुरसतीच्या मधल्या वेळात जात, आपणाला आवडणाऱ्या चमचमीत नि गोडधोड ब्राम्हणी खाद्य पदार्थांवर ताव मारीत आणि आपल्या प्रेमाच्या मराठी मायबोलीत मनसोक्त गप्पा झोडीत![3]

१. आठवणी, प्रेमावती दांडेकर व चंद्रप्रभा तालीम, शीलवती केतकर, हे. रा. खरे; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ८५.
२. ज्ञानकोश-मंडळाचा इतिहास, पृष्ठ १६९ व मुखपृष्ठ.
३. तोंडी आठवणी, नी. म. केळकर वगैरे.

वीरा दोन वर्षांची आणि दामू आठ वर्षांचा होईपर्यंत मुलांचे सुख केतकर पतिपत्नींनी निरपवाद भोगले; पण पुढे दामूला भुताटकी लागून दुधाच्या भरल्या घड्यात मिठाचा खडा पडला. रामकृष्ण नावाचा दामूचा एक भाऊ दामूसारखाच पोरका होऊन हॉटेलात कामे करीत बारा वर्षे भणभण हिंडत होता. दामूला घरी आणल्यावर केतकरांना रामकृष्णाबद्दलही कणव उत्पन्न झाली आणि त्यांनी १९२५-२६मध्ये प्रयत्नपूर्वक रामकृष्णाचा शोध काढला. ज्ञानकोशाच्या मुंबईच्या कार्यालयात त्यांनी रामकृष्णाची राहाण्याची सोय केली व त्याला शिक्षणाच्या मार्गाला लावले. पण मुंबईच्या कार्यालयातील कारकून श्री. डोंगरे व श्री. परचुरे हे त्याच्याबद्दल काही चमत्कारिक हकीगत सांगू लागले : तो कार्यालयात असला की एखादे वेळी जमिनीवरच्या चपला भिंतीला चिकटून बसत, निजलेला माणूस बाकासकट दुसरीकडे जाई किंवा तसलेच आश्चर्यजनक प्रकार घडत! लोकांत अशी बोलवा होती, की तो हॉटेलमध्ये असतानाही असले प्रकार होत. याच्या ताटातले पदार्थ त्याच्या ताटात जात किंवा गिऱ्हाइकास 'लेमनेड' दिले तर त्याचे 'रॉसबेरी' होई! त्यामुळे हॉटेलवाले त्याला हाकलून देत नि या हॉटेलातून त्या हॉटेलात अशी त्याची परवड निघे. मुंबईहून १९२६नंतर केतकरांनी त्याला पुण्यास आणले व त्याला आश्रमस्थानमध्ये राहाण्यास जागा व उपजीविकेचा काही उद्योग दिला. पण त्याच्यामागोमाग पारध करीत येणारी भुताटकी पुण्यालाही नष्ट झाली नाही. आपल्या कामाचे प्रतिवृत्त देण्यासाठी तो केतकरांच्या लष्करातल्या घरी आला, की भुताटकी आपले प्रताप कधीमधी गाजवून जाई. "वस्तू पळू लागत, पैसे अदृश्य होत, चित्रे आवाज न करता जमिनीवर उतरत आणि इतर चमत्कार होत!" आबाळ झालेली मुले स्वतःकडे लक्ष वेधून घेण्यासाठी नाना तऱ्हेचे चाळे करतात किंवा मनोविकृतीमुळे अशा मुलांना खरोखरच वेडेवाकडे भास होतात, असे आधुनिक मानसशास्त्र आपणास सांगते. रामकृष्णाच्या बाबतीत असेच काही होत असावे आणि भुताटकीच्या समजुतींनी पराचा कावळा झाला असावा. पण त्याच्या जीवनात काहीतरी जगावेगळा नि त्रासदायक विकार शिरला होता, यात शंका नाही. केतकरांनी दयाबुद्धीने रामकृष्णाला जवळ केला खरा, पण १९२७-२८च्या सुमारास रामकृष्णाच्या संसर्गाने किंवा नुसत्या कर्मधर्मसंयोगाने त्याचाच विकार दामूलाही जडला! जे घरकुल विस्कटलेल्या वातावरणात त्यांनी नि शीलवतीबाईंनी मोठ्या प्रयासाने बांधले होते ते घरकूलच त्यामुळे जणू हादरू लागले.[१]

दामूच्या विकाराबद्दल शीलवतीबाई सांगतात, की 'दामू आठ वर्षांचा होता तेव्हा त्याच्या बाबतीत भुताटकीचे पहिले चिन्ह दिसले. त्याचे एक खेळणे वेगाने उडाले आणि दूरच्या भिंतीवर जाऊन इतक्या जोरात आदळले की ते वाकडेतिकडे होऊन पडले. पुढे त्याच्या भुताटकीमुळे निंबोण्या येऊन पडत, पलंग हलत, वस्तू फुटत, पैसे जात आणि अन्न किंवा कपडे अदृश्य होत. आमचे भयंकर नुकसान होई आणि फूटतूट वाचवावी म्हणून आम्हांला अल्युमिनियमची भांडी वापरावी लागत. कधीकधी मुलाचे

१. आठवणी, शीलवती केतकर, य. रा. दाते.

अन्नही ओठापासून हिरावले जाई. मुलाचा जीवच धोक्यात होता. भुताटकीने मुलाच्या आयुष्याची नासाडी केली. मुलगा मोठा हुशार आणि प्रेमळ आहे; पण त्याचे शिक्षण होऊ शकले नाही.' स्वतः केतकर श्री. गो. चिं. तांवे यांच्यापाशी म्हणाले होते, की 'एकदा दामू अदृश्य झाला आणि कर्जत स्टेशनावर सापडला; एकदा तो गुप्त झाला आणि घराच्या छपरातून खाली उतरला!' केतकरांचे आतेभाऊ रा. दि. य. फाटक सांगतात, की "त्यांच्या घरातली भुताटकी खरी होती, असे मी नक्की सांगू शकेन. पुण्याला त्यांच्या घरात 'पर्वती-व्हिला'मध्ये मी एकदा आठ दिवस राहिलो होतो. ते गावाला गेले होते. एके दिवशी रात्री मी व दामू शेजारीशेजारी झोपलो असताना एक हातोडी उडून भिंतीवर आदळताना मी प्रत्यक्ष बघितली. हातोडी उडण्यापूर्वी दामू गाढ झोपलेला मी पाहिला होता व ती उडाली तेव्हाही तो झोपलेलाच होता. तेव्हा ते काम त्याचे खास नव्हे. अचानकपणे टाइप येणे, पलंग हलणे वगैरे प्रकारही होत. जेवताना पानातून संत्री जात. दामूला खोटे म्हटले, की वाईट वाटे." दामूमुळे ज्ञानकोशाच्या कार्यालयात किंवा डॉ. व्ही. बी. गोखले यांच्या घरी टाइप येऊन पडला, कै. शांतारामपंत दांडेकरांच्या घरी काड्यांच्या पेटीमधली काडी ओढून फेकलेली दिसली,—वगैरे हकीगती सांगणारे लोकही भेटतात.[1] मिळून दामूच्या भोवती काहीतरी गौडबंगाल तरंगू लागले होते आणि त्या गौडबंगालाची अनोळखी नि म्हणून भयानक आकृती केतकर पतिपत्नींना अतिशय त्रासदायक होत होती.

दामूची भुताटकी खोटी आहे, असा कित्येक जणांचा प्रामाणिक समज होता. कै. शांतारामपंत दांडेकरांच्या कुटुंबाशी केतकर-कुटुंबाचा चांगला घरोबा होता; पण दामू स्वतःच काहीतरी गडबड करतो नि भुतावर नाव घालतो, असे दांडेकर मंडळींना वाटत असे! श्री. आबा चांदोरकर म्हणतात, की "डॉक्टरचा मुलगा दामू मंडळात येई; जुळाऱ्याचा डोळा चुकवून खिशात टाइप भरी आणि मग वर उडवी. म्हणे भुताने खिशात टाइप आणून टाकला! डॉक्टर कधीकधी एकदम रागावत, लालबुंद होत, ओरडत; तेव्हा मुलाने टाइप घेतलेला बघितला तरी कोण बोलणार?" रा. दात्यांनी तर एकदा दामूच्या चमत्कारांची मुद्दाम तपासणी केली नि ते चमत्कार खोटे असल्याची त्यांची खात्री पटली. त्यांचे म्हणणे असे, की "घरातली अंडी जातात, पैसे जातात, अशी दामूबद्दल बोलवा होती; पण घरातले नोकर स्वतःच अंडी, पैसे लांबवून भुताटकीवर भार घालीत असावे....केतकर-पतिपत्नी केडगावला जाऊन राहिली होती; [तेव्हा] त्यांच्या घरी मी व गोविंदराव भट भेटण्यास गेलो असता खोलीत छताला लागून उलट खाली खडे पडले. केतकर म्हणाले, की ही दामूची भुताटकी आहे. पण मी दामूवर लक्ष ठेवले, तेव्हा त्याच्या खिशात खडे असल्याची शंका आली. त्याचा झाडा घेण्यास केतकरांना मी सांगितले, पण त्यांनी बाहेरून खिसे चाचपून 'आत काही नाही' असे

१. आठवणी, शीलवती केतकर, गो. चिं. तांबे, दि. य. फाटक, य. रा. दाते, प्रेमावती दांडेकर व चंद्रप्रभा तालीम, आबा चांदोरकर.

म्हटले. मी खिशात हात घालून पाहाण्यास सांगितले, तेव्हा मात्र खिशात खडे निघाले. मी झाडा घेववला, हे केतकरांना आवडले नाही आणि शीलवतीबाईंना तर ती गोष्ट चीड आणण्यासारखी वाटली."—दामूची भुताटकी अनेकांना अशी खोटी वाटल्यामुळे[1] पुढे केतकरांबद्दल तीवरून अनेक खरेखोटे प्रवाद उठले.

दामूच्या भुताटकीवर काही लोकांचा विश्वास नसला तरी केतकरांना आणि शीलवतीबाईंना ती पूर्णपणे खरी वाटत होती, याबद्दल शंका नाही. भुताटकीमुळे शीलवतीबाई केव्हाकेव्हा इतक्या घाबरत, की त्या तशाच धावत धावत प्रेमावतीबाई दांडेकरांच्या घरी जात! १९२७ साली शीलवतीबाईंचे वडील वारले आणि त्यांची बहीण दोन वर्षे इंग्लंडमध्ये गेली. तेव्हा बहिणीला घरातल्या भुताटकीचे प्रकार त्यांनी पत्रातून कळविले आणि बहिणीने लंडनच्या 'सोसायटी फॉर सायकिकल रिसर्च' या संस्थेचा सल्ला घेतला. त्या संस्थेचे हिंदुस्थानातील प्रतिनिधी पुण्याला केतकरांच्या घरीही आले. त्यांनी मुलाची परीक्षा करण्यासाठी त्याला नग्न केले आणि काही चमत्कार होईनात तेव्हा असा निष्कर्ष काढला, की मुलगा आईबापांना फसवीत आहे! पण शीलवतीबाईंना वाटले, की हे प्रतिनिधी मूर्खपणाने वागले. "जे घडते ते घडतच नाही, असा शेरा मारणे म्हणजे शास्त्रीय संशोधन नव्हे. घडते ते का घडते, ते संशोधकाने शोधले पाहिजे. पण या लोकांनी आम्हांलाच भोंदू ठरविण्यास प्रारंभ केला. तेव्हा माझ्या पतींनी त्यांना दरवाजाचा रस्ता दाखविला!" पुढे शीलवतीबाईंची बहीण त्या संस्थेच्या लंडन येथील केंद्रकार्यालयात पुन्हा गेली, तेव्हा तेथील लोक म्हणाले, की मुलगा येथे आला तर त्याचा प्रत्यक्ष अभ्यास आम्हांला करता येईल. ती संस्था दामूचा खर्चही देण्यास तयार झाली. पण दामूला एकटा परदेशात पाठविण्यास शीलवतीबाई तयार नव्हत्या. त्याला सांभाळण्यासाठी आपण स्वतः त्याच्याबरोबर असले पाहिजे असे त्यांचे मातृहृदय त्यांना सांगत होते व म्हणून आणखी एका माणसाचा भाडेखर्च त्यांनी त्या संस्थेकडे मागितला. पण आणखी भाडेखर्च देण्यास संस्था तयार झाली नाही आणि लंडनला जाण्याचे बेत तेथेच जिरले.[2] मानसिक संशोधन करणाऱ्या संस्थेमार्फत दामूच्या भुताटकीवर शास्त्रोक्त उपाय योजण्याचे केतकर-पतिपत्नींचे जसे प्रयत्न होते तसेच इतर उपाय योजण्याचेही त्यांचे प्रयत्न आशावादीपणाने चालू होते. केडगाव बेटाची वारी भूतबाधेचे निवारण व्हावे म्हणूनच त्यांनी केली होती. पुण्याला नारायण पेठेत सदावर्त्यांच्या रामाच्या देवळात गोंदवलेकरमहाराजांचे एक शिष्य राहात होते. त्यांच्या घरी, महाराजांच्या आरतीच्या वेळी, रात्री एका भक्ताच्या अंगात महाराज येऊन आर्तांच्या प्रश्नांना उत्तरे देत असत. हे समजल्यावर श्री. चिं. ग. कर्वे यांच्याबरोबर केतकर मुलाला घेऊन तेथे गेले होते आणि महाराजांनी मुलाला भिकारदास मारुतीचे दर्शन घेण्यास व मारुतिस्तोत्राचा जप करण्यास सांगितले होते!

१. आठवणी, प्रेमावती दांडेकर व चंद्रप्रभा तालीम, आबा चांदोरकर, य. रा. दाते.

२. आठवणी, शीलवती केतकर;—आपल्या आठवणीत य. रा. दाते व दि. य. फाटक अनुक्रमे सांगतात की लंडनच्या संस्थेकडून दीड व दोन माणसांचा भाडेखर्च मिळाला होता.

या वेळीं श्री. कर्वे केतकरांच्याकडे सारखे शोधकपणे पाहात होते; "पण त्यांच्या चेहऱ्यावर अविश्वासाची छटा दिसत नव्हती, तर काळजीची दिसत होती." मुलाला झालेल्या बाधेने केतकर इतके चिंताग्रस्त झाले होते, की गुरू, मंत्रतंत्र, अंगारेधुपारे वगैरे करीत असता सुशिक्षित बुद्धिवादी समाज आपणाला काय म्हणेल इकडे त्यांचे लक्षच जात नव्हते.[1] मुलासाठी सकाळीं उठून श्रद्धाळूपणे ते मोठ्याने जप करीत आणि भोवतालची मंडळीं हसू लागली तर त्यांना सभय गंभीरपणाने 'हसू नये' अशी सूचना देत. त्यांचा भुताखेतांवर प्रथम विश्वास नव्हता; पण दामूच्या बाबतीत घडणाऱ्या प्रकारांची सत्यता त्यांना पूर्ण पटली होती आणि त्यांचे मत पूर्णपणे बदलले होते![2]

भुतांबद्दल ते एके ठिकाणी म्हणतात, की "मृतांचे आत्मे भूतलावरील व्यक्तींच्या आयुष्यक्रमात विघ्ने आणू शकतात; पण हा अनुभव हजारो व्यक्तींत एखाद्यालाच येत असावा, अशी माझी समजूत आहे....परमेश्वराची आज मला कल्पना नाही; तथापी 'पिशाच' अगर 'समंध' या प्रकारची नावे मिळालेल्या मृतात्म्यांच्या योनीमध्ये एखादी व्यक्ती पुष्कळच बलवान असेल आणि तिच्या बळामुळे 'परमात्मा' हे नाव तिला प्राप्त झाले असावे, असे मला वाटू लागले आहे."[3] या ठिकाणची परमात्म्याची त्यांची कल्पना फारच कोती आणि अध्यात्मशास्त्राला सोडून आहे, हे उघड आहे. पण परमात्म्याची कल्पनाही ते पिशाचांवरून करीत आहेत, पिशाच हे गोचर सत्य म्हणून ते धरून चालत आहेत, हे लक्षात घेण्यासारखे आहे. दामूने त्यांच्या विचारविश्वात पिशाच किंवा भूत हे नवे सत्य आणून उपस्थित केले होते!

दामूची भुताटकी अनेकांना खोटी वाटत होती आणि केतकर पतिपत्नींचा तर तीवर अनुभवजन्य विश्वास दिसत होता.—तर हे गूढ काय बरे असावे? सर्व गोष्टींचा तारतम्याने विचार केला तर तर्क असा होतो, की दामूचे बालपण भयंकर अवस्थेत गेल्यामुळे रामकृष्णाप्रमाणे त्यालाही एक मनोविकृती जडली असावी. त्या मनोविकृतीमुळे तो हरतऱ्हेचे उपद्व्याप करीत असेल, पण ते आपणच करतो याची जाणीव त्याला होत नसेल किंवा जाणीव झाली तरी ते उपद्व्याप कबूल करण्यापेक्षा नाकबूल करण्यात त्याला गुप्त आनंद होत असेल. दामूने उपद्व्याप नाकबूल केले, की त्याने नाकबूल केलेले उपद्व्याप त्याच्यावर आरोपित करायला आत्यंतिक अपत्यप्रेमामुळे केतकर-पतिपत्नी तयार होत नसतील. केडगावला रा. दात्यांनी दामूचा झाडा घेववला, तेव्हा त्याच्या खिशात खडे सापडले. पण शीलवतीबाईंचे त्यावर असे म्हणणे होते, की 'छताला लागून पडलेले खडे दामूने फेकलेले नव्हते आणि खिशातले खडे त्याने गोळा केलेले नव्हते! रा. दात्यांचा मात्र तसा ग्रह झाला.'[4] तेव्हा जी गोष्ट स्वतःला दिसली नाही नि जिचे कर्तृत्व दामूने

१. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठे, ८८, ८९.
२. आठवणी, प्रेमावती दांडेकर व चंद्रप्रभा तालीम.
३. आठवणी, केतकर, प्रतिभा, ३१ जुलै १९३३.
४. आठवणी, शीलवती केतकर.

नाकारले, ती भुताटकीमुळेच झाली, असा सरळ निष्कर्ष केतकर-पतिपत्नी काढीत असावी. रा. दाते म्हणतात त्याप्रमाणे घरातल्या नोकराचाकरांनीही बारीकसारीक चोऱ्या करून त्या दामूच्या नि भुताटकीच्या नावावर पचवल्या असाव्या. एकंदरीत, काहीतरी दुर्दैवी मनोविकृती, आंधळे व उत्कट अपत्यप्रेम, आणि नोकराचाकरांची फसवाफसवी या साऱ्यांची एक अशुभ युती झाली असावी व तिलाच भुताटकी हे नाव मिळाले असावे. ही अशुभ युती केतकरांच्या सुखी नि भरल्या संसाराच्या राशीला आली, हे दुर्दैव होय ! दुसरे काय ?

भुताटकी केतकरांना 'खरी' वाटली व तिच्यावर त्यांनी अंगाऱ्याधुपाऱ्यांसारखे अज्ञजनसंमत उपाय केले, यात त्यांचे आपल्या कुटुंबियांवर असणारे उत्कट अन् हळवे प्रेम असेल; पण त्यांची भावना त्यांच्या बुद्धीवर पगडा बसवू लागली होती, त्यांच्या मेंदूची शक्ती क्षीण होऊ लागली होती, याचेही ते एक लक्षण होते. वास्तविक पाहाता, भुताटकीबद्दलच्या त्यांच्या वृत्तीचा अन्वयार्थ एवढाच लागत होता; पण दुर्दैवाने त्यांच्या चारित्र्यावर या भुताटकी-प्रकरणात बरेच शिंतोडे उडविले गेले. ज्यांचा चमत्कारांवर विश्वास नव्हता अशा केतकरांच्या काही शत्रुमित्रांनी केतकरांची भुताटकीवरील श्रद्धा दांभिकपणाची ठरवली आणि त्या दांभिकपणाची आपल्या कल्पकतेप्रमाणे वेगवेगळी मीमांसा केली. श्रीयुत जे. डी. जेंकिन्स नावाचे गृहस्थ १९२८ च्या सुमारास 'टाइम्स'मध्ये लेख लिहीत व त्या लेखांत केतकरांच्या घरातील भुताटकीचे वर्णन देत. त्यामुळे काहींनी अशी कल्पना लढवली, की भुताटकी म्हणजे केतकरांचा स्वतःच्या जाहिरात-बाजीचा एक विक्षिप्त नमुना असावा ![1] १९२९च्या सुमारास आपल्या 'प्राचीन महाराष्ट्रा'च्या संशोधनासाठी दोनतीन वर्षे इंग्लंडात जाऊन राहावे, असा विचार केतकरांच्या मनात आला होता व तो विद्यासेवकातून त्यांनी जाहीरही केला होता. तेव्हा त्या गोष्टीची सांगड काहींनी 'सोसायटी फॉर सायकिकल रिसर्च' या संस्थेकडून मिळणाऱ्या भाडेखर्चाबरोबर घातली आणि अशी पल्लेदार कल्पना काढली, की साऱ्या केतकर-कुटुंबाची इच्छा हिंदुस्थान सोडून इंग्लंडात जाऊन राहावे अशी होती. अर्थात जाण्याचा भाडेखर्च फुकटामध्ये पदरात पडावा म्हणून केतकरांनी भुताटकीचे खूळ पिकवले नि त्याची जाहिरात केली ![2] काहींनी तर जाहीर रीतीने केतकरांवर त्यांच्या मृत्यूनंतर असा आरोप ठेवला, की "भुताटकीचे त्यांनी मांडलेले थोतांड एखाद्या मामुली भामट्यास साजण्यासारखेच होते"![3] या भुताटकी-प्रकरणात केतकरांचा प्रामाणिकपणाच असा संशयात पडला आणि महाराष्ट्राचा हा ज्ञानकोशकार, शुद्ध सत्याचा हा आर्ष उपासक, भामटा ठरण्याची पाळी आली ! घरातल्या भुताटकीने केतकरांची नि शीलवतीबाईंची

१. आठवणी, य. रा. दाते, शीलवती केतकर; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ४५.
२. 'प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास', विद्यासेवक, जुलै १९२९; आठवणी, य. रा. दाते, आबा चांदोरकर.
३. चि. वि. जोशी, अभिरुची, जून १९४५ व ऑगस्ट १९४५.

जी केविलवाणी घालमेल प्रत्यक्ष होई ती या आक्षेपकांनी लक्षात घेतली असती तर त्यांनी केतकरांचा भुताटकीवरील विश्वास (भुताटकी खोटी असली तरी) खोटा किंवा भोदूपणाचा होता, असे म्हटले नसते. केतकर-दांपत्याने दामूला अपत्यप्रेमाच्या उमाळ्याने पदरात घेतले होते व त्याचा प्रतिपाळ केला होता. तेव्हा स्वतःच्या जाहिरातीसाठी किंवा इंग्लंडच्या भाडेखर्च उपटण्यासाठी दामूला लबाड्या शिकवून त्याच्या जीवनाचा विचका त्यांनी करावा हे अशक्य होते. आक्षेपकांनी या गोष्टीकडेही ध्यान दिले असते तर भामटेपणाचा आरोप उत्पन्न झाला नसता. परंतू ज्या पांढरपेशा व ब्राम्हण वर्गात केतकरांबद्दल जिज्ञासा होती त्या पांढरपेशा, ब्राम्हण वर्गापासून केतकर दूर लष्करात राहाण्यासाठी गेले होते; आणि ज्ञानकोश संपण्याच्या वेळीं त्यांच्या काही सहकाऱ्यांची मने त्यांच्या हातून दुखावली गेली होती. तेव्हा नसते आरोप जन्माला यावे नि त्यांच्या प्रामाणिकपणावर डाग उडावे, हे काहीसे अपरिहार्य होते.

दामूची 'भुताटकी' साधारणतः दोन वर्षे जोरात होती, पण पुढे तिचा जोर ओसरू लागला आणि दामूला पुष्कळ अंतराअंतरानेच त्रास होऊ लागला. मात्र, पुढे सहासात वर्षे तरी त्याला अधूनमधून त्रास होत होता आणि त्यावर नाना तऱ्हेचे उपाय चालू होते. एक लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी, की या भुताटकीतही केतकरांच्या मनाचा संशोधनाकडचा कल लोपला नव्हता. भुताटकीचा छडा लावण्यासाठी त्यांनी व शीलवतीबाईंनी काही पुस्तके वाचली व ते स्वतः एकदा नरसोबाच्या वाडीलाही जाऊन आले. नरसोबाच्या वाडीला भुतांनी पछाडलेल्या लोकांचे परीक्षण विजेरीचा उजेड पाडून ते कसे करीत होते, ते तेथील पुजारी अजून सांगत असतात. लालजी पेंडश्यांच्या घरी तीन दिवसरात्र जमिनीवर पडून प्लँचेटचे प्रयोग त्यांनी केले होते. भुताटकीवर एक ग्रंथ लिहावा असाही त्यांचा बेत होता![1]

भुताटकीच्या प्रकरणात केतकरांचे आपल्या घरादारावर जे प्रेम दिसून आले त्या प्रेमाचा झरा त्यांच्या अंतःकरणातून सदैव वहात असे. घरातल्या सर्व वस्तू नि सर्व माणसे त्यांना अतिशय प्रिय होती. घरातल्या शय्येसारखी शय्या अन् खुर्चीसारखी खुर्ची दुसरीकडे मिळणार नाही, असे त्यांना वाटे. घरातला चहा नि घरातले लोणी यांच्यासारखी चव बाहेरच्या कोठल्याही चहाला नि लोण्याला यावयाची नाही, असे त्यांचे मत असे. घरातली साधी मीठभाकर त्यांना मिष्टान्नांच्या मेजवानीसारखी लागे. घरात शीलवतीबाईंनी एखादा नवा पदार्थ तयार केला, काटकसरीची एखादी नवी कल्पना काढली, तर त्यांच्या मुखावर अभिज्ञतेचे व समाधानाचे स्मित असे झळके, की शीलवतीबाईंना मूल्यवान पारितोषिक मिळाल्याचा आनंद होई. जेव्हा ते प्रवास करून परत येत तेव्हा घरात आपली सर्व गात्रे शिथिल करून त्यांना पूर्ण विश्रांती देत आणि म्हणत, "माझ्या घरीदारी जर मला मनमोकळेपणाने वागता आले नाही

१. आठवणी, शीलवती केतकर; दुर्गा भागवत, यशवंत, एप्रिल १९५०; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ८९, इत्यादी.

आणि पूर्ण स्वातंत्र्य मिळाले नाही तर त्या घरादाराचा काय उपयोग?" तथापी दगडामातीच्या भिंती नि त्यांतील सामान म्हणजे घर, अशी घराबद्दल त्यांची मर्यादित भावना नव्हती. घरामधल्या मानवी नात्यांना आणि प्रेमरज्जूंना ते घर समजत असत. एकदा एका डाकघरातील प्रायः शृंगारहीन अशा खोलीत शीलवतीबाईंबरोबर राहाण्याचा त्यांना प्रसंग आला. तेव्हा त्यांनी हसत नि दीर्घ निःश्वास सोडत शीलवतीबाईंना उद्देशून उद्गार काढले, की "तुम्ही जिथे जाल तिथे सुखाचे घरदार ठेवलेलेच!" विस्कळीत नि वादळी जीवनाची तपेच्या तपे लोटल्यावर त्यांना भरलेले घरदार लाभले होते. तेव्हा वाळवंटात प्रवाशाने शीतल पाण्याचा प्रवाह सापडताच जसे नितांत समाधान मानावे तसे समाधान घरादाराबद्दल त्यांनी मानले तर नवल नव्हते. आता त्रैलोक्याचे राज्य जरी त्यांना कोणी देऊ केले असते तरी त्यांनी आपले घर सोडले नसते.[१]

घरामधली केतकरांची क्रीडाकरमणूक अगदी साधीसुधी असे आणि लिहिण्याच्या हस्यांत रुचिपालट म्हणून किंवा डोक्याला आलेला शीण जावा म्हणून ते तिचा आश्रय करीत. कधीकधी मुलांना संतुष्ट करण्यासाठीही ते खेळात सहभागी होत. त्यांना पत्ते आवडत; पण पुष्कळ वेळा खेळाडूंच्या अभावी 'पेशन्स'चा डाव त्यांना मांडून बसावे लागे. पेशन्सचे कित्येक डाव ते एकाच दिवशी कधीकधी खेळत असत. एके वेळी पटावर खेळण्याच्या 'हाल्मा' नावाच्या इंग्रजी डावावर त्यांचे मन जडले होते; कारण त्या डावात कसब थोडे लागत असे आणि डोक्याला जवळजवळ मुळीच श्रम पडत नसत! मुलांसाठी 'सुखी कुटुंबे' ह्या विनोदी चित्रांच्या पत्त्यांनी खेळण्यास त्यांची तयारी असे. लग्नापूर्वी बुद्धिबळांची त्यांना आवड होती; पण बुद्धिबळात चित्ताची एकाग्रता फार झाल्यामुळे पुढे त्यांचे डोके दुखू लागे व त्यांना शीण येई. तेव्हा ते म्हणत, की 'असा खेळ काय कामाचा?' मैदानी खेळ लग्नानंतर ते कधी खेळले नाहीत; पण आपल्या चिरंजिवांशी मुष्टियुद्ध खेळण्यात त्यांना मौज वाटे आणि आपल्या छोट्या कन्येबरोबर पलंगावर जोराने लोळण घेण्यात त्यांना अतिशय हर्ष होई! मुष्टियुद्ध नि लोळण या व्यायामात हसताहसता लालबुंद होऊन ते धापा टाकू लागत! अमेरिकेत किंवा विवाह झाला तेव्हा सिनेमाचा त्यांना जो षोक होता तो पुढेही टिकून होता. चिंताग्रस्त करणारे व्यावहारिक प्रश्न जेव्हा आ वासून पुढे उभे राहात तेव्हा ते सिनेमाला जाण्याचा बेत काढीत किंवा निरुद्देश भटकंती करण्यासाठी घराबाहेर पडत आणि त्या प्रश्नांशी झुंजणाऱ्या मेंदूला विश्रांती देत. निरुद्देश भटकंती करीत असता आपला आवडता कुत्रा ते बरोबर घेत व वाटेत भेटणाऱ्या चार लोकांशी वेगवेगळ्या विषयांवर गप्पा मारीत. त्यांचा मुख्य व्यायाम म्हणजे चालण्याचाच होता; पण तोही ते नियमित घेत नसत. त्यांना आपल्या कामासाठीच खूप चालावे लागे नि चालून आल्यावर हातपाय पसरून विश्रांती घेण्यात त्यांना मोठा आनंद होई. चालताना ते सावकाश चालत, थोडे डुलत चालत, पण ते पुष्कळ वेळ चालू शकत. त्यांचे शरीर

१. शीलवती केतकर, लोकशिक्षण, मे-जून १९३७.

'खादीचे' दिसले, तुंदील वाटले, तरी त्यात बाराबारा तास काम करण्याची चांगली ताकद होती.[1]

दोन्ही मुलांना हसतखेळत व त्यांच्याच कलाने शिक्षण देण्याचा केतकर प्रेमळपणाने प्रयत्न करीत असत. इतिहासपुराणांतील गोष्टी पलंगावर पडून ते मुलीला सांगत नि पलंगावर त्यांच्याजवळ निजून मुलगी त्या उत्सुकतेने ऐके. 'आणखी गोष्ट हवी' म्हणून मुलीने कितीही पिच्छा पुरवला तरी ते कंटाळत नसत. भारतीय इतिहासपुराणांतल्या बऱ्याच गोष्टी झाल्या की टॉलस्टॉयप्रभृती पाश्चात्य ग्रंथकारांच्या गोष्टीही ते आवडीने कथन करीत व मुलगी त्या भक्तीने ऐके. दोन्ही मुले आपल्या शंका त्यांना निःशंकपणे विचारीत आणि आपलीं गुपितेही त्यांच्यापाशी उघड करीत. जशा मोठ्यांच्या अडचणी ते मन लावून ऐकत, तशाच छोट्यांच्या अडचणीही ऐकत. मुलांना निसर्गक्रमानुसार वाढू द्यावे, 'हे कर, हे करू नको' असले दंडक त्यांच्यावर लादू नयेत, मोठ्यांनी त्यांच्या अडचणी तेवढ्या दूर कराव्यात आणि त्यांना शक्य ते साह्य करावे, अशी शिक्षणाबद्दल त्यांची सर्वसाधारण मते होती. त्यामुळे स्वतःच्या आखीव मार्गावरून शिस्तीचा लगाम घालून मुलांना हाकलीत नेण्याचा मार्ग त्यांनी कधीही अनुसरला नाही. उभ्या पितृदशेत मुलांना शरीरदंड त्यांनी चुकूनही केला नाही. मुलांच्याविषयी पित्याला साजेशा आकांक्षा त्यांच्या मनात उद्भवत, तदनुरूप ते योजनाही आखीत; पण मुलांची प्रवृत्ती स्वतःच्या आकांक्षा नि योजना यांच्या विरुद्ध गेली तर त्या आकांक्षा नि योजना सोडून देण्याचे दुःखद कर्तव्य ते निमूटपणे पार पाडीत. मात्र हसतखेळत नि सहज-प्रवृत्तींच्या अनुरोधाने शिक्षण देण्याचे त्यांचे तंत्र दामूच्या बाबतीत तितकेसे यशस्वी झाले नाही. भुताटकीने त्याचे जीवन उद्ध्वस्त झालेच होते आणि त्याला निग्रहीपणाने शाळेत डांबणे केतकरांना जमले नाही. त्यामुळे त्याच्या शिक्षणाची सगळी परवड झाली. वीराला कळू लागले, ती मोठी झाली, तशी समजूतदारपणे आईवडिलांचे ती ऐकू लागली. पण दामू वात्यपणा करी, सांगितलेले ऐकत नसे, आणि कामाला फारसा हात लावीत नसे.[2]

एक प्रकांड पंडित नि ओबडधोबड विक्षिप्त गृहस्थ म्हणून केतकर घराबाहेर लोकांना ठाऊक होते; पण त्यांच्या मनात रसिकतेच्या ज्या रेशमी लहरी क्वचित उमटून जात त्यांचे दर्शन त्यांच्या कुटुंबियांना नि विशेषतः सुशिक्षित पत्नीला घेता येत असे. शीलवतीबाई म्हणतात, की "डॉ. केतकर अल्पसंतुष्ट वृत्तीचे होते....मुलांवर व प्राण्यांवर त्यांचे मोठे प्रेम असे; आणि खेळकर मुले व बागडणारी कुत्र्यामांजरांची पिले पाहून त्यांना फार आनंद होई. हे लहानलहान जीव किती संतोष देतात!—असे उद्गार त्यांच्या तोंडून बाहेर पडत; आणि हे आपलेच सवंगडी आहेत असा वास

१. शीलवती केतकर, लोकशिक्षण, मे-जून १९३७.

२. शीलवती केतकर: आठवणी, व लोकशिक्षण मे-जून १९३७ मधील लेख; आठवणी, हे. रा. खरे, इत्यादी.

लागून मुलेबाळे व जनावरे त्यांजकडे अत्यंत आकर्षिली जात....ती उभयता लवकरच त्यांची भक्त बनत. आपण जणू काय त्यांच्यापैकीच एक आहो, अशा प्रकारे ते त्यांच्याशी खेळत व दंगामस्ती करीत....लोकांनी अगदी तुच्छ गणलेली रानफुले, अगदी सामान्य फुलांचा एखादा ताटवा अथवा एखादाच सुरेख रंगदार तुरा पाहूनही त्यांच्या वृत्ती हेलावून जात. खेड्यापाड्यातून पदोपदी आढळणारे सामान्य देखावे—उदाहरणार्थ, विहिरीवर पाणी भरणाऱ्या बायका किंवा पाण्याची घागर डोक्यावर घेऊन घराकडे ठुमकत ठुमकत चाललेल्या स्त्रीची सुंदर हालचाल इत्यादी दृश्येही त्यांना मोहक वाटत. म्हशींना पाहून मात्र ते कष्टी होत व म्हणत, पाहा ते त्यांचे भावपूर्ण डोळे! आमच्यावर कोणीच ममता करीत नाही, असे जणू ते सुचवीत आहेत!"[1]

केतकरांचा सगळ्या घराला मोठा आधार होता. निराशेचा केवढाही प्रसंग शिरावर कोसळला तरी ते स्वतः डगमगत नसत; कारण त्यांची अशी श्रद्धा होती, की आपण ज्या मार्गाने कार्यसिद्धी होईल असे धरून चालतो त्या मार्गाहून श्रेष्ठ मार्गाचा शोध लागावा म्हणूनच निराशेचे प्रसंग आपणावर येतात. निराशेच्या नि संकटाच्या प्रसंगी त्यांचे धैर्य नि त्यांचा उत्साह यांना उलट भरती येई.—आणि त्यांचा हा स्वभाव असा चेतनादायक होता की त्याच्या संसर्गाने घरातील इतर माणसांच्या मनातील काळजीचे नि निराशेचे ढग निरस्त होऊन त्यांची मनेही आनंदोत्साहाने उजळून निघत. शीलवतीबाई जेव्हा एखाद्या अडचणीपुढे हतबुद्ध होऊन हातपाय गाळू लागत, तेव्हा ते लागलीच पुढे येऊन परिस्थिती समजून घेत, त्या परिस्थितीचे एकएक अंग उलगडून तिचे सत्य स्वरूप स्पष्ट करीत आणि आपणापुढील अडचणीत काल्पनिक भाग किती होता हे समजल्याने मग शीलवतीबाईंच्या मनावरचा भार हलका होई. ज्या गोष्टी आपल्या स्वाधीनच्या नाहीत, पण वास्तविक आहेत, त्यांना तोंड देणेच प्राप्त आहे, हे प्रत्ययास येऊन त्या पुन्हा प्रयत्नाला लागत. "सर्व काही ठीक होईल" असे केतकर सदा म्हणत आणि "एखाद्या गोष्टीचा विचार अवश्य करा, पण मनस्ताप मात्र करून घेऊ नका" अशी त्यांची सांग असे. त्यांचे मत असे होते, की 'मनस्तापाने कार्य साधत नाही. ते नासते. शिवाय मनस्ताप केल्याने प्रकृती बिघडते नि कर्तृत्वशक्ती लयास जाते. जगात एकही काल्पनिक किंवा वास्तविक गोष्ट अशी नाही, की जिच्याकरता आपण आपल्या प्रकृतिस्वास्थ्यावर पाणी सोडावे.'[2] हे त्यांचे मत म्हणजे 'अलिप्त राहून कर्म करावे' या गीतातत्वावरचे जणू अनुभवजन्य भाष्य होते. मोठमोठाली कार्ये शिरावर घेऊन ते वादविवादांच्या नि संकटांच्या गहन अरण्यात बेदरकार संचार कसा करू शकत, त्याचे रहस्यच या त्यांच्या मतात साठवलेले होते. ते मनाने असे खंबीर, आशावादी नि उत्साही असल्यामुळे साऱ्या घराची द्वारका त्यांच्या बलिष्ठ खांद्यांवर विश्रब्धपणे विसावत असे, यात आश्चर्य नव्हते.

१. लोकशिक्षण, मे-जून १९३७.

२. शीलवती केतकर, लोकशिक्षण, मे-जून १९३७.

शीलवतीबाई चांगल्या शिकलेल्या असल्यामुळे द्रव्यसंपादन करण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी होते. पण लग्नाच्या वेळीं ज्ञानकोशातील नोकरी सोडल्यानंतर द्रव्यसंपादनासाठी त्यांनी नोकरी अशी केली नाही. १९२४ नंतर केव्हाकेव्हा जर्मनच्या किंवा इंग्रजीच्या शिकवण्या त्यांनी केल्या किंवा एखाद्या बालकमंदिरात अध्यापनाचे काम केले; पण त्यात द्रव्यसंपादनाचा मुख्य उद्देश नव्हता आणि त्यातून द्रव्यही फारसे मिळाले नाही. द्रव्य-संपादन केतकरांनी करावे आणि घर शीलवतीबाईंनी सांभाळावे, अशीच श्रमविभागणी झालेली होती. ज्ञानकोश आटोपल्यानंतर केतकरांना आर्थिक स्थिती फार हलाखीची आली, पण त्या वेळीही ही श्रमविभागणी चालू होती. केतकर घराबाहेर अनंत व्यापांत गुंतलेले असत; पण त्या व्यापांच्या आर्थिक अंगाकडे, किंवा देण्याघेण्याच्या व्यवहारा-कडे शीलवतीबाई मन घालीत नसत. मुलांची बाळग नि घराची निगा यांत त्या मनोभावाने मग्न असत. केतकर जो पैसा घरात आणतील त्यात घरखर्च भागवायचा, प्रसंगी कोंड्याचा मांडा करायचा, ही त्यांची वृत्ती असे. केतकरांचा हात सढळ होता, कोणी डोळयात पाणी आणले की त्यांच्या खिशातून पैसा निघे, ते आपल्या अनेक योजनांतही पैसा ओतीत,—त्यामुळे शंभर तोंडांनी खर्च होई. घरातील राहाणीही मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय कुटुंबाच्या मानाने उच्च दर्जाची होती. पण केतकरांना शील-वतीबाईंनी कधी खर्चात पाडले नाही. परिचितांना त्या थोड्याशा कंजूषच दिसत. काटकसरीच्या त्यांच्या युक्त्या बारीक नजरेने पाहाणाराला कौतुकास्पद वाटत. पाहुण्यांची जेवणे आटोपत आली, की कोणाला काय हवे-नको ते विचारून मग स्वतः त्या जेवायला बसत व जर फक्त भाजी उरली असेल तर भाजीच खाऊन आपले जेवण भागवीत. साध्या खोक्यावर कापड घालून त्या टेबल बनवीत आणि खोक्यांवर फळया टाकून पलंग तयार करीत. केतकरांचे सोवळे गोल साडी म्हणून त्यांनी वापरलेच, पण लग्नातले लुगडेही कितीतरी वर्षे त्या नेसत होत्या. भिंतीची भगदाडे सुंदर चित्रांनी कशी मढवावी, ही कला त्यांना अवगत होती. दोघे नवराबायको एकमेकांना असा आधार देत, सांभाळून घेत आणि गोडीने संसाराचा गाडा पुढे रेटीत.[1]

केतकरांच्या देण्याघेण्याच्या व्यवहारात शीलवतीबाई लक्ष घालीत नसत; पण केतकरांची जी विचारसृष्टी होती तीमध्ये सहचरी म्हणून त्या त्यांच्याबरोबर अनेकदा विहार करीत. 'Shall Matriarchy Be Revived'—मातृसत्ताक कुटुंबपद्धतीचे पुनरुज्जीवन होईल काय—या विषयावरचे शीलवतीबाईंचे विचार 'हिंदुस्थान रिव्ह्यू'मध्ये प्रसिद्ध झाले होते आणि त्याच विषयावर विचारांच्या अनेक उत्तुंग भराऱ्या 'ब्राम्हणकन्ये'मध्ये केतकरांनी घेतल्या होत्या.[2] केतकरांच्या 'एक जगा'च्या कल्पनेशी शीलवतीबाई किती एकरूप झाल्या होत्या ते 'Hinduism and Its Future in the New World-

१. आठवणी, शीलवती केतकर, प्रेमावती दांडेकर व चंद्रप्रभा तालीम, हे. रा. खरे; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ९३.

२. पृष्ठ २२५, दुसरी आवृत्ती.

Society' या पुस्तकाला त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेवरून सहज दिसून येते. खान-पाणंदीकर-विवाहामध्ये दोघे जुटीने सहभागी झाली होती, हेही येथे आठवण्याजोगे आहे. दोघांचे वैचारिक सख्य एवढे होते, की एकमेकांचे विचार एकमेकांच्या मनात समोरासमोर ठेवलेल्या आरशाप्रमाणे हुबेहूब प्रतिबिंबित झालेले असत. शीलवतीबाई म्हणतात, की "आम्हा दोघांमध्ये महत्वाच्या विषयावर मतभेद अजिबात नव्हते. पुढेपुढे त्यांची मते तीच माझी मते झाली."[१] कधीकधी शीलवतीबाईंना कोणी प्रश्न करीत, की 'तुम्ही केतकरांच्या साऱ्या कादंबऱ्या समग्र वाचल्या आहेत का?' तेव्हा त्या मजेने उत्तर देत, की 'नाही. त्यांत मला नवीन काहीच आढळत नाही.'—कारण दोघांच्या स्वैर संवादांत कादंबऱ्यांमधले सारे विषय, साऱ्या अवघड समस्या, साऱ्या विचारप्रवर्तक उपपत्ती आधीच येऊन गेलेल्या असत. दोघांची मते एकच असली तरी निरनिराळे दृष्टिकोन स्वीकारून दोघे आपापल्या दृष्टिकोनाचे समर्थन करीत व विचारमंथन चाले. कादंबऱ्यांत शिरलेल्या काही चर्चा तर त्यांच्या घरगुती प्रश्नांमधून उत्पन्न झालेल्या असत आणि दोघांच्या तोंडचे शब्द निरनिराळ्या पात्रांच्या तोंडी घातलेले असत. मग असे शब्द शीलवतीबाई कधीकधी उचलीत नि 'हे माझे शब्द इथे का घातले?' म्हणून केतकरांमागे थट्टेने भुणभुण लावीत. केतकर 'वाङ्मयचौर्य' मान्य करून म्हणत, 'हे गुपित आपणा दोघांनाच ठाऊक आहे ना? मग त्यात कोणाचे काय बिघडणार? असू दे.' दोघांच्यामध्ये चर्चा इतक्या चालत की आपल्या घराला 'दोन सदस्यांचा क्लब' असे नावही त्यांनी ठेवले होते![२] पुष्कळ वेळा दोघे घराजवळील बागेत चहा घेत बसत आणि चहा घेता घेता आपल्या लहानमोठ्या योजना शीलवतीबाईजवळ सांगण्यात केतकरांना फार समाधान वाटे. गतगोष्टींबद्दलही दोघांत सुखसंवाद होत. अशा वेळी, भविष्यात किल्ले बांधणारे आणि बालपणातल्या अतृप्त इच्छा पुऱ्या व्हाव्या म्हणून भुकेलेले केतकरांचे मन एखाद्या बालकाच्या मनासारखे शीलवतीबाईंना भासे आणि त्या केतकरांना म्हणत, 'तुम्ही म्हणजे एक मोठे बाळ आहात!'[३]—शीलवतीबाई केतकरांच्या पत्नी होत्या, सखी होत्या, आणि अंशतः माताही होत्या.

केतकरांच्या नित्याच्या वागणुकीत शीलवतीबाईंच्या मतांचा नि मनाचा पगडा बसला आहे, असे कधीकधी दिसून येई. विशेषतः लग्नापूर्वीपासून जे लोक केतकरांना ओळखीत होते व त्यांच्या खांद्याला खांदा लावून कामे करीत होते त्यांना ही गोष्ट जाणवत असे. रा. दाते म्हणतात, की "त्यांच्या मनोवृत्तीत लग्नानंतर फरक पडत गेला." केतकरांचे लग्न होण्यापूर्वी व नंतर काही काळ ज्ञानकोशामधल्या सहकाऱ्यांना केतकर 'आपले' वाटत असत; पण मागाहून त्या सहकाऱ्यांची अशी भावना झाली की 'आपल्या' केतकरांना आपणापासून कोणीतरी दूर नेत आहे! ज्ञानकोशाच्या शेवटच्या

१. आठवणी.

२. विचक्षणा, प्रस्तावना, शीलवती केतकर.

३ शीलवती केतकर, लोकशिक्षण, मे-जून १९३७.

काळात केतकरांचे नि त्यांच्या सहकाऱ्यांचे संबंध जे कडवट झाले त्याला हेही एक कारण होते. रा. दात्यांची एक आठवण अशी आहे, की डॉ. व्ही. एल. देशपांडे यांच्या लग्नाच्या वेळीं रा. दात्यांनी लग्नाचे पौरोहित्य केले आणि लग्नपत्रिकेवर त्यांच्या नावापुढे 'एडिटर ज्ञानकोश' अशी उपाधी लावली गेली. तेव्हा शीलवतीबाईंना आपल्या नवऱ्याचे ज्ञानकोशाचे संपादकत्व अशा तऱ्हेने दुसऱ्याच्या वाट्याला गेल्याचा (किंवा ज्ञानकोशातील सहकारी बेशिस्त नि उद्दाम झाल्याचा) विशेष राग आला. त्यांनी लगेच केतकरांशी कानगोष्ट केली आणि नंतर केतकरांनी झाल्या गोष्टीबद्दल रा. दात्यांना जाब विचारला! पण पत्रिका रा. दात्यांनी छापलेल्या नसल्यामुळे त्यांनी सरळ जबाब दिला, की 'मी स्पष्टीकरण द्यावे, असे यात काही नाही.' रा. दात्यांचीच दुसरी आठवण अशी आहे, की पुणे-समाचाराची छपाई चालू असता एकदा त्यांना रात्री छापखान्यात थांबावे लागले. तेव्हा त्यांची दुचाकी छिद्रान्वित (पंक्चर) झाली होती, म्हणून रा. चिंतामणभट्ट दातार त्यांना म्हणाले, की 'येथे मिस कोहनची दुचाकी पडली आहे ती सध्या घेऊन जा; सकाळी गड्याकरवी तुमची दुचाकी पाठवू नि मिस कोहनची परत आणवू.' त्याप्रमाणे रा. दात्यांनी केले; पण दुसऱ्या दिवशी शीलवतीबाईंनी एक चिठ्ठी पाठवून त्याबद्दल त्यांना दोष दिला! चिठ्ठी केतकरांच्या हस्ते आली होती; तेव्हा ती वाचून रा. दात्यांनी रागाने केतकरांकडे नुसते रोखून बघितले. केतकर "एवढेसे तोंड करून निघून गेले." केतकरांच्या वर्तनावर शीलवतीबाईंचे याप्रमाणे जे नियंत्रण पडे ते प्रेममूलक पालकवृत्तीमुळे पडत असावे आणि आपला नवरा कर्तबगार नि विद्वान असला तरी व्यवहाराच्या बाबतीत त्याच्या दिलदारपणाला जपले पाहिजे या भावनेतून ते उद्भवत असावे, असे वाटते. मात्र त्यामुळे ज्ञानकोशातल्या सहकाऱ्यांना असा भास होई, की आपल्या व केतकरांच्या उजळ संबंधांत शीलवतीबाई एखाद्या कृष्ण छायेसारख्या उभ्या आहेत! पत्नीचे निरतिशय प्रेम केतकरांना त्यांच्या सहकाऱ्यांपासून दूर नेण्यास किंचित का होईना पण निमित्तस्वरूप व्हावे, हा एक दैवदुर्विलास होता.[1]

अमेरिकेत असताना अंकुरलेले केतकरांचे आप्तस्वकीयांबद्दलचे प्रेम प्रौढपणी बरेच उत्कट नि व्यापक झाले होते. त्यांच्या एका दूरच्या पुतणीचा विवाह रा. दांडेकर यांच्याशी सुरत मुक्कामी झाला, तेव्हा मुद्दाम ते सुरतेला गेले आणि आपली एक पुतणी परक्या घराण्यात जात असलेली बघून त्यांनी डोळ्याला उपरणे लावले.[2] श्री. बबनराव गोखले या आपल्या भाच्याला धंद्यात घालण्यासाठी त्यांनी काही खटपट केली.[3] त्यांचे थोरले बंधू कै. दामोदरपंत यांच्या मुलीचे पती, म्हणजे त्यांचे जांवई,

१. आठवणी, य. रा. दाते, ग. ना. टिळक; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ८८.

२. आठवणी, कृ. के. राहाळकर.

३. तोंडी आठवणी, नी. म. केळकर.

श्री. भावे यांना त्यांनी गुजराथी ज्ञानकोशाचे बडोद्याचे काम दिले;[१]—आणि आगटे व गोखले या आपल्या चुलत बहिणींकडे जाऊनयेऊन त्यांनी शेवटपर्यंत संबंध ठेवले.[२] त्यांनी दूरची नातीदेखील उकरून काढली नि वाढीस लावली. पुण्यात मोतीचौकाजवळ राहाणारे डॉ. परशुराम महादेव केतकर हे त्यांच्या पणजाच्या भावाच्या शाखेमधले तिसरे पुरुष होते; पण ते त्यांना काका मानीत व त्यांच्याशी घरोबा ठेवीत![३] श्रीयुत द. स. काटदऱ्यांचे प्रसिद्ध केतकर-कन्यकांपैकी एकीशी लग्न झाले, तेव्हा त्यांनी वधूवरांना स्वतःच्या घरी चहाचे आमंत्रण दिले.[४] आप्तस्वकीयांशी असे आपुलकीने वागणारे केतकर मित्रांशीही स्नेहाने वागत, हे सांगायला नको. पण ते लष्करात राहायला गेल्यामुळे काही लोकांचा असा भ्रामक समज झाला होता, की ते एक भणंग नि भटके गृहस्थ आहेत, त्यांना आप्तमित्र नाहीत!

केतकर आणि त्यांची कुटुंबीय मंडळी आप्तमित्रांच्या घरी कशी दिसत, कशी वागत, याचे एक खुमासदार चित्र प्रा. त्र्यं. शं. शेजवलकरांनी रंगवून ठेवले आहे. १९२८ च्या सप्टेंबरमध्ये श्री. शेजवलकर कामशेतला रियासतकार नानासाहेब सरदेसाई यांच्याकडे मानसिक विश्रांतीसाठी जाऊन राहिले होते. त्या वेळी, एके दिवशी केतकर-कुटुंब सरदेसायांकडे येऊन दाखल झाले. खूप पाऊस पडून गेल्यामुळे जिकडेतिकडे चिखल झाला होता आणि सडकेपासून बंगल्यापर्यंत येताना केतकर-पतिपत्नींनी पादत्राणे हातात काढून घेतली होती. केतकरांनी विजार गुडघ्यापर्यंत ओढली होती नि नेहमीचे हसू त्यांच्या तोंडावर फुललेले होते. शीलवतीबाईंचे पाय झग्यापर्यंत उघडे होते, त्यांच्या कडेवर वानरीच्या पोराप्रमाणे वीरा बिलगली होती, त्यांचा एक हात डोळे मिचकावीत चालणाऱ्या दामूने धरला होता अन् चिखलातून त्या आस्तेआस्ते येत होत्या. घरात येताच पोटावरून हात फिरवीत केतकरांनी सरदेसायांना सांगितले, की "बुभुक्षा आहे" आणि सरदेसायांच्या घरातील एकदोन खोल्यांचा ताबा केतकर-कुटुंबाने आपलेपणाने स्वतःकडे घेऊन टाकला! आपली बहीण हेटी कोहन व मिस सिंग नावाची एक ख्रिस्ती फटाकडी तरुणी यांनाही शीलवतींनी बरोबर आणले होते; त्यामुळे आपल्या खान्याची सोय त्यांनी साहजिकच स्वतंत्रपणे करण्याचे ठरविले. पण केतकरांचा खादाडपणा त्या खान्यावर तृप्त नसे. ते आणि त्यांची मंडळी दोन्हीकडे जेवू लागली. दही, भात, भाजी, भाकरी खाऊन वर पावलोणी, अंडी, चहा घेतला तर त्यात काय बिघडले? रात्रीच्या जेवणानंतर शीलवतीबाईंना केतकरांसाठी खास चहाही करून द्यावा लागे. शिवाय, कामशेतच्या ग्रामीण दुकानातले शेंगदाणे विकत घेऊन, पँटच्या खिशात घालून, रस्त्याने ते खात खात भटकण्याची मौज केतकर केव्हाही अनुभवीत

१. आठवणी, य. रा. दाते.
२. तोंडी आठवणी, यमुनाबाई गोखले; आठवणी, श्री. रा. टिकेकर, गो. चिं. तांबे.
३. अप्रसिद्ध केतकर-वंशावळ; आठवणी, हे. रा. खरे, ग. ना. टिळक.
४. आठवणी, हे. रा. खरे.

असत. केतकर गबाळ नि काहीसे अस्वच्छ होते; त्यांचे मलिन रुमाल धुता धुता शीलवतीबाई या मुक्कामात बेजार होत होत्या. तशात कृष्णवर्णी वीराला खरूज झाली होती, तीही धुऊन तिच्यावर त्यांना पट्ट्या बांधाव्या लागत. पण सगळे काही त्या शांतपणाने नि समाधानाने करीत होत्या. या वेळी दामूला भुताने पछाडलेले असल्याने त्याचे लाड होत होते आणि तो विजेरीचा प्रकाश केतकरांच्या डोळ्यांवर पाडून भारी व्रात्यपणा करीत होता. साऱ्यांनीच सरदेसायांचे घर एवढे आपलेसे केले होते की गुपचूप करावयाचा प्रणयाच्या गोष्टीही केतकर तेथे उघडेपणाने करीत! डॉ. जॉन्सनचा प्रणय धाकट्या गॅरिकला किल्लीच्या छिद्रातून चोरून बघावा लागे; पण डॉ. केतकरांचा उघडा प्रणय डोळे मिटले नाही की कोणालाही दिसे. सरदेसाई घडीदार शिस्तीचे नि व्यवस्थेचे फार भोक्ते; पण केतकर-कुटुंबाने बघताबघता या चारसहा दिवसांत त्यांच्या शिस्तीचे नि व्यवस्थेचे पार दिवाळे वाजविले होते! केतकर आप्तमित्रांकडे गेले, परक्या ठिकाणी असले, तरी आपला केतकरी खाक्या असा निरंकुश चालू ठेवीत.[1]

केतकरांचे वागणे धृष्टपणाचे असले तरी ते समाजातील एक विचारवंत पुढारी होते. साहजिकच, समाजाचे पुढारीपण मिळालेल्या कोणाही गृहस्थाकडे जशी सल्ला विचारणारांची येजा चालू असते तशीच ती केतकरांच्याकडेही नित्य चालू असे. मोठे नि मूलगामी प्रश्न केतकरांच्या डोक्यात सदैव घोळत असत, तरी सल्ला विचारणाऱ्याचा छोटा प्रश्न ते तुच्छ मानीत नसत. कोणाची धुसफूस, कोणाची अडचण, कोणाचा मनस्ताप, कोणाचा अनुभव ते एकाग्रपणे ऐकत नि विचारपूर्वक त्यावर मते देत. त्यांचा सल्ला आपद्ग्रस्तांना नेहमीच मोलाचा वाटे. लेखनात बंडखोर नि विक्षिप्त वाटणारे केतकर अशा वेळी समतोल बुद्धीचे नि व्यवहारी आहेत याविषयी अनेकांची खात्री पटे. कामकरीवर्गाविषयी नि गरिबांविषयी केतकरांना विशेष सहानुभूती वाटे. ह्या वर्गातील लोक घरीदारी भेटले, की बोलण्याच्या ओघात त्यांना ते विधायक सूचना करीत. सहकारी मंडळ्या कशा सुरू कराव्या, तद्द्वारा कर्ज कसे मिळवावे, आपले काम अधिक सोप्या रीतीने व काटकसरीने कसे करावे, आपल्या जातीची व समाजाची सुधारणा कोणत्या मार्गांनी करता येईल वगैरेसंबंधी ते बोलत असत. त्यांची आस्था व अधिकार बघून पददलित माणसे त्यांच्या पायापाशी येऊन बसत आणि आपले अंतःकरण खुले करून त्यांच्यापुढे ठेवीत. आपल्या कादंबऱ्यांतून, लेखांतून नि ग्रंथांतून नवविचारांची बीजे जशी त्यांनी चौफेर पेरली तशीच ती घरीदारी होणाऱ्या प्रासंगिक गप्पागोष्टींतून व बैठकींतूनही पेरली. त्यांच्या सल्ल्याने ज्यांचे प्रश्न सुटले, ज्यांना दिलासा मिळाला, ज्यांची जीवने मार्गाला लागली, असे कितीतरी लोक महाराष्ट्रभर विखुरलेले होते; अजूनही आहेत.[2]

लोकांची सुखदुःखे ऐकून घेणारे केतकर एक समंजस सद्गृहस्थ होते; पण ते

१. प्रतिभा, जुलै १९३७.

२. शीलवती केतकर: आठवणी; व लेख, लोकशिक्षण, मे-जून १९३७; व 'विचक्षणे'ची प्रस्तावना, पृष्ठ ३; इत्यादी.

कोणाचा लघळपणा खपवून घेत नसत की गुळगुळीत मते देऊन वेळ साजरी करीत नसत. प्रसंगी स्पष्ट बोलून ते कसा तुकडा तोडीत याची एक आठवण प्राचार्य वेलिंगकरांनी सांगितली आहे. त्या आठवणीचा आशय असा, की केतकर डेक्कन जिमखान्यावर आपल्या बंगल्यात राहात असता एकदा एक कवी त्यांच्याकडे आले. कवी आपल्या कविता त्यांना वाचून दाखवीत होते आणि ते ओटीवर फराळ करीतकरीत कवितांचे श्रवण करीत होते. बराच वेळ त्यांच्याकडून काही उत्तेजन मिळाले नाही, तेव्हा कवींनी विचारले, 'काय, कशा आहेत कविता?' त्यावर ते शांत मुद्रा ठेवून उद्गारले, 'अगदी भिकार!' त्यामुळे कवींना युक्तिवाद सुचून ते म्हणू लागले, की 'तुम्ही ज्ञानकोशच लिहावे. तुम्ही कुठे कविता करता, तर काव्याची रुची तुम्हांला कळेल?' कवींच्या या युक्तिवादावर, एक वाफवलेले अंडे हातात घेऊन त्याकडे बघत केतकर उत्तरले, 'हे अंडे मी घातले नाही; घालू शकणार नाही; म्हणून मला याची चव कळत नाही, असे थोडेच आहे?' यापुढील उत्तर ऐकायला कवी जाग्यावर उरलेच नाहीत![1] केतकर नको त्या लोकांना अशा प्रकारे वाटेला लावीत. त्यांना जनहिताची कदर होती; पण जनस्तुती मिळावी म्हणून आपला सिंहस्वभाव सोडायला ते तयार नव्हते.

—आणि जनस्तुतीची त्यांना जर पर्वा नव्हती तर आपले एकंदर कौटुंबिक जीवन जनसंमत अशा साच्यात त्यांनी का ओतावे? त्यांनी ते ओतले नाही आणि ते जसे घडले तसे घडू दिले. मधूनमधून त्यांनी त्याला काही मनसोक्त आकारही दिले. मिळून ते जीवन 'मॉडर्न आर्ट'मधल्या एखाद्या शिल्पासारखे बनले—सामान्य पण असामान्य, थोडे गूढ पण फार आकर्षक! या शिल्पाचे रहस्य समजावून कसे सांगणार? ते समजूनच घ्यायला हवे.

१. दुर्गा भागवत, यशवंत, एप्रिल १९५०.

# वाङ्मयनिर्मितीचे अखेरचे पर्व

[१९२९ ते ३७]

१९२९ साली ज्ञानकोश संपला, पण केतकरांचे कर्तृत्व काही तेवढ्याने संपले नाही. ज्ञानकोश संपल्यानंतर, आयुष्यातील अखेरची आठनऊ वर्षे, त्यांनी वाङ्मय-निर्मितीचा उद्योग अतिशय वेगाने आणि व्यापक प्रमाणावर चालू ठेवला होता. या काळात स्थूलपणे त्यांनी पाच प्रकारचे तरी वाङ्मय निर्माण केले! पैकी एक प्रकार कादंबऱ्या नि महाकाव्य या ललित वाङ्मयाचा होता; दुसरा प्रकार संशोधनात्मक ऐतिहासिक वाङ्मयाचा होता; तिसरा ज्ञानकोशासारख्या संपादित संग्रहग्रंथांचा होता; चौथा समाजशास्त्रीय व राजकीय प्रबंधांचा होता; आणि पाचवा स्फुट लेखनाचा होता. या प्रत्येक प्रकारात त्यांनी भरपूर निर्मिती केली. कादंबऱ्या त्यांनी चार लिहिल्या आणि महाकाव्य अर्धेमुर्धे पुरे केले. संशोधनात्मक ऐतिहासिक ग्रंथ त्यांनी पाच लिहिले. त्यांनी संपादित केलेल्या संग्रहग्रंथांची संख्या अकरा किंवा बारा भरेल.—आणि या काळात त्यांनी लिहिलेल्या समाजशास्त्रीय व राजकीय प्रबंधांची संख्या दोन आहे. म्हणजे स्फुट लेखन वगळता, सुमारे तेवीसचौवीस ग्रंथ या आठनऊ वर्षांत त्यांनी उत्पन्न केले! वर्षाला तीनएक ग्रंथ हे त्यांच्या उत्पादनाचे प्रमाण पडले!

मे १९२८ मध्ये 'विद्यासेवक'मधून 'ब्राम्हणकन्या' या कादंबरीच्या प्रकाशनाला त्यांनी प्रारंभ केला होता; पण विद्यासेवक पुढे बंद पडल्याने त्या कादंबरीचे प्रकाशन खंडित झाले होते. १९३० साली ब्राम्हणकन्येचे लेखन त्यांनी पूर्ण केले आणि ब्राम्हणकन्या पुस्तकरूपाने प्रकाशित झाली. त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये ब्राम्हणकन्या ही सर्वांत जास्त रमणीय कादंबरी आहे, असे सर्व रसिकांचे मत आहे. त्यांच्या इतर कादंबऱ्यांत कथानकाचा जो विस्कळीतपणा आढळतो तो ब्राम्हणकन्येमध्ये नाही. तिचे कथानक बांधेसूद आहे, वाचकांचे लक्ष केंद्रित करील असा मध्यबिंदू त्या कथानकाला आहे, आणि वाचकांची उत्कंठा सतत तेवती राहील असा प्रवाहीपणा नि खळखळाटही त्या कथानका-मध्ये आहे. इतर कादंबऱ्यांत मानवी मनाचा अदृश्य तळ जसा जागजागी त्यांनी

दाखविला, मानवी मनाचे जसे मर्मग्राही विश्लेषण केले, तसेच ब्राम्हणकन्येतही केले पण एकाच व्यक्तीच्या मनाचे सलग, सूक्ष्म नि सुभग चित्रण ब्राम्हणकन्येत इतर कादंबऱ्यांहून जास्त प्रमाणात आहे. ब्राम्हणकन्येच्या पानापानावर इतर कादंबऱ्यांप्रमाणे अभिनव विचारांची पखरण त्यांनी पाडलीच; पण ब्राम्हणकन्येतील विचारांची उच्च पातळी, त्यांचा एकजिनसीपणा नि त्यांच्यातील तोल ही काही आगळीच आहेत. खुद्द केतकरांनाही आपली ही कादंबरी सर्वश्रेष्ठ वाटत असावी आणि तिच्या निर्मितीत त्यांनी विशेष मानसिक कष्ट घेतले असावे. कारण कादंबरीच्या प्रारंभी "सहृदय वाचकास" त्यांनी अशी इषारेवजा विनंती केली आहे, की "पुस्तक एकदा वाचल्यानंतर दुसऱ्यांदा वाचावे व दुसऱ्यांदा वाचल्यानंतर पुन्हा एक किंवा अनेक वेळ वाचावे....प्रत्येक वाचनाच्या प्रसंगी प्रस्तुत लेखनाचे रहस्य अधिकाधिक कळत जाईल."

या कादंबरीतील अप्पासाहेब डग्गे हे गृहस्थ समाजसुधारणेच्या ध्येयाने प्रेरित झालेले असतात आणि त्यांनी रखेलीच्या मुलीशी लग्न केलेले असते. त्यांच्या संसाराचे चित्र रेखाटून केतकरांनी हे दाखविले आहे, की पतित किंवा अकुलीन स्त्रीशी ध्येयवादीपणाने एखाद्याने लग्न केले, तरी त्याचे सांसारिक जीवन सुखाचे होत नाही. तो नि त्याची पत्नी यांची सामाजिक नाती वेगवेगळी असतात, त्यांच्या संस्कृती नि वृत्ती भिन्न असतात, आणि जीवनदृष्टीही विसंवादी असतात. त्यामुळे त्यांच्यामध्ये पुरेशी एकरूपता येत नाही व त्यांच्या संसारात दुःखाच्या छाया घोटाळू लागतात. शिवाय, समाजसुधारणेचे श्रेय पतितेशी लग्न करणाऱ्या पुरुषाला मिळाले, तरी आपल्या अपत्यांना तो दुःखद परिस्थितीमध्ये नकळत लोटून देतो. कारण त्याच्या अपत्यांना अकुलीनपणाचा डाग जन्मतःच लागतो आणि त्यांना शिष्ट समाजात विवाहाच्या द्वारा मिसळणे अशक्यप्राय होते. अकरमाशांच्या अवमानित जातीत मिसळावे, हे भवितव्य त्यांना स्वीकारावे लागते. अप्पासाहेब डग्ग्यांची कथा केतकरांना बहुधा एका प्रत्यक्ष घटनेवरून सुचली असावी. कारण त्या काळीं पुण्यात असे एक वकील होते, की ज्यांनी एका बॅरिस्टराला सोनारीण रखेलीपासून झालेल्या मुलीशी १९०५ च्या सुमारास लग्न केले होते आणि पुढे त्या मुलीपासून स्वतःला मुले झाल्यावर त्या मुलांचे कसे होणार म्हणून जे फिकिरीत पडले होते![1] या वकिलांचा वैयक्तिक प्रश्न घेऊन कादंबरीत सुधारकवर्गाच्या मोठ्या सामाजिक प्रश्नावर केतकरांनी प्रकाश टाकला.

अप्पासाहेब डग्ग्यांची मुलगी कालिंदी ही या कादंबरीची नायिका आहे. अकुलीनपणाचा डाग आपल्याला लागला असल्यामुळे शिष्ट समाजात आपले लग्न होणार नाही, लग्न झालेच तर आपल्या भावी प्रजेला आपण वडिलांप्रमाणे अकुलीनपणाच्या खाईत लोटू, हे तिला जाणवते आणि ती शिवशरण नामक लिंगायत व्यापाऱ्याची रखेली बनते. पुढे शिवशरणपासून तिला मुलगा होतो, पण शिवशरणशी तिचे बिनसते नि ती स्वतंत्रपणे नोकरी करू लागते. कालिंदीचा हा कथाभाग भडक नि अटीतटीच्या घटनांनी भरलेला

१. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ १०; आठवणी, य. रा. दाते, दि. य. फाटक.

आहे, पण कादंबरीत द्रुत लयीचे नाट्य आणण्याकडे केतकरांनी त्याचा उपयोग केलेला नाही. वरून अनाचारी दिसणारी स्त्री आतून किती नीतिमान असू शकते, स्त्री दुःखी पुरुषावर प्रेम कसे करू लागते, शृंगार नि श्रीमंती यांपेक्षा प्रियकराच्या जीवनात सहभागी होण्यासाठी ती कशी भुकेलेली असते वगैरे स्त्रीमनाचे धर्म कालिंदीच्या या कथाभागात त्यांनी अतिशय मार्मिकपणे रंगविले आहेत. शिवाय, आईबापांच्या अशिष्ट विवाहाची फळे मुख्यतः मुलींना कशी भोगावी लागतात आणि पत्नीपेक्षा रखेलीच्या जीवनक्रमात सुखाचा अन् सुरक्षिततेचा कसा अभाव असतो, ह्या सत्यांवर त्यांनी प्रकाश टाकला आहे. कालिंदी नोकरीसाठी मुंबईस जाऊन राहाते आणि मग शिवशरणशी बिनसल्यामुळे तिच्या मनात निराशेचा जो गडद अंधार दाटलेला असतो तो निरस्त होतो. तेथे रामराव नामक कम्युनिस्ट विचारसरणीच्या एका मजूरपुढाऱ्याशी तिची ओळख होते व तिचे सारे पूर्ववृत्त कळल्यावरही रामराव पत्नी म्हणून तिचा स्वीकार करतो. कालिंदीच्या ह्या पुढच्या कथाभागात केतकर हे सूचित करतात, की स्त्रीचे दुःख बरेचसे अर्थमूलक असते. ती जर आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी झाली तर तिच्या जीवनात आशेचा प्रकाश खेळू लागेल. शिवाय, अकुलीन स्त्रीला नि वाकड्या वाटेने गेलेल्या स्त्रीला जीवनाची घडी पुनरपी बसविणे कठीण असले, तरी अशक्य नाही. वैवाहिक नीतिनियमांबद्दल बेफिकीर असणारे आणि विवाह होत नाही म्हणून खोळंबलेले जे ध्येयनिष्ठ पुरुष समाजात आहेत ते अशा स्त्रियांचा स्वीकार करू शकतील.

कालिंदीच्या कथेतच शिवशरण आणि रामराव यांचे उद्बोधक जीवनवृत्तांत केतकरांनी गुंफून दिले आहेत. शिवशरणने कालिंदीला पळवून नेऊन तिला रखेली म्हणून ठेवलेले असते, पुढे तो तिला दूरही लोटतो, पण तो काळ्या हृदयाचा कृत्रिम खलनायक वाटावा असे त्याचे चित्र केतकरांनी रंगविलेले नाही. परिस्थितीच्या पेचात सापडल्यामुळे काही पुरुषांना रखेली ठेवण्याचा मार्ग कसा पतकरावा लागतो आणि हृदयात दुष्टपणा नसताना तिला दूर कसे लोटावे लागते, हे शिवशरणच्या जीवनावरून त्यांनी सांगितले आहे. कालिंदीवरचे अपार प्रेम व्यक्त करून शिवशरण शेवटी आत्महत्या करतो, असे केतकर दाखवितात आणि समाजातील अनाचाराकडेही ते किती उदार हृदयाने बघत असत याची साक्ष पटते. कालिंदीचे कलंकित जीवन टाऊक असूनही तिच्याशी लग्न करणाऱ्या रामरावाचे पूर्ववृत्त अगदी वेगळ्या धर्तीने त्यांनी सांगितले आहे आणि त्यामध्ये, पुरुष जसे स्त्रियांना बिघडवितात तशा काही स्त्रियाही पुरुषांना बिघडवितात, हे सत्य त्यांनी उजेडात आणले आहे. रामराव मजूरनेता असल्यामुळे त्याच्याबरोबर मजूरवर्ग व त्या वर्गात काम करणारे कार्यकर्ते यांचे वर्णन कादंबरीमध्ये येते. त्यात केतकरांनी हे दर्शवले आहे, की मजूरवर्गात स्त्रिया मिळवत्या असल्यामुळे त्यांच्यात पांढरपेशांचे नीतिनियम शिथिल झालेले आढळतात; आणि मजुरांच्या पुढाऱ्यांना आर्थिक हलाखीमुळे लग्न करता येत नसल्याने ते गुपचूपपणे 'पांडवधर्मा'चा अवलंब करतात. मजुरांनी सहकारी तत्त्वावर गिरणी कशी चालवावी, यासंबंधी रामरावाची एक योजनाही कादंबरीमध्ये आली आहे.

ब्राम्हणकन्या लिहीत असता प्रसिद्ध साम्यवादी पुढारी व मजूरनेते भाई डांगे आणि श्रीयुत लालजी पेंडसे यांच्याशी केतकरांचा संबंध आला होता. मजुरांच्या अनेक प्रश्नांबद्दल डांगे व पेंडसे यांच्या घरी चर्चेच्या अनेक बैठकी त्यांनी टाकल्या होत्या. तेव्हा, ब्राम्हणकन्येत प्रत्यक्षाचे प्रतिबिंब पडून मजुरांचे प्रश्न कसे आले, याचा वेगळा खुलासा करण्याची जरुरी नाही. ब्राम्हणकन्येमध्ये सहकारी तत्वावर मजुरांनी गिरणी चालवावी, अशी जी योजना आली आहे तिचा केतकरांनी खूपच आत्मीयतेने विचार केला होता. आपण स्वतः मजुरांचा पुढाकार घेऊन एखादी गिरणी चालवून दाखवावी, असे त्यांना खरोखरच वाटत असे. पुढे १९३५ साली मंदीची लाट आली आणि मुंबईच्या काही कापडगिरण्या विकावयास निघाल्या. त्या वेळी त्यांच्या खिशांत जरी कवडीदेखील नसे, तरी गिरणीमालकांकडे जाऊन ‘ मॅनेजिंग एजन्सी ’ विकत घेण्याची त्यांना ते गंभीरपणे ‘ ऑफर ’ देत ! श्री. पेंडसे वगैरे मंडळी त्यांना सांगत, की अशा प्रकारे गिरणी चालविणे फार कठीण असते; एक गिरणी मुंबईत अशा प्रकारे चालविण्याचा प्रयत्न होऊन ती अखेर बंद करावी लागली. पण स्वतःच्या कर्तृत्वावर त्यांचा पूर्ण विश्वास असल्यामुळे त्यांना ते पटत नसे.[1] १९३६-३७च्या सुमारास मात्र आपल्या कल्पनेतील अव्यवहार्यता लक्षात येऊन ती त्यांनी सोडून दिली असावी.[2]

ब्राम्हणकन्येमध्ये कालिंदीच्या मुख्य कथेच्या जोडीला सत्यव्रत-एसतेर आणि बिनयामिन-उषा यांच्या दोन उपकथा येतात. पैकी पहिल्या उपकथेमधील एसतेर ही कालिंदीची एक बेनेइस्रायल मैत्रीण असते आणि तिने कालिंदीला संकटाच्या वेळी आधार दिलेला असतो. तिच्यावरून केतकरांनी हे स्पष्ट केले आहे, की प्रौढ कुमारिकांच्या मनात अनेक पुरुषांबद्दल प्रेमभावना वेळोवेळी उत्पन्न झालेली असते आणि त्या बिनमिळवत्या, कमी शिकलेल्या किंवा विजातीय पुरुषाशीही लग्न करण्यास उत्सुक असतात. मात्र अशा पुरुषांनी धृष्टपणाने त्यांना मागणी घातली पाहिजे ! एसतेर बेनेइस्रायल असल्यामुळे बेनेइस्रायलांचे मोठे सूक्ष्म वर्णन कादंबरीत येते आणि एसतेरचे लग्न अखेरीस कालिंदीचा भाऊ सत्यव्रत याच्याशी होत असल्यामुळे बेनेइस्रायल व हिंदू यांच्या आंतरधर्मीय विवाहाची अभिनव सूचनाही कादंबरीत मिळते. असे सांगतात, की बेनेइस्रायलांबद्दल हा जो भाग कादंबरीत आला होता, त्यामुळे त्या काळी बेनेइस्रायल समाजात मोठी खळबळ माजली होती ![3] बिनयामिन हा एसतेरचा एक नातेवाईक असतो आणि त्याने कालिंदीची धाकटी बहीण उषा हिचे प्रेम संपादन करण्यासाठी तिचा पाठलाग चालविलेला असतो. बिनयामिनवरून आपल्या देशात प्रौढविवाह रूढ होत असला तरी तो सुखाचा होण्यासाठी अनुनयाची जी संधी लागते ती कशी मिळू शकत नाही, हे केतकरांनी दाखविले आहे. ब्राम्हणकन्या लिहिली गेली, त्या सुमारास अनुनयाच्या संधीचा प्रश्न त्यांच्या डोक्यात खूप

१. आठवणी, लालजी पेंडसे.

२. विचक्षणा, पृष्ठ २५५.

३. ‘अर्वाचीन मराठी साहित्य’, पृष्ठ १०८.

जोराने घोळत होता. ते तरुणतरुणींसाठी एक 'क्लब' काढणार होते आणि तेथे खेळांच्या निमित्ताने तरुणतरुणींना परस्परांच्या अनुनयाची संधी मिळवून देणार होते. कोणी तरुण कुमारिका भेटली, की ते तिला गंभीरपणे म्हणत, 'तुम्ही आमच्या क्लबात या. कुमारींना भावी पती तेथे भेटावे, अशी योजना आम्ही करणार आहोत'![1]

'प्रियंवदे'मधील वैजनाथशास्त्र्यांना ब्राम्हणकन्येत त्यांनी पुन्हा आणले आहे आणि अप्पासाहेब डग्गे व सत्यव्रत वैजनाथशास्त्र्यांकडे सामाजिक प्रश्नांच्या चर्चेसाठी जातात, असा कथाभाग जुळवला आहे. वैजनाथशास्त्री जे विचार कादंबरीत वेळोवेळी मांडतात ते विचार म्हणजे केतकरांच्या बंडखोर पण विधायक प्रतिभेच्या देदीप्यमान शलाका आहेत. केतकरांनी समाजरचना हा आपल्या 'प्रेमाचा' विषय कसा केला होता आणि त्या विषया-भोवती एखाद्या 'काव्यात्म प्रेमिका'प्रमाणे ते जन्मभर कशी रुंजी घालीत होते ते वैजनाथशास्त्र्यांच्या तोंडी त्यांनी घातलेल्या विचारांवरून दिसून येते. समाजरचनेसाठी त्यांनी केलेले अद्भुतरम्य विचारविलास कळण्याकरता वैजनाथशास्त्र्यांचे सारे विचार मुळातूनच वाचावयास हवेत; पण नमुना म्हणून येथे थोडेसे विचार बघण्यास हरकत नाही.

आपल्या सूत्रमय नि बोजड भाषेत प्रचलित विवाहसंस्थेविषयी वैजनाथशास्त्री (म्हणजे केतकर) म्हणतात, की "विवाह ही संस्था अत्यंत उपयुक्त आहे....स्त्री व पुरुष ही एकत्र झाली म्हणजे स्त्रीस गरोदरस्थिती व अपत्यप्राप्ती ही होतात व त्यामुळे तिची द्रव्यार्जनक्षमता कमी होते; पुरुषाची द्रव्यार्जनक्षमता कमी होत नाही. त्यामुळे स्त्रीचा आणि तिच्या अपत्याच्या पोषणाचा भार पुरुषावर टाकला आहे....हा भार टाकता यावा यासाठी पुरुषाच्या ठायी अपत्याविषयी स्वकीयता स्थापन झाली पाहिजे, म्हणून विवाह-पद्धती अंमलात आली आहे.—आणि यामुळेच विवाहित स्त्रियांना पुरुषांकितता प्राप्त झाली आहे. स्त्रीची पुरुषांकितता द्रव्यमूलक आहे व पुरुष जोपर्यंत आपले कर्तव्य करीत आहे तोपर्यंत कौटुंबिक सुखासाठी स्त्रीने मुख्याधिकार पुरुषाचा आहे, हे लक्षात ठेवूनच नेहमी वागले पाहिजे."..."स्त्रीने विवाहपद्धतीचा व पुरुषांकिततेचा स्वीकार करून आपल्या पोषणाची आणि अपत्यांच्या पोषणाची जबाबदारी पुरुषावर ढकलावी ही गोष्ट बहुजनसाध्य असल्यामुळे या रीतीचाच अवलंब जगभर झाला....ही संस्था यशस्वी करण्यासाठी पातिव्रत्याचे महत्व सर्व कवी वर्णू लागले व पुरुषाचा अधिकार पक्का होण्यासाठी कायदे होऊ लागले."[2]..."आर्थिक दृष्ट्या स्त्री जेव्हा स्वतंत्र असते तेव्हा तिला कोणते नियम लागू असावेत, याविषयी जगाने अजून विचारच केला नाही."[3]

मातृसत्ताक कुटुंबपद्धतीचे पुनरुज्जीवन करावे, असा अतिशय नवा विचार मांडताना वैजनाथशास्त्री तशाच सूत्रमय नि बोजड भाषेत म्हणतात, की "स्त्रियांची पुरुषांकितता किंवा कुटुंबातील पितृसत्ता द्रव्यमूलक असल्यामुळे प्रस्तुत विवाहसंस्था

१. आठवणी, लालजी पेंडसे.
२. पृष्ठे ३११, ३१२, दुसरी आवृत्ती.
३. पृष्ठ २२२, दुसरी आवृत्ती.

अनेक प्रसंगी स्वाभाविक प्रवृत्तीशी विसंगत व समाजास अपुरी होते. त्या प्रसंगांपैकी एक प्रसंग म्हटला म्हणजे जेव्हा पुरुष द्रव्यार्जनक्षम नसतो किंवा जेव्हा स्त्री पुरुषापेक्षा अधिक द्रव्य मिळवू शकते तेव्हाचा होय. अशा प्रसंगी परिस्थिती मातृसत्ताक कुटुंबास अनुरूप, पण कायदा मात्र पितृसत्ताक कुटुंबाचा, अशी असंगती होते. याशिवाय, जेव्हा एखाद्या स्त्रीला नवरा मिळतच नसेल व ती जरी स्वसंरक्षणक्षम असली तरी तिला प्रजोत्पादनाची संधी नाकारली जाते तो होय....अशा प्रसंगी तिला आर्थिक लायकी असताही आत्मसातत्यरक्षणाची संधी समाज नाकारीत असतो. याचे कारण तिला पुरुष मिळत नसतो म्हणून नव्हे, तर समाजाने निर्माण केलेल्या कायद्याचे बंधन स्वीकारणारा पुरुष मिळत नाही म्हणून; —आज जे संबंध अनीतीचे समजले जातात तसले संबंध करण्यास तयार असे पुरुष तिला हवे तितके मिळतील. विवाहाशिवाय अपत्योत्पादन तिने पत्करले तर विवाहाच्या केवळ आर्थिक अशा आदिकारणाशी अपरिचय असलेला समाज तिला गुन्हेगार ठरवितो. म्हणून ती विवाहाशिवाय प्रजोत्पादन करीत नाही व म्हणून तिला मातृत्व नाकारले जात आहे. यासाठी समाजाच्या मूलभूत कायद्यातच फेरफार केला पाहिजे."..."जगात दोन प्रकारच्या कुटुंबपद्धती सर्व देशांच्या कायद्याने चालू द्याव्यात. एक म्हटली म्हणजे मातृसत्ताक कुटुंबपद्धती व दुसरी पितृसत्ताक कुटुंबपद्धती. याशिवाय दोन्ही कुटुंबपद्धतींतदेखील अंतर्गत घटनेसंबंधी भेद असणार."..."पुरुषसत्ताहीन मातृसत्ताक कुटुंबपद्धती यशस्वी करणे लोकसंख्येच्या वाढीसाठी आणि स्त्रियांस त्यांचे हक्काचे मातृत्व देण्यासाठी अवश्य आहे."... "प्रत्येक कुटुंबास वाटेल तो कायदा घेण्याचे किंवा प्रचलित असलेला कायदा स्वतःपुरता स्वतःच्या कुटुंबशासनास लावून घेण्याचे स्वातंत्र्य असावे....कंपनीने अंतःशासनासाठी स्वतः केलेला कायदा नोंदावा लागतो, त्याप्रमाणे प्रत्येक कुटुंबाने आपणास लागू पडणारा कुटुंबशासनाचा कायदा नोंदावयास हरकत नाही."[1]

अनौरस प्रजेसंबंधी वैजनाथशास्त्री सांगतात, की "संगमोत्सुकता हा मानवी धर्म आहे. संगमक्षमता ही अल्पवयातच उत्पन्न होते, पण त्याच वयात द्रव्योत्पादनाचे व स्त्रीसंरक्षणाचे पुरेसे सामर्थ्य उत्पन्न होत नाही. त्यामुळे पुरुषास अविवाहित राहावे लागते व स्त्रीसही अविवाहित राहावे लागते. आणि यामुळे विवाहाशिवाय स्त्रीपुरुषसंबंध उत्पन्न होतात. या संबंधामुळे प्रजा उत्पन्न होते. ही प्रजा अप्रतिष्ठित व विवाहोत्तर प्रजा सुप्रतिष्ठित, हे सर्व खेळ द्रव्यार्जनक्षमता निरनिराळ्या पुरुषांत निरनिराळ्या काळी उत्पन्न होते या परिस्थितीचे आहेत."..."समाजातील जी अनौरस संतती आहे ती औरस संततीपेक्षा कोणत्याही भौतिक शक्तीच्या दृष्टीने कमी नाही. कोठे कमीपणा असल्यास तो अपत्य गर्भात असता मातेस जे पकडले जाण्याचे भय वाटत असेल, त्यामुळे...उत्पन्न झाला असेल....पण जर पुरुषसत्तारहित कुटुंबस्थापना अपवित्र राहिली नाही, तर आईस अपत्यागम लपविण्याचे कारणच नाही. यासाठी

१. पृष्ठ ३१२ ते ३१५, दुसरी आवृत्ती.

स्त्रीचा अविवाहित असूनही मातृत्व प्राप्त करून घेण्याचा हक्क सर्व समाजाने जाहीर करावा."[1]

वेश्यांच्या वर्गाविषयी वैजनाथशास्त्री पुढील मत प्रदर्शित करतात : "जोपर्यंत समाज पुरुषसत्ताक आहे तोपर्यंत तरी समाजामध्ये वेश्यावर्ग राहाणारच. या वर्गाच्या अस्तित्वास समाज जबाबदार आहे. स्त्रियांस प्रामाणिक द्रव्यार्जनाची संधी अधिक येईल, विवाहविषयक वेडे नियम काढून टाकले जातील, तेव्हा वेश्यावृत्ती अनवश्य व निरुपयोगी होत जाईल. आज वेश्यावृत्तीचे खरे आधारस्तंभ विवाहपद्धती कठीण कायद्याची व अडचणीची करणारे लोक आहेत. केवळ वेश्यावर्ग गुन्हेगार आहे, अशी समजूत करून घेणे म्हणजे मुद्दाम वेड पांघरणे आहे. जोपर्यंत स्त्रीपुरुषवियोग सांपत्तिक कारणामुळे म्हणजे सहकुटुंब राहाण्याची ऐपत बऱ्याच पुरुषांस नसल्यामुळे सक्तीचा होत आहे आणि जोपर्यंत बऱ्याचशा वर्गास वैवाहिक अर्थशास्त्राच्या दृष्टीने लायकी येत नाही तोपर्यंत वेश्यावर्ग समाजात राहाणारच. तो उघडपणे राहिला नाही तर प्रच्छन्नपणे राहील."[2]

—वैजनाथशास्त्रयांच्या या विचारांत समाजामध्ये आमूलाग्र उलथापालथ करणारी केवढी स्फोटक शक्ती भरलेली आहे, हे समाजशास्त्राच्या अभ्यासकांना आणि समाजसुधारकांना उलगडून सांगण्याची मुळीच जरुरी नाही. ब्राम्हणकन्येमध्ये असे मूलगामी विचार, विध्वंसक विचार, आणि विधायक विचार सर्वत्रच विखुरलेले आहेत. या विचारांनी केतकरांच्या सर्व कादंबऱ्यांत ब्राम्हणकन्या अग्रगण्य ठरण्यास मोठे साह्य तर केलेच, पण कित्येक समाजशास्त्रीय, समाजसुधारणाविषयक, गंभीर ग्रंथांपेक्षाही तिचे मोल वरच्या पायरीला नेऊन ठेवले !

शेवटी, ब्राम्हणकन्येच्या लेखनामधली एक मौज येथे सांगण्याजोगी आहे. ब्राम्हणकन्येची काही प्रकरणे प्रथम विद्यासेवकात प्रसिद्ध झाली होती आणि ब्राम्हणकन्या पुस्तकरूपाने छापली जात असता ती प्रकरणे विद्यासेवकातून फाडून घेऊन केतकर छापखान्याकडे पाठवीत असत. विद्यासेवकात ब्राम्हणकन्येच्या एका प्रकरणाशेजारी माधव ज्युलियनच्या एका काव्यावरील त्यांची टीका प्रसिद्ध झाली होती. छापखान्याकडे विद्यासेवकाची पाने पाठविताना या टीकेवर फुली मारण्याचे त्यांच्याकडून राहून गेले आणि जुळाऱ्याने ती टीका जुळवून टाकली. उपमुद्रिते तपासण्यासाठी त्यांच्याकडे आली, तेव्हा झालेली चूक त्यांच्या ध्यानात आली. पण जुळाऱ्याचे श्रम वाया जावयास नकोत, म्हणून त्यांनी मागेपुढे वाक्ये घालून ती टीका ब्राम्हणकन्येत दडपून दिली ![3]

मनाचे रंजन आणि बुद्धीचे उद्बोधन करणारी 'ब्राम्हणकन्या' एकीकडे लिहीत

१. पृष्ठे ३१७ ते ३१९, दुसरी आवृत्ती.

२. पृष्ठ ३१८, दुसरी आवृत्ती.

३. 'साहित्यिकांच्या गोष्टी', मनोहर, सप्टेंबर १९४५; मा. त्र्यं. पटवर्धन, प्रतिभा, जुलै १९३७.

असता केतकर याच वेळी, दुसरीकडे, 'गावसासू' ही आणखी एक कादंबरी लिहीत होते ! या काळात त्यांना दोन ग्रंथ नेहमी हाताशी लागत. एकाचा कंटाळा आला, की ते दुसऱ्याकडे वळत आणि आलटूनपालटून लिहिता लिहिता दोन्ही ग्रंथ पूर्ण करीत.[१] तेव्हा 'ब्राम्हणकन्ये'बरोबर त्यांनी 'गावसासू' लिहिली आणि तीही १९३० मध्ये प्रकाशित झाली. 'परागंदा' या कादंबरीत जसे वाचकांना त्यांनी हिंदुस्थानाच्या सरहद्दी-पलीकडे नेले तसेच 'गावसासू'मध्ये पुन्हा एकदा नेले. गावसासूमध्ये लंडनमधल्या हिंदी विद्यार्थ्यांची एकंदर परिस्थिती, त्यांच्यामधील लैंगिक भावना नि व्यवहार यांचे वर्णन येते आणि तेथे आय. सी. एस. होण्यासाठी येणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांमधून जावई पकडण्याकरता काही महत्त्वाकांक्षी हिंदी बायका कशा धडपडत असत ते बघावयास सापडते. लंडनमधील हिंदी विद्यार्थ्यांची लैंगिक नीतिमत्ता सुधारावी म्हणून तेथे अधिक प्रमाणात हिंदी मुली गेल्या पाहिजेत, असा विचार केतकरांनी मांडला आहे. १९११-१२ साली ते स्वतः इंग्लंडमध्ये राहिले होते, तेव्हा प्रत्यक्ष बघितलेली परिस्थिती नि व्यक्ती यांच्या मालमसाल्यातून 'गावसासू'ची उभारणी त्यांनी केली, हे सांगावयास नको.

'गावसासू'नंतर सुमारे पाच वर्षांनी 'विचक्षणा' ही सहावी कादंबरी त्यांनी लिहिली आणि ती १९३६-३७ मध्ये 'स्त्री' मासिकातून क्रमशः प्रसिद्ध झाली. त्यांच्या इतर कादंबऱ्यांप्रमाणे विचक्षणेतही नवी समाजचित्रे आहेत, नवी पात्रे आहेत आणि नवे विचार आहेत; पण विचक्षणेत गुरुबाजीविषयी नि परकीय पुरुषाकडून होणाऱ्या क्षेत्रज प्रजेविषयी जी मते मांडलीं आहेत ती विशेष धक्का देणारी आहेत. तीमध्ये मोतीलाल नावाचे एक शेटजी पुढील प्रकारची मते व्यक्त करतात: 'कित्येक पुरुषांना काही व्यंगामुळे मूल होणे शक्य नसते. त्यांच्याजवळ गडगंज संपत्ती असते आणि त्या संपत्तीला त्यांना वारस हवा असतो. अशा वेळी दत्तक घेण्याची चाल आहे; पण दत्तक घेण्याने कित्येकदा एखाद्या ऐतोबाच्या हातात संपत्ती जाते व तो तिची धूळधाण उडवतो, हे अशा पुरुषांना दिसत असते. नातेवाइकांशी भांडणे असल्याने त्यांच्यातून दत्तक घेण्याची या पुरुषांची इच्छा नसते आणि दत्तक घेतल्याने स्वतःचे व्यंग जाहीर व्हावे असेही त्यांना वाटत नसते. त्यांना स्वतःच्या पत्नीच्या ठिकाणीच मूल व्हावे, असे वाटत असते. तर परकीय पुरुषाकडून आपल्या पत्नीच्या ठिकाणी गुप्तपणे त्यांनी बीजधारणा कां करवून घेऊ नये ? विशेषतः एखाद्या गुरूच्या सेवेत पत्नीला गुंतवून गुरू किंवा गुरुशिष्य यांचा संबंध तिच्याशी येऊ देणे श्रेयस्कर नाही काय ? पत्नीला इतर पुरुषांकडे जाऊ दिले तर पत्नी ज्या पुरुषाकडे जाईल त्या पुरुषावरच प्रेम करू लागेल आणि त्याला खूष करण्यासाठी नवऱ्याची संपत्ती उधळून टाकील. तो पुरुषच घराचा मालक होईल. पण गुरू किंवा गुरुशिष्य यांच्या बाबतीत तसे होणार नाही. त्यांचे संबंध पुष्कळ स्त्रियांशी येत असल्यामुळे ते कायम टिकणार नाहीत आणि नवऱ्याच्या हातातून

१. 'माझी गेली आठ वर्षे', प्रतिभा, जुलै १९३७, (उद्धृत).

बायको किंवा संपत्ती न जाता त्याला अपत्यलाभ होईल. या प्रकारात अनाचार असेल; पण तो आवश्यक आहे,—आणि म्हणून त्यावर धर्माचे पांघरूण घालणे योग्य आहे. शिवाय आचार नि अनाचार हे शब्द जपूनच वापरले पाहिजेत. जी गोष्ट आवश्यक आहे ती करणे अनाचार नव्हे.'[1] गुरुबाजी व क्षेत्रज प्रजा यांचे हे समर्थन क्रांतिकारक नाही, असे कोण म्हणेल? ह्याच विषयावर पद्मनाभ नावाचा एक शिष्योत्तम असे भाष्य करतो, की 'विवाहसंस्था अपूर्ण असून तिला पूर्णता आणण्यासाठी स्त्रियांना केव्हाकेव्हा परपुरुषाशी संबंध ठेवावा लागतो. अशा प्रसंगी, आपण पाप करीत आहोत ही भावना त्यांच्या मनात असणे बरे, की आपण पूज्य पुरुषास आत्मसमर्पण करीत आहोत ही भावना असणे बरे? गुरूशी संबंध आला तर आत्मसमर्पणाची भावना राहील आणि संबंध अधिक सुखावह होईल. तेव्हा गुरुसंस्थेचा उपयोग विवाहसंस्थेची अपूर्णता दूर करणारा आहे.'[2] गुरुबाजीवरील हे भाष्यही हुषारीचे आहे, यात शंका नाही. तर्कटे नावाचे एक डॉक्टर गुरुबाजीची आवश्यकता अशी प्रस्थापित करू पाहातात, की 'समाजामध्ये चाललेली गुरुबाजी एक महत्त्वाची सामाजिक गरज भागवीत असते. नेहमीच्या व्यवहारा-मधून दूर जावे असे मानवी मनाला सारखे वाटत असते आणि मनाची ती भूक नाटके, क्लब वगैरेंनी भागविली जाते. गुरुबाजी तेच कार्य वेगळ्या साधनांनी करते. लोकांच्या मनाला लागणारे स्वास्थ्य धार्मिक गुरू देतात व म्हणून लोक त्यांच्याकडे जातात.'[3] डॉ. तर्कट्यांच्या या समर्थनालासुद्धा काही समाजशास्त्रीय अर्थ नाही का? विचक्षणा लिहिण्यापूर्वी घरातील भुताटकीच्या निमित्ताने काही गुरूंशी नि आश्रमांशी केतकरांचा संबंध आला होता; तेव्हा आपल्या समाजशास्त्रीय दृष्टीने गुरुबाजीचे असे विचित्र मंडन विचक्षणेमध्ये त्यांनी केले असावे.

विचक्षणेबरोबर 'भटक्या' या कादंबरीचे लेखनही त्यांनी बरेचसे पूर्ण केले होते; पण त्यांच्या आकस्मिक मृत्यूमुळे 'भटक्या'ची अखेरची प्रकरणे कधीच लिहिली गेली नाहीत. या कादंबरीत एका भटक्या व्यक्तीचे आत्मचरित्र देण्याचे निमित्त करून नाना विषय, नाना विचार, नाना व्यक्ती नि नाना समाज यांचे हवे तसे विशृंखल दर्शन वाचकांना त्यांनी घडवले आहे आणि एकजिनसीपणाच्या गुणाला अजिबात फाटा दिला आहे. यामुळे, बटाट्याच्या चाळीपासून मेसापोटेमियातील युद्धापर्यंत आणि पोलीस इन्स्पेक्टरच्या अनुभवांपासून दोन मिळवत्या बायकांनी सामायिकात एक पती सांभाळण्याच्या कल्पनेपर्यंत अमाप गोष्टी 'भटक्या'मध्ये बघावयास सापडतात आणि बुद्धीचे खूप उद्बोधन होते;—पण एक सलग नि स्वयंपूर्ण कथानक तीमध्ये मुळीच न आढळल्याने कलेची भूक मात्र अतृप्त राहाते. या कादंबरीत त्यांनी अशी एक मौज केली आहे, की आधी प्रकाशित झालेले आपले तीन गोष्टीवजा लेख काटाछाट करून कथानकामध्ये चपखल

१. पृष्ठे १९६, १९७.
२. पृष्ठे ३०९, ३१०.
३. पृष्ठे २९५, २९६.

बसवून दिले आहेत! बोलूनचालून हे भटक्याचे भरकटलेले आत्मचरित्र होते; मग अशी मौज त्यांनी का करू नये?[१]

केतकरांच्या कादंबऱ्या आणि त्यांचे शास्त्रीय ग्रंथ यांचा तुलनात्मक विचार केला तर असे दिसते, की सामाजिक नीतिनियम नि रूढ प्रतिष्ठित समजुती यांना गदगदून हलविणारे लेखन त्यांनी मुख्यतः कादंबऱ्यांमध्ये केले. प्रियंवदेची 'राष्ट्र म्हणजे बायका' ही कल्पना; ब्रम्हगिरींनी गीतेला 'सैतानी ग्रंथ' म्हणून दिलेली पदवी; वैजनाथशास्त्र्यांनी स्त्रीसत्ताककुटुंबाचा, अनौरस प्रजेचा नि अनूढ मातृत्वाचा केलेला पुरस्कार; क्षेत्रज प्रजा व गुरुबाजी यांचे 'विचक्षणे'त आलेले समर्थन; सामायिकात दोन बायकांनी एक पती सांभाळण्याची 'भटक्या'मध्ये आलेली योजना; वगैरे गोष्टी आठवल्या म्हणजे त्यांनी नीतिनियमांवर नि प्रतिष्ठित समजुतींवर कसे प्रचंड हल्ले केले ते स्पष्ट होते. हे हल्ले करताना त्यांच्यामधील बाल्यपणा नि खोडकरपणा जागृत असेल, यात संशय नाही. चिमटे घेऊन, ढोसून समाजाला विचारप्रवृत्त करावे अशी त्यांची इच्छा असेल, याबद्दलही वाद नाही. पण त्यांच्या या हल्ल्यांचे मूळ त्यांच्या निःशंक अधार्मिकपणात होते. ईश्वराच्या अस्तित्वावर त्यांचा विश्वास नव्हता आणि अमेरिकेतून परतल्यापासून धर्म व नीती यांच्या रूढ कल्पना त्यांनी धुतकारून लावल्या होत्या. "राष्ट्रबलसंवर्धन होईल तोच धर्म आणि तीच नीती" अशी त्या वेळची त्यांची धारणा होती आणि त्या धारणेची परिणती पुढे 'मनुष्यमात्राचे सुख वाढवील तोच धर्म नि तीच नीती' अशा धारणेत झाली होती. रूढ धर्माने त्यांच्या मनाला घाट दिलेला नव्हता किंवा त्यावर खोल, अबोध संस्कार केलेले नव्हते. ते आमूलाग्र असे अधार्मिक असल्यामुळे, धार्मिकपणाबरोबर नीतीला व रूढ प्रतिष्ठित समजुतींना जे पावित्र्य चिकटते ते त्यांच्या डोक्यात कधी चिकटले नव्हते. आगरकरांसारखी माणसे आस्तिक नव्हती, ती अज्ञेय-वादी होती, पण काही निरपेक्ष नैतिक नियम ती मानीत होती व त्या अर्थाने ती 'धार्मिक' होती. पण केतकर कोणतेच नैतिक नियम निरपेक्ष मानीत नसत, पवित्र मानीत नसत; त्यामुळे त्या दृष्टीनेही ते अधार्मिक होते. साहजिकच कोणत्याही नीतिनियमांवर हल्ला चढवताना ईश्वराची भीती त्यांना वाटली नाही की त्या नियमांच्या पावित्र्याची, निरपेक्ष-पणाची धास्ती त्यांना बाधली नाही. समाजशास्त्राच्या अभ्यासामुळे त्यांच्या मनावर एक गोष्ट पक्की ठसली होती, की सर्व नीतिनियम विशिष्ट सामाजिक परिस्थितीत विशिष्ट आयुष्यक्रम सुखावह करण्यासाठी उत्पन्न झालेले आहेत. तेव्हा आयुष्यक्रम अधिक सुखावह व्हावा, म्हणून त्या नियमांची त्यांनी सारखी फेरतपासणी, मोडणी नि मांडणी चालविली. त्यांच्या आधी महाराष्ट्रात लोकहितवादी, चिपळूणकर, टिळक, आगरकर, रानडे, भांडारकर वगैरे ज्या ज्या मोठमोठ्या व्यक्ती चमकल्या त्या साऱ्या या किंवा त्या

१ 'एका इलेक्शन एजंटाचा अनुभव', विद्यासेवक, ऑगस्ट १९२५; 'डॉ. वैसास यांची विचारक्रांती', विद्यासेवक, सप्टेंबर १९२५; 'फरासखान्यातील गोष्ट', यशवंत, फेब्रुवारी १९३०;—हे तीन लेख 'भटक्या'त समाविष्ट झाले आहेत.

अर्थाने धार्मिक होत्या. त्यामुळे त्या व्यक्ती नीती नि प्रतिष्ठित समजुती यांच्या अंगाला केतकरांसारख्या बेदरकारपणे झोंबू शकल्या नाहीत. केतकरांना मात्र अधार्मिकपणाचे अमोघ सामर्थ्य लाभले होते. साहजिकच त्या सामर्थ्याच्या आधारावर, एखाद्या यवनाने ज्या सहजतेने देवाची मूर्ती लाथाडावी नि फोडावी, त्या सहजतेने ते नीतिनियम नि प्रतिष्ठित समजुती लाथाडू नि फोडू शकले.

त्यांनी आपल्या कादंबऱ्यांत नीतिनियम नि प्रतिष्ठित समजुती यांच्याशी जो खेळ केला तो अनेकांना भयानक वाटला. समाजाचा पाया उखडून समाजाचा नाश ते करीत आहेत, असे काहींना वाटले; तर अनाचाराला ते उत्तेजन देत आहेत, अशी काहींची समजूत झाली. पण खरोखर यापैकी काहीही ते करीत नव्हते. कादंबरीतल्या लिहिण्याने विचारप्रवर्तन घडले तरी समाजात लगेच फारशी उलथापालथ होत नाही, हे ते जाणून होते; आणि काही उलथापालथ सामाजिक सुखासाठी आवश्यक नि अपरिहार्य असते, म्हणूनच ती करण्याची त्यांची इच्छा होती. त्यांच्या साऱ्या बंडखोरीचे सुकाणू समाजाच्या विनाशाकडे किंवा अनाचाराकडे नव्हते, तर समाज अधिक सुखी करण्याकडे नि अनाचारातला खोटेपणा उघड करण्याकडे होते. त्यांचा विध्वंस भांबावून सोडणारा असला तरी विधायक रचनेची त्यात पूर्वतयारी होती. प्रा. वा. म. जोशांनी म्हटल्याप्रमाणे त्यांचे विचार शेवटी "सद्भावनापोषक" आहेत.[१] प्रा. कुसुमावती देशपांड्यांनी म्हटल्याप्रमाणे "त्यांची वृत्ती क्षुद्र किंवा मन हलके किंवा कोते वाटत नाही....जीवन-विद्वेषाची किंवा उद्वेगाची छाया त्यांच्या निर्मितीवर पडली नाही. उलट त्यांच्या समवृत्ती जीवननिष्ठेचेच त्यांच्या निर्मितीत क्षणोक्षणी प्रत्यंतर पडते."[२] पण आपल्या बंडखोरीतून केतकरांनी मानव्याची जी उपासना केली, नाशातून जी निर्मिती साधली, ती समजण्यासाठी मन फारच मोठे केले पाहिजे आणि बुद्धीचे डोळे निर्भयपणे उघडले पाहिजेत.

आयुष्याच्या या अखेरच्या काळात केतकरांचे लक्ष पुन्हा एकदा काव्यरचनेकडे वळले होते आणि कादंबऱ्यांप्रमाणे काव्याचे लेखनही त्यांनी चालवले होते. मात्र पूर्वी त्यांनी स्फुट व आत्मलक्षी कविता लिहिली, तर या वेळी महाकाव्याच्या रचनेस त्यांनी हात घातला! या महाकाव्यात चारही वेद आणि पुराणे यांचे दोहन करावे व ते एका कथेच्या अनुषंगाने करावे, असा त्यांचा प्रचंड बेत होता आणि 'आंगिरसांचे सत्र' असे या महाकाव्याचे नामकरणही त्यांनी केले होते. ज्ञानकोश संपल्यावर प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास लिहिण्याचे जे एक फार मोठे कार्य त्यांनी वर्षानुवर्ष चालविले होते त्यामधून डोक्याला विश्रांती मिळावी, म्हणून या महाकाव्याचा प्रपंच त्यांनी थाटला होता! त्यांच्या हयातीत 'आंगिरसांच्या सत्रा'तील काही उतारे प्रसिद्ध झाले; त्या महाकाव्याचे बरेचसे असंबद्ध लेखनही त्यांनी करून ठेवले; पण त्याला सुसंबद्ध नि पूर्ण स्वरूप देण्यास

१. लोकशिक्षण, मे-जून १९३७.
२. 'मराठी कादंबरी', पृष्ठ १८२.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप
अनुक्रम .......... वि: ..........
क्रमांक .................. नों: दि: ..........

त्यांना मृत्यूपर्यंत सवड मिळाली नाही.[१]

१९२९ नंतर कादंबऱ्या नि महाकाव्य यांच्या स्वरूपात बरेच ललित लेखन केतकरांनी केले असले तरी त्या काळातला त्यांचा तो एक गौण उद्योग होता. त्या काळात त्यांनी जो मुख्य उद्योग केला आणि ज्यात त्यांनी आपल्या मेंदूला सर्वात जास्त शिणवले असा उद्योग म्हणजे प्राचीन महाराष्ट्राच्या विस्तृत इतिहासाचे संशोधन व लेखन हा होय. हा त्यांचा उद्योग ज्ञानकोशाच्या मोठ्या कामामधून आनुषंगिक कार्य म्हणून उगम पावला होता आणि पुढे त्याला स्वतंत्र नि मोठे महत्व प्राप्त झाले होते. ज्ञानकोशाचा पुरवणी-खंड म्हणून ज्याप्रमाणे 'हिंदुस्थान-खंड' निघाला त्याप्रमाणे 'महाराष्ट्र-खंड'ही निघावयाचा होता. पण पुढे असे दिसून आले, की महाराष्ट्र-खंडासाठी बरेच संशोधन करावे लागणार व सारे संशोधन द्यावयाचे तर ग्रंथ खूप वाढणार. तेव्हा कालावधी, पृष्ठसंख्या व हातामधली शिल्लक यांचा विचार करून ते काम अंगाबाहेर टाकण्यात आले होते. पण ज्ञानकोशाच्या कक्षेतून काम असे बाहेर पडले तरी त्याने केतकरांच्या मनाची घट्ट पकड घेतली होती. १९२७ च्या नोव्हेंबरमध्ये विद्यासेवकात 'प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासाची तयारी, आमची नवी योजना' हा लेख त्यांनी फडकवला होता आणि डॉ. भांडारकर, इतिहासाचार्य राजवाडे वगैरेंनी अपुरे ठेवलेले कार्य पूर्ण करण्याचा आपला मनोदय जाहीर केला होता. "गेले सहा महिने काम झाले" अशा अर्थाचा उल्लेख त्याच लेखात त्यांनी केला होता. पण ज्ञानकोशाच्या व्यवस्थापकाचे व संपादकाचे त्यांच्याकडील काम १९२८ साली सुटले तेव्हाच प्राचीन महाराष्ट्राच्या कामाला खरा जोर लागला.

प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासलेखनाकडे आपले लक्ष कसे वळले ते त्यांनी पुढील-प्रमाणे सांगितले आहे. ते म्हणतात : "या इतिहासक्षेत्राचा काळजीपूर्वक अभ्यास करण्याकडे प्रवृत्ती होण्याचे कारण ज्ञानकोशाची पुरवणी म्हणून 'महाराष्ट्र-विभाग' काढण्याची जी तयारी केली ते होय. महाराष्ट्र-विभागात मुख्यत्वेकरून महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, आर्थिक,...वैज्ञानिक, वाङ्मयविषयक इतिहास द्यावयाचा होता. हा तयार करताना असे वाटू लागले, की त्रोटक इतिहास थोडक्या पानांत देऊन ज्ञान-विकासाच्या दृष्टीने काहीएक फायदा नाही. इतिहासाच्या स्थूल गोष्टी ज्ञानकोशात येऊन गेल्याच आहेत. ऐतिहासिक भाग तयार करताना पूर्वीच्या लेखकांनी लिहिलेल्या मजकुरातील वैगुण्ये...दिसून आली...त्याबरोबर हेही दिसून आले, की प्राचीन काळच्या सामाजिक इतिहासाचे अगदी स्थूल स्वरूपदेखील कोणाच्याही लक्षात आले नाही, व जे आपणास दिसत आहे ते द्यावयाचे झाल्यास ग्रंथ बराच मोठा करावा लागेल."..."हे सर्व अभ्यासक्षेत्र पाहाता असे वाटू लागले, की हे क्षेत्र दिसत असता ते सोडून जाणे बरोबर नाही."..."ज्ञानकोश पुरा झाल्यापासून बराच काळपर्यंत माझे

१. लोकशिक्षण, डिसेंबर १९३२; विद्यासेवक, डिसेंबर १९३५; 'माझी गेली आठ वर्षे', प्रतिभा, जुलै १९३७, (उद्धृत); के. ना. काळे, लोकशिक्षण, मे-जून १९३७.

अंतःकरण आकर्षण करील असे काम सापडले नव्हते. ते आता सापडले आहे." [१] प्राचीन महाराष्ट्राच्या कामाने त्यांचे अंतःकरण खरोखरच इतके आकृष्ट केले, की शेवटची आठदहा वर्षे त्या कामात त्यांच्या मनाच्या एका मोठ्या भागाची एक तऱ्हेची समाधी जणू लागून राहिली होती.

ज्ञानकोश हातावेगळा झाल्याबरोबर प्राचीन महाराष्ट्राच्या कामाला त्यांनी कशी अंग झाडून सुरुवात केली ते १९२९च्या जुलैमधील त्यांच्या निवेदनावरून दिसून येते. तोवर प्राचीन अवशेष नि शिलालेखादी अंकित लेख यांच्या अवलोकनाच्या निमित्ताने 'ऑर्किऑलॉजी'च्या खात्याशी त्यांचा संबंध येऊन त्यांनी त्या खात्यात काही सुधारणा व्हाव्या असा प्रयत्न केला. वऱ्हाड-मध्यप्रांत हा प्रदेश प्राचीन अवशेषांच्या दृष्टीने महत्वाचा आहे, पण त्याचा कारभार बांकीपूर-पाटणा येथून चालत असे आणि त्याच्या ऐतिहासिक संशोधनाकडे दुर्लक्ष होत असे. याकरिता वऱ्हाड-मध्यप्रांताचे निराळे मंडल (सर्कल) उत्पन्न करण्यात यावे किंवा तो भाग 'इंपीरियल खात्या'कडून काढून संशोधनार्थ स्वतंत्र करावा, अशी सूचना त्यांनी वऱ्हाड-मध्यप्रांताच्या गव्हर्नराला पत्रद्वारे केली. यासंबंधी आवश्यक ते राजकारण करण्याची विनंती लोकनायक अण्यांना त्यानी केली व त्यांच्याकडून त्या विनंतीला मान्यताही मिळविली. आर्किऑलॉजीच्या खात्याकडील बऱ्याच लेखांचे वाचन व्हावयाचे राहिले होते. त्यासंबंधी 'डिरेक्टर जनरल ऑफ आर्किऑलॉजी' श्री. हारग्रेव्ह्ज यांच्याकडे त्यांनी पत्रव्यवहार केला व वाचनाचे आश्वासन त्यांच्याकडून मिळविले. काही उत्खनन व्हावे म्हणून ते हारग्रेव्ह्ज यांना दिल्लीला जाऊन भेटले; पण उपलब्ध वस्तूंच्या संग्रहाकडे खात्याचे लक्ष आहे, नव्या उत्खननाकडे नाही, असे त्यांना उत्तर मिळाले. संशोधनासाठी व प्राचीन अवशेषांच्या प्रत्यक्ष अवलोकनासाठी त्यांनी बराच प्रवासही उरकला. मुंबई, नागपूर येथील संग्रहालयांना त्यांनी भेटी दिल्या; जुन्नर, घारापुरी, कार्ला, कान्हेरी, वेरूळ, नाशिक, भांबुर्डा, पुणे इत्यादी ठिकाणची लेणी पाहिली; सोपाऱ्याच्या अवलोकनासाठी दोन खेपा घालून पश्चिम किनाऱ्याच्या काही भागात प्रवास केला; वऱ्हाड-मध्यप्रांतातील भांदक, बालापूर, रामटेक व उत्तर हिंदुस्थानातील सांची, अविभेलसा ही ऐतिहासिक स्थळे नजरेखाली घातली; दिल्लीचा अशोकस्तंभ नि दुसरे काही अवशेष बघितले;—आणि गुजराथेतील अहमदाबाद, बडोदे, सिद्धपूर, उंझा या ठिकाणच्या स्मारकांची पाहाणी केली! त्या वेळेपर्यंत सुमारे सात हजार अंकित लेखांच्या नकला नि भाषांतरे त्यांनी करून घेतली होती ! [२]

जसजसे संशोधन होत होते तसतसे प्रारंभीच्या काळात स्फुट लेखांच्या द्वारा ते संशोधन ते प्रसिद्ध करीत होते आणि त्यावरील विद्वानांची मते अजमावण्याचा प्रयत्न करीत होते. १९२८च्या अखेरीस नागपूरच्या महाराष्ट्रात 'कालिदास आणि विदर्भ' या विषयावर त्यांनी जी लेखमाला लिहिली व प्रा. मिराशींबरोबर त्यांचा जो वाद झाला

१. 'प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास', महाराष्ट्र, २९ जुलै १९२८.
२. 'प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास', विद्यासेवक, जुलै १९२९.

त्याचा उल्लेख पूर्वी झालेला आहे. त्याशिवाय शातवाहनांसंबंधी एक लेख 'ज्ञानसंग्रहा'त त्यांनी लिहिला,[१] 'कायस्थ प्रभूंचे महाराष्ट्रात आगमन' हे चार लेखांक 'लोकशिक्षणा'त लिहिले[२] आणि 'कायस्थ प्रभूंचे सामाजिक स्थान' हा लेख 'विद्यासेवका'त लिहिला.[३] १९२८-२९मध्ये कायस्थ प्रभूंवरील लेख लोकशिक्षणात प्रसिद्ध झाल्यानंतर त्यातील विधानांमुळे कायस्थ प्रभू त्यांच्यावर बरेच संतापले. चंद्रसेनाची म्हणजे कायस्थ प्रभूंच्या मूळ पुरुषाची कथा काल्पनिक आहे, कायस्थ प्रभूंचे 'चांद्रसेनीय' हे नाव किंवा 'प्रभू' हे नाव जुने नसून नवीन आहे, जुने नाव परभू (म्हणजे परदेशी) हे असावे, इत्यादी त्यांची विधाने कायस्थ प्रभूंना रुचली नसावी.[४] कायस्थ प्रभू त्यांच्यावर किती संतापले होते त्याची कल्पना 'महाराष्ट्र-सारस्वता'मधील[५] रा. श्री. म. वर्दे यांच्या लेखांवरून येऊ शकते. श्री. वर्द्यांनी 'महाराष्ट्राचा व्रात्य शकार' असे गालिप्रदान त्यांना केले होते! पण सत्याच्या संशोधनासाठी ते बद्धपरिकर झाले असल्यामुळे कायस्थ प्रभूंनी जी गडबड केली तिच्याकडे त्यांनी फारसे लक्ष दिले नाही. उलट कायस्थ प्रभूंच्या सामाजिक इतिहासाचा माग ते अधिकाधिक काढीत गेले आणि त्या इतिहासावर आपण एक पुस्तक लिहू शकू असा आत्मविश्वास मे १९२९मध्येच त्यांना वाटू लागला![६]

हैद्राबादच्या साहित्य-संमेलनाच्या प्रसंगी, मे १९३१मध्ये, 'प्राचीन महाराष्ट्रा'च्या 'आदिपर्वा'पैकी पहिली आठ प्रकरणे त्यांनी प्रकाशित केली[७] आणि बहुधा त्याच वेळेला 'शातवाहनपर्वा'पैकी 'महाराष्ट्र व मौर्यसत्ता' हे प्रकरणही वाचकांच्या हाती दिले. पण त्यांच्या या इतिहाससंशोधनाचे स्वागत प्रथितयश इतिहासतज्ज्ञांनी प्रायः उपेक्षेने किंवा तुच्छतेनेच केले. प्रा. अ. स. अळतेकर या विख्यात पंडिताने आपल्या लोकशिक्षणामधील परीक्षणात त्यांच्यावर चांगला ताशेरा झाडला. त्यांच्या लिखाणात परस्परविरोध आहे, त्यात संदर्भांचा अपुरेपणा किंवा अभाव आहे, विवेचन नि पुरावे यांची टाळाटाळ केली आहे, अथवा त्यांचा अस्थानी हवाला दिला आहे, "सामान्यतः मौर्यांसंबंधी व विशेषतः अशोकासंबंधी जी विधाने केलेली आहेत त्यांपैकी बहुतेक विपर्यस्त व अग्राह्य आहेत", लिपिशास्त्रविषयक सिद्धांत नवीन पण निराधार आहेत, इत्यादी प्रकारची टीका प्रा. अळतेकरांनी पुराव्याचे माप पदरात घालून केली. प्रा. अळतेकरांनी त्यांचे काही सिद्धांत खोडूनही काढले. त्यांनी जो सामाजिक व

१. 'प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास', विद्यासेवक, जुलै १९२९.
२. सप्टेंबर १९२८ ते जानेवारी १९२९.
३. जुलै १९२९.
४. 'प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास', विद्यासेवक, जुलै १९२९; 'माझी गेली आठ वर्षे', प्रतिभा, जुलै १९३७, (उद्धृत).
५. 'महाराष्ट्र सारस्वत', नोव्हेंबर-डिसेंबर १९३३, जानेवारी-फेब्रुवारी १९३४.
६. 'प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास', विद्यासेवक, जुलै १९२९.
७. 'माझी गेली आठ वर्षे', प्रतिभा, जुलै १९३७, (उद्धृत)

सांस्कृतिक इतिहास दिला होता तो तेवढा वाचनीय आहे, असे प्रा. अळतेकरांचे मत पडले.[१] परंतू प्रा. अळतेकरांची अशी विदारक नि विधायक टीका झाली तरी तिचा कोणताही परिणाम केतकरांवर झाला नाही. प्रा. मिराशींची टीका होऊनही 'कालिदास व विदर्भ' यासंबंधीचे आपले लेखन त्यांनी जसे 'प्राचीन महाराष्ट्र'त समाविष्ट केले तसेच 'महाराष्ट्र व मौर्यसत्ता' हे प्रकरण प्रा. अळतेकरांची टीका होऊनही त्यांनी 'प्राचीन महाराष्ट्र'त समाविष्ट केले.

प्रा. अळतेकरांच्या टीकेचा परिणाम केतकरांवर झाला नाही; पण स्वतःशीच त्यांचे जे अखंड चिंतन चालू होते त्यामुळे 'आदिपर्वा'तील आठ प्रकरणे आपणाला बदलावी लागणार, असे त्यांना वाटू लागले. त्यांच्या डोक्यात असा विचार आला, की 'कुरु-युद्धापूर्वी महाराष्ट्रात जो इतिहास घडला त्याचा संबंध असुरांशी आहे. तेव्हा त्या इतिहासासाठी असुर-वाङ्मयाचा चांगल्या तऱ्हेने अभ्यास केला पाहिजे. तो अभ्यास केला तर आज आपण जे लिखाण केले ते बाद ठरेल.' तेव्हा आदिपर्वाची आठ प्रकरणे जरी त्यांनी प्रसिद्ध केली होती तरी त्यांचा प्रसार त्यांनी एकदम थांबवला![२] पुस्तकाच्या लेखनात नि प्रकाशनात त्यांचे काही शेकडा रुपये खर्च झालेले असणार; पण ज्ञानाच्या नि विचाराच्या शुद्धतेसाठी त्या रुपयांवर पाणी सोडण्यास ते तयार झाले! १९३१च्या सुमारास त्यांची आर्थिक स्थिती फार हलाखीची झालेली होती. पण हलाखीच्या आर्थिक परिस्थितीतही पैशापेक्षा त्यांना ज्ञानोपासनेचे महत्व जास्त वाटत होते.

१९३५ साली 'प्राचीन महाराष्ट्रा'च्या मोठ्या ग्रंथसंभारापैकी 'शातवाहनपर्वा'चा पहिला भाग त्यांनी प्रसिद्ध केला आणि पाचशे पृष्ठांचा तो ग्रंथ बघितल्यावर, ते ज्ञान-कोशानंतर सहासात वर्षे कोणत्या प्रकारच्या संशोधनात गढले होते, याची महाराष्ट्राला कल्पना आली. शातवाहनपर्वाच्या या विभागात महाराष्ट्राचा शकपूर्व इतिहास नि आनु-षंगिक भारतीय व जागतिक इतिहास यामधील शेसवाशे विविध विषयांवर त्यांनी लिहिले आहे आणि अनेक अभिनव सिद्धांत संशोधनाच्या जगात उधळून दिले आहेत. या विभागात त्यांनी असे मानले, की खिस्तपूर्व तिसऱ्या सहस्रकात महाराष्ट्रामध्ये वसाहती झाल्या आणि त्या माने, बेडर, कोळी, भोई, महार, व रट्ठ वगैरे लोकांनी केल्या. महाराष्ट्र या नावाचा संबंध त्यांनी महार व रट्ठ या दोन जातींच्या नावांशी लावला. कुरुयुद्धाच्या वेळी, म्हणजे साधारणतः खिस्तपूर्व १५०० या सुमारास, महाराष्ट्रामध्ये अश्मक, क्रथ, कैशिक, अपरांत, कुंतल इत्यादी अनेक राज्ये प्रस्थापित झाली होती, असे महाभारतादी ग्रंथांवरून ठरवून, त्यांनी काही अश्मक राजांचा शोध कथासरित्सागर या ग्रंथावरून काढला. वररुची हा व्याकरणकार बुद्धापूर्वीच होऊन गेला, असा पक्ष त्यांनी घेतला व ज्या अर्थी वररुची महाराष्ट्री भाषेचा उल्लेख प्रामुख्याने करतो त्या अर्थी खिस्तपूर्व

१. लोकशिक्षण, सप्टेंबर १९३१.
२. 'माझी गेली आठ वर्षे', प्रतिभा, जुलै १९३७, (उद्धृत).

हजार वर्षे महाराष्ट्राची भाषा व संस्कृती यांना वैशिष्ट्य आले होते, अशी मांडणी केली. इतर संशोधक कथासरित्सागरातील उदयनाला बुद्धानंतरचा समजत होते; पण त्यांनी उदयनाला बुद्धापूर्वी अर्डीचशे वर्षे मागे नेले आणि त्याने दक्षिणापथावर कशी स्वारी केली, तीमधून फक्त महाराष्ट्राला कसे वगळले वगैरे हकीगत सांगितली. कुरुयुद्ध व बुद्ध यांच्या दरम्यानच्या काळात महाराष्ट्राने काही दिग्विजय केले आणि महाराष्ट्रावरही काही आक्रमणे झाली; असे सांगून त्यांनी महाराष्ट्रावरील चार मोठ्या आक्रमणांची माहिती प्रथमच उजेडात आणण्याचा प्रयत्न केला. कुरुयुद्ध व बुद्ध यांच्या मध्यंतरी कैकेयांचा ऊर्फ इराणी लोकांचा हिंदुस्थानाशी कसा संबंध आला, इराणी लोकांच्या पैशाची भाषेचे वर्चस्व कसे उत्पन्न झाले, 'मग' नामक इराणी उपाध्यायांना महत्व येऊन पुढे शाकद्वीपी ब्राम्हण म्हणून भारतीय समाजात ते कसे मिसळले, इराणच्या वरचढपणाला उदयनाने कसा धक्का दिला वगैरे प्रकरणांवर त्यांनी स्वमतानुसार पुष्कळ प्रकाश टाकला. बुद्धाच्या आधीच्या काळात महाराष्ट्राशी असुरांचा नि शकांचाही संबंध आला होता, अशी कल्पना त्यांनी पुढे आणली. सांस्कृतिक व वाङ्मयीन इतिहासावर तर त्यांनी पुष्कळच विस्तार केला. रामायण व पुराणे यांची घटना, कथासरित्सागराची रचना व त्यातील कथा यांचा काल, सूतवर्ग व संस्कृत पंडित यांचे संबंध, ब्राम्हणांनी केलेला समाजविस्तार इत्यादी विषय त्या सांस्कृतिक व वाङ्मयीन इतिहासात येऊन जातात. महाराष्ट्रात अश्मक राजांचे अस्तित्व कुरुयुद्धापासून बुद्धापर्यंत व बुद्धापासून मौर्यापर्यंत नि वाकाटकांपर्यंत सुमारे दोन हजार वर्षे होते, असे मत त्यांनी व्यक्त केले आणि अश्मकांकडून महाराष्ट्राची सत्ता शातवाहनांकडे खिस्तपूर्व ३५०च्या सुमारास आली असावी, असा इतिहास दिला. शातवाहनांसंबंधी लिहिताना त्यांनी मुख्यतः अशोकाचे गिरनार व सोपारा येथील शिलालेख, कालिदासाचे 'मालविकाग्निमित्र' हे नाटक आणि खारवेलाचा हाथिगुंफा येथील शिलालेख यांचा वेगळा अर्थ केला व शातवाहनांच्या इतिहासात काही नव्या कल्पना आणल्या. 'शातवाहनपर्वा'च्या पहिल्या विभागात याप्रमाणे अमाप विषय व अमाप नवे सिद्धांत आले आहेत आणि त्यांचे एक महान अरण्यच जसे काही माजले आहे! या अरण्याचा पसारा नि गुंतागुंत बघून सामान्य वाचक आश्चर्यचकित तर होतोच, पण त्या अरण्याचा सुसंगत अर्थ लावता लावता त्याच्या बुद्धीला वाभाडेही जातात!

मात्र विषयांचा पसारा नि नव्या कल्पनांचे वैपुल्य शातवाहनपर्वात कितीही असले तरी विवेकी नि चोखंदळ इतिहासकाराला त्यामधील सिद्धांत पटणे फार कठीण जाईल. उपलब्ध पुराव्यांचा एकांगी अर्थ लावावा, एका कच्च्या पुराव्यावर दुसऱ्या कच्च्या पुराव्याची वीट रचून इतिहासाची इमारत उभवावी, प्रस्थापित सिद्धांतांकडे दुर्लक्ष करावे, पुराव्याची मोहरी सापडली की कल्पनेने तिचा मेरू बनवावा, असा प्रकार शातवाहनपर्वात पदोपदी झाला आहे. शातवाहनपर्वाच्या लेखनाच्या वेळी केतकरांची विचारपद्धती कशी होती ते कळण्यासाठी ह्या प्रकाराची एकदोन मासलेवाईक उदाहरणे बघण्याजोगी

आहेत. महाराष्ट्राचा वसाहतकाल खि. पू. तिसऱ्या सहस्रकात नेताना ते पहिला आधार वररुचीचा घेतात. वररुचीच्या प्राकृतप्रकाश या ग्रंथात बौद्धांचे उल्लेख मुळीच नाहीत आणि पाली व अर्धमागधी या भाषांचा विचार केलेला नाही. तेव्हा, वररुची बुद्धापूर्वी होऊन गेला असला पाहिजे, असे अनुमान त्यांनी काढले आहे; व ज्या अर्थी वररुची प्राकृतप्रकाशात 'महाराष्ट्री' भाषेचा प्रामुख्याने उल्लेख करतो त्या अर्थी त्याच्यापूर्वी महाराष्ट्रातील भाषा व संस्कृती यांना वैशिष्ट्य आले असले पाहिजे, अशा निष्कर्षाला ते आले आहेत.[1] पण पाली व अर्धमागधी या भाषांना अशोकानंतर ग्रंथभाषा म्हणून महत्व आले होते; त्यामुळे त्या भाषांचा वररुचीने उल्लेख केला नसेल तर तो अशोका-आधीचा ठरेल, बुद्धाआधीचा कसा ठरेल? शिवाय, वररुचीला बुद्धानंतरचा ठरविणारा मोठा पुरावा राजशेखराने दिला आहे. बुद्धकाली जे पाटलीपुत्र शहर वसले, त्या पाटलीपुत्र शहरात वररुचीने परीक्षा दिली, असे राजशेखर सांगतो. म्हणजे वररुची निश्चितपणे बुद्धानंतरचा ठरतो. इतिहासकारांचे सर्वसामान्य मत असेच आहे. पण त्या गोष्टीकडे केतकर दुर्लक्ष करतात. अर्थात वररुचीला प्रथम बुद्धापूर्वीचा ठरवून मग त्यावरून महाराष्ट्रातील भाषा व संस्कृती यांना अधिक पूर्वकालात नेण्याचा त्यांचा प्रयत्न कसा मान्य होणार? वररुचीनंतर त्यांनी महाभारताचा आधार घेतला आहे व असे म्हटले आहे, की महाभारतात कुंतल, क्रथ, कैशिक, अपरांत (कोंकण), विदर्भ, अश्मक वगैरेंचे उल्लेख येतात, म्हणून महाभारत रचले गेले तेव्हा कुंतल वगैरे राज्ये नि अश्मक वगैरे राजे महाराष्ट्रात असले पाहिजेत. महाभारताची रचना आणि कुरुयुद्ध यांत फारसे अंतर नसावे. त्यामुळे महाभारताच्या वेळची ही राज्ये नि हे राजे यांचे अस्तित्व कुरुयुद्धाच्या वेळीही महाराष्ट्रात असले पाहिजे.[2] पण महाभारत व कुरुयुद्ध यांमध्ये कित्येक शतकांचे अंतर असावे, असे अनेक इतिहासकार मानतात; तेव्हा महाभारतातले उल्लेख कुरुयुद्धापर्यंत मागे नेण्याचा त्यांचा उद्योग प्रस्थापित इतिहासात कसा जमा होऊ शकेल? महाराष्ट्राचा इतिहास कुरुयुद्धाच्याही मागे नेण्यासाठी त्यांनी ऋग्वेदातील अगस्त्यसूक्तांचा आधार घेतला आहे. त्यांचे मत असे, की अगस्त्याची सूक्ते वऱ्हाडात रचली गेली आणि त्या सूक्तांत उल्लेखिलेले मान्य म्हणजे माने होत. अगस्त्य हा सुदासाचा समकालीन होता व सुदास कुरुयुद्धापूर्वी सुमारे सहाशे वर्षे होऊन गेला. तेव्हा महाराष्ट्रातील अगस्त्याचे अस्तित्व कुरुयुद्धापूर्वी सहाशे वर्षे म्हणजे खिस्तपूर्व १५०० + ६०० = २१०० वर्षे जाते आणि माने वगैरे जातींच्या वसाहती त्याच्याही आधी जातात.[3] पण सर्व इतिहास-कारांच्या मते ऋग्वेदातील सर्व उल्लेख पंजाबच्या आसपासचे आहेत; तेव्हा केतकर अगस्त्य-सूक्ते वऱ्हाडात कशी आणतात ते समजत नाही. त्या सूक्तांतील मान्य म्हणजे माने होत, ही त्यांची एक कल्पनाच आहे; आणि माने महाराष्ट्रात असल्यामुळे मान्यांचा उल्लेख

१. विभागपरिचय, पृष्ठ ३; प्रस्तावना, पृष्ठे ११, ४५, ४६; ग्रंथ, पृष्ठे ३१३, ३१४, ३२२.
२. प्रस्तावना, पृष्ठे ५, ४३; ग्रंथ, पृष्ठे ७३, ७४, १४९.
३. प्रस्तावना, पृष्ठ १४; आदिपर्व, पृष्ठे ७५, ७६; शातवाहनपर्व, पृष्ठ २३८.

करणारी अगस्त्यसूक्ते महाराष्ट्रामधली होत, असे ते म्हणत असतील तर ते फारच अग्राह्य ठरेल. कारण, मान्य व माने यांचा संबंध असला तरी अगस्त्यसूक्तांच्या पंजाब-मधील लेखनानंतर मान्य दक्षिणेत आले असतील व माने झाले असतील, ही शक्यता नाकारण्यासारखी नाही. तेव्हा, अगस्त्यसूक्तांच्या बळावर महाराष्ट्राचा वसाहतकाल खि. पू. एकवीसशेच्या मागे नेण्याचा त्यांचा प्रयत्न यशस्वी झाला असे कसे म्हणता येईल ? खि. पू. एकवीसशेच्याही पाठीमागे महाराष्ट्राचा वसाहतकाल नेण्यासाठी त्यांनी रामायणाचा आधार घेतला आहे. रामायणात असा कथाभाग येतो, की दंडक राष्ट्रावर (म्हणजे महाराष्ट्रावर) राज्य करणाऱ्या दंड व श्वेत या प्राचीन राजांच्या गोष्टी अगस्त्य रामाला सांगतो. तेव्हा, त्यांच्या मते, महाराष्ट्राचा वसाहतकाल रामाच्याही पाठीमागे असला पाहिजे. पुराणांतील वंशावल्यांप्रमाणे राम सुदासापूर्वी कित्येक पिढ्या होऊन गेला. अर्थात खि. पू. एकवीसशेच्यापूर्वी कित्येक पिढ्या राम आणि रामापूर्वी काही शतके महाराष्ट्राची वसाहत, हे ओघाने आले.[१] पण पुराणांतील वंशावल्यांवर विश्वास ठेवून रामाला सुदासाआधीचा ठरवण्यास अनेक इतिहासकार तयार नाहीत, तेव्हा केतकरांचा हा युक्तिवाद प्रस्थापित कसा होणार ? बरे, राम सुदासाआधीचा ठरला तरी रामायणात आलेली कथा व तीमधील राजे रामापूर्वीचे कसे ठरणार ? रामानंतर रामायणाची रचना झाली व ती रचना दीर्घकाल होत होत बुद्धानंतरही चालू असावी. त्यामुळे रामानंतरच्या अनेक कथा व राजे रामायणात गोवले जावे नि रामाशी संबद्ध व्हावे, हे स्वाभाविक होते. तेव्हा राम सुदासाआधीचा ठरला तरी दंड व श्वेत हे रामाच्या पूर्वीचे नक्की कसे ठरणार नि त्यामुळे महाराष्ट्राचा वसाहतकाल खि. पू. तिसऱ्या सहस्रकात कसा जाणार ? शातवाहनपर्वात केतकरांनी कोणत्या प्रकारची विचारपद्धती स्वीकारली होती, याचे हे एक उदाहरण झाले.

दुसरे कथासरित्सागराचे उदाहरण सांगितले, की त्यांच्या विचारपद्धतीची पुरी ओळख पटू शकेल. 'कथासरित्सागर हा इतिहासदायक ग्रंथ आहे व तो मुख्यतः बुद्धपूर्व कालातील इतिहासासाठी उपयुक्त आहे'[२] अशी भूमिका शातवाहनपर्वात ते घेतात व कथासरित्सागरावरून पुष्कळशा इतिहासाची उभारणी करतात. पण कथासरित्सागराकडे मुख्यतः 'इतिहासदायक' ग्रंथ म्हणून आजवर कोणाही इतिहासकाराने पाहिले नव्हते आणि केतकरांचे लेखन ध्यानात घेतल्यानंतरही तो मुख्यतः इतिहासदायक ग्रंथ आहे, हे पटत नाही. त्या ग्रंथात वेताळपंचविशी, पंचतंत्र इत्यादींचा अंतर्भाव होतो आणि त्यातील कथांत अवास्तवता, अद्‌भुतता, कृत्रिमता इतकी आहे की त्याची रचना मुख्यतः मनोरंजनासाठीच झाली असावी, हे स्पष्ट दिसते. रामायण-महाभारत किंवा पुराणे या ग्रंथांत इतिहास आहे, हे जसे परंपरेने मान्य आहे, तशीही कथासरित्सागराची गोष्ट नाही. तेव्हा कथासरित्सागरात मुख्यतः इतिहास ग्रथित झाला आहे, ही त्यांची

१. पृष्ठे १६५ ते १६७, २३८; शिवाय, ज्ञानकोश, विभाग ३, पृष्ठे ११६, ११७ पाहा.
२. प्रस्तावना, पृष्ठे १०, ४६; ग्रंथ, पृष्ठे ११७, १२५, १३२.

भूमिका इतिहासकारांना मान्य होण्याची जवळजवळ मुळीच शक्यता नाही. बरे, त्या ग्रंथातील कथांमधून इतिहास काढायचा म्हटले, तरी तो ग्रंथ 'मुख्यतः बुद्धपूर्व' आहे, हा त्यांच्या भूमिकेतील दुसरा भागही कोणाला पटण्यासारखा नाही. कथासरित्सागरात बुद्धकाली वसलेल्या पाटलीपुत्र नगराचे, दीनार या नाण्याचे आणि इतर असे भरपूर उल्लेख येतात, की ज्या उल्लेखांवरून त्या ग्रंथाची रचना बुद्धानंतर झाली, हे स्पष्ट होते. बुल्हर, लेव्ही, व्हिन्सेंट स्मिथ, वेबर, स्पेयर वगैरे सर्व इतिहासकार तो ग्रंथ बुद्धानंतरचाच मानतात. खुद्द केतकरही बुद्धकालीन व बुद्धोत्तर उल्लेख त्यात असल्याचे अनेकवार कबूल करतात.[1] तेव्हा, तो ग्रंथ 'मुख्यतः बुद्धपूर्व' आहे, हे कसे सिद्ध व्हावे? जेवढ्या ठिकाणी बुद्धकालीन व बुद्धोत्तर उल्लेख स्पष्टपणे आले असतील तेवढी ठिकाणे बुद्धकालीन व बुद्धोत्तर होत, बाकी सर्व ग्रंथ बुद्धपूर्व होय, ही त्यांची भूमिका आग्रही-पणाची नि आठमुठी वाटते. कथासरित्सागराला याप्रमाणे इतिहासग्रंथ ठरवून नि तो बुद्धपूर्व आहे असे मानून, मग त्यातून त्यांनी जो इतिहास काढला आहे त्याबद्दल आता वेगळे विवेचन कशाला हवे? मनोरंजक नि कल्पित कथांवर उभारलेला तो एक अधिकच मनोरंजक नि कल्पित असा प्रचंड डोलारा वाटतो!

शातवाहनपर्वातील विचारपद्धती याप्रमाणे भ्रांत, एकांगी आणि कल्पनाप्रचुर तर आहेच, पण तीमध्येसुव्यवस्थितपणा, सलगपणा नि संगतीही पुरेशा प्रमाणात नाही. विषयांच्या अवाढव्य पसाऱ्यात अनेक कल्पना ग्राह्य धरल्या आहेत, पण त्यांचा परस्परसंबंध स्पष्ट केलेला नाही. कालाच्या व स्थलाच्या पटावर वेगवेगळ्या घटना कोठे कशा बसतात त्याची स्थूल कोष्टके दिली आहेत; पण विवेचनाच्या वेळीं त्यांत गोंधळ केलेला आहे. अनेक ठिकाणी केतकर विधाने करतात, पण त्यांना कारणे देत नाहीत. त्यामुळे ती विधाने म्हणजे नुसत्या कल्पना आहेत, की त्या विधानांसाठी इतर इतिहासकारांनी दिलेली कारणे त्यांना मान्य आहेत, की त्या विधानांमागे त्यांची स्वतःची काही कारणपरंपरा आहे, ते कळत नाही. विशेषतः, स्वतःची म्हणून परस्परविसंगत मते जेव्हा ते मांडतात तेव्हा तर फारच घोटाळा उडतो. त्यांच्या विसंगत मतांचे काही नमुने बघितले तर या साऱ्या जंजाळाची थोडी कल्पना येऊ शकेल. उदाहरणार्थ, वररुचीचा काल निश्चित करणे ही बाब शातवाहनपर्वात फार महत्वाची होती. पण वररुची बुद्धापूर्वी होऊन गेला, असे मत त्यांनी जास्त वेळा नि प्रामुख्याने मांडले असले तरी त्या मताशी विसंगत अशी विधाने जागजागी त्यांनी केली आहेत. एके ठिकाणी ते उदयनाला बुद्धपूर्व दोन-अडीचशे वर्षे समजतात व वररुचीला उदयनानंतर चारपाचशे वर्षे मानतात; म्हणजे तेथे वररुचीचा काल त्यांनी बुद्धोत्तर धरला आहे व त्याला खि. पू. चारशे ते पाचशेच्या दरम्यान आणून सोडला आहे. दुसऱ्या ठिकाणी, ते वररुचीला नंदकालीन म्हणतात; म्हणजे तेथे त्याचा काल बुद्धोत्तर धरून शिवाय त्याला खि. पू. ४१३ ते ३२२ या अलीकडील कालखंडात ते ओढीत आहेत!—आणि तिसऱ्या ठिकाणी, ते वररुचीला

१. पृष्ठ १२५ इत्यादी.

मौर्यकालीन समजतात; म्हणजे तेथे त्याचा काल बुद्धोत्तर धरून, वर त्याला खि. पू. ३२२ ते २९८ या अगदी अलीकडच्या कालखंडात त्यांनी खेचले आहे![1] वररुचीच्या कालबद्दल ही जशी विसंगत मते ते मांडतात तशीच कात्यायनाच्या कालबद्दलही ते मांडतात. कात्यायन पाणिनीच्या कालापासून फारसा अलीकडचा नसेल, असे म्हणून एके ठिकाणी त्यांनी कात्यायनाला प्राचीन कालात लोटले आहे; तर शिकंदराच्या विजयामुळे यवनलिपीचा विचार कात्यायनाला करावा लागला असेल, असे म्हणून दुसऱ्या ठिकाणी त्यांनी त्याला आधुनिक काळात आणले आहे![2] महाराष्ट्राचा नि अश्मक राजांचा इतिहास देण्यासाठी त्यांनी कथासरित्सागराचा उपयोग करण्याचा प्रचंड प्रयत्न केला, कथासरित्सागरावरून नृसिंहादी अनेक अश्मक राजांचा शोधही त्यांनी स्वमताप्रमाणे घेतला; पण पुन्हा एके ठिकाणी त्यांनी असेही म्हटले, की 'कथा-सरित्सागरात अश्मक राजांचा उल्लेख येत नाही, याचे आश्चर्य वाटते'![3] सदोष विचारसरणी आणि आशयाचे असले हे सैल नि परस्परविसंगत जंजाळ यांमुळे शातवाहनपर्वाचे अंतरंग फार आक्षेपार्ह झाले आहे, यात संशय नाही.

—आणि शातवाहनपर्वाचे बहिरंग त्याच्या अंतरंगाला साजून दिसेल असेच आहे. या लांबरुंद ग्रंथात विषयविवेचनाची कोणतीही शिस्त केतकरांनी पाळलेली नाही. एकच विषय त्यांनी अनेक प्रकरणांत नि दूरदूरच्या प्रकरणांत फोडून टाकला आहे आणि जो विषय आधी यावयास हवा तो नंतर, नि नंतर यावयास हवा तो आधी, घातला आहे. प्रस्तुत काय नि अप्रस्तुत काय, मुख्य काय नि गौण काय, हे त्यांनी बघितलेले नाही. महाराष्ट्राचा इतिहास हा विषय प्रस्तुत असता त्या इतिहासाला अप्रस्तुत असे अनेक विषय त्यांनी ग्रंथात आणले आहेत आणि गौण विषयांवर सविस्तर विवेचने केली आहेत. ग्रंथात अनावश्यक गोष्टींची भरती करून ज्ञानसंग्रहाच्या गुणाला त्यांनी दडपेगिरीचे रूप दिले आहे. या दडपेगिरीमुळे अनेक शिलालेख, त्यांची भाषांतरे, निरनिराळ्या प्रकारच्या याद्या, ठिकठिकाणचे उतारे नि अनुवाद यांची थोड्याफार वशिल्यावर ग्रंथात भरपूर गर्दी उसळली आहे. अशा शास्त्रीय ग्रंथाला सूची असणे अत्यंत जरुरीचे होते. स्वतः केतकरांनी अमेरिकेत असताना इतिहासाचार्य राजवाड्यांना थोडी आर्थिक मदत पाठवण्यात पुढाकार घेतला होता व राजवाड्यांनी आपल्या ग्रंथांना सूची जोडावी ही त्या मदतीला अट घातली होती. पण शातवाहनपर्वाला कसलीही सूची त्यांनी जोडली नाही! सूचीखेरीज या ग्रंथाचे परिशीलन करणे हे वाटाड्याखेरीज सहाऱ्याच्या प्रवासाला निघण्यासारखे ठरते. ग्रंथाची प्रकरणे पाडून त्यांनी प्रकरणांची कांडे पाडली आहेत, कांडांना मथळे दिले आहेत; पण ते सारे मृगजळ आहे. कारण मथळ्याला अनुरूप असा मजकूर न चुकता मथळ्याखाली घालावा, असे बंधन ते पाळीत नाहीत.

१. अनुक्रमे पृष्ठे १३२, ६३ व २३, १२५.

२ पृष्ठे ४४६, ४४७, २६२.

३. पृष्ठ ७४.

अंतर्गत संदर्भ तर 'पुढे असुक आहे', 'मागे तमुक आहे' असे पघळपणे त्यांनी दिले आहेत आणि बाहेरचे आधारही काही ठिकाणी ऐसपैस सांगितले आहेत, तर काही ठिकाणी अजिबात टाळले आहेत. मजकुराचे हे अस्ताव्यस्त बहिरंग सजवण्यासाठी म्हणून की काय, त्यांनी सारा ग्रंथ मोहरेदार पांढऱ्या कागदावर छापला व त्यात भरपूर चित्रे घातली. पण विशिष्ट चित्र विशिष्ट ठिकाणी कां घातले आहे, हे वाचकांना सर्वत्र उमगत नाही आणि ते त्यांना स्वतःलाही उमगत नसावे, असे वाटते. कारण एका ठिकाणी, बहुधा आयता ठसा मिळाला म्हणून त्यांनी एक आकृती दडपून दिली आहे, पण ती कशाची आहे हे न कळल्यामुळे तीखाली अशी मार्मिक मखलाशी केली आहे, की ही "ऐतिहासिक स्पष्टीकरण मागणारी आकृती" आहे![1] शातवाहनपर्वाच्या मलपृष्ठावरची चित्रे म्हणजे प्रसिद्ध चित्रकार श्री. नी. म. केळकर यांनी त्यांच्याकडे नमुन्यासाठी दिलेली कच्ची रेखाटने होत. कच्ची रेखाटने नि पूर्ण केलेली चित्रे यांतल्या फरकाकडे दुर्लक्ष करून त्या रेखाटनांचेच त्यांनी ठसे करून घेतले व ती छापून काढली![2] त्यांच्यातील अव्यवस्थितपणा, अस्ताव्यस्तपणा नि दडपेगिरी हे गुण त्यांच्या बहुतेक ग्रंथांत थोड्याफार प्रमाणात नेहमीच आढळतात; पण त्या गुणांनी शातवाहनपर्वात अगदी हैदोस घातला आहे.

शातवाहनपर्वाच्या अंतरंगात नि बहिरंगात असे अनेक दोष शिरले, ही त्यांच्या बुद्धीच्या काही अंगांना क्षीणता येऊ लागली होती, याची खूण आहे. शेवटच्या आठनऊ वर्षांत त्यांनी अवाढव्य वाङ्मय निर्माण केले, यावरून त्यांच्या बुद्धीची पुष्कळ काम करण्याची कुवत टिकून होती, हे उघड आहे. या वाङ्मयात त्यांनी अपरंपार नव्या कल्पना अन् विचार यांचा खच्च पाडला, यावरून त्यांच्या बुद्धीचे नवनिर्मितीचे सामर्थ्य शाबूत होते, हेही स्पष्ट आहे. पण शेवटच्या काळात त्यांच्या बुद्धीतील शिस्त नि बंदिस्तपणा यांना ओहोटी लागली होती. एखाद्या अवघड प्रश्नाची निर्णायक सोडवणूक करण्यासाठी बुद्धी दीर्घकाल केंद्रीभूत करून जे कष्ट घ्यावे लागतात, ते त्यांच्याच्याने होईनासे झाले होते. त्यांच्या बुद्धीने विषयांचे अमर्याद क्षेत्र ग्रहण केले होते आणि नव्या कल्पना, नव्या उपपत्ती, नवे सिद्धान्त यांचे रानच्या रान उभवले होते. पण तो सर्व बोजा सुसूत्रपणे नि तारतम्याने कह्यात ठेवणे त्यांना कठीण पडू लागले होते. विस्तार व्यवस्थेला मारक होत होता आणि परिभ्रमण एकनिष्ठेच्या आड येत होते. जेवढ्या विचारांचे पालनपोषण करता येईल त्यापेक्षा अधिक विचारांची प्रजा जन्म घेत होती. त्यामुळे इतिहासकाराला ज्या मानसिक प्रक्रिया निक्षून पार पाडाव्या लागतात त्या शातवाहन-पर्वामध्ये ते पार पाडू शकले नाहीत. जे जे सुचले नि स्फुरले त्याचे काहीतरी अर्धेकच्चे समर्थन करून ते मांडून टाकावे, असा क्रम त्यांनी स्वीकारला. त्यावर एकाग्र चिंतन करावे, त्यात ग्राह्याग्राह्य ठरवावे, जे ग्राह्य ठरेल त्यात गौणप्राधान्य शोधावे, अग्राह्य असेल

१. पृष्ठ ७२.
२. तोंडी आठवणी, नी. म. केळकर.

ते कठोरपणे फेकून द्यावे, असे त्यांनी केले नाही. आपणाला सुचणारी प्रत्येक उपपत्ती केवळ नवीन आहे म्हणून तिचे आकर्षण त्यांना पडले आणि ती निर्णायक सिद्धांता-प्रमाणे त्यांनी मांडून टाकली. सर्व उपलब्ध पुराव्यांच्या कसोट्यांवर नि युक्तिवादांच्या निकषांवर ती उतरते किंवा नाही, हे त्यांनी बघितले नाही; आणि स्वतःच्या युक्ति-वादातील दुबळे दुवे दुर्लक्षून त्या युक्तिवादाच्या मोहक जाळ्यात ते अडकून पडले. नव-निर्मितीची तर त्यांना इतकी घाई झाली नि विवेचनविस्तार त्यांनी एवढा लांबरुंद केला, की आपण आधी काय म्हटले नि नंतर काय म्हटले यांतील विसंगती त्यांना जाणवेनाशी झाली. तारतम्याची नि प्रमाणबद्धतेची उणीव त्यांच्या सर्व जीवनावर आपल्या अगदी पातळ नि पुसट छटांचा शिडकावा हळुवारपणे सदैव टाकीत होती. त्यांच्या विक्षिप्त वागणुकीचे एक मूळ त्या उणिवेतच होते. पण ती उणीव शेवटच्या काळात वाढत गेल्याने प्रबल युक्तिवाद नि शबल युक्तिवाद यांतील तारतम्याकडे तर ते डोळेझाक करू लागलेच, पण त्यांच्या ग्रंथाच्या बहिरंगातही फापटपसारा नि भोंगळपणा शिरला. थोडक्यात म्हणजे, ज्या बुद्धीची काही अंगे असामान्य अन् अप्रतिम आहेत पण काही अंगे शिणलेली नि जर्जर आहेत अशा बुद्धीच्या मुशीत शातवाहनपर्व तयार झाले आणि त्यामुळे त्याला जे गुणदोषात्मक संमिश्र स्वरूप आले ते आले. गामासारख्या त्रिखंडकीर्ती मल्लाने आपल्या उतरत्या काळात वेडीबागडी घेतलेली ती एक पराभवाची झुंज आहे.

केतकरांच्या बुद्धीला अखेरीअखेरीस जी विशिष्ट क्षीणता आलेली होती ती त्यांच्या कादंबऱ्यांत मात्र उघड झाली नाही. कारण त्यांच्या बुद्धीची जी अंगे मंदावली होती त्या अंगांच्या कार्याची अपेक्षा कादंबऱ्यांमध्ये स्वभावतःच फारशी नव्हती. कादंबऱ्यांत निर्णायक सिद्धांत सर्वांगीण युक्तिवादासह मांडले जावेत, अशी अपेक्षा नसते. तेव्हा तसे सिद्धांत मांडण्याचा त्यांचा दुर्बलपणा कादंबऱ्यांत दिसला नाही. त्यांनी ज्या तऱ्हेच्या कादंबऱ्या (किंवा कादंबरीप्रबंध) लिहिले त्यांत फक्त नवविचार हवे होते, त्यांचे थोडेसे बुद्धिरंजक समर्थन हवे होते, आणि त्यातून वाचकांचे विचारप्रवर्तन व्हायला पाहिजे होते. ह्या साऱ्या गोष्टी, त्यांच्या बुद्धीने अफाट विषयांचे जे ग्रहण केलेले होते, तिच्यात नवनिर्मितीचे जे सामर्थ्य शाबूत होते, त्याच्या जोरावर ते करू शकले. अर्थात, कादंबऱ्या त्यांनी यशस्वीपणे लिहाव्या आणि इतिहासकार म्हणून त्यांची कामगिरी निर्दोष होऊ नये, हे साहजिकच होते. आयुष्याच्या अखेरीस शातवाहनपर्वाप्रमाणे त्यांनी जे राजकीय वाङ्मय लिहिले त्या वाङ्मयात मात्र त्यांच्या बौद्धिक क्षीणतेचे परिणाम पानापानावर विखुरलेले आहेत. त्यांनी जे समाजशास्त्रीय किंवा इतर लिखाण केले त्यातदेखील या बौद्धिक क्षीणतेच्या छाया अधूनमधून पडल्या आहेत. त्यांच्या स्वभावात शेवटी जे सूक्ष्म बदल झाले त्यांच्या मुळाशी ही बौद्धिक क्षीणताच होती. या काळात त्यांच्या निकट सहवासात आलेले श्री. लालजी पेंडसे म्हणतात, की 'त्यांच्या बुद्धीतला घट्टपणा अगदी गेला आहे, असे मला तीस-एकतीस सालीच प्रथम वाटले.

तेहेतीस सालानंतर तर सूचना मिळताच विषय ग्रहण करण्याची त्यांची शक्ती कमी झाली. त्यांना मी 'ल्यूनसी'च्या अर्थाने 'मॅड' म्हणू शकणार नाही, पण 'डॉग्मॅटिक' ह्या अर्थाने त्यांना 'मॅड' म्हणणे शक्य आहे.'[1]

आयुष्याच्या अखेरीस केतकरांना बौद्धिक क्षीणता कां आली, हे एक न उकलणारे गूढ आहे. ज्ञानकोशामध्ये जे अतिमानुष श्रम बाराचौदा वर्षे बुद्धीने, भावनेने नि शरीराने त्यांनी केले त्याचा हा परिणाम असेल का? की दारिद्र्यामुळे ज्ञानकोशानंतर त्यांची जी ससेहोलपट झाली तिचा हा परिणाम असेल? की लग्नापासून मधुमेहाने त्यांच्या देहात जे ठाण दिले होते त्याचा हा परिणाम असेल? की या साऱ्यांचा हा संकलित परिणाम असेल? काय असेल ते असो, पण त्यांना बौद्धिक क्षीणता आली ही एक अत्यंत दुर्दैवी नि हृदयाला पीळ पाडणारी घटना होती.

केतकरांचे शातवाहनपर्व पुष्कळच सदोष आहे हे खरे; पण महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वाङ्मयात त्यामुळे वैशिष्ट्यपूर्ण भर पडली यात शंका नाही. एका माणसाच्या आवाक्यात सर्वसामान्यपणे येऊ शकणार नाहीत एवढ्या जागतिक इतिहासातील घटना नि साधन-सामग्री त्यात केतकरांनी आपल्या दृष्टीसमोर ठेवली आणि पूर्वलेखकांच्या मतांची बंधने पार धुडकावून दिली. त्यामुळे त्यातील मते नि कल्पना महाराष्ट्राच्या भावी इतिहासकारांच्या डोक्यात खळबळ उठवतील, गोंधळही माजवतील आणि सूचक व प्रेरक ठरून त्यांना साह्यकारी होतील. नवे सिद्धांत पक्क्या पायावर प्रस्थापित करण्याचे श्रेय केतकरांना फारसे मिळेल, असे वाटत नाही; पण त्यांनी ज्या तऱ्हेची विचारसरणी स्वीकारली त्या तऱ्हेच्या विचारसरणीमुळे जुने स्वतःच्या भूमिकेबद्दल ठिकठिकाणी साशंक होतील, नव्यांना नवी दृष्टी मिळेल आणि इतिहासरचनेचे पाऊल पुढे पडेल.

१९३५ साली शातवाहनपर्वाचा पहिला विभाग प्रसिद्ध झाल्यानंतर त्यावर नियत-कालिकांतून मामुली अभिप्राय आले; आणि प्रथितयश विद्वानांनी प्रायः त्याची उपेक्षा केली किंवा खाजगी रीतीने थट्टाही केली. परंतू मामुली अभिप्राय, उपेक्षा नि थट्टा यांच्याकडे केतकरांनी फारसे लक्ष दिले नाही. आत्मप्रौढीच्या उंच मनोऱ्यात बसून त्यांनी आपले संशोधन पुढे चालविलें आणि मृत्यूपर्यंत शातवाहनपर्वाचा दुसरा व तिसरा विभाग लिहून पुरा केला. 'कायस्थ प्रभूंचा सामाजिक इतिहास' या विषयावर आपण एक ग्रंथ लिहू शकू, असा जो आत्मविश्वास १९२९ साली त्यांना वाटू लागला होता, त्या आत्मविश्वासास अनुसरून तो ग्रंथही त्यांनी मृत्यूपूर्वी हातावेगळा केला. शातवाहन-पर्वाचा दुसरा व तिसरा विभाग आणि कायस्थ प्रभूंवरील हा ग्रंथ यांचे प्रकाशन तेवढे त्यांच्या डोळ्यादेखत होण्याचा योग आला नाही.[2]

१. आठवणी.

२. आठवणी, शीलवती केतकर; 'कायस्थ प्रभूंचा सामाजिक इतिहास' शीलवतीबाईंच्या संग्रहातून आता नष्ट झाला आहे. कोणा संकुचित वृत्तीच्या सुशिक्षित माणसाने तो सफाईने शीलवतीबाईंच्या संग्रहातून पळवून नेला, असे समजते!

प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासाने अखेरच्या काळात त्यांना खूपच गुंतवून नि गुंगवून ठेवले होते. १९२७ साली त्यांची अशी कल्पना होती, की या कामाला सुमारे तीन वर्षांचा अवधी लागेल. पण त्यांच्या कल्पनेच्या चौपट साहित्य त्यांना नंतर दिसू लागले आणि १९२९ साली त्यांनी असा कयास बांधला, की हे काम पुरे होण्यास आणखी तीन वर्षे लागतील. परंतू या कयासाप्रमाणे १९३२ साली काम तर पुरे झाले नाही आणि शातवाहनपर्वाचा नुसता पहिला विभाग प्रसिद्ध होण्यासच १९३५ साल उजाडले. शिवाय आदिपर्वाचे झालेले काम मध्यंतरी बाद करावे लागले. १९३५ साली काम लांबण्याची जी कारणे त्यांनी दिली त्यांत असे म्हटले, की "अभ्यासाच्या मर्यादा दिवसे-दिवस वाढत गेल्या", "अनेक अभ्यासक्षेत्रे सापडू लागली" आणि "जितके ज्ञात आहे व ज्ञेय आहे ते सर्व द्यावयाचे, ग्रंथास मर्यादा ठेवावयाची नाही, असा मनातील विचार आहे." तेव्हा, नऊदहा वर्षे या कामाला त्यांना अपुरी वाटली यात आश्चर्य नव्हते. हिंदुस्थानमधील सर्व 'आर्किऑलॉजिकल सर्कल्स'चे काम लंडनमध्ये एकत्रित पाहावयास मिळेल, तेथे इतर सामग्रीही उपलब्ध होईल, म्हणून लंडनला जाण्याचीदेखील त्यांच्या मनाची उडी होती! पण, मागे सांगितल्याप्रमाणे, ते जमले नाही. संथ पाण्यावरील तरंगवर्तुलाप्रमाणे त्यांचे संशोधनाचे काम असे सारखे वाढत होते.[1] संशोधन व लेखन यांच्या वाढत्या व्यापात एकीकडे ते गुंतले असताना दुसरीकडे प्रकाशन नि विक्री यांच्या कामासाठीही त्यांना पुष्कळ खटपट करावी लागत होती. आदिपर्व, महाराष्ट्र नि मौर्यसत्ता, आणि शातवाहनपर्वाचा पहिला विभाग यांचे प्रकाशन त्यांनी स्वतःच केले आणि मोठ्या उमेदीने शातवाहनपर्वाच्या तीन हजार प्रती छापून घेतल्या. तडाखेबंद काम करण्याच्या आपल्या सवयीस अनुसरून १९३५च्या डिसेंबरपर्यंत त्यांनी शातवाहनपर्वाच्या १२४०-हून अधिक प्रती खपवल्या[2] आणि मृत्यूपर्यंत एकूण दीड ते दोन हजार प्रतींचा उटाव त्यांनी केला असावा!

महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या कामामधून 'प्राचीन महाराष्ट्र'च्या कामाचा जसा उगम झाला तसाच इतर भाषांतील ज्ञानकोशांच्या कामाचाही उगम झाला. महाराष्ट्रीय ज्ञानकोश पुरा होत असताना केतकरांच्या मनात अशी एक आकांक्षा उदय पावली होती, की मराठी ज्ञानकोशाची भाषांतरे करून इतर भारतीय भाषांत ज्ञानकोश रचावे, मराठीतील राष्ट्रविकासाचे ज्ञान इतर प्रांतांना द्यावे आणि राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या कार्याला सार्वत्रिक गती द्यावी! इतर भाषांतील ज्ञानकोश व्यवहारदृष्ट्याही किफायतीचे होतील, अशी त्यांची कल्पना होती. कारण त्या ज्ञानकोशांसाठी नवा ज्ञानसंग्रह करावा लागणार नव्हता, मराठीच्या भाषांतरांवर बरेचसे काम भागणार होते आणि विक्रीची नवी नवी

१. 'महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासाची सविस्तर योजना', विद्यासेवक, डिसेंबर १९२७; 'प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास..', विद्यासेवक, जुलै १९२९; 'माझी गेली आठ वर्षे', प्रतिभा, जुलै १९३७ (उद्धृत).

२. विद्यासेवक, डिसेंबर १९३५ मधील प्राचीन महाराष्ट्राची जाहिरात.

क्षेत्रे मात्र मिळणार होती.[1] तेव्हा ध्येय व व्यवहार ही दोनही साधण्यासाठी महाराष्ट्रीय ज्ञानकोश संपण्याआधीच त्यांनी इतर भाषांतील ज्ञानकोशांना हात घातला होता. १९२८ साली महाराष्ट्रीय ज्ञानकोशातील सहकारी त्यांना सोडून जाईपर्यंत, गुजराथी ज्ञानकोशासाठी प्राथमिक पाहाणीचे नि आखणीचे काम पूर्ण झाले होते, हे यापूर्वी सांगितले आहे. पण ज्ञानकोश-मंडळाच्या चालकांमध्ये व त्यांच्यामध्ये गुजराथी ज्ञानकोशाच्या कामाविषयी तेव्हा एकमत नसल्यामुळे १९२८पर्यंत त्या कामाला विशेष गती आली नव्हती. १३ जून १९२८ रोजी ज्ञानकोश-मंडळाचे त्यांचे काम सुटल्यानंतर मात्र गुजराथी ज्ञानकोशाकडे आणि इतर ज्ञानकोशांकडे त्यांनी विशेष लक्ष पुरविले. अखेरच्या नऊदहा वर्षांत 'प्राचीन महाराष्ट्र'च्या कार्याच्या जोडीला हे कार्य त्यांनी हाती घेतले होते आणि ते तडीला नेण्याची त्यांची धडपड चालू होती. परंतू महाराष्ट्रीय ज्ञानकोश संपल्यापासून ब्रम्हदेवाने त्यांच्या दैवाचे काटे उलटे फिरवण्यास जणू प्रारंभ केला असल्यामुळे ह्या कार्यात त्यांना यश मिळवता आले नाही. ध्येय त्यांना साध्य झाले नाही आणि त्यांचा व्यवहारही भयंकर आतबट्ट्याचा झाला!

केतकरांचे महाराष्ट्रीय ज्ञानकोश-मंडळाचे काम सुटल्यानंतर 'गुजराती ज्ञानकोश कंपनी' निराळी नोंदविण्यात आली व मराठी ज्ञानकोश नि गुजराथी ज्ञानकोश यांच्या हिशेबाची वजावट झाली. रा. दाते यांच्या स्मृतीप्रमाणे गुजराथी ज्ञानकोशाची कंपनी प्रथम केतकरांच्या पूर्ण मालकीची होती, तिच्या 'लेटरहेड्स'वर 'प्रोप्रायटर केतकर' असा उल्लेख असे, पण पुढे ती कंपनी 'प्रायव्हेट लिमिटेड' झाली. या कंपनीने गुजराथी ज्ञानकोशाचे दोनच विभाग प्रसिद्ध केले. पहिला विभाग १९२९ साली प्रसिद्ध झाला आणि दुसरा विभाग १९३५च्या नंतर, १९३७ पर्यंत केव्हातरी प्रसिद्ध झाला. मात्र दोनच विभाग प्रसिद्ध झाले तरी तिसरा भाग बराचसा मुद्रित झाला होता आणि एकूण वीस संकल्पित विभागांपैकी सहाहून अधिक विभागांचे हस्तलिखित तयार होऊन पडले होते. या ज्ञानकोशात भाषांतराचे कामच बरेचसे करावयाचे असल्याने मराठी ज्ञानकोशापेक्षा वेगाने काम व्हावे, हे स्वाभाविक होते. मराठीचे गुजराथी भाषांतर करणारी माणसे बडोद्याला सहज मिळण्याजोगी होती. त्यामुळे भाषांतराचे काम प्रामुख्याने बडोद्यालाच उरकण्यात आले. भाषांतर-खात्याचे 'मुख्य शासक' म्हणून बडोदा-कॉलेजचे प्राध्यापक अतिसुखशंकर कमलाशंकर त्रिवेदी यांचे नाव जाहीर झाले होते आणि केतकरांचे जावई श्री. शंकर विठ्ठल भावे, बी. ए., यांचे नाव भाषांतरखात्याचे व्यवस्थापक म्हणून छापले होते. पण भाषांतराची सर्व खटपट मुख्यतः रा. भावे यांनीच पार पाडली. गुजराथी ज्ञानकोशाचे कार्यालय मुंबईला, ४२ हमाम स्ट्रीट येथे कोटात होते; आणि मुद्रण पुण्याच्या हेमवल्लभ व गणेश छापखान्यांत होत होते. मुंबईलाही जुळणीखाते सुरू करून केतकरांनी मुद्रणयंत्र विकत घेतले होते. पण मुंबईचे मुद्रण प्रकाशात येऊ शकले नाही. लेडी विद्यागौरी व नानालाल कवी यांचे साह्य गुजराथी ज्ञानकोशाला केतकरांनी मिळविले आणि

१. 'ज्ञानकोश-मंडळाचे भवितव्य', विद्यासेवक, सप्टेंबर १९२४.

श्री. कन्हय्यालाल मुनशी, श्री. एस. एस. होडीवाला वगैरे अनेक थोर व्यक्तींची सहानुभूतीही संपादन केली.[१] महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या वेळी धडाडीचे नि चौफेर प्रयत्न करून त्यांनी कार्याला जसा उठाव आणला तसाच उठाव या गुजराथी ज्ञानकोशाला ते आणीत होते. पण अखेर त्यांना पैसा कमी पडला आणि पैशासाठी त्यांच्या साऱ्या उभारीची पुनःपुन्हा खची झाली.

केतकरांना पैशाचा तुटवडा कसा पडला, त्याचे स्पष्टीकरण गुजराथी ज्ञानकोशाचे काही वेळचे चिटणीस श्री. लालजी पेंडसे यांच्या आठवणींमध्ये मिळू शकते. श्री. पेंडसे यांची एक आठवण अशी आहे, की 'गुजराथी ज्ञानकोशाचे केतकरांचे काम पाहून एका अस्मिताधारी, बड्या नि कीर्तिवंत गुजराथी साहित्यिकाच्या पोटात जोराने दुखू लागले आणि त्याने त्या कामात बिब्बा घातला. तो साहित्यिक म. गांधींच्या मर्जीमधला होता, तेव्हा म. गांधींच्या कानाशी लागून व इतर मार्गांनी त्याने वारंवार विघ्ने उत्पन्न करण्यास प्रारंभ केला. या साहित्यिकाच्या उपद्व्यापांना म. गांधींकडूनच लगाम घालावा, म्हणून केतकर एकदा म. गांधींना भेटण्यासाठी साबरमतीच्या आश्रमात गेले; तर त्यांच्याआधीच तो साहित्यिक आश्रमात येऊन तळ देऊन बसला होता! म. गांधींनी केतकरांचे बोलणे फारसे ऐकून न घेता त्यांना सांगितले, की 'गुजराथ्यांचे काम गुजराथी पाहून घेतील. त्यात बाहेरच्यांनी पडू नये. तुम्ही हे काम न केलेले बरे.' म. गांधींची ही जवळजवळ आज्ञाच होती. तिचा प्रसार जेव्हा गुजराथी मंडळीत झाला, तेव्हा मोठमोठ्यांची मने फिरली आणि आगाऊ गोळा होणाऱ्या वर्गण्यांचा किंवा इतर मार्गांनी मिळणाऱ्या पैशांचा ओघ एकदम आटला. म. गांधींनी घेतलेल्या विचित्र भूमिकेमुळे केतकर त्या वेळी बरेच अस्वस्थ झाले होते. 'प्रजामित्र-केसरी' किंवा 'हिंदुस्थान' या पत्रांत त्यांनी काही लेखही लिहिले; पण त्यांचा काही उपयोग झाला नाही.'

श्री. पेंडसे यांची दुसरी आठवण अशी, की 'म. गांधींचा विरोध केतकरांना जसा भोवला तसा त्या वेळचा गुजराथेतील महापूरही त्यांना भोवला. त्या महापुरात बडोद्याची काही हस्तलिखिते नष्ट झाली व त्यांना जबरदस्त फटका बसला.'[२]

पण केतकरांच्या आर्थिक दुःस्थितीला केवळ दुर्दैवच कारण होते असे नाही. त्यांच्या सैल आणि बेबंद कारभारामुळेही त्यांचा पाय खोलात गेला. श्री. पेंडसे यांचे यासंबंधी असे निवेदन आहे, की "हिशेब फारच सैलपणे ठेवले जात... डॉक्टर जो 'पॉकेट मनी'तून खर्च करीत तो ज्ञानकोशावरच पडे. डॉक्टर हाताचे अतिशय सैल नि सढळ होते. गरजू माणसाला ते एकदम पैसे देत; पण कित्येकदा ते त्यांच्या लक्षातही राहात नसे. त्यांनी एक जुनी मोटार घेतली होती. अंदाजे सोळाशे रुपये तिच्यावर खर्च झाले असतील आणि त्याच्या दुप्पट तिच्या दुरुस्तीला लागले असतील. ते पैसे गुजराथी

१. 'माझी गेली आठ वर्षे', प्रतिभा, जुलै, १९३७ (उद्धृत); आठवणी, य. रा. दाते, लालजी पेंडसे; 'गुजराती ज्ञानकोश' हे गुजराथी प्रसिद्धीपत्रक, इत्यादी.

२. दुर्गा भागवत, यशवंत, एप्रिल १९५०; आठवणी, लालजी पेंडसे.

ज्ञानकोशावर पडले आणि अखेर मोटारीच्या लोखंडाचेही पैसे आले नाहीत. मध्यंतरी त्यांनी 'डेली पेमेंट'वर एक मोटार ठेवली होती. तिला बहुधा काम नसे, पण तिचे पैसे मात्र लागू होत! अशा रीतीने सर्व कारभार अनागोंदी पद्धतीने चाले." [1] महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या वेळी जेव्हा दैव अनुकूल होते तेव्हा या तऱ्हेचा अनागोंदी कारभार खपून गेला; पण दैव प्रतिकूल झाल्यावर तो कसा खपणार?

गुजराथी ज्ञानकोशाचे आगाऊ वर्गणीचे कित्येक हजार रुपये त्यांच्याकडे जमा झालेले होते आणि पहिला विभाग प्रसिद्ध झाल्यावर बडोदे-सरकारकडून एक हजार रुपये त्यांना मिळाले होते. दुसरा विभाग प्रसिद्ध झाल्यावर बडोदे-सरकारकडून आणखी चार हजार रुपये त्यांना मिळाले असावे. पण म. गांधींचा विरोध, महापूर, नि अनागोंदी कारभार यांमुळे झालेल्या नुकसानीतून त्यांचे डोके वर निघू शकले नाही. पैशाच्या टंचाईने त्यांना एवढे ग्रस्त केले, की विकत घेतलेला टाईप वीक, मुद्रणाचे यंत्र वीक, असे त्यांना करावे लागले! नोकरांचे पगार भागवणे त्यांना अशक्य झाले. पगारबाकी मिळावी म्हणून दोन नोकरांनी त्यांच्याविरुद्ध फिर्यादी लावल्या आणि एकाने तर त्यांच्यावर अटकेचा हुकूम मिळवला! त्यांच्या हातात बेड्या पडण्याचीच पाळी आली होती; पण त्यांचे मित्र श्री. अच्युतराव भट यांनी आयत्या वेळेस पैसे भरल्यामुळे तो दुर्दैवी प्रसंग टळला! मोठ्या उल्हासाने नि उत्साहाने सुरू केलेल्या गुजराथी ज्ञानकोशाची अशी वाताहात त्यांच्या मृत्यूपर्यंत चालू होती. [2]

गुजराथी ज्ञानकोशात केतकरांना ठोकरा बसत होत्या, पण त्याच वेळी ज्ञानसंग्रहाची इतर कित्येक कामे हाती घेऊन ती पुरी करावी, अशी उमेद ते बाळगीत होते. त्यांच्या नेतृत्वाखाली तामीळ ज्ञानकोश तयार करण्यासाठी एक समिती स्थापन झाली होती; पण त्या समितीचे चिटणीस श्री. मुत्तय्या मुदलियार हे मद्रास-सरकारचे दिवाण झाल्यामुळे तामीळ ज्ञानकोशाचे काम बंद पडले. कानडी ज्ञानकोशाच्या बऱ्याच प्रती आपण घेऊ, असे म्हैसूर-सरकारकडून त्यांनी आश्वासन मिळविले होते; पण कानडी ज्ञानकोश मार्गस्थ होऊ शकला नाही. मराठी ज्ञानकोशाचे रूपांतर करून हिंदी ज्ञानकोश आपण तयार करू, अशी इच्छा 'नागरी प्रचारिणी सभे'ने प्रदर्शित केली होती; पण त्या सभेच्या हातून काहीही काम झाले नाही. तेव्हा केतकरांनी स्वतःच ते काम सुरू केले आणि १९३५पर्यंत हिंदी ज्ञानकोशाचा एक भाग प्रसिद्ध केला. [3] पुढील भाग मात्र त्यांच्या अकाली मृत्यूमुळे प्रकाशात येऊ शकले नाहीत. इतर भाषांतील ज्ञानकोशांचे हे काम वगळले तर 'महायुद्धोत्तर जग' या मोठ्या ग्रंथाचे चार भाग त्यांनी जवळजवळ पुरे करीत आणले होते आणि महाराष्ट्रीय ज्ञानकोशाची पुरवणी म्हणून ते प्रकाशित करण्याची त्यांची इच्छा होती. पण मृत्यूमुळे त्या भागांनाही प्रकाश दिसला

१. आठवणी, लालजी पेंडसे.
२. आठवणी, लालजी पेंडसे, य. रा. दाते; डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ९.
३. 'माझी गेली आठ वर्षे', प्रतिभा, जुलै १९३७, (उद्धृत).

नाही.[१] सारांश, मृत्यूनेच त्यांचे पंख तोडले म्हणून त्यांच्या भराऱ्या थांबल्या; नाहीतर संकटांना न जुमानता अनंत भराऱ्या माराव्या अशी अदम्य इच्छा त्यांच्या मनात मुसमुसत होती.

'भारतीय समाजशास्त्र' हा त्यांचा शेवटचा समाजशास्त्रीय ग्रंथ १९३६ साली प्रसिद्ध झाला आणि त्यांच्या बुद्धीला जी विशिष्ट क्षीणता आली होती तिच्या छाया 'शातवाहनपर्वा'नंतर जाणकारांच्या पुन्हा एकदा दृष्टीस पडल्या. त्यांच्या बुद्धीवर त्यांची भावना कुरघोडी करू लागली होती, हे या ग्रंथात अनेक ठिकाणी पाहावयास सापडते. जातिभेदाचा नाश केला पाहिजे, असा उद्घोष पूर्वी त्यांनी अखंड केला होता. जगदैक्यावर त्यांची दृष्टी होती, त्यासाठी प्रादेशिक राष्ट्रभावना त्यांना हवी होती नि त्या गोष्टीला जातिभेदाची मोठी अडचण आहे याची त्यांना जाणीव होती. पण जातिभेदाला सर्वस्वी विरोधी अशी विचारसरणी एकीकडे बुद्धीने पतकरीत असता, दुसरीकडे हिंदुत्वाचा त्यांना मोठा अभिमान होता नि हिंदुत्वाशी निगडित असलेल्या जातींबद्दल त्यांना छुपे, भावनात्मक प्रेमही होते! त्यांच्या व्यक्तित्वामध्ये हे जे द्वंद्व होते ते ज्ञानकोश संपेपर्यंत क्वचित क्वचित प्रकट होई; पण त्यात जातींबद्दलच्या भावनात्मक प्रेमावर बुद्धीचे सदैव नियंत्रण असे.[२] भारतीय समाजशास्त्रात मात्र त्या प्रेमाने बुद्धीवर मात केली. या ग्रंथात "जातिभेद मोडण्यासाठी समाजात चळवळ हवी" असे एका बाजूला म्हटले आहे; पण दुसऱ्या बाजूला "जातिविशिष्ट चळवळी समाजास अवश्य आहेत" असे म्हणून जातींचा नि जातियुक्त समाजरचनेचा त्याहून जोरदार पुरस्कार केला आहे.[३] त्यांना ब्राम्हणांचा अभिमान होता आणि पूर्वीच्या लेखनात ब्राम्हणांच्या कामगिरीचा संयमित गौरवही त्यांनी केला होता; पण आता 'शातवाहनपर्वा'त व 'भारतीय समाजशास्त्रा'त ब्राम्हणांच्या समाजविस्तारक विद्येचा अतिशयोक्तिपूर्ण गौरव त्यांनी केला आणि समाजरचनेमध्ये ब्राम्हणांनी विषमतेसारखे घातक तत्व पतकरले इत्यादी दोषांचा त्यांना पूर्णपणे विसर पडला.[४] पारमार्थिक विचारांना राजकीय किंवा सामाजिक बाबतीत महत्व न देण्याची वृत्ती पाश्चात्य जगात स्वतंत्रपणे वाढली, हे त्यांना पूर्वीपासून ठाऊक होते;[५] पण ब्राम्हण्य आणि हिंदुत्व यांच्या अभिमानाने प्रेरित होऊन 'भारतीय समाजशास्त्रा'त त्यांनी असे म्हटले, की "जगाची धर्मविषयक पक्षपाती वृत्ती घालविण्यासाठी जागतिक संस्कृती निर्माण करणे हे जगाचे [व] विशेषतः ब्राम्हणांचे काम आहे." "हिंदु संघटनेचे अंतिम

१. 'भटक्या'च्या प्रारंभीची जाहिरात.
२. ज्ञानकोशाच्या पहिल्या विभागात हे द्वंद्व सूक्ष्म स्वरूपात दिसू शकते. त्या विभागात सर्वत्र जातिभेद मोडावा असा आग्रह धरला आहे (उदाहरणार्थ, पृष्ठ ४८१); पण एखाद्या ठिकाणी (उदाहरणार्थ, पृष्ठ ३३९) जातिनिष्ठ संघटनेचा पुरस्कारही केला आहे.
३. अनुक्रमे पृष्ठे २२०-२२१ व पृष्ठ २०५.
४. शातवाहनपर्व, प्रकरण ३४ वे आाण भारतीय समाजशास्त्र, प्रकरण १७ वे.
५. हिंदुइझम, प्रस्तावना, पृष्ठे ८ ते ११.

ध्येय जगाचे धार्मिक स्वातंत्र्य वाढविणे हेच आहे"![1] प्रा. इरावतीबाई कर्वे यांच्या मताप्रमाणे "ज्ञानकोशापर्यंतची त्यांची [समाजशास्त्रीय] ग्रंथनिर्मिती व विचारपद्धती बरीच समतोल वृत्तीची आढळते, तर 'भारतीय समाजशास्त्र' ह्या पुस्तकात केवळ शास्त्रज्ञाची भूमिका जाऊन हिंदुधर्माभिमान्याची भूमिकाच अधिक उठावदार रीतीने दिसते; आणि केवळ चातुर्वर्ण्याचीच नव्हे, तर अर्वाचीन जातिसंस्थेची व विशेषतः ब्राम्हणांचीच वकिली जोराने व आग्रहाने केलेली आढळते."[2] तेव्हा त्यांच्या बुद्धीचे भावनेवरील नियंत्रण या ग्रंथात ढिले पडले होते, हे उघड आहे. शिवाय, त्यांच्या बुद्धीला जी क्षीणता आली होती तीमुळे या ग्रंथात अनेक पारिभाषिक शब्द त्यांनी अत्यंत सैलपणे वापरले आणि ग्रंथाची रचना इतकी विस्कळीत केली की शातवाहन-पर्वाचे भावंड म्हणून ग्रंथ शोभून दिसावा.

बौद्धिक क्षीणतेचा परिणाम सोडला, तर 'भारतीय समाजशास्त्रा'मध्ये आपल्या जुन्या सिद्धांतांचाच केतकरांनी नवा विस्तार केला आणि शुद्धिसंघटनेची जी समकालीन चळवळ होती तिला धरून हिंदुसंघटनेविषयीचे आपले विचार त्यात ग्रथित केले. एकंदरीत, हा ग्रंथ मुख्यतः प्रकाशकाच्या तगाद्यामुळे नि पैशासाठी त्यांनी घाईने तयार करून दिला असावा.[3] कारण ग्रंथात नवे लेखन मोठ्या प्रमाणावर असले, तरी पूर्वी प्रसिद्ध झालेले लिखाण, तसा उल्लेख न करता, त्यात भरपूर घुसडून दिलेले आहे. २५२ पृष्ठांच्या ह्या ग्रंथात सुमारे ९० पृष्ठे, म्हणजे एकतृतीयांशाहून अधिक भाग, पूर्वी प्रसिद्ध झालेल्या लिखाणावरून उद्धृत केलेला आढळेल!

'भारतीय समाजशास्त्रा'प्रमाणे 'व्हिक्टोरियस इंडिया' हा ग्रंथ आयुष्याच्या शेवटीशेवटी त्यांनी लिहिला आणि १९३७ साली, त्यांच्या मृत्यूनंतर, तो प्रसिद्ध झाला. त्या ग्रंथात त्यांनी आपल्या ज्या राजकीय विचारांची नि उद्योगांची माहिती दिली त्या राजकीय विचारांकडे नि उद्योगांकडे आपण पुढच्या प्रकरणात वळू.

१९२९ ते ३७ या अखेरच्या कालखंडात कादंबऱ्या, प्राचीन महाराष्ट्र, मराठी ज्ञानकोशाची पुरवणी, इतर भाषांतील ज्ञानकोश, समाजशास्त्रीय व राजकीय ग्रंथ, या क्षेत्रात केतकर जेव्हा सलग वाङ्मयनिर्मिती करीत होते, तेव्हा प्रासंगिक नि स्फुट वाङ्मयनिर्मितीचा त्यांचा उद्योग चालूच होता. अशा वाङ्मयनिर्मितीत प्रथमतः त्यांच्या हैद्राबादच्या साहित्यसंमेलनातील भाषणाचा उल्लेख केला पाहिजे. महाराष्ट्रीय ज्ञान-कोशाची जी महान कामगिरी त्यांनी बजावली होती तिचा गौरव करण्यासाठी या साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद १९३१ साली महाराष्ट्राने त्यांना दिले आणि आपल्या भाषणाने त्यांनी हे संमेलन चांगलेच गाजवले. ते काही मेघगर्जना करणारे फर्डे वक्ते नव्हते; अपुरा आवाज, बोजड भाषा नि हावभावांचा अभाव यांमुळे त्यांच्या वक्तृत्वाचा

१. पृष्ठे २४१, २३९.

२. लोकशिक्षण, मे-जून १९३७.

३. या ग्रंथाचे प्रकाशन नागपूरच्या 'सुविचार प्रकाशन मंडळा'ने केले.

बाह्य आविर्भाव अगदी वेडौल नि तुटपुंजा असे; पण आपल्या भाषणातील आशयानेच हैद्राबादला त्यांनी साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. रूढीप्रमाणे वाङ्मयाचा वार्षिक आढावा त्यांनी घेतला नाही, आणि ते काम पगारी चिटणिसांनी करावे असे सुचवून श्रोत्यांना पहिला धक्का दिला. पुढे भाषामंडनापेक्षा भाषारक्षण नि भाषावर्धन यांचे महत्व विशेष आहे, हे तत्व त्यांनी पुरस्कारले आणि त्या दृष्टीने संमेलनापुढे एक व्यवहार्य नि लढाऊ कार्यक्रम ठेवला. 'भाषाविकासावर द्रव्योत्पादनाचा विकास अवलंबून आहे' आणि 'भाषा सहजासहजी मारली जात नाही' हे महत्वाचे दोन मुद्देही आपल्या भाषणाच्या ओघात त्यांनी मांडले. हे संमेलन महाराष्ट्रविरोधी निजामाच्या मुसलमानी राज्यात होत असल्यामुळे तेथे मराठीची जी गळचेपी चालली होती तीबद्दल ते काय बोलतात, इकडे श्रोत्यांचे विशेष लक्ष होते. त्यांच्या भाषणावर संस्थानातील स्थानिक लोकांचे तर इतके लक्ष होते, की त्यातील काही भाग त्या लोकांना पुढे त्रास पोचू नये म्हणून त्यांना बादही करावा लागला होता! पण बाद भागावर Cancelled, Cancelled असे शिक्के उठवून त्यांनी छापील भाषण वाटण्यास दिले नि कायद्याच्या कचाट्यातून मुक्त होऊन वर बाद भाग सर्वांना वाचता यावा, अशी सोय केली! बाद न केलेल्या भाषणात त्यांनी निजामाच्या मराठीविषयक धोरणाची छाननी करून, देशी भाषांच्या संवर्धनातच त्याचेही हित होते, हे त्याला पटवून दिले. शिवाय त्याला अशी धमकीही देऊन ठेवली, की "आपली भाषाविषयक नीती अशीच चालू राहिली तर स्वातंत्र्योत्सुक आणि स्वत्व-स्थापनोत्सुक महाराष्ट्र काय राजकारण करील, हे गूढ भवितव्याच्या पोटात आहे."[१] थोड्याच वर्षांपूर्वी एक फर्मान काढून निजामाने महाराष्ट्रीय ज्ञानकोशाला आपल्या राज्यात बंदी केली नव्हती का? त्या बंदीचा आपल्या या भाषणात केतकरांनी जणू वचपा काढला.

हैद्राबादच्या साहित्य-संमेलनामधली एक मौज अशी, की अध्यक्षीय व्यासपीठावर ते शामळभटी साहेबी पोषाखात विलसत होते आणि राजभाषेविरुद्ध देशी भाषेचा जोरदार पुरस्कार करीत होते. यात विरोधाभासाची जी एक मंद लकेर होती तीमुळे काही मार्मिक श्रोत्यांच्या गालावर मधूनच हास्यरेषा उमटत होती.[२] दुसरी मौज अशी, की संमेलनात वावरत असता संभावित शिष्टाचार त्यांनी पार गुंडाळून ठेवला होता. उकाडा फार होत असल्यामुळे विषयनियामक समितीच्या सभांना ते खाली धोतर नि वर साहेबी टोपी घालून येत आणि सभेची वेळ नसेल तेव्हा कमरेभोवती पंचा गुंडाळून अगडबंब वावरत![३] आणि तिसरी मौज अशी, की या संमेलनामुळे अध्यक्ष म्हणून

१. '१६ व्या महाराष्ट्र-साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष...केतकर..यांचे भाषण' व 'सोळावे महाराष्ट्र साहित्य संमेलन', कृ. पां. कुलकर्णी इत्यादी, लोकशिक्षण, मे १९३१; 'ज्ञानकोशकार डॉ. केतकर' या पुस्तकात शं. के. कानेटकरलिखित 'अंजली'; श्री. रा. पारसनीस, लोकशिक्षण, मे-जून १९३७.

२ मा. त्र्यं. पटवर्धन, प्रतिभा, जुलै १९३७.

३. चिं. वि. जोशी, ध्रुव, मे १९४९.

त्यांना जो अधिकार मिळाला त्या अधिकारातून पुढे महाराष्ट्र-साहित्य-परिषदेशी त्यांचे काही वितुष्ट आले आणि परिषदेला कोर्टात खेचण्याची नोटीस त्यांनी दिली!—पण पुढे ते प्रकरण पेटले नाही.[१]

हैद्राबादच्या भाषणाखेरीज स्फुट वाङ्मयनिर्मितीमध्ये त्यांच्या तीन लेखमाला महत्वाच्या आहेत. पैकी 'माझ्या आयुष्यातील जुन्या, बऱ्यावाईट आठवणी' आणि 'वाङ्मय-क्षेत्रात नियंत्रक संस्थेची आवश्यकता' ह्या लेखमाला १९३३-३४ साली 'प्रतिभे'त प्रसिद्ध झाल्या; आणि 'मी व माझे टीकाकार' ही लेखमाला १९३६ साली 'ज्योत्स्ने'मध्ये प्रकाशित झाली. ह्या लेखमालांपैकी पहिल्या नि तिसऱ्या लेखमालेत त्यांनी जे स्वतःच्या जीवनाचे सिंहावलोकन केले, त्यावरून प्रौढपणी मागे वळून बघण्याची जी वृत्ती माणसात येते तिचा थोडाफार पगडा त्यांच्यावर बसू लागला होता, याचा प्रत्यय आला. —आणि दुसऱ्या नि तिसऱ्या लेखमालेत विषयांतर करून श्री. न. चिं. केळकरांना त्यांनी जे बोचकारे काढले त्यावरून त्यांचे रागद्वेष व मनोगंड या काळात तीव्र होत चालले होते, हे अनुभवास आले.

शेवटच्या आठनऊ वर्षांत तेवीस-चोवीस ग्रंथांची नि अनेक स्फुट लेखांची आतापर्यंत वर्णिलेली जी निर्मिती केतकरांनी केली ती खरोखर असामान्य नि अद्भुत होती. ही निर्मिती करताना ते केव्हा लिहीत, कोठे लिहीत, कसे लिहीत वगैरे प्रश्नांचा शोध केला तर त्यांच्या व्यक्तित्वाचे काही वेगळेच दर्शन घडते. वाङ्मय निर्माण करण्यासाठी लेखनाची जी शारीरिक क्रिया करावी लागते ती त्यांच्या बाबतीत या काळात फार मजेदार तऱ्हांनी होत असे. ते कोठेही लिहीत आणि केव्हाही लिहीत. चित्रपट सुरू होण्यापूर्वी, दवाखान्यात तिष्ठत असताना, गाडीची वाट पाहाताना, आणि मोटारीत किंवा आगगाडीत, ते खुशाल लेखणी चालवीत! डोक्यात कल्पना आली, की ती कागदावर उतरल्याखेरीज त्यांना चैन पडत नसे. मग फिरायला गेलेल्या ठिकाणी हिरवळीवर बसून ते लिहू लागत, हॉटेलमध्ये बरोबरीची माणसे पैसे चुकते करीत असता व्यवस्थापकाच्या 'कौंटर'ला ते स्वतःचे 'रायटिंग टेबल' बनवीत किंवा रात्रीअपरात्री उठून ते लिहीत बसत! रात्री जाग आली की त्यांना कल्पना स्फुरत, कल्पनांचा मनावर भार येई, आणि त्या लिहून टाकल्या की नंतर त्यांचे मन हलके होई. त्यांच्या मनाची तऱ्हा अशी होती, की सतत नि सर्वत्र लिहीत राहूनही व्यवहाराच्या गोष्टींचे विस्मरण त्यांना सहसा होत नसे. त्यांची आगगाडी कधी चुकली नाही, की ठरलेली भेट कधी हुकली नाही. कळ दाबल्याप्रमाणे एका कामातून दुसऱ्या कामात मेंदूची रवानगी ते करू शकत. एकदा आगगाडीतील एका प्रवाशाबरोबर ते पुणे-मुंबई-गाडीत ऐसपैस गप्पा मारण्यात रंगले होते. इतक्यात गाडी वेगात आल्यामुळे गप्पा एकमेकाला ऐकू येईनाशा झाल्या. तेव्हा आपल्या 'बॅग'-मधून त्यांनी लेखनसामग्री काढली, मांडीचे टेबल केले आणि शांतपणे लेखनाची समाधी लावली. "अठरा किंवा एकोणिसाव्या शतकातील शास्त्रज्ञांनी केलेले ज्ञानाचे

१. महाराष्ट्र-साहित्य-परिषद-इतिहास, पृष्ठे १७, २१.

वर्गीकरण व त्यामुळे उत्पन्न होणारे प्रश्न यांसंबंधी काही मजकूर डॉक्टरसाहेबांनी त्या वेळी लिहिला!" त्यांच्या डोक्यात विचार असे तुडुंब भरलेले असत की लेखणी कागदाला लागताच तीमधून ते विचार जसे काही खळखळा वाहू लागत आणि लेखन अतिशय द्रुत गतीने होई. कित्येकदा ते दुसऱ्याकडूनही लिहून घेत आणि ज्या वेळी जो मनुष्य मिळेल तो त्यांना लेखक म्हणून चाले. कागदांबद्दलही त्यांना आवडनिवड नसे. त्यांचे लिखाण जसे पांढऱ्या नि आखीव 'फूल्स कॅप' कागदावर होई तसेच नाना आकारांच्या नि रंगांच्या तुकड्यातुकड्यांवरही होई. कधीकधी 'यशवंत' किंवा 'प्रतिभा' या मासिकांसाठी श्री. नी. म. केळकर त्यांच्याकडे लेखाची मागणी करीत. तेव्हा ते म्हणत, "मी सांगतो लेख; तुम्ही घ्या लिहून"—आणि सुमारे दोनचार तासात लेख तयार होऊन छापखान्याकडे रवाना होई. छापखानदाराचा 'कॉपी'साठी तगादा लागला, की त्यांच्या लेखनाला विशेष पूर येई. 'परागंदे'च्या प्रस्तावनेत यासाठीच त्यांनी म्हटले होते, की "कथा लवकर तयार होऊन बाहेर पडली, याचे श्रेय बऱ्याच अंशी खिळे जुळविणाऱ्या कंत्राटदाराकडे आहे." ते एकेका दिवशी लिहू लागले, की लेखनाचे ढीगच्या ढीग पाडीत. शेवटी त्यांच्याकडे लेखनिक म्हणून काम करणारे श्री. हे. रा. खरे म्हणतात, की 'दिवसा पाचसहा तास ते तोंडाने मजकूर तर सांगतच, पण रात्रीही ते स्वतः लिहीत. एखादे दिवशी सकाळी कामास जावे तो रात्री त्यांनी तीसपस्तीस ताव (हाफ शीट्स) लिहून ठेवलेले असत!'[१]—अखेरच्या काळात त्यांच्या लेखनाचा तडाखा याप्रमाणे आठनऊ वर्षे चालू होता. मग तेवढ्या काळात वाङ्मयाची एक असामान्य नि अद्भुत सृष्टी त्यांनी जन्माला घालावी, हे क्रमप्राप्तच नव्हते का?—आणि त्या सृष्टीत नाना रंग अन् ढंग यावे, सत्याचे नवदर्शन अन् क्रांतिकारक विचार यावे, आशयाची अन् रचनेची शिथिलता यावी, हेही सुसंगत नव्हते का? त्यांच्या वाङ्मयाचा गुणदोषमय आशय आणि लेखनासाठी होणारी त्यांची मजेदार शारीरिक प्रक्रिया यांमध्ये विचक्षणांना एक परस्परावलंबी नि गुंतागुंतीचे नाते सहज दिसू शकेल.

१. शीलवती केतकर, लोकशिक्षण, मे-जून १९३७; हेटी कोहन, 'मार्टिर्स टु ड्यूटी', पृष्ठे ९९ ते १०३; बलवंत धेपेश्वरकर, महाराष्ट्र, २५ एप्रिल १९३७; नी. म. केळकर, प्रतिभा, जुलै १९३७; आठवणी, हे. रा. खरे.

## जगावेगळे राजकारण

[१९२९ ते ३७]

पारतंत्र्यात प्रत्येक देशभक्त मनुष्याला राजकारणाकडे थोडेफार लक्ष पुरवावेच लागते. अर्थात देशभक्तीच्या तीव्र भावनेमुळे केतकरांनाही प्रथमपासून राजकारणाचे आकर्षण असे. महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या मोठ्या कामात वर्षानुवर्षे गुंतून पडल्यामुळे प्रत्यक्ष राजकारणात ते शिरू शकले नाहीत; पण काहीतरी राजकीय उलाढाली करण्याची उबळ त्यांना मधूनमधून येत होती. १९२४-२५ साली तर 'निःशस्त्रांच्या राजकारणा'चा महत्वाचा विचार त्यांनी मांडला होता आणि तो विचार कार्यान्वित करण्यासाठी १९२७ साली स्वयंनिर्णयी संघाची स्थापनाही केली होती. राजकारणाचे हे जे आकर्षण त्यांना होते त्यामुळे, महाराष्ट्रीय ज्ञानकोश संपल्यानंतर ते हळूहळू राजकारणात ओढले गेले. लोकांना कळेल नि जाणवेल असे कार्य करून लोकप्रियता मिळवावी, अशी इच्छाही या वेळी त्यांच्या मनात बळावू लागली होती आणि लोकप्रियता मिळवण्याची जवळची वाट म्हणून त्यांना राजकारण करावे असे वाटू लागले होते. त्यांचे एक जवळचे परिचित श्री. नी. म. केळकर म्हणतात, की "आपण अजाण, सामान्य जनतेच्या हिताचे, त्यांच्या डोळ्यांत भरेल, असे कार्य करावे, असे डॉ. केतकर यांस आता वाटू लागले. आपले कार्य, आपली विद्वत्ता, ही सारी या विस्कटलेल्या समाजात निदान आज निरर्थक आहेत, केवळ स्वतःच्या कर्तव्यबुद्धीचे देणे द्यावयाचे म्हणून आपले वाङ्मय चालू राहावे; पण जनतेला जे पाहिजे तेही आपण अंगीकारले पाहिजे, या विचाराने...अनेक मनोवेधक, मार्मिक कल्पना डॉक्टर केतकरांनी प्रसिद्ध केल्या."[1] पूर्वी लोकप्रियतेची जवळची वाट धरण्याचा मोह त्यांना फारसा पडलेला नव्हता. अमेरिकेत असताना, १९०९ साली, त्यांनी स्वतःला बजावले होते, की

> **"लोकप्रियता निकट अंतिमा या भेदा जाणोन ।**
> **चिरप्रियत्वा आकांक्षोनी नियमी आयुष्याते ॥"[2]**

१. धनुर्धारी, ९ एप्रिल १९४९.

२. 'आनंदकालीन दुःखोद्गार व तज्जन्य विचार', विद्यासेवक, जून १९२६.

—आणि महाराष्ट्रीय ज्ञानकोश किंवा वैदिक संशोधन यांसारखी प्रमुख कार्ये करताना ‘चिरप्रियत्वावर’ त्यांनी लक्ष ठेवले होते; सवंग नि जवळची लोकप्रियता झिडकारली होती. पण आता, दशकांच्या नि शतकांच्या पलीकडील मान्यतेवर दृष्टी ठेऊन कार्य करण्यासाठी मनाला जी कणखर उभारी लागते ती त्यांच्यात कमी झाली होती. तेव्हा, त्यांच्या देशभक्त मनाला चटकन लोकप्रिय होण्याकरता राजकारणाचा मोह पडावा नि काहीतरी डोळे दिपवणारा चमत्कार करण्याची खटपट त्यांनी करावी, यात नवल नव्हते. शिवाय महाराष्ट्रीय ज्ञानकोशापूर्वी राष्ट्रगुरूच्या व्यापक अन् उच्च भूमिकेत ते वावरत नव्हते का ? त्या भूमिकेतून त्यांनी ज्ञानकोशकाराची जशी मर्यादित नि खालची भूमिका क्रमप्राप्त म्हणून स्वीकारली, तसेच या वेळीही थोडेसे झाले. ते नवे नि क्रांतिकारक राजकीय विचार राष्ट्रगुरूप्रमाणे राष्ट्राला आवाज उंचावून सांगत होते; पण राष्ट्रातले राजकारणी पुरुष तिकडे लक्ष देईनात. तेव्हा आपल्या विचारांप्रमाणे कृती करण्यासाठी त्यांना स्वतःलाच राजकारणाच्या आखाड्यात उतरावेसे वाटले.

१९२९ ते ३७ या काळात एकीकडे प्राचीन महाराष्ट्राच्या संशोधनाचे मोठे कार्य ते करीत होते; गुजराथी, हिंदी, तामीळ, कानडी वगैरे ज्ञानकोश काढण्यासाठी चौफेर धडपडत होते; कादंबऱ्या नि प्रबंध लिहीत होते;—आणि दुसरीकडे राजकीय उलाढाली करीत होते. त्यांच्याच भाषेत सांगावयाचे म्हणजे ‘हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचे महायुद्ध ते एकाकीपणे लढत होते !’

म. गांधींनी सत्याग्रहाची दुसरी देशव्यापी चळवळ जेव्हा सुरू केली तेव्हाचा तो काळ होता. १९२९ च्या लाहोर-काँग्रेसने पूर्ण स्वराज्याचा ठराव केला आणि त्या ठरावाप्रमाणे देशाला कार्यप्रवृत्त करण्याची जबाबदारी देशाचे नेते म्हणून म. गांधींच्या शिरावर येऊन पडली. पण केतकरांना असे वाटले, की म. गांधी आपल्यावरील जबाबदारी टाळीत आहेत आणि प्रत्यक्ष कृती पुढे ढकलीत आहेत. तेव्हा देशाला योग्य मार्गदर्शन करावे व शक्य तर सविनय कायदेभंगाची पुढील चळवळ होऊ देऊ नये, या हेतूने त्यांनी एक अभिनव सूचना देशासमोर मांडली. त्यांची सूचना अशी होती, की मुंबईला एक सभा घ्यावी आणि तीत ठराव करून हिंदुस्थानच्या बादशहांना हिंदुस्थानने केलेल्या राज्यघटनेप्रमाणे राज्य करण्यासाठी हिंदुस्थानात बोलवावे ! ब्रिटिश पार्लमेंट अहिंदी लोकांची प्रतिनिधी असल्यामुळे हिंदुस्थानची राज्यघटना करण्याचा तिला अधिकार नाही, ही गोष्ट जाहीर करावी ! आपली सूचना मुंबईतील काँग्रेस-पुढाऱ्यांना त्यांनी कळवली आणि मुंबईत सभा घेण्याचा प्रयत्न केला; पण कोणाही काँग्रेस-पुढाऱ्याने त्यांच्याशी सहकार्य केले नाही. काँग्रेस-पुढाऱ्यांचे सहकार्य मिळेना, तेव्हा ‘नौबत’ पत्रात त्यांनी एक मुलाखत दिली आणि ब्रिटिश पार्लमेंटची हिंदुस्थानावरील सत्ता बेकायदेशीर आहे, हे जगजाहीर करण्याचा प्रयत्न केला. या मुलाखतीत ‘नौबत’चे संपादक श्री. लालजी पेंडसे यांनी त्यांना एक असा प्रश्न विचारला, की ‘ब्रिटिशांनी मदत

१. व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठ २.

नाकारली तर आपण राज्यरक्षण कसे करणार?' तेव्हा त्यांनी उत्तर दिले, की 'ब्रिटिशांनी संरक्षणाची जबाबदारी सोडून दिल्यास आपण अमेरिका, जपान किंवा जर्मनी यांच्याशी संरक्षणाची 'कॉन्ट्रॅक्ट्स' करू आणि विशिष्ट काळात त्यांच्याकडून आपली माणसे शिकवून तयार करून घेऊ.' पण त्यांची ही मुलाखत म्हणजे एक विनोद आहे, अशा भावनेने लोकांनी तिच्याकडे बघितले व तीमधील विचार ध्यानात घेतला नाही. मग स्वतःचा 'स्वयंनिर्णयी संघ' त्यांच्या हाताशी होता, त्याच्यातर्फे त्यांनी बादशहांना एक तार केली आणि तीमध्ये भावी चळवळीची बादशहांना कल्पना देऊन त्यांनी बादशहांना हिंदुस्थानात येण्याचे निमंत्रण दिले. पण येथील नोकरशाहीने ती तार बादशहांपर्यंत पोचू दिली नाही. 'ज्ञानप्रकाशा'तून नि काही गुजराथी वृत्तपत्रातून तारेची बातमी मात्र प्रसिद्ध झाली. तारेतील आमंत्रण बादशहांनी स्वीकारले असते व हिंदुस्थानात येऊन हिंदी लोकांनी बनविलेल्या राज्यघटनेप्रमाणे राज्य केले असते, तर कायदेभंगाची चळवळ तर टळली असतीच, पण हिंदुस्थानावर ब्रिटिश पार्लमेंटची जी बेकायदेशीर सत्ता होती ती संपून हिंदुस्थान स्वतंत्र झाला असता, अशी केतकरांची समजूत होती! पण तसे घडले नाही आणि म. गांधींची कायदेभंगाची देशव्यापी चळवळ सुरू झाली.[1]

बादशहांना आमंत्रण देण्याचा केतकरांनी जो उद्योग केला त्यामागे त्यांची एक जगावेगळी विचारसरणी होती. 'हिंदुस्थान हा तर्कदृष्टीने व कायद्याने स्वतंत्र व सार्वभौम देश आहे' असा त्यांचा सिद्धांत होता[2] आणि त्या सिद्धांताचा पाठपुरावा ते पुढीलप्रमाणे करीत होते: 'इंग्लंडने हिंदुस्थानला कधीही जिंकलेले नाही, मग कायद्याने हिंदुस्थान इंग्लंडच्या अंकित कसा होऊ शकेल?[3] इतिहासात जे घडले ते इतकेच, की एक ब्रिटिश कंपनी हिंदुस्थानात आली व तिने दिल्लीच्या नि साताराच्या राजांकडून दिवाणीचे किंवा पेशवाईचे अधिकार मिळवले. १८५७ मध्ये दिल्लीच्या राजाने कंपनीला दिवाणगिरीवरून बडतर्फ करून नानासाहेबाला पेशवा नेमले; पण नंतरच्या युद्धात कंपनी विजयी होऊन तिने दिल्लीच्या राजालाच पदच्युत केले. पुढे कंपनीने इंग्लंडमधील विंडसर राजघराण्याची प्रस्थापना दिल्लीच्या सिंहासनावर केली, साताराचे सिंहासन मोकळेच ठेवले, आणि कंपनी बरखास्त झाली. याचा अर्थ असा होतो, की सर्व हिंदुस्थानची दिवाणगिरी प्रथम एका ब्रिटिश कंपनीकडे गेली आणि मग त्या कंपनीकडून ती ब्रिटिश राजाकडे गेली. दोनही सिंहासनेदेखील ब्रिटिश राजाकडे गेली. पण त्या सिंहासनांचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व नष्ट झाले नाही. जर इंग्लंडने हिंदुस्थान जिंकले असते तरच त्या सिंहासनांचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व नष्ट

१. व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठे ६७ ते ६९ इत्यादी; 'माझा राजकीय कार्यक्रम', विद्यासेवक, सप्टेंबर १९३५.

२. व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठे ५, ६१.

३ व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठ १४.

झाले असते ![1] जेव्हा दिग्विजयाशिवाय अन्य रीतीने दोन सार्वभौम प्रदेशांचे राज्यपद एका व्यक्तीकडे येते तेव्हा कोणताच प्रदेश परतंत्र बनत नाही किंवा त्याचे सार्वभौमत्व जात नाही. हॅनोव्हरचा व इंग्लंडचा राजा एकच झाला तरी त्या देशांचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व अबाधित राहिले नाही का ?[2] इंग्लंडच्या इतिहासाप्रमाणेही कायदेशीरपणे इंग्लंडचा म्हणजे पार्लमेंटचा हक्क हिंदुस्थानावर लागू होत नाही. कारण पार्लमेंट म्हणजे काय ? तर कॉमन्स व लॉर्ड्स यांच्याबरोबर प्रजेचे प्रश्न कळण्यासाठी राजाची झालेली मुलाखत. या मुलाखतीत कॉमन्स व लॉर्ड्स यांना स्वतःच्या प्रदेशाबद्दलच कायदे सुचविता येतील. इतरांच्या प्रदेशाबद्दल त्यांनी कायदे सुचविले तर तो कट होईल किंवा ते आक्रमण होईल. अर्थात पार्लमेंटने हिंदुस्थानबद्दल केलेले सारे कायदे फुसके किंवा 'इन्व्हॅलिड' आहेत.[3] पार्लमेंटचा नि म्हणून इंग्लंडचा हिंदुस्थानावर काहीही हक्क नाही. हिंदुस्थान आपल्या ब्रिटिश बादशहांसह पूर्ण स्वतंत्र नि सार्वभौम आहे '!

कायद्यात हिंदुस्थान स्वतंत्र नि सार्वभौम असला तरी व्यवहारात नाही, हे केतकरांना मान्य होते आणि हिंदुस्थानच्या कारभारावर नियंत्रण ठेवणारा भारतमंत्री (स्टेट्स सेक्रेटरी) पार्लमेंटला जबाबदार असल्यामुळे तसे घडते, असे त्यांचे मत होते. पार्लमेंट इंग्लंडचे प्रतिनिधी असल्याने नि त्याला भारतमंत्री जबाबदार असल्याने त्याच्याकरवी इंग्लंडचे पारतंत्र्य हिंदुस्थानावर चोरवाटेने लादले जाते, असे त्यांना वाटे.[4] साहजिकच भारतमंत्र्याला बाजूला टाकून बादशहांना हिंदुस्थानच्या बाजूला वळवण्याचा धाडसी बेत त्यांनी आखला होता !

केतकरांच्या प्रस्तुत विचारसरणीत त्यांच्या बौद्धिक क्षीणतेचे वेडेवाकडे प्रतिबिंब गडदपणे पडले होते. 'शातवाहनपर्वा'त एकांगी नि कच्च्या युक्तिवादाचा जो प्रकार त्यांनी अनुसरला होता तोच प्रकार येथेही त्यांनी अनुसरला होता. वास्तविक पाहाता, ईस्ट इंडिया कंपनीने इंग्लंडच्या सरकाराकडे जेव्हा कर्ज मागितली नि ती इंग्लंडच्या खजिन्यातून जेव्हा देण्यात आली तेव्हाच कंपनीच्या कारभारात पार्लमेंटने आपला अधिकार प्रस्थापित केला होता. पुढे, १८७३ च्या 'रेग्युलेटिंग ॲक्ट'पासून हिंदुस्थानविषयक जे कायदे झाले ते सारे कायदे पार्लमेंट व राजा यांनी केले होते आणि त्या कायद्यांनी मिळालेल्या हक्कांप्रमाणे कंपनीने हिंदुस्थानातले राज्य कमावले होते. तेव्हा कंपनीने लढून राज्य जिंकले, याचा अर्थ कंपनीच्या मार्फत ते राजा व पार्लमेंट यांनी किंवा इंग्लंडने जिंकले, असा होतो. ज्या १८५८ च्या कायद्याने व्हिक्टोरिया राणीने हिंदुस्थानची राज्यसूत्रे स्वतःकडे घेतली त्यातही हीच भूमिका स्पष्टपणे स्वीकारलेली होती. कारण त्याच्या प्रस्तावामध्ये असे म्हटले होते, की 'व्हिक्टोरिया राणी पार्लमेंटच्या सूचनेने व संमतीने हिंदुस्थानचे

१. व्हिक्टोरियस इंडिया पृष्ठे १४ ते १६.
२. व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठ १३.
३. व्हिक्टोरियस इंडिया पृष्ठ ५६.
४. व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठे १७, १०१ इत्यादी.

राजपद स्वीकारीत आहे.' त्या कायद्यात हिंदुस्थानच्या कारभाराची अंतिम जबाबदारी भारतमंत्र्यावर टाकली होती व त्यास पार्लमेंटला जबाबदार बनविले होते. तेव्हा पार्लमेंटच्या अधिकाराबद्दल इतिहासाची साक्ष इतकी स्पष्ट असता, फक्त ब्रिटिश राजाचा अधिकार हिंदुस्थानावर आहे, पार्लमेंटचा किंवा इंग्लंडचा नाही, हा केतकरांचा विचार टिकण्यासारखा नव्हता. ते हॅनोव्हरचे उदाहरण घेत होते; पण ते उदाहरण फसवे होते. हॅनोव्हरच्या राजाला (किंवा इलेक्टरला) इंग्लंडने स्वखुषीने स्वतःचे राजपद दिले होते. त्यामुळे त्या दोन देशांचे राजपद एकाच व्यक्तीकडे गेले तरी दोनही देश स्वतंत्र नि सार्वभौम राहिले. पण हिंदुस्थानाने स्वखुषीने आपले राजपद ब्रिटिश राजाला दिलेले नव्हते. त्यामुळे त्या राजाच्या आधिपत्याखाली हिंदुस्थान स्वतंत्र नि सार्वभौम राहाण्याचा प्रश्न नव्हता. आपले म्हणणे सिद्ध करण्यासाठी केतकर इंग्लंडचा इतिहासही पुढे करीत होते नि पार्लमेंटला बाहेरच्या प्रदेशांबद्दल कायदे करण्याचा अधिकार नाही, असे सांगत होते. पण पार्लमेंटने झगडा करून ब्रिटिश राजाच्या सर्वभौम अधिकारात व्यवहारतः वाटा मिळवला होता. तेव्हा, एका ब्रिटिश कंपनीमार्फत जिंकलेल्या प्रदेशाबद्दल कायदे करण्याचा अधिकार राजासह पार्लमेंटला निश्चित होता. आपल्या आमंत्रणाला मान देऊन बादशहा हिंदुस्थानात येतील ही जी आशा केतकरांना वाटत होती तिला काय म्हणावे तेच कळत नाही. इंग्लंडचे राजपद नियंत्रित आहे नि इंग्लंडच्या राजाला पार्लमेंटच्या व मंत्रिमंडळाच्या संमतीखेरीज काहीही करता येत नाही, हे सर्वविश्रुत आहे. मग इंग्लंडने लादलेले पारतंत्र्य नष्ट करण्यासाठी बादशहा हिंदुस्थानात कसे येऊ शकले असते? केतकरांचे आमंत्रण स्वीकारण्यापूर्वी स्वतःच्या पदच्युतीचा प्रश्न त्यांना सोडवावा लागला नसता का?—केतकरांची एकंदर विचारसरणी बघितली, की हवे ते बघणाऱ्या अन् नको त्याकडे अंध नेत्र वळवणाऱ्या नेल्सनची आठवण होते. फरक एवढाच, की नेल्सनने अंध नेत्रामुळे दुसऱ्याला चकवून लढाई जिंकली आणि केतकर स्वतःच चकून लढाईऐवजी हवेत हातवारे करीत राहिले.

तरुणपणी केतकर सशस्त्र क्रान्तिवादाचा पाठपुरावा करीत होते; पण पुढे ते सनदशीर नि शांततावादी राजकारणाचे पक्के पुरस्कर्ते बनले. १९२४-२५ सालातले त्यांचे 'निःशस्त्रांचे राजकारण' हे सनदशीर नि शांततावादी भूमिकेवरूनच त्यांनी मांडले होते; पण त्या 'निःशस्त्रांच्या राजकारणा'त करबंदीच्या चळवळीचा जो भाग होता तो सनदशीर नि शांततावादी राजकारणात नीटपणे बसू शकत नव्हता, हे त्यांना नंतर जाणवू लागले असावे. तेव्हा, 'निःशस्त्रांचे राजकारण' त्यांनी सोडले आणि नव्या सनदशीर नि शांततावादी मार्गांचा शोध त्यांचे मन बहुधा करू लागले. या शोधातूनच हिंदुस्थानच्या कायदेशीर सार्वभौमत्वाची नि पार्लमेंटच्या बेकायदेशीर सत्तेची कल्पना त्यांना सापडली असावी. त्यांच्या सनदशीर राजकारणामध्ये एककल्लीपणाची नि विक्षिप्तपणाची एक लकेर प्रारंभापासूनच चमकत असे. 'सनदशीर राजकारणाची मीमांसा' ह्या १९१४ सालच्या लेखमालेत पूर्वी त्यांनी असे म्हटले होते, की

'हिंदुस्थानास ब्रिटिश साम्राज्याचे चालकत्व बऱ्याच अंशी प्राप्त करू देण्याचे ध्येयदेखील सनदशीर चळवळीने साध्य होऊ शकेल'! त्यांनी असेही म्हटले होते, की "बादशहाने आपले नाव जॉर्ज बदलून चंद्रगुप्त घ्यावे...डोक्यावर टोपी न चढविता पगडी चढवावी... आपल्या मुलाची मुंज करून घ्यावी व संस्कारयुक्त व्हावे...अशा रीतीने...अर्ज करणेदेखील बेसनदशीर नाही!"[१] त्यांच्या सनदशीर राजकारणातील ही लकेर पुढे प्रबळ होऊन तिच्यामधून बादशहांना आमंत्रण देण्याची कल्पना निघालेली दिसते.—आणि एका क्षेत्रातील विचार दुसऱ्या क्षेत्रात लावून त्या क्षेत्राचे दर्शन बदलून टाकण्याची, त्यात अभूतपूर्व उलथापालथ सुचविण्याची, त्यांच्या मनाची एक स्थायी प्रवृत्तीच होती. त्या प्रवृत्तीचा परिणाम होऊनही या वेळी त्यांनी राजकारणाला कायद्याचे नि घटनात्मक कायद्याचे उपयोजन केले असावे. त्यांच्या जुन्या विचारांनी नि प्रवृत्तींनी त्यांच्या मनाच्या नव्या, विकल अवस्थेत जो वेडावागडा आकार घेतला, तो आकार म्हणजेच १९२९ नंतरचे त्यांचे राजकारण, असे म्हणणे शक्य आहे.

म. गांधींची सविनय कायदेभंगाची चळवळ संपल्यावर केतकरांनी असा निष्कर्ष काढला, की ती चळवळ पूर्णपणे अयशस्वी झाली. मग देशाला खरा मार्ग दाखवण्यासाठी ते थोडा नवा पवित्रा घेऊन आपल्या प्रयत्नाला पुनश्च लागले. पूर्वी बादशहांना फितवण्याची त्यांची खटपट अयशस्वी झाली होती, तेव्हा या वेळी भारतमंत्री, व्हाइसरॉय वगैरे अधिकाऱ्यांवर आपले लक्ष त्यांनी केंद्रित केले. ८ फेब्रुवारी १९३२ रोजी पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यामार्फत भारतमंत्र्याला त्यांनी एक नोटीस दिली. हिंदुस्थान कायदेशीरपणे स्वतंत्र असून हिंदुस्थानचे बादशहा कोणाचेही अंकित नाहीत, पण हिंदुस्थानचा मुख्य अंमलदार जो भारतमंत्री तो ब्रिटिश पार्लमेंटला जबाबदार राहिल्यामुळे हिंदुस्थानवर पारतंत्र्याच्या आपत्ती कोसळतात वगैरे आपले म्हणणे त्यांनी नोटिशीत सविस्तर मांडले होते. हिंदुस्थानच्या नोकराने परक्या देशाच्या पार्लमेंटला जबाबदार राहणे अत्यंत विसंगत व बेकायदा आहे, असे त्यांनी ठासून म्हटले होते.—आणि भारतमंत्र्याने ब्रिटिश मतदारांचे प्रतिनिधित्व सोडावे, ब्रिटिश तिजोरीतून पगार घेऊ नये, ब्रिटिश पार्लमेंटला जबाबदार राहू नये, ब्रिटिश मंत्रिमंडळाबरोबर स्वतःची जागा सोडू नये, हिंदी लोकांच्या विश्वासातील मंत्र्यांना हाती धरून हिंदुस्थानचा कारभार हाकण्याबद्दल बादशहांचे मन वळवावे इत्यादी बेडर मागण्या त्यांनी केल्या होत्या. नोटिशीचे समाधानकारक उत्तर दोन महिन्यांत न आल्यास कायदेशीर इलाज करावा लागेल, असा इषाराही शेवटी त्यांनी दिला होता. पण जिल्हाधिकाऱ्याच्या 'पर्सनल असिस्टंट'ने भेटीला बोलावून त्यांना धमकावण्याचा नि भिवविण्याचा थोडा यत्न केला, एक महिन्याने त्यांच्या नोटिशीची पोच त्यांना मिळाली आणि पुढे काहीच घडले नाही! तेव्हा, मार्च महिन्यात त्यांनी दिल्लीला जाऊन हिंदुस्थान-सरकारच्या 'असिस्टंट पोलिटिकल सेक्रेटरी'ची गाठ घेतली व व्हाइसरॉयशी मुलाखत मिळावी, अशी मागणी

१. महाराष्ट्र, १५ जुलै ते १९ ऑगस्ट १९१४.

केली. आपले म्हणणे व्हाइसरॉयने मान्य केले तर पुढील चळवळ करावयास नको, हिंदुस्थान सरकार नि बादशहाच पार्लमेंटपासून स्वतःचे स्वातंत्र्य प्रस्थापित करतील, अशी त्यांची अपेक्षा होती. पण त्यांना मुलाखत नाकारण्यात आली आणि पार्लमेंटच्या सत्तेविषयी कोणतेही विधान करता येणार नाही, असे उत्तर त्यांना मिळाले. तेव्हा, एप्रिलमध्ये त्यांनी व्हाइसरॉयला व मुंबई-बंगालच्या गव्हर्नरांना नोटिसा दिल्या आणि जो भारतमंत्री पार्लमेंटच्या आज्ञा पाळून बादशहांच्या सार्वभौमत्वाला बाध आणतो त्याचे हुकूम न बजावण्याविषयी त्यांना ताकीद दिली. परंतू आतापर्यंतच्या कोणत्याही खटपटीचा काहीही परिणाम त्यांना दिसेना. तेव्हा, ९ डिसेंबर १९३२ रोजी शेवटचा उपाय म्हणून, त्यांनी भारतमंत्र्याविरुद्ध पुण्याच्या फर्स्ट क्लास सब्जजच्या कोर्टात फिर्याद गुदरली. पण ही फिर्याद ९ जानेवारी १९३३ या दिवशी कोर्टाने काढून टाकली आणि हे प्रकरण आपल्या अधिकारकक्षेत बसत नाही, असे कारण दाखविले. केतकरांनी डिस्ट्रिक्ट कोर्टात व मुंबईच्या हायकोर्टात अपील करून पाहिले, पण उपयोग झाला नाही. 'लेटर्स पेटंट'खाली ही फिर्याद चालावी असाही त्यांनी यत्न केला आणि तोही फोल झाला. तेव्हा, नोटिशींनी व फिर्यादींनी लढाई करून स्वातंत्र्य जिंकण्याचे आपले प्रयत्न हिंदुस्थानच्या रणभूमीपुरते, शत्रू लढाईस उभाच राहीना म्हणून, त्यांनी समाप्त केले.[१]

या प्रयत्नात ते एक गोष्ट अशी गृहीत धरीत होते, की भारतमंत्री, व्हाइसरॉय, गव्हर्नर वगैरे अधिकारी आपला युक्तिवाद पटून आपले म्हणणे मान्य करतील. पण त्यांच्या युक्तिवादात तथ्य असते व तो या अधिकाऱ्यांना पटला असता तरी त्यांनी त्यांचे म्हणणे कसे मान्य केले असते? भारतमंत्री ब्रिटिश जनतेने निवडलेला व त्या जनतेचा प्रतिनिधी असा मनुष्य होता; तो पार्लमेंटला जबाबदार होता.—आणि व्हाइसरॉय व गव्हर्नर हे अधिकारी त्याच्या नियंत्रणाखाली होते. पार्लमेंटच्या इच्छेची अंमलबजावणी करणे हे साऱ्यांचे कर्तव्य होते व त्यासाठी ते पगार घेत होते. तर पार्लमेंटची सत्ता ते कां व कशी झुगारणार? ते सर्वच जण जर ब्रिटिश होते तर त्यांनी एकदम फितून ब्रिटनची बाजू कशी सोडली असती? अधिकाराची परंपरा, कारभाराची यंत्रणा नि मनुष्यमात्राचा स्वभाव यांविरुद्ध या गोष्टी होत्या व म्हणून त्या घडणे शक्य नव्हते पण केतकरांच्या ते लक्षात येत नव्हते. आपल्या प्रयत्नांत केतकर दुसरी एक गोष्ट अशी गृहीत धरीत होते, की आपले म्हणणे ब्रिटिशांच्या न्यायालयात सिद्ध करता येईल. "जे कायदेशीर आहे ते कायद्याच्या प्रयत्नाने उगवून घेता येते."[२] पण न्यायालयात कित्येकदा प्रवेशच मिळत नाही, हे त्यांच्या अनुभवास आले नाही का? आणि जरी प्रवेश मिळाला असता तरी त्यांची फिर्याद अयशस्वी व्हावी म्हणून ब्रिटिश अधिकाऱ्यांनी योग्य ती तजवीज केली नसती का? नको त्या माणसाला वेडा ठरवून वेड्यांच्या इस्पितळात त्याची रवानगी

१. व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठे ६९ ते ८३, ८५, ८६; 'माझा राजकीय कार्यक्रम...', विद्यासेवक, सप्टेंबर १९३५.

२. व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठ १७.

करण्याचे तंत्रही ब्रिटिश राज्यकर्त्यांना ठाऊक नव्हते का? ब्रिटिश न्यायालये कितीही चोखपणे न्याय देत असली तरी त्यांच्या चोखपणाला मर्यादा होत्या, हे लो. टिळकांच्या अनेक खटल्यांत स्पष्ट झाले नव्हते का? पण केतकरांच्या लक्षात या गोष्टीही येऊ शकत नव्हत्या. त्यांचा आशावाद जबर होता, उत्साह मोठा होता अन् त्यांच्या बुद्धीचे काही डोळे अधू झाले होते. त्यामुळे काही अशक्य गोष्टी त्यांना शक्य वाटत नि काही उघड गोष्टी दिसत नसत.

या काळात फिर्याद करण्याचे वेड त्यांच्या डोक्यात किती शिरले होते, याबद्दल एक राजकारणाबाहेरची हकीगत सांगण्यासारखी आहे. १९३२च्या फेब्रुवारी महिन्यात सयाजीरावमहाराज गायकवाडांनी व्याख्याने देण्यासाठी त्यांना बडोद्यास बोलावले आणि बोलावण्याप्रमाणे शीलवतीबाईंसह ते बडोद्याला गेले. तेथे काहीतरी निमित्त होऊन सयाजीरावांचे नि त्यांचे संबंध बिघडले व त्यांची फारशी व्याख्याने न होता त्यांना दहापंधरा दिवस तेथे लोंबकळत राहावे लागले. सयाजीरावांनी या भेटीत बडोदा-विद्यापीठाच्या प्रस्थापनेबद्दल त्यांचा सल्ला घेतला, असे काही लोक सांगतात. काय नक्की झाले कोणास ठाऊक, पण पुण्याला परतल्यावर केतकरांनी सयाजीरावांना अशी एक नोंदलेली नोटीस पाठविली, की 'तुम्ही रोज पन्नास रुपयांप्रमाणे पंधरा दिवसांची 'कन्सल्टेशन फी' पाठवून द्यावी, नाहीतर तुमच्यावर फिर्याद करावी लागेल'![1] खरे म्हणजे, सयाजीरावांनी मोठ्या उदारपणाने शिक्षणासाठी अमेरिकेत त्यांना मदत केली होती व ते हिंदुस्थानात आल्यावर बडोदे-संस्थानात नोकरी करण्याची त्यांच्यावरील अट काढून टाकली होती. तेव्हा या प्रसंगी काहीही घडलेले असले तरी त्यांनी सयाजीरावांना फिर्यादीची धमकी देणे अत्यंत अनुचित होते. पण केवळ फिर्यादीचे वेड डोक्यात असल्यामुळे त्यांना औचित्याचे भान राहिले नाही. पुढे सयाजीरावांनी त्यांच्या नोटिशीकडे लक्ष दिले नाही, त्यांनीही सयाजीरावांच्या हीरकमहोत्सवाच्या प्रसंगी सयाजीरावांना तोंड भरून जाहीर आशीर्वाद दिला[2] आणि हे सारे प्रकरण जिरले! असो.

भारतमंत्र्यावरील फिर्यादीचे हिंदुस्थानातील प्रयत्न खुंटल्यावर केतकरांचे लक्ष इंग्लंडकडे वळले व कायदेशीर प्रयत्नांसाठी इंग्लंडात जाण्याचे बेत ते आखू लागले. पहिल्या कोर्टाने आपल्या लेखी निकालात आणि हायकोर्टाच्या न्यायाधीशांनी तोंडी त्यांना सुचविले होते, की आपला प्रश्न त्यांनी इंग्लंडमध्ये नेला पाहिजे. तेव्हा इंग्लंडकडे त्यांचे लक्ष वळण्यास ते एक महत्वाचे कारण होते. सप्टेंबर १९३५च्या सुमारास एक जाहीर पत्रक काढून त्यांनी 'केतकर-संकल्प-साधक-निधी'ला प्रारंभ केला! दरडोई शंभर रुपयांप्रमाणे शंभर माणसांकडून किंवा संस्थांकडून दहा हजार रुपये जमवावेत व पार्लमेंटच्या तावडीतून भारतमंत्र्याला सोडविण्यासाठी इंग्लंडात जावे, असा या निधीचा

१. आठवणी, चिं. वि. जोशी, शीलवती केतकर; केतकरांचे श्री. पाटील, बडोदे, यांना दि. ६-२-३२ चे पत्र; चिं. वि. जोशी, अभिरुची, जून १९४५.

२. 'श्रीमन्महाराज...यांस...प्रेमोपहार', विद्यासेवक, डिसेंबर १९३५.

मुख्य हेतू होता. शिवाय या निधीतून 'प्राचीन महाराष्ट्र'चे संशोधनदेखील ते करणार होते. निधीचे हिशेब व शिल्लक (!) ते डॉ. ना. भा. खरे व लोकनायक मा. श्री. अणे यांच्याकडे देणार होते आणि अण्यांची निधीला सहानुभूती त्यांनी मिळविली होती.[1] पण बहुधा या निधीला काहीच रक्कम मिळाली नसावी, १९३५च्या कायद्यानंतर इंग्लंडात जाणे त्यांना निरर्थक वाटू लागले असावे, आणि निधी हवेत विरून गेला असावा. इंग्लंडमध्ये गेल्यावर आपण आपली स्वातंत्र्याची खटपट कशी करणार ते त्यांनी जाहीर केले नव्हते; पण तेथेही फिर्याद करण्याचा त्यांचा विचार असावा. 'फिर्याद काढून टाकल्यास काय कराल?' असे मित्रमंडळींनी खाजगी रीतीने विचारले तर ते म्हणत, की 'पार्लमेंट भरली असता भारतमंत्र्याच्या थोबाडीत मारीन आणि क्रिमिनल केस करून घेईन! मग माझे म्हणणे मांडण्याची संधी द्यावीच लागेल आणि न्याय मिळू शकेल!'[2]

१९३२च्या फेब्रुवारीमध्ये भारतमंत्र्याला नोटीस दिल्यापासून, हिंदुस्थानात व इंग्लंडात सरकारदरबारी काय काय घडते, हे बघण्यासाठी केतकर टपून बसले होते. जे काही घडले ते आपल्या प्रयत्नांचा परिणाम म्हणून घडले, असे त्यांना वाटत होते. जुलै १९३२ मध्ये ब्रिटिश मंत्रिमंडळात हिंदुस्थानच्या प्रश्नावर काही तंटा झाला आणि एका गुप्त बैठकीत पार्लमेंटच्या सभासदांना भारतमंत्र्यांनी हिंदुस्थानचा प्रश्न समजावून सांगितला. या बैठकीनंतर श्री. विन्स्टन चर्चिल यांनी, पार्लमेंटच्या हिंदुस्थानावरील सार्वभौमत्वाची पुन्हा प्रस्थापना केली पाहिजे, अशी ओरड करण्यास प्रारंभ केला. तेव्हा केतकरांनी या गोष्टीचा असा उलगडा केला, की पार्लमेंटच्या सभासदांना हिंदुस्थानवरील आपल्या सार्वभौमत्वाच्या कायदेशीरपणाबद्दल शंका उत्पन्न झाली असावी व त्यांच्यात मतभेद उत्पन्न झाले असावे. पुढे 'इंडिया बिल' तयार होऊन त्याला पार्लमेंटने हिंदुस्थानची संमती मिळवली. तेव्हा केतकरांनी त्याचे असे स्पष्टीकरण केले, की १९१९च्या कायद्याच्या वेळी हिंदुस्थानची संमती घेतली नव्हती, पण ती 'इंडिया बिला'ला आता घेतली; कारण पार्लमेंटच्या हिंदुस्थानविषयक कायदे करण्याच्या अधिकाराला आपण आव्हान दिले. एप्रिल १९३२मध्ये ब्रिटिश सरकारने आपले दोन सभासद पार्लमेंटमध्ये बसविण्याचे बंद केले. तेव्हा भारतमंत्र्याला आपल्या सूचनेप्रमाणे पार्लमेंटमधून काढण्याची ही पूर्वसिद्धता आहे, असे केतकरांना वाटले. हिंद-जपान तहाच्या वेळी जपानी शिष्टमंडळ प्रथम इंग्लंडमध्ये गेले, मग हिंदुस्थानात आले, आणि हिंदुस्थान सरकारची तहावर सही झाल्यावर मग त्याखाली इंग्लंडनेही सही केली. याची फोड केतकरांनी अशी केली, की हिंदुस्थान सरकारने आपले तह करण्याचे अधिकार या वेळी प्रस्थापित केले आणि आपल्या सार्वभौमत्वाची चुणूक दाखविली. ब्रिटिश पार्लमेंटच्या इच्छेविरुद्ध व्हाइसरॉयने हिंदी विधिमंडळ विसर्जित

१. 'माझा राजकीय कार्यक्रम...' विद्यासेवक, सप्टेंबर १९३५.

२. आठवणी, लालजी पेंडसे; बलवंत धोपेश्वरकर, महाराष्ट्र, २५ एप्रिल १९३७.

केले, तेव्हाही हिंदुस्थान सरकारने पार्लमेंटविरुद्ध स्वत्वाचा आग्रह धरला, असे त्यांचे मत बनले! हिंद-जपान-तह आणि विधिमंडळाचे विसर्जन या दोन गोष्टींबद्दल हिंदुस्थान सरकारचे अभिनंदन करण्यासाठी तर, ३० सप्टेंबर १९३४ रोजी, 'महाराष्ट्राच्या स्वयं-निर्णयी संघा'ची सभा त्यांनी बोलाविली होती![1] अनेक घटनांचा अन्वयार्थ ते स्वतःला असा अनुकूल लावीत होते, पण खुद्द त्यांच्याशी त्या घटनांचा काही संबंध नव्हता, असे वाटते. हिंदुस्थानातल्या जागृतीमुळे स्वराज्याचे जे अधिकार इंग्लंडकडून हिंदुस्थानला मिळत होते त्याचा परिणाम म्हणून त्या घटना घडत होत्या किंवा त्या घटनांचे उगम दुसऱ्या कशात होते. पण स्वतःलाच जगाचा केंद्रबिंदू समजण्याच्या मनःस्थितीत केतकर या वेळी असल्यामुळे त्या घटनांचा संबंध ते स्वतःशी जोडीत असावे.

नोटिशी आणि फिर्यादी यांचे कायदेशीर प्रयत्न चालू असता त्या प्रयत्नांना पूरक अशा इतर खटपटीही केतकर करीत होते. मुंबई-सरकारच्या तत्कालीन सातही मंत्र्यांच्या गाठी त्यांनी घेतल्या आणि आपला विचार त्यांच्या कानावर घातला. सर्व मंत्र्यांना हे पटले, की हिंदुस्थानचा भारतमंत्री दुसऱ्या देशाच्या पार्लमेंटला जबाबदार असणे विसंगत होय; पण त्यांच्यापैकी कोणीही केतकरांच्या प्रयत्नांस उचलून धरण्यास तयार झाला नाही. १९३४ साली लोकनायक अणे व डॉ. खरे यांनी एक चहापान-समारंभ घडवून आणून केंद्रीय विधिमंडळाच्या सभासदांपुढे केतकरांना आपले विचार मांडण्याची संधी दिली. तेथे, भारतमंत्री सर सॅम्युअल होअर यांना पार्लमेंटमधून निघण्यास भाग पाडावे, असे केतकर म्हणाले; पण त्यांचे ते म्हणणे कोणास पटले नाही. भारतमंत्री अहिंदी मताला जबाबदार असू नये, अशा अर्थाचा ठराव विधिमंडळात आणण्यास डॉ. खरे मात्र कबूल झाले. पण पुढे सर सॅम्युअल यांनी आपल्या जागेचा राजीनामा दिल्यामुळे हा ठराव आणण्याचे कारण उरले नाही. नवे भारतमंत्री मार्किस ऑफ झेटलंड यांना ब्रिटिश लोकांनी निवडलेले नव्हते, ते लॉर्ड असल्यामुळे पार्लमेंटात बसत होते आणि मंत्रिमंडळासह त्यांनी आपले मंत्रिपदही सोडले नव्हते. तेव्हा अहिंदी मताला जबाबदार असण्याचा ठराव त्यांच्याविरुद्ध येऊ शकत नव्हता.[2] आपल्या एकंदर खटपटींच्या ओघात, १९३२ साली, केतकर एकदा ब्रम्हदेशातही जाऊन आले! तेथे त्यांनी काही सामाजिक निरीक्षण केले, आगटे नामक आपल्या चुलतबहिणीची भेट घेतली; पण तेथील 'सेक्रेटरिएट'मधून भारतमंत्र्यावरील फिर्यादीसाठी काही माहिती मिळवावी, हा तेथे जाण्यात त्यांचा मुख्य हेतू होता![3]

१. व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठे ८२ ते ८५; केतकरांनी ३० सप्टेंबर १९३४ रोजी बोलाविलेल्या सभेला दोनचार माणसेच उपस्थित असावी! (पाहा : श्री. के. क्षीरसागर, नवभारत, एप्रिल १९५०).

२. व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठे ८६,८७.

३. व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठ ८२; 'भारतीय समाजशास्त्र', पृष्ठ १६५, १७१; आठवणी, श्री. रा. टिकेकर.

हिंदुस्थानचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व यांविषयीचा कायदा सांगताना किंवा भारतमंत्र्याला नोटीस दिल्यानंतर ज्या घटना घडल्या त्यांचा अन्वयार्थ लावताना केतकरांना वस्तुस्थितीचे परिपूर्ण आकलन होईनासे झाले होते. जे इष्ट आहे त्यालाच ते सत्य समजू लागले होते. त्यांच्या मनाची ही अवस्था १९३५ चा कायदा पास झाल्यानंतर बरीच पुढच्या पायरीला गेली. १९३५ च्या कायद्याने हिंदुस्थान स्वतंत्र झाला, असे कोणाही शहाण्या माणसाने आजवर म्हटले नाही आणि कोणाला तसा अनुभवही आला नाही. त्या कायद्याने हिंदुस्थानच्या कारभारात हिंदी लोकांना फार सत्ता मिळाली, पूर्ण लोकशाही प्रस्थापित झाली, असेही कोणाला वाटले नाही. तो कायदा पास झाल्यावरही सारे हिंदी लोक नि लोकनेते स्वातंत्र्य मिळावे, लोकशाही प्रस्थापित व्हावी, म्हणून १९४७ पर्यंत झगडत होते. पण १९३५ च्या कायद्याने हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाले, असे केतकरांनी ठरविले! त्या कायद्याने हिंदुस्थानच्या राज्यकारभारावर लोकांची पूर्ण सत्ता आली, असा त्यांनी अर्थ काढला! ते म्हणतात, "१९३५ च्या कायद्याने पार्लमेंटची सत्ता जवळजवळ पूर्णपणे दूर करण्यात आली आहे."[1] "ब्रिटिश पार्लमेंटने हिंदुस्थानवर आपले सार्वभौमत्व कधी सांगितले नव्हते, त्यामुळे कायद्यात त्या सार्वभौमत्वाच्या विसर्जनाविषयी विधान केलेले नाही. कायद्यात फक्त एवढेच म्हटले आहे, की भारतमंत्र्याची सर्व सत्ता बादशहांकडे पुन्हा येत आहे, गव्हर्नर जनरल व गव्हर्नर्स यांना बादशहांकडून सत्ता मिळत आहे, आणि भारतमंत्र्याकडे फक्त सर्वसाधारण देखरेखीचे काम आहे. पण याचा अर्थ भारतमंत्र्याच्या ज्या सत्तेचा पार्लमेंट उपयोग करून घेई ती सत्ता पूर्णपणे संपली आहे, असा होतो."[2] "ह्या कायद्याने हिंदी लोकांना हिंदुस्थानच्या सर्वांगीण हालचालीवर पूर्ण ताबा दिला आहे."[3]—केतकर हिंदुस्थान कायदेशीरपणे स्वतंत्र नि सार्वभौम आहे म्हणून १९२९ पासून भांडत नव्हते का? आपल्या भांडणाचा परिणाम होऊन आपणाला यश मिळत आहे, असा भास त्यांना होत नव्हता का? तेव्हा, ज्याचे चिंतन करावे ते प्रकट झाल्यासारखे होऊन, १९३५ च्या कायद्यात त्यांना स्वातंत्र्य नि लोकशाही यांचा साक्षात्कार होऊ लागला!

१९३५ च्या कायद्याच्या बाबतीत सारे लोक व लोकनेते एकीकडे होते, तर केतकर दुसरीकडे होते. तेव्हा लोकांचे व लोकनेत्यांचे मत बाजूस टाकून प्रत्यक्ष कायद्यावरून केतकरांची परीक्षा झाली पाहिजे. पण प्रत्यक्ष कायद्यातही केतकरांच्या म्हणण्याला आधार आढळणार नाही. ह्या कायद्याने हिंदी लोकांना काही अधिक सवलती मिळाल्या होत्या, हे खरे; पण त्यांत स्वातंत्र्य नि लोकसत्ता यांची परिपूर्ण प्रस्थापना कोठेहि आढळणार नाही. ह्या कायद्यातील एका कलमाप्रमाणे, हिंदुस्थानविषयक कायदा करण्याच्या पार्लमेंटच्या सत्तेवर कायद्यातील कुठल्याही भागामुळे बंधन उत्पन्न होत

१. व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठ १००.
२. व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठ ७.
३. व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठ २१०.

नाही.[१] मग हिंदुस्थानचा ललाटलेख लिहिण्याची सत्ता पार्लमेंटच्या हातातच या कायद्याने ठेवली होती, हे स्पष्ट नव्हते का? कायद्यातील दुसऱ्या एका कलमाप्रमाणे, या कायद्यात हिंदुस्थानला कुठलीही दुरुस्ती करता येत नाही.[२] म्हणजे पार्लमेंटने कायद्याची जी चौकट घालून दिली तीमध्येच वावरण्याचे बंधन हिंदुस्थानवर नव्हते का? या कायद्याने गव्हर्नर जनरलला स्वेच्छेप्रमाणे किंवा स्वनिर्णयाप्रमाणे वागण्याची मुभा अनेक बाबतींत दिली होती. ही मुभा संरक्षण, परराष्ट्रीय संबंध, शांतता व सुव्यवस्था, आर्थिक स्थैर्य, पब्लिक सर्व्हिसेस इत्यादी महत्वाच्या बाबतींत होती आणि गव्हर्नर जनरल जेव्हा ह्या मुभेचा उपयोग करून वागेल तेव्हा त्याच्यावर भारतमंत्री व पार्लमेंट यांचे नियंत्रण ठेवले होते. याचा अर्थ, कायद्याच्या चौकटीतही सारा कारभार लोकांकडे सोपविलेला नव्हता, त्यामध्ये गव्हर्नर जनरल, भारतमंत्री, पार्लमेंट यांच्या हस्तक्षेपाला मुबलक वाव ठेवला होता, असाच होत नव्हता का? पण हे सारे केतकरांच्या बुद्धीमध्ये जसेच्या तसे पोचू शकत नव्हते आणि ते कायद्याचा मनःपूत अर्थ लावीत होते. त्यातून स्वातंत्र्य अन् लोकसत्ता काढून दाखवीत होते!

कायद्याचा संकलित अर्थ केतकरांना कसा आकलन होत नव्हता, कायद्यातील एखादा तुकडा उचलून ते त्याचा कसा विपर्यास करीत होते, इष्ट ते सिद्ध करण्याची त्यांची धडपड कशी चालू होती, हे त्यांच्या काही युक्तिवादांत ठळकपणे दिसू शकते. १९३५च्या कायद्याने हिंदुस्थानचे एक संघराज्य प्रस्थापित होत होते. तेव्हा, संघराज्याच्या निरनिराळ्या घटकांमध्ये सत्तेची नीट विभागणी करता यावी, म्हणून त्या कायद्याच्या प्रारंभी सर्व सत्ता बादशहांनी स्वतःकडे घेतली आहे. सर्व सत्ता स्वतःकडे घेताना भारतमंत्र्याकडील सत्ताही साहजिकपणे त्यांनी स्वतःकडे घेतली आहे.—आणि मग भारतमंत्र्यासह निरनिराळ्या घटकांमध्ये त्या सत्तेची कायद्याच्या पुढील कलमांत विभागणी केली आहे. पण बादशहांनी भारतमंत्र्याकडील सत्ता स्वतःकडे घेतली, एवढ्याच भागावर केतकरांनी नजर खिळवली व भारतमंत्र्याची सत्ता संपली म्हणून आनंद मानला.[३] पुढे भारतमंत्र्याला जी सत्ता दिली आहे तिचा अर्थ त्यांच्या चित्तात ठसला नाही. या कायद्यातील एक कलम असे आहे, की पार्लमेंटच्या कोणत्याही कायद्यातील कोणत्याही नियमाला उडवून लावणारे विधेयक गव्हर्नर जनरलच्या पूर्वसंमतीशिवाय हिंदी विधिमंडळात आणता येणार नाही.[४] हे कलम उघडउघड पार्लमेंटच्या बाजूचे नि हिंदी लोकांच्या विरुद्ध आहे. पण त्यावर केतकरांनी असे भाष्य केले, की "पार्लमेंट हिंदुस्थानविषयक कायदे करू शकेल; पण गव्हर्नर जनरल आणि हिंदी विधिमंडळ यांना योग्य वाटल्यास दोघांना मिळून ते

१. कलम ११० (अ).
२. कलम ११० (ब, २).
३. व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठे ७, १०४.
४. कलम १०८.

कायदे बाद ठरविता येतील."[1] पण गव्हर्नर जनरलच्या पूर्वसंमतीवर ह्या कायद्याने दुसरीकडे भारतमंत्र्याचे व पार्लमेंटचे नियंत्रण ठेवलेले आहे. तेव्हा पार्लमेंटचा कायदा बाद ठरविणारे विधेयक विधिमंडळात मांडण्यास भारतमंत्र्याच्या व पार्लमेंटच्या परवानगीशिवाय गव्हर्नर जनरलने पूर्वसंमती कशी दिली असती? त्याने तशी पूर्वसंमती द्यावयाची म्हणजे पार्लमेंटनेच स्वतःच्या कायद्याविरुद्ध विधेयक आणण्यास पूर्वसंमती द्यावयाची! हे घडणे कसे शक्य होते? पण समग्र कायद्यापेक्षा कायद्यातील एका तुकड्याचा विपर्यासच केतकरांना खरा वाटला. या कायद्याने "हिंदुस्थानातील नोकरशाहीला विधिमंडळांची सत्ता डावलून स्वतंत्रपणे वागण्याची खूप सवलत दिली आहे" असे त्यांनी एकीकडे म्हटले;[2] पण दुसरीकडे या कायद्याने लोकसत्ता प्रस्थापित झाल्याबद्दल आनंद प्रदर्शित केला. भारतमंत्र्याच्या हाती किंवा इतर कोणाच्या हाती केवढीही सत्ता असली तरी तिचा दुरुपयोग झाल्यास बादशहांकडे आपणाला तक्रार नेता येईल, असे त्यांनी पुन्हापुन्हा बजावले आणि ती सत्ता जणू नाहीच असा निष्कर्ष काढला![3] तेव्हा विपर्यस्त युक्तिवाद नि इष्ट ते सिद्ध करू पाहाणारा युक्तिवाद यांच्या ते पूर्णपणे आहारी गेले होते, असे म्हटल्यावाचून गत्यंतर नाही.

आपल्या हृदयाशी बाळगलेल्या आशा व आकांक्षा सफल होत आहेत असा आभास त्यांना इतक्या तीव्रतेने होऊ लागला होता, की हिंदुस्थान हा एक विजयी देश आहे आणि त्याने जगाच्या एकीकरणात महत्वाचा वाटा उचलला आहे, असेही ते म्हणू लागले होते. आपली राजकीय विचारप्रणाली व उद्योग यांचे निवेदन ज्या ग्रंथात त्यांनी केले त्या ग्रंथाला त्यांनी 'व्हिक्टोरियस इंडिया' अथवा 'विजयी हिंदुस्थान' असे नाव दिले! त्यांचे म्हणणे थोडक्यात असे होते, की 'मोठे राज्य व जागतिक राज्य यांचे ध्येय अतिप्राचीन काळापासून हिंदुस्थानने आपल्या डोळ्यासमोर ठेवले होते. त्या ध्येयाला अनुसरूनच हिंदुस्थानने एका परक्या कंपनीला दिवाणगिरी व परक्या राजाला राजपद दिले. त्यामुळे हिंदुस्थानचे एकीकरण तर घडून आलेच; पण शिवाय इंग्लंड व हिंदुस्थान या देशांचे श्रेयस्कर संयुक्तीकरणही झाले. या संयुक्तीकरणात इंग्लंडने प्रथम हिंदुस्थानचा गैरवाजवी फायदा घेतला; पण १९३५ नंतर ती स्थिती राहिलेली नाही. आता दोनही देश समतेच्या तत्वावर एकत्र येत आहेत व ते दोघांनाही लाभकारक आहे. सारांश, परक्या कंपनीला दिवाणगिरी देण्यात किंवा परक्या राजाला राजपद देण्यात हिंदुस्थानने काहीच चूक केली नाही. ते करणारा हिंदुस्थान एक विजयशाली देश होय. आपली सांस्कृतिक परंपरा टिकवून जगाचे प्रचंड भूभाग एकत्र जोडणारे हिंदुस्थानसारखे किती देश भूतलावर दाखवता येतील!'[4] त्यांच्या या म्हणण्यात इतिहासाची उलटापालट पुष्कळच

१. व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठ ११५.
२. व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठ ११९.
३. व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठे १०६, ११२, ११५ इत्यादी.
४. व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठ ४७, प्रकरण ४-५.

होत होती. कारण इंग्रजांच्या हातात हिंदुस्थानची शेंडी गेली, ती हिंदुस्थानच्या ध्येय-दृष्टीमुळे गेली नव्हती, तर त्याच्या मूर्खपणामुळे किंवा दुबळेपणामुळे गेली होती; आणि हिंदुस्थान राजकीय दृष्ट्या एका छत्राखाली आला, इंग्लंडशी संबद्ध झाला, याचे श्रेय इंग्लंडकडे होते, हिंदुस्थानकडे नव्हते. पण जागतिक राज्याचे भव्य स्वप्न त्यांनी १९०९-पासून स्वतःच्या उराशी धरले नव्हते का? जगाच्या एकीकरणात हिंदुस्थान मोठी कामगिरी करील, असे त्यांना वाटत नव्हते का? तेव्हा ते सारे आता घडले आहे, असा आभास त्यांना होऊं लागला.

१९३५ च्या कायद्याने जे स्वातंत्र्य मिळाल्यासारखे केतकरांना वाटत होते त्या स्वातंत्र्याचे सारे श्रेय ते आपल्या स्वभावानुसार स्वतःकडे अगदी मनमोकळेपणाने घेत होते. 'व्हिक्टोरियस इंडिया' ह्या पुस्तकाच्या प्रारंभी आत्मगौरवाची पुढील भव्य घोषणा त्यांनी केली आहे. ते म्हणतात, "लेखक जनतेला हे सांगू इच्छितो, की त्याने एकट्याने एक महायुद्ध जिंकले आहे. समकालीन जग त्याची उपेक्षा करीत होते, त्याला कोणी साह्य करीत नव्हते की कोणी विरोध करीत नव्हते, ज्यांना त्याच्या उद्योगाची माहिती होती ते तुच्छतेने त्याच्याकडे बघून फक्त स्मित करीत होते, पण त्याने एक महाप्रचंड कार्य साधले आहे. मात्र त्याने कार्य साधले तरी त्याचे खरे ज्ञान अद्यापी कोणाला झालेले नाही. लेखकाच्या प्रयत्नाने मानवजातीचा एकपंचमांश भाग गुलामगिरीतून मुक्त झाला आहे. पण प्रत्यक्ष मुक्तता होऊनही मुक्त झालेल्यांना ते समजलेले नाही. लेखकाच्या यशाची थोरवी समकालीनांना समजो की न समजो, भविष्यकालीन विचारवंतांना योग्य ते श्रेय त्याला द्यावेच लागेल."[1] १९३५ सालच्या एका मुलाखतीत सगळ्या राजकीय पुढाऱ्यांबद्दल त्यांनी असे उद्गार काढले, की "राजकारणाच्या बाबतीत कोणत्याही शास्त्रज्ञाने डोके घातले नाही; त्यामुळे मूर्ख उपदेशकांचा सुकाळ पुष्कळ झाला आहे....देशस्वातंत्र्याविषयी विचार करणारा एकही पुढारी मला दिसला नाही व यासंबंधी सशास्त्र विचार करण्याची फिकीर कोणाही पुढाऱ्यास असलेली मला दिसली नाही...मी अठ्ठेचाळीस वर्षेपर्यंत विचार करीत राहिलो आणि नंतर कामास लागलो....मी तुम्हांस देशस्वातंत्र्यासाठी काहीएक करावयास सांगत नाही. त्याला लागणारी कारवाई मी करीतच आहे."[2] या उद्गारांवरून सर्व राजकीय पुढाऱ्यांपेक्षा स्वतःला ते श्रेष्ठ समजत होते, हे स्वच्छ दिसते. आपण एकट्याने स्वातंत्र्य संपादन केले, ह्या कल्पनेच्या फुग्यात बसून ते इतके उंच गेले होते, की "मी आपणास सर्व आधुनिक मनुष्यांपेक्षा मोठा समजत आहे" असे उघड उद्गार ते निःशंकपणे आणि सहजासहजी काढीत असत.[3]

अखेरच्या काळात त्यांच्या बुद्धीचे भावनेवरील नियंत्रण कमी होऊन त्यांचे काही

१. पृष्ठे २-३

२. 'डॉ. केतकर यांना दिलेली एक मुलाखत', प्रतिभा, जुलै १९३७.

३. 'श्रीमन्महाराज...यांस...प्रेमोपहार', विद्यासेवक, डिसेंबर १९३५.

संकुचित स्वाभिमान बळावले आणि त्या स्वाभिमानांचा थोडाफार आविष्कार 'भारतीय समाजशास्त्रा'त झाला. हिंदुस्थानला आपण स्वातंत्र्य मिळवून दिले असे वाटून, जेव्हा ते स्वतःला जगातील सर्वश्रेष्ठ पुरुष समजू लागले, तेव्हाही त्या स्वाभिमानांनी बरीच उचल खाल्ली. पेशव्यांच्याबद्दल त्यांना बालपणापासून जो अभिमान होता त्या अभिमानामुळे ते आता असे म्हणू लागले, की हिंदुस्थानच्या एकीकरणाची तत्वे बाळाजी बाजीरावाने प्रथम अमलात आणली. राजघराण्यात लग्नसंबंध जोडावे, अनेक राजांची दिवाणगिरी एकाच्या हातात एकवटावी व हिंदुस्थानचे एकीकरण साधावे, हे बाळाजीचे धोरण होते. ईस्ट इंडिया कंपनीने स्वतःकडे दिल्लीची नि साताऱ्याची दिवाणगिरी घेताना नवीन काहीच केले नाही, तर बाळाजीच्या धोरणाची नुसती नक्कल उठवली !'[1] त्यांना कोकणस्थपणाचा नि ब्राम्हणपणाचा जो अभिमान होता त्या अभिमानामुळे स्वतःची स्वातंत्र्यसंपादनाची बहादुरी जगाला जाहीर करताना ते म्हणू लागले, की 'ज्या जातीला हिंदुस्थानवर सत्ता गाजविण्याचे अधिकार अठराव्या शतकात मिळाले होते व ज्या जातीने हिंदुस्थानच्या एकीकरणाचे धडे प्रथम घालून दिले त्या महाराष्ट्रीय ब्राम्हण जातीत माझा जन्म झाला आहे !'[2] पूर्वी केतकर-घराण्याच्या गार्ग्य गोत्राचा गौरवपूर्ण उल्लेख एका कवितेत त्यांनी केला होता; आता गार्ग्य गोत्राच्या अभिमानातून 'गार्ग्य गोत्रीय कोकणस्थ...' या विषयाच्या संशोधनाकडे ते वळले असावे ![3] आता ते स्वतःला नुसते थोर समजत नसत, तर 'थोर ब्राम्हण' समजत असत. सयाजीरावमहाराज गायकवाडांच्या हीरकमहोत्सवाचे वेळी त्यांनी सयाजीरावांना जो आशीर्वाद दिला तो "ब्राम्हण या नात्याने आपणास व आपल्या कुळास आशीर्वाद देतो" असे म्हणून दिला.[4] त्यांचे विचार एकीकडे अफाट नि शिथिल होत चालले होते आणि दुसरीकडे त्यांचे स्वाभिमान असे संकुचित नि घट्ट बनत चालले होते.

केतकरांनी आपल्या परीने स्वातंत्र्यासाठी झगडा केला, स्वमताप्रमाणे स्वातंत्र्याचे गाठोडे आणून लोकांसमोर सोडले; पण लोकांची प्रीती किंवा प्रशंसा अपेक्षेप्रमाणे त्यांना लाभली नाही. सारे लोक काँग्रेसच्या नि म. गांधींच्या मागे होते. म. गांधींचा सर्वत्र जयजयकार नि गुणगौरव होत होता. तेव्हा, केतकरांच्या प्रचंड पण पडू लागलेल्या मनात म. गांधींविषयीच्या मत्सराने अन् द्वेषाने नकळत प्रवेश केला. 'निःशस्त्रांच्या राजकारणा'चा आपला विचार म. गांधींना त्यांनी व्यक्तिशः भेटून पूर्वी सांगितला होता; पण गांधींनी तो स्वीकारला नव्हता. कायदेशीर राजकारणाचा नवा विचार म. गांधींच्या काँग्रेसी अनुयायांना त्यांनी ऐकवला होता; पण तो त्यांनी झिडकारला होता. गुजराथी ज्ञानकोशाची वर येऊ लागलेली इमारत तर म. गांधींनी शब्दाच्या एका फुंकरीने जमीनदोस्त केली

१. व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठे ४५-४६.
२. व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठ ६७.
३. विद्यासेवक, डिसेंबर १९३५.
४. 'श्रीमन्महाराज...यांस...प्रेमोपहार', विद्यासेवक, डिसेंबर १९३५.

होती. तेव्हा केतकरांच्या मनाच्या अबोध भूमीत म. गांधींविषयीच्या मत्सराचे अन् द्वेषाचे स्वाभाविकपणेच चांगले पोषण झाले. विचाराच्या पायावर म. गांधींविषयी जी जी मते पूर्वी त्यांनी बनविली होती ती सारी मते आता विकाराच्या वादळात पार बदलून गेली. १९२० च्या सुमारास ते एवढेच म्हणत होते, की म. गांधींनी दक्षिण आफ्रिकेमधली स्थिती विशेष सुधारली नाही.[१] पण आता ते स्पष्ट म्हणू लागले, की म. गांधींनी दक्षिण आफ्रिकेमधली स्थिती बिघडवून टाकली. 'निःशस्त्रांच्या राजकारणा'त ते सांगत होते, की टिळक-कॉंग्रेस-स्वराज्य-निधी म. गांधींनी उडविला या आरोपात विशेष तथ्य नाही, आणि तो निधी त्यांनी उडविला असला तरी हरकत नाही, कारण त्यांनी शिकविलेल्या असहकारितेच्या मंत्राची किंमत एक कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे.[२] पण आता म. गांधींनी त्या निधीची अफरातफर केली असे त्यांना वाटू लागले व म. गांधींना कोर्टात खेचण्याची भाषा त्यांच्या तोंडात आली. लोकांना स्वत्व-स्थापनेच्या ध्येयासाठी स्वास्थ्यसुखाचा होम करण्यास लावावयाचे असेल तर म. गांधीं-सारख्या पुढाऱ्यांची जरुरी आहे; स्वराज्याची चळवळ ही आध्यात्मिक चळवळ आहे, हे गांधींनीच ओळखले; असे ते पूर्वी लिहीत होते.[३] पण आता 'हिंदी लोकांनी स्वतःच्या उन्नतीचे प्रयत्न करू नयेत म्हणून त्रयस्थ लोक म. गांधींचा उपयोग करीत आहेत', 'म. गांधी क्षपणक आहेत' असे ते लिहू लागले. 'म. गांधी हिंदी स्त्रियांपेक्षा इंग्रज स्त्रियांत अधिक मोकळेपणाने मिसळतात', 'खिस्ती मिशनऱ्यांच्या कृपेमुळे म. गांधींच्या अंगावर संतपणाची झूल पडली' वगैरे आरोपही ते करू लागले.[४] म. गांधींच्यावर त्यांचा एवढा राग झाला होता, की रस्त्यात चारचौघांशी गप्पा मारताना ते खुशाल म्हणत, की 'गांधीला चमक्या मारल्या पाहिजेत!'[५]

१९३५ च्या कायद्याचा मनःकल्पित अर्थ व गांधीद्वेष यांमधून १९३६ साली केतकरांनी एक नवेच प्रकरण उत्पन्न केले. १९३५ च्या कायद्याने स्वातंत्र्य मिळाले, ही कल्पना त्यांच्या मनावर इतकी ठसली होती, की त्या कल्पनेचा चष्मा घालूनच पुढील काळात ते साऱ्या गोष्टी बघू लागले. हिंदुस्थान ज्या अर्थी स्वतंत्र आहे त्या अर्थी कॉंग्रेसने यापुढे स्वातंत्र्यसंपादनाची भाषणे करणे म्हणजे थापा मारणे होय, असे त्यांनी ठरविले. स्वातंत्र्याच्या नावाने निधी जमविणे म्हणजे जनतेची शुद्ध फसवणूक होय, असे त्यांचे विचार वाहू लागले. स्वातंत्र्य मिळाले असता ते अमान्य करून कॉंग्रेस आपल्या असाधारण विजयावर पडदा टाकीत आहे, आपल्या श्रेयावर दरोडा घालीत आहे, अशी त्यांची भावना झाली. स्वातंत्र्य मिळाले हे नक्की धरून यापुढे विधायक कार्यक्रमासाठी

१. ज्ञानकोश, विभाग १ ला, पृष्ठ २६७ ते २६९.
२. निःशस्त्रांचे राजकारण, पृष्ठ ३७.
३. 'जनता आणि पुढारी...' लोकशिक्षण, श्रावण शु. १०, शके १८३७.
४. म. गांधींबद्दलची उत्तरकालीन सर्व मते : व्हिक्टोरियस इंडिया, पृष्ठे १३८ ते १४२.
५. आठवणी, य. रा. दाते.

कंबरा कसल्या पाहिजेत, असे त्यांचे मत होते. पण त्या मताच्या आड स्वातंत्र्य अमान्य करणारी काँग्रेस येत आहे, अशी त्यांची खात्री होती. अर्थात काँग्रेसच्या विरुद्ध काहीतरी उपाययोजना करून तिला चांगला धडा शिकविला पाहिजे, हे ओघाने आले. तेव्हा महाराष्ट्र-प्रांतिक-काँग्रेसचे अध्यक्ष श्री. शंकरराव देव यांना ११ मार्च १९३६ रोजी त्यांनी नोटीस दिली आणि २५ जून १९३६ रोजी पुण्याच्या फर्स्टक्लास सब्जज-पुढे त्यांच्यावर फिर्याद गुदरली! शंकरराव देव हे त्यांच्या दृष्टीने काँग्रेसचे केवळ नैमित्तिक प्रतिनिधी होते आणि त्यांचा खरा रोष म. गांधींवर होता. काँग्रेसने स्वातंत्र्य मिळविण्याच्या नावावर जी फसवणूक चालविलेली आहे ती तिने बंद करावी, स्वातंत्र्य मिळाले आहे हे मान्य करून विधायक कार्याला तिने हात घालावा, ही फिर्यादीमधील त्यांची मुख्य मागणी होती.—आणि ती मागणी पुरी होण्याची मुख्य अट म्हणून म. गांधींना निंदाव्यंजक ठरावाने नालायक ठरवून काँग्रेसमधून हाकलण्यात आले पाहिजे, असे ते म्हणत होते. त्यांच्या फिर्यादीवर २८ सप्टेंबरला श्री. देवांनी आपले निवेदन सादर केले व फिर्यादीत मुद्दा नाही, ती फापटपसाऱ्याने भरलेली आहे, सबब काढून टाकावी, अशी मागणी केली. तेव्हा १४ ऑक्टोबर रोजी केतकरांनी आपले म्हणणे पुनश्च मुद्देसूदपणे मांडले.[1] यानंतर फिर्यादीचे फारसे काम पुढे चालू शकले नाही; कारण एप्रिल १९३७मध्ये त्यांचे (म्हणजे वादीचे) निधन अचानकपणे घडून आले. या फिर्याद-प्रकरणात त्यांच्या मनाचा तोल अजिबात ढळला होता, हे स्पष्ट करून सांगण्याची आवश्यकता नाही.

१९२९ पासून केतकरांनी जे राजकीय उद्योग केले त्यांमध्ये आपणाला चटकन लोकप्रियता लाभावी, अशी त्यांची एक इच्छा होती. पण बादशहांना तार करण्यापासून श्री. शंकरराव देवांवर फिर्याद लावण्यापर्यंत त्यांनी जे उद्योग केले त्या उद्योगांना कोणाचीच मान्यता मिळाली नाही. लोकनेत्यांनी त्या उद्योगांकडे गंभीरपणे बघितले नाही आणि लोकांनाही विक्षिप्तपणाचा तो एक नमुना वाटला. "या सर्व प्रकारांमुळे त्यांनी आपले बरेच हसे मात्र करून घेतले!" असे प्रा. श्री. रा. पारसनीसांनी म्हटले आहे.[2] महामहोपाध्याय पोतदार म्हणतात, की "या प्रकरणी इतर सर्वांना नादान व अज्ञान ठरविण्याचा जो अट्टहास त्यांनी केला तो त्यांच्या अंगावर आला.—आणि आदर होण्याऐवजी उपहास होण्यातच त्याचे पर्यवसान झाले."[3] त्यांच्या उद्योगाचे वर्णन प्रा. बनहट्टींनी पुढीलप्रमाणे केले आहे : "त्यांनी एकदम आपल्या एकट्याच्याच प्रयत्नाने स्वराज्याच्या गगनास गवसणी घालण्याची व्यापक व अत्यद्भुत कल्पना काढली, आणि तीन राक्षसांच्या गोष्टीतील राक्षसाला बाटलीत कोंडणाऱ्या जानूप्रमाणे स्वराज्याला आपल्या गवसणीत गुंडाळून आपल्या देशबांधवांपुढे आणून हजरदेखील केले! हा सर्व त्यांच्या कल्पनेचा बुडबुडा असेल, परंतू एखाद्या प्रचंड घुमटाप्रमाणे तो विस्मयजनक

१. व्हिक्टोरियस इंडिया, प्रकरण १७ वे व परिशिष्ट.

२. लोकशिक्षण, मे-जून १९३७.

३. लोकशिक्षण, जुलै १९३७.

होता, यात मात्र शंका नाही." [१] महाराष्ट्राचे विनोदी लेखक प्रा. चिं. वि. जोशी यांनी केतकरांच्या फिर्यादीच्या छंदाचे विडंबन केले आणि 'रत्नाकर'मध्ये 'वेड्यांचे इस्पितळ' या गोष्टीत त्यांच्यावरून एक फिर्यादवाला वेडा रंगवला! [२] १९२५ च्या हिवाळ्यात केतकर नागपूरला गेले होते आणि तेथे टाउनहॉलमध्ये त्यांनी 'हिंदुस्थानला पूर्ण स्वराज्य मिळाले आहे' या विषयावर व्याख्यान दिले होते. ते व्याख्यान ऐकून एका टांगेवाल्याने जे उद्गार काढले त्या उद्गारांत सर्वसामान्य माणसाचे त्यांच्या राजकारणाविषयी जे मत होते ते ठसठशीतपणे प्रकट झाले. तो टांगेवाला म्हणाला, "सवराज मिला, सवराज मिला, ऐसा क्या बकता है ये शक्स! भला ऐसी बात कभी हो सकती है? इसके दिमाखमे (मेंदूत) कुछ फरक तो नही हुआ?" [३]

या प्रकारे लोकप्रियतेऐवजी केतकरांच्या पदरात उपेक्षा, उपहास नि कुचेष्टा या गोष्टीच पडल्या; पण एकदा सुरू केलेले राजकीय उद्योग त्यांनी त्यासाठी बंद केले नाहीत. उलट आठनऊ वर्षे त्या उद्योगांत विलक्षण चिकाटीने आणि चढत्यावाढत्या उत्साहाने ते रमून गेले होते. याचे कारण असे होते, की लोकप्रियतेच्या मोहाने त्यांना काही काळ थोडेसे भुलवले असले, तरी त्यांच्या राजकीय उद्योगांची खरी प्रेरणा त्या मोहात नव्हती. बालपणापासून देशभक्तीची जी धगधगीत भावना त्यांच्या हृदयात सदैव जागृत होती त्या देशभक्तीच्या भावनेतून त्यांच्या राजकीय उद्योगांना प्रेरणा मिळाली होती. त्यांच्या उद्योगांमागील विचारसरणी भ्रांत असो की नसो, त्यांच्या देशभक्तीची उत्कटता नाकारता येण्यासारखी नाही. विशेषतः त्यांनी दारिद्र्याच्या ज्या भयानक परिस्थितीत आपले राजकीय उद्योग केले ती परिस्थिती लक्षात घेतली, की त्यांच्या देशभक्तीची उत्कटता मनावर काही भव्य आणि उदात्त संस्कार करून जाते. महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या व्यवस्थापकाचे नि संपादकाचे त्यांचे काम १९२८ साली सुटले आणि त्यांना मिळणारे सुमारे चारशे रुपये मासिक वेतन एकदम बंद पडले. पूर्वीच्या वेतनातून त्यांनी आपल्या सढळ स्वभावानुसार काहीही शिल्लक टाकली नसावी; त्यामुळे हे वेतन बंद पडताच त्यांना एका दिवसात गरिबी आली. ज्ञानकोश-मंडळाच्या सभांना लष्करातून त्यांना पुणे गावात यावे लागे; पण टांग्यासाठी त्यांच्याजवळ पैसे नसत. [४] ज्ञानकोशानंतर वाङ्मयनिर्मितीचे मोठमोठे उद्योग त्यांनी केले, पण खर्चवेच वजा जाता, मासिक सवाशे ते दीडशे रुपयांहून अधिक प्राप्ती त्यांना होत नसावी. या तुटपुंज्या प्राप्तीवर घरातली चार माणसे, थोडीशी उच्च राहाणी आणि एखादा नोकर यांचा खर्च भागता भागता नाकी नव येत. १९३०-३१ च्या सुमारास ते एकदा बडोद्याला गेले होते, तेव्हा न्यायमूर्ती गोपाळ कृष्ण दांडेकर यांनी त्यांना विचारले, "डॉक्टर, कसे काय चालले

१. प्रतिभा, जुलै १९३७.

२. आठवणी, चिं. वि. जोशी.

३. आ. रा. देशपांडे, प्रतिभा, जुलै १९३७.

४. केतकरांचे २०-९-२९ चे य. रा. दात्यांना पत्र.

आहे ?" त्यावर त्यांनी आपल्या विजारीला पडलेल्या छिद्रात हातातली पेन्सिल घातली व छिद्र मोठे करीत म्हटले, "सध्या हे असे चालले आहे."[1] अखेरच्या काळातील त्यांच्या आर्थिक स्थितीचे खरोखरच ते प्रतीकात्मक करुण चित्र होते. त्यांना खायलाप्यायला भरपूर हवे असे, पण या काळात पोटालाही चिमटा घेण्याचा त्यांच्यावर प्रसंग आला होता. गुजराथी ज्ञानकोश खपविण्यासाठी एकदा ते अहमदाबादेस गेले, तेव्हा त्यांचा आणि त्यांच्या एका सहकाऱ्याचा तीन दिवसांचा जेवणखर्च फक्त साडेतीन आणे होता![2] कित्येकदा एक वेळ जेवून पोटातली आग ते शांत करीत असत, कित्येकदा मित्राकडे झालेल्या फराळाला भोजन समजून खऱ्या भोजनाला टाळा देत असत,—आणि कित्येकदा नुसत्या चहापावावरही त्यांचे अनेक दिवस लोटत असत![3] गुजराथी ज्ञानकोशात पैशासाठी त्यांच्या हातात बेड्या पडण्याचा प्रसंग आला होता, याचेही स्मरण येथे केले पाहिजे. शेवटी त्यांच्यापाशी लेखनिक म्हणून काम करणारे रा. हे. रा. खरे म्हणतात, की "त्यांना आर्थिक साह्य मिळाले असते तर ते लवकर मेले नसते."[4] दारिद्र्याशी प्राणांतिक झुंज आठनऊ वर्षे ते घेत होते आणि त्याच वेळीं आपल्या राजकीय उद्योगांचा पसारा त्यांनी मांडला होता. तयार कपड्यांच्या दुकानातला मळका सूट घालून पायी हिंडणारा[5] हा निष्कांचन देशभक्त ब्रिटिश साम्राज्याशी टक्कर देत होता. कलेक्टरापासून भारतमंत्र्यापर्यंत अनेकांना नोटिसा, मंत्री नि व्हाइसरॉयचा सेक्रेटरी इत्यादींच्या भेटीगाठी, खालच्या कोर्टापासून हायकोर्टापर्यंत खटपटी, ब्रम्हदेशाचा प्रवास, स्वयंनिर्णयी संघाच्या सभा,—या साऱ्याला लागणारा पैसा पोटाचे उद्योग सोडून व रक्त आटवूनच त्यांना उभा करावा लागला असेल. पण दारिद्र्याने सगळीकडून फास आवळले असताना हा पैसा त्यांनी उत्साहाने उभा केला नि हसतमुखाने खर्चून टाकला.—कारण त्यांची देशभक्ती अलोट होती, उत्कट होती. अमेरिकेला जाण्याचा उद्योग काय किंवा महाराष्ट्रीय ज्ञानकोश रचण्याचा उद्योग काय, त्यांचे बहुतेक छोटेमोठे उद्योग देशभक्तीतून स्फुरलेले नि झळाळलेले होते. तेव्हा शेवटचे त्यांचे राजकारण मुख्यतः त्याच भावनेतून प्रेरणा घेऊन उठावे, यात आश्चर्य नव्हते.

अखेरच्या काळामधली केतकरांची विचारसरणी कोणाही तर्ककठोर माणसाला पटणार नाही. ती त्याला भ्रांतिष्टपणाची आणि हास्यास्पद वाटेल. पण तर्काच्या जोडीला त्या माणसाजवळ सहृदयता असेल तर तो त्या विचारसरणीला हसणार मात्र नाही. केतकरांचे भीषण दारिद्र्य आठवून तो विषण्ण होईल आणि त्यांची देशभक्ती मनात येताच त्याच्या हृदयातल्या काही उदात्त भावना छेडल्या जातील. त्याला वाटेल, की त्यांचे राजकारण म्हणजे काही हास्यास्पद प्रहसन नव्हते; ती एक करुण नि उदात्त शोकांतिका होती.

१. आठवणी, चिं. वि. जोशी.
२. यशवंत, मे १९३७, 'स्पष्टवक्ता'.
३. प्रतिभा, जुलै १९३७, नी. म. केळकर; आठवणी, लालजी पेंडसे.
४. आठवणी.
५. प्रतिभा, जुलै, १९३७, नी. म. केळकर.

# आकस्मिक अंत

[१९३७]

मृत्यूपूर्वी सुमारे चार वर्षे केतकरांनी 'माझ्या आयुष्यातील जुन्या, बऱ्यावाईट आठवणी' लिहिल्या होत्या आणि त्या आठवणींमध्ये आपल्या आयुष्याचे सिंहावलोकन त्यांनी जाताजाता करून ठेवले होते. त्यात त्यांनी म्हटले होते :

"माझे अंतःकरण...अनेक आयुष्यध्येयांच्या मागे सैरावैरा धावत सुटले आहे. योगमार्ग, देशाभिमान, ईश्वरजिज्ञासा यांनीच मला भटकविले आहे असे नाही; तर विद्येची आवड, भारतीय संस्कृतिरक्षणाची इच्छा, भाषेचा अभिमान या सर्व भावनांनी आयुष्याला गती मिळाली आहे. जेव्हा विशिष्ट भावनेचा जोर होई तेव्हा आयुष्याला काही निराळी गती मिळाल्याशिवाय राहात नसे. किंकर्तव्यमूढासारखे इतस्ततः हिंडणे-देखील बरेच झाले आहे. आयुष्याचे स्वरूप कसे झाले, तर ध्येयांनी भटकणे आणि पोटाच्या म्हणजे निकट फायद्याच्या विचारांनी दुसऱ्या मार्गावर जाणे, म्हणजे 'ताळ्यावर येणे', या दोन शक्तींच्या ओढीत आयुष्याला स्वरूप आले ते आले."[१]...

"ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास आणि नीतिमार्गाने आक्रमण यांचा संबंध थोडा तरी आहे, असे मला वाटत नाही. ईश्वरविषयक भीती मला नव्हती, सैतानविषयक त्याहूनही नव्हती. तरीदेखील माझे आचरण अत्यंत नीतिमान मनुष्यासारखे आहे, अशी माझी समजूत आहे."..."जेव्हा आपल्या सदसद्विचाराविरुद्ध मी आचरण केले, असे प्रसंग मला जवळजवळ आठवतच नाही, असे म्हटले तरी चालेल.—आणि सरळ व प्रामाणिकपणे वागण्यानेच मी पुष्कळ व्यक्तींस अप्रिय झालो असेन, असे वाटते. ईश्वराच्या अस्तित्वाविषयी अविश्वास असून आपणास जे सत्य वाटते त्याप्रमाणे मी अत्यंत लहानपणापासून चालत आलो आहे."[२]...

"मला असे वाटू लागले आहे, की माझा एकंदर आयुष्यक्रम झाला त्यापेक्षा तो

१. प्रतिभा, २८ ऑगस्ट १९३३.

२. प्रतिभा, ३१ जुलै १९३३.

भिन्न होणे जवळजवळ शक्यच नव्हते. माझी हिंदुस्थानच्या कॉलेजातील शिक्षणासंबंधाने जुगुप्सामूलक अपूर्णता, माझे अमेरिकेस जाणे, माझी लेखनव्यवसायाकडेच असलेली प्रवृत्ती, माझे लग्न या सर्व गोष्टी बहुतांशी विशिष्ट नियमांमुळे घडून आल्या. त्यांच्या घटनेत मला खरोखर स्वातंत्र्य नव्हते. मी जरी आपणास स्वतंत्र समजत होतो, तरी परतंत्र होतो. मला पारतंत्र्याची जाणीव मात्र नव्हती."..."विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट प्रवृत्तीचा मनुष्य आल्याने विशिष्ट परिणाम होतो, आणि तो मनुष्य मात्र वेडेपणाने आपण अमूक केले, असा अहंकार बाळगीत असतो, असे आता वाटू लागले आहे."...'विशिष्ट प्रवृत्तीचे श्रेयही व्यक्तीस देता यावयाचे नाही; कारण प्रवृत्तीची कारणे परिस्थितिमूलक, भौतिक, किंवा वांशिक असतात.'[1]

या सिंहावलोकनात त्यांनी जणू आपल्या चरित्राची निरवानिरव केली होती आणि 'इदं न मम' अशा आशयाचे फार अर्थगर्भ उद्गार काढले होते. मात्र मृत्यू आपल्या फार जवळ आला आहे, असे त्यांना कधीही वाटले नव्हते. मृत्यूने पूर्वी दोन वेळा त्यांना अस्पष्ट चाहूल दिली होती. एकदा शांतारामपंत दांडेकरांच्या दहनप्रसंगी, आणि दुसऱ्यांदा त्यांना स्वतःला पिसाळलेले कुत्रे चावले त्या प्रसंगी. पण ज्ञानकोश संपवल्यावर निदान पंचवीसतीस वर्षे जगण्याची उमेद त्यांनी बाळगली होती! त्यामुळे १९३७ च्या एप्रिलमध्ये मृत्यू जेव्हा त्यांच्या उंबरठ्यात येऊन साक्षात उभा राहिला, तेव्हा त्याच्या आगमनाची काहीही पूर्वकल्पना त्यांना नव्हती.

त्या वेळी जीवनाचा केवढा थोरला पसारा मांडून त्यात ते रममाण होऊन गेले होते. १९३५ च्या सप्टेंबरमध्ये आपल्या आवडत्या 'विद्यासेवका'चे पुनरुज्जीवन करून १९३७ पर्यंत त्याचे आठ अंक त्यांनी कसेबसे बाहेर काढले होते; आणि त्याला भरघोस स्वरूप देता यावे, म्हणून त्यांचा जीव तुटत होता. अनेक पूर्ण केलेले ग्रंथ त्यांना प्रकाशित करावयाचे होते, अनेक अपुरे राहिलेले ग्रंथ त्यांना शेवटास न्यावयाचे होते आणि मराठीखेरीज इतर देशी भाषांमधील ज्ञानकोशांच्या योजना ते तडीस लावणार होते. 'प्राचीन महाराष्ट्रा'च्या संशोधनासाठी लंडनला जाऊन बसावे अशी त्यांची इच्छा होती, स्वमताप्रमाणे हिंदी राजकारणाला नवी विधायक दिशा दाखविण्याचा त्यांना हुरूप होता, आणि साऱ्या जगाची समाजरचना अधिक सुखकारक करण्यासाठी त्यांच्या डोक्यात अनेक विचार घोळत होते. मनुस्मृतीप्रमाणे 'श्रीधरस्मृती' लिहिण्याची त्यांची साहसी महत्वाकांक्षा होती[2] आणि ज्ञानकोश संपतासंपता ज्या उत्तुंग नि रम्य कल्पना त्यांनी जाहीर केल्या होत्या त्या पार पाडण्यासाठी ते उत्सुक होते. आपले लेखनिक श्री. हे. रा. खरे यांना त्यांनी एक संच तयार करण्यास सांगितले होते आणि त्यांच्या डोक्यात कोणतीही नवी योजना परिपूर्ण साकार झाली, की ती कागदावर उतरे नि त्या संचात जाऊन पडे. त्या संचात अशा कितीतरी योजना होत्या की ज्या अमलात

१. प्रतिभा, ३१ जुलै १९३३.

२. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ८२.

आणण्यासाठी त्यांचे अधीर हात शिवशिवत होते.[1] आपल्या गजबजलेल्या आयुष्यक्रमात ते नागपूरला जात होते, धुळ्याला जात होते, जळगावला जात होते, सभासंमेलनांत सामील होत होते, थट्टाविनोद करीत होते आणि व्याख्याने देत होते. प्राचीन महाराष्ट्राच्या तीन हजार प्रतींपैकी सुमारे दीड हजार प्रतींचे गठ्ठे शिल्लक होते, ते खपवण्यासाठी उन्हातान्हातून सारा महाराष्ट्र ते तुडवीत होते.[2] मृत्यूने त्यांना अचानक गाठले, तेव्हा ऐहिकाच्या गराड्यात, अभ्युदयाच्या उपासनेत ते इतके गढले होते, की जीवनाला अंत असतो याचे त्यांना जणू भानच नव्हते.

ते बाहेरील जगाच्या व्यापातच केवळ गढले नव्हते, तर स्वतःच्या घरादाराबद्दलही पुष्कळ आशाआकांक्षा त्यांनी मनाशी बाळगल्या होत्या. दामूच्या शिक्षणाची त्यांच्या हातून आबाळ झाली होती, पण १९३६च्या सुमारास त्यांनी त्याला विधिपूर्वक दत्तक घेतले होते आणि त्याची मुंजही रा. चित्रावशास्त्री यांच्या हस्ते लावली होती.[3] आपली दोन्ही मुले मोठी होतील व आपले नाव पुढे चालवायला लायक बनतील, म्हणून त्यांनी नाना मनोरे कल्पनेत उभारले असतील. केव्हा आत्मनिरीक्षणाला सवड मिळाली, की त्यांना आपले चंद्रमौळी घर दिसे, त्या घराला कष्टाने नि प्रेमाने स्वर्गीय राजवाडा बनविणारी आपली गृहिणी आठवे आणि हे घर आपण सावरून संपन्न केले पाहिजे, असे विचार त्यांच्या मनात डोकावून जात. मृत्यूपूर्वी थोडे दिवस ते शीलवतीबाईंना भावविवश होऊन म्हणाले होते, की 'विलायतेतून इथे मी तुला बोलावले, पण थोडेसुद्धा सुख माझ्या हातून तुला मिळाले नाही.' (I brought you from the continent, but I could give you no pleasure.) त्यावर शीलवतीबाई म्हणाल्या होत्या, 'छे, छे, डॅडू! मला पोटभर सुख मिळाले आहे' (No, Dadoo! I have had plenty of it.)[4] साहजिकच आपल्या एकनिष्ठ पत्नीला सुखाचे दिवस दाखविण्यासाठी त्यांच्या मनाची घालमेल चालली होती, हे उघड होते.

पण जगाच्या नि घराच्या संसारात ते असे हजार प्रकारांनी मग्न झालेले असतानाच मृत्यूने त्यांच्यावर गिधाडासारखी झेप टाकली आणि त्यांना इहलोकातून आकस्मिक उचलून नेले! विजेचा प्रवाह बंद पडून, समोर दिसणारी रंगीबेरंगी प्रकाशमय नि गजबजलेली नगरी क्षणार्धात दिसेनाशी व्हावी, तसे झाले!

१९३७च्या प्रारंभी श्री. नी. म. केळकरांना ते एकदा पुण्याला रस्त्यात भेटले आणि केळकरांशी भर उन्हात दोन तास बोलत राहिले. केळकरांना ते थकल्यासारखे दिसले आणि केळकरांनी त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तेव्हा ते म्हणाले, "आता मी रोडावलो नसून मेद कमी झाल्यामुळे माझी प्रकृती उलट चांगलीच

१. आठवणी, हे. रा. खरे.
२. आ. रा. देशपांडे, प्रतिभा, जुलै १९३७; रा. म. आठवले, लोकशिक्षण, जुलै १९३७, वगैरे.
३. डॉ. केतकरांचे सान्निध्य, दाते-कर्वे, पृष्ठ ९०.
४. आठवणी, हे. रा. खरे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २५८११ वि: चरित्र/०२९९
नों: दि: २५।११।५५



सुधारली आहे!" पण प्राण कुरतडणारे दारिद्र्य व अपरंपार कष्ट यांनी त्यांची प्रकृती दिवसेदिवस खालावत चालली होती.[१] लग्न झाल्यानंतर त्यांच्या शरीरात साखर आढळली होती आणि मधुमेहाच्या विकाराने त्या शरीरात कायमचे ठाणे दिले होते. पण साखरेऐवजी सॅकरीन टाकून ते चहा घेत, वैद्यांनी ठरवून दिलेल्या शास्त्रोक्त आहारावर शक्यतो राहात आणि त्यामुळे मधुमेह कधी चळावला नव्हता. जवळजवळ शेवटपर्यंत त्यांची तब्येत चांगली सुदृढ होती.[२] पण १९३७ मध्ये, दारिद्र्य व कष्ट यांमुळे ते खचले आणि त्या वर्षीच्या मार्च महिन्यात मधुमेहाने उचल खाल्ली. अशा स्थितीत, फाटक्या पादत्राणाची चूक त्यांच्या पायाला लागून तेथे भोवरी झाली. भोवरीवर शस्त्रक्रिया करण्याचा प्रसंग आला तेव्हाच त्यांनी ओळखलें, की 'यातून डॉक्टर आपणाला वाचवतील अशी खात्री नाही.' मृत्यूपूर्वी बरोबर बारा दिवस श्री. या. श्री. अणे त्यांच्याकडे गेले होते, तेव्हा दिलखुलास गप्पा मारतामारता आपली ही आशंका त्यांनी स्मितपूर्वक बोलून दाखविली होती![३]

सेवासदनाजवळील एका डॉक्टरीणबाईंनी त्यांच्या भोवरीवर शस्त्रक्रिया केली, पण तीत 'सेप्टिक' झाले! सेप्टिक झाल्यावर गोरगरिबांच्या ससून रुग्णालयात त्यांना नेण्यात आले; पण रोग्यांच्या त्या मोठ्या कारखान्यात त्यांच्याकडे पुरेसे लक्ष दिले गेले नाही. असे म्हणतात, की तेथे त्यांच्या आजाराची नीट परीक्षा झाली नाही आणि त्यांच्यावर जे उपचार करण्यात आले ते काही अंशी अघोरी होते! त्या उपचारांनीच त्यांच्या शरीराची सारी यंत्रणा बिघडली, त्यांना बेशुद्धी आली, आणि बेशुद्ध अवस्थेत ते मरण पावले! ती १० एप्रिलची रात्र होती नि तेव्हा रात्री दहाचा सुमार झाला होता. मृत्यूने इतक्या झपाट्याने त्या रात्री त्यांना आपल्या काळ्या पडद्याआड उचलून नेले, की काय घडले नि कसे घडले, हे शुश्रूषा करणाऱ्या माणसांना प्रथम उमजलेही नाही. मग मात्र वस्तुस्थितीची जाणीव सर्वांना झाली आणि शोकाचा एकच उमाळा संयमाचे बांध फोडून बाहेर पडला. पूर्वी ज्ञानकोश-मंडळात मतभेद झाल्याची केतकरांची साधी तार आली, तेव्हा शीलवतीबाई उभ्याच्या उभ्या मूर्छित झाल्या होत्या. आता तर त्यांचे सौभाग्यसर्वस्व, त्यांचा प्राण हिरावला गेला होता. अशा स्थितीत त्यांना केवढे दुःख झाले असेल, त्यांच्या हृदयाचे कसे शतशः तुकडे झाले असतील, त्यांच्या डोळ्यांसमोर कसा शून्यांधकार पसरला असेल, ते कल्पनेनेच जाणले पाहिजे.[४]

१० एप्रिलच्या रात्री केतकर गेले; पण त्यांच्या मृत्यूची वार्ता ११ एप्रिलच्या वृत्तपत्रांमधून पुणे-गावाला समजली. बरीच वर्षे ते लष्कर-भागात राहात असल्यामुळे

१. नी. म. केळकर, प्रतिभा, जुलै १९३७.
२. आठवणी, शीलवती केतकर, इत्यादी.
३. श्री. रा. पारसनीस, लोकशिक्षण, मे-जून १९३७; आठवणी, हे. रा. खरे; या. श्री. अणे, महाराष्ट्र, ५ मे १९३७.
४. आठवणी, हे. रा. खरे, शीलवती केतकर; श्री. रा. पारसनीस, लोकशिक्षण, मे-जून १९३७.

गावातील लोकांशी त्यांचा संबंध कामापुरताच येत असे आणि त्यांचा आजार व अंत या गोष्टी तर तडकाफडकी घडल्या होत्या. त्यामुळे १० एप्रिलच्या रात्री त्यांच्या मृत्यूची वार्ता गावात फारशी कोणाला समजली नव्हती. ११ एप्रिलला सकाळीं मात्र ती वार्ता समजताच त्यांना जाणणाऱ्या प्रत्येकाला आश्चर्याचा अन् दुःखाचा जबर धक्का बसला. अनेक जणांनी ससून रुग्णालयाकडे धाव घेतली आणि अनेक जण त्यांच्या राहात्या घराकडे घाईघाईने गेले. शीलवतीबाईंच्या शोकविव्हल मनात केतकरांचे तेराचौदा वर्षांपूर्वीचे शब्द कालपरवा ऐकल्यासारखे ताजेपणाने घोळत होते, की 'मी जर प्रथम मृत्यू पावलो तर काही झाले तरी माझे दहन करू नका!' त्या वेळीं शांतारामपंत दांडेकरांचा दहन-संस्कार पाहून त्यांची जी अवस्था झाली होती तीही शीलवतीबाईंना स्पष्ट आठवत होती. तेव्हा त्यांच्या शवाचे दहन न करता ते पुरावे, त्याचे दफन करावे, असे त्यांनी ठरवले होते. केतकरांच्या दरिद्री घरात त्यांच्या अंत्यसंस्काराला पुरतील एवढेही पैसे या प्रसंगी नव्हते! पण कर्त्या नि सुशिक्षित स्त्रीला साजेसे धैर्य धरून, त्यांनी एका मनुष्याकरवी मोतीचौकातील डॉ. पी. एम. केतकर यांच्याकडून शंभर रुपये उसने आणवले होते आणि ख्रिस्ती ॲडव्होकेट श्री. चक्रनारायण यांच्या मदतीने लष्करामधल्या एका ख्रिस्ती दफनभूमीतील जागा दफनासाठी बघून ठेवली होती. गावातील मंडळीं त्यांच्याकडे आली, तेव्हा केतकरांची स्वतःच्या अंत्यसंस्काराविषयीची इच्छा त्यांनी त्यांना सांगितली. केतकरांच्या मुलखावेगळ्या वर्तनामुळे नि विचारांमुळे ती मंडळीं आजवर पुष्कळदा थक्क झाली होती; पण आता ही इच्छा ऐकून थक्क होण्याचा त्यांच्यावर शेवटचा प्रसंग आला! केतकरांसारख्या हिंदू संस्कृतीच्या अभिमान्याचे, आर्य ब्राम्हणाचे दफन व्हावे, हे त्यांना पटेना; पण शीलवतीबाईंनी सांगितलेली इच्छा त्यांना नाकारताही येईना. अखेर श्री. चिं. ग. कर्वे व श्री. काकासाहेब लिमये यांनी अशी तोड काढली, की केतकरांचे दफन होणार असेल तर होऊ दे, पण ते निदान ख्रिस्त्यांच्या दफनभूमीत नको, ते हिंदूंच्या दफनभूमीत व्हावे. व्रात्यस्तोमपूर्वक हिंदू झालेल्या शीलवतीबाईंनीही समजुतदारपणाने ही तोड मान्य केली. मग, नव्या पेठेत ठोसरपागेजवळ हिंदूंची जी दफनभूमी आहे तीमधील मुठा नदीच्या काठची एक जागा शीलवतीबाईंना नेऊन दाखविण्यात आली व त्यांना ती पटल्यावर नक्की करण्यात आली. महाराष्ट्र-साहित्य-परिषदेच्या ठेकेदारांनी पाचसहा तासांत खड्डा खणून, बांधून काढला. सायंकाळीं पाच वाजता केतकरांचे शव ख्रिस्ती पद्धतीच्या घोड्याच्या गाडीतून, पेटीमधून, शीलवतीबाईंनी परिषदेच्या कचेरीत आणून ठेवले. पाहाणाराला त्या शवाच्या मुखावर समाधान नि स्मित हळुवारपणे तरळताना आढळत होते. केतकरांनी आपल्या साऱ्या जीवनाचे श्रेय परिस्थितीला, भौतिक नि वांशिक कारणांना पूर्वीच देऊन टाकले नव्हते का? अत्यंत नीतिमान मनुष्याप्रमाणे आपले जीवन व्यतीत झाले, अशी तृप्तीची ढेकर त्यांनी पूर्वी दिली नव्हती का? मग त्यांच्या मुखावर समाधान नि स्मित मेल्यावरही तरळावे, हे स्वाभाविक होते. परिषदेच्या आवारात अनेकांनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले, अनेकांची भाषणे झाली आणि नंतर मोठी प्रेतयात्रा

निघून ती स्मशानभूमीत पोहोचली. नव्या पेठेतील त्या हिंदू स्मशानभूमीत रात्री आठचे सुमारास केतकरांना मूठमाती मिळाली. त्या वेळी रा. य. रा. दात्यांनी ऋग्वेदामधील दहाव्या मंडलातील मंत्र म्हटले आणि विधी संस्कारयुक्त केला. महाराष्ट्राच्या ज्या मातीतून केतकरांचे जीवन निपजले होते त्याच मातीत ते जीवन अशा लोकविलक्षण रीतीने विलीन झाले.[1]

आता एक चौथरा केतकरांच्या देहाचे अवशेष पोटाशी घेऊन नि त्यांचे नाव मस्तकावर धारण करून नव्या पेठेतील त्या स्मशानभूमीत वर्षानुवर्षे पडला आहे. त्याच्यावर कधी ऊन तर कधी पाऊस, कधी ढगांच्या सावल्या तर कधी मखमली धुके यांचा उदार हात फिरत आहे. शेजारून मुठा नदीचा प्रवाह केव्हा भरभरून वहातो, तर केव्हा क्षीण होऊन वहातो. वर्षाकाठी १० एप्रिलचा दिवस उजाडला, की काही कृतज्ञ नि सहृदय माणसे त्या ओसाड स्मशानभूमीत जातात आणि चौथऱ्यावर फुले वहातात. क्वचित अश्रूही वहातात. या चौथऱ्याखाली केतकरांच्या देहासाठी जो खड्डा खणला त्या खड्ड्याशेजारी शीलवतीबाईंनी स्वतःसाठीही जागा राखून ठेवली आहे. आपला देह पडेल तेव्हा पतीशेजारीच शेवटची निद्रा आपणाला घ्यायला मिळावी, अशी आर्त इच्छा त्यांनी हृदयाशी बाळगली आहे.

स्थलप्रत.
... दि: ...
अनुक्रम .. ... नों दि: ...
क्रमांक ...

१. चिं. ग. कर्वे, ध्रुव, मे १९४९; श्री. रा. पारसनीस, लोकशिक्षण, मे-जून १९३७; आठवणी, शीलवती केतकर, य. रा. दाते; त्र्यं. शं. शेजवलकर, प्रतिभा, जुलै १९३७.

# सूची

[वास्तव व्यक्ती आणि केतकरकृत ग्रंथ व नियतकालिके]


### अ

अक्कलकोटकर विष्णुबुवा, १५५
अगम्यगुरु, १४
अगस्त्य, २६१, २६२
अणे मा. श्री., २५७, २८५, २८६
अणे या. श्री., २९९
अभ्यंकर अण्णंभट, १२६
अय्यर ए. के. अनंतकृष्ण, ६७
अशोक, २५८, २६०, २६१
अश्मक, २५९, २६०, २६४
अळतेकर अ. स., १३१, २५८, २५९

### आ

आखवे रामशास्त्री, ११०
आगटे, २४२, २८६
आगरकर गो. ग., २६, २५४
*आंगिरसांचे सत्र*, २५५, २५६
आठल्ये ज. ह., ७८
आत्मानंद सरस्वती, १५३
आपटे वा. शि., २११
आपटे ह. ना., २०, १७५
*आशावादी अथवा एका प्रवाहपतिताचे चरित्र*, १७४, १८६ ते १८९, १९०, २११, २१२, (२५४)

### इ

*इंडियन इकॉनमिक्स (ॲन एसे ऑन –)*, ५७ ते ५८, ५९, ६४, १२०
इब्न इशाक, २००

### उ

उत्तर *अमेरिकेतील वसंतकाल*, ३८, (३६ ते ३९), १७५
उदयन, २६०, २६३

### ए

एकनाथ (संतकवी), १४, १९१
एजर्टन, २८
एन., ८, ९, १०, ३७, ५३, १०५
एम., ८, ९, १०

### ओ

ओक (गीर्वाणलघुकोशकार), २११
ओगले गोपाळराव, ८४, ८६
ओपर्ट गस्टाव्ह, १२३, १२४
ओल्डेनबर्ग, १२७

### क

कठाळे, १०२, १४२, १४३
कर्झन, १५
कर्वे इरावतीबाई, ४८, २७३
कर्वे कृ. गो., १६
कर्वे चिं. ग., ११०, १११, १४४, १४६, १४७, १५५, १६४, १६५, २०३, २१४, २१८, २२०, २३२, २३३, ३००
काटदरे द. स., २४२
काणे पां. वा., १३
काणे भा. गो., ४३, ४४, ४५, ५३

कात्यायन, २६४
कादरभाई, २००, २०१
*कायस्थप्रभूंचा सामाजिक इतिहास* २५८, २६७
कार्नेगी अँड्र्यू, ४०, १६७
कालिदास, ५, २१०, २६०
काळे श्री. गो., १०६
किंकेड (इतिहासकार), १२३
किर्लोस्कर (नाटककार), ५
कुंटे म. मो., १२९, १३५
केतकर
—गोविंद रघुनाथ, ५
—दामोदर व्यंकटेश, १, २, १८, २४१
—दामोदर श्रीधर, २२६, २२७, २२९ ते २३५, २३७, २४२, २४३, २९८
—नारायणराव ऊर्फ नानासाहेब, २, ११, १२, १८, १९, २५, १६०
—परशुराम महादेव, २४२, ३००
—प्रभाकर व्यंकटेश, १
—भिकुताई, १, ११, ३५, ४१
—लक्ष्मीबाई, १, २, १०, ११, ३५, ४१, २२७
—विठ्ठलपंत, १, २
—वीरा, २२६ ते २३५, २३७, २४२, २४३, २९८
—व्यंकटेशपंत, १, २, १८, ३५, ४१
—शीलवतीबाई, ११० ते ११७, १२६, १३९, १४०, १४२, १५३, १५५, १५६, १६०, १६१, १७३, १८४, २०१, २१५, २१६, २१७, २२६ ते २४३, २८४, २९८ ते ३०१ (पाहा : कोहन ईडिथ व्हिक्टोरिया)
केळकर न. चिं., १५६, १६०, १९४ ते १९९, २१४, २२३, २२४, २७५
केळकर नी. म., २६५, २७६, २७७, २९८
कोल्हटकर अ. ब., ९८, १९५, २१५, २१६, २१७
कोसंबी धर्मानंद, ६०, ८०, ८१, ८२, ९९, २०२
कोहन
—ईडिथ व्हिक्टोरिया, ५२ ते ५४, १०५, १०६, १०८ ते ११०, १३९, १४०, १४१, १५८ (पाहा : केतकर शीलवतीबाई)
—कोहन (श्रीयुत), ५२, ११५, ११६, ११७, १५८, १६०, २२७
—हेटी, ५२, ११५, ११६, ११७, १५९, १६०, २२७, २२८, २३२, २४१, २४२

## ख

खरे ना. भा., ८४, १०२, १३९, १४१, २८५, २८६
खरे वासुदेवशास्त्री, १४३, १४४
खरे हे. रा., २७६, २९५, २९७
खाडिलकर कृ. प्र., १९
खान गुलाबखान बशिरुद्दिनखान, २१५ ते २१८, २४०
खापर्डे गणेश हरी, ८
खापर्डे दादासाहेब, २०९
खारकर महादेवराव, १३
खेर वा. गं., १३
ख्रिस्त, १४

ग

गडकरी बा. सं., ४, ५, १४, १९, २०, २१, १६०, १७४
गॅरिक, २४३
गाडगीळ बॅरिस्टरांच्या पत्नी, ११२
गांधी महात्मा, १५६, १६५, १६६, १६७, १६९, १७२, २१३, २७०, २७१, २७८, २७९, २८२, २९१, २९२, २९३
गामा, २६६
गायकवाड, ७
गायकवाड सयाजीराव, २५, ३१, ५६, २८४, २९१
*गावसासू, परागंदा भारतीयांचे एक समाजहृद्य*, १७४, २५२
गिडिंग्ज, ३३, ३४
गुणे पां. दा., १३
गोखले, २४२
गोखले गो. कृ., ६७, ७५
गोखले बबनराव, २४१
गोखले व्ही. वी., २३१
गोडबोले परशुरामतात्या, ४
*गोंडवनातील प्रियंवदा व घरकुट्टे घराण्याचा इतिहास*, १७३ ते १७९, १८३, १८८, १९०, २४९, (२५४)
गोंदवलेकर महाराजांचे शिष्य, २३२
गोपीनाथराव टी., ६६, ६७
गंगाबाई, १२

च

चक्रनारायण, ३००
चतर्जी रामानंद, ६३
चर्चिल विन्स्टन, २८५
चांदोरकर, २०२
चांदोरकर आबा, १५५, २१८, २२०, २२७, २२८, २३१
चाफेकर दामोदरपंत, ८
चार्वाक, १३२
चितळे वासुदेवराव, १५५
चिंतामणिपेठकर, ४, ५
चित्राव सिद्धेश्वरशास्त्री, १२६, १४४, १४६, २९८
चिपळूणकर कृष्णशास्त्री, ४, ५
चिपळूणकर विष्णुशास्त्री, २७, २५४
चिरोल, ४५, ४६
चोळकर, ७९, ८४
चंदावरकर (सर) नारायणराव, १७, ८०, ८१

ज

जकातदार विष्णुपंत, १४१, १४२, १५२
जॅक्सन, १६
जॉन्सन, २४३
जाफर (सर) इब्राहिम हरुन, २०१
जेंकिन्स जे. डी., २३४
जेंक्स, ३४
जोशी चिं. वि., १९१, २९४
जोशी जुन्नरकर, ७
जोशी (सर) मोरोपंत, २०९
जोशी वा. म., १७५, १८६, २५५
जोशी वासुदेवराव, १९७
जोशी (वीर) वामनराव, ४, ५
जोशी सॅम्युअल लूकस, २५

ट

टागोर रवींद्रनाथ, १९
टॉल्स्टॉय, २३७
टिकेकर श्री. रा., २१४

टिळक ग. ना., २२०
टिळक रामभाऊ, २१८, २२३
टिळक लोकमान्य, १५, १९, २७, ६३, ७९, ८०, ८२, ८३, ९५, ९७, १०९, ११०, १३५, १४४, १५६, १६६, १९५, १९६, १९७, १९८, २१३, २१८, २२०, २५४, २८४:
टिळक श्रीधरपंत, १७३

### ठ

ठाकूर रावबहादूर, ८५
ठेंगडी, १००, १०१, १०२, १४३

### ड

डांगे श्री. अ., २४८
डिडेरो, ९५
डेव्हिड्स व्हिस, २८
डोंगरे, २३०

### त

तापीबाई, १०४
तांबे (गव्हर्नर), २०९
तांबे गो. चिं., ९३, ९४, १७८, २३१
तालचेरकर हरिश्चंद्र, २०, ४३, ४४
तुकाराम (संतकवी), १४, १९१
तेरेदेसाई, २०५
तंट्या (भिल्ल), १
त्रिवेदी अतिसुखशंकर कमलाशंकर, २६९

### थ

थत्ते ना. वा., ४
थर्स्टन, १२३

### द

दस्तगीर गुलाम, २०२
दांडेकर, २४१
दांडेकर गो. कृ., २९४
दांडेकर प्रेमावती, १६०, २३२
दांडेकर शांतारामपंत, ३, २१, ११२, १४३, १६०, १६१, २१२, २२९, २३१, २९७, ३००
दातार चिंतामणभट्ट, १२६, १२७, १४४, १४६, २२०, २४१
दाते, ८३
दाते य. रा., ८९, ९५, १०७, ११०, १११, १२६, १२७, १३५, १४४, १४५, १४६, १४७, १४८, १५०, १५५, १५७, १६४, २०२, २०३, २१४, २१८, २१९, २२०, २२१, २३१, २३३, २३४, २४०, २४१, २६९, ३०१
दिमटिमकर अब्दुलरहीम, २००
दिवेकर स. मा., १५७
देव शंकरराव, २९३
देशपांडे आ. रा., १५९
देशपांडे कुसुमावती, २५५
देशपांडे य. खु., ३, ४, ५, ६, १३, १०६
देशपांडे व्ही. एल., २४१
देशपांडे स. वा., ९५, १४४, २०३
देशमुख रा. त्र्यं., ८९
देशमुख रामराव, २०९
देसाई गोपाळराव, २०४

### न

नगरकर गोरखनाथ, ४३
नवाबअल्ली, २००
नानालाल कवी, २६९
नायक ल. बा., २०५
नायर कृष्णन, ६७

निजाम, १०३, २००, २७४
*निःशस्त्रांचे राजकारण*, १६४, १६५ ते १७३, २७७, २८१, २९२
नृसिंह, २६४
नेल्सन, २८१

प

पटवर्धन वासुदेवराव, ८०
परचुरे, २३०
*परागंदा, भारतीय समाजाची सरहद्द*, १७४, १७९ ते १८६, १८८, १९०, २५२, २७६
परांजपे (सर) र. पु., ५५, ९६
परांजपे वि. वि., १५३
पाठक बाबा, १
पाणिनी, २६४
पाणंदीकर मालिनी, २१५, २१६, २१७, २१८, २४०
पाणंदीकर सत्याश्रय, २१६
पाध्ये म. कृ., ७९, ८४, ९२, ९३, ९४, ९५, १००, १०१, १०२, १३८, १३९, १४०, १४१, १४२, २०७
पारखी शं. पां., २०३
पारसनीस (इतिहासकार), ४५, १२३
पारसनीस श्री. रा., २९३
पार्गिटेर, १२७
पियर्सन (रेव्हरंड), ४५
*पुणे-समाचार*, २१४ ते २१९, २२३
पेंडसे लालजी, २२४, २२५, २३५, २४८, २६६, २७०, २७८
पेशवे, ६, ७, १२५, १८४
पेशवे नानासाहेब, ६, ७, १२, २७९
पेशवे बाळाजी बाजीराव, २९१
पोतदार द. वा., ६३, १३६, १५७, २०८, २९३
पंडित शं. पां., १२३, १३५
*प्राचीन कहाण्या*, १६५
*प्राचीन महाराष्ट्र, आदिपर्व, पहिली आठ प्रकरणे*, २५८, २५९, २६८
*प्राचीन महाराष्ट्र, महाराष्ट्र व मौर्यसत्ता*, २५८, २५९, २६८
*प्राचीन महाराष्ट्र, शातवाहनपर्व, वि. १ ला, कुरुयुद्धापासून शकारंभापर्यंत*, २१०, २१८, २३४, २५६ ते २६८, २६९, २७२, २७३, २८०, (२८५, २९७), २९८
*प्राचीन महाराष्ट्र, शातवाहनपर्व, वि. २ रा*, २६७
*प्राचीन महाराष्ट्र, शातवाहनपर्व, वि. ३ रा*, २६७.

फ

फकिरा, २२९
फडके ना. सी., ६१, ८०, ८४, ९३, १०१, १०२, १४२
फडके वासुदेव बळवंत, ८, २७
फडणवीस नाना, ७, १२
फाटक दि. य., ३, २१, २२, २४, १४२, २३१
फाटक लक्ष्मणराव, १४३
फाटक विनायकबुवा, १४
फाटक स. कृ., १३९
फोर्ड हेन्री, ११५

ब

बकलंड, २८
बनहट्टी श्री. ना., २९३

बाजी प्रभू, १६५
बापट धुं. ग., १०७, १२६, १२७, १४४, १४६, १४७, १४८, १५५, १६०
बापट रामकृष्ण, २३०, २३३
बापट सेनापती, १०७, ११०, १४४, १५५
बांवर्डेकर, २०५
वार्नेट, २८
बुटी, ९५
बुद्ध गौतम, ६०, २०२, २०३, २५९, २६०, २६१, २६२, २६३
बुल्हर, २६३
*ब्राम्हणकन्या*, १७४, २२८, २३९, २४५ ते २५१, २५२, (२५४)

भ

भट अच्युतराव, ६३, ११६, १४३, २७१
*भटक्या*, १७४, २५३, २५४
भट गोविंदराव, २३१
भवाळकर, १००, १०१, १०२, १४३
भागवत राजारामशास्त्री, १३५, १५८
*भारतीय समाजशास्त्र*, २७२, २७३
भांडारकर रा. गो., १७, ८०, ८१, ८२, ९७, ९९, १४४, १९६, २५४ २५६
भालचंद्र (सर), ९६
भावे ल. के., १४४, १५५
भावे शं. वि., २४२, २६९
भीष्म, ३९

म

मॅकडोनेल, २८, १२७
मॅकिकन, १२, १३, १४
मॅझिनी, २४
मराठे ग. स., ४४
महाजनी वि. मो., १४, १९६
*महायुद्धोत्तर जग*, २७१
*महाराष्ट्र वाग्विलास*, २०, २१, २७
*महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण अथवा महाराष्ट्रीय वाङ्मयाभिरुचीच्या इतिहासातील एक प्रकरण, विभाग १ ला, ब्रिटिश सत्तेपूर्वीचा काल*, १६४, (१८९), १९० ते १९२, २१३, २१८
महंमद पैगंबर, १५५, १९९, २००, २०१, २०२
माडखोलकर ग. त्र्यं., १७४
मांडुस्कर भि. मो., २०४, २०५
माधव ज्युलियन, २५१
मॉरिसन (सर) थिओडोर, ७३
मार्क ट्वेन, २४
मार्किस ऑफ झेटलंड, २८६
मार्गोलिथ, १९९, २००
मित्र का. र., १४, २०
मिराशी वि. वा,. २१०, २५७, २५९
मिल्टन, १५
मुकर्जी (सर) आशुतोष, ५७
मुक्तेश्वर (कविवर्य), ३
मुंजे (डॉक्टर), ७९, ८४, ८६
मुदलियार मुत्तय्या, २७१
मुनशी कन्हय्यालाल, २७०
मुल्ला बडे, २०१
मेहेंदळे तात्यासाहेब, ६३, १५७
मोरोपंत (पंडितकवी), ३, ५

र

रघुनाथपंडित (पंडितकवी), ३

रनू लुई, १२८
रमाबाई पंडिता, २२
रँड, ८
राजवाडे रा. शं., १५७
राजवाडे वि. का., ३९, ४५, ६३, ७९, ८२, ९६, ९७, १२८, १४४, १५६, १५७, १५८, १६५, १७६, १७७, २०४, २०८, २१३, २२८, २५६, २६४
राजवाडे वै. का., ९९, १००, १०६
राजशेखर, २६१
रानडे एन. बी., २११
रानडे म. गो., १७, २६, २५४
रॉबर्टसन, १५
रॉबर्टसन (सर) बेंजामिन, ८५, ८६
राम (दाशरथी), ३९, २६२
रॉय मानवेंद्रनाथ, १६९
रॉस, २८, ३४
रिस्ले (सर) एच., २८

ल

लजपतराय लाला, १८३, १८४
लक्ष्मणराव के. व्ही., ६७
लक्ष्मीपती अच्यन्त, ६६, ६७
लाँग, ३२
लानमन, ३०
लिमये काकासाहेब, ३००
लिमये प. म., ५८
लेले गणेशशास्त्री, ४
लेव्ही, २६३
लोकहितवादी, २६, २५४
लोकस एम. जी., १३९

व

वझे, १९५
वररुची, २५९, २६१, २६३, २६४
वर्दे श्री. म., २५८
वॉक्शवायलर, २८
*वाङ्मयसूची (महाराष्ट्रीय –)*, ८९ ते ९१, ९२, १०८, ११८, १४३
वामन (पंडितकवी), ३, ३४
वॉर्ड लेस्टर, ३३, ३४, ६२
*विचक्षणा*, १७४, २५२ ते २५४
विजापूरकर वि. गो., १४, ७८
विंटरनिट्झ, २८, १०६, ११६, १२७, १२८, १३५, १३९, १४०
विद्यागौरी लेडी, २६९
*विद्यासेवक*, १६३, १६४, १६५, १७२, १७३, १७४, १७५, १७९, १८६, १९०, १९२, १९३, १९४, २०८, २४५, २९७, (१६३ ते १९३)
विलकॉक्स वॉल्टर एफ., ३०, ३२, ३३, ३४
विल्सन (इतिहासकार), २०४
विवेकानंद, १४, २२, ७१
वेबर, २६३
वेलिंगकर, २४४
वैद्य, ४६
वैद्य एल. आर., २११
वैद्य गजाननराव, ११०
व्यास, १२४
व्हाइट अँड्र्यू डी., ४०
*व्हिक्टोरियस इंडिया*, २७३, २८९, २९०, (२७८ ते २९३)
व्हिक्टोरिया राणी, २८०

श

शहा रुखयारजंग, २०२
शातवाहन, २५८, २६०

शिकंदर, २६४
शिंदे, ७
शिलोत्री प्रभाकरपंत, १३, १८, १९, ३९, ६३
शिवरामस्वामी, ५, १९१
शेजवलकर त्र्यं. शं., २४२
शौकतअली, २०२
शंकराचार्य, १११

## स

सरकार (सर) यदुनाथ, १७६, १७७
सरदेसाई नानासाहेब, २४२, २४३
साठे एल. जी., १३
साठे धोंडोपंत, १४३
सांबारे, ७८
सावरकर वि. दा., १६, १९, २७
सिंग, २४२
सीतारामय्या पट्टाभी, ६९
सुदास, २६१, २६२
सेनार्ट, ४६
*संकीर्ण लेख*, ५६
*स्त्रीसत्तापराभव*, १६४
स्पेन्सर, १९२
स्पेयर, २६३
स्मॉल अलबियन, ३४
स्मिथ व्हिन्सेन्ट, २८, २६३
स्टँडेन बी. पी., ७३, ८५

## ह

हॉपकिन्स, २८, ४६
हारग्रेव्ह्ज, २५७
*हिंदुइझम (ॲन एसे ऑन हिंदुइझम, इट्स फॉर्मेशन अँड फ्यूचर)*, ४३, ४६ ते ५२, ५८, ६४, ११९, १२९, १८२
*हिंदु लॉ अँड दि मेथड्स अँड प्रिन्सिपल्स ऑफ दि हिस्टॉरिकल स्टडी देअर-ऑफ*, ५९
हिलेब्रँट, १२९
*हिस्टरी ऑफ कास्ट (दि हिस्टरी ऑफ कास्ट इन इंडिया, प्रथम खंड)*, २६ ते ३०, ४६ ते ४९, ११९, १२९
होअर (सर) सॅम्युअल, २८६
होडीवाला एस. एस., २७०
होळकर, ७
हौग मार्टिन, १२९
ह्यूम, ८५

## क्ष

क्षीरसागर श्री. के., ५९

## ज्ञ

*ज्ञानकोश (गुजराती –)*, २१९, २४२, २६८ ते २७१, २७८, २९१, २९५
*ज्ञानकोश (महाराष्ट्रीय –)*, ३०, ३३, ६७, ६८, ७६, ७७ ते १०४, १०६, १०७, १०९, ११०, ११४, ११८ ते १३७, १३८ ते १५६, १५७, १६०, १६२, १६३, १६४, १७४, १७८, १८२, १९२, १९३, १९४ ते २१४, २१६, २१९ ते २२३, २२५, २२९, २४०, २४१, २५६, २५७, २६७ ते २७४, २७७, २७८
– विभाग १ ला, हिंदुस्थान आणि जग, ११९ ते १२५, १३६, १३७, १५०, १५७
– विभाग २ रा, वेदविद्या, १२५ ते १३५, १३६, १३७, १५०

—विभाग ३ रा, बुद्धपूर्व जग १२५ ते १३५, १३६, १३७, १५०
—विभाग ४ था, बुद्धोत्तर जग, १३५, १३६, १५१, १९९, २०२, २०३, २०६
—विभाग ५ वा, विज्ञानेतिहास, १३५, १३६, १५१
—विभाग ६ ते २१, शरीरखंड, ११८, १४३, १४५, १४९, १५०, १५१, २०३, २०४, २०५, २०७, २१४, २२१
—विभाग २२ वा, सूचीखंड, २२१
—विभाग २३ वा, हिंदुस्थानखंड, २२१, २५६
*ज्ञानकोश (हिंदी –)*, (२६८, २६९), २७१, २७८
*ज्ञानकोशमंडळाचा इतिहास (माझे बारा वर्षांचे काम ऊर्फ –)*, २०७, २१८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ......... वि: ..........
क्रमांक ................ नों: दि: ..........

REFBK-0010346

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०३४५

# शुद्धिपत्र

[काही ठळक चुकांचे]

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | २१ | १८९९ | १८८९ |
| २ | १४ | साहजिकच पुरुषाचा | साहजिकच कर्त्या पुरुषाचा |
| ५ | १७ | १८९९ च्या | १८९९ साली |
| १३ | ८ | राहिला. | राहिला.[१] |
| २५ | ९ | अमेरिकेमध्ये होते. | अमेरिकेमध्ये होते.[२] |
| ३१ | ५ | संशोधन करणे आवश्यक वाटू लागले. | संशोधन करणे त्यांना आवश्यक वाटू लागले. |
| ३४ | २१ | येथील | तेथील |
| ५२ | ९ | विचारातून आचाराला गती मिळावी | विचारातून आचाराला आणि आचारातून विचाराला गती मिळावी |
| ५३ | ६ | हिंदू, ब्राम्हण नि कोकणस्थ | हिंदी, महाराष्ट्रीय |
| ५५ | ८ | त्यांनी काढले होते. | त्यांनी काढले होते.[१] |
| ६७ | टीप १ | पृष्ठे १६, १९ २०. | पृष्ठे १६, १९, २०. |
| ७५ | २२ | पाश्चात्य केतकरांनी पदवीधरांचा | केतकरांनी पाश्चात्य पदवीधरांचा |
| ८९ | टीप १ | पृष्ठे ४२ ते ४५, १३३, १२४ | पृष्ठे ४२ ते ४५, १२३, १२४ |
| ९४ | २२ | ‘रजिस्ट्रार ऑफ कंपनी’ | ‘रजिस्ट्रार ऑफ कंपनीज’ |
| १३२ | १ | यजुवदात | यजुर्वेदात |
| १३५ | २७ | तो इतके दिपले | ते इतके दिपले |
| १३५ | ३१ | ‘युद्धोत्तर जगा’वर | ‘बुद्धोत्तर जगा’वर |
| १३६ | १४-१५ | टेकाडात नि उंचवट्यात | टेकाडांत नि उंचवट्यांत |
| १४१ | २५ | शाठ्या नीतीपुढे | शाठ्य नीतीपुढे |
| १४४ | टीप १ | राजवाड | राजवाडे |
| १४५ | टीप १ | पृष्ठे १५६ ते १९५८ | पृष्ठे १५६ ते १५८ |
| १५५ | ३ | असा प्रकारे | अशा प्रकारे |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १५५ | टीप १ | ब॑. धोपेश्वरकर | बलवंत धोपेश्वरकर |
| १५७ | १४ | अडीचशे रुपये वर्गणी ज्याची त्यास | पंचवीस रुपये वर्गणी शक्य तेवढी ज्याची त्यास |
| १७९ | १७ | विचारवप्र्रतनाच्या | विचारप्रवर्तनाच्या |
| २०९ | टीप २ | जुलै १९३६ | जुलै १९३७ |
| २१० | २९ | समाविष्ट केला. | समाविष्ट केला.[२] |
| २१६ | ७ | आणि आम्ही सहन करावी ! | आणि ती आम्ही सहन करावी ! |
| २१८ | १७ | झाली. | झाली.[१] |
| २२० | टीप १ | रा. ना. टिळक | ग. ना. टिळक |
| २३४ | टीप १ | दात-कर्वे | दाते-कर्वे |
| २३९ | टीप १ | डॉ. कतकरांचे सान्निध्य | डॉ. केतकरांचे सान्निध्य |
| २४२ | टीप १ | य. रा. दात | य. रा. दाते |
| २४४ | टीप १ | दुगा भागवत | दुर्गा भागवत |
| २६० | ३३ | केतकांची | केतकरांची |
| २६८ | १७ | महाराष्ट्र नि मौर्यसत्ता | महाराष्ट्र व मौर्यसत्ता |
| २७८ | १७ | लढत होते !' | लढत होते !'[१] |
| २८६ | टीप १ | श्री. के. क्षारसागर | श्री. के. क्षीरसागर |
| २९६ | १६ | आठवतच नाही, | आठवतच नाहीत, |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २५६११ ...... वि: चरित्र
क्रमांक ...२२३...... नों: दि: ......